शु
भ
दी
पा
व
ली

# ॥ग्रंथाली॥

सप्रेम नमस्कार,

आपली प्रतिक्रिया जाणण्यास उत्सुक आहोत.

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

आपले स्नेहांकित,

सुदेश हिंगलासपूरकर, विश्वस्त

डॉ. वीणा सानेकर, कार्यकारी संपादक


अरुण जोशी, संपादक


धनश्री धारप, उपक्रम संयोजक

योगिता मोरे, संगणकविभागप्रमुख

आणि ग्रंथाली परिवार

granthaliruchee@gmail.com
granthali02@gmail.com




शब्द
रुची
दिवाळी विशेषांक
ऑक्टोबर-नोव्हेंबर २०११
मूल्य १८० रु.
पृष्ठे १७२
तुमच्या प्रगतीसाठी तुमचा आज सोबती नसेन मी
तरी भविष्यासाठी तुमच्या पुन्हा नव्याने फुलेन मी


राज्य मराठी विकास संस्था
खेळ खेळा
कल्पक
गमतीदार
राज्य मराठी
विकास संस्थेचे
सुरू असलेले प्रकल्प
• मायमराठी
(अमराठी भाषकांना मराठीचे प्रशिक्षण)
• मराठी बोलींचे प्रतिमांकन
• बृहन्महाराष्ट्रातील संस्थांना अनुदान
• मराठी संशोधन संस्थांना अनुदान
• दुर्मिळ पुस्तके व नियतकालिके संवर्धन
• संगणकीय आज्ञावल्यांचे मराठीकरण
• भाषाविज्ञान शिष्यवृत्ती योजना
• गीतार्णव शब्दार्थ संदर्भ कोश
• विधिशास्त्र संज्ञा संकल्पना कोश
• ऑलिम्पिक माहितीकोश
• रंगवैखरी- आंतरमहाविद्यालयीन नाट्याविष्कार स्पर्धा
• भाषिक कौशल्यांच्या विविध स्पर्धा
• फिरते वाचनालय
भारतातील पहिलं पुस्तकांचं गाव
स्ट्रॉबेरीसोबत पुस्तकांचा आनंद घ्या!
पुस्तके वाचायला या / राहायला या
३० घरे, २८ साहित्य प्रकार, २५,०००हून अधिक दर्जेदार पुस्तके...
मु. पो. भिलार, ता. महाबळेश्वर
जि. सातारा - ४१२ ८०५
pustakanchgaav.rmvs@gmail.com
अमराठी भाषकांसाठी 'मायमराठी' पुस्तकांद्वारे
सहा पातळ्यांच्या अभ्यासक्रमाची निर्मिती
माय मराठी
My Marathi
प्रत्येक शालेय विद्यार्थ्याकडे असलीच पाहिजेत अशी पुस्तके
शालेय मराठी शब्दकोश
₹१५०/-
विज्ञान संकल्पना कोश
सवलतीत ₹२००/-
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई - ४०० ००१
दूरभाष : (०२२) २२६३ १३२५ए २२६५ ३९६६
संकेतस्थळ : www.rmvs.in / www.rmvs.marathi.gov.in
इ-टपाल : rmvsmumbai@gmail.com


दीपोत्सवाने आपले
जीवन आनंदाने व
सुखाने उजळू दे
सर्वांना दीपावलीच्या हार्दीक शुभेच्छा
महा सुपर गृह कर्ज
ह्या दीपावलीला स्वतःच्या घरात पदार्पण करा
आकर्षक व्याज दर (रेपो रेटशी संलग्न)
2 हफ्ते फ्री*
प्रक्रिया शुल्क नाही
• किमान कागदपत्रे • परतफेड सुलभता
• सुलभ अटी • सर्व प्रकारची स्वागतार्ह सेवा
बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक
8010 633 633 नंबर वर मिस्ड कॉल द्या.
Follow us @mahabank
*नियम व अटी लागू


शुभ दिपावली
NKGSB Bank
NKGSB Co-op. Bank Ltd.
(Multi-State Scheduled Bank)
एन्‌केजीएस्‌बी रुपे प्लॅटिनम डेबिट कार्ड वापरा
आणि
आकर्षक सूट व कॅशबॅक ऑफर्सचा लाभ घ्या.
022 28602000
www.nkgsb-bank.com
PLATINUM
CARDHOLDER NAME
RuPay
DEBIT
लक्ष्मी सदन, ३६१, सरदार वल्लभभाई पटेल रोड, गिरगाव, मुंबई - ४००००४.


दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
स्वप्नपुर्ती होणार
प्रोसेसिंग शुल्क नाही
युनियन होम
5 दिवसांत मंजुरी
परतफेडीची मुदत 30 वर्षांपर्यंत
परिवर्तनीय परतफेड पर्याय
आकर्षक अटींवर गृहकर्जाचा टेकओव्हर
कोणतेही छुपे शुल्क नाही
युनियन माईल्स
2 दिवसांत मंजुरी
परतफेडीची मुदत 7 वर्षांपर्यंत
कमी प्रक्रिया शुल्क
स्पर्धात्मक व्याज दर
कर्जासाठी ऑनलाईन अर्जाची सुविधा | दैनिक घटत्या शिलकीवर व्याजआकारणी
युनियन बँक ऑफ इंडिया
Union Bank of India
Member of Banking Codes & Standards Board of India
1800 22 2244 / 1800 208 2244 | 080 6181 7110 | +91 80 6181 7110

# Well Wisher

From

## Sunil Vasant Bhosale

## Someel Creations

**Mobile : 9820833650**

न्यू इन्डिया ॲश्युरन्स परिवाराकडून सर्वांना

शुभ दीपावली

सुरक्षित करा स्वत:ला!

न्यू इन्डिया फ्लोटर मेडिक्लेम



प्रीमियर हेल्थ इन्शुरर्स..

संपूर्ण कुटुंबासाठी एकच फ्लोटर विमा रक्कम

रूग्णालयात दाखल झाल्यावर रू. १५ लाखांपर्यंत रक्कम उपलब्ध

आकर्षक झोन निहाय प्रीमियम

७४ दिवसांपेक्षा जास्त – काळजी प्रक्रियांचा फायदा

वैशिष्ट्ये:–

- संपूर्ण कुटुंबासाठी एकच फ्लोटर विमा रक्कम.
- रुग्णालयात दाखल झाल्यानंतर विम्याची लाभ रक्कम रू. २ लाख, रू. ३ लाख, रू. ५ लाख आणि रू. १५ लाखापर्यंत.
- विमा राशी व्यतिरिक्त १०% अतिरिक्त लाभ क्रिटीकल इंलनेसाठी.
- नवजात बाळासाठी विमा कवच.
- हॉस्पिटल कॅश.
- आकर्षक झोन निहाय प्रीमियम
- संपूर्ण भारतभर कॅशलेस इन नेटवर्क हॉस्पिटल्स.
- ७४ दिवसांपेक्षा जास्त – काळजी प्रक्रियांचा फायदा

*तपशीलवार माहितीसाठी कृपया माहितीपत्रकाचा संदर्भ घ्या.

लाखो लोकांचा विश्वास...

बनावट फोन कॉलपासून आणि खोट्या/फसव्या ऑफरपासून सावध रहा. आयआरडीएआय लोकांना स्पष्ट करते की : आयआरडीएआय किंवा तिचे अधिकारी हे एकतर कोणत्याही प्रकारच्या विमा किंवा वित्तीय उत्पादनांच्या विक्रीमध्ये सामील नाहीत किंवा प्रिमियमची गुंतवणूक करीत नाहीत. आयआरडीएआय कोणत्याही प्रकारचे बोनस जाहीर करीत नाही. असे कॉल प्राप्त झालेल्या लोकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी अशा फोन कॉलच्या आणि आलेल्या फोनच्या क्रमांकाच्या तपशिलासह पोलीसामध्ये तक्रार करावी.

www.newindia.co.in | online.newindia.co.in

टोल फ्री : 1800-209-1415

NEW INDIA ASSURANCE

दि न्यू इन्डिया एश्योरन्स कंपनी लिमिटेड

The New India Assurance Co. Ltd

पंजीकृत आणि मुख्य कार्यालय : न्यू इन्डिया एश्योरन्स बिल्डिंग, ८७, एम.जी.रोड, फोर्ट, मुंबई – ४०० ००१, भारत

IRDAI REGN. No. 190 CIN : L66000MH1919GOI000526 UIN. NIAHLIP13030V011213 Advt. No.NIA/CCD /17-18/030

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्मक जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

दिवाळी अंक
ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१९, वर्ष सातवे
अंक सहावा-सातवा, मूल्य १८० रु.

संपादक : सुदेश हिंगलासपूरकर
कार्यकारी संपादक : डॉ. वीणा सानेकर
मुखपृष्ठ छायाचित्र : प्रदीप म्हापसेकर
रेखाटने : ईशा सानेकर, सहकार्य : अमेय लाड

कार्यालयीन संपर्क
कॉम्प्युटर युनिट - योगिता मोरे
granthaliruchee@gmail.com
जाहिरात प्रसिद्धी - धनश्री धारप
granthaliad@gmail.com
वितरण - हरिप्रसाद जयस्वाल

केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.
वार्षिक वर्गणी ३०० रुपये डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६
संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत

## अनुक्रम

**दीपरंग**
दिव्यादिव्यांची ज्योत सांगते.../ ११
विनायक जोशी

**अक्षररंग**
हे निराकारा / १६
आश्लेषा महाजन
विश्राम बेडेकर यांचे एक दुर्मीळ पत्र / १८
डॉ. अनंत देशमुख

**जन्मतशताब्दी विशेष**
लोकसाहित्यातील चंद्र : सरोजिनी बाबर / २२
डॉ. कीर्ती मुळीक
स्वरसंमोहन / ३२
पद्मश्री पद्मजा फेणाणी-जोगळेकर
नितळ माणूसपण जपणारा : फकिरा / ३४
वृषाली किन्हाळकर
वाटेवर काटे वेचित चाललो / ४०
केशव परांजपे
तेजोनिधी-स्वरनिधी पंडित वसंतराव देशपांडे / ४४
रविप्रकाश कुलकर्णी

**कथारंग**
मोपासाकथा / ५०
श्रीकांत बोजेवार
रंग... बेरंग...! / ५८
डॉ. वंदना महाजन
पुस्तकाचे परिणाम / ६६
रवींद्र कुलकर्णी
गोष्ट / ७०
रवींद्र लाखे

**विचाररंग**
स्त्रीवाद आणि ज्यून एरिक / ७६
डॉ. अजित मगदूम
रशियागेट आणि अमेरिकन पत्रकारितेची दिवाळखोरी / ८४
डॉ. मोहन द्रविड
जागतिक घडामोडींच्या संदर्भात भारतीय अर्थव्यवस्थेचा धावता आढावा / ८८
शेखर साठे

**गौरवरंग**
नवा शिपाई /९६
**सरोज जोशी**
राष्ट्रीय पुरस्कार : काही प्रश्न / १०२
**संतोष पाठारे**

**काव्यरंग**
**सदानंद डबीर** / १०६, **गीतेश शिंदे** / १०६,
**चंद्रशेखर सानेकर** / १०७, **प्रशांत असनारे** /१०७,
**शिल्पा देशपांडे** / १०८, **श्रीपाद अपराजित** / १०९,
**छाया कोरेगावकर** / १०९, **नामदेव कोळी** / ११०,
**प्रतिभा सराफ** / ११०, **प्रकाश खरात** / १११,
**योगिनी राऊळ** / १११

**स्मृतिरंग**
लोकमान्यांचे अर्थकारण / ११२
**अरविंद व्यं. गोखले**
फंदी अनंत : कवनांचा सागर / ११६
**शिरीष गंधे**
खय्याम : प्रतिभासंपन्न स्वयंभू संगीतकार / ११८
**अरुण मळेकर**

**प्रवासरंग**
श्रीलंका एक थरारक अनुभव / १२१
**गणेश कुलकर्णी**
मला भेटलेले उबेरचे वाहनचालक / १२९
**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

**ललितरंग**
धनगरवाड्यातील कोकरांची किलबिल / १३४
**रावसाहेब पुजारी**
माणूस आहे म्हणून... / १३९
**मोहिब कादरी**
बालबच्चेवाला भोलेनाथ पाल / १४४
**भगवान इंगळे**

'ग्रंथाली' वाचकदिन वृत्तांत / १५४

ग्रंथाली पुरस्कार वृत्तांत / १५९

ग्रंथाली पुस्तकप्रकाशन / १६४

ग्रंथाली ग्रंथपाने / १६७



## संपादकीय...

युवा पिढीचे चळवळींशी, आंदोलनांशी फारसे नाते उरलेले नाही, असे खूपदा बोलले जाते, पण अलीकडे नव्या पिढीने हे वाक्य खोटे ठरवणारी ठाम भूमिका घेतली. मेट्रो रेल्वेच्या निमित्ताने आरेमधल्या हिरवाईवर घाला बसणार आहे, हे कळल्यावर अनेक तरुण-तरुणींनी बेधडक आरेकडे धाव घेतली. परीक्षांची फिकिर न करता पर्यावरणाच्या जतन-संवर्धनासाठी महाविद्यालयीन मुलांनी जोरदार आवाज उठवला. एनजीओ वगैरेंची वाट न पाहता पण कुठून-कुठून, मुलं-मुली गोळा झाली. अलीकडे तीव्रपणे जाणवणारा हवेतला दमटपणा, वाढता ओसाडपणा, शहरांचा भकासपणा अस्वस्थ करणारा आहे. शाहीर अण्णाभाऊ साठे म्हणाले होते, *माणसाला माणूस खातं लुटतं आणि लुटलं जातं...*
माणूस माणसाला तर खातोच आहे. तो निसर्गालाही गिळंकृत करतो आहे आणि तरी निसर्ग त्याचं देणं उधळतोच आहे. त्याची क्षमाशीलता, समंजसपणा, औदार्य, मोठेपणा, प्रामाणिकपणा याची माणसाला कणभरही सर नाही. माणसाच्या उजळ भविष्याकरता निसर्गाचं हिरवं जग पुन्हा-पुन्हा सिद्ध होतं.

शाळेत अशा अर्थाचं एक सुभाषित पाठ केलं होतं की झाडाला जितकी फळं धरत जातात, तितकं ते अधिक नम्र-ऋजू होतं. याचा नेमका उलट अनुभव अनेकदा

माणसांच्या बाबतीत येतो. काही माणसं मात्र यात बसत नाहीत ती विरळाच असतात. 'स्व' पलीकडे जाऊन ती माणसं समष्टीचा विचार करतात.

''माझे चुकत असेल तर तुम्ही सांगा दुरुस्त करा. मी अजूनही सत्य शोधतोच आहे.'' असे म्हणणारे म. गांधी खरोखरच होऊन गेले का? दिडशेव्या जयंतीनिमित्ताने हाडामांसाच्या या अस्सल माणसाला विनम्र अभिवादन!

यंदाच्या अंकातील 'जन्मशताब्दी विशेष' आणि 'स्मृतिरंग' हे दोन विभाग वाचकांना नितांत आनंद देऊन जातील. सरोजिनी बाबर, अण्णाभाऊ साठे, पं. रविशंकर, खय्याम, अनंत फंदी अशा माणसांनी साहित्य, कला नि संस्कृतीला दिलेल्या योगदानाचा आलेख या दोन विभागांतून साकारला आहे.

लोकमान्यांची महाराष्ट्राच्या एकूण इतिहासावरची नाममुद्रा 'अक्षर' आहे. अनेक अंगांनी त्यांच्या दूरदृष्टीचा वेध घेता येईल. 'लोकमान्यांच्या अर्थकारणा'वरील लेख या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

'आविष्कार रंगभूमी' आणि 'अरुण काकडे' हे दृढ समीकरण! 'चंद्रशाले'च्या आठवणी अनेक रंगकर्मी आज त्यांच्या जडणघडणीबाबत मोलाच्या मानतात. प्रायोगिक रंगभूमीवरच्या एका अंकाचा शोध घेण्याच्या निमित्ताने, त्यांची-माझी प्रत्यक्ष भेट झाली. बोलण्यातले मार्दव, अतिशय ऋजू स्वभाव आणि नवनवीन कल्पनांचा शोध घेणारा चळवळ्या रंगकर्मी ही काकडेकाकांची वैशिष्ट्ये! ग्रंथालीशी त्यांचं स्नेहमय नातं होतं. त्यांचा सहवास अजूनही आम्हा सर्वांच्या मनात ताजा आहे. नाट्यविषयक संवेदनशीलता रुजवण्याकरता ते आयुष्यभर कार्यरत होते. त्यांचे काम अक्षय स्मरणात राहील. अशी माणसं म्हणजे आपल्या आयुष्याला लाभलेलं वरदानच म्हणायला हवं.

अरुणोदय भाटकर हे असंच एक नाव! कविता नि त्यातही विशेषत: गझलच्या बाबतीतले ते मर्मज्ञ! उर्दू-हिंदी साहित्याचा, काव्याचा त्यांचा व्यासंग प्रचंड! तासन्‌तास या संदर्भात बोलत राहिले तरी त्यांना थकवा म्हणून नाही. भाटकरांनी स्वत:चा संसार केला नाही पण त्यांचा माणसांचा संसार मात्र फार मोठा होता. माझ्या लेकीवर त्यांची खूप माया. घरी आले की तिचं बोलणं ऐकणं हा त्यांचा खास कार्यक्रम असायचा. गझलची अचूक समीक्षा करू शकणारे भाटकर हे या काळातले एकमेव जाणकार समीक्षक होते. 'एकमेव' अशासाठी की त्यांची शैली अनन्य होती. शब्दांच्या अर्थांच्या छटा उलगडत, त्यांना भिडण्याची जबरदस्त ओढ त्यांच्यात जिवंत होती.

अरुणोदय भाटकर यांचा अथांग स्नेह आम्हाला लाभला ही भाग्याची गोष्ट! सणा-उत्सवाच्या दिवसांत माणसाच्या आठवणी अधिक व्याकुळ करतात.

० ० ० ० ०

भोवतालाचं निरीक्षण करताना जाणवतं, सगळीकडेच राजकारणाचे आखाडे उभे राहिलेत. संस्थांपासून मानवी संबंधांपर्यंत सर्वच राजकारण! रक्तानात्याच्या माणसांमध्येही स्पर्धा, मत्सर, ईर्षा यांनी टोक गाठलेलं! जीवनाविषयी आणि माणसांविषयीची परस्परांची समज वाढत नाही, तोवर विवेकाची दिवाळी साजरी होणार नाही.

मात्र कितीही निराश वाटले तरी आशेचा दिवा विझवून चालणार नाही. कैफी आझमी यांच्या शब्दात सांगायचे तर-

*हाँ, मगर एक दिया नाम है जिस का उम्मीद*
*झिलमिलाता ही चला जाता है*

विवेक आणि विचारांच्या तेजोमय - निरभ्र दिपावलीकरता लक्ष-लक्ष शुभकामना!

० ० ० ० ०

सुदेश हिंगलासपूरकर मुक्तपणे 'शब्द रुची'चा अंक करण्याचे स्वातंत्र्य नेहमी देतात; त्यामुळे मिळणारा आनंद वेगळाच! या अंकाकरता अरुण जोशी यांचे भरभक्कम पाठबळ लाभल्यामुळे दिवाळी अंकाची जबाबदारी मी निभावू शकले. धनश्री धारप नेहमीच अंकाच्या व्यवस्थापनाकरता विशेष परिश्रम घेतात आणि योगिताच्या हाती सगळे साहित्य सोपवून मी निश्चिंत असते. आपुलकीने 'शब्द रुची'चा अंक योगिता सजवते, हे नमूद करायलाच हवे. गुप्ताजी, सौमित्र आणि 'ग्रंथाली'च्या सर्व धडपडणाऱ्या सहकाऱ्यांविषयी अपार स्नेह! रसिक-वाचक या अंकाचे मन:पूर्वक स्वागत करतील, हा विश्वास आहेच!



**- डॉ. वीणा सानेकर**
सी-१२, सुयोग सोसायटी,
संत ज्ञानेश्वर मार्ग,
मुलुंड (पूर्व), मुंबई-४०००८१
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar2018@gmail.com

विनायक जोशी

# दिव्यादिव्यांची ज्योत सांगते...

**भारतात प्रत्येक भाषेत सण आणि उत्सवाची गाणी सापडतात. ही गीते आपल्या मनात प्रसन्नपणे दरवळत राहतात. अशाच काही दिवाळीगीतांचा हा भावमधुर कोलाज!**




कोणताही 'सण' साजरा करायचा म्हटला की परंपरा व नवता या दोहोंमधील मार्गाने जावे लागते. सणाशी जोडलेल्या गोष्टींचा आनंद घ्यायचा असतो व त्यामध्ये वेगळे काय करता येईल हा विचार सुद्धा डोकावतो. सणानुसार करण्याचे चविष्ट पदार्थ, रुढीनुसार पूजापाठ, नवी वस्त्रे परिधान करणे व हे सारे समूहाने करणे जेव्हा घडते तेव्हा सण छान झाला, असे आपण सहज म्हणतो. दिवाळी या सणाची आपण आतुरतेने वाट पहात असतो. असंख्य वेगवेगळ्या मार्गांनी हा सण साजरा करतो. सांस्कृतिक भावनेसह सामाजिक बांधिलकी सुद्धा जपली जाते. दिवाळी पहाट ही संकल्पना सुरू करताना 'चतुरंग प्रतिष्ठान'ने सुद्धा सांस्कृतिक-सामाजिक अशी सांगड घातली. दिवाळीच्या वैशिष्ट्यांसह पहाटे मंचावर गायन होत असताना मिळालेल्या उत्पन्नातून काही भाग हा एका सामाजिक संस्थेला भाऊबीज-भेट दिला जातो. या प्रकारे दिवाळीतील फटाक्यांच्या

आतषबाजीसह सुरांची रोषणाई होऊ लागली. पहाटगाणी तर आहेतच. त्याचबरोबर या सणाची गाणी ही संकल्पना तितकीच महत्त्वाची ठरते. दिवाळी हा गीतांचा विषय होतो आणि मराठी-हिंदी भाषेतील अनेक गाणी मिळतात व ती आठवूनसुद्धा आपला सण सुरेल साजरा होतो.

फुलबाजी हाती धरून गोलाकार फिरवत-फिरवत आपल्या मुखातून नकळत शब्द येतात...

दिन दिन दिवाळी गाई म्हशी ओवाळी
गाई म्हशी कुणाच्या? लक्ष्मणाच्या
लक्ष्मण कुणाचा? आईबापांचा...

या ओळी म्हटल्या की माझा सण साजरा होतोय हे जणू सिद्धच होते. त्याला जोडून पुढे शब्द येतात...

दिवाळीच्या दिवशी गं, आंघोळी लवकर करा
मारील नरकासुरा, माझा किसनदेव गं।
दिवाळीचा दिवा गं, अगंणी पणत्या लावा,
ओवाळीते देवा-भावा, माझ्या चोळीचा मान ठेवा गं।
दिवाळीच्या दिवशी गं, फराळाचं गोडधोड करा
आज लक्ष्मी येईल घरा, तिची सोन्यानं ओटी भरा गं।
आली वर्षाची दिवाळी, धरती सुखानं न्हाली
शिवारी बरकत आली, आली दिवाळी गं।

मग या पारंपरिक शब्दांसह मराठी-हिंदीमधील फिल्मी व गैरफिल्मी दिवाळी गीते मनात फेर धरतात. काही गाणी लोकप्रिय झाली तर काही दुर्मिळ म्हणून महत्त्व अधिक आहे. एक गोष्ट नक्की आहे की या सर्व गीतांबद्दल वाचल्यावर पहिली प्रतिक्रिया ही, ते-ते गाणे ऐकूया, अशीच असेल यात शंका नाही.

वर्ष १९३९ मधील 'माणूस' हा मराठी चित्रपट आठवा. चित्रमहर्षी व्ही. शांताराम यांच्या 'प्रभात चित्र'ची सामाजिक विषयातील ही निर्मिती आहे. हा चित्रपट खूप गाजला. त्यातली गाणी सुद्धा रसिकांना आवडली. या चित्रपटगीतांना मा. कृष्णराव यांनी संगीत दिले आहे. या गीतांच्या ध्वनिमुद्रिका 'नॅशनल ग्रामोफोन कंपनी ऑफ इंडिया, मुंबई' या कंपनीने 'यंग इंडिया' लेबलवर निर्माण केल्या. ख्यातनाम लेखक अनंत काणेकर यांची गीते होती. शांतारामबापूंच्या उत्कृष्ट टेकिंगमुळे हा चित्रपट चार्ली चॅप्लीन यांनाही आवडला होता अशी माहिती कळते. पुढील काळात या चित्रपटाची 'आदमी' ही हिंदी आवृत्ती निघाली. शाहू मोडक, शांता हुबळीकर, मा. छोटू, बाई सुंदराबाई, राम मराठे ही 'माणूस' चित्रपटातील कलाकार मंडळी. या चित्रपटातील शांता हुबळीकर यांच्या तोंडी असलेले दिवाळी-गीत खूपच लोकप्रिय झाले. आजही ते गीत ऐकण्यासाठी उपलब्ध आहे. गीत सुरू होण्यापूर्वी पडद्यावरील बालकलाकार म्हणजे पं. राम मराठे आहेत - ते विचारतात, ''मैनाबाई... मला बोलावणार ना लग्नाला?'' यानंतर गीत सुरू होते.

दिवाळी दिवाळी आली, हासत-नाचत-खेळत आली
बहर उडाला, दिवे उजळले, रंग पसरले।
बगीचा बहरला, फुलला पारिजात
उमलूनी आला हो, बहरूनी गेला गोड गोड।
फुलल्या मनी कळ्या तारा नयनीच्या
छमकत छमकत फुलल्या फुलल्या छान छान छान।

मैनाबाई म्हणजे शांता हुबळीकर, गोल-गोल फिरत फिरत, नाचत नाचत, गीत म्हणून आनंद व्यक्त करतात. मा. कृष्णरावांच्या चालीमध्ये ताना, बोलताना, आरोही-अवरोही आलाप, हमिंग ही सारी वैशिष्ट्ये दिसतातच. पडद्यावर हे गीत पाहताना बालकलाकार राम मराठे माऊथ ऑर्गन घेऊन मैनेभोवती नाचताना दिसतात. दोघांच्या अभिनयातील निरागसता स्पष्ट दिसते. हे गीत केवळ ऐकायलाच नाही तर पहायलाच हवे.

दिवाळी गीते म्हणताना ती पाडवा गीते, भाऊबीज गीते हा विषय येतोच! १९५५ या वर्षी 'भाऊबीज' हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटातील सर्वच गीते लोकप्रिय झाली. 'अत्तराचा फाया तुम्ही', 'खुलविते मेंदी माझ्या', 'चाळ माझ्या पायात', 'पडला पदर खांदा तुजा दिसतो गं'... या गाण्यांनी मराठी रसिकांना जिंकले. यासह आणखी एक गीत ऐका. ते सुद्धा प्रचंड लोकप्रिय झाले. 'सोनियाच्या ताटी, उजळल्या ज्योती'... हे ते गीत. या चित्रपटगीतांचे संगीतकार वसंत मोहिते यांनी 'भाऊबीज' या एकाच चित्रपटाची गीते संगीतबद्ध केली. सर्वच गीते सुपरहिट झाली पण याच वसंतराव मोहित्यांनी अन्य काही चित्रपट केल्याचे आढळत नाही. गीतकार संजीव यांची ही गाणी आहेत.

हे गीत आलापाने सुरू होते. छोटी बहीण नाचत-नाचत भावाचे स्वागत करते. बहिणभावांच्या मुद्रेवरील निरागसता मनाला भिडते. 'वेड्या बहिणीची वेडी ही माया' ही भावना खुललेली दिसते.

*सोनियाच्या ताटी, उजळल्या ज्योती,*
*ओवाळीते भाऊराया रे वेड्या बहिणीची रे वेडी माया।*
*माया माहेराची पृथ्वीमोलाची, साक्ष याला बाई चंद्रसूर्याची*
*कृष्ण द्रौपदीला सखा रे भेटला, पाठीशी राहू दे छाया रे।*
*चांदीचे ताट, चंदनाचा पाट*
*सुगंधी गंध दरवळे, रांगोळीचा घाट*
*भात केशराचा, घास अमृताचा, जेवू घालिते भाऊराया रे।*
*नवलाख दिवे हे निळ्या आभाळी*
*वसुंधरा अशी चंद्रा ओवाळी*
*नक्षत्रांची सर, येई भूमीवर, पसरी पदर भेट घ्याया रे।*
*चंद्र वसुधेला सखा रे भेटला, पाठिशी राहू दे छाया रे।*
*पंचप्राणांच्या वाती, उजळल्या ज्योती,*
*ओवाळिते भाऊराया रे।*

भाऊबीजेचा संदर्भ मिळताच आणखी काही गीते आठवतात. १९७५ या वर्षी संगीतकार प्रभाकर जोग यांची गीते

असलेला ‘ओवाळीते भाऊराया’ हा चित्रपट रसिकांना आवडला. त्यातील आशा भोसले यांच्या उत्कट भावनेच्या स्वरातील एक गीत संगीतप्रेमींना आवडले.

चंद्र हा गगनी, हासतो बघूनी, चांदणे शिंपूनी करी माया
ओवाळीते मी लाडक्या भाऊराया।
दिवाळीची शोभा या उजेडात न्हाली
कळस होऊनी भाऊबीज आली
जन्मोजन्मी मिळू दे तिची छाया।

हे गीत पडद्यावर पाहणे हा आनंद होता. काळजाला भिडणारी भावना प्रेक्षकांनी मनापासून स्वीकारली. जोगसाहेबांच्या संगीतातील ही एक लक्षवेधी संगीतरचना आहे.

‘ते माझे घर’ हा चित्रपट १९६३ या वर्षात प्रदर्शित झाला. सीमा, रमेश देव, राजा परांजपे, शरद तळवलकर, मधू आपटे अशी स्टारकास्ट असलेला हा चित्रपट आहे. गीतकार रवींद्र भट यांच्या चित्रशारदा या संस्थेची ही निर्मिती आहे. संगीत सुधीर फडके यांचे आहे. रवींद्र सदाशिव भट हे मराठी संतांचे चरित्र रेखाटणारे लेखक प्रसिद्ध कवी, नाटककार, पटकथाकार होते. त्यांचे मूळ गाव वाई होते. खूप मोठा माणूस असून प्रसिद्धीपराङ्मुख होते. ‘ते माझे घर’ या चित्रपटातील त्यांनी लिहिलेले, बाबूजींनी संगीतबद्ध केलेले व आशा भोसले यांनी गायलेले एक दिवाळी-पाडवा गीत तुफान लोकप्रिय झाले.

*तबकामध्ये इथे तेवती निरांजनाच्या वाती*
*दिव्या दिव्यांची ज्योत सांगते तुझी न माझी प्रीती।*
*समईसंगे आज उजळल्या या नयनांच्या वाती*
*आकाशातील नक्षत्रांच्या लक्ष लागल्या ज्योती*
*सुवासिनी मी वाट पाहते घेऊन पूजा हाती।*
*आज उगवला दिन सोन्याचा हितगूज येई ओठी*
*पतिदेवाला पूजायाला भावफुलांची दाटी*
*दिवाळीत या मंगळसूत्रा शोभा येईल कंठी।*
*तुझियासाठी देवापुढती तबक सजविले राया*
*पाट चंदनी समोर मांडून तुझीच होईन छाया।*
*तुझ्या पूजनी सार्थ वाटती युगायुगांची नाती।*

या गीताला एक वेग आहे. म्युझिक पीस सुरू झाल्यापासून व तालाचा उठाव सुरू झाल्यापासून हा वेग समजतो. हे गीत या दृष्टीने पुन्हा ऐकावे असे आहे. द्रुत लय पूर्ण गीतात सांभाळली आहे.

१९७९ या वर्षात प्रदर्शित झालेल्या ‘अष्टविनायक’ या चित्रपटाने अनेक रेकॉर्ड ब्रेक केले. अनिल-अरुण यांच्या संगीतातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. त्यातील एक दिवाळी गीत हे त्या वर्षीचे सुपरहिट गीत ठरले. आजही ते अनेक कार्यक्रमांतून गायले जाते. लोकप्रिय गायिका अनुराधा पौडवाल यांनी उत्तमरीत्या गायलेले हे गीत अभिनेत्री वंदना पंडित व अभिनेता सचिन पिळगांवकर यांच्यावर चित्रित झाले आहे.


भाऊबीज

अष्टविनायक



आई पाहिजे


शिर्डीवाले साईबाबा

*आली माझ्या घरी ही दिवाळी, सप्तरंगात न्हाऊन आली।*
*मंद चांदणे धुंद श्वास हा मी तर त्यात भिजावे*
*जन्म जन्म रे तुझ्या संगती एकरूप मी व्हावे*
*प्रीत नयनी वसे लाज गाली हसे, कोर चंद्राची खुलते भाली।*
*पाऊल पडता घरी मुकुंदा गोकुळ हरपून गेले*
*ऊटी लावता अंगी देवा सुगंध बरसत आले*
*हर्ष दाटे उरी आले घरी, सूर उधळीत आली भूपाळी।*
*नक्षत्रांचा साज लेऊनी रात्र अंगणी आली*
*दीप उजळले नयनी माझ्या ही तर दीपावली*
*संग होता हरी जाहले बावरी, मी अभिसारिका ही निराळी।*

आरंभीला सनईचे सूर मनातले वातावरण मंगलमय करतात. पडद्यावर भुईनळे, फटाके हे दृश्य मनोहारी ठरते. आकाशकंदील व शेकडो पणत्या हे पाहताना मन हरखून जाते. अभिनेत्री वंदना पंडित यांनी आपल्या अभिनयाने हे गीत सजवले आहे. आणखी एका कारणासाठी हे गीत पुन्हा पुन्हा ऐकावे-पहावे असे वाटते. ते म्हणजे संगीतकार अनिल अरुण यांनी शब्दातील अर्थाला चाल बांधलेली दिसते. अशा अनेक गोष्टींमुळे हे गीत लोकप्रिय झाले यात दुमत नाही.

१९८८ या वर्षातील 'आई पाहिजे' या चित्रपटातील संगीतकार अशोक पत्कींनी स्वरबद्ध केलेले गीत गाजले. शांताराम नांदगांवकर यांचे शब्द आहेत. मधुर स्वरयोजना हे संगीतकाराचे खास वैशिष्ट्य या गीतात सुद्धा दिसते.

*लक्षदीप हे उजळले घरी, दारी शोभली सडा रांगोळी*
*फुलवाती अंगणात सोनसकाळी, आली दिवाळी।*
*आनंदयात्रा जणू ही दिव्यांची, स्वर्गातूनी ये रात वैभवाची*
*चांदण्याच उतरल्या या धरेवरी,*
*सौख्याच्या घेऊ चला भरून ओंजळी, आली दिवाळी।*
*तुळस डोलते ही वृंदावनात माझ्या*
*पूजिते मनोमनी तुला पतिराया*
*धनी तू कुंकवाचा, माझे सौभाग्य आता*
*तुजसाठी माझ्या या प्राणज्योती रे।*
*वात्सल्य पान्हा देऊनी तुला मी*
*केले कळीचे फूल गोजिरे मी*
*लोचनांत ठेवुनी तुला सोनुल्या*
*रे तुलाच पाहते मी जळी स्थळी, आली दिवाळी।*

या गीतातील दुसऱ्या अंतऱ्यानंतर पुन्हा गीत मुखड्याकडे येत नाही. थेट तिसऱ्या अंतऱ्याआधीचे म्युझिक सुरू होते.

१९७६ या वर्षात 'माझा मुलगा' हा चित्रपट प्रदर्शित झाला. गीत-संगीत दोन्ही यशवंत देव यांचे आहे.

*दिवाळी येणार, अंगण सजणार, आनंद फुलणार घरोघरी,*
*आमच्या घरी अन् तुमच्या घरी।*
*रुप्याच्या ताटात दिवाळी अक्षत*
*ओवाळणी थाटात घरोघरी, आमच्या घरी अन्...*

नवलाख तळपती दीप विजेचे येथ, उतरली तारकादळे जणू नगरात ...हा भाव या सर्व गीतांत दिसतो. पहाटे गीतातले कळस ठरलेले गीत सुद्धा दिवाळी गीत नसले तरी प्रकाश भावनाच व्यक्त करते. ते गीत म्हणजे...*नवल वर्तले गे माये उजळला प्रकाशु... मनाचिये अंधाराचा होतसे विनाशु...*

मशाली हाती धरून समूहाने गायलेले 'लखलख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया' हे गीतसुद्धा कोटी ज्योती झळाळल्याचा आनंद निर्माण करते.

कवी शंकर रामाणी यांचे एक मराठी गीत हे दोन संगीतकारांनी स्वरबद्ध केले. एक पं. जितेंद्र अभिषेकी व दुसऱ्या गायिका-संगीतकार पद्मजा फेणाणी-जोगळेकर

*दिवे लागले रे दिवे लागले*
*तमाच्या तळाशी दिवे लागले।*
*दिठींच्या दिशा खोल तेजाळताना*
*कुणी जागले रे कुणी जागले।*
*रित्या ओंजळी दाटली पुष्पवृष्टी*
*असे झाड पैलाड पान्हावले*
*तिथे मोकळा मी मला हुंगिताना*
*उरी गंध कल्लोळनी फाकले।*
*उभा रोमरोमातुनी चैत्रवारा*
*कुणी देहयात्रेत या गुंतले*
*आरक्त त्यांच्या कृपेच्या कडा अन्*
*उषासुक्त ओठांत ओथंबले।*

गायिका पद्मजा फेणाणी-जोगळेकर यांची स्वरयोजना उत्तम आहेच. या गीतांचे त्यांचे गायन प्रभावी आहे. पं. अभिषेकीबुवांनी पूरिया कल्याण या रागात बांधणी केली आहे. पूर्वी, मारवा, पूरिया अशा विविध अंगाने हा राग गायला जातो. या अभिषेकीबुवांच्या स्वररचनेत हे सर्व सूर दिसतात.

हिंदी भाषेतील दिवाळी गीते आठवताना पटकन ओठावर येणारे गीत म्हणजे 'शिर्डी के साईबाबा' या चित्रपटातील श्रेष्ठ गायिका आशा भोसले यांनी गायलेले गीत!

*दीपावली मनाई सुहानी*
*मेरे साई के हाथोंमें जादु का पानी।*
*श्रद्धा का दीपक, भक्ती की ज्योती*
*सत्य प्रेम की जलती निशानी, दिपावली..।*
*मेरे साई की अमृतवाणी*
*मैं तो भई रे साई दिवानी*
*द्वारकामैया ये वेद पुरानी, दिपावली..।*

साईबाबांच्या चमत्काराने ठायी-ठायी दिवे निर्माण होतात. या दृश्याने या गीताची पडद्यावरील सुरुवात आहे. सनई या वाद्याने मंगलमय वातावरण निर्माण केले. या सुपरहिट गीताचे गीत-संगीत दोन्ही पांडुरंग दीक्षित यांचे आहे. हे गीत पडद्यावर पाहताना विलक्षण आनंद मिळतो.

१९६१ या वर्षातील 'नजराना' या चित्रपटातील गायक मुकेश यांनी गायलेले गीत आठवून पहा.



'भाऊबीज' चित्रपट

राजेंद्रकृष्ण यांनी लिहिलेल्या या गीताला संगीतकार रवी यांनी स्वरबद्ध केले. दिवाळीगीत आहे, परंतु करुणरसप्रधान आहे.

*एक वो भी दिवाली थी, एक ये भी दिवाली है*
*उजडा हुआ गुलशन है, रोता हुआ माली है।*
*बाहर तो उजाला है मगर दिलमें अंधेरा*
*समझो ना इसे रात ये है गम का सवेरा*
*क्या दीप जलाएँ हम, तकदीर भी काली है...।*
*ऐसे ना कभी दीप, किसी दिल का, बुझा हो*
*मै तो वो मुसाफिर हूँ जो रस्तेमें लुटा हो।*
*ऐ मौत तू ही आजा दिल तेरा सवारी है...।*

गायक मुकेश यांनी गायलेले हे गीत ऐकण्यास उपलब्ध आहे. सारंगी व सतार या वाद्यांमुळे गाण्यातील भावना गडद होते.

काही अलिकडच्या व्हिडिओ अल्बममध्ये अनेक आघाडीच्या गायकांनी एकत्र गायलेले 'आयी है दिवाली, सुनोजी घरवाली' हे नृत्यप्रधान वाटावे असे गीत ऐकायला मिळते.

१९६२ या वर्षी प्रदर्शित झालेल्या 'हरियाली और रास्ता' या चित्रपटातील एका गीतातील विरहभावना ही दिवाळीच्या पार्श्वभूमीवर दिसते. मनोजकुमार व माला सिन्हा यांच्यावर चित्रित झालेले हे गीत आहे.

लाखो तारे आसमामें एक मगर ढूँढे ना मिला
देख के दुनिया की दिवाली, दिल मेरा चुपचाप जला।

ॲकॉर्डियन या वाद्याच्या सुराने संपणारे हे गीत. शब्दातील आशय पुन्हा अधोरेखित करते.

खूप वर्षांपूर्वी 'चतुरंग' संस्थेची दिवाळी पहाट ठाण्यातील गडकरी रंगायतनमध्ये संपन्न झाली. भैरव राग के प्रकार या विषयातील 'नादावलेली अक्षरे' या शीर्षकाचा कार्यक्रम किराणा घराण्याच्या ख्यातकीर्त गायिका डॉ. प्रभा अत्रे यांनी सादर केला. माझा भाग्ययोग म्हणजे त्या कार्यक्रमात सर्व गीत सादरीकरणाचे निवेदन करण्याची संधी मला मिळाली. त्यात भैरवी गाताना
डॉ. प्रभाताई अत्रे यांच्या बंदिशीमध्ये अनोखे शब्द होते...

*आस पुरी हो मेरी तुम्हारी*
*आओ मिलकर मनायें दिवाली।*

दिवाळी गीतांनी सण साजरा करताना
*रुणझुणले काळजात, लखलखले लोचनात*
*अंबरात, अंतरात, एकरूप हे*
तेजोमय नादब्रह्म हे.. ही भावना मनात येते.

प्रवीण दवणेंचे शब्द व श्रीधर फडके यांची स्वररचना व सुरेश वाडकर, आरती अंकलीकर यांचे स्वर आपले अंतर्मन उजळण्याचे लक्षवेधी काम करतात. प्रवीण दवणेंनी खूप वर्षांपूर्वी एक बालगीत लिहिले. गायिका देवकी पंडित यांनी गायलेली, ती पहिल्यावहिल्या ध्वनिमुद्रिकांपैकी एक अशी आहे. संगीत नंदू होनप यांचे आहे.

*फुलबाज्यांची झाडे अंगणात लावू*
*टपटपणाऱ्या फुलाफुलांना रंग नवे देऊ।*
*स्वर्गीतील ती नक्षत्रे आली आज भेटाया*
*आभाळीचा चंद्र लागला घरापुढे ग डोलाया*
*गरगर भुईचक्राला नवा ताल देऊ।*
*माळ लवंगी भारीच उद्धट अंगणात तडतडते*
*तिची करामत पाहूनी तेव्हा पणती ही घाबरते*
*आनंदाच्या तेजासंगे गीत गोड गाऊ।*


**– विनायक जोशी**
भ्रमणध्वनी : ९८२१२३७११३
vinayakpjoshi@yahoo.com


आश्लेषा महाजन

# हे निराकारा....

ज्ञानेश्वरीचा ईश्वरी अलौलिक पैस दे...
गाथेतला आनंदाच्या डोहातला आनंदतरंग दे
समस्त संतांचा मानव्याचा परमार्थ दे..
महदंबेच्या धवळ्यांतून आद्य कवयित्रीचा उन्मेष दे...
पंतकवींचे भाषाभिमानी लळित दे...
तंतकवींचे, लोकसाहित्याचे लौकिक रसाळपण दे...
गाथासत्तसईतील धीट मोकळेपणा दे...
जेथे जाईन तेथे केशवसुतांची भावंडे दे ..
गोविंदाग्रजांचा कणखर दगडांचा देश कुठे हरवला आहे?
तो तर देच, पण– निसर्गाशी प्रगाढपणे विलोपलेली
बालकवींची स्वप्नील एकतानताही दे...
माधव ज्युलियनांची मनस्वी प्रयोगशीलता दे,
विश्वाच्या आंगणात शुद्ध रसपान करणारा,
बींचा चाफा मिळू दे मला आंदण...
'पळभर हाय हाय' करणारा तांब्यांचा निर्मोह दे ..
दु:ख तयघरात कोंडून, सुख हंड्याझुंबरात सजवणारी,
बहिणाबाईची साक्षरता दे...
कार्यकारणभाव सांगणारी शास्त्रकाट्याची मर्ढेकरी कसोटीही दे...
वैचित्र्याला रंगवणारे केशवकुमार अत्र्यांचे झुंजार विडंबन दे,
बाकीबाबांप्रमाणे जीवन आकळून पक्क फळापरी मीपण गळू दे
अन् अनिलांचे स्वत:च निवारा शोधणारे शांत तळे दे ...
कुसुमाग्रजांचा प्रेमयोग रोमरोमी भिनू दे...
गदिमांची प्रातिभ वीणा झंकारू दे घरीदारी...
पु.शिं.च्या स्त्री–प्रतिमांमागचा 'पुष्कळा, पुष्कळां'चा पारा दे...
नाघंची शीळ येऊ दे ओठांवर ओतप्रोत..
विंदांच्या देणाऱ्याचे हात येऊ देत हातात,
पाडगावकरांप्रमाणे होऊ दे माझे जीवनगाणे गाणे...
बापटांचे गगन सदन तेजोमय– बरसो माझ्या अंगणात...
महानोर, घन ओथंबून येवोत, शिवारातल्या चांदणे लखडलेल्या
जोंधळ्यासाठी...होऊ दे आबादानी...
उत्तररात्रीतून मिताक्षरी उत्तरे दे– कलंदर किणीकरांच्या
फकिरीची... चित्रे, कोलटकर, डहाकेंच्या अमूर्त शैलीतील
किंचित आकलन दे...
जगड्व्याळाचे गूढगुंजन करणारे ग्रेसांचे भय इथले
विरून जावो संध्येनंतरच्या चंद्रमाधवीत...
आयुष्याच्या मशाली पेटत्या ठेव काळरात्र झाली तरी,
भटांचा एल्गार वाहू दे रक्तात... होऊ दे मुक्तिबोध...
तमाच्या तळाशी दिवे लावणारे रामाणींचे हात असोत हातात...
सुर्वे, माझ्या सुरक्षित औरस–चौरसाला विमुक्त विद्यापीठाचे
आवार द्या...
वंचितांची काळोखी जिंदगानी ढसाळांच्या समतासूर्याने
प्रकाशू दे... उत्थानगुंफेतील क्रांतीतून युगांतराची मनोहर
सुबुद्ध जाण दे...
कुरूपा कुब्जेतील सौंदर्य शोधणारी विरहार्त
इंदिरेची मधुराभक्ती दे...
संजीवनींच्या मनातली ऊर्वशी भिनू दे जनात शब्दांतून...
पद्मा यांची आकाशवेडी पक्षीण भरारू दे उंचच उंच...
शांताबाईंची 'जन्मजान्हवी' वाहू दे धमन्यांमधून...
अजूनही खूप काही आहे जे अभिव्यक्त झालंय्–
सर्जनशील मनांच्या गाभ्यातून, कथा–कादंबरी–नाटकांतून,
काव्यशास्त्रविनोदातून, ललितरम्य नवरसांतून...
ह्या सर्वांचा माणसामाणसांत हसरा विवेकी पूल बांध,
पु.लंसारखा!
जे जे सुंदर, उदात्त, उन्नत, महन्मधुर ते ते सारे तर देच, पण–
रौद्र–भीषण–बीभत्स–क्रूर–दु:ख–दैन्य–अश्लाघ्य...ही विरुपेही
मला कळू दे...
मी व्यापक होत विराट झाले कदाचित तर,
नि:शब्दाची शून्य पोकळी दे...
निराकारा...

**– आश्लेषा महाजन**
भ्रमणध्वनी : ९८६०३८७१२३
ashlesha27mahajangmail.com






# प्रकाश भातम्ब्रेकर द्वारा अनूदित नवीनतम कृतियां

12, रोज़ विला, गोरेवाडी, माहिम, मुंबई - 400 016

मो. + 91 93244 09490 / 79779 10107




**2019**

शैलेश कुमार सिंह तथा डॉ. रणजीत साहा की प्रस्तावना. 14 समकालीन कहानीकारों की अनोखी रचनाधर्मिता की यथार्थ अभिव्यक्ति. पृष्ठ 343, ₹696/- विजया बुक्स, दिल्ली -32



**2018**


रणधीर शिंदे की प्रस्तावना. 21 वीं सदी की मराठी कविता की दिशा और दशा को अधोरेखित करनेवाले 62 कवियों के सशक्त हस्ताक्षर. पृष्ठ 192, ₹395/- विजया बुक्स, दिल्ली - 32

**2018**

अरुण कमल की प्रस्तावना. ईसाइयत और बाइबिल के गहन संदर्भ हिन्दी में पहली बार उजागर करनेवाली सार्थक अभिव्यक्ति. पृष्ठ 192, ₹395/- विजया बुक्स, दिल्ली - 32



**2018**




एक आदिवासी के IAS बनने की प्रेरणादायी संघर्ष गाथा. प्रभात प्रकाशन, नयी दिल्ली - 2 पृष्ठ 183 , ₹350/- किफायती संस्करण ₹ 175/- सरस्वती विहार, दिल्ली - 2



**2018**

विख्यात आंतर्राष्ट्रीय मल्याळी कवीची अत्यंत तरल भावाभिव्यक्ति. पाने 168, ₹220/- कॉपर कॉइन पब्लिशिंग, गाझियाबाद




**2017**

वर्तमान पीढ़ी की बेबाक, खुद्दार किन्तु संवेदनशील महिला लेखिका की पांच अनूठी, लम्बी कहानियां. पृष्ठ 182, ₹350 शिल्पा विहार, दिल्ली - 2

**2016**

महानगरों की लीचड़ जिंदगी के विभिन्न पहलुओं को कारगर अभिव्यक्ति प्रदान करनेवाली दमदार कहानियां. पृष्ठ 172, ₹150/- साहित्य अकादेमी, दिल्ली - 1





**2015**

प्रकृति के प्रति कृतघ्नता करते हुए समूची मानवता को विनाश के कगार पर पहुंचा रही पीढ़ी को सावधान करनेवाली गुहार. पृष्ठ 144, ₹350/- राधाकृष्ण प्रकाशन, दिल्ली - 2




**2014**




स्वरसम्राट के सांगीतिक जीवन के उतार-चढ़ावों को सरस-सुमधुर शैली में प्रस्तुत करती एक जीवनी. पृष्ठ 271, ₹400/- प्रभात प्रकाशन, नयी दिल्ली - 2




**2013**

सामान्य परिवार में जन्मे तथा अभावग्रस्तता में पले-बढ़े प्रखर जननेता के संघर्षमय जीवन की अद्भुत आत्मकथा. पृष्ठ 282, ₹300/- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - 21

डॉ. अनंत देशमुख

# विश्राम बेडेकर यांचे
# एक दुर्मीळ पत्र

अलिकडेच सुप्रसिद्ध साहित्यिक विश्राम बेडेकर यांनी १९३०-१९४० दरम्यान लिहिलेली पत्रे उपलब्ध झाली आहेत. या पत्रांमधून त्यांच्या तत्कालीन मानसिक आंदोलनांची कल्पना येते. त्यात त्यांना एक नाटक लिहायचे होते. त्यासंबंधी त्यांनी इथे विवेचन केले आहे. दुर्दैवाने त्यांनी हे नाटक लिहिल्याचे दिसत नाही.



*'येथे प्रकाशित करीत असलेले पत्र श्री. वि. चिं. बेडेकर यांनी आपल्या एका मित्राला लिहिलेले आहे. या सुमारास त्यांनी ब्रह्मकुमारी हे नाटक लिहून पूर्ण केलेले होते. पण ते प्रकाशात मात्र आले नव्हते.*

*या पत्राच्या वाचनाने मला जे काही मिळालं, ते माझ्या वाचकांनाही पोहोचवावे एवढ्याच भावनेने हे पत्र येथे देत आहे. यासाठी या पत्राचा विषय, त्याची लांबी रुंदी व उंची ही सारी बंधने झुगारून द्यावी लागत आहेत.*

*पत्रप्रकाशनाला परवानगी घ्यावी लागते ती मी घेतलेली नाही. यामुळे मला काहींचा रोषही पत्करावा लागणार आहे.*

*आजच या पत्राला पन्नास वर्षे झाली.'*

HVMole
7-11-79

हा हरिभाऊ मोटे यांनी लिहिलेला मजकूर असून परिणामतः तो असा अप्रसिद्ध राहिला होता.

मात्र कालांतराने मोटे यांचा विचार बदलला. त्यांनी ०७-११. (१९) ७९ या तारखेला त्यावर पुढील मजकूर लिहिला आहे-

हा संपूर्ण भाग रद्द केला आहे. या माझ्या पुस्तकात नको. इतरत्र प्रसिद्ध करणार आहे.

म्हणजे मूळात हरिभाऊंना हे त्यांच्या आत्मचरित्रात घ्यायचे होते. त्यानुसार त्यांनी प्रेसकॉपी करताना त्याचा अंतर्भाव केलेला. पुढे विचारांती त्यांना ते बाजूला ठेवावेसे वाटले आणि त्या आधी तशी नोंद करून त्यांनी ते ठेवलेही. मात्र 'आपण त्याचा पुढे उपयोग करू' असे जे त्यांनी लिहिले तसे त्यांना कदाचित वार्धक्याने जमले नसावे आणि त्याची रवानगी बासनात झाली असावी.

मुळात हे पत्र कोणी आणि कोणाला लिहिले आहे ते इथं स्पष्ट होत नाही. बहुधा हरिभाऊ मोटे यांनी लिहिलेल्या नोंदीवरून ते नागपूरच्या एका स्नेह्याला विश्राम बेडेकर यांनी लिहिलेले असावे. बरे, ज्या स्नेह्याला त्यांनी आपल्या संकल्पित नाटकाचा सारांश इतका तपशीलात कथन केला त्याला आपली कोणतीही वैयक्तिक बाब सांगितलेली नाही, त्याचीही ख्यालीखुशाली विचारलेली नाही. मात्र आपल्या वृत्तीविषयी आणि कलावंत मनाविषयी ते आवर्जून लिहिले आहे.

शिवाय पत्रावरची तारीख हरिभाऊंच्या नोंदीनुसार २१ आ. २९ म्हणजे १९२९ मधली आहे. तेव्हा हे पत्र बेडेकरांनी खरेच नागपूरच्या कुणा मित्राला लिहिले होते का ते प्रत्यक्ष कृष्णाबाईंना-कारण बेडेकर आणि कृष्णाबाई यांचा तेव्हा तसाच स्नेह होता- हेही कळायला आता मार्ग नाही.

* * *

**आ**णि खरेच सांगतो विजेच्या रेषेने डोळे दिपवून टाकण्यापूर्वी, ज्याप्रमाणे आकाश प्रसूतिवेदनेने कळवळून ओरडते त्याप्रमाणे माझे मन काहीतरी-काहीतरी अचाट असे करावयाला सापडावे म्हणून तगमग करते आहे. माझ्या मनातले विचार इतके भयंकर आणि मन विटवणारे असतात की, मी मूळचाच सैतानी वृत्तीचा तर नाही ना अशी मला शंका येऊ लागली आहे. माझ्या तळमळीची जर मला जाणीव नसती तर त्या विचारांचा अंशही शब्दरूपाने व्यक्त होऊ देण्यास मी धजतो ना! पण माझ्याच्याने राहवत नाही. माझे हृदय कलावंताचे आहे-स्त्रीचे आहे हे मला पटले आहे. परवा हरीला मी Rosa Lina चे वाक्य सांगितले तेच खरे. ''I am a woman when I think I must speak.''

पण मला जे काही सांगावेसे वाटते. ते सांगताना जगाला कितपत भ्यावे हाच सध्या माझ्यापुढे प्रश्न आहे. बिरबलाच्या एका गोष्टीत, एका वानरीला पिलासकट पाण्याच्या पिंपात टाकून वागण्यावरून त्याने बादशहाला दाखविले की, पोटच्या अपत्यापेक्षा स्वत:चे प्राण आईला जास्त प्रिय वाटतात. जग याच कल्पनेवर स्वंथ करीत आले आहे. मला याच्या उलट सांगावयाचे आहे. प्राणच काय पण प्राणापेक्षाही प्रिय वाटणाऱ्या आपल्या अब्रूवर पाणी सोडायला सुद्धा आईचे अंत:करण तयार होते.

माझ्या नवीन नाटकाचे नाव 'आई'. हरी इथे आला असताना त्याचे जे नुसते बीज माझ्या मनात घोळत होतो, त्याचे आता 'कल्पनेत उमटणाऱ्या आपल्या आवडत्या माणसाच्या आठवणी' इतक्या स्पष्ट स्वरूपात रूपांतर झाले आहे. नाटक तुम्हाला आवडणार नाही आणि समाजाला तर नाहीच नाही. पण मी तरी काय करू? ती ती पात्रे माझ्या डोक्यात सध्या इतका धुमाकूळ घालताहेत की, त्याला दुसरी तोड मला सुचतच नाही.

एक तरुण वेश्या आहे. नृत्य आणि गायन तिला इतक्या कसबाचे येते आहे की ते पाहून, मूळ नाटक कितीही खराब असते आणि कंपनी भिकार निघाली तरी पैसा मात्र खोऱ्यानी खिशातून जाऊ देण्यासाठी लोकांनी तयार व्हावे. पहिल्या अंकाच्या शेवटी ज्यावेळी तिच्या इथे धंद्यात पडण्याच्या पूजाविधीच्या निमित्ताने रंग उडतो, त्यावेळी गावातल्या एका प्रौढ आणि घरंदाज श्रीमंत चिताऱ्याने तिच्या इथे आपण होऊन चालत यावे इतके आकर्षण तिथे असण्याइतका त्या नायकिणीच्या रूपाचा लौकिक असतो. स्वार्थीपणात त्या चिताऱ्याच्या मनाची जोड कोकणस्थानात सुद्धा सापडणार नाही. (आणि कोणचा कलावंत स्वार्थी नसतो?) तिच्या धंदेवाईकपणाला त्याच्या मर्जीची चटक लागून आणि पैशाची ढिली दिसून, त्यांची चांगलीच गट्टी जमते, यांतही नवल नाही.

पण शरीर आणि धंदा वेश्येचा असला तरी मूळचे स्त्रीचे मन मेलेले नव्हते. प्रथम चैनीच्या चटक्याने विलासासाठी उत्सुक होणारे तिचे हृदय, नंतर गरम रक्तात सळसळणाऱ्या मदनाने गदगदा धरून हलवल्यामुळे व्हावे तसा केवळ कामेच्छेने तिच्या शरीराला सुटणारा कंप आणि शेवटी स्त्रीहृदयातल्या वीरपूजेच्या कोमल भावनेला विरंगुळा होऊन बसलेल्या त्या चित्रकारामुळे खरोखरीच्या जोडीदाराच्या मिलनासाठी हपापण्यास शिकलेल्या हृदयात मागच्या दोन वृत्तींचे रूपांतर, ही परिवर्तने इतक्या झपाट्याने घडून आली की त्यासाठी एक अंकाच्या वर जागा अडवण्याचे नाटक-कर्त्यालाही कारण दिसत नाही. तिच्या रूपमदाने धुंद झालेल्या त्या प्रौढाचे घरच्या स्त्रीकडे आणि मुलांबाळांकडे दुर्लक्ष होण्याबद्दल कुणालाच काही वाटण्याचे कारण नाही कारण प्रथमपासूनच त्याची वृत्ती अति स्वयंकेंद्रित होती.

केवळ देहाची मालकी दुसऱ्याला देऊन मोबदल्यात सर्व सुखसोयी आणि बडेजाव मिळवायचा ही जर वेश्यापणाची व्याख्या आपण मनात वागवली तर त्याची बायको पत्नी असून खरी वेश्या होती. नवऱ्याच्या सुखोपभोगापुढे स्वत:चे अस्तित्वही विसरण्याइतकी ती सिंधू होती. तिच्या १७-१८ वर्षांच्या मुलाची ओढही या नव्या 'आई'कडे लागली तरी तिला त्याची

खंत नव्हती.

या शांत आणि सुखमय वातावरणात नाटककर्त्याने आणलेले पहिले विघ्न म्हणजे त्या नव्या आईचे मातृपदाच्या मार्गावर पहिले पाऊल. आपल्या प्रियकराची मूर्ती प्रतिमारूपाने हृदयात (वास्तविक पोटच म्हणावयाला पाहिजे पण काव्यांत पोटाचा संबंध फारच वाईट दिसतो. रसाचे सेवनसुद्धा रसिकांच्या हृदयाने करावयाचे असते, पोटाने नव्हे.) बाळगायला मिळण्याइतके भाग्य लाभल्याबरोबर त्याची बातमी आपल्या प्रियकराला देताना तिच्या झालेल्या उत्कट आनंदाचा पूर्ण विरस व्हावा इतका त्या 'पुरुषा'ला त्याचा धक्का बसतो. 'स्त्री'च्या तारुण्याचा आणि सौंदर्याचा आपण निरपवाद उपभोग घ्यावा हे त्याच्या पुरुषी मनाचे ध्येय. आपलाच मुलगा का होईना पण त्याने तिच्या तारुण्यावर आणि सौंदर्यावर घाला घालावा हे त्यास सहन होत नाही. जातीची वेश्या असून या असल्या धंद्यांतल्या अडचणींची अगोदर व्यवस्था लावण्या-
इतके धोरण तिच्या अंगी कसे नव्हते, याचे त्याला आश्चर्य वाटते. आणि तो तिला उघड विचारतो की, तिच्या जातकुळीत असल्या स्त्रिया निघू
लागल्यावर विवाहित स्त्रियाची रमणीयता ज्या अनेक कारणांनी उड्या टाकीत ओसरत जाते त्यांना कंटाळून वेश्यांचा उद्धार करावयास निघणाऱ्या रसिकांना (रूपमदिरेच्या सेवनाकरिता उत्कंठित झालेले) तोंड तरी कसे राहील? आणि शेवटी उपाय-उपाय तोच की जो अवलंबिण्याची वेश्यामनाची सुद्धा सहजासहजी तयारी नसते!

हे ऐकून त्या वात्सल्यप्रेमाने समुत्सुक होऊ पाहणाऱ्या मातेच्या मनाला काय वाटले- आकाशाच्या पोकळीत चंद्रकिरणांच्या स्रवण्याने जगज्जननीच्या होत असेल असा दुधाच्या धारांनी सारख्या भरत जाणाऱ्या तिच्या स्तनांना (पुढे मला काही सुचत नाही) ....थोडक्यात सांगतो, तिच्या वेदनांची कल्पना नाटककाराला विचारावी. अनेक रम्य उपमांच्या साहाय्याने आणि त्वेषमय प्रतिरोधाने जेव्हा ती त्या स्वार्थ्याशी त्या प्रवेशात भांडेल तिथपर्यंत वाट पाहत बसणे तुम्हा अभाग्यांना भाग आहे. माझे कान मात्र आताच ते हुंदके, ते श्वास, त्या विनवण्या ही सर्व परवांपासून सारखे ऐकत आहेत.

ती होती तरुण आणि सुरेखही पण. तो प्रौढ होता आणि समंजस होता, पण किती तर हे असले पाखरू हातांतून सुटल्यावर तिची जोड पाहायलाही मिळायची नाही हे समजण्याइतका! तेव्हा त्याने तिची समजूत घालायला सुरुवात केली. गर्भावर शस्त्रक्रिया करून बाळंतपणाच्या




संभवाचे पूर्ण उच्चाटन करून आपले सौंदर्य आणि तारुण्य शक्यतो टिकवण्याचे ती कबूल करीत असल्यास तो वाटेल ते तिला मोबदल्यात देण्यास तयार झाला. पुरुषमनाने गुलाम म्हणून वागविलेल्या स्त्रियांच्या लोखंडी बेड्यांना पत्निपदाच्या सन्मानाची जो सुवर्णरस चढविला असतो तसल्या सुवर्णाचे दागिने त्याने तिला देऊ केले. स्वतःचे पत्नीपद आणि अर्ध्या इस्टेटीची मालकी तिला देऊ केली. गरीब बिचारी मुलगी! गरीब बिचारी वेश्या! बिचारी माता! तिने पहिल्यांदा या सर्व गोष्टी नाकारल्या. गडकऱ्यांच्या नायिकाचे भूत तिच्या अंगात संचारून तिने स्त्रीच्या प्रत्येक शब्दाला टाळ्या मिळविण्याइतके काव्यमय आणि जोरदार भाषण केले आणि (कल्पनेत पोटच्या गोळ्याला पाठीशी घालून) जिवावर उदार होऊन त्याच्याशी ती भांडली. तिने त्याला सांगितले, ''मला आई व्हायचे आहे. आजपर्यंत मी खेळवलेल्या बाहुल्यांच्या डोळ्यांत जिवंत पाणी खेळलेले मला पाह्यचे आहे. त्यांच्या लाकडी आणि मेणाच्या ओठांतून अमृताच्या धारा स्रवलेल्या मला पाहायच्या आहेत.''

पण त्याने तिला घरांतून घालविण्याची गोष्ट काढल्यावर त्याच्या संगतीला आणि प्रेमाला मुकावे लागेल या कल्पनेचा चटका तिला चाटून गेला. गडकऱ्यांचा तिच्या पाठीवर असलेला हात दूर झाला आणि मधून-मधून डोळे पुसणाऱ्या प्रेक्षकांचे हातही खालीच राहिले. ती माझ्या पूर्ण हातात सापडली. नसानसांतून हाक देणारा मदन, डोळ्यांना भुलविणारे वैभव आणि बुद्धीला भ्रम पाडणाऱ्या लटक्या प्रेमाच्या फसवणुकी यांनी तिला बुचकळ्यात पाडले आणि शेवटी त्याच्या 'तू अगदी वेडी आहेस. तुला आईपणाचे समाधान द्यायला ही माझी (पहिल्या बायकोची) मुले आहेत' या शब्दांनी तर ती इतकी विरघळली की, दुसऱ्या अंकाच्या शेवटी असंख्य प्रेक्षकांना असंतुष्ट करून त्याचा हात धरून ती पडद्याआड निघून गेली!

नाटक वास्तविक इथेच संपायचे, पण कर्त्याच्या हेतूचा होणारा विपर्यास टाळण्यासाठी आणि मुख्यतः इतर पात्रांनी नायिकेच्या आयुष्यात चालविलेल्या ढवळाढवळी पुढे येणाऱ्या संकटांच्या तीव्रपणामुळे पुढे नाटक चालणे इतके अपरिहार्य होते की मध्यंतरी थोडा काळ गेलेला आहे असे दर्शविण्यापुरता वीसेक मिनिटे वेळ गेल्यानंतर अंकाचा पडदा आपोआप वर उघडतो.

अजून तिच्यावर शस्त्रक्रिया झालेली नसते. मात्र ती होणार या कबुलीमुळेच तिचे घरातले वास्तव्य शक्य झालेले असते. त्याने सहजासहजी केलेल्या सूचनेमुळे आणि गर्भाच्या

वृद्धीबरोबर अधिकाधिक उत्कटतेने उचंबळणारे तिचे मातृप्रेम पोटच्या पोराला जन्माआधीच मुकावे लागणार या भयंकर कल्पनेने अधिकच उद्रेकोन्मुख होते, त्यामुळे त्याच्या अठरा वर्षाच्या मुलाची आणि तिची गट्टी जमते. स्त्रियांच्या नित्य व्यवहारांत, भाषणांत आणि इतर संबंधात एकंदरीनेच रूढीने आणि मूळच्याच अंत:करणाच्या कोमलतेने वैषयिक बाबतीत जास्त संयम असतो, त्यामुळे असले विषयकल्पनानिरपेक्ष प्रेम त्यास मनात ठेवून सरळपणाने बाहेर दाखविताही येते. पण तारुण्याच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या तरुणाच्या मनात आपल्याइतकाच सरळपणा आणि भावनांची शुद्धता राहू शकेल असे समजण्याइतके तिचे मन भोळे असते. त्या मुलाच्या मनात वासनांचे अंकुर प्रथमपासूनच स्पष्ट आहेत की नाही हे कर्त्याने अजून ठरविले नाही. बहुधा आहेतच. नसले तर Freud च्या Theroy प्रमाणे एडिपस कॉम्प्लेक्सची केस होईल. आणि त्यांत आश्चर्य वाटायला नको. त्या पोराने Freud वाचला नव्हता आणि माझ्या नायिकेने तर नव्हताच. पण त्याला कुरवाळण्यात तिला मातृसुखाचा आनंद मिळू लागला तरी तिच्या स्पर्शाने त्याच्या मनात अनेक निराळेच विचार येऊ लागले. त्यांच्या या प्रेमाच्या अकल्पितपणाने तो बाप तर चकित झालाच पण त्याने त्या प्रकाराचा सरळ अर्थ काय करायचा तो करून आपल्या पोराला बाहेरची वाट दाखविली.

मग त्या नायिकेच्या मनाची कुचंबणा काय विचारावी? घरात राहावे तर आई होण्याची आशा कायमची नष्ट करून टाकावी लागणार आणि शिवाय मानलेल्या पोराची प्रेमाचे ताकही नाही. शस्त्रक्रिया करायची वेळ जसजशी जवळ येत चालली तसतसे मातृप्रेमाच्या प्रदानाला सवकलेले तिचे मन तिला दोष देऊ लागले. आणि त्या पोराच्या चोरून होण्याच्या भेटीत पुरेशी उत्तेजना मिळाल्यामुळे तीही घराबाहेर पडली.

घराबाहेर पडली ती अगदी बाळंतपणाच्या वेळेलाच. आणि त्या नालायक पोराच्या भरवशावर बाळंतपण होणे तर अशक्य होते. अशा स्थितीत नाटककर्त्याने Tragedy च्या पुढच्या सोयीसाठी अगदी पहिल्या अंकापासून तिच्यावर डोळा ठेवणाऱ्या एका सावकाराची योजना केली आहे. या धूर्ताने त्या पोराला जाळ्यात पकडून त्याच्यामार्फत तिला उपकारांच्या ओझ्याखाली वाकविले. मूल होऊन त्याच्या आनंदात केलेल्या सर्व त्यागाचे मोल उणे वाटत असता एक दिवस पोराने तिच्या मातृहृदयावर आपल्या कुवासनाच्या कुऱ्हाडीचे घाव घातले. धबधब्यावरून कोसळणाऱ्या नदीच्या ठिकऱ्या उडून त्या धबधब्याइतक्याच उंच उडतात त्याप्रमाणे तिच्या चूर झालेल्या मनाचे तुकडे खवळून उठले. तिने निराशेच्या त्वेषाने दाराची वाट धरली. पण तिथे सावकार उभा. चांदीच्या चकत्याच्या मोबदल्यात त्याने तिच्या अब्रूच्या हिरकणीची मागणी केली. रस्त्यावर पडून अब्रूने दिवस काढू म्हणावे तर उपासमारीच्या मृत्यूशिवाय दुसरे गत्यंतर नव्हते. मृत्यूला ती तयार होती, पण मग तिच्या मागे तिच्या पोराचे पालनपोषण करायला नाटककर्तासुद्धा असमर्थ होता. याच विचाराने तिने मागे एकदा आत्महत्यासुद्धा दूर लोटली होती. आणि आताही शेवटी एकच सांगतो – मुलाला खाली ठेवून, आजवर त्याच्या पित्याच्याच मुक्यांनी शुद्ध राहिलेल्या आपल्या ओठांनी तिने त्याचे एक शेवटचे चुंबन घेतले आणि शेजारच्या टेबलावरच्या तबकांतून पाने घेऊन त्याला चुना लावायला सुरुवात केली. त्या सावकाराने त्या पोराला तिच्या धाकट्या मुलाला उचलून घेऊन आपल्या बंगल्यात पोचविण्यास सांगितले आणि जाताना दार ओढून घ्यायला सांगितले!!

मी भितो तो इथेच. तिला जिवे मारणे म्हणजे माझ्या हातचा मळ आहे. पण मला या अशा तऱ्हेने प्रेक्षक वाचकांच्या भावना exploit करायचा तिटकारा आहे. ती वेश्या खरी पण स्त्रीचे खरे purpose - निर्मिती–मातृत्व हे तिने ओळखले आहे. म्हणूनच मी नाटकाचे नाव 'आई' किंवा 'मा' असे ठेवणार आहे. तिच्या शेवटच्या त्यागामुळे माझ्याविरुद्ध मोठे काहूर उठेल हे मी जाणून आहे. पण त्याला माझा इलाज नाही. हिंदू समाजाच्या सध्याच्या वैवाहिक जीवनात पुरुष हा सेंटर असून स्त्री कुचकामाची केवळ उपभोग्य वस्तू आहे असे राहून–राहून प्रतीत होते आहे त्या कल्पनेचा उच्छेद होऊन, Home आहे ते मातेमुळे आणि स्त्रियांना बायका होण्याची इच्छा नसते इतकी माता होण्याची असते हे मला सुचवायचे आहे.

यातली काही पात्रे अद्याप अधांतरीच असलेली वाटतील. पण त्यांची व्यवस्था मी लावलेली आहे. या सारांशात ती तशीच वाटणार.

(हे पत्र कै. कृष्णाबाई मोटे, डॉ. द. दि. पुंडे आणि डॉ. अंजली सोमण यांच्या सहकार्याने)

**– डॉ. अनंत देशमुख**
भ्रमणध्वनी : ८६८९९७८७४४
dranantdeshmukh@gmail.com

॥ग्रंथाली॥




**विसरलेल्या आठवणींची कथा**

**अरुण साधू**

पुस्तकातील लेखांची खास गोष्ट म्हणजे विनोती शैलीमध्ये लिहिलेला हा त्यांचा एकमेव खास असावा.

**– शेखर साठे**

**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

डॉ. कीर्ती मुळीक

# लोकसाहित्यातील चंद्र
# डॉ. सरोजिनी बाबर



लोकसाहित्य म्हणजे समाजनाचा आरसा लोकसंस्कृती आणि लोकसाहित्यातून समाज समजून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या डॉ. सरोजिनी बाबर यांचे हे जन्मशताब्दी वर्ष...

डॉ. सरोजिनी बाबर यांचा जन्म ७ जानेवारी १९२० रोजी सातारा जिल्ह्यातील बागणी गावी झाला. बागणी गाव वारणा नदीच्या काठी आहे. गुरुवर्य कृ. भा. बाबर आणि गंगूबाई बाबर यांचे हे पहिले अपत्य.

बागणी गावात भुईकोट किल्ला आहे. हे गाव ऐतिहासिक काळी लष्करीदृष्ट्या महत्त्वाचे ठरले. बाबरांचे देशमुख घराणे; पूर्वजांच्या पराक्रमामुळे 'बाबर' म्हणून ओळखले जाऊ लागले. बहारदार निसर्ग, दूधदुभत्याची रेलचेल, देखण्या जनावरांनी गच्च भरलेले गोठे आणि मायेचा वर्षाव करणारी माणसं अशा संपन्न, समृद्ध जीवनात सरोजिनी बाबर वाढल्या. त्यांच्या गोतावळ्यात त्या 'आक्काताई' म्हणून ओळखल्या जात.

सरोजिनी बाबर यांचे वडील कृ. भा. बाबर हे हाडाचे शिक्षक होते. ते सत्यशोधक

समाजाचे कार्यकर्ते होते. त्यांनी आपल्या तीनही कन्यांना शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले. सरोजिनी उर्फ अक्का त्यांच्या ज्येष्ठ कन्या. त्यांनी या मिळालेल्या संधीचं सोनं केलं. त्या एम.ए., पीएच्.डी. झाल्या. 'डॉक्टरेट मिळवलेल्या बहुजन समाजातल्या पहिल्या महिला' हा सन्मान त्यांना प्राप्त झाला. 'स्त्रियांचे मराठी साहित्यातील योगदान' या विषयात त्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केली. या प्रबंधावर त्यांनी 'वनिता सारस्वत' हा ग्रंथ तयार केला आहे. ७ कादंबऱ्या, ११ कथासंग्रह, २६ ललितलेख संग्रह, २ काव्यसंग्रह आणि 'माझ्या खुणा, माझ्या मला' हे आत्मचरित्र हे सरोजिनी बाबर यांचे साहित्य विश्व!

'महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती'च्या अध्यक्ष या नात्याने सुमारे ३० ग्रंथ त्यांनी संपादित केले आहेत. १९५२ ते १९७४ या कालावधीत त्या राजकारणातदेखील सक्रिय होत्या. महाराष्ट्र विधान सभेच्या सदस्य, महाराष्ट्र विधान परिषदेच्या सदस्य आणि राज्य सभेच्या सदस्य ही पदे त्यांनी भूषविली. राहुरी कृषी विद्यापीठातर्फे डी.एस.सी., पुणे विद्यापीठ, त्याचप्रमाणे टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे डि.लिट. पदवी देऊन त्यांना गौरविण्यात आले आहे. 'गुरुवर्य बाबुराव जगताप पुरस्कार', 'विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार', 'पठ्ठे बापूराव पुरस्कार' आदी पुरस्कारांनी त्या सन्मानित झाल्या आहेत.

लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीची साधनसामुग्री संकलित करणे, त्यांचा अभ्यास करणे आणि संपादन करणे हा डॉ. सरोजिनी बाबर यांचा ध्यास होता. अखंड चाललेल्या त्यांच्या या व्रतातून भावी अभ्यासकांसाठी मोठ्या प्रमाणात लोककथा, लोकगीतं, म्हणी, उखाणे, रूढी, चालीरिती यांचे संकलन उपलब्ध झाले आहे.

लहानपणीचे संस्कार माणसाच्या पुढील जीवनातील कर्तृत्वाला कारणीभूत ठरतात. डॉ. सरोजिनी बाबर यांनी आपल्या बालपणीचे वर्णन केले आहे. ''सोपा सारवावा, अंगण लोटावे, सडा घालावा, रांगोळी रेखावी, एवढाल्या चपात्या लाटाव्यात. तळहाताच्या मापाने हातावर भाकरी झेलाव्यात, ताकाचा डेरा खांबाशी बांधलेली रवी नाचवीत उभ्याने घुसळावा, बागेतील फुले वेचून आणावीत, आजीचे देव घासूनपुसून द्यावेत, सहाणेवर चंदनाचे खोड घाशीत देवांसाठी गंध उगळावा. सुईदोरा घेऊन टीप घालायला, हेम घालायला, काजे करायला शिकावे. आजोबांच्या मामांच्या चिलमीवर विस्तव नेऊन द्यावा, आलेल्या गेलेल्यांचे होय-नाही पहावे, असल्या कितीतरी कामांचे ओझे पेलीत मी खुशीने घरात वावरायची.''

आपल्या अंगावरील दागिन्यांविषयी त्या लिहितात ''त्या वेळी माझ्या हातातील हिरेमाणिक, काकणे न् बिंदल्या रिम झिमायच्या, गळ्यातील एकदाणी कोरकुरउड्या घेत धावताना झेपावयाची, कानातले झुबे हलायचे, पायातले पैंजण वाळे छुम छुमायचे, अंगावरचा सुंदर परकर पोलका उठून दिसायचा. माझी आजी माझ्या दोन्ही कानांवर मिऱ्या वेण्या घालायची. मामी पाचपेडी वेणीला चांदीचे मखमली गोंडे बांधायची. सणासुदीला अंगात सोन्याचे चंद्र-सूर्य, तर वेणीत देखण्या चांदण्या गुंफलेल्या असायच्या...'' भातुकली, झिम्मा, फुगडी, हादगा खेळत सरोजिनी बाईंनी आपले बालपण मनसोक्त भोगले.

सरोजिनीबाईंनी मुलांसाठी बाळगाणी, कविता लिहिल्या आहेत. 'आम्हाला आमची तालेवारी' नावाचा त्यांचा बालकविता संग्रह आहे. यातील कवितांमधून अक्कांनी भोगलेल्या समृद्ध बालपणाचे चित्र दिसते. त्यांच्या एका कवितेत त्या लिहितात-

*आजोळी मी गेलेवते*
*हौस मौज करायला ग*
*आजोळी मी गेलेवते*
*काय हवंय काय नको*
*ध्यानात घेऊन दमलेवते*
*राजवर्खी बांगडी मला*
*आता पाहिजेल म्हटलेवते*
*त्यापायी फिरून फिरून*
*मामा माझे शिणलेवते*
*भिंग ल्याली परकर चोळी*
*नेसायला हवीय म्हणाले*
*पंढरीला जाऊन आणूया*
*मामा-मामी बोलले*
*अग्गरबाळी बग्गरबाळी*
*केव्हा घालीन झालंवतं*
*सोनं किती महाग झालंय*
*कोणं तरी घरात बोलंवतं*
*पैंजणवाळे भारूंभार*
*नाजूक पायात ल्यालेवते*
*शिंदेशाही आणू तोडे*
*आजोबाच मला म्हटलेवते*
*राघूमैना साडीचोळी*
*पदर हवा फैनाबाज*
*आजी माझी बोलून गेली*
*आता गं कुठला तसला साज*
*एकदाणीला चंद्रहार*
*घालून सये मिरवावं*
*गोठ पाटल्या तोडून मोडून*
*आजीनं सगळं घडवावं*
*राकडी केवडा भांग भरला*
*गोंडाही वेणीला गुंफला*
*पखंटीचा पदर माझा*
*अंगावर भारी शोभला*
*अंगतपंगत पोरांची मग*
*बसली दाटीवाटीनं*

*लगीन माझ्या भावलीचं मग*
*करीन म्हटलं हौसेनं*
*मांडव बिंडव तुळशी पुढला*
*सजवला पाना फुलांनी*
*वाजत गाजत डौल मांडला*
*आत्याकडच्या भावल्यांनी*
*सनई चौघडा घुमला दारी*
*मुहूर्त निघाला सकाळचा*
*आजोळ घरी मग उडू दे*
*दणकाच कवतीकाचा*

आजोबा, आजी, मामा, मामी, आत्या, मावशी, दादा, ताई आणि सवंगडी अशी मोठी वर्दळ, अक्का वाढल्या त्या घरी होती. आपल्या या सवंगड्यांबरोबर त्यांची अंगत-पंगत चालायची, भावला-भावलीचं लगीन चालायचं, 'भिंग ल्याली परकर चोळी', 'फैनाबाज पदराची राघू-मैना साडीचोळी' ही मुलगी या भावला भावलीच्या लग्नात अंगावर 'ल्यालते', राजवर्खी बांगडी, भारूंभार पैंजणवाळे, एकदाणीतला चंद्रहार, अग्गरबाळी-बग्गरबाळी, शिंदेशाही तोडे, यांसारखे अलंकार ती या लग्नात घालण्यासाठी मागते, घरात तुळशीपुढे मांडव घातला जातो. पोरांची दाटीवाटीने पंगत बसवली जाते, दारात सनई-चौघडा वाजवला जातो, पाना-फुलांनी भावला-भावलीला सजवले जाते. मोठी माणसंही 'कवतीकानं' हे बघत राहतात. लहान मुलांची हौस पुरवत राहतात. 'खेळून खेळून दमले मी' या कवितेत अक्का लिहितात-

*खेळून खेळून दमले मी*
*खेळून खेळून दमले मी*
*सालमसलकी जोसात*
*पक्वा घालून थकले मी*
*घागर फुंकीत झोकात*
*फुगडी झिम्मा घुमवला मी*
*कितीक रिंगण काढले*
*उखाणे बोलीत नाचले मी*
*स्वतःलाही विसरून गेले*

सुमारे बारा कडव्यांच्या या कवितेत अक्कांनी 'सूप नाचवीत नाच गं घुमा', 'घसरफुगडी', 'उडता झिम्मा', 'कोंबडा', 'टिपऱ्या', 'दंडाची फुगडी', 'काचकिरडा', 'खिसबाई खिस', 'फुगडीतलं जातं' अशा अनेक खेळांची नावं सांगितली आहेत.

बालकांबरोबर मोठ्यांनाही मोहित करणारी अशी ही बालगीतं आहेत.

या गीतांतील भाषा ग्रामीण आहे. 'जोसात', 'झोकात', 'अंगण घुमारले', 'फरारता पदर', 'अवचित उगवलं टिपूर चांदणं', 'गेलेवते, दमलेवते, म्हटलेवते, शिणलेवते' यासारखी क्रियापदं डॉ. सरोजिनी बाबर सर्रास वापरतात. बोली भाषेतला गोडवा, त्याला असणारी सुरेख लय त्यातून सहजपणे आपल्या लक्षात येते. आक्का सांगली-साताऱ्याकडे वाढल्या. त्यामुळे त्यांच्या भाषेवर ग्रामीण संस्कार झाले. पुढे पुण्यात शिकायला आल्यावर त्यांच्या या ग्रामीण ढंगी भाषेवर टीका झाली. 'गावंढळ' म्हणून त्यांना संबोधण्यात आले, पण आक्कांनी या भाषेला अभिमानानं आपल्या लेखनात स्थान दिलं. आपल्या या भाषेची, शैलीची त्यांनी खास अशी लकब तयार केली.

लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांची आवड निर्माण होण्यामागे डॉ. सरोजिनी बाबर यांचे ग्रामीण भागातील बालपण हा मोठा घटक ठरला. त्यांनी गायनाचेही शिक्षण काही काळ घेतले. आपल्या आईप्रमाणे त्या सुरेल, गोड आणि ठाम आवाजात लोकगीते म्हणत. लोकगीतांच्या नवनवीन सुरावटी, ओव्या, लय, ताल त्या माहीत करून घेत.

लोकसाहित्य जगभरात सर्वत्र दिसून येते. प्रत्येक भागातील लोकसाहित्यात वेगळेपण दिसते. महाराष्ट्र राज्याचा विचार केला तर इथे मोठ्या प्रमाणावर प्रादेशिक विविधता आहे. दऱ्याखोऱ्या, डोंगरकपारी, पठार असे विविध उंचसखल, पसरट प्रदेश इथे आहेत. हे प्रदेश समुद्रसपाटीपासून विविध उंचीवर आहेत. काही नदीजवळच्या सुपीक भागात आहेत तर काही खडकाळ जमिनीचे आहेत. येथील नैसर्गिक परिस्थिती वेगवेगळी आहे. कोकणासारख्या भागात मुसळधार पाऊस असतो, तर मराठवाडा, विदर्भ सारखे प्रदेश पावसाअभावी दुष्काळी म्हणून जाहीर करावे लागतात. अशा निसर्गतः वैविध्य असणाऱ्या या प्रदेशातील लोकांच्या राहणीमानात, विचारसरणीत, जडणघडणीत एकूण जीवनशैलीतच विविधता पहावयास मिळते. साहजिकच या प्रत्येक प्रदेशाचे लोकसाहित्य वेगवेगळे असल्याचे दिसते.

अनेकजणांनी लोकसाहित्याच्या संकलनास सुरुवात केली. त्या काळात समाजाचं ऋण फेडण्याच्या भावनेतून साने गुरुजींनी स्त्री गीतांच्या संकलनाचं काम सुरू केलं. मालतीबाई दांडेकर यांनी देखील ग्रामीण भागातील मौखिक काव्य संकलित करण्यास सुरुवात केली. या काळात अक्का आकाशवाणीवरून लोकसंगीताचे कार्यक्रम करीत होत्या. या सर्व घडामोडीतून अक्कांना आपल्या आवडीचे क्षेत्र उमजले. लोककथा, दंतकथा, दैवतकथा, ओव्या, कहाण्या, उखाणे, देवादिकांच्या कथा, गाणी, आख्यायिका यांचे संकलन करण्यास त्यांनी सुरुवात केली. आपल्या सहकाऱ्यांसमवेत त्या खेड्यापाड्यात, वाड्या-वस्त्यांत हिंडू लागल्या.

लोकसाहित्याच्या संकलनाला अक्कांनी ग्रंथित स्वरूप दिले. त्या संकलनातून त्या काळातील संस्कृती लक्षात येते. 'रेशीमगाठी' या पुस्तकातील 'देवाघरीचे मंगल' (बाळराज) या लेखात त्या लिहितात -

'मला भाऊ झाला त्या वेळी म्हणे मामांनी घोड्यावरून फिरत जात पेढे वाटले होते गावोगाव! आणि म्हातारआईनं

*जिच्या घरी तान्हं तिच्या उरी आनंद*
*पाळण्या शेजारी देव उतरे गोविंद*

अशी आवई देत माझ्या दादाचं नाव ऋषिकेश ठेवलंवतं. म्हातार आईला देवादिकांचा नाद. थोडी अक्षरओळख झालेली तर पोथी पुस्तकांचं वाचन तिचं! भाषा शुद्ध, विचार समृद्ध, हौसमौज जगावेगळी, त्यामुळे ती खुशाल सांगून टाकायची –

*हौस मला मोठी तान्ह्या बाळाच्या टोपड्याची*
*पिंपळ्यापानासाठी नथ मोडीली दीडशाची*
*पालख पाळणा चिमण्याबाईंचा गजबार*
*माझा ग राजस आत निजला समींदर*
*मोठे मोठे डोळे झुल्याचे आकडे*
*किती पाहू मी रूपाकडे नातवाच्या*
*मोठे मोठे डोळे जशी टाळांची टोपणं*
*रूप राजाचं देखणं नातवाचं*
*भरल्या तिन्ही सांजा गाई आल्या गजबारानं*
*सोनं झाकावं पदरानं बाळराज*

संकलित केलेले केवळ गीत किंवा लोककथा न देता सरोजिनी बाबर यांनी त्या काळातील ग्रामीण जीवनाचं, संस्कृतीचे वर्णन करीत त्यांचे दर्शन घडवीत कथा व गीतं मांडली. त्यामुळे तो काळ, त्या काळातील श्रद्धा, परंपरा, रीतिरिवाज यांचे योग्य दर्शन त्यांनी संकलित केलेल्या या लोकसाहित्यातून पहावयास मिळतं.

लोकसाहित्यामध्ये कथा, काव्य, गीत, संगीत, नृत्य अशा अनेक कलांचा समावेश होतो. या कलांच्या माध्यमातून त्या काळातील लोक संस्कृतीचे दर्शन होते. लोकसाहित्य हे लोकांनी लोकांसाठी लिहिले असल्याने त्याच्यात समाजमन, समाजजीवन आढळते. समाजधारणेची तत्त्वे समाजाला समजावून देण्यासाठी लोकसाहित्य रचले गेले आहे. लोकांना समाज, धर्म, व्यवहार यांचे ज्ञान लोकसाहित्यातून प्राप्त होत असते. साहजिकच भोळ्या-भाबड्या लोकांना आकृष्ट करण्यासाठी लोकसाहित्यात अद्‌भुतता येते, सादरीकरणाचा भाग येतो. सादरीकरणातून कथा, काव्य अधिक वेधक, परिणामकारक केले जाते. अशा प्रकारे लोकसाहित्य लोकशिक्षणाचे कार्य करते.

'डामडौल' या समाजशिक्षण मालेच्या ३३८ व्या अंकात डॉ. सरोजिनी बाबर यांनी स्वतः लिहिलेल्या कविता आहेत. या अंकाच्या प्रास्ताविकात त्या लिहितात – 'अशीच मी एका गावाला गेलेली. तिथं त्यावेळी बायकांची सभा बसलेली. त्या सभेत सरस्वतीच्या लेकी बाळी आपल्या आपल्या लिहिण्या बोलण्यातलं काय-काय सांगतेल्या. तशी मला पण काही बोला म्हणून गळ घातली गेलेली. तर काय झालेलं की, मराठी लोकगीतांचा माझा अभ्यास, तेव्हा त्या गीताबद्दलच मी बोलावं ही अपेक्षा त्यांनी मनात धरलेली. कारण मला स्वतःला कविता लिहिता येते हे कुणाच्या लक्षातच आलं नसलेलं म्हणे! त्यामुळे मग मी ठरवलं की, आपल्याच कवितेबद्दल आपण बोलायचं आणि लिहायचंही, पण तेवढ्यानं होईना म्हणताना आज आम्ही आपलाच हा 'डामडौल' आमच्या वाचकांच्या हाती द्यावा म्हटलं. म्हणून तर आमच्या समाज शिक्षण मालेचं हे तीनशे अडतिसावं प्रकाशन आज वाचकांच्या पुढे ठेवताना 'कसं खुशालीत आल्यागत झालंय! म्हटलं कसं, माझी कविता आहे तरी कशी, हे कळू दे की जनलोकांला!'

घरात मांडलेली देवपूजा, कशिदा काढून मोत्यांच्या झालरीने सजवलेली स्त्रीची हिरवी चोळी, गावाकडच्या घरी आलेले पाहुणे, गावाकडचं आपलं घर, भारत देश, लहान बाळाचे पहिले बोल, पहिलं पाऊल अशा विविध विषयांवर अक्कांनी कविता लिहिल्या आहेत. या कविता असल्या तरी त्यांना लोकगीतांचा बाज आहे. सरोजिनी बाबर 'रांगोळी' कवितेत लिहितात –

*रांगोळी*
*सजविले आज सई*
*मी गं अंगण सुरेख*
*रांगोळीची माझ्या बाई*
*तुम्ही करा गं पारख*

*सारविल्या दारी सये*
*बघ उतरे ठिपका*
*रेघ वळणदार आली*
*चित्र रेखीत भपका*

*आज बाई काढीयली*
*मी ग डब्बल कोयरी*
*जमुनिया साऱ्याजणी*
*चला फुलवू कोयरी*

*वेलदोड्यांचा वेल आला*
*सई नटूनी थटूनी*
*बिल्वदळ वाहीन मी*
*आता देवाच्या चरणी*

*फुले कारल्यांचा मळा*
*माझिया ग अंगणात*
*आली कासवाची स्वारी*
*गिरक्या भवती मारीत*

*आकाश दिव्याच्या जोडीला ग*
*गालिच्याची सोबत*
*कमळाच्या पाकळीचा*
*ठसा दारी उमटत*

*रिंगणात रेखिला मी*
*चेंडू सई चंदेरीच*

*पाळण्याची शोभा बघा*
*दिसे किती आगळीच*

*सूर्यफूल स्वस्तिक ग*
*किती आलं हे रेखीव*
*धेनूपद काढीतसे*
*चिन्नू लाडी राजीव*

*रांगोळ्यांनी सजली का*
*पाऊलवाट आजची*
*हळद कुंकवानी सजवा*
*पायघडी मानाची*

या गीतांतून लोकसंस्कृतीच्या खुणा आपल्याला दिसतात. साधं घरापुढचं अंगण; पण तेही रोज किती वेगवेगळ्या प्रकारच्या रांगोळ्यांनी सजवलं जातं. पुन्हा या रांगोळ्या अर्थपूर्ण आहेत. पवित्र मानली गेलेली कमळपाकळी, धेनूपद, सूर्यफूल, स्वस्तिक, कोयरी अशी अनेक चिन्हं या रांगोळीतून दारात ठिपके, वळणदार रेघांनी काढली जातात. या रांगोळ्यांनी मन प्रसन्न तर होतेच, पण त्यांचे मनावर संस्कारही होत जातात. दारापुढल्या रांगोळीची ही कला आजच्या काळात लोप पावू लागली आहे. व्यक्तिमनावर संस्कार करणारी, त्याला शारीरिक आणि मानसिक बळ देणारी, नातीगोती व सभोवतालचा परिसर जोपासणारी, निसर्गाशी एकरूप होणारी, कुटुंब आणि समाज पातळीवर एकोपा सांधणारी अशी आपली मूल्यवर्धित लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य आहे. आजच्या व्यक्तीवर दडपण आणणाऱ्या, त्यांचे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य हरवणाऱ्या, प्रगती आणि विकासाच्या नावाखाली निसर्गाचा ऱ्हास करणाऱ्या यंत्र आणि तंत्र युगात ही लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य जपणे संवर्धित करणे ही आपली गरज झाली आहे.

लोकसाहित्याच्या बाबतीत आणखी एक मुद्दा सांगितला जातो. लोकसाहित्य आणि अभिजात साहित्य यांची फारकत झाली तेव्हा समाज जीवनासाठी आवश्यक गुणांची जोपासना करण्यासाठी लोकनेत्यांनी एक स्वतंत्र ग्रामीण संस्कृती निर्माण केली. संस्कृतात जे आहे ते सामान्य माणसाला उपयुक्त ठरावे म्हणून त्याचे मराठीकरण जसे संत ज्ञानेश्वरांनी केले त्याचप्रमाणे संस्कृतातील तत्त्वचिंतन लोकांपर्यंत पोचावे म्हणून लोकनेत्यांनी लोकसाहित्यातील लोककथा निर्माण केल्या.

लोकसाहित्य म्हणजे लोकांचं साहित्य. समाज, त्या समाजातील स्त्री-पुरुष, त्यांचे राहणीमान, दैनंदिन कार्यक्रम, कृषिकर्म, माणसामाणसातील नातेसंबंध, गोतावळा, त्यांची वेशभूषा, केशभूषा, सजवलेलं घर, सकाळच्या वेळेस केलेली सडा-रांगोळी, होणारं सूर्यनारायणाचं दर्शन, निसर्गशोभा, देवादिकांच्या कथा, पुराणं, त्यांच्याविषयीच्या कहाण्या, श्रद्धा, सण, उत्सव या सर्वांचं दर्शन लोकसाहित्यातून घडतं.




हे लोकसाहित्य पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेलं आहे. प्रत्येक पिढी आपल्या समजुतीनुसार, आकलनानुसार त्यात भर टाकत आली आहे. तिच्यातील बदलानुसार त्यात बदल होताना दिसतात. 'म्हातारी आणि भोपळ्याची गोष्ट' लोककथेमध्ये 'एक होती बुढी, ती रोज खाई आंब्याची कढी. शेजी म्हणाली, ''म्हातारे म्हातारे, अशी काय करतेस? सोन्यारूप्याचा जीव काय गांजतेस?'' म्हातारी म्हणाली, ''नाही गं बया, असं कशी करीन? ऐक, ऐक, मी आता लेकीच्या घरी जाईन, भाजी खाईन, ताजी होईन, मग मला पहा.'' म्हातारीने तयारी केली. पेरकंडाची गाडी केली, उंदराचे बैल केले. म्हातारीचे खाचर निघाले. उंदीर पळती सुरू सुरू, बुढीचे केस उडती भुरू भुरू...' अशी कथा ग्रामीण भागात सांगितली जाते. या कथेत एक लय, ताल दिसतो. 'उंदराचे बैल केले' मधून अद्‌भुतता दिसते. 'एक होती बुढी, खाई आंब्याची कढी' मध्ये काव्यसदृश्यता दिसते. 'भाजी खाईन, ताजी होईन' मधून प्रबोधन दिसते, जे मुलांसाठी आवश्यक आहे.

आजच्या काळातली 'म्हातारी आणि भोपळ्याची कथा' त्या मानाने गद्य आहे. 'उंदराचे बैल केले' इत्यादी अद्‌भुतता त्यात नाही. ती वास्तवाकडे जास्त झुकलेली आहे. 'लेकीच्या घरी जाईन, तूप रोटी खाईन, जाडजूड होईन, मग तू मला खा' याप्रमाणे बदल त्यात झाले आहेत. लोकसाहित्य याप्रमाणे प्रवाही

आहे. आशय आणि आविष्काराचे बदल त्यात सातत्याने घडत असतात.

जगभरात प्रत्येक प्रदेशाचं, प्रत्येक समाजाचं लोकसाहित्य आहे. त्याचं संकलन कितीही केलं तरी ते पूर्ण होणार नाही. इतकं ते अवाढव्य आहे.

पुरुषांपेक्षाही स्त्रीगीतांची संख्या लोकसाहित्यात मोठी दिसते. याचं कारण व्यक्त होणे हा स्त्रीचा प्रकृतिस्वभाव आहे. झालेला आनंद ती आपल्या मुलांजवळ विशेषतः पोरीबाळींजवळ व्यक्त करते. मनात सलणारी एखादी खंत, दुःख ती आपल्या जिवाभावाच्या मैतरणीजवळ व्यक्त करते. सासर-माहेरचं मोठेपण ती शेजारणीला सांगते, तर नवऱ्याची तक्रार ती 'तुमच्या लेकाला सांगा' म्हणत आपल्या सासूजवळ व्यक्त करते. व्यक्त होण्यासाठी तिला कुणी माणूस लागतंच असं नाही. जात्यावर धान्य दळताना अर्थात दळणकांडण करताना, रवीच्या मोठ्या दोऱ्या ओढीत उभ्यानं रांजणातलं दही घुसळताना, अंगणात सडा रांगोळी करताना ती ओव्या रचते, गाणं गाऊ लागते. लय, ताल ही स्त्रीची निसर्गतः प्रकृती आहे. आपल्या प्रत्येक भावभावनेवर तिनं लयबद्ध गीतं रचलेली आहेत. माणसाच्या जीवनक्रमावर गीतं रचली आहेत. जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या सोळा संस्कारविधींवर तिची गीतं दिसून येतात. लग्न हा तिचा अतिशय आवडता विषय. लग्नातल्या प्रत्येक विधीवर लोकगीतं, ओव्या, उखाणे दिसून येतात. 'रुखवत' नावाच्या पुस्तकात डॉ. सरोजिनी बाबर यांनी 'रुखवत' या लेखामध्ये रुखवताचा प्रसंग, त्या प्रसंगी वर-वधू दोन्हीकडच्या बायकांनी जमलेली गर्दी, उखाण्यातून त्यांनी विहिणबाईंची, एकमेकींची काढलेली उणीदुणी छान रीतीने वर्णन केली आहेत.

''रुखवत आला। रुखवत आला।।'' आमच्या शेजीचा मला तगादा आला. मी घाईघाईनं मांडवात घुसले. तिथं नवरीकडच्या बायकांचीआणि दुरड्यांची ही गर्दी! नवऱ्याकडच्या आमच्या बायका पण गोळा झालेल्या. पोरांची वर्दळ वढली. पुरुष माणसं लांबून डोकावतेली! ...दुरड्या विणलेल्या रुमालांनी झाकलेल्या होत्या. एकेक बाई ठसक्यात उभी! एक पोरगेलेशी बाई पुढं आली. सर्वांना हळदकुंकू लावून पहिली दुरडी उघडू लागली. तिनं उखाणा घातला-

*''मांडवाच्या दारी शिध्याची पाटी, विहिनीच्या कपाळाला पडली आठी. व्याही बसला तसा उठला. विहिनीला आला राग. विहिनबाईचा राग काढा. बारा भुयांची पालखी बसायला धाडा. मला कशाला पालखी? मी तुळशीच्या फुलाहून हलकी. सहज बसली घालून मांडी तर मोडली पालखीची दांडी. जोकून बघितलं तर वजन भरलं चांगलं आकरा खंडी!''*

आमच्याकडील बायकांची तोंड अगदी बघण्यासारखी झाली. एवढा अपमान कोण सोशील? बायकांचा राग वाढला. नागीण फुसकारावी तशी एकजण पुढं होऊन म्हणाली -

''आला आला रुखवत. रुखवतावर मेथीची भाजी. आणि नवरीच्या भैनीच्या नाकातील नथ हाई माझी!''

झालं! वातावरण तंग झालं आणि ''तुमची का म्हनं असतीया नथ?'' असं पुटपुटत नवरीची भैन पुढं आली. तिनं झणकाऱ्यानं आमच्याकडल्यांना बजावलं, म्हणाली-

''आला आला रुखवत. रुखवतावर हुती चंची. भाड्यानं डागीनं घालणारी ती यीहीन कोंची?''

मग काय विचारता? उणीपाणी निघायला नुसता ऊत आला. समोरासमोर बायका उभ्या राहिल्या. तापल्या तव्यावर लाह्या फुटाव्यात तशा त्या फाडफाड बोलायला लागल्या...

''मांडवाच्या दारी आळं राखंचं, हळूच बसा यीनीबाई, लुगडं नेसलाय् लोकांचं!''

''आला आला रुखवत. रुखवतात कुडकाचं मोती वगाळलं. नवऱ्याच्या कुरवलीचं नाक येडकानं चगाळलं!''

''आला आला रुखवत. रुखवतावर होता आईना. नवऱ्याची करवली दरवाज्यात माईना!''

''आला आला रुखवत. रुखवताव होतं जांभळ. आमच्या नवरीचा नीट करा संबाळ, न्हाईतर आमचा ज्योतिबा देव लई हाय वंगाळ!''

अशा रीतीने या उखाण्यांना रंग चढत जातो पण ही सगळी गंमत आहे. हे दोन्हीकडच्या बायका जाणून आहेत. त्यामुळे शेवटची दुरडी उघडताना दोन्ही बाजूंचा मान राखला गेला. ती बाई म्हणाली, ''आला आला रुखवत, रुखवताव होता मोर, नवरा बिजलीची बत्ती, नवरी चंद्राची कोर.''

सरोजिनीबाईंजवळ प्रसंग रंगविण्याचं विलक्षण कसब आहे. एका प्रसंगातून दुसरा प्रसंग, दुसऱ्यातून तिसरा अशी प्रसंगांची माळ त्यांच्या लेखात दिसून येते. हे प्रसंगही रोजच्या जीवनातले, सर्वसामान्य आहेत. पण सरोजिनी बाबर ते इतके खुलवून सांगतात की माणूस भूल पडल्यासारखा त्यांचा लेख पुढे पुढे वाचत जातो. बोली भाषेचा गोडवा, छोट्यामोठ्या उपमा, प्रतिमा, प्रतीके, गोष्टीवेल्हाळपणा आणि संकलित केलेली अनेक गीतं, हुमानं, लोककथा यांची त्या चपखल मांडणी करतात. त्यांच्या या लेखांमधून लोकसंस्कृतीचं एक मोहक दर्शन घडतं. ते सर्वांना आवडतं. हरवत चाललेला हा लोकसंस्कृतीचा ठेवा मन रिझवू तर लागतोच; पण तो पुन्हा एकदा भूतकाळ ओलांडून वर्तमानकाळात यावा आणि त्यातून सर्वत्र एक निर्मळ, प्रसन्न वातावरण पूर्वीसारखेच निर्माण व्हावे ही तळमळ ज्याला-त्याला लागते.

आजच्या यंत्र संस्कृतीत मनोरंजनाच्या यांत्रिक साधनांतून आपण मन रुजवू पाहतो. दुपार आणि संध्याकाळच्या वेळेस घरातील सर्वजण दूरदर्शन, भ्रमणध्वनी, संगणकाच्या अंर्तजालापुढे बसून आपल्या मनाची करमणूक करू पाहतात, पण त्याच्या जोडीला 'डोळे खराब होतील रे' 'जरा बाहेर जा खेळायला' 'किती वेळ तो मोबाईल हातात घेऊन बसला आहेस' असा

आयांचा मुलांवर ओरडा सुरू होतो. दूरदर्शनवरचे स्वार्थ, मत्सर यांनी गांजलेले रटाळ कार्यक्रम पाहताना 'माणसाची सर्जनवृत्ती हरवत चालली आहे का? या कार्यक्रमातून मला निश्चित काय मिळाले'; असे प्रश्न प्रौढ व्यक्तीला पडू लागतात. पुन्हा ही यंत्रे बंद केली की मनाचा एकटेपणा खायला उठतोच. तृप्ती अशी प्राप्त होत नाही. पूर्वीच्या काळी मनोरंजनाची काय साधनं होती? सरोजिनी बाबर यांच्या 'रुखवत' पुस्तकातील 'इंद्रसभा चंद्रसभा' हा लेख पाहू या :

आमच्या स्वतःच्या गावाला मी कधी सणासुदीसारखी गेली, म्हणजे जवळपासच्या बायकांचा घोळका हमखास गोळा होतो. मला रात्रीचं जागरण सोसत नाही हे माहीत असलं तरीही त्या जेवणवेळ टळून गेल्यावर घरचं सगळं आवरून 'वळवाच्या पावसागत कवातरी याचं, तर पोटभर बोलत बसायचं सोडून निजायची काय घाई गं?'' अशी भाषा करीत माझ्याकडे येतात. अशा वेळी आमच्या दारात अनेक लहान मोठे कंदील गोळा होतात आणि अंगणात वयमान विसरून तिथं येतेल्यांची इंद्रसभा-चंद्रसभा कशी झोकात बसलेली दिसून येते.' अशी प्रस्तावना करीत 'मग खेळीमेळीनं बोलणं निघतं. मग एका म्हाताऱ्या पावणीनं नाव घ्याचा बेत एका एकीच काढला! तशा सगळ्याचजणी तोंडाला पदर लावीत हसल्या, लाजल्या, 'नको बाई' म्हणाल्या, पण एकीनं ठसक्यात नाव घेतलं नि खेळाला जोर चढला. बायका हिरीरीनं नाव घेऊ लागल्या.

*''एक शेर दुधाचा पावशेर खवा न सदाशिवरावांचं नाव घेते ध्यानात ठेवा.''*
*''गोट केले, पाटल्या केल्या, सरी मला करायची,*
*शंकररावांचं नाव घ्याला मागं न्हाई मी सरायची''*
*''खेळकरी टेकावर, वाऱ्याच्या झोकावर न*
*सद्या गुरवाचं नांव घेते सगळ्यांच्या नाकावर!''*
*''वाटल्या डाळीचं केले पिठलं, त्यात खोबरं घातलं*
*खिसून भगवानराव राती गेलं रुसून तर रखमीनं ते खाल्लं चाटूनपुसून''*

मग एखादी बहाद्दरीण असते. ती असं तसं दोन ओळीचं नाव न घेता आपल्या घराचं, घरातल्या माणसांचं वर्णन करीत नाव जुळवते....

*''पुनं गांव चांगलं, चौकूनी बंगलं, बंगल्याला शिड्या,*
*शिड्यांला माड्या, माड्याला कुलूपं, कुलुपाला किल्ल्या,*
*उघडून बघते तर मोठ्या मोठ्या खोल्या*
*हळदी कुंकवाचं भरते ताट, जाते पाटलाच्या आळी*
*पाटील म्हणतो नांव घे मुली*
*नाव न्हाई फुकाचं, हंबीररावांसाठी गणगोत सोडलं सुकाचं.''*

हे ऐकून मामाच्या येश्वदीला जोर चढला. कुणी नाव घ्यायचा आग्रह करायच्या आधीच ती म्हणाली-

''मी पुजली तुळस. मला घावला कळस. काय कळस सोन्याचा खांबा. काय गोड पाडाचा आंबा. सदरेला उभी जाऊ मोठी शाणी. आठवड्याला घाली तुळशीला पाणी. नणंद मोठी प्यारी. चुकून देत न्हाई न्हयारी. दीर मोठा तालीवार. बत्तीस खेड्यांचा कारबार. हाती मिळाला ताडमाड. दार भिंगाचं. गादी किनखापाची. उशी मोराची न् रामचंद्रांचं नाव घेते लेक हाय थोराची.''

दुसऱ्या एका लेखात नणंद भावजया कामासाठी घराबाहेर पडतात आणि पावसात अडकतात. आडोशाला उभ्या राहतात आणि त्यांना गावातला गोष्टीवेल्हाळ गोपा भेटतो. त्यानं गोष्ट सांगायला सुरुवात केली. ''एक हुतंआपलं असंच बारकं गांव. तिथं एक टोळभट नावाचा एक जावाय पावणा आल्याला. सासूनं पोळ्याच्या सैपाकाचा बेत केला...' एकातून दुसरी, दुसऱ्यातून तिसरी अशा अनेक गंमतीच्या गोष्टी रचत गोपानं त्यांना ऐकवल्या. वेळ कसा गेला, पाऊस कधी संपला कळालंच नाही. 'रुखवत' पुस्तकात 'वैदकीतला गोपा' नावाचा हा लेख आहे.

हाच पाऊस बघत 'गाववाली' लेखातली म्हातारी पावसाकडे बघून मोठ्या आवाजात गात राहिली...

*पाणी जाऊ द्या, जाऊ द्या*
*पलाणी पाटाव*
*तिथं लिंबाचा, लिंबाचा*
*आहे साटाव*
*कोतमिर म्हणीती, म्हणीती*
*माजा सुवास देका वो*
*मेथी म्हणीती, म्हणीती*
*पैशाला पेंडी इका वो*
*कारलं म्हणीतं, म्हणीतं*
*उघडुनि पाडू नका वो*
*वांगं म्हणीतं, म्हणीतं*
*मला फोडणी टाका वो*
*लसूण म्हणीतो, म्हणीतो*
*माझा सुवास देका वो*
*कांदा म्हणीतो, म्हणीतो*
*सभेला मांडू नका वो*
*मिरची म्हणीती, म्हणीती*
*माजा तिखट माथा वो*
*पाणी जाऊं द्या, जाऊं द्या*
*पलाणी पाटाव*
*तिथं पाण्याचा, पाण्याचा*
*आहे साटाव...*

हीच म्हातारी लेखिकेच्या घरी ज्येष्ठ महिन्यात अनाहूतपणे आली. तेव्हा कुठं निगालीस?' असा प्रश्न केल्यावर तिनं झोकात कसं सांगितलं बघा-

*पैली माजी ओवी गाई एका एका*
*ब्रह्मा विष्णु देका हारोहारी*

*दुसरी माजी ओवी गाईली विठ्ठला*
*भेटू दे तो सावळा पांडुरंग*
*तिसरी माजी ओवी त्रिभुवनी नाईका*
*ब्रह्मा विष्णु देका हारोहारी*
*चौथी माजी ओवी गाईन चौदेशा*
*पुरवावी आशा पांडुरंगा*
*पाचवी माजी ओवी पाचा पर्णा ज्योती*
*आता ववाळीला रुक्मिणीचा पती*
*सावी माजी ओवी सा मास लोटील*
*साक्षात भेटेल पांडुरंग*
*सातवी माजी ओवी संपत्ती सागरा*
*राघोबा उदारा देई भेटी*
*आठवी माजी ओवी अठ्ठावीस योग*
*उभा पांडुरंग विटेवरी*
*नव्वी माझी ओवी नौगुणी गाईली*
*पूजा आरंभलीइठ्ठलाची*
*धाव्वी माजी ओवी धा झाल्या संप्रूणी*
*गा मन्याभावनी इठ्ठलाशी*
*अकरावी माजी ओवी अकरावी पावेल*
*हरी चरणी गुंतलं मन माजं*
*बारावी माजी ओवी बारा एकादशी*
*जाणं पंढरीशी तुका म्हणे*
*तेरावी माजी ओवी अमृताच्या धारा*
*गाती मनोहरा विठ्ठलाला.*

बोला पुंडलीक वर दे हारी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम!

'म्हातारीच्या ह्या कल्पकतेनं आम्हाला वेडं केलं. साधं पंढरीला निघालेय सांगायचं तर तिनंकेवढा पसारा मांडला!...' असं लेखिका पुढे लिहिते. गावावरून आलेल्या म्हातारीला घरातली माणसं आणखी राहण्याचा आग्रह धरतात.

सर्जक, चैतन्यशील अशी ही करमणूक घरात प्रसन्न वातावरण निर्माण करते. माणसं एकमेकांच्या जवळ येतात. प्रसंगानुरूप त्यांच्यात आणखी गप्पा होतात. सुखदुःखाची चर्चा होते. एकटेपणा जाणवत नाही किंवा कंटाळाही दूर निघून जातो. अंगणात खेळ खेळताना. झाडं लावताना कुणीतरी कल्पकतेनं गाणी योजतं आणि अंगवळणी पडल्यासारखं ती गाऊनही दाखवतं. मग ती ऐकायला पोरांबाळांसह, वृद्ध माणसं, घरातील बायका, पुरुष सर्वजण गोळा होतात. या सर्वांतून सर्वांच्याच सर्जकवृत्तीला चालना मिळते, निसर्ग पर्यावरणाविषयी आदर निर्माण होतो. सण, रुढी, रितिरिवाज माहीत होतात, माणसं एकमेकांना माहीत होतात, एकोपा निर्माण होतो, त्यातून एकमेकांच्या अडीअडचणीला धावून जावेसे वाटते, ज्ञानाचे आदानप्रदान होते, देवदेवादिकांविषयीच्या कथा माहीत होतात आणि या सर्वांतून माणुसकी सतत जागी राहते. पूर्ण गाव सुरक्षित राहतं. आज लहान मुलांपासून ते वृद्ध माणसांपर्यंत सर्वजण असुरक्षित वातावरणात आहेत. लहान मुलींवरील अत्याचारात वाढ झाली आहे. तर वृद्ध माणसांना घरामध्येच आपल्या कुटुंबियांकडून अत्याचार सहन करावा लागतो. त्यांच्याविषयीची कृतज्ञता आज घरादारांत दिसून येत नाही. लहान मुलांकडे पाहण्याची खेळकर, निर्व्याज वृत्ती समाजातून नाहीशी होत चालली आहे. लोकसाहित्यातून, लोकसंस्कृतीतून ही मूल्ये समाजात, माणसामाणसांत रुजवली जातात आणि सगळ्यांचेच जगणे सहज सुंदर होऊ लागते. हे जाणून घेऊन चंगळवाद, भौतिकवादामध्ये रमलेल्या समाजाने पुन्हा एकदा लोकसाहित्याकडे वळले पाहिजे, लोकसंस्कृतीचे संवर्धन केले पाहिजे, त्यांच्याशी पुन्हा नाळ जोडणे समाजाची सुव्यवस्थित, आरोग्यसंपन्न घडी बसविण्यासाठी आवश्यक आहे.

अक्कांचे वडील कृ. भा. बाबर हे हाडाचे शिक्षक होते. ते शिक्षकांच्या चळवळीत व सत्यशोधक समाजाच्या कामगिरीत हिरीरीनं भाग घ्यायचे. नोकरीत असताना आपल्या वागण्या, बोलण्यावर व लेखनावर बंधने येतात हे लक्षात आल्यावर त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला. खेड्यापाड्यातील सर्वसामान्य लोकांना वाचता येतील अशी सोप्या भाषेतील पुस्तकं तयार करण्याचा त्यांनी संकल्प सोडला. त्यातून 'समाज शिक्षण माला' चा जन्म झाला. सोप्या भाषेत सर्व प्रकारचं ज्ञान उपलब्ध करून देणारी, मोठ्या अक्षरातील ही पुस्तकं लोकांना अतिशय आवडली. दर महिन्याला एक याप्रमाणे या मालेचे सन १९५० ते १९८८ पर्यंत सुमारे अडतीस वर्षे सलग ५५० अंक निघाले. या सर्व अंकांचं संपादन डॉ. सरोजिनी बाबर यांनी केलं. 'दसरा दिवाळी', 'देव आणि राक्षस', 'होळी, धुलवड आणि रंगपंचमी', 'बंडखोर संत कबीर', 'सिंधू संस्कृती', 'जात्यावरील गोड गाणी', 'लोककथा आणि समाज जीवन', 'समाजाचे बदलते स्वरूप', 'प्रापंचिक अंदाजपत्रक', 'मुलाची भाषा', 'महाकवी रवींद्रनाथ', 'देवाघरची दौलत', 'अणुयुगातील आपण' ही काही अंकांची शीर्षकं मालेतील विषयांची विविधता दर्शवतात. मालेच्या निमित्ताने सरोजिनी बाबर यांनी स्वतः लेखन केलं. घरातील व्यक्तीनाही लिहितं केले आणि अनेक नामवंत लेखकांकडून त्यांनी समाज शिक्षण मालेसाठी लेखन करवून घेतले. कृ. बा. बाबर, ग. ल. ठोकळ. म.म. दत्तो वामन पोतदार, डॉ. सुमती क्षेत्रमाडे, बा. भ. बोरकर, दुर्गा भागवत, रियासतकार गो. स. सरदेसाई, डॉ. अप्पासाहेब पवार, शंकर पाटील, आनंद यादव, बाबासाहेब पुरंदरे, वामनराव घोरपडे, इंदिरा संत ही यातील काही नावं होत.

१९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. राज्यात वेगवेगळ्या समित्यांची स्थापना होऊ लागली. याच काळात महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समितीचीही स्थापना झाली. पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना 'मला तुमच्या मराठी मुलुखातील चालीरिती कळू द्या, लोकगीते ऐकू द्या, सण, उत्सव पाहू द्या' अशी आग्रहाची

विनंती केली. सरोजिनी बाबर यांनी सर्व प्रथम या समितीचे सदस्य म्हणून काम केले. पुढे त्यांची या समितीच्या अध्यक्षपदी नेमणूक झाली. सुमारे तीस वर्षे त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली आणि महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागातल्या लोकवाङ्मयाचा मोठा संग्रह तयार केला. यात महाराष्ट्रातील सण उत्सव, रीतिरिवाज, विविध कलांची माहिती आहे. ठिकठिकाणच्या बोली भाषांतील ओव्या, गीते, कथा, कहाण्या, उखाणे, म्हणी, खेळ गाणी यांत समाविष्ट आहेत. 'लोकसाहित्य साज शिणगार', 'जा माझ्या माहेरा', 'दसरा दिवाळी', 'लोक साहित्यः शब्दकोश' 'भोंडला भुलाबाई', 'लोकसाहित्य – भाषा आणि संस्कृती' आदी सुमारे २५ ग्रंथांचे संपादन डॉ. सरोजिनी बाबर यांनी केले. ही सर्व पुस्तकं एकाहून एक सरस आहेत. त्यातून लोकजीवनाचे सविस्तर, सखोल अभ्यासाचे संचित आढळून येते. निर्दोष मांडणी, उत्तम छपाई, दीनानाथ दलाल, ग. ना. जाधव आदी नामवंत चित्रकारांची चित्रे या सर्वांमुळे हे ग्रंथ रसिकजनांमध्ये लोकप्रिय झाले. लोकसाहित्य, लोकसंस्कृतीच्या अभ्यासकांसाठी ते महत्त्वाचे संदर्भ ग्रंथ ठरले. अक्का अर्थात डॉ. सरोजिनी बाबर यांच्या या कार्यामुळे गतकाळातील हे लोकसाहित्याचे वैभव कायमस्वरूपात ग्रंथरूपाने टिकून राहिले आहे. भूतकाळ, वर्तमानकाळच नव्हे तर भविष्यातील पिढ्याही यासाठी कायम त्यांच्या ऋणात राहतील.

**संदर्भ ग्रंथ**


१. शरदिनी मोहिते, 'डॉ. सरोजिनी बाबर' शिव पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, एपिल २००९

२. सरोजिनी बाबर, संपादक, 'मनोगत समाज शिक्षण माला,' प्रकाशक – डॉ. सरोजिनी बाबर, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

३. सरोजिनी बाबर 'डामडौल' समाज शिक्षण माला, अंक ३३८ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

४. सरोजिनी बाबर 'रुखवत' प्रकाशिका डॉ. सरोजिनी बाबर समाज शिक्षण प्रकाशन, पुणे ४११ ०३०, तिसरी आवृत्ती, मे १९७५

५. सरोजिनी बाबर, संपादक 'लोकसाहित्य व लोकसंस्कृतिसंमेलन'
महाराष्ट्र लोकसाहित्य समिती, महाराष्ट्र सरकार प्रकाशन विभाग, पुणे, मे, १९६१.

६. मंदा खांडगे, 'लोकसाहित्याच्या अभ्यासक – डॉ. सरोजिनी बाबर', लेख दै. पुढारी, ७ मे, २०१९.



**– डॉ. किर्ती मुळीक**
भ्रमणध्वनी : ९८८१४७७४६५
mulickkeerti@gmail.com





# प्रकाश भातम्ब्रेकर द्वारा अनूदित चुनिंदा कृतियां (1980-2000)

12, रोज़ विला, गोरेगाडी, माहिम, मुंबई - 400 016
मो. + 91 93244 09490 / 79779 10107

**1981** — राधाकृष्ण प्रकाशन, दिल्ली - 2

घिनौनी खींचतान, अखाड़ेबाजी और उठापटक भरे राजनीतिक गलियारे का पोल-खोल कच्चा चिट्ठा




**1983** — प्रकाशन संस्थान, दिल्ली - 2

समसामयिक सामाजिक एवं सांस्कृतिक परिवेश को सार्वजनीन अपील प्रदान करनेवाली उर्मांस




**1983** — प्रकाशन संस्थान, दिल्ली - 2

कार्पोरेट संस्कृति के चलते ध्वस्त-पस्त हो रही मानवता एवं नारी अस्मिता का बेबाक लेखाजोखा



**1987** — भारतीय ज्ञानपीठ, दिल्ली - 3

लोकमान्य टिळक के खुद्दार व्यक्तित्व के अनोखे पहलुओं को उजागर करता बृहत उपन्यास




**1988** — राजकमल प्रकाशन, दिल्ली - 2

मीनाकुमारी और गुरुदत्त जैसे जिंदादिल कलाकारों की त्रासद जिंदगियों का जज्बाती आलेख



**1991** — राधाकृष्ण प्रकाशन, दिल्ली - 2

मजदूर, बीड़ी कामगार, हमाल आदि समाजांगों की नारकीय स्थिति पर प्रकाश डालती व्यथा-कथा




**1992** — भारतीय ज्ञानपीठ, दिल्ली - 3

आजन्म पत्रकारिता से जुड़े संवेदनशील कथाकार की पैनी निगाहों का आविष्कार




**1993** — वाणी प्रकाशन, दिल्ली - 2

सत्ता और राजनीति के बीच पिसते आम आदमी के ढह जाने की दर्दनाक दास्तां




**1993** — सन्मार्ग प्रकाशन, दिल्ली - 7

गांधी तथा गांधीवाद की नये संदर्भों में पुनर्व्याख्या




**1995** — किताबघर प्रकाशन, दिल्ली - 2

ऐतिहासिक - सांस्कृतिक - सामाजिक सन्दर्भों के साथ दीर्घकाल तक अधिसत्ता में रहे शक्तिशाली केंद्र का शहरनामा



**1996** — किताबघर प्रकाशन, दिल्ली - 2

औद्योगिक विकास का नाजर दिखाते हुए आदिवासियों को विस्थापित कर पर्यावरण के साथ खिलवाड कर रही पीढ़ी की ज्यादतियों का लेखाजोखा



**1997** — राजेश प्रकाशन, दिल्ली - 31

निरंतर प्रयोगवादी रहे शीर्ष कहानीकार की कलम का संवेदनशील, ताज़गी भरा आविष्कार



पद्मश्री पद्माजी फेणाणी–जोगळेकर

# स्वरसंमोहन

भारतरत्न
पं. रविशंकर
यांचा जन्म
७ एप्रिल १९२० रोजी
झाला. पंडितजींचे
हे जन्मशताब्दी वर्ष.
या महान कलावंताने
सतारीने सबंध जगाला
संमोहित केले.



**स्व**रांची 'भन्नाट' जादू काय असते, हे काहीच कलाकारांच्या बाबतीत मी नेहमी अनुभवते. गेले काही दिवस भारतरत्न पंडित रविशंकरजी आणि पद्मविभूषण उस्ताद अली अकबर खाँ साहेब यांच्या जुगलबंदी वादनाच्या आविष्कारातून असाच आनंद घेतेय. त्यातून बाहेर पडूच नये, अशी ही केवळ मोहिनीच नव्हे तर 'संमोहिनी' Hypnotism म्हणजे मनावर जडलेली जादू.. भुरळ! त्यांचा 'मांज खमाज' हा राग तर झपाटल्यागत, माझी पाठच सोडत नाही.

कुठल्याही शब्दांच्या आधाराविना स्वरांचा भावनाविष्कार काय असतो? तो शब्देविण संवादु अनुभव म्हणजे...... स्वरांचा उत्सव, स्वरांचे लखलखते झाड, अंगावर बरसणाऱ्या स्वरांच्या फुलझड्या मिटलेल्या डोळ्यांना दिसू लागतात; आणि अलगद डोळे पाझरू लागतात. हृदयाला टाचणी लागल्यावेळीच असे डोळ्यांतून पाणी येते.

अशा उत्कृष्ट शास्त्रीय संगीताचा, आपल्या मानसिकतेवर काय परिणाम होऊ शकतो?



'अनुराधा' चित्रपटातील 'जाने कैसे सपनों में...' या गाण्याचे दृश्य

जणू स्वत:चा गोडवा असूनही, दुधात विरघळलेल्या साखरेसारखी! कुठेही अवास्तव स्तोम न माजवणारी!

भारतरत्न पं. रवीजींसारखेच दुसरे असेच गाणारे भारतरत्न म्हणजे गानसम्राज्ञी लतादीदी! पुण्यात दीदींच्या ८५ व्या वाढदिवसाला माझे गुरू पद्मश्री पं. हृदयनाथजी मंगेशकर यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात, मी पं. रवीशंकरजींनी 'अनुराधा' चित्रपटासाठी स्वरबद्ध केलेली ... 'जाने कैसे सपनों में...', 'हाये रे वो दिन...', 'कैसे दिन बीते...' अशी एकाहून एक सुंदर गाणी सादर केली. त्यावेळी साक्षात् पं. रवीजींना थेट भेटल्यासारख्या, बाळासाहेबांच्या (गुरुजींच्या) प्रेम व आदर या भावना उचंबळून आल्या, ज्या त्यांनी स्टेजवरून श्रोत्यांसमोर व्यक्तही केल्या. एका दिग्गजाने दुसऱ्या दिग्गजाला दिलेली ही सलामी! या दिग्गजांची काय 'उंची' आहे याचे मोजमाप करणारी पट्टी आमच्याजवळ उपलब्धच नाही, ही खरी गंमत आहे!

थेट हिमालयाच्या शिखराकडे आश्चर्याने आणि कौतुकाने आपण फक्त पहात राहावे, अशी ही सारी ईश्वरीय वरदान लाभलेली मंडळी! त्यासाठी हिमालयाच्या निदान पायथ्याशी तरी पोहोचावे लागते!

त्यादिवशी बाळासाहेबांनी, मी रवीजींची गाणी गाऊन त्यांची आठवण करून दिल्याबद्दल, माझे पुन्हा-पुन्हा आभार का मानले, हे मला 'आज' कळतंय! त्यावेळी फक्त आश्चर्यच वाटलं होतं. पंडितजींच्या शेवटच्या आजारपणात आयसीयुत असताना त्यांनी बाळासाहेब व दीदींची 'मीरा' ऐकली. हे सारे अमेरिकेहून फोनवर झालेले संभाषण, त्यांचा सहवास, या सर्व गोष्टी आठवून, बाळासाहेब काहीसे भावुक झाले होते. एका अनुपम सौंदर्याची अखेर आठवून ते का गदगद झाले होते? हे मला आज 'मांज खमाज' ऐकताना वारंवार जाणवत राहिले आणि राहीलही. अशी संगीतातली थोर माणसे आता होणे नाही; म्हणूनच वाटते की; या वेड लावणाऱ्या, संमोहन घालणाऱ्या व्यक्तींच्या सतत सान्निध्यात रहाणे, त्याचा अभ्यास करणे, त्यात चिंब-चिंब भिजून जाणे हेच या काळात आपले उन्नयन आहे. हीच स्वर्गीय स्वरांची अनुभूती आहे.

मन उडूबागडू लागते, नाचू लागते, नाट्य करू लागते. ती लय रवीजींनी नृत्य शिकल्यामुळे आपल्याही रक्तात सळसळू लागते, शरीर नागासारखे डोलूही लागते, काळजात सौंदर्य लहरी उमटू लागतात. त्यातून आनंद, प्रेम, लज्जा, लडिवाळपणा, आस, विरह, व्याकुळता, अशा अनेक भावना, केवळ कानापर्यंतच नाही तर थेट हृदयापर्यंत पोहोचवण्याची ताकद नि चित्तवृत्ती उल्हसित करण्याची ताकदही या स्वरांत आहे, म्हणून तर या हातांनी पाश्चिमात्यांवर, त्यांचे संगीत उपलब्ध असूनही भुरळ पाडली.

हे स्वर ऐकताना ते हृदयापर्यंत पोहोचल्याची जाणीव प्रत्येक रोमरोमांत होते. आपण काहीतरी अद्वितीय, अपूर्व ऐकतोय याची, रक्ताच्या थेंबाथेंबाला, नसानसांत उसळताना, *'उभ्या रोमरोमांतुनी चैत्रवाटा...'* अशी अनुभूती येऊ लागते.

दोघेही दिग्गज, पण एकमेकांवर कुरघोडी न करता, गिमिक्स न करता, एकमेकांना पूरक, वाजवून केवळ स्वरांच्या वेगवेगळ्या सौंदर्यपूर्ण जागा (उपज) घेऊन, आपल्या जाणिवा, रागाबरोबर फुलवतात. शरीराचा प्रत्येक भाग 'पुलकित' होतो म्हणजे काय? हे तेव्हा जाणवतं. अवघ्या ३५-४० मिनिटांत अवकाशात न मावणा-या, वैविध्यपूर्ण अनंत जागा. एकासारखी दुसरी शोधून सापडणार नाही. इतक्यांदा पारायणे केली, तरी पुढची जागा ही (pleasant surprise) वेगळाच गोड धक्का देऊन जाते.


लयीचे तर काय नि किती किती नानाविध प्रकार...! यांना दरवेळी इतके कसे सुचत असेल नि किती अफाट रियाझ केला असेल या मंडळींनी! दैवी देणगी आणि मेहेनत, परमेशाची कृपा आणि नशिबाची साथ, अशा अनेक गोष्टींचा सुंदर संगम. या जुगलबंदीला अजून एक साथ अत्यंत मधुर हात असलेल्या अब्बाजींची...! म्हणजे पद्मविभूषण उस्ताद अल्लारखाँ खाँ साहेब,

**– पद्मजा फेणाणी-जोगळेकर**
padmajajoglekar@gmail.com

वृषाली किन्हाळकर

# नितळ माणुसपण जपणारा फकिरा

**अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने आपल्या मातीशी ईमान राखणाऱ्या 'फकिरा'च्या अजोड शौर्याची कहाणी.**



**आ**जपर्यंत पन्नास आवृत्त्या निघालेली 'फकिरा' ही शाहीर अण्णाभाऊ साठे यांची खऱ्या अर्थाने अजरामर कादंबरी.

अजरामर म्हणजे जिला वार्धक्य नाही अन् मृत्यूही नाही. त्या अर्थाने मी ह्या कादंबरीला खूप विचारान्ती 'अजरामर' संबोधले आहे.

मी पहिल्यांदा 'फकिरा' वाचली, त्यावेळी मी इयत्ता सातवीमध्ये शिकत होते. इतकी भारावून गेले होते की, प्रत्येक मैत्रिणीला मी फकिराची गोष्ट सांगायची. यावर्षी मी पुन्हा 'फकिरा' वाचली. आज मी साठ वर्षांची आहे. फकिराने भारावून जाण्याचं वय निश्चितच नाही पण तरीदेखील, फकिरा वाचून मी पानापानावर भारावून जातच होते. त्यातली सौंदर्यस्थळं, पात्रं, माणसांचे स्वभाव हे सगळं वेगळ्या अर्थाने मनात रूतलं, आणखी खोलवर.

आजच्या काळात हे पुस्तक वाचताना अधिक आश्चर्य वाटतं, ते गावावर इतकं प्रेम कुणी

करत असतं का, याचं! आपण ज्या कॉलनीत, सोसायटीत, आज राहतो, त्या भागाबद्दल तरी इतकं ममत्त्व आपल्याला असतं का, याचं उत्तर नाकारार्थी आहे. स्वत:च्याच जगण्यात आपण इतकं गुरफटून जातो की, गावाकडच्या एखाद दुसऱ्या व्यक्तीला जरी आपण थोडी मदत कधी काळी केली तर आपल्याला खूप धन्यता वाटते.

गावाच्या प्रतिष्ठेसाठी अक्षरश: प्राणत्याग करणं हे आज तर कुणालाही आश्चर्य वाटणारं असंच काम आहे. प्राणाची पर्वा न करता गावची प्रतिष्ठा जपणं- 'फकिरा'चं बीजच हे आहे! गावच्या प्रतिष्ठेसाठी स्वत: जाणूनबुजून मृत्यूकडे शांत पावलं टाकणारा राणोजी हा फकिराचा बाप आहे.

विश्वास ठेवावाच लागतो कारण ही कल्पित कहाणी नसून सत्यकथा आहे. फकिराची प्रस्तावना वि.स. खांडेकर यांची. त्यांनी एक वेगळा प्रयोग करत प्रस्तावना दिलेली आहे. कुणी एक गृहस्थ त्यांना भेटायला आलेले आहेत आणि फकिराची प्रस्तावना लिहिणारे खांडेकर, त्या गृहस्थाने 'फकिरा'बाबत विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देत आहेत; अशी प्रश्नोत्तरे हे प्रस्तावनेचे स्वरूप आहे. इथे वाचकांच्या, समीक्षकांच्या मनातले प्रश्न त्या गृहस्थांच्या तोंडून विचारले गेले असल्याने ही प्रस्तावना फार परिपूर्ण, निर्दोष झाली आहे, मुळातून वाचण्यासारखी.

अण्णाभाऊ साठे यांच्या लेखनाला काही मर्यादा असणारच, जशी ती प्रत्येकच लेखक, कलावंत यांना असते. तरीही, खांडेकर एक फार सुरेख उदाहरण तिथे देतात की वाचक, समीक्षक यांच्या अपेक्षेप्रमाणे कुणी लेखकाने लिहावं असं होत नसलं अन् लेखक स्वेच्छेने, स्वयंप्रेरणेने जे काही लिहितो, त्या लेखनात खूप सामर्थ्य असतं. परिपूर्ण नसलं तरी ते लेखन
समाजाला खूप काही देऊन जातं. या अशा अर्थाने ते नदीचं उदाहरण देतात. ''नदीचा प्रवाह काय तिच्या काठावरल्या लोकांच्या इच्छेनुरूप वाहतो? पण त्याने कितीही वेडीवाकडी वळणे घेतली, तरी त्याच्या भोवतालचा भाग तो पिकवीत जातोच जातो. कलावंतांचंही तसंच आहे.'' हे खांडेकरांचं विधान फार महत्त्वपूर्ण आहे.

अण्णाभाऊ साठ्यांच्या लेखनाला सणसणीत, फक्कड कांद्याच्या पिठल्याची उपमा खांडेकर देतात. उग्र, चित्तवेधक प्रसंगांनी भरलेली, एखाद्या चलत्‌चित्रासारखी अण्णाभाऊंची ही कादंबरी, काव्याची किनाार लाभलेली, ऐटदार, खेड्यातली बोली बोलणारी भाषा असणारी आहे. अण्णाभाऊ साठे प्रतिभावान लेखक असून अन्यायाविरुद्ध बंड उभारणाऱ्या वृत्तीचे पूजक आहेत. अशा शब्दात खांडेकर 'फकिरा' वाचण्यासाठी वाचकांना अनुकूल भूमी तयार करून देतात.

अण्णाभाऊ साठेंचं मनोगत देखील फार सुरेख, लक्षवेधी आहे. ''प्रतिभेला वास्तवाची गरज असते. मी ज्यांच्याविषयी लिहितो, ती माझी माणसं असतात. त्यांची मुर्वत ठेवूनच मला लिहिणं भाग पडतं. जे पाहिलं, ऐकलं, अनुभवलं, तेच मी लिहिलं. डोंगरात नि त्याच्या पायथ्याला विखुरलेलं फकिराचं कर्तृत्व एकत्र करून हा इमला उभारला. फकिराने खजिना लुटला तेव्हा मी पाळण्यात होतो! आईने सांगितलं की मी पहिली घुटी घेतली. इंग्रजी खजिना लुटलेल्या पैशांचीच!

सरकारी खजिना लुटून, त्याने माझ्यावर उपकार केले होते. ते त्याचे उपकार मी कसे फेडावेत याचा विचार करीत होतो. अखेर ज्ञानेशाची, तुकयाची, तीन कोटी मराठी जनतेची जी मराठी भाषा तिचं भांडार लुटून 'फकिरा'वर उधळून, त्या दोन ओंजळीची फेड करण्याचा प्रयत्न मी केला आहे.

हेतू एवढाच की जो उपेक्षित होता, अंधारात होता, त्याने प्रकाशात यावं, त्यानं महाराष्ट्र शाखेच्या मंदिरापुढं चिरंतन उभं राहावं.

फकिरा माझा होता, त्याच्या कर्तृत्वाचा पसारा आवरून मी ही कादंबरी लिहिली आहे. ती कशी आहे हे महाराष्ट्रानं पाहावं. कारण बा महाराष्ट्रा, तू थोर आहेस, विद्वान आहेस, करता-करविता आहेस आणि मी काहीच नाही.''

हे अण्णाभाऊंचे मनोगत फार प्रांजळ आणि मन:पूर्वक आहे. त्यांची तळमळ थेट ह्रदयाला भिडते. प्रस्तावना आणि मनोगत १९५९ साली लिहिलेले. परंतु आजदेखील ते कालबाह्य वाटत नाही, संदर्भहीन वाटत नाही. 'फकिरा' वाचण्यास ते वाचकाला प्रवृत्त करते.

काय आहे या कादंबरीत?

इथं एक बाप-लेकाची जोड आहे; जी शौर्य आणि त्यागाचं एक अनुपम उदाहरण आहे. एक वस्तुपाठ आहे, जगण्याचा, अन्यायाशी दोन हात करण्याचा, 'स्व' बाजूला ठेवून 'आपल्या' माणसांसाठी सहजपणे मृत्यूला मिठी मारण्याचा!

ब्रिटिशांचा अंमल आहे आपल्या देशावर, आपल्या गावखेड्यांवर, आपल्या संपूर्ण जगण्यावरच; असा तो काळ - साधारणत: वारणेपासून कृष्णेपर्यंतच्या सुपीक खोऱ्यातल्या परिसरातली काही छोटी खेडी आणि त्या खेड्यातील जनजीवनाच्या काही रूढी-परंपरा, प्रतिष्ठेच्या काही गोष्टी मान-अपमानांचे काही प्रसंग, माणसांचे स्वभाव अशा सगळ्या गोष्टींना कवेत घेणारं फकिराचं कथानक आहे.

वाटेगाव हे एक लहानसं खेडं. त्याच्या शेजारचं शिगाव. शिगावला जत्रा भरली होती. तो जुना काळ. जनतेला करमणुकीची संधी म्हणजे जत्रा! नुसतीच करमणूक नाही तर त्यात माणसांच्या गुणांचे प्रदर्शन करण्याची संधी देखील असायची. सबंध गावच उत्साहात-आनंदात असायचं.

वाटेगाव-शिगाव-काळेगाव अशी शेजार-शेजारची खेडी. तिथे त्या भागात एक जोगणीची प्रथा असायची. दोन बैती नवरा-नवरी व्हायची आणि त्यांची वरात निघायची. त्यात नवरीच्या हातात पिवळ्या कपड्यात झाकून एक खोबऱ्याची वाटी असायची. इतर गावातल्या एखाद्या माणसाने भर वरातीतून

ती खोबऱ्याची वाटी पळवायची आणि स्वत:च्या गावी न्यायची. असं झालं तर मग पुढल्या वर्षीपासून जत्रेचा मान त्या गावाला मिळायचा.

जत्रा भरणं म्हणजे गावच्या प्रतिष्ठेत मौलिक भर पडायची. पण वाटी पळवणारा इसम जर गावच्या हद्दीतच सापडला तर मात्र त्या गावचे लोक; त्याचं डोकंच उडवून टाकणार असा रिवाजच होता. म्हणजेच, खोबऱ्याची वाटी पळवणं म्हणजे भलतंच जोखमीचं काम असायचं. अति धाडसी बेडर माणूसच, गावासाठी असा जिवाची बाजी खेळू शके.




शिगावच्या खोताने आपल्या तरुणपणी, काळगावच्या जत्रेतून जोगणी आपल्या गावात आणली होती. तेव्हापासून शिगावात वर्षातून तीन वेळा जत्रा भरत होती. गावची भरभराट होत होती. आणि इकडे वाटेगावात शंकरराव पाटील विचारांच्या तंद्रीत उदास बसले होते. शिगावच्या बाजीबा खोतासारखा जबर माणूस आपल्या गावात नाही, त्यामुळे आपल्या गावात खेळ नाही, जत्रा नाही गाव नुसतंच मोठं – पण दिवस बुडाला की चिडीचिप!

अशा विचारात पाटील असताना, राणोजी मांग रस्त्यावरून जात असतो. पाटील त्याच्याशी बोलत, मनातली खंत व्यक्त करतात. राणोजी दुसऱ्या दिवशी शिगावची जोगणी पहायला जाणार असतो. पाटील त्याला म्हणतात की बाजीबा खोतासारखा बहाद्दर आपल्या गावात नाही, त्यामुळे आपल्या गावात जत्रा भरणार कशी? गावाची भरभराट होणार कशी? बाजीबाने शिगावावर उपकार केले तसे या गावावर उपकार करणारा माणूस इथे जन्मला पाहिजे. राणोजीला पाटलांची तळमळ जाणवली. आणि त्याला वाटलं गावात शंकरराव पाटील आणि विष्णुपंत कुलकर्णी ही दोन मोठी माणसं आहेत तर जत्रा भरवणं काय अवघड आहे? परंतु पाटील त्याला मोकळेपणाने कबूल करतात की, ''उभ्या गावाशी लढत देऊन जोगणी आणणं सोपं नाही. त्यासाठी डोंगराएवढं काळीज हवं आणि ते माझ्याजवळ नाही. विष्णुपंत कुलकर्णी कायद्याच्या कोपरखळ्या देण्यात पटाईत आहेत. जीव गेला तरी ते चाकोरी सोडणार नाहीत.'' त्या काळातली पाटील, कुलकर्णी ही वतनदार माणसं, पण शंकरराव पाटलांनी राणोजी मांगाजवळ, स्वत:च्या मर्यादा स्पष्ट मांडल्या, ही गोष्ट वाचकांना देखील खूपच अप्रूपाची वाटून जाते. राणोजी मात्र मग पाटलाच्या मनातली उदासी कशी दूर व्हावी, याचाच विचार करीत घरी जातो.

गावात काही रग नाही, कुणी जत्रा भरवत नाही. यामुळं दु:खी असलेला पाटलाचा चेहरा राणोजीला अस्वस्थ करत होता. गावापासून थोडा दूर मांगवाड्यात राहणारा हा राणोजी, दौलतीचा मुलगा. या मांगवाड्यात एकाहून एक शूर, हिंमतवान माणसं राहत. इनाम मिळालेल्या थोड्याशा जमिनीवर गुजराण करणारी. पोटाला अन्न पुरेसं मिळालं नाही की नाईलाजाने दुसऱ्याच्या आवारातून धान्य ओरबाडून आणून, लेकरांची पोटं भरणारी. मुळात वृत्तीने बेईमानी नव्हती पण भीक मागायला अपमान वाटायचा म्हणून अन्नासाठी चोरी करणारी ही माणसं, गावची राखण मात्र नेकीने करत.

राणोजी मांग घरी गेला तरी बेचैन होता. मनात विचार जोगणीचे जत्रेचे, गावच्या प्रतिष्ठेचे! 'आपण जर उद्या ती जोगणी आणली तर गावावर अनंत उपकार होतील, गावात जत्रा भरू लागेल, गाव भरभराटीला येईल. लोक म्हणत राहतील; राणोजीमुळे ही जत्रा सुरू झाली! एका मांगाने हे शूर काम केलं! पाटील पाठ थोपटतील.

समजा हे काम करताना आपण मेलो तर? येऊ दे मरण – ते कधीतरी येणारच, मग गावावर उपकार करून मरण आलं तर – आपल्या अंगावरच्या जखमा गावाच्या काळजावरच्या मोहरा ठरतील.' असा विचार करून राणोजी झोपायचा प्रयत्न करतो.

अण्णाभाऊ साठे इथं लिहितात, ''वारणेपासून कृष्णेपर्यंतचा सारा खोरा प्रकाशमय झाला. निर्भयता अवतीर्ण झाली अन् आज शिगावची जोगणी आणायचीच असा निर्धार करून राणोजी उठला.''

तो निघाला तेव्हा त्याची लहान मुलं– फकिरा आणि सहदेव म्हणतात, ''आबा, आमाला पेढं आण.''

क्षणभरच राणोजीच्या पोटात कालवाकालव होते आणि त्याच्या लाडक्या घोड्याला, गबऱ्याला टाच मारून तो शिगावकडे रवाना होतो. शिगावात जोगणी वाजतगाजत निघालेली असते. आजूबाजूला नंग्या तलवारी घेऊन बाजीबा खोताचा मुलगा बापू होता, ताकदवान माणसं होती.

राणोजी मांग काखेत तलवार दाबून आसपास फिरत होता. संधी शोधत होता. सगळी योजना व्यवस्थित केली होती त्याने. गावातल्या भैरू रामोशीच्या मार्फत त्याने पाटलांना, कुलकर्ण्यांना निरोप देऊन ठेवलेला होता की राणोजी जोगणी घेऊन पळाला की हत्यारबंद माणसं घेऊन शिगावच्या माणसांना आडवं यायचं.

राणोजी अगदी अचूक वेळी जोगणी पळवतो. शिगावची हद्द ओलांडून तो आपल्या गावाच्या, वाटेगावच्या हद्दीत येतो.

खरं म्हणजे परंपरेनुसार आता जोगणी वाटेगावच्या मालकीची झालेली असते तरीही बापू खोत चवताळून चिडून राणोजीचा पाठलाग करून, नियम तोडून, राणोजीला मारतो. राणोजीला मारून देखील जोगणीची वाटी, शिगावच्या खोताला मिळत नाही! रागाने खोत मग राणोजीचं शिर कापून नेतो!

सबंध वाटेगाव हे दृश्य पाहून स्तंभित होतं! शिगावकरांची ही आगळीक पाहून चिडतं, भडकतं!

राणोजीचा बाप दौलती, आई राही, बायको राधा आणि चिमुकली दोन पोरं फकिरा अन् सहदेव - यांच्या दु:खाला तर सीमाच नसते!

गावचे कुलकर्णी म्हणतात, ''शिगावकरांनी भलामोठा अपराध केलाय. आमच्या गावच्या हद्दीत शिरून आमच्या माणसाचं शिर नेलं आहे. मी, ते शिर वापस आणल्याशिवाय पाणीही पिणार नाही.''

गावचे पाटील म्हणतात, ''मी शिगाव जाळून टाकीन, मीही मरेन हरकत नाही.'' भैरू रामोशी म्हणतो, ''मी तर एका शिराची किंमत पन्नास शिरं घेणार.''

एकूणात, ईर्ष्येचा डोंब उसळतो. इकडे शिगावात खोत बाप-लेक खुशीत असतात. शिगावचीही सहा माणसं जोगणी वाचवताना मरण पावली होती. दोन गावात इतका तणाव वाढून देखील इंग्रजी सत्ता शांत असते, हे विशेष! धार्मिक बाबतीत ढवळाढवळ करायची नाही, असा राणीचा नियम असतो.

शेवटी दोन्ही गावची पेटलेली चिडलेली माणसं, गावच्या पंचांचं ऐकायचं ठरवतात. नीट चौकशी, विचार होतो. शिगावकरांची चूक त्यांच्या पदरात टाकून, जोगणीचा मान वाटेगावकरांना मिळतो. भांडणं, मारामाऱ्या टाळून पंच शांतता प्रस्थापित करतात. पुढे मग राणोजीची तडफ ज्यांनी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिली होती; ती माणसे राणोजीचे तोंडभरून कौतुक करत राहतात, कितीतरी दिवस!

ज्या मांगजमातीबद्दल कोणीही कधी विचार केला नव्हता, त्या निवडुंगानं वेढलेल्या जागेत कोण राहतात, कसे जगतात याचा कुणी फारसा विचारही करत नसायचं; त्या मांगवस्तीतल्या राणोजीने गावाला प्रतिष्ठा मिळवून दिली होती! राणोजीच्या आत्मसमर्पणाने, गाववाले आणि मांगवस्ती यातलं अंतरच पुसून टाकलं होतं!

फकिराचा हा प्रथमार्ध आहे. राणोजी हा फकिराचा बाप. राणोजीच्या वीरमरणाचा प्रसंग फकिराला पक्का स्मरणात असतो. राणोजीचा लाडका घोडा गबऱ्या देखील जोगणी आणताना मारला गेलेला असतो. लहानसा फकिरा आणि सहदेव यांना गबऱ्याची देखील फार उणीव भासत असते. राणोजीचा बाप दौलती मग एक नदीत शिंगरू आणतो, मुलं त्याचं नाव 'गबऱ्या'च ठेवतात. बापाचं वीरमरण आठवत आठवत, आजी-आजोबा आणि आई राधा आणि नवा गबऱ्या यांच्या प्रेमळ मायेत फकिरा मोठा होतो.

फकिरा राणोजीसारखाच निर्भीड, परंतु प्रेमळ आणि माणुसकी जपणारा माणूस असतो. कळत्या वयात त्याच्या लक्षात येतं की या मांग वस्तीवर फार अन्याय होतोय. मात्र गावचे पाटील आणि कुलकर्णी मात्र फार भली माणसं असतात. राणोजीचं गावासाठी झालेलं बलिदान गाव कधी विसरत नाही.

विष्णुपंत कुलकर्णी स्वत: मांगवस्तीत जाऊन, वेळोवेळी फकिराच्या कुटुंबाला धीर देत असतात. शंकरराव पाटील, एकदा फकिराच्या आईला मजुरीला जाताना पाहतात तर त्यांना फार वाईट असतं. ते राधाला म्हणजे फकिराच्या आईला म्हणतात की तुझ्या कुंकवाने गावावर डोंगराएवढे उपकार केलेत. तू नको कष्टवू आता स्वत:ला. पुढे मग त्या कुटुंबाला पुरेल इतकं धान्य पाटलांकडून नियमित येत राहतं.


ग्रंथाली

**मोहन रणसिंग यांची दोन पुस्तके**





**आठवणीतलं कुडाळ हायस्कूल**

**मूल्य १५० रु.**

**सवलतीत ९० रु.**

कुडाळ हायस्कूलला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत आणि लेखकाने हायस्कूल सोडल्यावर पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. या सुवर्ण योगावर हे पुस्तक प्रकाशित होत आहे याचीही दखल लेखकाने घेतलेली आहे. या सर्वांमुळे केवळ हायस्कूलच्या विद्यार्थी-माजी विद्यार्थी यांनाच नव्हे तर सर्वसामान्य वाचकांच्या मनाची पकड हे पुस्तक घेऊ शकते.




**ठाकर लोकगीते**

**मूल्य १८० रु.**

**सवलतीत ११० रु.**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ठाकर या आदिवासी जमातीने विविध लोककलांचा वारसा जोपासून ठेवलेला आहे. हा वारसा शोधून, त्यांचा सखोल अभ्यास करून तो सर्वसामान्य वाचकांसमोर आणण्याचे कार्य लेखक मोहन रणसिंग यांनी केलेले आहे.

ही पाटील-कुलकर्णी या वतनदारांची पात्रं फारच विलोभनीय आहेत. कांदबरीत फकिराची आई राधा - हिचं व्यक्तिचित्र देखील फार प्रभावी पद्धतीने अण्णाभाऊंनी उभं केलं आहे. गावासाठी जीव देणाऱ्या राणोजीची ती पत्नी आणि धाडसाने गावाला जगवणाऱ्या फकिराची आई!

संपूर्ण कादंबरीत गावाची एकी नजरेत भरते. जातपात विसरून एकदिलाने राहणारी माणसं, गावाची पत जपणारी माणसं इथे भेटतात. बाजूच्या परिसरातील चोर लुटारूपासून गावाची राखण तर मांगवस्तीनेच करायची ही रीत. परंतु मांगवस्तीला पुरेसे अन्न मिळत नाही याची काळजी इंग्रज सत्ता करीत नसे.

बाजूचे गाव, शिगाव मात्र राणोजीने जोगणी पळवून नेली हे विसरत नाही. बापूजी खोत, राणोजीचा मुलगा फकिरा याच्यावर नजर ठेवूनच असतो. हा खोत जोगणी पळवून नेण्याचा प्रयत्न अगदी निकराने करतो. परंतु हिंमतवान फकिरापुढे त्याला नमते घ्यावे लागते. मनातल्या मनात तो सूडबुद्धीने धुमसतच असतो.

मांगवस्तीची लोकसंख्या वरचेवर वाटत राहते. आज त्यांना इंग्रज सत्तेने दिलेली जमीन वाढवून दिली जात नाही. अर्धे वर्ष संपले की मग ही मंडळी रात्री बाजूच्या गावातून अन्नधान्य लूट करून आणीत. मात्र मनातून ही माणसं दुष्ट, लुटारू, चोर किंवा बेईमान नसायची.

फकिरा जसजसा मोठा होत जातो तसतसा इंग्रज सत्तेचा राग त्याच्या मनात भरत जातो. मांगवस्तीत असणारी अपुरी अन्नव्यवस्था याला टोचत राहायची. त्याच्या धाडसी स्वभावामुळे खूप पोरं त्याच्या जवळ जमली. हळूहळू फकिरा आणि त्याची साथीदार पोरं, गावचा आधार बनली.

पुढचं सगळं कथानक मुळातून वाचण्यासारखं आहे. अनेक रोमहर्षक, चित्तवेधक प्रसंग आणि विलोभनीय पात्रांच्या रचनेतून अण्णाभाऊ वाघाचं काळीज असणारा फकिरा, वाचकांसमोर साक्षात करतात.

एके वर्षी पाऊसच पडत नाही, दुष्काळ पडतो. अन्नाचा कण मांगवस्तीत उरत नाही त्यात आणखी साथीचे रोग फैलावतात. माणसं पटापटा मरू लागतात. फकिरा त्याच्या साथीदारांना घेऊन एका मळ्यातलं धान्य लुटतो. लोकांमध्ये वाटून टाकतो परंतु इंग्रजांचे प्रांत अधिकारी फकिरा व त्याच्या दोस्तांना पकडून बेड्या ठोकतात. इथे विष्णुपंत कुलकर्णी मात्र फार ठामपणे प्रांतसाहेबांना पटवून देतात की, जनतेला अन्न मिळवून देण्याची तुमची जिम्मेदारी आहे, अन्यथा मरणारी माणसं पाहून तरणी पोरं लुटालूट करणारच.

शेवटी प्रांताधिकारी फकिरासकट सगळ्यांना मुक्त करतात परंतु हा लढा असा संपत नाही. शिगावचे खोत प्रांताधिकाऱ्यांना सतत भेटून, वाटेगावचे वतनदारच बदलण्याचा डाव खेळतात. सातत्याने फकिराला गुन्हेगार सिद्ध करण्यात प्रयत्नरत राहतात.

या दोन गावामधलं वैर कधीच संपत नाही आणि फकिरा कधीच कुणाला घाबरत नाही. अनेक धाडसी कामं तो करतच राहतो. इंग्रजी खजिनाच लुटण्याचं अनंत अवघड काम तो करतो आणि इंग्रजी सत्तेला सळो की पळो करून सोडतो. कृष्णा-वारणेच्या खोऱ्यात लपून, इंग्रज पोलिसांना जेरीस आणतो.

फकिरा सापडणं अशक्यच आहे असं जाणवल्यानंतर प्रांताधिकारी एक वेगळीच युक्ती करतात. फकिराच्या सबंध वस्तीलाच अटक करतात! मग मात्र नाईलाजाने फकिरा आत्मसमर्पण करतो, आपली माणसं सुखरूप रहावीत म्हणून!

हे सगळं सविस्तरपणे पुस्तकात वाचण्याचा आनंद फार वेगळा आहे. अतिशय चटकदार संवाद, ठळक पात्ररचना आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे अतिशय निर्भीड, नि:स्वार्थ अशी राणोजी-फकिरा ही बाप-लेकाची जोडी!

गावासाठी जोगणी पळवून आणताना शिरच्छेद झालेला राणोजी आणि गावातल्या लोकांना पोटभर अन्न मिळावं म्हणून खजिनाच लुटून आपल्या लोकांना जगवणारा फकिरा. सहृदय माणुसकीचा जिवंत झरा असणारी कुलकर्णी-पाटलाची जोडी देखील फार थोर वाटते. आणि नवरा, मुलगा गमावलेली मूक अश्रू ढाळणारी राधा, फकिराला आत्मसमर्पण करण्यासाठी जाताना पाहून हंबरडा फोडते तेव्हा आपल्याही काळजाचा एक ठोका चुकतो.

मराठी साहित्यामधलं एक मानाचं पान असणारी ही कादंबरी अण्णाभाऊंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीस अर्पण केलीय हे किती औचित्यपूर्ण आहे!

अण्णाभाऊंची भाषा, चित्रमय शैली याबद्दल काय सांगावं? गरिबी सरून बरे दिवस आले हे सांगताना ते लिहितात- ''बणाबाईला सुखाचे दिवस आले. कलंडलेलं घर सरळ होऊन, स्वत:च्या पायावर उभं राहिलं.''

चैत्राच्या उन्हाचं वर्णन करताना ''वातावरण भलतंच रागावलं होतं'' असं ते लिहितात. श्रावणातल्या पावसाबद्दल ते लिहितात, ''पावसानं आखडलेले पाय पसरले. सृष्टी भिजली. हळूहळू काळी वावरं हिरव्या शालीत गेली.'' राणोजीचे विचार व्यक्त करताना- ''जोगणी आणताना मरण आलं, तर आपल्या अंगावरच्या जखमा गावाच्या काळजावरच्या मोहरा ठरतील. गबऱ्याच्या टापा कोरल्या जातील.''

ही अशी अत्यंत चित्रमय भाषा हे फकिराचं अजून एक वैभव आहे. १९५९ साली प्रकाशित झालेली ही कादंबरी, आजही उत्साहाने-उत्कंठतेने वाचली जाते, म्हणूनच 'फकिरा' अजरामर आहे.

**- वृषाली किन्हाळकर**
भ्रमणध्वनी : ९४२२८७१३६५


# प्रकाश भातम्ब्रेकर द्वारा अनूदित उल्लेखनीय कृतियां

12, रोज़ विला, गोरेवाडी, माहिम, मुंबई - 400 016
मो. + 91 93244 09490 / 79779 10107



केशव परांजपे

# वाटेवर काटे वेचित चाललो!



**२ मे २0२0... वसंतराव देशपांडे यांच्या जन्माची शताब्दी! ३0 जुलै १९८३ या दिवशी वसंतराव देशपांडे गेले. त्यांना जाऊन ३६ वर्षे होऊन गेली तरीही त्यांच्या गायनाविषयी रसिकमनात अजूनही कुतूहल आहे.**

**ला**डिक, लडिवाळ किंवा बाळबोध सरधोपट संगीतावर पोसलेल्या मराठी रसिकतेला वसंतस्वराने दिलेली कोपरखळी अजूनही कुठेतरी झिणझिणते आहे. वसंतरावांची भावगीते अशी चारच ध्वनिमुद्रित आहेत : *कुणी जाल का सांगाल का, वाटेवर काटे वेचित चाललो, राहिले ओठातल्या ओठात वेडे शब्द माझे आणि बगळ्यांची माळ फुले अजुनी अंबरात.* भावगीताचे शब्द कवीचे, चाल संगीतकाराची; तो सांगेल त्या बरहुकूम गायची. तरीही गायक त्या गीताला आपल्या आवाजाने एक व्यक्तिमत्त्व देऊ शकतो; आणि ही गोष्ट वसंतरावांच्या भावगीतांनी सिद्ध करून दाखवली आहे. वसंतरावांचा आवाज विशिष्ट-अतिविशिष्ट होता. त्यांच्या गळ्यात भिंगरीच होती म्हणा ना, पण या अफाट फिरतीच्या पलीकडे, हरकती-खटके-मुरक्यांच्या नखरेल अलंकरणाच्या आत वसंतरावांच्या आवाजात एक गोष्ट होती – जी मराठी सुगमसंगीतात आणि मराठी मुलखातल्या उपशास्त्रीय संगीतातही दुर्मीळ आहे आणि ती 'बात' म्हणजे 'दर्द!'

बगळ्यांची माळ फुले ही कवी वा.रा. कांत यांची कविताच मुळात तरल आहे. 'बगळ्यांची माळ' ही प्रतिमा खूप नवीन आहे. प्रेमातल्या विफलतेचे सूचनही काव्यात्म आहे. या वेगळ्या संवेदनेच्या भावगीताची चाल वेगळ्या वाटेची – श्रीनिवास खळे यांची. खळेसाहेबांचे संगीत संचित गायकीच्या विविध रंगांनी समृद्ध होतं आणि 'वाकड्यात शिरण्याचा' त्यांच्या चालीचा स्वभाव होता. 'हटके' गीत, 'हटके' संगीत आणि त्याला आवाज लाभला वसंतराव देशपांडे यांचा. वसंतरावांच्या गायकीने या गीताला एक वेगळाच 'नूर' दिला. असा किस्सा ऐकिवात आहे की खळेसाहेब खाजगीत सांगत असत की 'बगळ्यांची माळ फुले' या गीताच्या ध्वनिमुद्रणाप्रसंगी पु.ल. देशपांडे स्टुडिओत आले आणि वसंतरावांची तारीफ करू लागले, वसंतरावांच्या प्रत्येक जागेला जोरकस दाद देऊ लागले, पण त्यामुळे खळेसाहेबांना हे गाणं वसंतरावांकडून जसं गाऊन घ्यायचं होतं तसं गाऊन घेता आलं नाही. बहुधा खळेसाहेबांना हरकती मुरक्या संयमाने, नेमक्या हव्यात. तिथेच वापरून गाण्याचा 'समा' बांधायचा असावा. फिरकतीपेक्षा मिंडेने अधिक काम करून घ्यायचे असावे. किस्सा कितपत विश्वासार्ह हे सांगता येत नाही, पण गाण्याचा नूर मात्र खास वसंतरावांच्या शैलीने जमला आहे एवढं खरं! मराठी चित्रपट आणि सुगम संगीताचे शहेनशाह (नव्हे 'सम्राट') सुधीर फडके, तलत महमूद यांच्या शैलीची आठवण करून देणारे अरुण दाते वा अन्य कोणत्याही गायकाहून वसंतरावांची अभिव्यक्ती वेगळी आहे. वसंतरावांच्या आवाजात उसनं अवसान नाही सुरेलपणाचं, भारदस्तपणाचं, हळवेपणाचं, मर्दानगीचं – कोणतंच आणलेलं अवसान नाही. त्यांचा आवाज मुलायम नाही तर कडक आहे, गळ्यात प्रचंड फिरत आहे, उच्चार किंचित सानुनासिक आहेत. या सगळ्या सामुग्रीतून एक अस्सल रसायन त्यांच्या गाण्यात अवतीर्ण होतं. काळजापर्यंत पोचण्याची आपली एक वाट तयार होते, त्यांचं गाणं 'सिद्ध' होतं. 'जे' गात आहे आणि 'जसं' गाताहेत त्याची एकतानता त्यांचा गळा साधतो आणि हीच गोष्ट 'असर' करते.

'बगळ्यांची माळ फुले' या गीतात कवितेचा भाव, चालीचा भाव आणि गायनाचा भाव यांची एकतानता जुळून आली आहे आणि या जुळण्यात वसंतरावांची 'समज' फार महत्त्वाची भूमिका पार पाडते आहे. रम्य आठवणी, हुरहुर आणि ''तू गेलीस तोडुनी ती माळ सर्व धागे'' ही वेदना यांतून या कवितेचा एक 'सूर' ('मूड' किंवा 'टोन') बनला आहे, तो सूर संगीतकार आपल्या चालीच्या ठेवणीतून साधतो आहे आणि गीत-संगीताचा तोच सूर गायक गळ्याच्या सर्व कसरतींच्या तळाशी गुंजत ठेवतो आहे असा अनुभव हे गीत देतं. सूर-ताल, शब्दोच्चार, गळ्याची कार्यक्षमता या पलीकडे गीताची गायकाकडून एक मागणी असते आणि ती मागणी गायक पूर्ण करतो तेव्हा ते गीत सिद्ध होतं – बगळ्यांची माळ फुले या गीताची अशी मागणी वसंतरावांनी पूर्ण केली आहे. गीताच्या वेदनेचा सूर – 'दर्द' गाण्याच्या तळाशी गुंजत ठेवला आहे. ही सर्व प्रक्रिया अतिशय सूक्ष्म असते आणि ती पूर्ण करण्याचा प्रयत्न दिसला की ती फसते. वसंतरावांच्या संवेदनेत गझलगायकी मुरलेली होती त्यामुळेच या गीताची अभिव्यक्ती इतकी उत्तम जमली. वसंतरावांच्या भावगीतांची अभिव्यक्ती गझलच्या जातकुळीची आहे.

रसिकांना वसंतरावांची ओळख आहे ती भावगीतगायक म्हणून नाही, तर नाट्यसंगीताचे खणखणीत नाणे म्हणून. 'कट्यार काळजात घुसली' या नाटकातल्या त्यांच्या भूमिकेबद्दल आणि गायनाबद्दल खूप बोललं, लिहिलं गेलं आहे. हे नाटक हा जसा वसंतरावांच्या कारकिर्दीचा भाग्ययोग तसाच तो नाट्यसंगीताच्या दुनियेचाही भाग्ययोग! वसंतरावांच्या अंगच्या गुणसमुच्चयाला इतका समर्पक न्याय या संगीत नाटकाने दिला आणि त्या नाट्यकृतीला संपूर्ण न्याय वसंतरावांनी दिला की संगीत नाटकाच्या इतिहासाचे हे नाटक म्हणजे एक सोनेरी पान ठरले. नाटककार पुरुषोत्तम दारव्हेकरांनी वसंतरावांना डोळ्यांसमोर ठेवून हे नाटक लिहिले असावे असा तर्क अनेक जणांनी केला आहे, परंतु वस्तुस्थिती मात्र तशी नाही. संगीतकार पं. जितेंद्र अभिषेकी यांनी या नाटकातील पदांच्या चाली वसंतराव त्या गाणार आहेत, हे गृहीत धरून लावल्या आहेत. पण दारव्हेकरांनी जणू कल्पवृक्षाच्या तळी बसून आपल्या नाटकातील व्यक्तिरेखा चितारली असावी की ज्यामुळे ती तंतोतंत मूर्तिमान करणारी व्यक्ती या भूमिकेसाठी मिळाली की (थोडी अतिशयोक्ती बरं का!) जी व्यक्ती आधीच या भूमिकेसाठी घडली होती तिचीच आकृती दारव्हेकरांना दिसत गेली? पं. जितेंद्र अभिषेकींनी स्वत:ला अनेक प्रकारांच्या संगीताच्या अभ्यासाने समृद्ध केले होते. शास्त्रीय-रागदारी संगीताच्या अनेक घराण्यांशी त्यांनी गंडाबंध जवळीक साधली होतीच; पण त्याहीपलीकडे ठुमरीचे अनेक रंग त्यांनी आत्मसात केले होते. भक्तिसंगीत, कव्वाली, अगदी पाश्चात्य संगीताशीही त्यांनी परिचय करून घेतला होता. मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या चढ्या आणि खड्या आवाजातल्या वक्र चलनाच्या नाट्यगीतांचा अभिषेकींच्या संगीतावर लक्षणीय प्रभाव होता. त्यामुळेच वसंतरावांच्या गळ्यातच नव्हे तर मनाच्या बगिच्यात बहराला येतील अशा स्वरवेली त्यांनी 'कट्यार'साठी रेखल्या आणि वसंतरावांनी या चालींचं सोनं केलं. या चाली इतरांनी गाण्यासाठी वसंतरावांनी अवघड करून टाकल्या. या चालींवर वसंतरावांच्या गळ्याच्या अफाट फिरतीची अशी मुद्रा उमटली की ती फिरतही या चालींची व्याख्या बनली. 'घेई छंद मकरंद'मधल्या सुरुवातीच्या तानेने अनेकांना वेड लावले. अनेक नव्या श्रोत्यांचे लक्ष या तानेने नाट्यसंगीताकडे वेधून घेतले. संगीताची समज असो वा नसो या करामतींनी श्रोत्यांना आकर्षित करून घेतले एवढे खरे. नाट्यसंगीतावर बालगंधर्व

गायकीचा अंमल होता (आणि आहे.) सगळेच काही बालगंधर्व असत नाहीत. त्यामुळे एक कृतक लडिवाळपणा–पसरटपणा नाट्यसंगीतावर, साचलेल्या पाण्यावर शेवाळाचा थर जमावा तसा जमलेला होता. मध्य लयीच्या ताना झिलई गेलेल्या मण्यांच्या विस्कटलेल्या माळांसारख्या नाट्यगीतात लोंबत होत्या. किंवा दुसरा एक प्रकार म्हणजे स्वच्छ निकोप आवाजातला रागदारीवर आधारित भावशून्य कवायत प्रकार. बरे ही कवायत अशी तर शारीरिक शिक्षणाच्या तासाला पंधरा मिनिटांतल्या पंधरा मिनिटांत करावी तशी. (अर्थात सन्माननीय अपवाद होतेच) या पार्श्वभूमीवर वसंतरावांचे नाट्यसंगीत ताजेतवाने, चुस्त चौकस म्हणून नक्कीच वेगळे, उजवे ठरले. खुद्द वसंतरावांचा बालगंधर्वांच्या गायकीचा चांगला अभ्यास होता आणि ती गायकी त्या सच्चाईने ते प्रस्तुतही करू शकत होते. रेडियोवर असे काही नमुने वसंतरावांनी सादर केले होते असे संदर्भ आहेत. वसंतरावांना स्वत:ला दीनानाथरावांची गायकी आवडायची. दीनानाथरावांचे ते 'एकलव्य' शिल्प म्हणवले गेले, पण वसंतराव जे नाट्यसंगीत गायले ते बालगंधर्वांचे नव्हते आणि दीनानाथरावांचेही नव्हते. वसंतराव नाट्यसंगीत गायले ते स्वत:च्या अंदाजाने! वसंतरावांना नाट्यपदाचा शब्दार्थ आणि संगीतार्थ नीट उमजलेला असे आणि तो ते समर्थपणे अभिव्यक्त करीत. या अभिव्यक्तीत त्यांच्या गळ्यातली चपळ तानक्रिया, खटका–कण असे अंगभूत अलंकार सहाय्याभूत होते. 'मृगनयना रसिक मोहिनी' (संशयकल्लोळ), 'कर हा करी धरिला शुभांगी' (संशयकल्लोळ) ही पदे या दृष्टीने ऐकावीत.

वसंतरावांना शब्दांची चांगलीच जाण होती. कवितेची जाण होती. शास्त्रीय संगीताच्या प्रांतातसुद्धा शब्दांची जाण असल्याने नक्की फरक पडतो. वसंतराव लाहोरला राहिलेले होते पंजाबभर फिरून त्यांनी उदंड गाणे ऐकले होते. उर्दू काव्याचे संकेत त्यांना अवगत होते. गायिका कुसुम शेंडे यांनी आठवण सांगितली आहे की त्या सरस्वतीबाई राजेंकडे गायन शिकत होत्या तेव्हा काही वेळा बंदिशींचा अर्थ लागत नसे, कारण बंदिशीचे शब्द नीट लिहिले गेलेले नसत. अशा बंदिशींचे शब्द आणि त्यांचे अर्थ वसंतराव नेमकेपणाने सांगत.

वसंतरावांचा आवाज गोड, मुलायम नव्हता. मा. दीनानाथांचे ते (एकलव्य) शिष्य होते खरे पण त्यांचा आवाज दीनानाथरावांसारख्या नव्हता. दीनानाथांचा आवाज उंच पट्टीतला होता, त्या आवाजात 'खर्ज' त्या मानाने कमी होता पण नादमयता, नादमाधुरी अपार होती. वसंतरावांचा आवाज – स्वर संपूर्ण स्थिर असा कोणत्याही ध्वनिमुद्रणात तरी ऐकायला मिळत नाही. सतत पुढच्या (किंवा क्वचित मागच्या) स्वराचा कण घेत तो झंकारत राहतो. झंकार हे वर्णन एवढ्यासाठीच की त्याचे छेडण्याशी साधर्म्य आहे. अगदी अधिक नेमकेपणाने सांगण्याचा प्रयत्न करायचा तर छेडलेल्या तारेवर संतूरची कांडी अलगद टेकवल्यावर जसा 'फ्लिकर' होतो तसा वसंतरावांचा आवाज वाटतो. याला आवाजाची लवचिकता, चापल्य वेग किंवा फिरत म्हणता येत नाही. याउलट तारेवर घर्षणाने जो स्वर उत्पन्न होतो – व्हायोलिन, सारंगी तो सलग किंवा स्थिर असतो. क्षणाच्या कणाकणाला तो खळाळत नाही तर सलग प्रवाही असतो. या सर्व अर्थाने वसंतरावांचा आवाज सदोष म्हणायला हवा. पण या आवाजाने खुलेल अशी गायकी वसंतरावांनी अनुसरली होती. अन्य गायक जेवढ्या जागेत हरकत/मुरकीचा विचारही करू शकणार नाहीत तेवढ्या अल्प अवकाशात वसंतराव एक नक्षीकाम पुरे करीत असत. त्यांचा आवाज कडक, काहीसा राकट असला तरी ठहरावाच्या जागी तो हलका लावून ते मार्दवाचा भास छान उत्पन्न करीत. त्यांचा आवाज जवारीदार होता. जवारीदार आवाज ध्वनिमुद्रणाला फारसा अनुकूल नसतो असे काही तज्ज्ञांचे मत आहे. परंतु मैफलीत ऐकताना अशा आवाजात एक आगळा मजा असतो, एक ताजगी जाणवते. ध्वनिमुद्रणात तो खरखरीत आणि सुरापासून जरा फटकून ऐकू येतो. स्वर आणि शब्दांच्या उच्चारातून वसंतराव मर्दानी पेशकश करीत. मर्दानी म्हणजे आक्रमक नव्हे. गीताची गरज आक्रमकतेची, वीर रुद्र रसाची असेल तरच आक्रमकता, एरवी केवळ पुरुषी मर्दानी अभिव्यक्ती. आपल्या आवाजाच्या very high pulse rate चा उपयोग करून ते द्रुत तानेतून द्रुततम भास उत्पन्न करायचे. वसंतरावांचे अतुलनीय बलस्थान म्हणजे त्यांनी केलेले अनेकविध गायकींचे मार्मिक आकलन. कोणत्याही गानप्रकाराचे, गायकीच्या ढंगाचे त्यांना 'अनुकरण' copy करावे लागत नसे तर तो ढंग ते अस्सलपणे साकार करू शकत. आपल्या गायनातून एक सुसंगत 'कहन' त्यांना साध्य होत असे.

वसंतरावांच्या सुरेलपणाविषयी सार्वत्रिक शेरेबाजी चालत असे आणि चालते. काही नि:पक्षपाती, स्वागतशील विद्वानांना याविषयी विचारले असता त्यांनीही म्हटले की वसंतराव कणसूर होते – निदान अव्वल सुरेली नव्हते. या शेऱ्यांचा थोडा परामर्श घेऊ. वसंतरावांचा स्वर स्थिर लागत नसे – सतत भिंगरीसारख्या, जागच्या जागीसुद्धा फिरत असे त्यामुळे स्थिर खडा सूर ऐकण्याची सवय ज्या कानांना आहे त्यांना तो स्वर 'सुरेल' वाटत नसेल. वसंतरावांचा स्वर स्थिर लागत नसे की वसंतराव स्थिर स्वर लावत नसत असा प्रश्न विचारल्यावर पं. सत्यशील देशपांडे यांनी पं. कुमार गंधर्व आणि पं. वसंतराव देशपांडे यांनी एकत्र, एकदिलाने, एका शैलीत केलेली भीमपलास रागाची आलापी यूट्यूबवर ऐकावी असे सुचविले. चमत्कृतीशिवाय सहज शांत सुराचं काम करण्यात वसंतराव त्या रेकॉर्डिंगमध्ये तरी कुठेही कमी पडलेले नाहीत, अशी ग्वाही पं. सत्यशीलजींनी दिली आहे. सरळसोट गाण्याचा वसंतरावांचा पिंड नव्हता. त्यांची सर्जकता नव्या वाटा, अनपेक्षित वळणांनी जाणारी होती. त्यांना जसे गायचे

होते तसा – त्या गायनाला अनुकूल आवाज त्यांनी लावला. सत्यशीलजींच्या मते वसंतरावांची सर्जकता त्यांच्या आवाजाची अनुगामिनी नव्हती तर आवाज तिच्या हुकमाचा ताबेदार होता. शास्त्रीय गायनाच्या संदर्भात सत्यशीलजी म्हणतात की ''वसंतरावांना आपल्या भात्यातले बाण प्रत्यंचेवर लावण्याची एवढी असोशी होती, भराभराभरा आपल्या खजिन्यातली खेळणी बाहेर मांडायची त्यांना इतकी लगबग होती की रसिकाला ऐकताना धाप लागावी. अनवट राग, सिद्ध रागांतल्या अनवट वळणाच्या बंदिशी पेश करण्यात त्यांना स्वारस्य वाटे. रटाळपणाची शक्यताही त्यांना नकोशी वाटे. नियमांनुसार आखून-रेखून, गायनाची सर्व अंगे कर्तव्यभावनेने पठण करून गाण्यात रमणारे ते नव्हते. काहीतरी वेगले, रसिले, 'हटके' म्हणून जे आहे ते दाखवावे ही त्यांची मैफलीची व्याख्या होती.'' सत्यशीलजींनी वसंतरावांच्या अनेक मैफली ऐकल्या. त्यातल्या कित्येक पडल्या होत्या, असे ते नमूद करतात. पण हुकमी बेतास बेत जमण्यापेक्षा सपशेल पडणेही परवडते असा वसंतरावांचा बाणा होता म्हणूनच ज्या मैफली जमायच्या त्या फार जमून जायच्या! खऱ्या कलावंताचा कलंदरपणा वसंतरावांच्या अंगी पुरता बाणलेला होता.

शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात वसंतरावांच्या तयारीच्या तुलनेत व्हावा तसा नावलौकिक झाला नाही. एकतर विशेषत: महाराष्ट्रात ज्या पद्धतीचे शास्त्रीय गायन ऐकण्याची श्रोत्यांना सवय होती त्यापेक्षा वसंतरावांची पद्धत नक्कीच वेगळी होती. वसंतरावांच्या काळात 'मेगा इव्हेंट्स' नव्हते आणि संगीतसभांचे कार्यक्रम ठरवणारी मंडळी स्वत:ला गाणे समजते, आपण शास्त्रीय संगीतात मुरलेले आहोत असा समज बाळगून होती. या मंडळींनी गाणे खरेच बरेच ऐकले होते. तरीही स्वत:च्या वैयक्तिक आवडी आणि कुवतीबाहेरचे संगीत त्यांना झेपत नव्हते. याच संदर्भात वसंतरावांच्या कणसूर किंवा अव्वल सुरिले नसल्याची प्रमाणाबाहेर चर्चा झाली. स्पर्धेत असणाऱ्या अन्य गवयांना ही चर्चा फार फायद्याची होती. याच अर्थाने पं. सत्यशील देशपांडे यांनी 'संगीतसूर्य डॉ. वसंतराव देशपांडे' या जयराम पोतदार यांच्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत 'वसंतराव देशपांडे या संगीतसूर्याला' उद्देशून तथाकथित ढुढ्ढाचार्यांच्या दुर्लक्षाचे लागलेले ग्रहण असा शब्दप्रयोग केला असावा. 'कट्यार'पासून वसंतराव नाटकात आणि मग नाट्यसंगीतावरील अभ्यासपूर्ण रोचक समालोचनासह गायन अशा कार्यक्रमांत व्यस्त राहू लागले. तरीही शास्त्रीय गायनाच्या बैठकीच्या आमंत्रणाचा त्यांनी कधीही अव्हेर केला नाही (असे जयराम पोतदार सप्रमाण सांगतात.) तो काळ जरी पी.आर.चा. नव्हता तरीही वसंतरावांनी शास्त्रीय गायक म्हणून स्वत:ला प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले असावेत किंवा तशी महत्त्वाकांक्षाही बाळगली असावी असे वाटत नाही. त्यांची मैफलीची व्याख्या शास्त्रीय गायन नियमित ऐकणाऱ्या श्रोत्यांतल्या अल्पसंख्याकांच्यासुद्धा पचनी पडणारी होती. त्यामुळे अशा मोजक्या श्रोत्यांसाठी शास्त्रीय गायन आणि सर्वांसाठी नाट्यसंगीत असे काहीसे समीकरण वसंतरावांच्या मनातही असावे.


शास्त्रीय संगीताच्या अभ्यासाच्या बाबतीत वसंतराव मात्र यत्किंचितही कमी नव्हते. काही जाणकारांच्या मते रटून, घोटून हुकमीपणा आणणे आणि हुकमी येणाऱ्या गोष्टींवर भिस्त ठेवून मैफलीत त्यापलीकडे न जाणे असा धोरणीपणा आणि असे परिश्रम वसंतरावांनी केले नाहीत. ग्वाल्हेर, किराणा, पतियाला आणि भेंडीबाजार या चार घराण्यांचा परिपूर्ण म्हणता येईल असा अभ्यास वसंतरावांनी केला होता. या घराण्यांच्या मानदंडांकडून रीतसर तालीम त्यांनी घेतली होती. वसंतराव शास्त्र आणि विद्या पारंगत होते. त्यांनी आपल्या तबियतीच्या हिशोबाने, सर्वसामान्यांना अवघड वाटणारे तंत्र आत्मसात केले होते आणि कलेची त्यांना चाड होती. पं. कुमारगंधर्व हे वसंतरावांहून वयाने लहान. तरीही वसंतरावांचे कुमारांबरोबर जे नाते होते ते मित्र-गुरू असे होते. कुमारांच्या 'कलाकार'पणाचा वसंतरावांनी मनापासून नि:स्सीम आदर केला. पं. भीमसेन जोशी, पु.ल. देशपांडे यांचे वसंतरावांबरोबरचे मैत्र वसंतरावांबद्दल बरेच काही सांगून जाते. शास्त्रीय संगीतक्षेत्रात वसंतरावांची तशी उपेक्षा झाली हे जरी खरे असले तरी वाराणसीत पं. रविशंकर जो 'रिम्पा संगीत समारोह' आयोजित करीत त्यात वसंतराव अनेक वेळा गायले होते. पं. भीमसेन जोशी प्रस्तुत 'सवाई गंधर्व' महोत्सवात मोक्याच्या वेळेला वसंतराव १९६२ पासून १९८२ पर्यंत (१९६३, ६४ चा अपवाद वगळून) दरवर्षी गायले. मोठ्या मनाच्या संगीतविषयक व्यापक मोकळा दृष्टिकोन बाळगणाऱ्या अभ्यासू प्रतिभावान कलावंतांनी दिलेली मान्यता, पसंतीची पावती वसंतरावांना भरून पावली. साठीनंतर जेव्हा मानमरातब, प्रसिद्धी या गोष्टी सहजपणे चालत, नव्हे मिरवणुकीने यायच्या त्या वयातच, चौसष्टाला वर्षी वसंतराव गेले. देवाने त्यांना दीर्घ आयुष्य दिले असते तर त्यांनी रसिकांना मनमुराद गाणे ऐकवले असते; श्रोत्यांची रसिकता, अभिरुची खूप संपन्न केली असती हे खरे; पण मानमरातब, सत्कार-पुरस्कारांत ते रमले नसते, हेही तितकेच खरे! वसंतरावांना जाऊन तीन दशके उलटून गेल्यानंतरही त्यांनी अजरामर करून ठेवलेली कलाकृती नव्या रूपात पुन्हा साकार करण्यासाठी तरुण कलाकार सरसावतात. यातील एक महत्त्वाचा घटक वसंतराव आणि त्यांची चिरतरुण गायकी हा नक्कीच आहे!

**– केशव परांजपे**
भ्रमणध्वनी : ७७३८६७४३२१
kdparanjape@gmail.com

रविप्रकाश कुलकर्णी

# तेजोनिधी-स्वरनिधी पंडित वसंतराव देशपांडे

साधासुधा वाटलेला हा माणूस आता मत्त मयुराप्रमाणे स्वत:च्याच धुंदीत असल्यासारखा मन:पूत गात तर होताच पण जणू स्वरांच्या इशाऱ्यावर साऱ्या श्रोत्यांना झुलवायला लागला होता.



'कट्यार काळजात घुसली' या संगीत नाटकातील खाँसाहेब

**या** नावाला संगीतक्षेत्रात तरी ओळखीची गरज नाही. वसंतराव देशपांडे म्हटलं की 'कट्यार काळजात घुसली' या नाटकाचं नाव ओठावर येणारच. आता 'कट्यार' म्हटलं की, 'तेजोनिधी लोहगोल' हे गाणं आठवेल. तर कुणाला 'या भवनातील गीत पुराणे'. तुम्हाला राग-संगीतात रुची असेल तर तुम्ही 'सुरत पिया की न छिन बिसराये'ची निवड कराल. 'लागी करजवा कट्यार'ला तर ऑप्शनच नाही. पण मग 'घेई छंद मकरंद प्रिय हा मिलिंद'चं काय? थोडक्यात 'कट्यार' आणि वसंतराव हे समीकरण पक्कं! ह्या नाटकाचे लेखक-दिग्दर्शक पुरुषोत्तम दारव्हेकर यांनी वसंतरावांना वेगळ्याच धाटणीने दाद दिली आहे. ते म्हणतात, ''खरे तर कट्यारमुळे वसंतरावांना नाव मिळाले, असे नसून वसंतरावांमुळे 'कट्यार' नाटक लोकप्रिय झाले, हे समीकरण बरोबर आहे.''

प्रत्येक कलावंताच्या आयुष्यात एक योग यायला लागतो, जो त्याचे सगळे आयुष्य बदलून

टाकतो. त्यालाच काही जण 'टर्निंग पॉईंट' देखील म्हणतात. ज्याने सारे आयुष्य उजळून निघते आणि तो प्रकाश न संपणारा असतो. त्याची आठवण पुन्हा-पुन्हा निघणार असते.

वसंताख्यान हे असं आहे. पण अशावेळी मला मात्र आठवतो तो फार-फार पूर्वीचा काळ, ज्याच्या आठवणी आठवणं आणि न आठवणं या सीमारेषेवर आहेत. कसे ते सांगतो-

आमच्या एका नातेवाईकांनी पुण्यात सायकलवरून मला डबल सीट एका ऑफिसात नेलं. सगळी सरकारी ऑफिसं तेव्हापासून एकसारखीच, म्हणजे पिवळ्या फाईलचे ढीग टेबलावर, मात्र टेबलाच्या मागे खुर्चीवर कुणी असेलच ह्याची खात्री नाही. पण काहीजण मात्र खुर्चीला चिकटून ठेवल्यासारखे. जणू त्यांच्यावरच साऱ्या ऑफिसचा भार असावा आणि म्हणूनच ऑफिस चालत असावं. आज देखील ह्यात फारसा फरक नसावा.

त्यावेळी देखील मला ते जाणवलं.

''काय तात्या बरं आहे का?'' असं म्हणत, कुणाला लांबूनच हात करत माझे नातेवाईक चालले होते. त्यांच्याबरोबर छोटासा मी. मलाच कळत नव्हतं मी कुठे आणि कशासाठी चाललो आहे. मग आम्ही एक टेबलापाशी थांबलो

''काय महाराज कुठे आहेत?'' त्यांनी विचारलं.

समोरच्या खुर्चीला लावलेल्या कोटाकडे पहात ते खुर्चीवरचे म्हणाले, ''कोट खुर्चीला लटकवला आहे का? म्हणजे स्वारी आली आहे. असेल कुठेतरी...''

काहीतरी अपशब्द उच्चारायचा त्याचा विचार असावा, पण छोट्या मला पाहून त्याने स्वतःला आवरलं असावं असं मला वाटलं.

एवढ्यात एकजण आला आणि, ''अरे तुम्ही केव्हा आला? आणि हे छोटे कोण बरोबर?'' म्हणत आम्हाला त्याने नेलं - कॅन्टिनमध्ये.

त्यांचं काय बोलणं झालं मला कळलं नाही. फक्त, ''मग संध्याकाळी येताय का?'' हे शेवटचं वाक्य कळलं.

आमच्या त्या नातेवाईकानं मला संध्याकाळी पण बरोबर घेतलं. लक्ष्मीबागेत आम्ही गेलो.

मैफिलीची तयारी सुरू झाली होती. मांडामांड चालू होती. मग एकजण पांढराफेक सुरवार नव्हे लेंगाच आणि वर तसाच झब्बा घातलेला मंचावर प्रेक्षकांना नमस्कार करत, स्थानापन्न झाला.

सकाळी आम्हाला भेटलेले तेच ते गृहस्थ होते! मैफिलीला सुरुवात झाली. सोबत साथ-संगत करणारे होतेच. आधी कुठला तरी राग झाला. टाळ्यांचा कडकडाट झाला.

''मारवा गावा तो ह्या माणसानेच'' कुणी तरी म्हटलंच. पण प्रेक्षकांना काहीतरी वेगळंच हवं होतं अशी उत्कंठा वाटली. आणि नाट्यसंगीत सुरू झालं-

*शूरा मी वंदिले*

मग आलं-

*रवी मी, चंद्र कसा मग मिरवितसे*

बघता-बघता सारी मैफिल ह्या गाणाऱ्याने जणू आपल्या ताब्यात घेतली.

*'शतजन्म शोधिताना...'* सुरू झालं आणि वाटलं. अख्खं लक्ष्मीबाग सुरानं भरून गेलं आहे.

सकाळी बघितलेला साधासुधा वाटलेला तोच हा माणूस आता मत्त मयुराप्रमाणे स्वतःच्याच धुंदीत असल्यासारखा मनःपूत गात तर होताच पण जणू स्वरांच्या इशाऱ्यावर साऱ्या श्रोत्यांना झुलवायला लागला होता.

न राहवून मी माझ्या नातेवाईकांना विचारलंच, ''सकाळी ज्याला आपण भेटलो तेच हे गाणारे आहेत?''

''सकाळी जे पाहिलं, जे ऐकलं ते विसर. हा आत्ता गातोय ते खरं. हा खरा वसंता देशपांडे! ह्याचा जन्म ह्यासाठीच झालाय...''

तर हा वसंता देशपांडे ते वसंतराव देशपांडे मला वेळोवेळी कधी जवळून तर कधी सगळ्यांना दिसले तसे मैफिलीत भेटत गेले. पण एक माणूस आणि कलावंत म्हणून कोड्यात टाकत गेले.

लहान्या वसंताचं कायम श्रद्धास्थान राहिलं ते त्यांची आई. कारण संगीताचा वारसा तिच्याकडूनच मिळाला. ह्या लहान वसंताने भालजी पेंढारकरांच्या 'कालियामर्दन' चित्रपटात चुकलो, बोलपटात 'कालियामर्दन' करणाऱ्या छोट्या कृष्णाचं काम केलं होतं. पण ते तेवढ्यावरच राहिलं. त्याचं एक छायाचित्र उपलब्ध आहे पण कुणालाही ते कुठल्यातरी पुस्तकात छापणं, जेणेकरून त्याचा सांभाळ होईल असं वाटलं नाही. खुद्द वसंतरावांनी तर ह्याबाबत उच्चारदेखील केला काही असं का झालं असेल?

त्याच्याही आधी असेल, नागपूरला. मूक चित्रपटाच्या अगोदर पिरात बसून तबला-पेटी आदी संगीत वाजवायला लागायचं, त्या वाद्यवृंदात एक वसंता होता तर दुसरा रामचंद्र चितळकर. जो पुढे सी. रामचंद्र संगीत दिग्दर्शक, निर्माता वगैरे झाला. लोकप्रिय झाला. ह्या दोघांचा परस्परसंबंध पुढे कधीच कसा आला नाही? नाही म्हणायला, वसंतरावांनी पुढे मराठी चित्रपटात चाळीस-पन्नास गाणी तरी त्यांनी म्हटली आहेत. ज्यात 'सप्रेम नमस्कार विनंती विशेष' (वैजयंता), 'आली सखी आली प्रियामिलना' (अवघाचि संसार), 'झांजीबार, झांजीबार (पेडगावचे शहाणे), 'माझ्या कोंबड्याची शाळा' (नवराबायको), 'ही कुणी छेडली तार' (गुळाचा गणपती), 'मला वाटते होऊनी कुंतल' (दोन घडीचा डाव), 'रंगू बाजाराला जाते हो' (वंशाचा दिवा), 'कानडा राजा पंढरीचा' (झाला महार पंढरीनाथ) किंवा 'टाळ बोले चिपळीला नाच माझ्या संग' (भोळीभाबडी) अशी गाणी पार्श्वगायक म्हणून त्यांनी म्हटली पण वसंतराव देशपांडे पार्श्वगायक म्हणून प्रस्थापित होऊ शकले नाहीत. मात्र वसंतराव चित्रपटात चक्क अभिनेते आणि पार्श्वगायक म्हणून ठसठशीत दिसले ते 'अष्टविनायक' चित्रपटामुळे. त्यातील 'प्रथम तुला

वंदितो दयाळा, गजानना गणराया' किंवा 'तू सुखकर्ता तू दु:खहर्ता' ही गाणी गाजली-वाजली. आणि 'दाटून कंठ येतो, ओठात येई गाणे' जणू त्यांची नाममुद्रा घेऊन आलं.

अर्थात वसंतरावांकडे 'अष्टविनायक' चित्रपट आला. ह्याला कारणीभूत त्याचं 'कट्यार काळजात घुसली'मधलं काम होतं. वसंतरावांचं गाणं खणखणीत होतं पण त्याचा उपयोग हवा तेवढा आणि हवा तसा का करून घेतला नसेल? आता सांगून विश्वास बसणार नाही, पण सुरुवातीला 'कट्यार काळजात घुसली' नाटक चालत नव्हतं! तेव्हा या नाटकातील गाण्याच्या ध्वनिमुद्रिका निघाल्या, ही गाणी आकाशवाणीवर वाजायला लागली. पुढचा 'कट्यारचा...' इतिहास-नाटक 'हाऊसफुल्ल' चालायला लागलं. नाट्यरसिक पुन:पुन्हा प्रयोग पहायला, खरं तर ऐकायला येऊ लागले, ते त्यातील वसंतरावांच्या गाण्यासाठी! अर्थात हा झाला पुढचा इतिहास.

सांगायचा मुद्दा वसंतराव पार्श्वगायक म्हणून प्रस्थापित नाही होऊ शकले. वसंतरावांच्या चित्रपटातील गाण्याचा कुणी कार्यक्रम केल्याचं आठवत नाही.

सांगायचा मुद्दा वसंतरावांचा चित्रपटाशी मूकचित्रपटापासून संबंध आला पण चित्रपटाशी संबंधित जुनाजाणता कलावंत म्हणून त्याला सिनेमावाल्यांनी कधी हारतुरा केलेला आठवत नाही. आणि वसंतरावांनी त्याबद्दल कधी वाच्यता देखील केली नाही, असं कसं?

वसंतराव कोड्यात पाडतात ते असे!

लिहिता-लिहिता मी खूप पुढे आलो, पण वसंतरावांच्या बाबतीत असंच होतं...!

वसंतरावांच्या आयुष्यातील एक विशेष घटना म्हणजे त्यांचे मामा, जे रेल्वेत होते. त्यांची बदली लाहोरला झाली तेव्हा त्यांनी वसंताला आपल्याबरोबर नेलं. १९३८-१९४० ते लाहोरला होते. म्हणजे वयाच्या १८ ते २० काळात - जडणघडणीच्या काळात ते लाहोरला होते. जेथे पटियाला घराण्याच्या गायकीचे 'उस्ताद खलिफा' म्हणून ओळखले जाणाऱ्या असद अली खाँसाहेबांची गाठ पडली. खाँसाहेबांना एक पैसा द्यायचा व एक बंदिश लिहून घ्यायची. अशा ४० बंदिशी त्यांनी मिळवल्या आणि मामाला हे सर्व अभिमानाने सांगितले. तेव्हा मामा त्याला काय म्हणाले? ''ही वही बंबात फेक म्हणजे त्यामुळे पाणी लवकर गरम होईल!'' पुढे ते म्हणाले, ''नुसत्या बंदिशी लिहून गाणे येत नसते, त्या बंदिशी गाता येत नाहीत, तर त्या गळ्यावर चढाव्या लागतात, तसे करण्यासाठी तुला खाँसाहेबांचा विधिवत गंडा बांधून शिष्य व्हावे लागेल.''

वसंतराव विधिवत गंडाबंध शागीर्द झाले.

खाँसाहेबांनी वसंतरावांना शिकवायला सुरुवात केली, मारवाने. त्या मारवाचे इतके विभ्रम खाँसाहेबांनी दाखवले की एखाद्या रागाला इतके विविध पैलू असू शकतात हे तोपर्यंत वसंतरावांना माहितसुद्धा नव्हते. सहा महिने ते शिकत होते.

पण नंतर खाँसाहेब म्हणाले, ''जाओ बेटे, तुमको अब गाना आ गया। मैंने सब सिखा दिया है। अब आगे का रास्ता तुमको अपने आप दिखाई देगा।''

यावर अर्थातच वसंतराव म्हणाले, ''आपने अभी तक मुझे एकही राग तो सिखाया है। मुझे आपके पास और सिखना है।''

त्यावर खाँसाहेब म्हणाले, ''हां बेटे, मैने तुम्हे एकही राग जरूर सिखाया है, लेकिन उस राग के हरएक स्वर को षड्ज मानकर कितने नये रागोंका दर्शन होगा और नये रागोंके हर एक स्वर को मूर्छना करके और कितने राग तयार होंगे, इसपर जरा गहराईसे सोचो, तो सब समझमें आ जाएगा और आगे का रास्ता तुमको खुदबखुद दिखाई देगा। एक साधे तो सब साधे। सब साधे तो कुछ ना साधे। और एक बात ध्यानमें रखो, जैसा बोलते हो वैसा गाओ...''

त्यानंतर वसंतराव १९४२ मध्ये पुण्यात डिफेन्स अकांऊटस्‌मध्ये चिकटले - वय वर्षे २२ ते निवृत्त होईपर्यंत. ते सुद्धा कुठे तर नेफात!

पु.ल. देशपांडे यांनी वर्णन केल्याप्रमाणे, 'लाखात एखाद्याला मिळावे असे संगीतातल्या तबियतीचे वरदान घेऊन आलेला वसंता त्या जंगलातल्या एका तंबूत पाऊस-पाणी, रोगराई, हिंस्त्र जिवजंतू यांच्या संगतीत राहून लोकांच्या पगाराची बिले खरडू लागला. तिथे त्याची प्रकृती ढासळली. मग अखंड साठ की सत्तर रुपये एवढे सरकारी सेवेबद्दल केलेले चीज घेऊन वसंतराव निवृत्त झाले.'

असं का व्हावं? वसंतराव गाण्यात ढाण्या वाघ असतील पण इथे मात्र शेळीसारखे निमूटपणे का पिचत राहिले? ह्याला एकच एक उत्तर नसणार. मात्र त्याला मध्यमवर्गीय दुबळेपणा नक्की चिकटलेला दिसतो. ह्या सगळ्याचाच परिणाम म्हणजे वसंतरावांच्या वृत्तीत बेफिकिरी आली नसेल? त्यामुळेच त्याचं गाणं बेबंद झालं नसेल? कुठल्याही घराण्याचा टिळा त्याला लावता आला नाही. त्यांचं गाणं विविध घराण्याच्या साचेबंद आकृतिबंधापेक्षा वेगळं-धुंद करणारं असेल, पण वसंतरावांना ऐन उमेदीत मान्यता मिळाली नाही. पुलंच्याच शब्दात एक प्रसंग आहे. ते म्हणतात, 'वसंताची गायकी परंपरेच्या पालखीतून संथपणे मिरवत जाणारी नाही. दऱ्याखोऱ्यांतून बेफाम दौडत जाणाऱ्या जवान घोडेस्वारासारखी त्याच्या गायकीची मूर्ती आहे. भर उन्हाळ्यात पलाशबनात अग्निपुष्पे फुलावी तशी ही गायकी ती फुले पहायला उन्हाची तिरीप सोसणारी जवानी हवी. विस्तीर्ण माळावर बिजलीचे जणू काय वादळी थैमान पाहात राहावे तद्वत् अवाक् होऊन समोरचे श्रोते वसंताने उभे केलेले सुरलयीचे मांडव पहात होते. वीसेक वर्षांपूर्वीची मैफल नागपुरात धंतोलीवर बाबूरावजी देशमुखांच्या बंगल्यावरच्या दिवाणखान्यात ऐकणारेही असे एक्के जमले होते की गाणाऱ्या पुंडलिकालाही आपल्या भेटी परब्रह्म आले आहे असे वाटावे.

तबल्याला मधू ठाणेदार, सारंगीवर मधू गोळवलकर, मी पेटीच्या साथीला आणि गायक वसंत देशपांडे, आम्ही सगळेच तिशीच्या आसपास. आमच्यापैकी कोणीही आदरार्थी बहुवचनात शिरला नव्हता. समोर नाना जोग, बाबूरावजी देशमुख, दोडके, बाबूराव चिमोटे हे सारे आप्तस्वकीयच. त्यामुळे दाद मिळायची ती देखील 'क्या बात है वश्या', 'वा मधू' अशी आपुलकीचीच. कौशीकानडातल्या 'काहे करत मोसे बरजोरी'त वसंता घुसला होता. पांढरी चारच्या धैवतापर्यंत वसंताच्या वक्रगती नावाचे सट्टे चालले होते. 'सरगम' अशी मुश्कील निघत होती की, त्या सुरांच्या मागून धावणं मला आणि मधू गोळवलकरला अशक्य होत होतं. सुरांच्या त्या अचाट आणि अत्यंत अकल्पित स्थानावरून उठणाऱ्या फेकी ठाणेदाराच्या तुकड्यांशी झुंज घेत कुशल धनुर्धाऱ्यासारख्या समेचा केंद्रबिंदू वेधून जात होत्या. चीज संपली आणि मैफिलीला टाळी देण्याचे भान राहिले नाही. त्या धुंद शांततेची, त्या सन्नाट्याची दाद, हजार हातांच्या टाळ्यांच्या कडकडाटाहूनही अधिक मोलाची असते. काहीतरी अलौकिक घडताना अनुभवल्यानंतर होणारा आनंद अविर्वचणीय असतो. त्या मौताला शब्द शिवला तर त्या क्षणाचे पावित्र्य बिघडते. वसंताच्या गाण्याइतकाच त्या सन्नाट्याचा मजा घेत आम्ही गाणारे, वाजविणारे आणि श्रोते काही सेकंद बसलो होतो. तेवढ्यात, वाढत्या वयाबरोबर ज्यांचा फक्त खडूसपणाच वाढत जातो अशा नमुन्याच्या एका म्हाताऱ्याने आपली कवळी वाजवली.

'क्यॅ हां देशपांडे - आपलं घराणं क्युठल्यं-'

'आमच्यापासूनच सुरू होणार आहे आमचं घराणं' वसंताने ताडकन् उत्तर दिलं. दिवाणखान्यातल्या साऱ्या नागपुरी रसिकतेनं त्या जबाबाला छप्परतोड टाळी दिली.

पुलंचं हे वसंत कौतुक वाचायला आज सुंदर वाटतंच. पुलंनी ही किमया उत्तम साधली होती यात शंकाच नाही. पण वसंतरावांचं घराणं थोडं मान्य व्हायला त्यानंतर त्यांची जिंदगी जायला लागली. उपेक्षा भाळी आली. समाज समाज म्हणतात त्या समाजाने तरी त्यांची आधी बूज राखली का?

वसंतराव यांचे चिरंजीव बापूसाहेब यांनीच आठवण सांगितली आहे. ते सांगतात, 'एकदा एका घरी बाबांचे गाणे होते. त्यादिवशी अचानक बाबाला खूप ताप भरला, त्यामुळे त्या कार्यक्रमाला जाणे त्यांना शक्यच झाले नाही. दुसऱ्या दिवशी ते सद्‌गृहस्थ बाबा का आले नाहीत? म्हणून विचारायला आले, तेव्हा बाबांनी खुलासा केला आणि म्हणाले की, ''माफ करा. माझ्या अंगात खूप ताप असल्याने मी गायला येऊ शकलो नाही.''

यावर ते सद्‌गृहस्थ म्हणाले की, ''आमचे ५ लीटर दूध वाया गेले त्याचे काय?''

पुण्याहून नगरला शिकवणीसाठी जात. कशाने तर एस.टी. ने. अशी उपेक्षा वसंतरावांची झाली. परिणामी ते कडवट न होते तरच नवल. हा कडवटपणा किती भिनावा? त्यांचा मुलगा विजय उपाख्य बापू यांनीच पुढे आठवण सांगितली आहे की वसंतरावांनी निक्षून सांगितले की, ''काहीही करा, पण गाणे करू नका!''

त्याच्याही पुढची गोष्ट वसंतरावांच्या धाकटी कन्या नंदाताईची कहाणी- त्या दहा वर्षे चक्क रोहिणी भाटेंकडे कथ्थक शिकल्या. पुढे अपेंडिक्सच्या ऑपरेशनमुळे त्यांच्या नृत्यात खंड पडला. पण काय? मुलींनी नृत्य करणे वसंतरावांच्या आईला मान्य नव्हते! त्या मुलीची दहा वर्षे बरबाद झाली हे कुणाच्याच लक्षात आलं नसेल काय? खुद्द वसंतरावांचं म्हणणं काय असावं? ते गप्प बसले... असं का? खुद्द माझा अनुभव सांगतो.

त्या काळात एक उत्साही चमू म्हणून ते मला ओळखू लागले होते. त्याची सुरुवात मी त्यांच्या ऑफिसात गेलो होतो तेथून झाली हे मी लेखाच्या सुरुवातीलाच सांगितलं आहे. पुण्यात गेलो की त्यांची हमखास भेट कुठे ना कुठे व्हायचीच. मग ते गाणं असायचं, नाहीतर त्यांच्या घराच्या आसपास, क्लिपा लावलेला लेंगा-सदरा, हातात सायकल. ही सायकल त्यांच्या शिष्यानं गुरुदक्षिणा म्हणून दिली होती, तेव्हापासून वसंतरावांची पायपीट संपली. तर असे वसंतराव पेरू गेटपाशी दिसले. मी नमस्कार केला. तेव्हा ते म्हणाले, ''काय रे केव्हा आलास? काय करतो आहेस?'' लहान्यांना विचारायचे, हे पेटंट प्रश्न असायचे तेव्हा.

तेव्हा म्हटलं, ''गाणं केव्हा आहे?''

त्यांना बरं वाटलं असावं. तेव्हा हसत म्हणाले, ''आत्ता आहे येतोस?''

तेव्हा आगापिछा विचार न करता म्हटलं, ''चला. आलोच.''

तेव्हा समोरच्या जीपकडे बोट दाखवत म्हणाले, ''जा. तिचे जाऊन बस.''

एवढ्यात तबला-पेटी घेऊन साथीदार देखील आलेच. तोपर्यंत वसंतराव आलेच. गाडी सुरू झाली. चाललीय.... चाललीय. गाडी चाललीच होती.

आता मला भान आलं, ''आपण चाललेय तरी कुठे?''

तेव्हा वसंतराव म्हणाले, ''चाललो आहे. गाडी थांबली की उतरायचं.'' आता मी काही बोलण्यासारखं नव्हतंच. पण वसंतराव बोलत होते. नाना विषय...!

एकदाची गाडी थांबली. मोठ्ठा तंबू होता म्हणा. शेड होती म्हणा. सगळीकडे शुकशुकाट!

शेडच्या आजूबाजूला पोत्यांची थप्पी लावलेली म्हणजे कोणत्या तरी साखर कारखान्यात तर आम्ही आलो नव्हतो? एवढ्यात आमचे पेटीवाले समोरच्या ऑफिसात गेले. त्यांच्याबरोबर एक टोपी घातलेले गृहस्थ आले, ''या या... त्यांनी स्वागत केलं. त्यांनी पाणी असलेला तांब्या दिला. तुम्ही गाणं सुरू करा तोपर्यंत चहा येईलच.''

माझा चेहरा 'आँ' असा!

एवढ्या मोठ्या शेडमध्ये आम्ही चौघे आणि ते ऑफिसातले गृहस्थ. तरी ते गृहस्थ म्हणत होते, ''तुम्ही गाणं सुरू करा. मग हळूहळू लोकं येतात...''

मी एकदा वसंतरावांकडे आणि एकदा त्या गृहस्थाकडे पहात राहिलो. तोपर्यंत, ''मी येतोच...' म्हणून तो देखील गायब झाला. उरलो फक्त आम्ही चौघेजण! तोपर्यंत वसंतराव जाजमावर बसले देखील. एका बाजूला तबला एका बाजूला पेटी. समोर मी. माझा चेहरा कमालीचा पडला असावा.



**'अष्टविनायक' चित्रपटातील एक प्रसंग**

तेव्हा वसंतराव म्हणाले, ''गड्यांनो काही हरकत नाही. आपण आज रियाझ करू या...'' हे ऐकूनच मी थक्क झालो!

वसंतरावांनी गायला सुरुवात केली आणि हळूहळू लोकं खरंच यायला लागली. मग ती पण त्यांच्यापरीनं दाद देत होती. पण वसंतराव मात्र मन:पूत गात होते स्वत:शीच गायल्यासारखे. हे वसंतरावांचं दर्शन आगळं-वेगळंच होतं. कलावंताला असल्या प्रसंगाला कधीतरी सामोरं जावंच लागतं. खुद्द कुमारगंधर्वांचं एकदा शिवाजी मंदिरला गाणं होतं. इनमिन दहा-पंधरा लोकं होती. त्यात मंगेश पाडगावकर देखील होते!

मध्यंतरानंतर परत गाणं झालं-संपलं. आम्ही कुमारांना भेटायला गेलो. मंगेश पाडगावकरांना पाहून कुमार म्हणाले, ''अरे तुम्ही आला आहात? मग मध्यंतरात का आत आला नाहीत?'' तेव्हा पाडगावकर म्हणाले, ''अहो प्रेक्षकांची इनमिन संख्या पाहून तुम्हाला काय वाटलं असेल, असं म्हणून आत यायचा धीरच झाला नाही बघा.''

तेव्हा कुमार तात्काळ म्हणाले, ''अरे हट्. प्रेक्षकांची संख्या पाहून आपण गातो की काय? मी माझ्या आत पाहून गाणं म्हणत असतो!''

भीमसेन जोशी तर त्यांच्यासोबत त्यांच्या जीवश्च कंठश्च मित्राला घेऊन जायचे. समोर कोणी प्रेक्षक नाही हे पाहून त्याचं चित्त विचलित होत नसे. ते लगेच म्हणत, ''प्रेक्षकांची काळजी करू नका. मी माझा श्रोता घेऊन आलोय. फक्त मानधनाचं पाकिट मात्र तयार ठेवा.'' अशी आणखी पण उदाहरणं मी देऊन टाकेन. पण तो अनुभव सुरू झाला वसंतरावांच्यापासून. वसंतरावांच्या बाबतीत वाईट एवढंच वाटतं की गाणं करण्याकरता त्यांना कुठल्या आडरानात जायला लागलं.

परिस्थिती माणसाला काय करायला लावेल हे सांगता येणार नाही. त्यांनी मुलाला गाणं करू नको म्हणून सांगितलं ते ह्या चटक्यांमुळे! पण नशिबाचा खेळ कसा असतो पाहा. कट्यारमुळे वसंतरावाचं सारं आयुष्यच बदलून गेलं. त्याची पण गंमत पाहा- 'कट्यार' आधी चालत नव्हतं. तेव्हा खटपट करून त्यातील गाण्याच्या रेकॉर्ड्स काढल्या गेल्या. त्या रेडिओवर वाजू लागल्या.

'तेजोनिधी लोहगोल' काय किंवा 'या भवनातील गीत पुराणे', 'लागी करेजवा कटार' ही गाणी ज्याच्या-त्याच्या ओठावर खेळू लागली. 'घेई छंद मकरंद प्रिय हा मिलिंद' हे गाणं गावं ते वसंतरावांनीच असं म्हटलं जाऊ लागलं.

बघता-बघता कट्यार म्हणजे वसंतराव आणि वसंतराव म्हणजे कट्यार हे समीकरण होऊन गेलं. म्हणूनच पुलंनी वसंतरावांच्या साठीला, त्यांच्यावर लेख लिहिताना त्या लेखाचं शीर्षक होतं- 'पं. वसंतखाँ देशपांडे.' 'कट्यार'चे लेखक-दिग्दर्शक पुरुषोत्तम दारव्हेकर तर जाहीर म्हणाले, ''वसंतरावांनी स्वपराक्रमाने संगीतक्षेत्रात सिद्धी मिळवली. तरीही प्रसिद्धी मिळायला मात्र त्यांना परिस्थितीमुळे खूपच विलंब झाला. पुढे त्यांनी म्हटलं, 'माझ्या 'कट्यार' नाटकामुळे वसंतरावांचा भाग्योदय झाला हे विधान पूर्णत: चुकीचे आहे. उलट वसंतरावांमुळे त्या नाटकाचे सोने झाले.'' ज्या संगीतपरंपरेत वसंतराव लहानाचे मोठे झाले त्या परंपरेच्या व्याख्येनुसार 'कट्यार' हे खरे संगीत नाटक नव्हते. 'संगीतावरचे नाटक' किंवा 'संगीताचे नाटक' नव्हे तरीही सतत बारा वर्षे वसंतरावांना रंगमंचावर जगताना स्वत:च्या आयुष्यातील अनेक सुखद आणि दु:खद अनुभवांचा पुन:प्रत्यय यायचा! त्यामुळे हाडाच्या मैफली गवय्या असणारा हा कलावंत, त्या नाटकाला सहजपणे संगीत नाटकांच्या परंपरेत नेऊन बसवू शकला.' वसंतरावांना इतक्या गोष्टीत रस होता की पूछो मत! त्यामुळे ते भल्याभल्यांना चक्रावून टाकत. पाहा-

एकदा त्यांनी कुमारगंधर्वांना लिहिलं- आपण येत आहोत. पण ते त्यांनी कसं लिहिलं?-

*मैं आऊ तोरे मंदरवा*
*पैया परत देहो मोहे मनबलिया।*

यावर कुमारच ते. त्यांना रचना करायचं कसब होतंच. त्यांनी लिहिलं-

*अरे मेरो मढैया नोरा आहे रे*
*काहे धरे चरण मेरो बनबलिया।।*

ही बंदिश कुमारजींच्या 'अनुपरागविलास'मध्ये आहे.

कुमारांनी प्रसिद्धीची परवानगी मागितली. वसंतराव म्हणाले

'तुम्हाला देऊन टाकलं'! पण वसंतरावांनी परत कधी बंदिशी वा तत्सम रचना केल्या का? माहीत नाही. का? याचं उत्तर नाही.

हे सगळं काय दर्शवतं.

रामकृष्ण बाक्रे यांनी तो वेगळेपणा नेमका टिपला आहे. ते म्हणतात, 'वसंतरावांच्या आयुष्याकडे तटस्थपणानं दृष्टिक्षेप टाकला की पुन्हा-पुन्हा 'पण' असं मनात येतं. हा 'पण' बघा ते कसं मांडत आहेत-'

हा 'पणन' संगीत मर्मज्ञ रामकृष्ण बाक्रे यांनी वसंतरावांच्या साठीनिमित्त जो किर्लोस्करमध्ये लेख लिहिला होता, त्यात नेमका सांगितलेला आहे. लेखाचं शीर्षक होतं, 'संगीताच्या बागेतील ब्रह्मकमळ'. त्यात त्यांनी म्हटलंय, 'वसंतरावांच्या आयुष्याकडे तटस्थ मनानं दृष्टिक्षेप टाकला तर संगीताच्या उद्यानातील ते एक ब्रह्मकमळ आहेत असे वाटल्यावाचून राहणार नाही. ब्रह्मकमळ एका मध्यरात्री स्फोट होऊन फुलतं. ती मध्यरात्र उजाडण्यासाठी खूप-खूप वाट पहावी लागते. येशू ख्रिस्त या कमळाच्या परागकोषात झोपतो आणि त्या कोषातला एक पराग ताऱ्याप्रमाणे त्याच्या शरीरावर सुगंधाचे किरण सोडतो अशी त्यांची कल्पना. ते देखील त्या कळीच स्फोट होऊन सुगंधाची बरसात व्हावी म्हणून महिनोन्‌महिने अवधान ठेवून असतात. स्फोटाचा क्षण जवळ आला की हातात शँपेनच्या बाटल्या घेऊन त्या कळीभोवती फेर धरतात. अक्षरश: वाचतात - दारव्हेकरांची 'कट्यार' म्यानातून बाहेर पडेपर्यंत वसंतरावांच्या आयुष्यात हा स्फोटाचा क्षण आला नव्हता आणि आम जनता फेर धरून वाचू लागलेली नव्हती. त्या अग्नीची ४७ वर्षे वसंतराव 'वाटेवर काटे वेचित चाललो, वाटले जसा फुलाफुलात चाललो' या वृत्तीने नुसते चालत होते. प्लेबॅक देत होते. मैफली रोशन करीत होते. 'संशयकल्लोळ'च्या साठ प्रयोगात अश्विनशेटची भूमिका करून 'किलबिल'मधील 'मानिली आपुली' व दरबारातील 'मृगनयना' ही उपेक्षित पदे अपेक्षेबाहेर रंगवीत होते.

'परवशता पाश दैवे' हे पद डिट्टो दीनानाथांप्रमाणे आशा भोसलेंच्या कंठातून यावं म्हणून तिला खास तालमीत ते ऐकवताना वडिलांच्या स्मृतीनं गहिवरून येऊन आसू बहायला लावीत होते.'

थोडक्यात, रामकृष्ण बाक्रे यांनी गोड भाषेत आडवळसा घेत सांगितलं आहे की, वसंतरावांच्या गुणांचं चीज वेळेत झालं नाही. अशी वेळ परत कोणत्याही कलावंतावर येऊ नये अशीच कुणीही प्रार्थना करेल.


*(हा लेख लिहिताना पुलं, रामकृष्ण बाक्रे, जयराम पोतदार यांच्या आठवणींचा उपयोग झाला आहे. त्याबद्दल कृतज्ञता. मात्र माझे म्हणून जे काही आहे ते वेगळे वाटावे म्हणून तर संपादकांच्या आग्रहास्तव लेख लिहिला.)*

**- रविप्रकाश कुलकर्णी**
भ्रमणध्वनी : ९२२४८७२८७०

माणूसपणाच्या शोधासाठी
**पुरुष स्पंदनं**
दिवाळी २०१९

**स्त्रीपुरुष नातेसंबंधांचा पूर्वग्रहरहित मनाने वेध घेणारा वैशिष्ट्यपूर्ण अंक**

संपादक : **हरीश सदानी** विशेष संपादन सहाय्य : **मुक्ता चैतन्य**
मुखपृष्ठ : **अनिल कुलथे** मूल्य : **१७५ रुपये**
रेखाटने व मांडणी : **अनिल दाभाडे**



***यंदाच्या 'स्त्रीपुरुष लिंगभावाच्या सीमा ओलांडताना...' या विशेष विभागात सहभागी :***

**लेख** - सुनील सुकथनकर, रसिका आगाशे, राही श्रुती गणेश, प्रतिमा जोशी, वैशाली रोडे, चैताली भोगले, कोमल कुंभार, संदेश कुडतरकर, अनिकेत गुळवणी, विजय पांढरीपांडे, रेखा शहाणे, रखमा हेमा श्रीकांत, डॉ. साधना नातू, सानिया भालेराव, मधुवंती शिदोरे, सूरज पवार व इतर.

**ललित** - ऐश्वर्य पाटेकर, गुरुनाथ तेंडुलकर, माधव गवाणकर, मोहन देस, भूषण कोरगावकर, रोहिदास कवळे

**कविता** - प्रशांत असनारे, सौमित्र, हेमंत जोगळेकर, अशोक थोरात, विनय पाटील, राज चिंचणकर, दिशा पिंकी शेख, पद्मरेखा धनकर, भारती डिग्गीकर, वसन्त वाहोकार व इतर

**विशेष** - आशियातील पहिली महिला टॅक्सी ड्रायव्हर ते स्वतःच्या कंपनीतील सी.ई.ओ. **रेवती रॉय** : स्त्री सबलीकरणाचा अनोखा प्रवास शब्दबद्ध केलाय रेणुका कल्पना हिने.

प्रकाशक : **मेन् अगेन्स्ट व्हायलन्स अँड अब्युज (मावा)**
७०५, परिश्रम बिल्डिंग, भंडार गल्ली, ले. ज. रोड, माहीम, मुंबई - ४०० ०१६.
दूरध्वनी : ९८७०३०७७४८ इ-मेल : saharsh267@gmail.com

श्रीकांत बोजेवार

# मोपासाकथा

**लता–रफी–मुकेश यांची आवडलेली गाणी गाऊन पाहण्याचा आपल्याला मोह होतो, तेव्हा आपण केवळ आपला आदर व्यक्त करत असतो. तसाच हा प्रयत्न आहे. मात्र हे अनुवाद नव्हेत, केवळ कथालेखक मोपासाच्या शैलीचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या या तीन कथा.**

**मो**पासाच्या कथा वाचता वाचता त्या पद्धतीच्या कथा लिहिण्याचा सतत मोह होत राहतो. छोट्या छोट्या कथा. त्या कथांचे वैशिष्ट्यपूर्ण शेवट. प्रेम, लैंगिकता, वासना, स्त्री-पुरुषांच्या मानसिकतेमधील स्वाभाविक फरक आणि तत्कालीन फ्रेंच समाजातील उतरंड आपल्याला या कथांमधून दिसते. यातील अनेक बाबींमध्ये जगात सगळीकडे तीच स्थिती असते, केवळ दिसायला हे समाज वेगळे दिसत असतात. या पार्श्वभूमीवर मराठीत मोपासाच्या पद्धतीने कथा लिहिण्याचा केलेला हा एक प्रयत्न.

कथा १

**प्रेम आणि स्मृती**

ऋतुजा कमरेवर हात ठेवून उभी होती आणि ॲल्युमिनियच्या शिडीवर चढलेला धर्मा भिंतीच्या अगदी वरच्या भागाला असलेल्या घड्याळाची काच साफ करत होता. दोन्ही हात कमरेवर ठेवून ऋतुजा म्हणाली, 'सावकाश रे बाबा, ते घड्याळ एक तर खूप नाजूक आहे आणि दुर्मीळही आहे. विपुलनं लंडनहून आणलं होतं ते.' धर्मानं अगदी सांभाळून एका हातानं घड्याळ धरून ठेवलं आणि दुसऱ्या हातात असलेल्या तलम कापडानं तो काच साफ करू लागला. त्यानं वरून ऋतुजाकडे पाहिलं तेव्हा तिच्या भरदार स्तनांचे अर्धगोल त्याच्या नजरेत भरले. एरवी त्याला ते तिच्या समोर उभं राहून दिसले नसते, पण आता खूपच स्पष्ट दिसत होते. तिच्या शरीराची हालचाल झाली, ती थोडी पुढे-मागे झाली की तिच्या गाऊनचा रूंद गळा अधिकच रुंदावत असे आणि त्या अर्धगोलांच्या मधोमध असलेली घळ खालपर्यंत दिसत असे. घड्याळाची काच पुसून झाली की तिथंच उभं राहून आणखी काय पुसता येईल याचा तो विचार करू लागला. सोळा सतरा वर्षांची होती तेव्हाच ऋतुजाच्या शरीराचा डौल आणि आकार वेड लावणारे होते, आता तर ऐन पंचविशीचा बहर होता. चेहऱ्यावर यशाचं, प्रसिद्धीचं, विवाहाचं, तेज आलेलं होतं. व्यक्तिमत्वात असा काही आत्मविश्वास आला होता की त्यापुढं सगळं काही फिक्कं फिक्कं वाटावं. मुळात आकर्षक असलेली ऋतुजा अधिकच हवीहवीशी वाटू लागली होती.

घड्याळाची काच सावकाश पुसता-पुसता धर्मानं कितीदा तरी चोरून खाली पाहून घेतलं. त्याच्या मनात काय सुरू आहे याचा ऋतुजाला अंदाज येणं अथवा तशी शंका येणंही शक्य नव्हतं. पायात स्लिपर घालून ती इकडे-तिकडे फिरत होती आणि धर्माला सूचना करत होती. स्वतःच्या घरातच असल्यानं कपड्यांबाबतही फार सावध नव्हती.

धर्मा हे त्याच्या धर्मेश या खऱ्या नावाचं भ्रष्ट रूप. शाळेच्या दिवसांपासूनच चिकटलेलं. म्हणून तर ऋतुजा त्याला त्याच नावानं हाक मारत असे. तो आठवीत असताना ऋतुजा त्यांच्या वर्गात आली. विपुल आणि धर्मा एकाच बाकावर बसत असत. तिथून नेमकी ऋतुजा दिसत असे. दोघांचंही लक्ष फळ्याकडे कमी आणि ऋतुजाकडे जास्त असे. विपुल त्याला म्हणत असे, 'ए धर्मा, वहिणीकडे असं टक लावून पहायचं नसतं.' त्यावर धर्माही टेचात म्हणे, 'मी पण तेच सांगतोय लेका तुला. वहिणीकडे सारखं-सारखं बघायचं नाही, माझा माल आहे तो.' ऋतुजाला पटवणं हे दोघांच्याही आयुष्याचं ध्येय बनलं होतं जणू. 'चल बेट लाव, तुला पटते की मला पटते, पाहू या.'

बारावीपर्यंत तिघे एकाच वर्गात होते. त्या चार वर्षांत ऋतुजाच्या यौवनाचा पहिला बहर आला, त्या बहरानं ती डवरून गेली तसं दोघांचही तिच्यावरचं प्रेम अधिक वाढतं गेलं. ती जास्तच हवीहवीशी वाटू लागली. ऋतुजाला त्या दोघांची मैत्री चांगलीच माहिती होती, परंतु त्यांच्या प्रेमाची गंधवार्ता नव्हती. बारावीनंतर विपुल पुढील शिक्षणासाठी बाहेर गेला. ऋतुजाही कुठं तरी निघून गेली. धर्माच्या आयुष्यात मात्र शोकनाट्य रंगलं. वडिलांना अकाली अपघाती मृत्यू आला. पाठोपाठ आईचं आजारपण आलं. घराचा सगळा आर्थिक भार धर्मावर पडला. शिक्षण राहिलं बाजूला आणि मिळेल ते काम करत घराची जबाबदारी शिरावर घ्यावी लागली. बारावीच्या पुढं शिकताच आलं नाही. त्या जबाबदाऱ्यांमध्ये ऋतुजाच्या आठवणी विरून गेल्या, तिच्यावरचं प्रेम त्यानं हृदयाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात ढकलून दिलं. काही वर्षांनी आई गेली, त्या नंतर दोन बहिणींची लग्नं त्यानं कर्ज वगैरे काढून करून दिली. कधी प्रिंटिंग प्रेसमध्ये हेल्पर म्हणून नोकरी कर तर कधी गॅरेजमध्ये काम कर असं सतत नोकऱ्या बदलत कर्ज फेडण्यात त्यानं स्वतःच्या लग्नाचा विचारही केला नाही.

एक दिवस तो गॅरेजमधून, कळकट कपडे बदलून बाहेर पडला आणि घराकडे निघाला तेव्हा त्याच्या बाजूनं जात असलेली कार अचानक थांबली. कारमध्ये असलेल्या ऋतुजाचं त्याच्याकडे लक्ष गेलं, मग तिनं ड्रायव्हिंग सीटवर बसलेल्या विपुलचं लक्ष त्याच्याकडे वेधलं. कारमधून उतरुन दोघांनी धर्माची विचारपूस केली. धर्माच्या आयुष्यात घडून गेलेल्या



दुःखद घटनांची दोघांनाही कल्पना नव्हती. ते सगळं ऐकून हळहळलेली ऋतुजा म्हणाली, 'मग उगाच कुठं तरी काम करत राहण्यापेक्षा आमच्यासोबत ये, आमचं घर सांभाळ. आम्हाला कोणी तरी विश्वासू हवंच आहे. तुला रहायला आउट हाऊस आहे.'

धर्मा त्यांच्या सोबत आला. ऋतुजानं बंगल्याच्या मागच्या भागात स्टुडिओ थाटला होता. ती चांगली चित्र काढते हे धर्माला आधीच ठाऊक होतं, पण आता ती नामवंत चित्रकार झालेली आहे हे माहिती नव्हतं. विपुल मोठ्या कंपनीत फायनान्स कन्सल्टंट होता. म्हणजे तो काय करतो हे धर्माला कळलं नाही, पण श्रीमंत माणूस झाला होता हे तर दिसतंच होतं.

ज्या दिवशी धर्मा आपला बाडबिस्तरा घेऊन त्यांच्या बंगल्यात रहायला आला त्याच रात्री उशिरा विपुल एकटाच त्याला भेटायला आऊट हाऊसमध्ये आला. धर्माला मनातून वाटतंच होतं की तो येईल भेटायला. शाळेचा काळ आठवत त्यानं थोडा वेळ गप्पा मारल्या आणि मग म्हणाला, 'तुला बघून मला तेव्हाचं सगळं आठवलं. आपण ऋतुजाविषयी काय-काय बोलायचो, पैजा लावायचो वगैरे.'

खूप दिवसांनी धर्माच्या चेहऱ्यावर आज थोडं हास्य आलं होतं. एका श्रीमंत व्यक्तीशी आपण बरोबरीच्या नात्यानं संवाद साधतो आहोत याचा आनंद त्याला लपवता येत नव्हता. तो जुने दिवस आठवत म्हणाला, 'हो ना. तू ऋतुजाकडे पाहात

राहायचास आणि म्हणायचास, हिच्या छातीत डोकं खुपसायला मिळावं, बस्स! मग साला जीव गेला तरी चालेल. आणि मी म्हणायचो.'

'प्लीज. नको सांगूस ते. ती आता फक्त ऋतुजा नाही, ती माझी बायको आहे. ती आता खरोखरच तुझी वहिणी झालेली आहे.'

विपुलचं हे वाक्य ऐकल्यावर धर्माला आतून खरं तर खूप आनंद झाला. ऋतुजा जरी विपुलची बायको असली तरी आपण आधीच्या मैत्रीच्या नात्यानं तिच्या शरीराचा उल्लेख करू शकलो, यात त्याला एक अनामिक समाधान मिळत होतं. असेल विपुल श्रीमंत, असेल तो बंगलेवाला, पण आपला भूतकाळ थोडीच त्याच्या मालकीचा आहे? तो आठवणं आणि त्याबद्दल बोलणं तर आपल्याच हाती आहे. पण तो आनंद लपवत त्यानं विपुलला विचारलं, 'कधी? कुठं भेटलात परत तुम्ही?'

'मी नोकरीला लागलो, स्थिरस्थावर झालो आणि घरुन लग्नाचा आग्रह सुरू झाला तोपर्यंत ऋतुजा मोठी चित्रकार झालेली होती. मी जाऊन भेटलो तिला. जुन्या आठवणी निघाल्या. कोण कोण भेटतं, कोण कोण संपर्कात आहेत वगैरे. मग मी तिला थेट लग्नाची मागणी घातली आणि सांगितलं, तुझ्याशीच लग्न करायचं हे मी आठवीत असतानाच ठरवलं होतं. तिनं लगेचच होकार दिला.'

'लग्नाचं विचारण्यासाठी तू तिला जेव्हा जाऊन भेटलास, तिनं सर्वांची चौकशी केली तेव्हा माझ्याविषयीही विचारलं होतं?'

विपुल काही क्षण बोलला नाही. मग मान हलवत म्हणाला, ''हो, विचारलं होतं. आपला धर्मा कुठं आहे सध्या,'' असं म्हणाली होती.

'आपला धर्मा' हे शब्द ऐकून धर्माला अचानक अवघ्या आयुष्याचं, कष्टाचं सार्थक झाल्यासारखं वाटू लागलं. 'आपण दोघेही तिच्यावर मरत होतो, हे नसशील सांगितलं तिला तू.'

'नाही.' धर्माकडे रोखून पाहात विपुल म्हणाला, 'तुला घरी घेऊन येण्याची माझी अजिबात इच्छा नव्हती, पण मी ऋतुजाला नाही म्हणू शकलो नाही, तिनं कारण विचारलं असतं तर सांगता नसतं आलं मला, पण तू इथं तिच्या अवतीभवती असलास, की मला फार ऑकवर्ड वाटेल. तिच्याविषयीच्या तुझ्या भावना मला जशाच्या तशा आठवतात. आता तर जास्तच प्रकर्षानं आठवतील.' मनात सलत असलेला काटा विपुलनं बाहेर काढला.

'मग मी काय करू म्हणतोस?'

'आता आलाच आहेस तर काही दिवस रहा आणि मग एखादं कारण सांगून निघून जा इथून. कुठंही जाऊन एखादा छोटा धंदा वगैरे सुरु कर, मी तुला मदत करतो. पाहिजे तर स्वतःचं गॅरेज टाक, प्रिंटिंग प्रेस टाक. लग्न कर. आपण चार वर्ष एकाच बाकावर बसत होतो. अनेकदा एकाच टिफिनमधलं खात होतो. तुझं नीट बस्तान बसल्याचं पहायला मला मनापासून आवडेल.'

एक यशस्वी आणि श्रीमंत व्यक्ती, शानदार बंगल्याचा मालक, एका सुंदर स्त्रीचा पती आपल्याकडे काहीतरी मागतो आहे, आपण दात्याच्या भूमिकेत आहोत आणि तो याचकाच्या भूमिकेत आहे या अनुभूतीनं आनंदांची एक लहर धर्माच्या शरीरातून सळसळत गेली. किती तरी वर्षात असं सुख त्याच्या वाट्याला आलं नव्हतं. कोणापुढे तरी तो कायम अजिजी करत उभा असायचा, नकार ऐकत असायचा. विपुल निघून गेल्यावरही थोडावेळ तो त्या आनंदाच्या धुंदीतच होता. थेंबही न पिताच आलेल्या त्या नशेतच होता.

धर्माला बंगल्यात रहायला येऊन आज पंधरा दिवस झाले होते. दिवसभर तो पडेल ती कामे करायचा. स्टुडिओतली, घरातली, बागेतली. ऋतुजाला त्याची खूपच मदत होऊ लागली. ती त्याच्यावर विसंबून राहू लागली होती. विपुल उशिरा येत असे. तोवर धर्मा कामे आटोपून त्याच्या खोलीत जाऊन निजलेला असे. तिथं झोपल्या-झोपल्या तो बाहेरच्या आवाजांवरून अंदाज बांधत बसे. आता विपुल आला, आता तो जेवतो आहे. आता दोघे बेडरुममध्ये गेले. आता दिवा मालवला...आता दोघे काय करत असतील? या शेवटच्या प्रश्नाच्या उत्तराची कल्पना करताना मात्र त्याची झोप उडत असे. त्याला ती कल्पना नको वाटे. तो कूस बदलत तळमळू लागे. सकाळी भेटल्यावर विपुल त्याच्याशी फार कमी बोलत असे, परंतु त्याची नजर, त्याचे डोळे मात्र त्याला रोज विचारत असत, ''मग काय ठरवलंस तू?''

आज विपुल बाहेरगावी गेला होता. तो दोन दिवस येणार नव्हता. ऋतुजानं घराची साफसफाई करायला घेतली होती. ती सांगेल त्याप्रमाणं धर्मा एक-एक कोपरा, एक-एक वस्तू ओल्या-सुक्या कापडाने साफ करत होता. दोघांच्या गप्पाही सुरू होत्या. ती अमुक आता हैदराबादला आहे, तो तमुक आता विदेशात आहे वगैरे. आणि मग ऋतुजानं शिडी घेऊन त्याला वर चढायला सांगितलं, घड्याळ पुसून काढण्यासाठी. ते पुसता-पुसता त्याला जे दिसलं त्यानं तो आतून पार अस्वस्थ झाला होता. चिंध्या-चिंध्या झाल्या होत्या त्याच्या.

सगळं घर स्वच्छ झालं. ऋतुजा म्हणाली, 'धर्मा, मी आंघोळीला जाते, विपुलचा फोन आला तर घे किंवा आणखी कोणाचा काही निरोप असेल तर बघ.'

ऋतुजा आंघोळीला जाताच, धर्मा काही क्षण सोफ्यावर बसून राहिला. पण त्याच्याने बसवेना. मग तो उठला आणि बंगल्यातून बाहेर पडला. थेट रेल्वे स्थानकाकडे गेला. प्लॅटफॉर्मवर आलेली ट्रेन कुठे चालली आहे, कुठून आलेली आहे, काहीही न पाहताच आत चढला. 'कुठल्याही गावी गेलो तरी पाच दहा गॅरेजेस असतातच, कुठेही काम मिळेल आपल्याला...' असं स्वतःच्याच मनाला सांगत, दिसेल त्या सीटवर तो बसला. काही मिनिटांनी गाडीने स्टेशन सोडले.

कथा २

**पुरुष आशावादी असतात**

'ही साडी ठीक आहे ना, बरी दिसते ना मला?' असं म्हणत शर्वरीनं राकेशकडे पाहिलं. तिनं कुठलीही साडी नेसली असती आणि हा प्रश्न विचारला असता तर राकेशनं 'हो, अगदी मस्त दिसतेय, परफेक्ट सूट झालीये तुला' हेच उत्तर दिलं असतं, हे राकेशलाही माहिती होतं आणि शर्वरीलाही माहिती होतं. निघण्यापूर्वी शेवटचं स्वतःला आरशात पाहून घेत शर्वरी म्हणाली, 'मी विचार करत्येय की आज थोडी वाइन घेऊन पाहू की काय? सगळ्याच घेतात, तिथे मीच एकटी फक्त डाएट कोक आणि ज्यूस पित असते नेहमी. तोंड आंबट होऊन जातं ज्यूस पिऊन-पिऊन.' यावर राकेश म्हणाला, 'बघ की वाइन पिऊन, तुला आवडली तर मी घरी आपल्या बारमध्येही आणून ठेवीन एक यॉर्क एरोज.'

'ते काय असतं?'

'बेस्ट क्वालिटी वाइन फ्रॉम महाराष्ट्रा. चीज सोबत खूपच छान लागते.' यावर शर्वरी काय म्हणाली हे ऐकायला राकेश तिथं थांबला नाही. कारमध्ये जाऊन बसला. आजच्या पार्टीची तो आतुरतेनं वाट पाहात होता. निळ्या रंगाचा, आखूड बाह्यांचा आणि खांद्याला, दंडाला फिट्ट बसेल असा टी शर्ट त्यानं घातला होता. तो रोज जिममध्ये जातो, पोहायला जातो हे त्या घट्ट टी शर्टमुळे लगेचच लक्षात येत होतं. वयाची पन्नाशी उलटत असताना असा फिटनेस राखणं फार कमी लोकांना जमतं, पण राकेशनं ते जमवलं होतं आणि गेले काही महिने तर तो अधिकच काळजी घेत होता.

नागपूरमधील छोट्या-छोट्या आणि यशस्वी उद्योगपतींचा तो ग्रुप होता. आपापल्या व्यवसायात रुजलेले, यशस्वी झालेले आणि वयाच्या मध्यास आलेले व्यावसायिक. जवळपास सगळ्यांचीच मुलं- मुली तरुण होऊन हाताशी येऊ लागलेली होती. वर्षभरापूर्वी एका मित्राच्या भावाच्या लग्नासाठी सगळे जमले तेव्हा कोणीतरी म्हणालं, ''वी शूड मीट वन्स इन अ मन्थ विथ अवर स्पाऊजेस, जस्ट टू चील.'' त्या ग्रुपमध्ये त्यातल्या त्यात जरा सिनिअर असलेल्या रघुवीर बाजोरिया यांनी लगेचच होस्ट होण्याची तयारी दर्शवली. ते म्हणाले, ''माझ्या फार्महाऊसवरच भेटत जाऊ. नागपुरपासून फक्त तासाच्या अंतरावर आहे.'' मग ते दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी भेटू लागले.

विकास हा सीए फर्मवाला, त्याची बायको स्वरा. इव्हेंट मॅनेजमेंटवाला कल्पेश, त्याची फॅशन डिझायनर बायको पल्लवी. शहरातला एक प्रमुख बिल्डर निलेश, त्याची बायको आशा. मारुती शोरुमवाला हरेश, त्याची नखरेल बायको ललिता, दोन पेट्रोल पंपांचा मालक अशोक, हौशी गायिका असलेली त्याची बायको रुचिरा, शहरातील तरुण-तरुणींचा आवडता पब असलेल्या 'डार्क नाईट'चा मालक पंकज आणि त्याची लिव्हइन पार्टनर शोना, फर्निचर शॉप्सची चेन असलेला राकेश आणि त्याची बायको शर्वरी, आणि शहरातल्या सर्वाधिक गर्दीच्या भागातील, तीन हजार स्क्वेअर फुटांच्या भव्य ज्वेलरी शोरुमचा मालक रघुवीर बाजोरिया आणि त्याची बायको अचला. इतर काही मिळून पंधरा सोळा जोडपी तेव्हापासून महिन्यातून एकदा भेटू लागली.

उतरणीला लागलेली सौंदर्य, सुटलेली-सुटू लागलेली शरीरं आणि पैशाची चिंता नसल्यानं खरेदी, प्रवास यांविषयीच्या गप्पांना आलेला ऊत. बहुतेकांनी आपापल्या मुलांना किंवा झालेल्या अथवा होऊ घातलेल्या जावयांना आपल्याच व्यवसायात ओढून घेतलेलं होतं. त्यामुळं लग्नांचं प्लानिंग हा चर्चेचा एक प्रमुख विषय असे. सुरुवातीला फक्त पुरुष एकमेकांच्या ओळखीचे होते, मग बायकांची आधी एकमेकींशी आणि मग इतर बायकांच्या नवऱ्यांशीही ओळख झाली. आधी थोडे दबकत-दबकत आणि मग खुलेपणानं नॉनव्हेज जोक्स सांगितले जाऊ लागले. काही बायकांनी आपण बीअर, वाइन पितो हे सुरुवातीला उघड केलं नाही, पण ओळखी वाढल्या तशा त्याही मोकळेपणी ग्लास भरू लागल्या. पहिल्याच पार्टीत पुरुषांच्या बरोबरीने दारु प्यायला, ओठांमध्ये ऐटीत सिगरेट धरायला आणि नॉनव्हेज जोक्स मारायला, तशा जोक्सवर मोकळेपणी हसायला पुढे होती ती एकटी रघुवीर शेठची बायको अचला. पहिल्याच पार्टीच्या वेळची गोष्ट. रघुवीरनं चौथा पेग भरला तेव्हा अचला त्याला म्हणाली, 'आता बास हां रघू, हा शेवटचा. पाचवा पेग घेतला की मग तू काही न करताच झोपतोस.' रघुवीरनं टाळीसाठी बायकोपुढे हात धरला आणि म्हणाला, 'डोंट वरी बेबी, तुझा शनिवार फुकट जाऊ देणार नाही मी.'

पार्टीपुरुष यावर कसनुसे हसले. त्यांच्या बायकांनी चोरुन आपापल्या नवऱ्यांच्या चेहऱ्यावरचे भाव पाहून घेतले. पुढच्या प्रत्येक पार्टीत हा मोकळेपणा वाढत गेला. मात्र प्रत्येक पुरुष संधी मिळेल तेव्हा तेव्हा अचलाकडे पाहून घेई. तिच्याशी बोलण्याची संधी शोधी, कधी फार जवळ आलीच तर इतरांच्या नकळत श्वास आत ओढून तिचा सुगंध श्वासांतून ओढून घेण्याचा प्रयत्न करी. सुरुवातीला सगळ्या बायकांसारखीच एक वाटणारी अचला हळूहळू प्रत्येकाला आकर्षक भासू लागली. ती फिगर राखून आहे, तिचा इंटरेस्ट अजून कायम आहे. तिच्या उत्साहामुळेच रघूभाई एवढा तरतरीत आहे या वयातही, असं बायकांना सांगू लागले. 'मुलं मोठी झाली म्हणून काय आपण म्हातारे झालो का?' 'अरे बाबा, बेडरुम इज द ओन्ली प्लेस व्हेअर वी कॅन नॉट हाइड एनी थिंग', 'मुझे अंधेरा अच्छा नही लगता,मुझे उस वक्त रघूका फेस देखना अच्छा लगता है.' तिच्या अशा वाक्यांनी पुरुषांच्या हृदयाचे ठोके वाढत आणि पुढच्या पार्टीची ते आतुरतेनं वाट पाहात.

गेल्या वेळच्या पार्टीत बीअरची तिसरी बाटली रिकामी झाल्यावर राकेश वॉशरूममध्ये गेला. तिथून बाहेर पडून तो पार्टीहॉलकडे जायला उजवीकडे वळणार तो त्याच बाजूने अचला वॉशरुमकडे आली आणि दोघे एकमेकांवर आदळले. तिचा सुगंध नाकपुड्यांत घुसला, तिची वक्षस्थळं थेट त्याच्या छातीच्या थोडं खाली दाबली गेली. 'ओह, आय ॲम व्हेरी सॉरी अचलाभाभी' म्हणत तो बाजूला झाला. वॉशरुममध्ये जाता-जाता डोळा मारत अचला म्हणाली, 'इट्स माय प्लेझर.' ते ऐकून राकेश सैरभैर झाला. पुढे पार्टीभर तो अचलाच्या चेहऱ्यावर त्याच्यासाठी काही वेगळं दिसतं का ते शोधत होता. त्यानंतर आज पुन्हा तिसरा शनिवार आला होता, ज्याची वाट राकेश आधीचा तिसरा शनिवार संपल्या क्षणापासूनच पाहात होता.



गाडीत त्यानं शर्वरीची नजर चुकवून एक दोन वेळा आरशात पाहून घेतलं आणि आपण आकर्षक दिसतो आहोत याची खात्री करून घेतली. अचलानं 'इट्स माय प्लेझर' असं म्हणणं हा आपल्याला इशारा होता का? तिनं इशारा दिल्यावरही आपण पुढाकार घेतला नाही तर तिच्या लेखी आपण कुचकामी ठरू का? पण तो खरंच इशारा होता का? ती फार मोकळी-ढाकळी आहे बोलायला, सहजही बोलून गेली असावी. असे एकमेकांना छेद देणारे विचार त्याच्या डोक्यात येत होते. शर्वरी काय बोलते आहे याकडे त्याचं फारसं लक्षही नव्हतं. एक दोनदा शर्वरीनं 'ती अचला जरा जास्तच आहे, मला तर वाटतं ती थापा मारते सगळ्या' असं म्हटलं ते तेव्हा राकेशला तिच्या आवाजात तक्रारीपेक्षा स्वतःच्या समर्थनाचा सूर अधिक दिसला.

पार्टीत पोचल्यावर नेहमीच्या गप्पा, दारू, जोक्स रंगले. बिझनेसच्या गोष्टी झाल्या. जीएसटीमुळे झालेले प्रॉब्लेम्स, आर्थिक धोरणे यावर वाद झडले. चौथ्या-पाचव्या पेगनंतर भाषा बदलली आणि 'आई झवून टाकली यार धंद्याची या सरकारनं' इतपत भाषिक मोकळेपणा आला. शर्वरीला संशय येणार नाही याची खबरदारी घेत राकेश अचलाकडे पाहून घेत होता, तिच्या जोक्सना दाद देत होता, शंका येऊ नये म्हणून रघूच्या वाक्यांवरही टाळ्या देत होता. रात्री दोन वगैरे वाजता एकेक जण किचनमध्ये जाऊन प्लेट वाढून आणू लागला. काहींच्या बायकांनी त्यांना बसल्या जागी ताटे वाढून आणून दिली. सहज योगायोग जुळून आला असं दाखवून राकेश बरोब्बर अचलाच्या पाठोपाठच किचनमध्ये गेला. ती प्लेटमध्ये पदार्थ घेत असताना तो रिकामी प्लेट घेऊन तिच्या शेजारी उभा राहिला. तिनं स्वतःची प्लेट बाजूला ठेवून त्याची प्लेट घेतली, 'लेट मी सर्व्ह यू' म्हणत त्याला वाढू लागली. अचलानं चिकन मांचोरियनच्या बाऊलमधला चमचा उचलताच राकेश म्हणाला, 'नो नो..आय डोंट लाइक चायनीज. मैं सिर्फ बिर्याणी लूंगा थोडी.' त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत अचलानं त्याच्या प्लेटमध्ये मांचोरियन आणि फ्राइड राइस घातला. प्लेट त्याच्या हाती देत म्हणाली, 'एकही टाइप का खाना नही खाना चाहिये, कभी-कभी टेस्ट चेंज करके भी देखना चाहिये. मजा आता है.' तिच्या हातून प्लेट घेताना त्याच्या शरीरात करंट वाहू लागला होता. तो प्लेट घेऊन बाहेर आला तेव्हा शर्वरी त्याच्याकडे पाहातच राहिली. त्याला म्हणाली, 'तू चक्क चायनीज घेतलंस?' तो कसनुसं हसला. 'आज मात्र अचलानं आपल्याला अगदीच स्पष्ट इशारा दिला आहे. आता जर आपण तो समजून घेतला नाही तर आपल्यासारखे मूर्ख आपणच.' तो मनात स्वतःशीच म्हणाला.

अशा आणखी काही पार्ट्या झाल्या. कधी हलकासा स्पर्श, कधी बसल्या-बसल्या पायावर पाय, कधी सूचक वाक्य, कधी टी शर्टचं पोत पाहण्याच्या बहाण्यानं दंडाच्या बेटकुळीवर थाप यातून अचलाचे इशारे त्याला मिळत राहिले.

अशाच एका तिसऱ्या शनिवारी राकेश शोरुममधून घरी

निघण्याच्या बेतात होता तेव्हा निलेशचा फोन आला. त्यानं राकेशला विचारलं, 'आज येतोयस ना रात्री?'

'हो, अर्थात.' राकेश म्हणाला. त्यावर निलेश सावधपणे त्याला म्हणाला, 'यार, एक सल्ला हवा आहे मला.'

'बोल ना.'

'यार, ती अचलाभाभी सारखी इशारे देते. उसकवते मला. पण काही कळत नाही. ट्राय करावं की करू नये...म्हटलं तुला विचारावं.' त्याच्या या प्रश्नावर राकेश गप्पच झाला.

मग एकदा विकासनं कल्पेशला विचारलं, 'घेऊ का रे तिला?'

हरेशनं अशोकला सांगितलं, 'पेटवते यार ती.'

पंकजनं विकासला फोन करून सल्ला मागितला, 'एक स्टेप पुढे जाऊ का मी?'

अशोकनं पंकजला विचारलं, 'माझ्या हाती लागेल असं वाटतं ती.'

हळू-हळू सगळ्यांनाच सगळ्यांचं कळल्यावर मात्र आपली फसगत झाली या भावनेनं पेटून उठून प्रत्येकानं दुसऱ्याचं नाव घेऊन आपापल्या बायकांनाही ते सांगून टाकलं. त्यामुळे सगळ्यांच्या बायकांनाही ते कळलं.

पार्ट्या सुरूच राहिल्या. प्रत्येक बायको आधी अचलाकडे आणि मग दुसरीच्या नवऱ्याच्या रोखाने पाहात आपापल्या नवऱ्याला सूचक इशारे करत, 'बघा काय चाललंय दोघाचं' असं इशाऱ्यांनी म्हणंत राहिली. 'आपण तसे नाही आहोत' असं आपापल्या बायकांना दाखवत, 'आयला, ही तर फारच चलाख आहे', असं मित्रांना सांगत, सगळे नवरे, कधी तरी आपली हिंमत होईल, याची वाट पाहात राहिले. पार्ट्या सुरूच राहिल्या.

कथा ३

**डुक्कर**

हिवाळा आला की सकाळच्या वेळी घरासमोरच्या अंगणात खाटेवर बसायचं. सूर्याचा ताप सहन होईनासा झाला की मगच घरात जायचं. चहा तिथंच. नाश्ता तिथंच. जिल्हा पेपरचं वाचन तिथंच आणि आल्या-गेल्याशी गप्पाही तिथंच. गुलाबरावचा हा दर हिवाळ्याचा परिपाठ होता. माणूस असा बिलंदर की, चहा पिता पिता एखाद्याशी तासभर ऐसपैस बोलत बसेल पण समोरच्याला चहा विचारणार नाही. नाश्त्याचंही तसंच. बशीभर पोह्यांत, हरभऱ्याचा वाटीभर रस्सा घालून चवीनं चापत बसेल, मिशीच्या टोकाला लागलेला पोह्याचा कण जीभेचं टोक वर काढून काढून परत आत ओढून घेईल. पण समोरच्याला 'ये नाश्ता करायला',असं चुकूनही म्हणणार नाही.

अजाबराव हा गुलाबरावचा जवळचा मित्र होता, पण त्यालाही गुलाबराव चहा-नाश्ता कधी विचारत नसे. अजाबरावनं त्यावर एक तोडगा काढला होता. गुलाबराव चहा पित असेल तेव्हा नेमका अजाबराव घरून नाश्त्याची प्लेट घेऊन गुलाबरावच्या बाजूला येऊन बसत असे. त्याची प्लेट बघून गुलाबरावची चलबिचल होत असे. कधी ऑम्लेट, कधी उकडलेली अंडी, कधी लोणी-थालिपीठ असं गुलाबरावला त्रास देणारं काही तरी घेऊन येत असे. नेमकं त्याच दिवशी गुलाबरावच्या बायकोनं शिळ्या पोळीला फोडणी देऊन नाश्त्याचा शॉर्टकट शोधलेला असे. मनात ऑम्लेट आणि प्लेटमध्ये फोडणीची पोळी, असा त्याचा तिळपापड होत असे. पण तरी दोघांची मैत्री अबाधित होती.

एक दिवस सकाळ संपून दुपार होण्याच्या बेतात असताना आणि गुलाबराव खाटेवरून उठून घरात जाण्याच्या तयारीत असताना अजाबराव सायकलवर आला.

'गुलाब्या, चल जंगलात जाऊ.'

'नको, कंटाळा आला आता.'

'बरं राहू दे, मी जातो. रानडुक्कर पाहिलं म्हणे तिकडे मंग्यानं.'

'मग तसं सागायचं ना आधी, थांब मी येतो. बंदूक आणली का?'

'नाही रे, बिघडलेली आहे.'

'मग तिकडे जाऊन काय उखडणार? डुकराच्या गोट्या चोळत बसणार का?'

'मंग्या, रम्या, सत्या, पांड्या सगळेच गेलेय जंगलात. सापडलं डुक्कर तं पार्टी करतील. आपण तोंडानं हुर्र हुर्र आवाज करत फिरू त्यांच्यासोबत, म्हणजे आपल्यालाही पार्टीत घेतील.'

शंभर-दीडशे घरांचं ते गाव जंगलातच वसल्यासारखं होतं. तीन दिशांनी जंगल आणि एका दिशेनं गावाबाहेरच्या हायवेकडे जाणारा कच्चा रस्ता. गुलाबरावनं खाट उभी करून भिंतीला टेकवली, जुना टायर कापून शिवलेल्या मजबूत चपला पायात चढवल्या आणि उडी मारून अजाबरावच्या सायकलच्या कॅरिअरवर बसला. बसल्या-बसल्या ढुंगणाला चिमटा बसला तेव्हा त्यानं अजाबला शिव्याही घातल्या, पण शरीर वर उचलून उचलून जोर काढत पैडल मारण्याच्या तावातावात अजाबरावला काहीच ऐकू आलं नाही.

ते दोघे जंगलाच्या रस्त्याला लागले तेव्हा गुलाबरावनं विचारलं, 'डुक्कर कुणीकडे गेलं रे? गढीच्या बाजूला की भैरवनाथाच्या बाजूला?'

'माहीत नाही रे. सगळे दिसतील तिकडे आणि शिकारीचे आवाज येतील तिकडे जाऊ आपण.'

'नक्की डुक्करच होतं ना?'

'हो, मंग्यानं पाहिलं सोताच्या डोळ्यानं.'

'त्याला भडव्याला उंदीर आणि घुशीतला फरक कळत नाही.'

'पण डुक्कर समजतं त्याला. एवढे लोक गेले नसते शिकारीला नाही तर.'

तेवढ्यात गुलाबरावला हणम्या दिसला. तो दारूची भट्टी लावत होता. गुलाबरावनं अजाबरावला सायकल थांबवायला सांगितलं.

'राम-राम हणम्या शेठ.'

'राम-राम. भट्टी पेटवली नाही अजून. टैम लागंल.'

'ते तर दिसतंच आहे. रानडुक्कर खाऊन किती दिवस झाले तुला?'

'गावंतच नाही रे, तुला भेटलं का कुठं?'

'आपल्या जंगलात आलंय. तिकडंच चाललोय. डुक्कर आणलं तं दारु देशील ना फुकट?'

'तू डुक्कर आण तर, मी दारु दिलीच समज. बंदूक-गिंदूक तं काही दिसत नाही तुमच्याकडे?'

'आमच्या ओळखीचं आहे डुक्कर, आम्ही मर म्हटलं की मरतं,' असं म्हणून गुलाबराव खदखदा हसला. अजाबरावनं पैडल मारलं आणि हणम्यानं शिव्या मोजल्या, 'उगा टैम खोटी केला. गांडीत दम नाही, चाल्ले शिकारीला.'

जंगल जवळ येऊ लागलं तसं ओरडण्याचे आवाज येऊ लागले. ''अरे ते बघ तिकडे पळालं,'' ''अरे धर धर...'' ''गेलं रे गेलं...'' ''इकडून या. इकडून या.'' असे आवाज ऐकून अजाबरावचा उत्साह वाढला, त्यानं पैडलचा वेग वाढवला. गुलाबरावनं त्याच्या कमरेला चिमटा काढला. ''अजाब्या, इकडून घे सायकल, पांदीच्या रस्त्यानं.''

''पण डुक्कर तं तिकडे आहे, भैरवनाथाकडे.''

''सांगतो ते कर ना भाड्या.''


अजाबरावनं सायकल वळवली. लोकांचे हाकारे, आवाज दूर-दूर गेले. त्याचं मन शंकित झालं. 'गेली डुकराची पार्टी लेका आपली, इकडे तं कोणीच नाही' असं म्हणत त्यानं गुलाबरावला शिव्याही घातल्या. मध्ये ओढा लागला, त्याला पाणी होतं. सायकल घेऊन जाणं शक्यच नव्हतं. अजाबराव म्हणू लागला, ''मरू दे, घरी वापस जाऊ, भाकर-भाजी खाऊन झोपू.''

''तू गप रे. सायकल ठेव इकडेच. जाताना डुक्कर घेऊन जायला लागेल आपल्याला.''

अजाबराव म्हणाला, ''तू लेका खरा डुक्कर आहेस. काय कारस्थान शिजवलं आहे मनात?''

पण तोवर धोतराचा सोगा वर उचलून गुलाबराव ओढ्यात शिरलाही होता. मागोमाग अजाबरावही शिरला. ओढ्यात पाणी भरपूर होतं. हळू-हळू कमरेपर्यंत वाढलं. ओढा पार करता-करता दोघांचीही धोतरं भिजली.

पलीकडे गेल्यावर गुलाबरावनं धोतर सोडलं आणि बाभळीच्या दोन झाडांना पडद्यासारखं बांधलं. अजाबरावनंही



त्याचं अनुकरण केलं. पट्ट्या-पट्ट्याच्या अंडरवेअरवरच दोघंही झाडाच्या सावलीत पहुडले.

''आपल्याला असं पाहतील कोणी तर काय विचार करतील?'' अजाबराव म्हणाला.

त्यावर गुलाबराव म्हणाला, ''थांब सैयदच्या बायकोला घेऊन येतो, म्हणजे कोणी काही म्हणणार नाही.''

''तू लेका तिच्यावर डोळा ठेवू नको गुलाब्या. आमचं चाललं तं बरं तं चालू दे. मला माहिती आहे, आमचं पाहून तुझी गांड जळते.''

''सैयदला समजलं तं तुला बेकरीत भाजून काढंल लेका.'' गुलाबरावनं अजाबरावला घाबरवण्याचा व्यर्थ प्रयत्न केला. त्यावर गूढ हसत अजाबराव म्हणाला,

''लेका, सैयदच्या च्या बेकरीतला इस्तू नीट पेटत नाही म्हणून तं माझ्याकडे येते ती.''

दोघांचं असं बोलणं चाललं होतं. धोतरं वाळत होती. उन्हं कलत आली होती. तेवढ्यात कोणी तरी धावत, धापा टाकत येत असल्याचा आवाज आला. दोघेही सावध झाले. ते सावरून बसतात, तोच जंगलाच्या दाट झुडपांमधून रानडुक्कर धावत बाहेर पडलं आणि थेट समोर वाळू घातलेल्या धोतरात जाऊन अडकलं. गुलाब्या शिताफीनं उठला आणि गोंधळून गेलेल्या डुकराला त्यानं धोतरात गुंडाळलं. तोवर सावरलेल्या

अजाबरावनं धोतराच्या वरूनच डुकराचं तोंड आवळून त्याला गप्प केलं. गुलाब्यानं बंडीच्या खिशातली धारदार सुरी काढून धोतरात हात घातला आणि डुकराच्या मानेवरून ती फिरवली. चलाखीनं धोतर बाजूला केलं.अजाबरावनं गुलाबराकडं कौतुकानं पाहिलं आणि विचारलं, ''डुक्कर पळून या दिशेला येईल हे तुला कसं कळलं?'' त्यावर गुलाबराव नाक फेंदारत म्हणाला, ''रोज बाहेर खाटेवर बसून मी काय उपटत नाही? जनरल नॉलेज वाढवत असतो.''

मग दोघांनी डुक्कर ओढ्यातून दुसऱ्या बाजूला नेलं. हणम्याच्या घरी नेऊन सोललं, त्याला एक मोठा तुकडा दिला आणि त्याच्या मोबदल्यात मोहाची भरपूर दारू सोबत घेऊन निघाले. अजाबरावच्या घरी जाऊन डुकराचं मांस शिजवायला ठेवलं. दारूच्या बाटल्या तोंडाला लावल्या.

शिकारीवरून हात हलवत परत आलेली तरुण पोरं डुकराला मायबहिणीवरून शिव्या घालत रस्त्यावरून गेली, तेव्हा मटन शिजत आलं होतं. खूप दिवसांनी मनसोक्त रानडुक्कर हादडायला मिळाल्यानं दोघांच्याही डोक्यांत मस्ती शिरली. वर मोहाची दारु चढली होती. अजाबरावला सैयदची बायको आठवू लागली. बेकरीत डबलरोटी भाजली जात असल्याचा वास येताच, त्याची चलबिचल सुरु झाली. दारुनं जड झालेल्या आवाजात त्यानं गुलाबरावला ढोस दिला. ''गुलाब्या, खाऊन पिऊन झालं, चल फुट आता तू. सैयदची बायको येईलच आता.''

'एवढी राहिलेली बाटली संपवून टाकू' म्हणत गुलाब्यानं अजाबरावचा ग्लास भरला. त्याला आग्रहानं प्यायला लावलं. स्वतःच्या ग्लासात नावापुरती ओतली. आधीच खूप झाली होती, आणखी एक ग्लास रिचवताच अजाबराव जागेवरच कलंडला, आडवाच झाला. तेवढ्यात गुलाबरावला सैयदच्या बायकोची चाहूल लागली. त्यानं लगेचच दिवा विझवून टाकला. सैयदची बायको सरावानं घरात आली.

सकाळी गुलाबराव रोजच्यासारखाच उन्हात चहा पित बसला होता. अजाबराव सायकलवर आला. त्याला पाहून गुलाबराव म्हणाला, ''डुकरानं काल मजा आणली गड्या.''

सायकलवरून न उतरताच गुलाबरावकडे पाहात अजाबराव म्हणाला, ''खरं डुक्कर तं जिवंतच आहे, खाटेवर बसून चहा पितंय भोसडीचं.''

आणि पैडल मारून सायकल पुढे दामटवत तो निघून गेला.

**– श्रीकांत बोजेवार**
भ्रमणध्वनी : ९८९२४१९२६७
shrikant.bojewargmail.com

*With Best Complimenst From*

**Granthali's leading paper supplier**



# Mayur Paper Corporation

**STATIONERS & PAPER MERCHANTS**

***We are paper suppliers of reputed publishers like Granthali***

23-B, Podar Chambers, S.A. Brelvi Road, Fort, Mumbai-400 001.
e-mail : mayurpapercorp@gmail.com

डॉ. वंदना महाजन


# रंग... बेरंग...!

**आत्याच्या सासऱ्याचे वागणे तिला अनेकदा चमत्कारिक वाटायचे. तो अनेकदा तिच्या आजूबाजूला घुटमळत राहायचा. पण त्याच्या बायकोने आवाज दिल्यानंतर मात्र तो आपली नजर खाली टाकून गायब व्हायचा.**

बदल हा जगण्याचा गाभाच आहे. बुद्ध म्हणतात त्या पद्धतीने सगळे अनित्य आहे. या अनित्यतेचा अनुभव आपण लहान असल्यापासूनच घेत आहोत. आठवते तेव्हापासून ते आजपर्यंत किती बदल झाले आयुष्यात. आयुष्य मात्र चालूच आहे अजून तरी. अर्थात तेही संपणार आहे, कोणत्या तरी टप्प्यावर आपल्या संकुचित जगातच काय-काय घडत जाते. कधी त्याचे ठसे अंतर्मनावर उमटतात तर कधी आपण अगदी कोरडेच राहतो. बाई ही अधिक हळवी असते. असा सगळ्या जगाचाच गैरसमज. ती हळवी असण्यापेक्षा अधिक जबाबदार असते, पण तिला नको त्या जबाबदाऱ्यांमध्ये अडकविण्याचा कुटिल डाव सगळ्या जगानेच खेळला आहे. द्रौपदीला पटावर लावणारा युधिष्टिर असेल किंवा ती बाई आहे म्हणून तिला घरात डांबणारा सर्वसामान्य पुरुष असेल. दोघांची बाईविषयीची कुटिलता सारखीच आहे.

खरं म्हणजे बाई असणं, म्हणजे नेमकं काय असतं, याचा परिचय तेजस्विनीला जरा उशिराच झाला. दोन भावांची एकुलती एक बहीण असल्यामुळे तिचे संगोपन लाडाकोडातच झाले. मुलगी आहे म्हणून कोणत्याही अभावांना सामोरे जावे लागले नाही, असे तिला वाटत असले तरी बऱ्याच अभावांना ती सामोरी जातच होती. तिच्या जन्माविषयी आईने तिला जे काही सांगितले, ते बऱ्याच प्रमाणात विरोधांनी भरलेले होते. आईला आधीची दोन मुलं असल्यामुळे तिला तिसरे अपत्य नको होते आणि त्यात वडील घरातील कोणतीच जबाबदारी घेत नसल्यामुळे तिला त्या वातावरणाचा उबगही आला होता. शेती आणि घर या दोन्ही पातळ्यांवर लढताना तिची दमछाक व्हायची. त्यात अजून एका अपत्याची जबाबदारी तिला नको होती, पण तेजस्विनीच्या आजोबांना मात्र घरात मुलगी हवी होती. आईने जेव्हा गर्भपात करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा त्यांनी तिच्यापुढे मुलीची भीक मागितली. त्यांची बायको म्हणजे तेजस्विनीची आजी, मुलगी-मुलगी करीत मेली. आतातरी घरात मुलगी हवी, या त्यांच्या आग्रहातूनच तेजस्विनीचा जन्म झाला, पण ती आईच्या पोटात असतानाच आजोबांचे निधन झाले. ज्या पुरुषाची पत्नी गर्भवती असते. त्याने कोणत्याही अर्थीला खांदा द्यायचा नसतो, अशी एक प्रथा आहे. आई गर्भवती असल्यामुळे जेव्हा इतरांनी वडिलाना खांदा देऊ नये असे सुचविले, त्यावेळेस आईने ते नाकारले. आणि तिने वडिलांना खांदा द्यायला प्रवृत्त केले. या पार्श्वभूमीवर तेजस्विनीचा जन्म झाला. तिच्या जन्मानंतर तिची दोन मोठी भावंडे आणि आई-वडील अशा कुटुंबात तिची वाढ झाली.

रंगाचा आणि आपला खरं म्हणजे खूप जिव्हाळ्याचा संबंध! रंग आहेत म्हणून जगणे आहे.



लहानपणी रंग ओळखण्याचा एक खेळ मुली खेळायच्या. ‘रंग बाई रंग, कोणता रंग?’ असे म्हणत मुली ओरडायच्या. त्यात ठरलेली एक मुलगी विशिष्ट रंग सांगायची. निळा, हिरवा, पिवळा, लाल जो रंग ती सांगेल, तो रंग शोधून त्याला टिपायचे. जी मुलगी टिपू शकणार नाही, तिच्यावर राज्य. या खेळात तेजस्विनीचा अनेकदा गोंधळ व्हायचा. निळा, हिरवा, जांभळा, आकाशी हे सर्व रंग तिला एकच वाटायचे. लाल, गुलाबी, तांबडा, चॉकलेटी यांच्यातला फरकही तिला नीटपणे करता यायचा नाही. काळा आणि पांढरा ठरवणं सोपं असतं, पण वेगवेगळ्या रंगामधल्या छटा ओळखणे कठीणच.

हेच रस्त्यांच्या बाबतीत व्हायचं. रस्ते कधीही तिच्या लक्षात राहत नसत. कितीही लक्षात ठेवायचा प्रयत्न केला, तरी ती हमखास रस्ता विसरायची. एक रंग मात्र तिच्या पक्का लक्षात राहिला. तो म्हणजे लाल रंग. या लाल रंगाचं रक्त माणूस म्हणून जगणाऱ्या प्रत्येकाच्या अंगातून वाहत असत. त्याचा रंग एकच असतो. पण ते जेव्हा बाईच्या शरीरातून वाहायला लागतं, तेव्हा मात्र तिची ओळख बदलते. जिच्या शरीरातून हे रक्त वाहतं तीच खरी बाई. या वाहणाऱ्या रक्ताने तिला बाईपणाच्या साच्यात घट्ट बसविले आहे. बाईत होणारा हा बदल तिला सातत्याने बाईपणाचे भान आणून देत असतो.

एरवी अत्यंत अवखळ असलेली तेजस्विनी या बदलाने पुरती भांबावून गेली. बाईच्या शरीरातून असं रक्त जातं याची तिला बिलकुलच कल्पना नव्हती किंवा आईनेही कधी काही सांगितले नव्हते. पावित्र्याच्या चुकीच्या संकल्पना उराशी बाळगून, आपण किती अपवित्र गोष्टी स्वतःवर आणि इतरांवरही लादत असतो याचा परिचय या निमित्ताने तेजस्विनीला झाला. तेव्हा ती नवव्या वर्गात शिकत होती. रात्रीची वेळ! आई सगळं आवरून निवांत तिच्या मैत्रिणींशी गप्पा मारत होती. वडील झोपले होते. आणि दोन्ही भाऊ सुद्धा डाराडूर घोरत होते. कसल्यातरी अस्वस्थतेतून तेजस्विनीला जाग आली. तिने स्वतःला चाचपडून बघितले. तिच्या लक्षात आले की आपला फ्रॉक रक्ताने लाल झाला आहे. कोणतीही जखम झाली नसताना आपल्या शरीरातून रक्त का वाहतंय, या विचाराने ती खूपच घाबरली.

आईला गप्पांमध्ये व्यत्यय आणलेला चालत नव्हता. त्यामुळे तिला सांगावं, असं तेजस्विनीला वाटलं नाही. एखादी जखम झाली तर आपल्याला वेदना होतात आणि इतरांना ओरडून सांगता येते. पण आता कोणतीही वेदना होत नाहीये आणि रक्त मात्र वाहतंय हे काहीतरी वेगळच दिसतंय. तेजस्विनीला माहीत नव्हतं की, तूर्त वेदना न देणारं हे रक्त आयुष्यभर वेदना म्हणून आपल्या सोबत राहणार आहे. तिने बराच वेळ अस्वस्थतेत घालविला. थोड्या वेळात आई आल्यानंतर तिने भितभितच आईला ते सांगितले. आईची प्रतिक्रिया तशी थंडच होती. तिने तेजस्विनीला कापडी पॅड बनवून दिले. तिला कपडे बदलायला सांगितले आणि प्रत्येक बाईच्या बाबतीत हे असंच होत. आता दर महिन्याला शरीरातून असे रक्त जाणार हे आईने सांगितल्यानंतर तिच्या लक्षात आले.

धर्म आणि बाई यांचा नेमका संबंध काय आहे?हा प्रश्न तेजस्विनीला नेहमी पडत असे. घरात देव्हारा नसल्यामुळे खरं म्हणजे तिला देव-धर्माविषयी तसे आकर्षण नव्हते, पण

गावात वारकरी संप्रदायाला मानणारा खूप मोठा समुदाय होता. आजूबाजूची सगळी घरे वारकरी संप्रदायाचीच. सकाळी चार वाजता गावात प्रभातफेरी निघायची. यात दोन पुरुष आणि एक स्त्री असायची. ही स्त्री म्हणजे यमुनाबाई. चार वाजता उठून ती संपूर्ण गावाला फेरी घालायची. तोंडाने 'हरे राम, हरे राम, राम राम, हरे हरे' असा जल्लोष करायची. गावात सगळी घरे चार वाजता जागी झालेली असायची. बहुतेक बायकाच कामाला लागलेल्या असायच्या. त्या सगळ्या बायका यमुनाबाईला शिदोरी द्यायच्या. या शिदोरीसाठीच यमुनाबाई प्रभातफेरीत सामील होत असे. अर्थात गावात कुणबी समाजाच्या घरामध्ये लग्नकार्य असेल किंवा कोणताही विधी असेल, त्यात गाणी म्हणण्याचे काम यमुनाबाईच करायच्या. यमुनाबाईला दोन मुलं आणि एक मुलगी होती. मोठा मुलगा मोलमजुरी करायचा. तर लहान मुलाला वेड लागलेले होते. मुलगी लग्न होऊन सासरी गेलेली. वेडा रघू म्हणून गावात त्याची ओळख होती. यमुनाबाईचा सगळ्यांवरचा अधिकार मात्र मोठा होता. गावात तिला मानही होता. तिचा नवरा घर सोडून निघून गेला. परत आला तो, भगवे कपडे घालूनच. तो कोणत्या पंथात जाऊन कोणता साधू झाला. हे मात्र कधीच कळले नाही. गावात भिक्षा मागून तो पोट भरत असे. यमुनाबाईला वारकरी संप्रदायाशी फार काही घेणे देणे नव्हते, पण शेती नसल्यामुळे ती सकाळी हा उद्योग करायची. त्यातून मिळणाऱ्या धान्यामुळे तिच्या भाकरीची सोय होत असे.

तिच्या सोबत सकाळी प्रभात फेरीत सामील होणाऱ्या दोन पुरुषांच्याही अशाच वेगवेगळ्या कथा होत्या. यातील एक पुरुष गावातला मोठा शेतकरी. गावात कोणतीही जमीन विकायला निघाली, तरी ती आपल्यालाच मिळाली पाहिजे, अशी त्याच्या घराची ख्याती होती. बागायतदार शेतकरी असल्यामुळे त्याच्या हातात पैसा खेळता राहायचा. ते पैसे तो गावातल्या गरजू लोकांना व्याजाने द्यायचा. कधी-कधी पैसे परत नाही मिळाले तर त्यांची जमीन आणि घरे देखील हडप करायचा. अंगात पांढराशुभ्र अंगरखा, धोतर, माथ्यावर टिळा, गळ्यात तुळशीची माळ आणि डोक्यावर गांधी टोपी असा त्याचा वेष असायचा. अर्थात, ज्या शेतकऱ्यांकडे बऱ्यापैकी पैसा आहे आणि जे वारकरी सांप्रदायिक आहेत, ते ह्याच वेषात असायचे. त्यांची प्रभात फेरी सहसा चुकायची नाही. तसा तो शेतात कमीच जायचा. त्याची बायको, मुलं आणि सुना शेतात राबायचे. प्रभात फेरीत सामील होणारा दुसरा पुरुष गावातले घर विकून गावाच्या बाहेर राहायला गेलेला. त्याची शेती डोंगराळ असल्यामुळे त्याला ती परवडायची नाही.

यमुनाबाईसारखंच थोडंफार धान्य मिळेल, या आशेने तो प्रभात फेरीत सामील होत असावा. या वारकरी संप्रदायाच्या लोकांची आषाढी-कार्तिकीची पंढरपूरची वारी चुकायची नाही. ही माणसं पंढरपूरला पायी जाऊन नेमकं काय करतात. हा प्रश्न तेजस्विनीला नेहमी पडायचा. त्यांच्याबरोबर एकदा जाऊन बघितलं पाहिजे. असा विचार ती करायची. पण ही सगळीच माणसे वेगवेगळ्या दुःखांनी पिडित होती. हा पंढरपूरचा विठोबा त्यांच्या मदतीला का धावून येत नाही? असा प्रश्न तिला पडायचा.

गावात भागवत सप्ताहाचे आयोजन जोरात व्हायचे. आठ-आठ दिवस किर्तनाचे कार्यक्रम चालायचे. पण गावात विठोबाचं मंदिर मात्र नव्हतं. गावातली वारकरी मंडळी रामाच्या मंदिरात जमायची. राम मंदिराशेजारी जुनं हनुमानाचं मंदिर होत. हा हनुमान शेंदूराने आणि तेलाने बरबटलेला असायचा. अनेकदा तेजस्विनीच्या मैत्रिणी त्यांच्या आयांच्या आग्रहावरून त्या हनुमानाच्या मंदिरात तेल चढवायला जायच्या. ही दोन्ही मंदिरं बरोबर गावाच्या मध्यभागी होती. या मंदिरांच्या अलीकडे कुणब्यांची वस्ती तर पलीकडे मराठ्यांची वस्ती होती. कुणब्यांच्या वस्तीत शेवटच्या आळीत तेजस्विनीचं घर होत. त्याच्याच शेजारी ब्राह्मणांची तीन-चार घर होती. समोर सोनारांची वस्ती तर बाजूच्या गल्लीत मुस्लिमांची वस्ती होती. कुणब्यांच्या वस्तीच्या बाहेर बौद्ध वाडा होता. मांग आणि भिल्लांची वस्ती मात्र मराठ्यांच्या वस्तीच्या बाहेर होती. गावाच्या सरळ रेषेत बाहेर भटक्या-विमुक्तांची झोपडपट्टी होती. यात वेगवेगळ्या जमातींची माणस एकत्र राहायची. यालाच नवगाव असं म्हटलं जायचं.

गावाची ही रचना जातीय स्वरूपाचीच होती. यातील बहुतेक कुणबी वारकरी सांप्रदायिक होते तर काही मराठे महानुभाव पंथी होते. ही सगळीच माणसे आपापल्या विचारांना चिकटून जगणारी होती. सकाळी चार वाजता येणारी प्रभात फेरी म्हणजे जणू कोंबड्याची बांग होती. त्या आवाजासरशी बायका आणि गडी माणसं कामाला लागायची. दर गुरुवारी नऊ वाजता एक फकीर न चुकता गावात गस्त घालायचा. तो फकीर कधीही कोणाच्या दारासमोर भिक्षेसाठी थांबायचा नाही.

'अल्ला हो अकबर', 'दिये उसका भी भला, ना दिये उसका भी भला' असं म्हणत चालत रहायचा. बायका त्याला बोलून भिक्षा द्यायच्या. पांढरीशुभ्र दाढी, डोक्यावर हिरवा फेटा, अंगात पांढरा अंगरखा आणि कमरेला हिरवा पंचा अशा वेषात तो फकीर आपल्या धुंदीत चालत रहायचा. गावाच्या बाहेर पिराच्या दर्ग्याजवळ झोपडीत तो एकटाच राहायचा. तेजस्विनीला त्याची खूपच दया यायची. ती न चुकता त्याला भिक्षा घालायची. त्या भिक्षेत तो फक्त पिठच घ्यायचा.

गावात विशिष्ट वेळेला नवनाथांची फेरी यायची. गळ्यातली पेटी वाजवत ते काय गायचे ते मात्र नीटसं कळत नव्हतं. मध्येच कोणत्या तरी दारात थांबून ते पैशांची मागणी करायचे. ते ज्या दारात थांबले, ते घर भाग्यवान. असा लोकांचा समज होता. भगव्या परिधानातले हे नवनाथ लांबलचक केस वाढवलेले. काहींचा डोक्यावर बुचडा तर काहींचे केस मोकळे.

त्यांच्या चेहऱ्यावर कर्मठता झळकायची. तेजस्विनीला त्यांची खूप भीती वाटायची. हे साधूच्या वेशातले चोर, दरोडेखोर आहेत, असा तिचा दाट संशय होता. ही सगळी मंडळी धर्माच्या आड भिक्षा मागणारी होती, पण पोटाची आग शांत करण्यासाठी सरळ भिक्षा मागणारी बरीच मंडळी गावात होती. वारकऱ्यांचा गावात मठ नव्हता, पण त्यांच्या जगण्या-बोलण्यात कमालीची कर्मठता होती. महानुभाव पंथाच्या मार्गात मात्र गावातल्या अनेक स्त्री-पुरुषांचा भरणा होता.

गावातल्या काही तरुण मुली या मार्गात पाठविल्या गेल्या होत्या. गावातील सुजाता नावाची एक मुलगी या मार्गात नुकतीच गेली होती. सुजाताची कहाणी अस्वस्थ करणारी होती. ती या गावात तिच्या आत्याच्या घरात राहत होती. तिच्या आत्याला घरात कोणतेच अधिकार नव्हते कारण लौकिक अर्थाने ती सासुरवाशीण होती. दिवसभर घरात आणि शेतात तिला राबावे लागायचे. सुजाता घरात असल्यामुळे घरातली सगळी कामे तिने सुजातावर सोपविली होती. सुजाता सकाळी चार वाजता उठून कामाला लागायची. सगळ्या घराची साफसफाई करून ती चिकण मातीने चूल पोतारायची. आठवड्यातून दोनदा गायीच्या शेणाने घर सारवायची. अंगणात सडा सारवण करून रांगोळ्या काढायची. नंतर अंगणात चूल पेटवून पाणी ठेवायचे. येथून तिच्या दिवसाला जी सुरुवात व्हायची, ती रात्री अकरापर्यंत तिची सगळी कामे आटपायची. धुणी-भांडे, स्वयंपाक यात तिचा दिवस कसा जायचा, कळायचे नाही. आत्याच्या सासूचे तिच्याकडे बारीक लक्ष असायचे. या एवढ्या कामाच्या बदल्यात तिला दोन वेळचे शिळेपाके खायला मिळायचे. त्या संपूर्ण घरासाठी ती हक्काची मोलकरीण होती. तर तिच्या आत्यासाठी तिच्या श्रमातला अर्धा वाटा कमी करणारी सहकारी होती.

आत्याच्या सासऱ्याचे वागणे तिला अनेकदा चमत्कारिक वाटायचे. तो अनेकदा तिच्या आजूबाजूला घुटमळत राहायचा. पण त्याच्या बायकोने आवाज दिल्यानंतर मात्र तो आपली नजर खाली टाकून गायब व्हायचा. समोरच तिच्या आत्याच्या नात्यातले एक कुटुंब राहत होत. त्या कुटुंबातली बाई आत्याकडे येऊन बऱ्याच वेळा सुजाताच्या कामात ढवळाढवळ करायची. काम चांगले कसे केले पाहिजे, हे ती सुजाताला मनापासून समजवायची. तिला दोन मुलं होती. त्यातल्या मोठ्या मुलाचं नाव अर्जुन होतं. या अर्जुनला सुजाताविषयी खूप आकर्षण वाटायचं आणि तिची दयाही यायची.

या जगण्यातून आपली सुटका कशी होईल, या विचाराने सुजाता अस्वस्थ व्हायची. असे जगण्यापेक्षा कुठेतरी निघून जावं, असा विचार तिच्या मनात अनेकदा यायचा. पण कुठे जायचं? याचं उत्तर मात्र मिळत नव्हतं. ती उरलेल्या वेळात अर्जुनच्या आईलाही मदत करायची. यातून अर्जुन आणि सुजाताची मैत्री घट्ट होऊ लागली. अर्थात मुलं आणि मुलीतली मैत्री त्या गावातल्या लोकांना बिलकुलच मान्य नव्हती. त्यामुळे अर्जुन आणि सुजाता हे चोरुनच बोलायचे. बऱ्याच वेळा तर त्यांचा नजरेतूनच संवाद चालायचा. अर्जुनही तसा घरातल्या वातावरणाला कंटाळलाच होता. आईच्या हाती असलेली घरातील एक हाती सत्ता त्याला त्रासदायक वाटायची. शेतात काम करावे असा वडिलांचा आग्रह असायचा. तो जवळच्या छोट्या शहरात ये-जा करून पदवीचे शिक्षण घेत होता.

सुजाताशी असलेली मैत्री हा त्याला त्याच्या आयुष्यातला संवेदनशील भाग वाटायचा. सुजाताची होणारी होरपळ त्यालाही अस्वस्थ करायची. याचे पर्यवसान शेवटी दोघांच्या घरातून निघून जाण्यात झाले. या गावाला कायमचा राम राम ठोकून निघून जायचे, असा दोघांचा पक्का विचार झाला. गावातल्या प्रत्येक घरी शौचालय नव्हते. गावाच्या बाहेरच बायका शौचाला बसायच्या. खरं म्हणजे हातात पाण्याचा डबा गावातून मिरवत मिरवत त्या उघड्या शौचालयास जात हे खूपच अपमानकारक असल तरी गावातल्या बायकांना त्याची बिलकुलच तमा नव्हती. कारण, घरातून बाहेर पडायला हा त्यांचा हक्काचा मार्ग होता. हातात चार वेळाही डबा घेऊन तिकडे गेले तरी कोणीही रोखू शकत नव्हते. नाहीतर मुलीना साधं दारात बसायची चोरी होती. पोरी आणि बायकांनी माजघरातच राहिलं पाहिजे, हा त्या गावाचा शिरस्ता होता. पण शेतात काम करायला मात्र बायकांना जावेच लागायचे. ज्या बायका घरातच काम करायच्या. त्या मात्र घरातच बंदिस्त असायच्या.

सुजाता ही घराची पूर्ण वेळ नोकर असल्यामुळे तिला बाहेर पडता येत नव्हते. या सगळ्या त्रासातून मुक्तता व्हावी, म्हणून तिने अर्जुनने सांगितलेला मार्ग अनुसरला. अर्जुनबरोबर जाऊन लांब कुठेतरी सुखात राहता येईल. अशी तिची कल्पना होती. कष्ट काय कुठेही करायचे आहेतच. एवढे कष्ट केले तर कोठेही पोट भरता येईल, पण घरातल्या आणि घराबाहेरील माणसांच्या छळातून आपली मुक्तता तरी होईल. आत्यासह तिच्या सगळ्या नातेवाईकांना आणि विशेष करून अर्जुनच्या आईला आपण हक्काच्या गुलाम वाटतो. आईबापाने जन्म दिला पण त्यांना मुलगी नकोच होती. आपल्या पाठीवर चार बहिणी झाल्या आणि पाचवा भाऊ. आपण लहान बहिणीला सांभाळलं, तोपर्यंत त्यांना हवे होतो, पण जेव्हा लहान बहिणी इतर भावडांना सांभाळायला लागल्या. तेव्हा आपली गरज संपली. घरातलं तोंड कमी होणार म्हणून त्यांनी मला आत्याकडे पाठवलं. गुलाम म्हणून माणस विकण्याची प्रथा आहेच. हा त्यातलाच एक प्रकार पण गुलाम हा दृश्य तरी असतो. ही नात्यांच्या आड होणारी गुलामगिरी किती भयानक आहे? गुलामाच्या श्रमाला थोडंफार मोल तरी असतं. पण इथे तर फक्त उपकाराची भाषा! आईवडिलांनी टाकून दिलेली मुलगी आपण सांभाळतोय, ह्याच तोऱ्यात सगळे असतात.

आता हे मला सांभाळतात की, मीच या सगळ्यांना

सांभाळते? हा प्रश्न आहेच.

या सगळ्या विचाराअंती सुजाताने अर्जुनबरोबर निघून जायचे ठरविले. आता त्याच्याशी लग्नच केले पाहिजे असंही तिच्या डोक्यात नव्हते. आदल्या दिवशी दोघांनी मिळून वेळ ठरवला आणि दुसऱ्या दिवशी त्या ठरलेल्या वेळेस सुजाता हातात पाण्याचा डबा घेऊन घराच्या बाहेर पडली. गावाच्या बाहेर आल्यानंतर तिने डबा फेकून दिला. नेसत्या वस्त्रानिशी ती अर्जुनसोबत चालू लागली. शेजारच्या खेड्यापर्यंत एकमेकांपासून काही अंतरावर चालत त्यांनी पायी प्रवास केला. तरी गावातल्या एक दोन लोकांनी त्यांना बघितलेच अर्थात ही पळून जात आहेत असा त्यांना अंदाज आला नसावा. शेजारच्या खेड्यात आल्यानंतर त्यांनी बस पकडली, आणि ते शहरात पोहोचले. दोन दिवस बस स्टँडवरच काढले. त्यानंतर कामाची शोधाशोध करण्यासाठी दोघेही बाहेर पडले.

एव्हाना सगळ्या गावात बोंबाबोंब झाली होती की, त्या अमक्या-तमक्याची पोरगी घरासमोरच्या पोरासोबत पळून गेली. दोन्ही घरांमध्ये कोणीतरी मरून पडावं या पद्धतीने दुखाःचे सावट पसरले होते. अर्जुनच्या आईने आणि सुजाताच्या आत्याने एकमेकांच्या झिंज्या धरायच्या फक्त बाकी ठेवल्या होत्या. अर्जुनची आई सारखी ओरडत होती.

''कथानी पोर, घरमा आणि ठी, मायबापनी सोडी देयल. तिनी मला पोराले बिघाड आणि मना घरना सत्यानाश करा.''

मोठ्यामोठ्याने रडत ती सुजाताच्या आत्याच्या अंगावर धावून जात होती.

आधीच आपले भाऊ आणि वहिनी आपल्याला मुलगी विचारतील, त्यांना कसं तोंड दाखवायचं, या विचाराने सुजाताची आत्या अस्वस्थ झाली होती. खरं म्हणजे नजर भुईला टेकून दिवसरात्र काम करणारी सुजाता आपल्या हातावर तुरी देऊन निसटून जाईल, असे तिला बिलकुल वाटले नव्हते. तिचा सगळा राग अर्जुनच्या आईवर निघत होता. अर्जुननेच तिला भरीस पाडून पळवून नेले, याविषयी तिची खात्री पटली होती. त्यामुळे ती दात-ओठ खाऊन अर्जुनच्या आईला शिव्या देत होती.

''तुनाच पोऱ्या बिघडेल शे तुले माय म्हनीसन पोऱ्यासले वयन लावता उन नाही. वचवच करत बठ्ठा गावमा फिरस, पोरेसवर ध्यान नही ठेव. मनी भोईभाई भाचीले नांदी लायसन तो पयाडी लई गया.''

असा आक्रोश ती करत होती. त्या गावातील जातपंचायत लयास गेलेली असली तरी, अशा आणीबाणीच्या प्रसंगी त्या त्या जातीतील प्रतिष्ठित पुरुष मंडळी एकत्र येऊन निर्णय घ्यायचे. आपल्या जातीतील पोरगी पळून जाते, हा सगळ्या जातीसाठीच बट्टा होता कारण यामुळे जातीत विवाहसंबंध व्हायला अडचण येते. असे सगळ्यांचे म्हणणे होते. एक पोरगी पळून गेली म्हणजे, संपूर्ण गावातल्या पोरीना नालायक ठरविले जायचे. त्या गावातल्या पोरी चांगल्या नाहीत. अशी त्या गावाची पंचक्रोशीत ख्याती व्हायची. सुजाता पळून गेल्यानंतर तिच्या आत्याच्या सासऱ्या आणि नवऱ्यासह सगळी पुरुष मंडळी एकत्र झाली आणि या दोघांनाही शोधून काढले पाहिजे, असा निर्णय त्यांनी घेतला. सुजाता सापडली, तर तिला जिवंत ठेवता कामा नये. यावरही त्यांचे एकमत झाले. ताबडतोब सगळी मंडळी कामाला लागली.

इकडे सुजाता आणि अर्जुनला कोणतेही काम मिळत नव्हते. वैतागून ते एका बिल्डिंगच्या बांधकामात माती फेकायचे काम ते करू लागले. यातून कसेबसे अन्नापुरते पैसे मिळत होते. घरातून बाहेर पडून आठ दिवस झाले होते. सुजाताकडे कपडे नव्हते. काय करावे दोघांनाही कळत नव्हते. परत गेलो तर आपली खैर नाही, याची दोघांना जाणीव होतीच. दिवसभर गवंड्याच्या हाताखाली काम करायचे आणि रात्री कुठंतरी उघड्यावरच आडोसा घ्यायचा, असे चालले होते.

होते तेच बरे होते. कमीत कमी डोक्यावर छप्पर तरी होते. असे विचार सुजाताच्या मनात येत होते. दिवसभर कष्ट करायचे पण निवाऱ्याची कोणतीच सोय नाही. कुठेतरी आडोशाला जाऊन झोपावे लागते. एखाद्या दिवशी कुणी उचलून नेले, तर अर्जुन तरी एकटा काय करणार? या विचाराने ती अस्वस्थ व्हायची. हा कशासाठी आपला जीव धोक्यात टाकतो आहे, हे तिला कळत नव्हते.

असेच एके रात्री बस स्टँडच्या कोपऱ्यात दोघेही गाढ झोपेत असताना कोणीतरी लाथा मारून त्यांना उठवत होते. डोळे उघडून बघितले तर तिच्या आत्याच्या सासऱ्यासह गावातील चार-पाच माणस समोर उभी होती. आत्याचा सासरा त्या दोघांना पायाने ठोसे मारत दात ओठ खात त्यांना उठवत होता. दोघेही भयभीत होऊन उभे राहिले. झोप कुठल्याकुठे पळून गेली.

''हरामखोर साली, लाज नाही वाटनी यांना संगे पै येवाले घर दार सोडीसन अशी रस्ताबर पडेल शे. बिगरअब्रूनी कशी पैदा करेल व्हती, मायबापेसनी. ठाऊक नही.''

असा आत्याच्या सासऱ्याचा कर्कश आवाज तिच्या कानावर पडला, त्याचबरोबर कुणीतरी तिच्या पेकाटात दोन लाथा घातल्या. त्यासरशी ती तळमळून खाली कोसळली. अर्जुनच्या कानशिलात कुणीतरी दोनचार लगावल्या. त्याच्या माथ्यात जाळ उठला. ही सगळी माणसं सोबत मेटॅडोर घेऊन आलेली होती. त्यांनी या दोघांना फरफटत नेत मेटॅडोरमध्ये कोंबले. तोंडातून ब्र देखील काढता आला नाही. मेटॅडोरमध्ये अर्जुनला वेगळ्या कोपऱ्यात ढकलण्यात आले आणि सगळी माणसे अशा पद्धतीने सुजाताच्या आजूबाजूला येऊन उभी राहिली की, त्यांनी मोठे सावज पकडले आहे. एकाच वेळेस या दोघांना पकडण्याचा आनंद आणि सुजाताविषयीची क्रूरता त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होती. त्यांच्यातली एक-दोन माणसे तिला जाणूनबुजून धक्का मारायचा प्रयत्न करीत होती.

आपल्याला मरण आलं असतं तर बरं झालं असतं या विचाराने सुजाता विव्हळत होती. या माणसांपैकी फक्त आत्याच्या सासऱ्यालाच ती ओळखत होती. गावातील बाकी माणसं तिने कधीही बघितलेली नव्हती. ह्या माणसांपैकीच एकाने तिच्या पेकाटात लाथ घातली होती. या माणसांचा काय संबंध आपल्याला मारहाण करायचा? आपण म्हणजे रस्त्यावरची शिळाच आहोत, ज्यांनी त्यांनी लाथाडायला!

जन्मदात्या आईवडिलांनी आपली योग्य जबाबदारी घेतली असती तर, आपल्यावर ही वेळ आली नसती या विचाराने ती आतून पूर्णपणे कोलमडली. घरातून पळालोच होतो तर यांच्या हाताला लागणार नाही, अशी खबरदारी घ्यायची होती. आता आपले काही खरे नाही. बकऱ्याला बळी दिले जाते तसे आपल्याला बळी दिले जाईल, याची तिला खात्री होती.

अर्जुनच काय तोही कदाचित मोकळा होईल पुरुष म्हणून.

बघूया आता, आलेल्या परिस्थितीला तोंड दिले पाहिजे.

या विचारांच्या आवर्तनात सुजाताला ग्लानी आली. तिचा डोळा उघडला, तेव्हा ती गावात पोहोचली होती. एखाद्या धरून आणलेल्या मेंढराला दोर बांधून ओढत आणावं, तसं त्या दोघांनाही खाली उतरवलं गेलं. अर्जुन पट्कन त्याच्या घरात पळाला. सुजाताचा तोही आधार गळून पडला. तिला कुठे जावे? काय करावे? काहीच कळेना. तेवढ्यात खपाटीला लागलेली तिची आत्या बाहेर आली आणि तिने तिला ओढतच घरात नेले.

त्यानंतर तिला तिने लाथा-बुक्यांनी बदडून काढले. एव्हाना बघ्यांची गर्दी जमायला लागली होती. आत्याचा पारा तडकला. ती लोकांना उद्देशून बोलू लागली.

''काय थोबाड तानी राहेनात आठे काय तमाशा शे काय तुम्हना घरमा माया बहिणी नहीत का?'' असे म्हणून ती लोकांना हाकलायचा प्रयत्न करू लागली. पण यामुळे तिच्या नवऱ्याला तिचा खूप राग आला. त्याने झिंज्या ओढत तिला घरात नेले आणि चांगले बदडून काढले. तिच्या भावाची मुलगी बदचलन आहे, याचा अर्थ ती सुद्धा बदचलनच आहे. हे त्याच्या मारातून स्पष्ट दिसत होते.

आत्यालाही हतबल झाल्यासारखे वाटत होते. का आपण ही भावाची पोर इथे आणली याचा तिला पश्चाताप होत होता. ज्या घरात आपणच गुलाम होतो. त्या घरात आपण आपल्या हाताखाली परत एक गुलाम आणला. एवढीशी पोर दिवसरात्र कष्ट करून थकून जायची. कधीही कुणाला तिची दया आली नाही. आता मात्र सगळेच सापासारखे तिच्यावर उलटले आहेत. आता हे विषारी नाग तिला काय जिवंत सोडत नाही. सख्ख्या बापाला तिच्याविषयी काहीच वाटत नाही.

''तुले मनी अंडेर संभायता उनी नयी, आते ती अनि तू दोनीबी मनासाठे मरेल शेत तू काय ते तथ देख, परत तू न तोंड माले दाखाडू नको.'' असे म्हणून तो मोकळा झाला. आता हिला वाचविण्यासाठी नेमक काय करावं या विचारांनी ती अस्वस्थ झाली. आत्याच्या सासऱ्यांनी एव्हाना सुजाताला एका खोलीमध्ये कोंडले होते. तिचे अन्नपाणी बंद करावे, अशी सूचना त्यांनी घरात सगळ्यांना दिली होती. सुजातालाही काही खाण्यापिण्याची इच्छा नव्हतीच. पण दुपारी आत्याने तिला जबरदस्ती एका कागदात भाकरी आणि तिखट दिले होते. ते अजूनही तसेच पडून होते.

रात्री सगळी पुरुषमंडळी एकत्र आली. सुजाताला नेमकी काय शिक्षा दिली पाहिजे यावर त्यांची खलबते सुरु झाली.

''पोरगी व घरमाईन पोऱ्याबरोबर निंधी जास. तुम्हना संमदासना, काय डोया लायेल व्हतात का, बठ्ठा गावमा तोंड द्याखाडाले जागा ठीई नई.'' त्यांच्यातला एक जण गरजला. दुसऱ्याने लगेच सुरुवात केली,

''तिने बापले बलाई ल्या, पोर जित्ती रावाले नको. तिसऱ्याने लगेच सुरुवात केली. पाच लिटरन राकेलन टीपड लई या तीनापुढे ठेवा, तिनेच वतीसन काडी लावाले सांगा.''

जवळजवळ तिला कायमचे संपविण्यावर सगळ्यांचे एकमत झाले होते. तिच्या आत्याचा नवरा हतबल होऊन बोलला.

''देखा गड्यासनो आही काही मला पोटनी पोर नही. पोटनी राती तर तथीच कापी टाकतू. गावमा लयतून नई, पण आही दुसरानी पोर, मारी तर आमले संबध्यसले जेलमा जान पडी. जरा डोकस शांत ठीसन विचार करा.''

त्यावर परत एकजण गरजला, ''मग तू दुसरानी पोर घरमा ठेवताना तुझी अक्कल कथी गयथी, तुनजन असंच म्हणणं न्हई तर आजपाशीन तुना आम्हना संबंध सरणात. चलारे उठा.''

त्यावर तो परत गयावया करत म्हटला, ''अरे भाऊसवन मी तुमचा पाय पडस, पोरानी चूक पदरमा ल्या. मी आतेनाआते तिने तिचा मायबापेसकडे सोडी येस!''

खरं म्हणजे हे प्रकरण या पद्धतीने अंगावर येईल असा आत्याच्या नवऱ्याला बिलकुल वाटलं नव्हतं. सुजाताला मारून टाकणं त्याला बिलकुल मान्य नव्हतं. पण एखाद्या पोरासोबत पळून गेलेल्या पोरीला गावात हीच शिक्षा होती. त्याला तेल्याची सुनंदा आठवली. विधवा होऊन माहेरी परत आलेली. बाप कधीचच मेलेला. आईसोबत मोलमजुरी करत पोट भरत होती. माहेरात राहूनही सासुरवाशीण बाईसारखी राहायची. तिची आई तिला खूप धाकात ठेवायची. विधवा बाई म्हणजे जळता निखारा. कसं सांभाळायचं हिला, असं तिच्या आईला वाटायचं. त्यात तिच्या आजूबाजूच्या बाया तिला आणि तिच्या आईला भांडावून सोडायच्या. आई आणि मुलगी दोघीही विधवा. या दोघांनीही मागच्या जन्मात काहीतरी पाप केलं असेल, अशीच आजूबाजूच्या बायांची भावना होती. कोणत्याही कामासाठी त्यांना राबवलं जायचं, पण कोणत्याही समारंभात त्यांना

सहभागी करून घेतलं जायचं नाही. एके दिवशी सुनंदा गवंडी काम करणाऱ्या सुधाकर सोबत पळून गेली. एका महिन्यानंतर गावातल्या लोकांनी त्या दोघांनाही असच शोधून काढलं. सुधाकरला मरेपर्यंत मारलं. आणि सुजाताला रॉकेल टाकून पेटवून दिलं. दोन तासात तिचं प्रेत जाळून मोकळं केलं. त्यानंतर पोलीस आले.

तिने आत्महत्या केली, असा जबाब सगळ्यांनी एका सुरात दिला. पोलिसांना पाहुणचार केला आणि वर्गणी जमा करून पैसेही दिले. पोलीस मटण, दारूचा पाहुणचार घेऊन आल्या पावली परत गेले.

गावात पोलिसचौकी नव्हती. ती शेजारच्या गावात होती. सुजाताला मारले तर बाजी पलटू शकते. गाव आता आधीसारखा राहिलेला नाही. गावात अनेक दुफळ्या आहेत. अनेक माणसं आपल्या विरोधात आहेत. कुणी वरपर्यंत हे प्रकरण नेलं, तर आपल्याला तुरुंगात जाव लागेल, या शंकेने तो बेजार झाला. या प्रकरणात पोरगा जातीचाच आहे, म्हणून त्याला कोणीच काही बोलत नाहीये. सगळे आपल्या मागेच हात धुवून लागले आहेत. या विचाराने तो अस्वस्थ झाला. काहीतरी केलं पाहिजे. भानावर येऊन तो जमावाला म्हणाला

''आज ना रोज थांबा, मी तिना बापले कालदिन बलाई लेस, काल दिन रातले काय तो फेसला मोक्या करी टाकुत?''

जमावाचा नाईलाज झाला. होकार म्हणून त्यांनी काढता पाय घेतला. आता चोवीस तासांचा अवधी मिळाला आहे. बघूया काय करता येते ते. या विचाराने त्याला थोडे बरे वाटले.

सुजाताच्या आत्याला उरीपोटी आग लागल्यासारखे झाले होते. काय अवदसा आठवली या पोरीला, पळून गेली घरातून. दोन वेळचे खाणे-पिणे आणि अंगभर कपडा तर मिळत होते ना. आता बाईचा जन्मचा कष्ट करण्यासाठी आहे. कष्ट तर करावेच लागतात. मेलीने माझी अब्रू वेशीवर टांगली. सगळ्या बाया कुजबुज करतायेत.

''हिनी भाची पई गयी, कस वाईट खानोट शे.''

हिच्या वागण्यामुळे आपणही चारित्र्यहीन ठरत आहोत. यापुढे उभ्या आयुष्यात आपल्याला कोणी किंमत देणार नाही. सासू-सासऱ्यांनी तर टोमणे मारून तिच्या कानाचे पडदे फाडले होते. हा सासरा मेला, मुळातच याची नियत खराब आहे. स्वतःच्या सुनेशी मेला लगट करतो. सासू घरात आहे, आणि ती याला चांगलाच ओळखून आहे. ती नसती तर या मेल्याने आपल्याला काय सोडले नसते. तो काल मला ऐकवत होता.

''कसा बेकार खानोटामा सगाई कराई गयी पोर खुशाल हात धरी निगी गई? या मेल्याची लायकी आहे का?''

या विचारासरशी तिच्या अंगाचा तिळपापड झाला. ती उठली. दाराआडची काठी घेतली, सुजाताच्या रूममध्ये गेली आणि तिला चांगले बदडून काढले. कालपासून रडूनरडून सुजाता कोरडीठाक पडली होती. तिच्या पोटात अन्नाचा कण नव्हता. या माराचा तिच्यावर काहीही परिणाम झाला नाही. ती जणू दगड बनली होती. आत्याचा नवरा मध्ये पडल्यानंतर आत्या शांत झाली. तिने काठी फेकून दिली आणि एकाएकी सुजाताच्या गळ्यात पडून ओक्साबोक्शी रडू लागली. त्या रडण्याचाही सुजातावर परिणाम झाला नाही. ती निश्चल होती. त्यावेळेस रात्रीचे दोन वाजले होते.

आत्या आणि तिचा नवरा गेल्यानंतर सुजाता विचार करू लागली. आपण अस अर्जुनबरोबर निघून जायला नको होते. या घरात आपण आश्रित होतो. आश्रितासारखंच रहायचं होतं. आपल्यामुळे आत्याच कुटुंब अडचणीत आल. ही सगळी माणसं आपल्याला मारायलाच निघाली आहेत. यांना काय अधिकार आहे आपल्याला मारायचा? ज्यांच्याशी आपली काहीही ओळख नाही, ती सगळी माणसं आपल्याला मारायला उठली आहेत. का? कशासाठी? आपण एका मुलासोबत घराबाहेर पडलो, काही दिवस त्याच्यासोबत राहिलो म्हणून? मी अर्जुनसोबत राहते म्हणजे मी भ्रष्ट झाले म्हणून यांच्या सांगण्यावरून मी स्वतःला पेटवून घ्यायचे आहे? संपवून टाकायचे आहे? तसंही आपलं आयुष्य वाऱ्यावरचंच, संपलं तरी काय आणि कुणाला फरक पडतोय? आपण अर्जुन सोबत का गेलो? तर आपल्याला मुक्तता हवी होती. ती केवळ कपटापासून नव्हे. तर या लोकांपासून. अर्जुन बरोबर जाताना त्याच्याबरोबर लग्न करायचा विचारही शिवला नाही मनाला. आपल्या मनातल्या सगळ्याच भावना करपून गेलेल्या.

आईने चौथीनंतर शाळेत जायला मना केली. लहान बहिणींना सांभाळण्यासाठी आणि घरातल्या कामांसाठी. तेव्हापासून आजपर्यंत फक्त काबाडकष्ट जन्मदात्या आईनेही आपली कधी कीव केली नाही. ती तरी काय करणार? तीच पिचली आहे या सगळ्यात. हे सगळं संपवून टाकायचं होतं आपल्याला एकदाचं, म्हणून अर्जुन आशेचा किरण वाटला. तशी फार काय गुंतवणूक नव्हती त्याच्यात. त्याला लग्न करायचं होतं आपल्याशी. थोडी स्थिरस्थावर झाल्यावर लग्न करणार होतोच आपण. पण आता सगळंच संपलं आहे. लग्न करून तरी काय फरक पडणार होता? एका तुरुंगातून दुसऱ्या तुरुंगात गेलो असतो, पण आता या लोकांच्या तावडीतून सुटलं पाहिजे. कसं सुटणार? परत येथून पळून जाणं तर निव्वळ अशक्य आहे. काय करावं? सुजाता जिवाच्या आकांताने सुटकेचा रस्ता शोधत होती.

आत्या आणि तिचा नवरा विचार करून थकले होते. अख्खी रात्र त्यांनी जागून काढली होती. सुजाताच्या बापाला बोलावून काहीच उपयोग नाही. याची दोघांना जाणीव होती. सुजाताला येथून काढले पाहिजे. पण कुठे पाठवायचे? बाहेर फडफडलं होतं. तसा तिच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. हिला महानुभाव पंथात पाठवूयात, ही एकदा पंथात गेली तर सगळे प्रश्नच मिटतील. आणि जातीतल्या सगळ्या माणसांची

तोंडंही बंद होतील. तिने नवऱ्याला हा विचार सांगितला. बऱ्याच विचाराअंती त्याला हा विचार पटला.

आता ती डोक्यावरचे सगळे केस काढून काळे कपडे परिधान करून निःसंग होणार याला कोणाचा विरोध असण्याचे काहीच कारण नव्हते. महानुभाव पंथाचा स्वीकार हा लोकांसाठी धार्मिक सोहळा होता. गेलेली अब्रू परत येत नसली तरी यामुळे लोकांचा आपल्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलेल. सुजाताचा जगण्यामरण्याचा प्रश्न संपेल, असा विचार आत्याने केला.

तिच्या नवऱ्याने आणि सासऱ्याने दुसऱ्या दिवशी सकाळीच सगळ्या पुरुष मंडळीना एकत्र करून सुजाता महानुभाव पंथात जाणार आहे अशी वार्ता दिली. त्यमुळे सगळे गपगार झाले. सगळ्या टोकदार वातावरणात ती पंथात जायला तयार आहे किंवा नाही, याविषयी तिला विचारावे अशी कोणाला गरजच वाटली नाही. ती म्हणजे गोठ्यात बांधलेली गाय. आता तर दावं सोडून पळून गेलेली वडाय गाय. आता तिला पक्क्या दोऱ्यानी आवळायची तयारी चालली होती.

आत्याच्या सासऱ्याने निर्णय घेतला. आता याच्यासाठी उशीर नको. आजच्या आज महंतांना बोलवून सगळा विधी पुरा करूयात आणि हिची रवानगी पंथात करूयात. महंतांना जेवणावळी द्यावी लागेल, कारण नसतानाच खर्च आहेच; पण त्याची सोय आता करावीच लागेल. या निर्णयानंतर क्षणात सगळे वातावरण पालटले. सगळ्यांची लगबग सुरू झाली. कोणीतरी महंतांना आणण्यासाठी धावले. आत्या आणि तिची सासू स्वयंपाक काय करायचा याच्या चर्चेत गुंतल्या. आत्या एवढ्या उत्साहात आली की जणू तिला दहा हत्तींचे बळ मिळाले. शंभर लोकांचा स्वयंपाक दोन तासात करते असे सांगून ती कामाला लागली.

घरातील ही सगळी धावपळ सुजाता निष्क्रियपणे पहात होती. तिला कोणी प्रतिक्रिया विचारणारच नव्हते आणि विरोध करणेही शक्य नव्हते. आता डोकं भादरून मार्गात जावं लागणार हे तिला कळून चुकले होते.

**– डॉ. वंदना महाजन**
भ्रमणध्वनी : ९९२०७९५१३९
dr.vandanamahajan@gmail.com

ग्रंथाली

# सहिष्णुतेचे बांधकाम

**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**




इतरांच्या न्याय हक्काची बिनदिक्कत पायमल्ली करून त्यांना त्यांची जागा दाखवून देण्याची, त्यांचा बदला घेण्याची भाषा बोलणारे राजकारण हे सहिष्णुतेचे बांधकाम रोखून धरण्यासाठीच सुनियोजितरीत्या योजलेले राजकारण आहे. सहिष्णुतेसारख्या एका अत्यंत संवेदनशील विषयाची विविध अंगांनी सखोल व मर्मग्राही मीमांसा करणारे एक संग्राह्य पुस्तक!

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# नदीष्ट

**मनोज बोरगावकर**




विषय चाकोरीबाहेरचा आहे. शैली पहिल्या धारेची आहे. थेट कोंडुरा किंवा बनगरवाडीची आठवण करून देणारे लिखाण आहे. 'नदीष्ट' ही मनोज बोरगावकर यांची केवळ कादंबरी नाही, तो आहे त्यांच्या प्रत्यक्षदर्शी आणि अनुभवसिद्ध घटनांचा कसदार ललित गद्य हुंकार. 'नदीष्ट' ही मराठी कादंबरीविश्वातील अकरावी दिशा आहे.
– **विनायक पाटील**, नाशिक

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

रवींद्र कुलकर्णी

# पुस्तकाचे परिणाम

**जेथे पुस्तके**
**जाळली जातात**
**तेथे अखेर**
**माणसेही**
**जाळली जातात.**
**– हेन्रिक हेन**

सॉली गॅनोर हा लिथुनियातला ज्यू. हिटलरच्या सैन्याने लिथुनिया व्यापला तेव्हा तो दहा वर्षांचा होता. नाझी अंमल जसा प्रस्थापित झाला तसे लिथुनियन जनतेने देखील ज्यूंवर हल्ले चढवले. पुढे जर्मन छळछावणीत सॉली गॅनोरचे बहुतेक नातेवाईक व मित्र मारले गेले पण तो वाचला. त्याची कहाणी अशा प्रसंगातून गेलेल्या इतर ज्यूंपेक्षा वेगळी नाही. 'Light one candle' हे त्याच्या आठवणींचे पुस्तक. त्यातले त्याचे शिक्षक व सॉलीच्या वाचनप्रेमासंबंधीचे प्रकरण हृदयस्पर्शी आहे. हे त्याचे काहीसे स्वैर भाषांतर.

१९४१ च्या अखेरिस रशियाच्या जिवघेण्या थंडीपुढे जर्मनसेनेची माघार सुरू झाली होती. अर्थात अजून बरेच युद्ध शिल्लक होते आणि ज्यूंचा प्रश्न सोडवणे बाकी होते. त्यासाठी भरलेल्या वॉनसी परिषदेत जर्मनव्याप्त प्रदेशातील ज्यूंना रशियात रस्ते बांधायच्या कामाला जुंपून संपवून टाकण्याची कल्पना हैड्रिचने मांडली. आता फरच थोड्या ज्यूंना आपल्या भवितव्याची काही आशा राहिली होती.

दरम्यान जिवंत रहायचे असेल तर काहीही करून जर्मनांच्या उपयोगी पडण्याच्या स्थितीत असणे हेच ज्यूंना आवश्यक होते. त्यासाठी आमच्या वस्तीतल्या नागरी समित्यांनी व ज्यू पोलिसांनी आम्हा मुलांसाठी सुतारकाम, लोहारकाम शिकवण्याचे प्रशिक्षण वर्ग सुरू केले. जेणेकरून त्या कामांसाठी आम्हा मुलांना जर्मन सैनिक जिवंत ठेवतील. ज्यू युवक संघटनांसाठी देखील हे प्रशिक्षण वर्ग म्हणजे चांगले आवरण होते.

६ फेब्रुवारीला आमच्यापैकी बऱ्याच जणांना रिगा येथील छावणीत हलवण्यात आले आणि नंतर पुस्तकांच्या जप्तीचा आदेश आला. वस्तीतल्या सर्वांनी आपापल्या घरातील सर्व ग्रंथ जर्मन अधिकाऱ्यांकडे ठरावीक मुदतीत जमा करावयाचे होते. त्यानंतर कोणाकडे पुस्तके सापडल्यास त्याला गोळी घालण्यात येणार होती. अनेक शतकांपासून पासून आमची ओळख ही पुस्तकाची (ओल्ड टेस्टामेंटची) माणसे ही होती. कोणत्याही पुस्तकाशी फारकत घेणे हे यातनादायी होते.

वर्षाच्या सुरुवातीस आमच्या घराजवळच्या अनेकांना हलवण्यात आले होते. वस्तीचा तो भाग बेवारस पडला होता. त्यात प्रवेश न करण्याची सक्त ताकीदही होती. पण मी व माझा मित्र

कुकी तेथे चोरून प्रवेश करत असू, जळाऊ लाकडांसाठी! इतरही काही फेकलेले पण उपयोगी सामान आम्ही शोधत असू. हे धोकादायक होते. पण धोका पत्करल्याशिवाय जिवंत राहणे शक्य नव्हते.



तिथे बऱ्याचदा चकरा मारल्यावर एकदा आमच्या हाती घबाडच लागले. अशाच एका बेवारस खोलीत एक कपाट सापडले आणि त्यात जुनी पुस्तके होती. छताजवळ असलेल्या फटीतूनच तेथे प्रवेश करता येई. ती लपण्यासाठी सर्वोत्तम जागा होती. याला 'ऑपरेशन लायब्ररी' असे आम्ही नाव देऊन टाकले. क्षणभर वाटले यातली काही पुस्तके नेऊन आपल्या घरच्या कपाटात ठेवावी. एकदा कुकीने तसे म्हटले देखील, पण अखेर त्यालाही धीर झाला नाही कारण आदेशच तसा होता आणि सर्वांनी आपापल्या घरची मौल्यवान पुस्तके जर्मनांकडे जमा करायला सुरवात केली होती.

पुस्तके जमा करण्याच्या अंतिम दिनाच्या आदल्या रात्री खूप बर्फ पडला. पहाटे पाहिले तर सर्व वस्ती बर्फाच्या दुलईत लपेटली होती. पाणावलेल्या डोळयांनी माझ्या आईने तिची सर्व आवडती पुस्तके बर्फावरच्या घसरगाडीत, स्लेज मधे भरली. शेवटचा गठ्ठा रशियातल्या सर्वोत्तम लेखकांचा होता. ते दहा खंड होते. चामडी बांधणीतले. लाल रंगांची कव्हरे व शीर्षके सोनेरी अक्षरांची. टॉलस्टॉय, लर्मोटोव्ह, दोस्तोव्हस्की, तुर्गनेव्ह, पुष्किन, गोगोल . उत्कटता, विचार, आदर्श, भावना हे खंड आईच्या विवाहात भेट म्हणून आले होते. जोचिलकडून. तिचा भाऊ.

मला आईची सहानुभूती वाटली. वडिलांच्या नाहीशा होण्यातून ती सावरू शकली नाही. नंतर तिच्या भावाची पाठवणी रिगा छावणीत करण्यात आली. तो कदाचित परत कधीच दिसणार नव्हता. आजकाल आई क्वचितच हसे. दुःख विसरण्यासाठी ती पुस्तकात डोके खुपसून बसे. माझ्यासारखी. तासन्‌तास ती हालचाल न करता बसे. केवळ तिची दोन बोटे हातातल्या पुस्तकांची पाने उलटत. खाण्यापिण्याचीही तिला शुद्ध नसे. वाचताना तिच्या लेखी इतर जग अस्तित्वातच नसे. आता जर्मनांना तिची पुस्तके देखील हवी होती.

मला तिला सांगावेसे वाटले, ''तुला हवी तर राहू देत पुस्तके आपल्या जवळ. नाही तरी आपण मारले जाणारच आहोत. तोपर्यंत तरी वाचता येईल.'' पण मी गप्प बसलो. आधीच तिला या नवीन वास्तवाशी जुळवून घेणे अवघड झाले होते. 'हे पहा, जर्मन केंद्रापर्यंत ही पुस्तके पोचली पाहिजेत!' आईने खर्ड्या आवाजात फर्मान सोडले. तिला माझ्या मनात काय चालले आहे याचा अंदाज असावा. पुढे ती म्हणाली, पुस्तकांपायी जीव जाणे आपल्याला परवडणारे नाही.

मी स्लेज खेचत निघालो तसा कुकी मला वळणावर भेटला. त्याने देखील, स्लेजवरून पुस्तके आणली होती. तो भांबावलेला वाटला. 'चल,' मी करड्या आवाजात म्हटले. त्याला माझी कल्पना फारशी पसंत नसावी पण तो माझ्या मागे येइल याची मला खात्री होती. आम्ही रस्ता ओलांडला व त्या ओसाड पडलेल्या भागात आलो. अर्ध्या तासात आम्ही सर्व पुस्तके आम्हाला सापडलेल्या बेवारस खोलीतल्या कपाटात भरून टाकली. काही शेजाऱ्यांकडे स्लेज नव्हते. त्यांनी देखील आम्हाला पुस्तके वाहून नेण्यासाठी दिली. ती सर्व त्या कपाटात नेऊन ठेवली. पण माझे समाधान एवढ्याने झाले नाही. माझ्याकडे एक नवीन कल्पना होती. तिला कुकीकडून या वेळेस जास्तच विरोध झाला. पण शेवटी तो नरम पडला. आम्ही दोघांनी जर्मन केंद्रावर पुस्तकांच्या वर्गीकरणाचे काम मिळवले. ग्रॉडनिक नावाच्या माणसाकडे ती जबाबदारी होती. तो माझ्या वडिलांचा मित्र होता. त्याने आनंदाने केंद्राच्या पहिल्या मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर पुस्तके नेण्याचे काम दिले. दुसऱ्या दिवशी कुकी आजारी असल्याच्या बहाण्याने आला नाही. वास्तविक तो इमारतीच्या मागच्या बाजूला उभा होता. मी पुस्तकांचे दोन हातात दोन गठ्ठे घेई व त्यातला एक जिन्यामधल्या खिडकीतून कुकी जेथे उभा होता तेथे टाकी व कुकी त्याची पुढे त्या बेवारस इमारतीत व्यवस्था लावे. अशा बऱ्याच फेऱ्या झाल्या.

हे करण्यात धोका होता. कमालीची थंडी असताना

मी घामाने निथळत होतो. दोन तीन दिवसांनी कुकीला जर्मन सैनिकाने हटकले, तेव्हा त्याने आम्ही ठरवून ठेवलेले उत्तर दिले. कुकी म्हणाला, ''माझ्याकडे पुस्तके पोचवण्याचे काम आहे त्यासाठी या इमारतीचा दरवाजा शोधतो आहे. जर्मन सैनिकाने त्याच्यावर विश्वास ठेवला पण त्याच्या मूर्खपणाबद्दल त्याला एक  सणसणीत लाथ घातली. कुकीची पँट पार ओली झाली. यानंतर मात्र कुकीने सहकार्य करायचे नाकारलेच, पण तोपर्यंत आम्ही बरीच पुस्तके त्या ओसाड जागेत गोळा केली होती. वस्तीततल्या अनेक ज्यूंना आमच्या उद्योगाची कल्पना होती. ते आम्हाला पहात होते व दुर्लक्ष करत होते. अशी सुमारे पाचशे पुस्तके आम्ही जमवली. त्यातली सगळीच काही सोपी व आमच्या वयाच्या मुलांसाठी नव्हती, पण त्यातली बरीच आम्ही वाचली व शाळेतल्यापेक्षा कितीतरी जास्तीचे ज्ञान आम्हाला झाले.

त्या ओसाड जागेतल्या संग्रहातून मी एका वेळेस एकच पुस्तक घरी आणे, मी गुपचुप वाचे व लपवून ठेवे. अशाने माझे मन मला खाऊ लागले. उत्तम साहित्याचा संग्रह मी व कुकी केवळ आमच्या स्वार्थासाठी वापरत होतो. हळूहळू आम्ही जवळच्या मित्रांना व नातेवाईकांना देऊ लागलो. नंतर त्यात अनेक जण आले व बातमी पसरू लागली.

मी व कुकी सुतारकाम शिकायण्यासाठी जाऊ लागलो. तेथे एल्देस्टाईन हा आमचा गुरु होता. युद्धाच्या आधी तो गणित शिकवे. आता देखील आम्ही खिळे ठोकत नसू तेव्हा तो आम्हाला गणित शिकवे. एक दिवस तो माझ्या जवळ आला आणि मला त्याने थेट विचारले, ''काही पाठ्यपुस्तके हवी आहेत. विशेषत: गणिताची! मिळतील का?'' मी अशी काही पुस्तके मज जवळ असल्याचेच नाकारले, पण त्याने आपला आग्रह सोडला नाही. शेवटी, 'मी पहातो असे सांगून सुटका करून घेतली. खरे तर कुकीने मला शाळेची पाठ्यपुस्तके ठेवल्याबद्दल दोष दिला होता. त्यातही गणिताची पुस्तके ठेवायची म्हटल्यावर त्याने मला शिव्याच घालायचे बाकी ठेवले होते. त्याचे गणिताशी वैरच होते. गणिताची पुस्तके पाहून कुकी माझ्यावर ओरडलाच, ''या पुस्तकांसाठी मी जीव धोक्यात घालू?'' त्यातलेच एक थोडे नवीन वाटणारे भूमितीचे पुस्तक मी एक दिवस आमचा शिक्षक एल्देस्टाईनसाठी लपवून आणले. ते त्याने पाहिले मात्र आणि मला मिठीच मारली व हर्षभराने म्हणाला, ''अरे, हा खजिना आहे! पाहिलेस का तू? हे हिब्रूत आहे व तेलअव्हीवमधे छापलेले! थोड्याच वर्षांपूर्वी. कोठे मिळाले तुला हे?''

एल्देस्टाईन हा लाजरा मनुष्य होता. त्याला टक्कल पडत चालले होते. या वस्तीत जर्मनांनी त्याची पाठवणी करण्याआधी कोनास गावात तो हायस्कूलमध्ये शिकवे. काही लिथुनियन लोकांनी गावातल्या ज्यूंना त्यांच्या सिनेगॉगमध्ये जाळून ठार मारले होते. त्यात एल्देस्टाईनचे कुटुंबही होते. हे सर्व भोगल्यानंतर देखील त्याची उदात्त विचारांवरील श्रद्धा ढळली नव्हती. मांगल्याचा शेवटी विजय होईल याची खात्री होती त्याला.

वस्तीत त्याचे कुणी नातेवाईकही नव्हते. ज्या कुटुंबात पुरुष माणूस नव्हता अशा एका ज्यू कुटुंबाने त्याला दत्तक घेतले होते. एकाकी असलेले मूल, वयस्क वा स्त्री यांच्या संरक्षणासाठी वस्तीतल्या ज्यू समितीनेच ही योजना केली होती. जर्मनांची त्याला मान्यता होती. अशा जोडाजोडीतून अनेक नवीन कुटुंबे या वस्तीत उदयाला आली होती. एल्देस्टाईन अशाच एका पाच जणांच्या कुटुंबाबरोबर रहात असे. त्या कुटुंबात जुळी मुले होती. त्याला त्यांचा लळा होता. जर्मनांच्या हाताखाली काम करणाऱ्या लिथुनियन गार्डना लाच देऊन तो या आपल्या जोडलेल्या कुटुंबासाठी थोडे जास्तीचे अन्न मिळवे. त्या दिवशी देखील मी जसे त्याला पुस्तक दिले, तसे त्याने ते त्याच्या कपडयांनी भरलेल्या बॅगेत ठेवले. प्रशिक्षण वर्ग संपताच आम्ही दोघेही बाहेर पडलो व तो गेटजवळ लिथुनियन गार्डबरोबर त्याच्या नेहमीच्या देवघेवीसाठी थांबला. मी पुढे निघालो. अचानक मला गार्डचा आरडाओरडा ऐकू आला. तो दारूच्या नशेत होता. एल्देस्टाईनला नेहमीपेक्षा थोडे जास्त अन्न हवे होते. अचानक लिथुनियन गार्ड ओरडला, ''त्या तुझ्या बॅगेत काय आहे? पुस्तक! ते पण हिब्रू भाषेतले? पुस्तक बाळगण्याबद्दल मी तुला गोळी घालू शकतो! तू जी मला बक्षिसे दिलीस त्याबद्दल बंदुकीची गोळी खाणे कसे वाटेल तुला?''

मी फक्त दहा यार्ड लांब गेलो होतो. आरडाओरडाचा आवाज आला तसे मी वळून पाहीले. जर्मन कार दुसऱ्या दिशेने घटनास्थळी येत होती. ती थांबली. काय चालले आहे पहाण्यासाठी नाझी अधिकारी त्यातून उतरला. माझ्या पोटात गोळा आला.

लिथुनियन गार्ड नाझी अधिकाऱ्याला पुस्तक दाखवत असताना एल्देस्टाईन मान खाली घालून उभा होता. नाझी अधिकाऱ्याने पुस्तक चाळले. एल्देस्टाईनला ते कोठून आणल्याचे त्याने विचारले. एल्देस्टाईनचे उत्तर मला ऐकू आले नाही, पण त्या अधिकाऱ्याने माझ्या शिक्षकाच्या थोबाडीत मारल्या व ओरडला,  ''खोटे बोलू नकोस. हे पुस्तक पॅलेस्टाइनमधे छापले आहे. ही सांकेतिक भाषा आहे! बोल तुझा येथला माणूस कोण आहे? कोणी दिले तुला हे? सांगतोस का गोळी घालू? मग दोघांनी मिळून एल्देस्टाईनला मारायला सुरवात केली. मी भितीने गोठून गेलो. मला वाटले एल्देस्टाईन कुठल्याही क्षणी माझ्याकडे बोट दाखवेल, पण त्याने पडता-पडता मला पळून जाण्याची खूण केली. मी जीव घेऊन पळत सुटलो आणि कोपऱ्यावर मी गोळी झाडल्याचा आवाज ऐकला. मी वळून पाहिले तेव्हा एल्देस्टाईन कोसळत होता. नाझी अधिकाऱ्याने आता पिस्तुल त्याच्या डोक्याला लावले व परत चाप ओढला तशी एल्देस्टाईन जमिनीवर पडला व

निपचित झाला.

त्या रात्री मला भयंकर स्वप्न पडले. मी किंचाळत उठलो. पण किंकाळ्या मनातल्या मनात होत्या. मला धाप लागलेली होती. ज्या वस्तुस्थितीने मला भानावर आणले होते, ती काही फारशी स्पृहणीय नव्हती. माझ्या चुकीमुळे माझा शिक्षक मारला गेला होता.

मी प्रशिक्षण केंद्रावर गेलो नाही. दिवसभर रडत होतो. शेवटी कुकी आला व त्याने मझे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला पण मी त्याच्या पलीकडे गेलो होतो. मी आणि माझी येडछाप पुस्तके! माझ्या मूर्खपणाने मी अनेकांचा जीव धोक्यात आणल्याची जाणीव मला पहिल्यांदा झाली. माझ्या आईचे म्हणणे बरोबर होते. पुस्तकांसाठी जीव धोक्यात घालणे मूर्खपणाचेच होते. मी तिचे ऐकले नाही आणि एल्देस्टाईन मेला. त्याने केवळ माझ्याकडे बोट दाखवण्याची गरज होती. ज्याने तो कदाचित वाचला असता. त्याची मला पळून जाण्याची खूण करणारी दुबळी आकृती आजही दिसते.

''मूर्ख आहेस. तुला काय वाटते, त्याने तुझे नाव सांगितले असते तर जर्मन सैनिकाने त्याला जिवंत सोडले असते? मूर्खा, त्याने तुम्हा दोघांना गोळ्या घातल्या असत्या आणि हे एल्देस्टाईनला माहीत होते. ''कुकीने माझी समजूत काढली. शिवाय त्याने काळजीपूर्वक रहायला हवे होते.'' तो पुढे म्हणाला. पण आता कितीही युक्तीवाद केला तरी एल्देस्टाईन परत येणार नव्हता.

एल्देस्टाईनचे वस्तीतल्या दफनभूमीत दफन झाले. त्याला जिथे मारण्यात आले होते, त्याच्या जवळच ही जागा होती. तो ज्या कुटुंब बरोबर रहात होता ते, त्याचे थोडे विद्यार्थी, ज्यात मी व कुकी होतो असे थोडेच लोक या प्रसंगी उपस्थित होतो. त्याला नातेवाईक तर नव्हतेच आणि असले मरण ही या वस्तीत दुर्मीळ गोष्ट नव्हती. इतर कोणीही याकडे लक्ष दिले नाही. कुठलेही धार्मीक विधी झाले नाहीत. जर्मनांची त्याला बंदीच होती. त्याला खड्ड्यात सरकवताना ज्या मुलांबरोबर तो खोलीत राही ती मुले रडत होती. मी व कुकी शुंभासारखे स्तब्ध उभे होतो. मग पाऊस आला तसे आसऱ्यासाठी आम्ही पळालो.

नंतरचे दहा दिवस मी शाळेत गेलो नाही. मुलांना तोंड दाखवण्याची मला लाज वाटत होती. त्या ऐवजी मी एका आजारी कामगाराऐवजी बदली कामगार म्हणून दहा दिवस गेलो. मी १४ वर्षाचा देखील अजून नव्हतो. दहाव्या दिवशी मला उभे रहाणे देखील अशक्य झाले. मी कसेबसे स्वत:ला ओढत आणले व वस्तीच्या दाराशी कोसळलो.

ते दहा दिवस जणू माझ्या पापक्षालनाचे होते. दहा दिवस काम करून ढासळलेली माझी तब्येत पूर्वपदावर येइपर्यंत एक महिना गेला. नंतर मी प्रशिक्षण वर्गात गेलो तर आश्चर्य म्हणजे सगळे वातावरण नॉर्मल होते. एल्देस्टाईनच्या मृत्यूचा व मी त्याला दिलेल्या पुस्तकाचा संबंध कोणीही लावला नव्हता. तो इतर अनेकांप्रमाणे लाच देताना पकडला गेला व मारला गेला.

दुसरे आश्चर्य म्हणजे कुकी नेमाने आमच्या त्या ओसाड भागातल्या वाचनालयात जातच होता. त्याने एल्देस्टाईनला मारताना प्रत्यक्ष पाहिले नसल्यामुळे असावे कदाचित वा मी जसा घाबरलो तसे त्याच्याकडे धैर्य आले म्हणा! तो माझ्यासाठी एकदोन पुस्तके घेऊन येई. महिन्याभराने मी त्याच्या बरोबर परत त्या आमच्या छुप्या वाचनालयात जाऊ लागलो. त्या भीषण जगात लोकांचा परमेश्वरावरचा व समाजावरचा विश्वास उडून गेला होता. खरे तर त्यांचा मानवावरचाच विश्वास नाहीसा झाला होता. फक्त पुस्तकांनी मला आधार दिला. एक दिवस अचानक आई कामावरून लौकर घरी आली व तिने मला पुस्तक वाचताना रंगेहात पकडले. ती त्याने एवढी अस्वस्थ झाली की मीच घरी पुस्तक न आणण्याची शपथ घेतली.

आता कुकी व माझा वेळ बराचसा त्या ओसाड जागेतल्या पुस्तकांच्या कापाटासोबत जाऊ लागला. एक दिवस कुकीने कपाटातून बायबल काढले. मी ते का तेथे आणले होते हे मलाच ठाऊक नव्हते. मी नास्तिक संस्कारात वाढलो होतो. कदाचित मला वाटले असावे ज्यूंची लायब्ररी बायबलशिवाय अपूर्ण राहील.

'मला वाटते आपण एल्देस्टाईनसाठी प्रार्थना म्हटली पाहिजे.' कुकी म्हणाला. मी चमकून त्याच्याकडे पाहीले. आमच्या बोलण्यात जेव्हा जेव्हा धर्माचा विषय निघे तेव्हा कुकी तो उडवूनच लावे. तोही माझ्यासारखा अधार्मिक वातावरणात वाढला होता.

मला माहीत आहे तू कसला विचार करतो आहेस. एल्देस्टाईन आपल्या पुस्तकामुळे मेला हे खरेच आहे. कदाचित त्याची इच्छा असेल की आपण त्याच्यासाठी प्रार्थना करावी. हे ऐकताच मी मुकाटपणे प्रार्थनेच्या ओळी कागदावर लिहून घेतल्या.दुसऱ्या दिवशी शाळेतून येताना आम्ही एल्देस्टाईनच्या दफनस्थळाशी थांबलो व प्रार्थना म्हटली. आश्चर्य म्हणजे माझे मलाच बरे वाटू लागले. रोज शाळेतून येताना मी त्या जागेची काळजी घेऊ लागलो. हवामान ऊबदार झाले तशी मी तिथे वाटाणे पेरले. त्याचे झाड आले व त्याला वाटाणेही लागले जे मी व कुकीने वाटून घेतले. मंला माहीत होते की एल्देस्टाईनची यास काहीच हरकत नसणार.

(सॉली गॅनोर या लेखकाच्या
From 'Light One Candle' या पुस्तकातून)

**– रवींद्र कुलकर्णी**
भ्रमणध्वनी :९८१९२४७०९३
kravindrar@gmail.com

रवींद्र लाखे

# गोष्ट

**मग काका म्हणाले, ''तुम्हाला ही गोष्ट पूर्ण वाटली तर लेखकाचा दोष आहे. ह्यातल्या पात्रांचा नाही. आणि काय करा तुम्ही की, ही गोष्ट लिहिणारा लेखक आणि वाचक ह्या मधली रेषा पुसून टाका. म्हणजे तुम्ही एकविध व्हाल. एकविध झालात की तुम्ही स्वत: ह्या गोष्टीत सामील व्हाल. आणि गोष्ट पुढे न्याल.''**

**तो** तरुण म्हणाला, ''मला जगावसं नाही वाटत.'' मनात म्हणाला. सिगारेट ओढत तो उभा होता एका पानाच्या टपरीजवळ. बाजूला एक भिकारी होता. भिकाऱ्याने चमकून त्याच्याकडे पाहिलं. आधीच लालभडक असलेले डोळे आणखी लाल झाल्यासारखं. भिकारी उसळून बोलला, ''मादरचोद, तुझ्या मागच्यांचं काय? आईवडिल, बहीण भाऊ?'' तो तरुण, त्याचं नाव विकर्ण, चमकला.

त्यानं भिकाऱ्याला विचारलं, ''तुम्हाला माझ्या मनातलं ऐकू आलं? इकडं ये.''

भिकाऱ्याने त्याला जवळ बोलावलं. म्हणाला, ''बस माझ्याजवळ. त्या आधी माझ्यासाठी एक सिगारेट घेऊन दे.''

विकर्णनं विचारलं, ''कोणती?''

भिकारी म्हणाला, ''चारमिनार पाहिजे रे, पण या जयंताकडे नाही मिळत.''

जयंतानं एक ब्रिस्टॉल काढली. विकर्णकडे दिली. विकर्णनं भिकाऱ्याला विचारलं, ''ब्रिस्टॉल चालेल का?''

जयंता म्हणाला, ''भावेकाकांचा हाच ब्रँड आहे आता.'' भावेकाकांनी ब्रिस्टॉल घेतली.

''अरे, चारमिनार नाही मिळत तर करणार काय? हा जयंता देतो मला सकाळी एक ब्रिस्टॉल संध्याकाळी एक ब्रिस्टॉल. माचिस घे.''


भावेकाकांनी सिगारेट पेटवली नि जोर्रात एक झुरका घेतला. मरणापर्यंत जाणारा वाटला विकर्णला. सिगारेटचे पैसे देताना त्यानं त्या जयंता का कुणी त्याला विचारलं, ''कोण आहेत हे भावेकाका?''

तर तो जयंता म्हणाला, ''माझ्या टपरीमागेच त्यांचं घर आहे. सगळे आहेत घरात. पण भावेकाका आपलं बोचकं घेऊन इथं राहतात. इथंच झोपतात. करावीशी वाटली आंघोळ वगैरे तर घरी जातात. त्यानं काकांकडे पाहिलं. ७०च्या पुढं वय असेल.''

विकर्णच्या मनात आलं, ''च्यायला एवढं जगायचं? आता माझं वय २२. अजून ४८ किंवा त्याहून जास्त.''

''हं, काय झालं रे भडव्या तुला जगावसं नाही वाटत?'' भावेकाकांनीं विचारलं.

''काका, सकाळी उठलं की वाटतं कशाला उठायचं? रोज तेच-तेच जगायचं आहे तर. सकाळ होणार ते मग रात्रीपर्यंत तीच ती कामं. मग रात्री झोपायचं.''



''च्यायला, काय मोठं वेगळं सांगितलस? हे तर सर्व लोकांना वाटतं. त्यामुळे प्रत्येकानं एकदा तरी आत्महत्येचा विचार केलेला असेल. तू दिवस मोजत राहातोस. महिने मोजत राहातोस. तू वर्षं मोजत राहातोस. वेळ कसा जाईल हे पाहातोस. अरे, काळ आपल्या गतीने जात असतो. त्याचा एक मार्ग असतो. तू त्याच्या आड येतोयस. इन्टरफिअर करतोयस त्याच्या कामात. एक दोन कुत्री भावेकाकांच्या बाजूला येऊन बसली. जणू काही आता एक मोठं भाषण होणार आहे आणि त्यांना ते ऐकायचं आहे. नंतर मग बरीच कुत्री येऊन बसली. एक दोन कुत्र्यांमध्ये भांडण झालं किरकोळ.''

भावेकाका म्हणाले, ''तो काळा कुत्रा आहे ना दुसऱ्याला म्हणत होता, जरा तिकडं सरक ना. जागेवरून त्यांची भांडणं चाललीयत.'' एक दोन गाई लांबवरूनच हंबरत आल्या.

भावे जोरात ओरडून त्यांना म्हणाले, ''या, या सावकाश. थांबतो मी.'' सकाळचे दहा वाजले होते.

जयंता म्हणाला, ''ही वेळच आहे काकांच्या प्रवचनाची.'' त्या गाई आल्या.

कान उघडे करून बसल्या.'' काय रे, तुझं नाव काय?''

तो म्हणाला, ''विकर्ण.''

''मला सांग विकर्ण, आता तुझ्या मनात काय?''

विकर्ण म्हणाला, ''अगदी काहीही नाहीय.''

''आत्महत्या वगैरे?''

''नाही नाहीय तसं मनात.''

''पण मग असं का?'' भावेंनी जोरात विचारलं.

विकर्ण म्हणाला, ''माझ्या समोरचा आजचा दिवस मला नवीन वाटतोय म्हणून.''

एक कुत्रा म्हणाला, ''अरे आमच्या आयुष्यात रोज नवीन दिवस दिसतो तो भावेकाकांमुळे.''

लांबून गायींनी दुजोरा दिला. विकर्ण चकित झाला. त्याला कुत्र्यांचं बोलणं समजत होतं.

भावेकाका म्हणाले, ''हे जे प्राणी असतात ना त्यांच्या शुद्धतेला आपण गेलं की त्यांच्याशी अनुसंधान साधलं जातं आपोआप. तू आता त्यांच्या शुद्धतेच्या लेव्हलला आला आहेस.'' विकर्णनं एका कुत्र्याला विचारलं की तुमच्या मनात पण येतो का आत्महत्येचा विचार?

सगळी कुत्री हसायला लागली. त्या गायी तर एवढ्या जोरात हसल्या. कुत्र्यांचा लीडर वाटेल असा एक कुत्रा म्हणाला, ''काका, आपली पहिली भेट कुठं झाली सांगा ह्याला?''

काका पण हसले नि म्हणाले, ''ते शेवटी सांगू. आधी याची आपण उलट तपासणी घेऊ.''

''नाव काय तुझं?''

तो म्हणाला, ''विकर्ण''. ''अरे वा! आईबापानं चांगलं नाव ठेवलं आहे तुझं. हे नाव आईच्या पसंतीचं की बापाच्या?''

''आईच्या.''

''आई काय करते?''

''प्रोफेसर आहे.''

''कुठल्या विषयाची?''

''मराठी.''

''अरे, अजून मराठी भाषा जिवंत आहे वाटतं?'' असं म्हणून भावे काका मिस्किल हसले.

''कुठं राहातोस कुठं तू?''

''कुंभकर्ण लॉजमध्ये.''

''कुंभकर्ण?''

''हे असं कसं नाव लॉजचं?''

काकांनी चकित होऊन विचारलं. ''काय नाय हो. तिथं ना, म्हणजे तिथल्या रुम्स ना अशा आहेत की घनघोर झोप

लागते म्हणून पोरांनी चेष्टेत त्या लॉजचं नाव हे ठेवलंय. बरं, तुझं नाव विकर्ण, बरोबर. माहितीय का तुला तो कोण होता ते?''

एक कुत्रा पट्कन म्हणाला, ''तो एक कौरव होता.''

''येस. बरोब्बर.''

विकर्ण म्हणाला की, ''तो द्रौपदी वस्त्रहरणाच्या विरुद्ध होता. त्याला आपल्या भावांचं ते वागणं पसंत नव्हतं.''

''राईट यू आर. बरं म्हणजे तू इथं शिकायला आला आहेस तर. मग आईवडिल कुठं असतात?''

''रत्नागिरीला.''

''तुला का नाही जगावसं वाटत? खरं कारण सांग. मघा जे तू जे कारण बोललास ते खोटं होतं. हो ना? अरे रिपिटिशन सगळ्यांच्याच आयुष्यात आहे. तेव्हा मोकळेपणानं बोल.''

''मला एका मुलीनं डिच केलं. ओके, पण का? एकदा तिला लॉजवर घेऊन आलो होतो. पण मला जमलं नाही. आधीच झालं सगळं. कंडोम लावायच्या आधीच. तर मी खूप नर्व्हस झालो.''

ते पाहून ती म्हणाली, ''अरे होतं असं पहिल्यांदा. जमेल पुढे. तर मी तिला विचारलं तुला कसं माहीत? माझ्या या प्रश्नात संशय होता. कबूल करतो प्रामाणिकपणे.''

तर ती रागावली म्हणाली, ''माझ्यावर तू संशय घेतोस? तू आयुष्यभर संशय घेत राहाशील.''

सगळी कुत्री आपापसात कुबुजायला लागली. असं कसं घडलं पण वगैरे. आपल्यात तर नाही असं काही घडत वगैरे. एक थोराड कुत्रा म्हणाला, ''अरे त्यावेळेस आपलं मन त्या क्रियेतून काढून घ्यायचं.''

भावेकाका त्या थोराड कुत्र्याला म्हणाले, ''च्यायला तुमचं मन आणि आमचं मन ह्यात फरक आहे. तुमचा देह हेच मन असेल कदाचित.''

एक कुत्री म्हणाली, ''आमच्यात बाबा हे संशय वगैरे काही नाही. आणि कुणीही कुणाला एका क्षणात लागू होतं. आमचं तसं नाही.''

''आमच्यासाठी बैल शोधला जातो. तो दरवेळी वेगळा असू शकतो. आमचा सेक्स दावणीला बांधलेला.'' गाय जवळ येऊन म्हणाली.

सेक्स हा विषय सगळ्यांच्याच आवडीचा असतो, त्यातून गाय कशी सुटेल? एक कुत्रा म्हणाला, ''आमच्यातल्या पाळलेल्या कुत्र्यांचंही असंच असतं. कुत्रीसाठी कुणाचा तरी कुत्रा शोधला जातो.''

एक कुत्रा म्हणाला, ''नीटनेटक्या घरात राहणारी, सुसंस्कृत आणि सभ्य माणसं ही पण पाळलेली म्हणायची. लग्न वगैरे करणारी रीतसर.''

नंतर तो जोरजोरात हसला. दुसरा कुत्रा बोलला, ''रस्त्यावर राहणारी, झोपडपट्टीत राहणारी गरीब माणसं ह्यांना काय म्हणायचं मग?''

भावेकाका म्हणाले, ''पण ती मुलगी म्हणाली ते खरंय. जमेल तुला पुढं आणि तू खरंतर तिचं बोलणं संशयास्पद वाटलं म्हणून डाऊन झालायस तू. कबूल कर स्वत:शी. तू आमची भक्ती कर.'' एक कुत्रा त्याला खिजवत म्हणाला.

''तुझा डाऊननेस जाईल.''

विकर्ण भडकला. त्यानं त्या कुत्र्याला शिवी घातली. तर कुत्रा म्हणाला, ''डॉग गुगल कर. In ancient Mesopotamia, from the old Babylonian period until the Neo-Babylonian, dogs were the symbol of Ninisina, the goddess of healing and medicine and her worshippers frequently dedicated small models of seated dogs to her. In the Neo-ssyrian and Neo-Babylonian periods, dogs were used as emblems of magical protection. हे मिथ्समध्ये सापडेल तुला.''

विकर्ण म्हणाला, ''अरे, म्हणजे ही एक कथाच आहे ना. खरं नाहीय. दंतकथा वगैरे.''

''मग तू काय आत्महत्या वगैरे करणार होतास की काय?'' भावेकाकांनी विचारलं.

एका कुत्र्याने दुसऱ्या कुत्र्याला विचारलं ''आत्महत्या म्हणजे काय रे?''

''अरे गप बस. त्यांच्यात म्हणजे माणसात करतात आत्म हत्या.''

विकर्ण म्हणाला, ''हो. मग केली नाहीस ती. नंतर घाबरलो'', विकर्ण म्हणाला. भावेकाका थोडावेळ गप्प झाले. त्यांनी परत विचारलं की करायचीय का आत्महत्या तुला? आपल्याकडे एक माणूस आहे. तो आत्महत्या अरेंज करतो. कांडपिळे आडनावाचा एक माणूस आहे. पैसे घेतो पण. एका आत्महत्येचे काही लाख घेतो तो. परत ही पण व्यवस्था करतो की ती आत्महत्या, आत्महत्या वाटणार नाही. आता ही व्यवस्था करताना तो पोलिस आणि डॉक्टरलाही पैसे खाऊ घालतो. ती एक टीमच आहे. इव्हन तो ना, हे पण काम करतो. म्हणजे ते सगळे मिळून करतात. कुणी आत्महत्या केली तर नंतर चौकशीचा झमेला नको म्हणून नॅचरल डेथ म्हणून सिद्ध करून देते कांडपिळेची टीम. कांडपिळे एका हॉटेलमध्ये मॅनेजर आहे. लॉजिंग बोर्डिंगवालं हॉटेल आहे. परवाच त्याच्या हॉटेलमध्ये एका मुलानं आत्महत्या केली. त्यानं एका मुलीच्या नावानं चिठ्ठी लिहून ठेवली होती. गावडे कॉन्स्टेबलने मुलीची माहिती काढली तर ती बिचारी १७-१८ वर्षांची होती. पुढं त्या मुलीली त्रास नको म्हणून गावडे, इन्स्पेक्टर शिंदे नि डॉक्टर गायतोंडे ह्यानी सगळ्यांनी मिळून त्या मुलाचा नॅचरलं डेथ ठरवला. देवमाणसंच आहेत ती. एक सोशल वर्क म्हणून हे असं काम करतात ते, पण पैसे उकळतात पार्टीकडून. त्या मुलीकडून त्यांनी पैसे घेतले. नि मुलाच्या आईवडिलांकडून पण घेतले. ते कुठे मद्रासजवळ

राहणारे होते. मुलगा तर गेला होता. पुढे त्यांना झंजट नको होती. '

'अरे, विकर्ण, उघड्या डोळ्यांनी जग. हे असलं खूप नवीन जग सापडेल तुला.''

स्वत:साठी परत एक सिगारेट घ्यायला तो टपरीवर गेला. सिगारेट देताना जयंता म्हणाला, ''काकांच्या जावयानं पण आत्महत्या केली. काकांच्या मुलीचं लफडं होतं दुसऱ्या कुणाशी. ते जावयाला कळलं. तो उध्वस्त झाला. केली आत्म हत्या. काका तेव्हापासूनच असे इकडं राहायला लागले.''

''हो हो, माझ्या जावयानं आत्महत्या केली. तो खूप चांगला होता. तो मेल्याचं मला खूप वाईट वाटलं. मुलीचा राग आला. तर एकदम मला कळून आलं की हे घर वगैरे सगळं झूट आहे.नातं वगैरे पण झूट आहे. आपल्याच घरातली माणसं घराबाहेर जास्त जगत असतात. त्याना घरापेक्षा बाहेर जास्त मोकळं नि ऐसपैस वाटतं. मग मला सगळेच संशय यायला लागले. अरे, म्हणजे ही एक विकृतीच म्हण ना! मला माझ्या बायकोचा, मुलाचा त्याच्या बायकोचा सगळ्यांचा संशय यायला लागला. मला बाप मानणारी मुलं माझीच कशावरून? असा एक संशय बळावला. आता ह्यावर उपाय काय? रात्र-रात्र झोप येईना. मग मी सरळ माझ्या जगण्यातून अंग काढून घेतलं. माझं जगणं चालूय पण त्यात मी नाहीय. त्यात मी नसल्यामुळे माझ्या नात्याची कुठलीच माणसं माझ्या जगण्यात नाहीयत.

थोडावेळ शांतता पसरली. कुणीच बोलेना. कुत्री मात्र आपापसात कुजबुजायला लागली. त्यांना बहुतेक काकांविषयीची ही माहिती नवीन असावी. एक कुत्रं हळूच बोललं, ''पण काका आमच्या समाजात तर असली काही नातीच नाहीयत. मुलगा पण आईबरोबर संग करतोय.''

काका म्हणाले, ''तुमचा समाज म्हणालास तू. पण आमच्या समाजात जसे नियम आहेत नि रितभात आहे जगण्याची, ज्यात नैतिक-अनैतिक सगळं आलं ते नियम जगताना पाळावे लागतात. तसे नियम तुमच्या समाजात नाहीयत.

एक गाय म्हणाली, ''आमच्यात पैश्याची भानगड नाहीय ही सगळ्यात मोठी गोष्ट आहे. आणि आपापसातल्या नात्याचा कारभार स्वच्छ आहे.''

''काका, मला ना प्रश्न पडत राहतात सारखे. तुमची माझी ही अचानक भेट ही का? ह्या घटनेच्या मुळांशी जाण्याचा प्रयत्न करतो मी. तर ती विघटना होते. त्या घटनेतली एकसंधता निघून जाते. तुम्ही कोण? नुसत्या नावानं सांगायचं तर भावे काका. जयंतानं तुमच्या कुटुंबाविषयी माहिती सांगेस्तोवर मी वेगळ्या नजरेनं पाहात होतो तुमच्याकडे. कुणा वेड्याकडे पाहावं तसं. नंतर मी वेगळ्या नजरेनं पाहायला लागलो तुमच्याकडे. आता ह्यात एक लिंक आहे पण माझ्या वागण्यात एक असंगतता आहे. कुठलीही गोष्ट तर्कात बसवायला मला पार्श्वभूमी लागते. या कुत्र्यांचं बोलणं मला कसं समजायला लागलं, हा प्रश्न मला पडायलाच नको. पशुप्राण्यांची भाषा सर्वांना समजली पाहिजे खरं तर.''

तो थोराड कुत्रा म्हणाला, ''आम्हाला नावं नाहीयत. त्यामुळे आम्हाला मी किंवा तुम्ही म्हणता, तो इगो नाहीय. कळतंय का मी काय म्हणतो ते? तुला जगावसं वाटत नाही ह्या तुझ्या भावनेनं तुला मोकळं केलं तुझ्या मी मधून. आणि तू आमच्या लेव्हलला आलास. काय काका, मी म्हणतोय ते बरोबर आहे ना?

काही अंशी बरोबर आहे. पण फार पुढचा विषय बोलतोयस तू. तत्त्वज्ञानच एक. एक गोष्ट सांगतो. संत तुकाराम एकदा आपल्याच तंद्रीत शेताच्या बांधावरून चालले होते. चालता-चालता एका क्षणी शेतात बसलेला चिमण्यांचा एक थवा एकदम उडून गेला. तुकाराम थांबले. विचारात पडले. आपल्याला घाबरून चिमण्या उडून गेल्या असे त्यांना वाटले. तशी त्यांची खात्री झाली. चिमण्यांना भीती वाटावी असे आपल्यात काय आहे, असा प्रश्न त्यांना पडला. जोवर त्या भितीचे कारण लक्षात येत नाही आणि त्याचे निराकरण होत नाही, तोवर तेथून हलायचे नाही असे त्यांनी ठरवले. काहीही हालचाल न करता मग ते तिथेच उभे राहिले. काही वेळाने चिमण्या पुन्हा परतल्या. चिवचिवाट करू लागल्या, तुकाराम ांच्या आसपास निर्भयपणे वावरू लागल्या.''

गाय म्हणाली, ''ज्ञानेश्वरांनी पसायदानात 'जे खळांची व्यंकटी सांडो' असं म्हटलंय. म्हणजे माणसातला दुष्टपणा नाहीसा होवो. माणसात खरंतर चांगुलपणा ओतप्रोत भरलेला असतो, पण दुष्टपणा त्याला सोडत नाही. हा दुष्टपणा पूर्णपणे नाहीसा झाला तर माझं हंबरणं ओळखशील तू. फुलपाखराच्या पंखांची थरथरही तुझ्या काळजात कायमची ठेवू शकतोस. तुकारामांनी ती चिमण्यांची थरथर अनुभवली आणि चिमण्या परत आल्या. 'सर्वेपि सुखिनः संतु' यातल्या सर्वे'मध्ये माणसाबरोबरच पशु-पक्षी, कीटक-पतंग, झाडं, नद्या, झरे, पहाड या सगळ्या जीवसृष्टीचा समावेश आहे.''

''मघाशी काय शब्द वापरला तू?'' काकांनी विचारलं.
''असंगतता असा काही तरी. म्हणजे संगती न लागणारं ना? तर अरे वेड्या समजायला सर्वात सोपी गोष्ट आहे ही जगण्यातली असंगतता. पण ती तू नुसती हातात घेऊन बसलास तर समजणार नसते. ती जागच्या जागी ठेवून तिला पाहिलीस तरच ती सोपी होते.''

''तुझा जन्म कशासाठी झाला तर पुढे मरण्यासाठी. केवढी मोठी असंगतता आहे ही.'' एक कुत्री बोलली.

''हा प्रश्न तर माझ्या डोक्यात सतत असतो. त्याबरोबर मग ते सारे क्लिशे प्रश्नही रांग लावतात. मी कोण? माझं काय काम या जगात? माझ्या आयुष्याचा हेतू काय? लवडा नि लसूण. काय झालंय की ही भाषा पण एवढी परिचित झाली आहे की या प्रश्नातले मला नुसते शब्दच दिसतात. रोज दिवस उगवतो.

मावळतो. ह्या दरम्यान खूप घटना घडतात. पण मला फक्त उगवणारा मावळणारा सूर्य नि उगवणारा मावळणारा चंद्र एवढंच दिसतं.''

गाय म्हणाली, ''नाही जाणवल्या, कळल्या दिवसभरातल्या घटना तर त्यानं काय बिघडतं?''

''मला ना भाषा टाकून द्यायचीय. ती राडा करते डोक्यात. ती सारखी चक्राकार फिरत राहते मनात. आता समजा बुद्धी हा शब्द आहे. हा राडा करतो माझ्या डोक्यात. बुद्धी वापरायची म्हणजे काय? वापरायची म्हणजे? ती बुद्धी असते कुठे? मन आणि बुद्धी एक की वेगवेगळे? एखादा माणूस दुसऱ्या कुणाचा खून करतो. त्या खुनाचं तो त्याची बुद्धी वापरून समर्थन करू शकतो. कोर्ट म्हणजे काय तर बुद्धीने वापरलेली स्वार्थी भाषा. मला वाटतं की आपण खरंतर एकच पाप केलंय. ते आदम इव्हने सफरचंद खाण्याचं आणि आयुष्यभर आपण जगण्याचे कायदे सहन करत बसतो. म्हणजे जन्म हा गुन्हा झाला आणि जगणं ही शिक्षा.''

थोराड कुत्रा म्हणाला, ''हे असं सगळं आमच्या मनात काहीही येत नाही. आम्हाला बुद्धीच नाहीय. काका म्हणतात, आम्हाला मन नाहीय. पण ते आहे.'' काका एकदम शरमिंदे होऊन म्हणाले, ''अरे, म्हणजे तुम्हाला असलेलं मन माणसासारखं नसतं रे. तुमचं मन वेगळं. तसं झाडापेडांना पण मन असतं.''

परत एकदा दीर्घ शांतता पसरली. कुत्री चुळबुळू लागली. गाया त्यांच्या जागी निघून गेल्या. तो थोराड कुत्रा म्हणाला, ''आम्ही निघतो आता. रात्र होत आलीय. हल्ली ते नेपाळी हिंडतात कुत्र्यांची पिल्लं शोधायला आणि त्यांच्या चायनीज गाडीवर चिकन म्हणून की मटण म्हणून आमची पिल्लं वापरतात.'' काका म्हणाले, ''हां आज जरा जास्त थांबलात तुम्ही. निघा.''

सर्व कुत्री निघून गेली. भावेकाका, विकर्ण नि जयंता एवढेच लोक राहिले तिथं. विकर्ण परत एक सिगारेट घ्यायला गेला. तो खूप अस्वस्थ होता. त्यानं काकांनाही विचारलं, ''सिगारेट हवी का?'' काका ''नको'' म्हणाले.

जयंता हळूच बोलला, ''अरे ह्या म्हाताऱ्याच्या नादी लागशील तर येडा होशील. कुत्री काय जमवतो, त्या गायांना काय बोलवतो. आणि त्यांच्याशी काय बोलतो, मला तर झ्याट कळत नाही त्याचं बोलणं.''

सिगारेट पेटवून विकर्ण काकांपाशी आला. काकांनी त्याला एकदम एक प्रश्न विचारला, ''समजा, तू मेलास. आत्महत्या केलीस तर मेल्यानंतर तू काय काम करशील?'' विकर्ण एकदम चमकला. ''काका मेल्यानंतर काय ते कुणाला माहिती आहे. आणि माझ्या हातात काय राहणार आहे? मला तेव्हा काळ पण नसेल.'' काका म्हणाले, ''मेल्यानंतर तू काही करू शकणार नाहीस तर तू का मरतोयस?'' विकर्ण आणखी चमकला. ''अरे, जगलास तर समाजासाठी काही काम नाही केलंस तरी निदान श्वास घेण्याचं काम तरी करशील. त्याला कुठले प्रयास लागत नाहीत. श्वास घेण्याचं काम मात्र जागरुकतेनं कर.'' विकर्ण म्हणाला, ''तेच श्वास घेणं तर सहजच होत असतं ना काम? त्यात काय एवढं.

काका म्हणाले, ''सध्या श्वास तू अजाणतेपणानं घेतोयस. जाणतेपणानं विचारपूर्वक घे. आणि त्या श्वासाच्या अस्तित्वाचं भान ठेव. तुझी नित्यकर्म करतानाही त्या श्वासावर लक्ष ठेव. तू करीत असलेल्या नित्यकर्मांपेक्षा तू तुझ्या श्वासाला महत्त्व दिलंस तर तुला तुझी नित्यकर्म त्रास देणार नाहीत.''

विकर्ण गप्प झाला. खूप वेळानंतर बोलला, ''मी निघतो काका आता. जेवण मिळणार नाही उशीर झाला तर.'' ''हां, जा बेटा. पण एक लक्षात ठेव, मी जे काही बोललो त्यावर चिंतन कर. जमीर जिंदा रख, कबीर जिंदा रख, सुल्तान भी बन जाएं तो, दिलमें फकिर रख.'' हे बोलून काका एवढ्या मोठ्या आवाजात हसले की चहूबाजूंनी कुत्र्यांचा गायी बैल म्हशी डुकरं सर्वांचा एकत्र घोष ऐकू आला. जमीर जिंदा रख वगैरे. विकर्ण म्हणाला, ''काका बरं वाटलं तुमच्याशी बोलून. उद्या येतो.'' ''हां, ये ये. उद्या तुला एक गोष्ट सांगतो. ते माझं तुझ्याशी शेवटचं बोलणं असेल. मग तू इथं यायचं नाहीस. जयंता बोलला ना तुला ह्या म्हाताऱ्याबरोबर जास्त राहू नकोस वगैरे. येडा होशील. पण खरंतरं वेडं व्हायला हवं. मलाही वेडं नाही होता आलं. चल निघ. उद्या ये संध्याकाळी.''

***

विकर्ण झोपला, तो उद्याची वाट पाहात. काकांशी बोलताना नवीन काही निर्माण होत होतं. त्याचं त्याला आकर्षण वाटत होतं. कॉलेजला जायचं नाही, असं ठरवूनच तो काकांना भेटायला खूप सकाळी निघाला. बाहेर टपरीवरच चहा घेतला. परत लॉजवर गेला. संडास आंघोळ वगैरे आटपून जयंताच्या टपरीच्या दिशेने चालायला लागला. सूर्य नव्हताच उगवला. थोडं-थोडं फटफटायला लागलं होतं. जयंताची टपरी बंद होती. टपरीच्या बाजूला मुटकुळं करून काका झोपले होते. एका सतरंजीवर. आणि अंगावर एक सोलापुरी चादर होती. विकर्ण एकदम स्तब्ध झाला. त्यानं फक्त स्वतःचा विचार केला होता. काकांचा नाही. काका गाढ झोपले होते. तो तिथंच उभा राहिला. सिगारेटची तल्लफ आली होती पण दुकानं अजून उघडायची होती. त्याच्या मनात आलं की लवकर उठलं की छान वाटतं. बरं वाटतं. तेवढ्यात टपरीमागून एक मध्यमवयीन बाई आली. तिनं काकांना उठवलं. काका उठले. बाजूलाच त्यांची पाण्याची बाटली होती. त्यातल्या पाण्यानं त्यांनी खळबळून चूळ भरली. डोळ्यावर पाणी मारलं आणि वर पाहिलं तर विकर्ण दिसला. ''अरे तू? आणि एवढ्या लवकर? जयंताच्या दुकानाच्या फळकुटावर बस.'' त्या बाई परत आल्या. काकांसाठी चहा घेऊन.

काका त्या बाईंना म्हणाले, ''उरलाय का एखादा कप चहा? विकर्ण घेशील ना चहा?'' विकर्ण 'हो' म्हणाला. बाई प्रेमळ वाटल्या. काकांशी अगदी अदबीनं वागत होत्या. त्या म्हणाल्या, ''आहे, आहे घरात बराच चहा. आणते. त्या बाई विकर्णकडे पाहून बारीकसं हसल्या नि गेल्या. लगेचंच आल्या चहा घेऊन. दोघं चहा घेऊ लागले. एकदम काका म्हणाले की विकर्ण मला ना नेहमी वाटतं की प्रत्येक दिवस पहिला असतो. म्हणजे असं म्हण की विश्व निर्माण झाल्यानंतरचा पहिला. का विचार.''

विकर्णने काकांना विचारलं, ''का?''

काका हसले नि म्हणाले की, ''दुसरा सूर्य नसतो म्हणून. माझा रोजचा श्रोतृसमुदाय एवढ्या लवकर येणं शक्य नाही. तर तुला गोष्ट सांगून टाकतो. माझ्याही मनात एकदा आत्महत्येचा विचार आला होता. काळ आणि अवकाश हे एकमेकांना लगटूनच असतात. म्हणून त्याला मी कालावकाश म्हणतो. आपण म्हणजे माणूस, खरंतर एक वस्तू आहोत. पदार्थ आहोत. आपण म्हणजे पदार्थ, त्यानं कुठं असावं किंवा कुठं नसावं हे कालावकाश ठरवतं. कधी कधी कालावकाशाला आपण वाकवायचं ठरवतो. कुणाला जमतं कुणाला नाही. आणि हे जे वैश्विक नाटक असतं ना त्या नाटकाच्या सादरीकरणात सर्वजण नट असतात. प्रेक्षक कुणी नसतंच. हे सगळं घडत असतं मनात. परत गंमत म्हणजे असे समोर प्रेक्षक बसले आहेत नि कलाकार मंचावर आहेत अशी विभाजक रेषाच नसते. म्हणजे रंगमंचच नसतो. आपल्या मनाचा रंगमंच हा स्वत:च कलाकार म्हणून मी म्हटलं त्या नाटकात सहभागी होतो. मनात असं वैश्विक नाटक घडत असतं. आत्महत्येचा विचार ही गोष्ट या नाटकाचाच भाग असतो. त्या विचाराला काळाचं नकारात्मक परिमाण असतं. अर्थात अवकाशही नाकारण्याचा भाग झाला हा. पण हे कालावकाश अश्यावेळी काय करतं? तर त्याची गोष्ट ऐक. ते शास्त्रज्ञ लोक काही वेगळं सांगत असतील. पण ही घडलेली गोष्ट मला वेगळं सांगून गेली.

माझ्या मनात आत्महत्या कशी करायची हे सुरू झालं आणि ठरलं की रेल्वेरुळावर झोपायचं अमुक एक गाडी यायच्या आधी पाच मिनिटं. मी गेलो रेल्वेरुळावर. एक सुपरफास्ट गाडी येण्याची वेळ साधून. मला मरायचं होतं ते का माहितीय? का तर मला वाटत होतं जगातला प्रत्येक जण एक बाजू घेऊन जगतोय. मी कुठली एक बाजू घेऊ शकत नव्हतो. मला वैचारिक व्हायचं नव्हतं. उदाहरणार्थ माझ्या मनात विचार आला. माणसं एकत्र येतात, समूह होतात, झुंड होतात, हिंसक लवकर होतात. तर मी लागलीच दुसऱ्या बाजूने विचार करायला लागलो की माणसं एकत्र येतात, समूह होतात, झुंड होतात, तर एकत्र येऊन ते नवनिर्माण का नाही करू शकत? मग मला स्वत:कडूनच उत्तर आलं, आहेत की अशी माणसं. धार्मिक. धर्माच्या नावाखाली एकत्र आलेली. झुंड झालेली. मग धर्म ही संकल्पना खरी की खोटी? का गरज असते लोकांना या धर्माची? आणि धर्मवाले धर्म ही एकच बाजू लावून धरतात. बाकीचं फेटाळून लावतात. मी असा जास्तीत जास्त वैचारिक होत चाललो होतो म्हणून मला मरायचं होतं. गाडीची वाट पहात मी रुळावर पडून राहिलो. माझ्या बाजूलाच रुळांच्या बाहेर एक कुत्रा उभा होता. गाडी यायची वेळ होऊन गेली. वर एक तास झाला. मग मात्र मी उठलो. मरायची वाट पाहण्याचा मला कंटाळा आला. चक्क कंटाळा. गाडी येते त्या दिशेने मी चालू लागलो. रुळांतून. माझ्या मागोमाग तो कुत्राही. एक स्टेशन लागलं. तिथं मी त्या सुपरफास्ट गाडी संदर्भात विचारलं तर मला कळलं की गाडी मागेच थांबली आहे कुठंतरी. कुणीतरी जीव दिलाय तिच्याखाली. बॉडी काढणं वगैरे सोपस्कार पूर्ण झाले की गाडी येईल. हे कळलं नि माझी वैचारिकता नष्ट झाली. काय च्युतियागिरी आहे आपली? आपण पण एक बाजू घेतली होती, मरणाची. जन्म विसरून गेलो होतो. जन्म नि मरण एकत्र पाहायला हवं. यापुढे तसं पाहण्याचा प्रयत्न करत राहायचा. तुकाराम बुवांचा एकविध भाव हाच असावा. मी अतीव प्रेमानं त्या कुत्र्याला जवळ घेतलं, आंजारलं गोंजारलं. त्याला कडेवर घेऊन, विठ्ठल-विठ्ठल करीत मी घरी परतलो. तो कुत्रा म्हणजे काल जमली होती ना कुत्री त्यातला तो थोराड कुत्रा. त्या कुत्र्यांचा लीडर वाटत होता तो.''

मग काका म्हणाले, ''झाली गोष्ट विकर्ण. जा आता तू ही गोष्ट घेऊन. हिचा एखाद्या धर्मासारखा प्रसार कर. वाचकहो, तुम्हाला ही गोष्ट पूर्ण वाटली तर लेखकाचा दोष आहे. ह्यातल्या पात्रांचा नाही. आणि काय करा तुम्ही की, ही गोष्ट लिहिणारा लेखक आणि वाचक ह्या मधली रेषा पुसून टाका. म्हणजे तुम्ही एकविध व्हाल. एकविध झालात की तुम्ही स्वत: ह्या गोष्टीत सामील व्हाल. आणि गोष्ट पुढे न्याल.''

विकर्ण निघाला. तोपर्यंत जयंताचं दुकान उघडलं होतं. त्यानं त्याची गोल्डफ्लेक घेतली. काकांची ब्रिस्टॉल घेतली. मग ती लगेच परत केली नि जयंताला म्हणाला, ''एक नको. ब्रिस्टॉलचं एक पाकिटच दे.'' स्वत:ची सिगारेट पेटवली. काकांपुढे पाकिट सरसावलं.


काकांनी त्यातली एक सिगारेट घेतली. विकर्णने ती पेटवली. हळूच पाकिटही काकांना दिलं. आणि तो निघाला. एका नव्या दुनियेत. काका ओरडले, ''जमीर जिंदा रख, कबीर जिंदा रख, सुल्तान भी बन जाएं तो, दिलमें फकिर रख.'' आणि मग गडगडाटी हसले.

**– रवीन्द्र दामोदर लाखे**
भ्रमणध्वनी : ९८६९३९६३६९
lakheravindra@gmail.com

डॉ. अजित मगदूम

# स्त्रीवाद आणि ज्यून एरिक

**स्त्रीवादी संघटना आपला मूळ पिंड विसरून अभिजनवादी सोवळेपण कसे अंगिकारते यावर बोट ठेवत विविध स्त्रीवादी भूमिकांचा वेधक धांडोळा ज्यून एरिक या बंडखोर तरुणीनं आपल्या पुस्तकाच्या विवेकपूर्ण, सकस प्रस्तावनेत घेतला आहे. तिचा हा स्वैरानुवाद.**




मला जेव्हा लिंगभेदभाव वगैरे शब्दही माहीत नव्हते तेव्हा लहानपणी माझ्या घरात आणि बाहेर अनेक गोष्टी घडताना मी पहिल्या होत्या. लागोस, नायजेरियामध्ये माझ्या बालपणी बातम्यांमध्ये पुरुषांची बायकांना होणारी मारझोड मी पाहायची आणि माझ्या आजूबाजूचे लोक तिची तीच लायकी आहे, असं म्हणायचे. पुरुष जेव्हा तरण्या मुलींकडे वाईट नजरेने पाहायचे, तेव्हा वयस्कर बाया खांदे उडवीत 'दुर्दैवी' म्हणत असल्याचं मी ऐकलं आहे. मी आईला याविषयी विचारायचे, तेव्हा ती दुर्लक्ष करून विषय बदलायची आणि म्हणायची, ''मला नको ते प्रश्न विचारू नकोस असं तुझं वागणं असेल तर तुला माझ्या नवऱ्याच्या घरी सोडते.'' ''माझं घर का नाही म्हणत? सारखं त्याचं घर, हे काय? कारण बाई म्हणून जन्माला आलं की नावावर प्रॉपर्टी करता येत नाही.'' मी ताड्‌कन म्हणाले.

''तोंड बंद कर. तुला झालंय तरी काय गं? अशानं तुला नवरा तरी मिळेल का? चालती हो इथनं.'' ती चिडून म्हणायची.

माझ्या नायजेरियातील घरात मुलींनी कसं वागावं याचे काही नियम होते. आई म्हणायची, ''चांगल्या मुली केवळ ऐकिवात नसतात, तर प्रत्यक्षात दिसतात. चांगल्या मुलींना पुढे पत्नी, आई व्हायचं असतं. चांगल्या मुली आपल्या नवऱ्यांशी जुळवून घेतात, आपला आवाज कधीच काढत नाहीत. चांगल्या मुली मांडी घालून बसतात, लांब स्कर्ट घालतात, प्रार्थना करतात, चर्चमध्ये क्रियाशील असतात, आवाज वाढवून आगाऊपणा करत नाहीत, आपली मतं आपल्याजवळच ठेवतील, मुलाकडे न पाहता शाळेत लक्ष केंद्रित करतील आणि चांगल्या मुली कधीच बंड करत नाहीत.''

मी खूप काळ चांगली मुलगी होण्याचा प्रयत्न करीत होते. मी एक आदर्शवत् विद्यार्थिनी आणि रविवारच्या शाळेत क्रियाशील होते.वयाच्या दहाव्या वर्षी मी जेव्हा नायजेरियाहून इंग्लंडमधील बोर्डिंग स्कूलमध्ये दाखल झाले, तेव्हा माझ्यासमोर पारंपरिक मुलगी आणि स्त्रीचाच आदर्श होता. मी चौदा वर्षांची असताना लागोसमधील आमच्या चर्चमध्ये ख्रिसमसच्या वेळी गेले असताना तरुण पास्तरनी मला सर्वांसमोर उभे करून सांगितले की ही मुलगी चर्चमधील सर्व स्त्रियांसाठी एक रोल मॉडेल आहे. ते माझ्याबद्दल असं का बोलले ते मला माहीत होतं. मी मुलांशी कधी बोलले नाही, बायबलमधल्या रचना मला तोंडपाठ होत्या, गर्भपाताविरुद्ध मी प्रचार केला होता. मी (योनी) शुद्धता अंगठी घातली होती म्हणजेच मी माझ्या नवऱ्यासाठी शुचिर्भूत राहिले होते. (नव्वदीच्या दशकात अमेरिकेत कुमारिकांनी योनिशुचिता वचन म्हणून एक चांदीची अंगठी (Purity ring) परिधान करण्याची प्रथा मूळ धरू लागली. अर्थात काही धार्मिक आणि राजकीय शक्तींचं पाठबळ यामागे होतंच.)

पुढील सहा महिन्यातच मी माझी शुद्धता अंगठी कचरापेटीत टाकली होती, प्रार्थना करणं बंद केलं होत आणि गर्भपात हा बाईच्या निवडीचा विषय असल्याचं मी मानू लागले. पेन्टेकोस्टल चर्चमध्ये बिंबवलेला समलिंगींबद्दलचा दुजाभाव डोक्यातून काढून टाकला. त्यांनाही लग्नाचा अधिकार असल्याचं मी माझ्या वडिलांना ठासून सांगितले. हे सारं कुठून आलं? स्त्रीवाद. विशेषतः मेरी वोल्स्टनक्राफ्टचं 'अ विंडिकेशन ऑफ द राईट्स ऑफ वुमन' हे पुस्तक जे मला शाळेत शिक्षिकेनं दिलं होतं आणि त्यानंतर नोमी वुल्फचं 'द ब्युटी मिथ' जे मी विकत घेतलं होतं. वयाच्या पंधराव्या वर्षी ही पुस्तकं वाचताना सारं माझ्या डोक्यावरून जात होतं, पण त्यातला स्त्रीवाद सुबोध आणि आवाहक वाटला.

स्त्रियांना सामना करावा लागणारा जुलूम संपवण्यासाठीचा हा संघर्ष.

तोवर मला स्त्रीवादाच्या मुख्य प्रवाहाने अनेक अंगाने सीमारेषेबाहेरील स्त्रियांना वगळलं आहे याची जाणीव झाली नव्हती. एकविसाव्या शतकातही स्त्रीवादी महिला अशा अनेक प्रश्नांवर लढा देत आहेत याचीही समज मला आली नव्हती. मला एवढंच समजलं होतं की अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी स्त्रीवाद हे एक अतिशय प्रभावी हत्यार मला आणि इतर स्त्रियांना उपलब्ध आहे आणि म्हणून मी स्वतःला स्त्रीवादी म्हणू लागले. घरात, मित्रांच्यात, लोकांच्यात आणि चर्चमध्येही!

पुढील ख्रिसमसला जेव्हा आम्ही लागोसमधील चर्चमध्ये गेलो, त्यावेळी एक युवा नेता मला छेडत म्हणाली, ''तू स्त्रीवाद वगैरे जे काही करते आहेस, ते इथं आम्ही करत नाही.'' मी छद्मी हसले आणि म्हणाले, ''माफ करा, मी जाईन तिथे हे करते आहे.''

मी सोळाव्या वर्षी स्त्रीवादी विचारानं भारले होते आणि त्याविषयीच्या मीडियातील तसेच ऑनलाईन चर्चेत सहभागी होण्यास मी आतुर असायचे. २०१४ मध्ये ट्विटर अकाऊंट उघडल्यावर स्त्रीवाद्यांबरोबर विचारांची देवाणघेवाण करू लागले. त्याच वेळी संपादकांना स्त्रीवाद, राजकारण, लोकप्रिय संस्कृती इत्यादी विषयांवर स्फुटं पाठवू लागले. सात महिने ती छापण्यासाठी कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. मग मी 'मिस अंडरस्टुड'ची संस्थापक कार्लीन फर्मीन हिच्याबरोबर मुलांना लैंगिक छळापासून सावध करण्यासाठी 'द गार्डियन'मधून स्तंभ लेखन करू लागले. स्त्रीवादी भूमिका, प्रसार यानिमित्ताने युकेमधील प्रमुख वृत्तसंस्थांशी संबंध येऊ लागला. ज्या संपादकांना मी स्फुटं पाठवी, त्या सर्व स्त्रीवादी विचारांच्या असल्यानं मला खूप बरं वाटलं. त्यांच्या लेखन-विचारांवर मी ट्विटरवर

ज्यून एरिक - उदोरी ही २० वर्षांची एक धीट लेखिका आणि खंदी, झंझावाती स्त्रीवादी कार्यकर्ती. एल युकेच्या २०१७च्या 'फिमेल ॲक्टिव्हिस्ट ऑफ द इयर' पुरस्काराची मानकरी.

'बीबीसी', 'द गार्डियन' व अन्य संस्थांच्या प्रभावी आणि प्रेरणादायक महिलांच्या यादीत तिचा समावेश आहे. सध्या ती ड्युक युनिव्हर्सिटीत आपलं पदवी शिक्षण पूर्ण करीत आहे.

नुकतंच तिनं लिहिलेलं 'आपण सर्वच स्त्रीवादी होऊ शकू का?' (Can We All Be Feminists?) हे पुस्तक महिलांच्या वैचारिक विश्वात चर्चिलं जात आहे. २१ व्या शतकात जगातील पुढारलेल्या देशात तथाकथित स्त्रीवादी चळवळ ही प्रच्छन्न असमावेशकतेने कशी ग्रासली आहे हा या पुस्तकाचा विषय आहे. स्त्रियांच्या विविध समस्यांवर लढणाऱ्या १७ आघाडीच्या चळवळकर्तींच्या लेखांचा समावेश या पुस्तकात केला आहे.

माझी मतं व्यक्त करायचे, तेव्हा माझ्या लक्षात येऊ लागलं की त्यांचं लेखन भेदमूलक आहे. फ्लेविया झोडन, रेनी इडो-लॉज, मिकी केंडल व ज्यूड व्यांग यांचे ट्विट्स, लेख वाचल्यावर मला कळून चुकलं की त्यांचा स्त्रीवाद हा गोऱ्या, संपन्न, मध्यम वर्गीय भिन्नलिंगी व सुदृढ स्त्रियांपर्यंत सीमित असून कृष्णवर्णीय, समलिंगी व माझ्यासारख्या अबला तरुणी यांच्यापासून तो खूप दूर आहे. तरीही निरुपाय म्हणून मौन बाळगून त्यांच्यासाठी लिहीत राहिले. स्वतःला स्त्रीवादी म्हणवून घेण्यात धन्यता मानणाऱ्या या संपादिकांना कृष्णवर्णीयांना नाकारताना आणि एलजीबीटीक्यूआयए + स्त्रियांना तर हसताना मला हे सारं भयंकर वाटलं. एकीनं म्हटलं होतं की प्रत्येकानं आपण कोणत्या लिंगाचे आहोत हे ओळखलं पाहिजे, पुरुष ते ठरवू शकत नाही. दुसऱ्या एका संपादिकेने म्हटलं आहे की 'ट्रान्स' म्हणजे बलात्कार करू इच्छिणाऱ्याला स्त्रियांच्यात वावरण्यास मुभा देणारा एक मुखवटा आहे.

हे सारं पाहिल्यावर मला गप्प बसवेना. माझ्या कुटुंबाचे व चर्चचे जे विचार सोडले तेच पुन्हा इथं ऐकायचे कशासाठी म्हणून मी इथं स्फुटं लिहायचं बंद करून कृष्णवर्णीय लेखिका – अँजेला डेव्हीस, ऑड्रे लॉर्डे, बेल हूक्स व पॅट्रिशिया हिल कॉलिन्स यांची पुस्तके घेतली. बेल हूक्सचं 'फेमिनिस्ट थिअरी' या पुस्तकातील स्त्रीवादाच्या व्याख्येत मी समाविष्ट असल्याचं मला जाणवलं :

स्त्रीवाद ही एक लिंगभेदमूलक दडपशाहीविरोधी चळवळ आहे. तिचा उद्देश हा स्त्रियांचा विशिष्ट गट, वंश, किंवा वर्गाला लाभ व्हावा असा नाही. पुरुषांवर वर्चस्व गाजवणंही नाही. खऱ्या अर्थानं आपल्या सर्वांच्याच जीवनात परिवर्तन घडवण्याची ताकद त्यात आहे. स्त्रीवाद एक लिंगभेदमूलक दडपशाहीचा बीमोड करणारी चळवळ म्हणून वर्चस्वाची व्यवस्था, आणि लिंग, वंश, वर्ग यांच्यातील आंतरसंबंधांकडे आपलं लक्ष वळवते. म्हणून ज्या स्त्रियांना लिंगभेदमूलक दडपशाहीचे चटके सोसावे लागले अशा स्त्रियांचे अनुभव आणि बिकट अवस्था यांचा संयुक्त राष्ट्रांतील एकूण स्त्रियांचा सामाजिक स्तर समजावून घेण्यासाठी साकल्याने अभ्यासणे गरजेचे आहे.

हूक्स म्हणते की स्त्रीजातीतील परस्पर छेदणाऱ्या अस्मिता या स्त्रीवादाच्या चिकित्सेच्या केंद्रस्थानी असायला हव्यात.

हे तिचं विवेचन वाचल्यावर मी आधी उल्लेखिलेल्या कृष्णवर्णीय स्त्रीवाद्यांना तसेच वर्गीय, वंशीय, सिसेक्सिस्ट, इस्लामोफोबिक, एबलिस्ट आणि ट्रान्सफोबिक स्त्रीवाद्यांना 'स्त्रीवादी' संबोधणं अवघड वाटू लागलं. त्यांना 'स्त्रीवादी' म्हणता येईल का? उदा. समान वेतन आंदोलनात वेतन असमानता ही वंशीयतेशी निगडित नाही असं मानून, किंबहुना कृष्णवर्णीय, लॅटीना आणि दिव्यांग स्त्रियांना श्वेतवर्णीय स्त्रियांच्या तुलनेत कमी वेतन मिळते या वास्तवाकडे दुर्लक्षून केवळ स्त्रिया आणि पुरुष यांच्यातील वेतन असमानतेविरुद्ध आंदोलन करणाऱ्याना स्त्रीवादी कसे म्हणता येईल?

लंडनमधील एका स्त्रीवाद्यांच्या रॅलीत जेव्हा 'वूमन इज द निग्गर ऑफ द वर्ल्ड' असा फलक एका गोऱ्या महिलेने हातात धरलेला मी पहिलं तेव्हा एक कृष्णवर्णीय म्हणून मला फार वाईट वाटलं. २०१७ मधील निवडणुकीत अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प यांना तसेच वाढता फॅसिझम व झेनोफोबिया यांच्या विरोधात स्त्रियांच्या मार्चमध्ये जगभरातील लाखो स्त्री-पुरुष सहभागी झाले होते. ट्रम्प यांनी स्त्रियांची निर्भत्सना 'पुसी' या द्वर्थी शब्दाने केली होती, त्याला उत्तर म्हणून यातील अनेक स्त्रियांनी डोक्यावर गुलाबी 'पुसी हॅट' (मांजराचे दोन कान असलेली लुसलुशीत टोपी) परिधान केली होती. समान उद्दिष्टासाठी निघालेला हा मार्च म्हणजे महिलांच्या एकीचं, शक्तीचं आणि प्रतिकाराचं विराट दृश्य होतं. पण ही गुलाबी पुसी हॅट स्त्रीत्वाचा योनीशी संबंध सूचित करत असल्याने गैरलिंगी आणि लिंगातीत स्त्रियाना बाहेर फेकलं जाणं ही बाब माझ्या मनाला खटकली. मला वाईट वाटतं की किती तरी स्त्रिया 'PUSSIES GINST FSCISM' आणि

'VIV' VULV' असे फलक घेऊन सहभागी झाल्या होत्या. अशा फलकाने आपण सिसेक्सिस्ट विचार पुढे नेत ट्रान्स स्त्रियांना योनी नाही म्हणून त्या 'स्त्रिया'च नाहीत असे सूचित करतो हे त्यांच्या लक्षात कसे येत नाही? स्त्रीवादी चळवळीच्या मुख्य प्रवाहातून वगळणाऱ्या अंध जागा पाहिल्यानंतर मला विचारावं लागतं की या प्रस्थापित स्त्रीवाद्यांना आमच्यासाठी माणुसकी का दाखवता येत नाही?

मी जेव्हा या साऱ्या अंध जागा आणि हेतुतः मुख्य प्रवाहातून वगळण्याचे प्रकार पाहिले तेव्हा मला विचारावं वाटतं : प्रस्थापित स्त्रीवाद्यांना आमच्याकडे-माझ्याकडे माणुसकीने पाहणे इतके का अवघड जाते? गोऱ्या स्त्रीवाद्यांकडे इतरांपेक्षा अधिक सत्ता आणि अधिकार आहेत याचं भान त्यांना नसेल? वस्तुतः मी कृष्णवर्णीय, गैरलिंगी आणि दिव्यांग अशा व्यापक सेवेशी निगडित असूनही मी केवळ लिंगभावाबद्दलच बोलते असं त्यांना का वाटतं? हा कसला स्त्रीवाद? असा सवाल माझ्यासारख्या स्त्रिया शतकानुशतके विचारत आहेत, ही आता आश्चर्याची बाब राहिलेली नाही. १८५१ साली गुलामगिरीविरोधी असलेली आणि स्त्रियांच्या हक्कांसाठी झगडणारी सोजर्नर ट्रूथ ही एक्रोन, ओहियो येथील स्त्री हक्क परिषदेला उपस्थित होती. स्त्रियांच्या मताधिकाराबद्दल अनेकांनी मते व्यक्त केल्यानंतर ट्रूथ बोलायला उभी राहिली. काही अहवालानुसार ती गुलाम-मुक्तीविषयी बोलून विषयांतर करेल या भितीने तिच्या जवळच्या गोऱ्या कार्यकर्त्यांनी तिला रोखण्याचा प्रयत्न केला होता.

अतिशय गाजलेल्या तिच्या भाषणात ती गर्जते, मला वाटतं की दक्षिणेतील निग्रो आणि उत्तरेकडील गोऱ्या स्त्रिया हे सगळे आपल्या हक्कांबद्दल बोलत आहेत. ह्यात गोरा पुरुष हा

पेचात सापडणार आहे.  पण ही कसली चर्चा सुरू आहे? तो एक माणूस म्हणतो आहे की स्त्रियांना गाडीत चढताना मदत केली पाहिजे, खड्डा असेल तर त्यांना हात द्यायला पाहिजे व त्यांना चांगली जागा दिली पाहिजे, वगैरे. पण मला कोणी गाडीत बसताना किंवा चिखलातून जाताना मदत केली नाही किंवा चांगली जागा कोणी दिली नाही!  मी शेतात नांगर धरला, पिके काढली आणि धान्य कोठारात ठेवलं पण कुठलाही पुरुष मदतीला आला नाही. मी बाई नाही का? मी पुरुषांइतकं काम करते आणि मिळेल तेव्हा त्यांच्याइतकं खातेही, अन् लाथाही सहन करते. मी बाई नाही का? मला तेरा पोरं झाली. यातली सगळी गुलाम म्हणून विकली देखील.  मग माझ्यातलं आईचं काळीज जेव्हा दु:खानं रडलं तेव्हा केवळ जीजसनंच ते ऐकावं का? मग मी बाई नाही का? इथल्या बाया डोक्याचं बोलताहेत. काय म्हणतात बरं? ('बौद्धिक'. कोणीतरी कुजबुजलं.) तेच ते माझ्या बाळा, या सगळ्यात स्त्रियांचे अधिकार, निग्रोंचे अधिकार कुठे आहेत? माझा पेला अर्धा आहे अन् तुमचा भरलेला असेल याचा अर्थ असा नाही की माझा पेला पूर्ण भरून घेण्याचा मला अधिकारच नाही!''



हे शब्द मला हलवून सोडणारे होते. कृष्णवर्णीय आणि इतर स्त्रियांना आपण स्त्रीवादी विचार कक्षेतून वगळले गेलो आहोत, या ज्या समस्येला १८५१ साली सोजर्नर ट्रुथ हिला तोंड द्यावे लागले तीच समस्या आजही भेडसावत आहे. माझ्यासारखंच स्त्रियांच्या प्रश्नावर ती लढत होतीच, पण त्याबरोबरच कृष्णवर्णीय स्त्रियांच्या प्रश्नांवरही लढत होती. मला वाटतं, 'पुरुषांना जेवढे अधिकार आहे आहेत, तेवढे तरी स्त्रियांना मिळाले पाहिजेत,' हे तिने १८६७ साली म्हटलं होतं. कृष्णवर्णीय पुरुषांना हक्क मिळण्याबाबत वातावरण ढवळून निघत आहे पण कृष्णवर्णीय स्त्रियांच्या हक्कांबद्दल एक शब्दही ऐकायला मिळत नाही. आणि जर या पुरुषांना त्यांचे हक्क मिळाले व स्त्रियांना त्यांचे हक्क मिळाले नाहीत तर पुरुष त्यांच्यावर सत्ता गाजवतील आणि हे पूर्वी होतं तेवढंच वाईट ठरणार आहे.

परिषदेनंतरच्या काही दशकात ट्रुथने वातावरण ढवळून काढूनही संयुक्त राष्ट्रातील मताधिकार चळवळीतून कृष्णवर्णीय स्त्रियांना वगळणं सुरूच राहिलं. १८६९ मध्ये एलिझाबेथ कॅडी स्टेन्टन, सुझान बी, अँथनी यासारख्या स्त्री मताधिकार चळवळीतील गोऱ्या कार्यकर्त्यांनी, दोन दशलक्ष कृष्णवर्णीय स्त्रियांना डावलून दोन दशलक्ष गुलामीमुक्त कृष्णवर्णीय पुरुषांना मताधिकार बहाल करणाऱ्या या रिपब्लिकनाना १५ व्या घटनादुरुस्तीला विरोध करण्यासाठी आंदोलन छेडले. 'मी निग्रो बाई ऐवजी निग्रो पुरुषासाठी मतपत्रिका मागण्याआधी हा माझा उजवा हात कापून काढेन' असं अँथनीने जाहीर केलं. अगदी अलीकडच्या २०१६ च्या अध्यक्षीय निवडणुकीत हजारो गोऱ्या स्त्रियांची 'सुझान अँथनीच्या थडग्यावर मी मतदान केले', असे स्टिकर्स लावण्यासाठी झुंबड उडाली होती. याच काळात इंग्लंडमध्ये गोऱ्या स्त्री मताधिकार कार्यकर्त्या अनेकदा स्त्रियांच्या वाईट परिस्थितीची गुलामगिरीशी हास्यास्पद तुलना करीत. उदा. १९१३ मध्ये एम्लीन प्यांख्रस्ट तर म्हणाली, ''मी गुलाम होण्यापेक्षा बंडखोर होणं पसंत केलं असतं.'' कृष्णवर्णीय स्त्रियांना लिंगभावात्मक तसेच वांशिक अशा दोन्ही भेदांना सामोरे जावे लागते, हे अटलांटिक समुद्राच्या दोन्ही बाजूच्या प्रदेशातील या भल्याभल्या गोऱ्या स्त्रीवादी कार्यकर्त्यांच्या गावीही नसायचे.

अगदी अलीकडेपर्यंत बहुपेडी जुलमी व्यवस्थेखाली राहण्याच्या अनुभवाला शब्दही भाषेत नव्हता. १९८९ मध्ये कृष्णवर्णीय स्त्रीवादी विधिज्ञ किंबरले क्रेनशो यांनी छेदनबिंदू हा नवा शब्द वापरला, ज्याद्वारे लिंग भावात्मक तसेच वांशिक भेद एकमेकांना कसे छेदतात  हे सूचित केले आहे. वस्तुतः जरी तिला ही संज्ञा कृष्णवर्णीय स्त्रियांसाठी वापरावयाची होती तरी तिचा स्वीकार विस्तृतपणे झाला. छेदनबिंदू या संज्ञेद्वारे तिला भांडवलशाही,  भिन्नलिंगी, पुरुषसत्ताक, श्वेतवर्णीय इत्यादी सर्व भेदमूलक बाबी स्त्रियांना  वेदना देणाऱ्या आहेत हे सूचित करायचं होतं.

या छेदनबिंदूचा विचार न करणे म्हणजे स्त्रीवादी

राजकारणातून एका मोठ्या गटाला वगळण्यासारखे आहे. परंतु मुख्य धारेच्या स्त्रीवाद्यांना, ज्यांना बऱ्याचदा श्वेत स्त्रीवादी असे संबोधले जाते, त्यांना हे अजूनही मान्य होताना दिसत नाही. अनेक स्त्रीवादी स्त्रिया या त्यांच्या गोऱ्या, भिन्नलिंगी, उच्च किंवा उच्च मध्यमवर्गीय, सुदृढ कायिक अशा साच्यात न बसणाऱ्या या उर्वरित स्त्रियांकडे दुर्लक्ष करताना दिसतात, पण ही नवीन बाब आहे असे नव्हे.

सोजर्नर ट्रुथ यांच्या काळापासून हे चालत आले आहे. १९६९ साली झालेल्या या राष्ट्रीय स्त्री संघटनेच्या सभेत बेटी फ्रीडन हिने, ''समलिंगी स्त्रिया म्हणजे आपल्याला धोक्याची सूचना आहे कारण आपल्या आर्थिक आणि सामाजिक समतेच्या ध्येयापासून त्या विचलित करणाऱ्या आहेत'', असं विधान केलं होतं. याला प्रत्युत्तर म्हणून संघटनेतील क्वीयर स्त्रिया व गे लिबरेशन फ्रंट यांनी 'लव्हेंडर मेनेस' हा गट स्थापन करून १९७० मध्ये आयोजिलेल्या 'युनाईट विमेन'च्या दुसऱ्या अधिवेशनात समलैंगिक स्त्रियांना वगळल्याबद्दल आंदोलन छेडले.

त्यानंतर राष्ट्रीय स्त्री संघटनेच्या पुढील परिषदेत समलिंगी स्त्रियांना स्त्रीवाद्यात सामावून घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

गेल्या पाच दशकात अनेक स्त्रीवाद्यांनी ट्रान्स स्त्री ही स्त्री नाहीच अशी भूमिका घेतली आहे. तिसऱ्या लाटेतील उल्लेखनीय व जहाल स्त्रीवादी जर्मेन ग्रीयर आपल्या १९९९ मधील 'द होल वुमन' या पुस्तकात ट्रान्स स्त्रियांना वगळणारे विचार मांडते :

ज्या सरकारात फार थोड्या स्त्रिया आहेत, ज्यांना जाणण्यात त्यांनी घाई केली, ते स्वतःला स्त्री म्हणवणारे पुरुष आहेत व ते सिद्ध करण्यासाठी त्यांनी अंडाशय काढून टाकला आहे. म्हणून ते त्या स्त्रीला भिन्नलिंगी न मानता लिंगविरहित मानतात. अशा लिंगबदल करणाऱ्या कोणीही गर्भाशय किंवा बीजांडकोश रोपण का करून घेतलं नाही? जर ते करून घेणे बंधनकारक केलं असतं तर स्वतःला स्त्री समजणारे पुरुष रातोरात अदृश्य झाले असते. मानवनिर्मित स्त्रीला स्त्री म्हणून स्वीकारण्याचा आग्रह म्हणजे स्त्री ही सदोष नर असल्याची चुकीची धारणा संस्थात्मक पातळीवर निर्माण करण्यासारखे आहे.

ग्रीअर दोन दशकापूर्वी दुसऱ्या लाटेतील प्रमुख स्त्रीवादी जनिस रेमंड हिच्या प्रखर विचारांना पाठिंबा देत होती. ट्रान्ससेक्सुअल लोक आपलं पुरुषी जननेंद्रिय काढल्याने ते स्त्रियांना निरुपद्रवी वाटतात असं ती म्हणते. आजही अनेक स्त्रीवादी यांना हा विचार पटतो. त्यांच्या मते ट्रांसजेंडर स्त्रिया या या प्रसाधनगृहांमध्ये स्त्रियांना धोका ठरू शकतात. ट्रांसजेंडर स्त्रियांना वगळू पाहणाऱ्या या स्त्रीवाद्यांचा युक्तिवाद केवळ चुकीचा नसून ज्या-ज्या आधीच अत्याचाराच्या शिकार बनल्या आहेत, त्या स्त्रियांच्या एका गटाला आपल्यात सामावून घेणे हे एकंदर स्त्रीवादी चळवळीचे अपयश मानावे लागेल.

त्यांच्यावरील हल्ले आणि खुनाचे प्रयत्न याची आकडेवारी धक्कादायक आहे. 'नॅशनल सेंटर फॉर ट्रान्सजेंडर इक्वालिटी' यांच्या या पाहणीनुसार प्रत्येक चार जणांमध्ये एकाला पूर्वग्रहदूषित हल्ल्यांना सामोरे जावे लागत आहे. यात ट्रान्स स्त्रिया व कृष्णवर्णीय लोक यांच्यावरील हल्ल्याचे प्रमाण अधिक आहे. २०११ च्या हिंसाविरोधी प्रकल्पाच्या पाहणीनुसार एलजीबीटी विरोधात झालेल्या एकूण गुणात ४०% खून हे ट्रांसजेंडर स्त्रियांचे आहेत. मुख्य धारेच्या स्त्रीवादी चळवळीने अशा दोन बिंदूंना वगळल्याने तसेच धोकादायक स्थितीत वावरणाऱ्या स्त्रियांचा कैवार न घेतल्याने भयंकर असे सामाजिक परिणाम दिसून येत आहेत.

शुल्लकीकरण आणि वगळणं यामुळे स्त्रीवादी चळवळीत क्रियाशील असणाऱ्याला उद्विग्नता व एकाकीपणा अनुभवास येतो. कधीकधी स्त्रीवादी गटांच्या बैठकांना जर कृष्णवर्णीय नेतृत्व नसेल तर मी त्यांना जाणं टाळते. कारण माझं कृष्णवर्णीयत्व दाराबाहेर ठेवून जायला माझं मन शिणलं आहे. दुसरी गोष्ट म्हणजे कृष्णवर्णीय स्त्रीवाद्यांच्या बैठकांनाही जाणं भितीदायक झालं आहे कारण समलिंगांचं प्रमाण या वंशात भरपूर आहेत. याबद्दल मी ज्यावेळी माझ्या कृष्णवर्णीय क्वीअर मैत्रिणीला हे बोलले, त्यावेळी आम्ही दोघांनाही आश्चर्य वाटलं.

आपण उघडपणे क्वीअर म्हणून इथं वावरलो असतो तर? तर त्या खोलीत मी उघडपणे बायसेक्शुअल म्हणून शिरले तर काय होईल? हे अतिशय अवघड आणि धोकादायक झालं असतं. स्त्रीवाद्यांच्या सभेत मला स्थान नाही कारण माझ्या सारख्यांना त्यांनी कधी सामावून घेतलं नाही.

कधी-कधी विचार येतो, मला अधिक सामर्थ्य आणि अधिकार असते तर माझं जीवन कसं असतं? कल्पना कर की प्राध्यापक त्यांच्या वर्गात घेतील की नाही याची चिंता नसणं; तुझं मानसिक आरोग्य नीट राहण्यासाठी औषधांच्या खर्चाची तजवीज तुला करावी न लागणं; वर्णद्वेषाच्या भितीने क्वीअर स्त्रीवाद्यांच्या बैठकीला टाळू शकणे इत्यादी कल्पना कर. प्रामुख्यानं गोऱ्या वातावरणात तुला अभ्यास करणे, काम करणे, कमावणं अशा सूक्ष्म आक्रमणांना तोंड न देण्याची चैन करता आली तर!

मी एक कार्यकर्ती म्हणून कार्यशाळांतून पॅनेलवर बोलत असते. अशावेळी बऱ्याचदा एक गोरी महिला जवळ येऊन म्हणते, ''तू इतर कृष्णवर्णीय स्त्रियांसारखी नाहीस म्हणून आभार मानते. ते खूप रागीट असतात. मला समजत नाही आमचा द्वेष का करतात ते? बऱ्याचदा मी मान हलवते व तिथून लवकरात लवकर सटकते. मी माझ्या भावनांना आवर घालते 'ओ झुगो' पुरे झालं, मी इग्बोमध्ये पुटपुटते मला शांत करत. रागीट आहेस ते दाखवू नकोस, त्यांना जिंकू देऊ नकोस.''

कार्यकर्ते म्हणून माझ्या सुरुवातीच्या काळात बाईच्या जननेंद्रियाच्या आणि विरोधात भाषण असो किंवा 'ए'

दर्जाच्या राज्यशास्त्र अभ्यासक्रमात 'स्त्रीवाद' या विषयाच्या अंतर्भावासाठी युके सरकारकडे याचिका दाखल करणं असो मला रूढार्थानं 'अँग्री ब्लॅक वुमन' व्हायचं नव्हतं. याउलट मी तशी प्रतिमा होऊ नये म्हणून आटोकाट प्रयत्न करत होते. माझ्या बोलण्यावरूनच माझी प्रतिमा व्हावी असा प्रयत्न करत होते. मी स्वतःला थोडं लहान केलं. माझा आवाज न वाढवता समावेश नाकारणाऱ्या स्त्रीवादाबद्दल मी नेमके मुद्दे मांडत होते. पण मी त्यात फारशी गुंतले नाही. का? तर मी अँग्री आहे. मी 'धुंद' आहे. मी रागात आहे हे कारण पण मुख्य प्रवाहातील गोऱ्या स्त्रीवादाला मी कंटाळलेली आहे. गेली पाच वर्षे मी पाहते आहे की माझ्यासारख्या या परिघावरील स्त्रीकडे गोरे दुर्लक्ष करतात. माझी कृष्णवर्णीय चिमुरडी पोलिसांच्या हाताने मारली जाताना मला चीड येते, मी विचार करायचं थांबवू शकत नाही. मग नुकत्याच झालेल्या निवडणुकीला डोनाल्ड ट्रम्प निवडून येतात. संपूर्ण प्रचारादरम्यान ट्रम्पने स्त्रिया, स्थलांतरित यांच्यावर टीका करीत भेदमूलक निती अवलंबली. परंतु मतदानादिवशी ट्रम्पना ५३ टक्के गोऱ्या महिलांच्या मतदानाच्या तुलनेत हिलरी क्लिंटन यांना ९४% कृष्णवर्णीय आणि ६८% लॅटिना महिलांनी मतदान केले. ज्यातून गोऱ्या महिला या कृष्णवर्णीय, उपेक्षित, मुस्लिम व स्थलांतरित महिलांच्या समस्येविषयी किती अनभिज्ञ आहेत हेच दिसून येतं.

मुख्य प्रवाहातील स्त्रीवाद हा उथळपणाशी निगडीत आहे हीच मोठी समस्या आहे. मुद्दामहून छापून आणलेल्या या 'बालिका शक्ती', 'महिला सक्षमीकरण' या विषयावरील लेखांचे मथळे मात्र 'मेकअप करून स्त्रीवादी होऊ शकाल का?' असे सवंग असायचे. अशा वरवरच्या बाबींसाठी काही करत राहिल्याने स्त्रीवादी महिलांना बहुपेडी जुलमाला सामोरे जाणाऱ्या त्यांच्या कृष्णवर्णीय, दिव्यांग, ट्रान्स, मुस्लिम इ. भगिनींची जाण राहिली नाही. अमेरिकेत कृष्णवर्णीय महिला व मुलींची संख्या ही एकूण लोकसंख्येच्या १३ टक्के एवढीच आहे. पण 'आफ्रिकन- अमेरिकन पोलिसी फोरमच्या' २०१५ Say Her Name मोहिमेच्या या अहवालानुसार एकूण स्त्रियांच्या ३३ टक्के स्त्रिया पोलिसांकडून मारल्या गेल्या आहेत. आफ्रिकन अमेरिकन पोलिसी फोरम द्वारा Say Her Name ही मोहीम स्त्रियांच्या हत्येची संख्या पुढे यावी म्हणून राबविण्यात आली. कृष्णवर्णीय पुरुषांच्या हत्याचे आकडे समोर येतात त्यामुळे स्त्रियांच्या झालेल्या हत्या समोर येत नव्हत्या. रेकी बोईड, सँन्ड्रा ब्लॅक यांना मारलं गेलं तेव्हा मुख्य धारेच्या स्त्रीवादी महिला कुठे होत्या? अल्टेरिया वूड्स किंवा चार्लीना लाईल्स यांचं काय झालं? कृष्णवर्णीय स्त्रियांनी Say Her Name मोहिमेसंदर्भात एक मार्च आयोजित केला होता, तेव्हा या गोऱ्या स्त्रीवादी कुठे होत्या? यूकेमधील 'विमेन एड' या संस्थेच्या पाहणीतून ५० टक्के दिव्यांग स्त्रियांना आयुष्यात लैंगिक अत्याचाराला सामोरे जावे लागले आहे. याविषयी त्यांनी काहीही केले नाही. २०१५ मध्ये ॲम्नेस्टी इंटरनॅशनलद्वारा सर्व प्रकारच्या सहमतीपूर्वक लैंगिक व्यवहाराचे निरगुन्हेगारीकरण ज्याला 'न्युझिलँड मॉडेल' असंही संबोधलं जातं. यावर एक संशोधन अहवाल व धोरण शिफारस प्रसिद्ध केला गेला. प्रमुख स्त्रीवाद्यांनी ॲम्नेस्टी इंटरनॅशनलवर नॉर्डिक मॉडेलचे अनुसरण का केले नाही म्हणून टिकेची झोड उठवली. परंतु 'नॉर्डिक मॉडेल'मध्ये लैंगिक संबंध विकणाऱ्या व्यक्तीला गुन्हेगार ठरवता येत नसले तरी लैगिक संबंध विकत घेणाऱ्याला मात्र शिक्षा होऊ शकते, हे अयोग्य आहे. ॲम्नेस्टीने वेश्याव्यवसाय करणाऱ्यांच्या इच्छेचा विचार केला आहे हे स्पष्ट करून सुद्धा लेना डेनहॅम, केट विन्स्लेट, मेरिल स्ट्रीप व एमा थॉमसनसारख्या हॉलिवूड गोऱ्या स्त्रीवादी स्त्रियांनी त्यांच्या ब्रिटिश सहकाऱ्यांशी हातमिळवणी करत करून ॲम्नेस्टीने सदर अहवाल मागे घेण्याविषयीच्या पत्रांवर सह्या केल्या. आता या प्रस्तावित स्त्रीवाद्याना वेशाव्यवसाय करण्याविषयी काही सहानुभूती नसावी? त्यांच्या मागण्यांकडे लक्ष पुरवणं त्यांना काही अवघड नव्हतं.२०१५ मध्ये ग्रामीण अमेरिकेत शहरी भागाच्या तुलनेत ६४% गरोदर स्त्रिया गुंतागुंतीच्या समस्यांमुळे मृत्यूच्या दाढेत सापडल्या होत्या. हॉस्पिटलमध्ये पोहोचण्यासाठीचे अंतर व लागणारा वेळ व प्रसूतिशास्त्र तज्ज्ञांची निकडीच्या प्रसंगी भेट हे यात कळीचे मुद्दे होते. या समस्येबाबतही स्त्रीवाद्यांनी काही आवाज उठवल्याचे दिसत नाही. तसेच नॅशनल लॅटिना नेटवर्कनुसार प्रत्येक ३ हिस्पॅनिक किंवा लॅटिना महिलांमधील एकीला आपल्या जीवनात जोडीदाराकडून शारीरिक हिंसेला तोंड द्यावे लागते. यासाठीही कोणी कुठे प्रतिक्रिया दिल्याचे दिसत नाही.

गोऱ्या स्त्रीवादी संघटना या समस्या घेऊन काम करतात. त्यांचा संबंध केवळ संपन्न, भिन्नलिंगी, सिसजेंडर इत्यादींशी असतो. परंतु लाखो कृष्णवर्णीय, दिव्यांग, क्वीअर, ट्रान्स, गरीब आणि उपेक्षित स्त्रियांच्या या जीवन-मरणाच्या प्रश्नांशी त्या कधी भिडत नाहीत. अशा अनेक स्त्रिया आहेत ज्या आपलं घरचं दार उघडून बाहेर जाऊ शकत नाही. मग वर्णद्वेष, फॅटफोबिया, होमोफोबिया, ट्रान्स फोबिया इत्यादी अनेक कारणांमुळे त्या बाहेर येऊ शकत नाहीत. अशा स्त्रियांची बाजू घेणे, त्यांचे ऐकून घेणे, त्यांचे अनुभव, त्यांचा संघर्ष यांना आपण महत्त्व देत नाही असा याचा अर्थ होतो. यासाठी काही करत नसेल तर ते केवळ चुकीचे नसून ते धोक्याचेही आहे. मुख्य धारेच्या स्त्रीवादाकडे जर बहुसंख्य महिलांचे व नॉन बायनरी लोकांचे जीवन परिवर्तन घडवण्याचे एक साधन म्हणून पाहिले नाही तर चळवळींचे अस्तित्व नजिकच्या काळात संपुष्टात येण्याचा धोका आहे.

छेदनबिंदू महत्त्वाचा आहे किंबहुना लाखो लोकांचा तो जगण्याचा अनुभव होता. तथापि मुख्य प्रवाहाची स्त्रीवादी चळवळ सरधोपट मार्गाने वाटचाल करीत आहे. बेल हुक्सच्या व्याख्येप्रमाणे लिंगनिष्ठ दडपशाही संपवणं हे स्त्रीवादाचं ध्येय आहे. मग लाखो स्त्रियांना वगळणाऱ्या या चळवळीला स्त्रीवादी

कसे म्हणता येईल?

समाजातल्या काही स्त्रियांसाठीच काम करण्याची भूमिका सोडून द्यायची झाली तर स्त्रीवाद्यांनी ज्या गरीब आहेत, उपेक्षित आहे, क्वीअर आहेत, बेदखल आहेत अशा महिलांचा आवाज बुलंद केला पाहिजे. त्या लिंगनिष्ठ दडपशाहीला सामोऱ्या जात असल्या तरी त्यांचे हक्क आणि अधिकार जाणून घेतले पाहिजेत. परिघावरील स्त्रिया या गोऱ्या स्त्रियांना त्यांच्यासाठी काहीही करण्यास सांगतात, तेव्हा त्या 'एकतेचा किंवा समान पातळी' हा मुद्दा पुढे करतात. गोऱ्या स्त्रिया जेव्हा त्यांच्या लिंगभाव समानतेच्या लढ्यात 'भगिनी भाव' राखण्याचं आवाहन परिघावरील स्त्रियांना करतात, तेव्हा त्यांच्या अस्मिता गुंडाळून त्यांनी लढ्यात यावं अशी अपेक्षा करतात. परंतु मला तर हे अशक्य आहे. माझं कृष्णवर्णीयत्व मी माझ्या स्त्रीपणापासून वेगळे कसे करणार? मी माझ्या अस्मितांसह आले नाही तर मग हा कसला भगिनी भाव? माझी अस्मिता बाजूला ठेवायला सांगणारा स्त्रीवाद मला नको आहे. यापेक्षा ऑद्रे लॉर्डचा स्त्रीवाद मला जवळचा वाटतो. १९८४ मध्ये तिने केलेल्या प्रभावी भाषणात ती म्हणते, ''मालकाची साधनं ही मालकाचे घर कधीच उध्वस्त करत नाहीत.'' हे विधान आपले हक्क शाबूत ठेवून परस्परातले अंतर मान्य करते.

बाई म्हणून आपल्याला शिकवलं गेलं आहे की एकतर आपल्यातल्या अंतराकडे दुर्लक्ष करावे किंवा त्यांच्याकडे आपल्यातल्या दुराव्याचे किंवा संशयाचे कारण म्हणून म्हणून पहावे, बदलाची शक्ती म्हणून नव्हे. समाजाशिवाय मुक्ती नाही, एखादी व्यक्ती आणि तिला सोसावी लागणारी दडपशाही ही यांच्यातला एक तात्पुरता करार आहे. समाज म्हणजे परस्परांतील अंतर काढून टाकणे नव्हे किंवा आमच्यात अंतर नाही ही केविलवाणा असा आव आणणेही नाही.

अर्थात कोणतीही राजकीय चळवळ ही परिपूर्ण असू शकत नाही. मतभेद असणारच. परंतु दडपशाही संपवणं आणि सर्वांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणं हे चळवळीचं ध्येय असेल तर आपण जखमा बऱ्या केल्या पाहिजेत. पूल बांधले पाहिजेत, एकत्र येऊन ध्येय गाठले पाहिजे. मला मनापासून वाटतं एकसंध भगिनीभाव निर्माण करावा, ज्याचा संपूर्ण रोख समस्त स्त्रीवर्गाला मुक्ती मिळावी याकडे असेल. परंतु आपण आपल्या या अस्मितांना सोडून देऊन किंवा मनाची दारे बंद करून, तिथपर्यंत आपण जाऊ शकत नाही, आपण तिथपर्यंत पोहोचू. आम्हा परिघावरील बायकांचं म्हणणं जरा चढ्या आवाजात असलं तरी आणि ते ऐकायला असुखावह असलं तरी मुख्य प्रवाहातील स्त्रीवाद्यांनी ऐकून घेतलं तर!

प्रस्थापित स्त्रीवाद्यांनो, आपल्याकडून या गोष्टी आम्हाला मिळाव्यात. आमच्याबरोबर आपण संघटित व्हावं परंतु आमच्या अनुभवाच्या आणि कामाच्या बळावर आम्हीच आमचे अधिकारी असू. आमच्या वतीने बोलू नका. आम्ही आमच्यासाठी बोलू शकतो. जर आम्ही बोलू शकलो नाही तर ते धोकादायक ठरेल. परिणाम आपल्याला सहनही होणार नाहीत. अशावेळी आमचा आवाज आणि संघर्ष वाढण्याचा अधिकार तुम्ही वापरू शकता. महत्त्वाच्या ठिकाणी आपण जा आणि आम्हालाही घेऊन जा. धोका पत्करा. हो, म्हणजे पोलीस अत्याचाराच्या मोर्चात सामील व्हा आणि आणखीन एका कृष्णवर्णीय ट्रान्स महिलेच्या खुनाप्रसंगी हजर राहा. ज्यावेळी आपण संघटित होता त्यावेळी कोण आलं आहे आणि कोण आलं नाही हे पहा आणि त्यांना काहीही करून आणा. ते जमलं नाही तर असतील तिथे जा. डिजिटल क्षेत्राच्या पलीकडे जा आणि त्यांना तुमच्यात सामावून घ्या. कारण गरिबी, भूप्रदेश, वय, इंटरनेट, निरक्षरता व अन्य मर्यादांमुळे आपल्यापर्यंत सर्व पोहोचू शकत नाहीत. प्रत्येक प्रश्नाकडे शक्य तितक्या वेगवेगळ्या नजरेतून पहा. : वंश, वर्ग, दिव्यांग, लैंगिकता, गरिबी, लिंगभाव.

स्त्रीवादी प्रश्नांसंबंधी आपला दृष्टिकोन विस्तृत करा. आम्हाला आमच्या कामाबद्दल, संघटनांबद्दल मोबदला द्या. आम्ही कुठल्याही कार्यालयात जातो तेव्हा मदत करा. आम्हाला कुटुंबियांच्या सुटकेसाठी कोर्टात जामीन द्या, स्थलांतरितांच्या हक्कांसाठी पुढे या, चांगली कुटुंबनियोजन सेवा, चांगली आरोग्य सेवा, चांगली बाह्यसंगोपन सुविधा इत्यादीसाठी आपण प्रचार करावा. संघटनेच्या कार्यालयात येण्यासाठी तसेच मोर्चात सहभागी होण्यासाठी दिव्यांगांना सुविधा द्या. आमच्यासाठी चांगली सर्वनामे वापरा. मानसिक रोग, कलंकाविरुद्ध लढा पुकारा. जीवनाच्या प्रत्येक अंगात यासाठी काम करा, परंतु निर्णायकपणे ज्या समस्यांस आम्ही कारणीभूत नाही, त्यांच्या सोडवणुकीसाठी आमच्याकडे येऊ नका. पुढाकार घ्या, शिका, चुका करा, चांगलं करा.

माझ्या सर्व उपेक्षित भगिनींना :

मी तुम्हाला पाहते आहे. मला माहीत आहे, अत्याचाराचे छेदनबिंदू पार करत या जगात जगणं किती कठीण आहे. मला माहीत आहे, हे पैसे नसणं म्हणजे काय, गरीब असणं, बेघर असणं, रस्त्यावरून भटकणं, नोकरीच्या मुलाखतीसाठी जाताना केस कुरळे करणं, आणि तिथं त्या खोलीतील तुम्हाला मानव समजले तरी खूप झालं! मला जाणीव आहे की तुम्ही जो संघर्ष करीत आहात त्याबाबत मला माहीतही नसेल किंवा सध्या तुम्ही ज्या अनुभवातून जात आहात याची मला पूर्ण जाणही नसेल, पण मला चांगल्या गोष्टी घडतील कारण आपल्या समोर अडचणींचा ढीग असूनही अनेकांची भरभराट होत आहे.
होय, काहीजण जगण्यासाठी संघर्ष करीत आहेत तर काहीजण मृत्यूला कवटाळत आहेत, पण जे शक्य करून दाखवतात ते आपल्यासाठी लढत आहेत. आम्ही तुमची नावे आणि तुमच्या जीवन कथा स्मरणात ठेवू. पण आपणाला मार्गक्रमण करत

राहायला हवे. हे सारं बोलायला सोपं असतं करायला अवघड. पण या जगात आपल्याला मोठ्या प्रमाणात हिंसेला सामोरे जावे लागते आणि आपल्यासमोर समस्यांचा एवढा मोठा ढीग आहे की या दुनियेला आम्ही जगावं असं वाटतं की नाही याची शंका येते. त्यामुळे आपलं केवळ जिवंत असणं हेच एक मूलभूत काम आहे. काळजी घ्या. प्रत्येक गोष्टीत प्रथम राहा. आनंदाचे क्षण शोधा, तुमचे तुम्हीच साजरे करा. आपण जे काही चांगलं केलं आहे आणि अजूनही करणार आहोत त्याला जोडून राहा. तुमच्या भगिनींचं ऐकून घ्या आणि शिका : बेदखल स्त्रिया, ट्रान्स स्त्रिया, कृष्णवर्णीय स्त्रिया आणि दिव्यांग स्त्रिया. त्यांचे हात हातात घ्या. सीमारेषेच्या पलीकडे जाऊन काम करा. एकमेकांना आधार द्या. या होईल तितके लढत रहा. प्रयत्न करा. जेवढं चांगलं करता येईल तेवढं करा. शिका, चुका करा, चांगलं करा.

आव्हानांना तोंड द्यायचा अजून ज्यांना सराव नाही व आतल्या आत वाद सुरू असतो अशांसाठी आजची स्त्रीवादी चळवळ हे पुस्तक म्हणजे सुरुवात करण्यास उत्तम ठिकाण आहे. माझ्यासारख्या ज्यांना समस्या हेच जगणं व समस्या हाच त्यांचा श्वास आहे. अशांसाठी समान सत्य गवसेल. तुमच्यासारखेच अनुभव इथे वाचायला मिळतील, ज्या उपेक्षितांचा आवाज पुढे आणि केंद्रस्थानी भरून राहिला आहे.


खास हक्कदार स्त्रियांना त्यांच्यापेक्षा वेगळा स्त्रियांच्या या वर्षाचा विषय समजावून घ्यायला सुरुवात करायला मिळेल, तसेच समतेवर विश्वास असणाऱ्या काही उपेक्षित स्त्रियांना स्त्रीवादी चळवळीशी जोडून घेण्यासाठीही संघर्ष का करावा लागतो हेही या पुस्तकातून उमजेल. त्यातलीच मी एक आहे.

मी या पुस्तकाचं शीर्षक ‘Can we all be feminists?’ असं दिलं याचं कारण एक उपेक्षित स्त्री म्हणून मला स्वतःला स्त्रीवादी चळवळीत काही स्थान आहे का याची शंका वाटते. माझ्या उत्तर कुमार वयात मला ‘वुमनिझम’ हा एलिस वाकर यांनी वापरलेला शब्द सापडला जो कृष्णवर्णीय स्त्रियांच्या अनुभवावर प्रकाश टाकतो. काही वेळा ही उपाधी अतिशय सार्थ वाटते एलिस वाकरने कृष्णवर्णीय स्त्रियांच्या गरजांवर अचूक बोट ठेवले तसेच क्वीअर स्त्रीयांचाही त्यात समावेश केला. ती म्हणते वुमनिस्ट म्हणजे अशी स्त्री, जी दुसऱ्या स्त्रियांवर प्रेम करते लैंगिक / बिगर लैंगिकही. यावरून मला फेमिनिझम जसा मध्ये सोडतो तसा वुमनिझम सोडणार नाही असं वाटलं. तरीही माझ्या श्रद्धा आणि विचारांना फेमिनिझम म्हटलं काय किंवा वुमनिझम म्हटलं तरी काही फरक पडणार नाही. कारण मला अजूनही फेमिनिझम कात टाकून नव्यानं चांगलं काम करेल असं वाटतं. आजपर्यंत आणि यापुढेही स्त्रीवादी चळवळ ही स्त्रियांना आपले हक्क मिळवून देणारी एक भक्कम अशी संरचना राहील.

स्त्रीवादी चळवळीच्या काही मर्यादा असल्या तरी मी त्यांची ऋणी आहे. त्या चळवळीला धन्यवाद देते कारण मला माझा आवाज आणि उद्देश तिथं सापडला. प्रचार, संघर्ष आणि स्त्रियांच्या बाजूने उभे राहताना स्त्रीवादाने मला चांगली मुलगी (Good Girl) हा शेरा नाकारायला शिकवलं. मी बंडखोर असल्याने ते मला आवडलं. हे पुस्तक तुमच्यातील बंडखोरीच रूपांतर ठिणगीत करेल अशी आशा करते. ते कुठपर्यंत येईल हे मी सांगू शकत नाही, पण चला सुरुवात करुया.

**– डॉ. अजित मगदूम**
भ्रमणध्वनी : ७५०६०६७७०९
ajitbalwant@gmail.com

ग्रंथाली




# युगांतराची कविता

## डॉ. किशोर सानप

डॉ. किशोर सानप यांनी मात्र सत्तरी, ऐंशी, नव्वदीच्या व त्या पुढीलही कवी आणि कविता ही आपला समीक्षाविषय केली. मराठी कवितेवर आपली स्वतंत्र मुद्रा या काळात उमटवणाऱ्या कवींपासून तो असे कर्तृत्व पुढे सिद्ध करण्याची शक्यता असणाऱ्या कवींपर्यंतचे हे समीक्षालेखन ही या काळाचीही सांस्कृतिक समीक्षा झाली आहे. अकारण ग्रांथिक, पुस्तकी न होता, विद्वत्ताप्रचुरतेचा आव न आणता, ‘कोटेषणा’ टाळून थेट कवितेला भिडणारी संवेदनशील अशी दुर्मीळ होत चाललेली समन्यायी समीक्षा डॉ. किशोर सानप यांनी परिश्रमपूर्वक कशी जपली आहे याची साक्ष हा ग्रंथ देतो.

**मूल्य ६०० रु. सवलतीत ४०० रु.**

**डॉ. मोहन द्रविड**

# रशियागेट आणि अमेरिकन पत्रकारितेची दिवाळखोरी



**बरेच वेळा नजर वर लागली असताना पायाशी काय जळत आहे इथे आपले लक्ष नसते. डेमोक्रॅटिक पक्षाच्या अंतर्गत पक्षनेतृत्वाविरुद्ध, वॉल स्ट्रीटविरुद्ध आणि एकूण श्रीमंत वर्गाविरुद्धच असंतोष खदखदत होता.**

**वॉ**टरगेट हे अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन येथील एका बिल्डिंग समूहाचे नाव आहे. डेमोक्रॅटिक पक्षाच्या राष्ट्रीय समितीचे (DNC) मुख्य ऑफिस तिथे आहे. १९७२ च्या निवडणुकीत तत्कालीन राष्ट्राध्यक्ष निक्सन यांचा विजय पक्का असतानासुद्धा त्यांना किंवा त्यांच्या सहकाऱ्यांना काय अवदसा आठवली कोण जाणे, त्यांनी वॉटरगेट बिल्डिंगमध्ये जाऊन तेथील कागदपत्रे पळवायची योजना आखली. त्यांचे चोर बऱ्यापैकी माठ असले पाहिजेत. ते सापडले. ती लबाडी झाकण्यासाठी पुढे मूर्खपणाची असंख्य कृत्यं झाली. काऱ्याचा नायटा झाला आणि या सर्व प्रकरणाची इतिश्री निक्सन यांच्या राजीनाम्यात झाली.

त्या वेळेपासून कोणत्याही राजकीय भानगडीला 'गेट' म्हणायची पद्धत पडली. वॉटरगेटपासून अनेक छोटीमोठी गेट्स झाली.(यात बिल गेट्स नाही.) या सर्वांचा बादशहा म्हणजे रशियागेट!

हे गेट उघडले, साधारण जुलै २०१६ मध्ये. पण नाटक चालू झाले ७ नोव्हेंबर २०१६ पासून. म्हणजे डॉनल्ड ट्रंप यांच्या विजयानंतर. (खरं म्हणजे हिलरी क्लिंटन यांच्या पराजयानंतर!) बहुसंख्य पत्रकारांनी निवडणुकीच्या निकालाच्या भविष्याबद्दल आपल्या अकलेचे दिवे पाजळून आपल्या राजकीय पांडित्याची अब्रू दुनियेसमोर उघडी पाडली होती. त्या सगळ्यांनी आपल्या वस्त्रांची लक्तरे गोळा करून २४/७ 'रशिया! रशिया!' अशा 'चोराच्या उलट्या...' मारायला सुरुवात केली.

या भानगडीची खासियत म्हणजे, ती मुळात भानगडच नव्हती. ती भानगड व्हावी अशी अनेकांची इच्छा होती. एवढंच काय ते! त्यासाठी दारूगोळा जमवला गेला. तीन वर्षे अनेक वेळा तो बाँब उडवायचा प्रयत्न झाला, पण तो फुसका निघाला. ''या रविवारी ट्रंप चालला,'' असं दर आठवड्याला सगळे जण कोरसमध्ये ओरडत. (रविवारच्या ऐवजी फार तर आलटून-पालटून वेगळा वार असेल.) असं नियमित चालू ठेवणंसुद्धा काही सोपं काम नाही. मूळ रशियागेटपेक्षा ही मॅरथॉन कसरत ऐतिहासिक ठरणार आहे. प्रत्येक वेळी ट्रंप 'बोगस बातमी (Fake News)' म्हणून प्रतिक्रिया देत.

त्या गोष्टीचीही सार्वजनिक टिंगल होत असे.

या सर्वाची पार्श्वभूमी अशी. १९९१ सालापर्यंत रशिया हा अमेरिकेचा सर्वात बलाढ्य शत्रू. त्यानंतर सोव्हिएट संघ कोसळला आणि रशियाला लागून असलेल्या संघातल्या इतर राज्यांनी विभक्त व्हायची इच्छा व्यक्त केली. तेव्हा सोव्हिएट संघ आणि अमेरिकेमध्ये तोंडी करार झाला की सोव्हिएट संघाने राज्यांच्या विभक्त होण्यात अडथळा आणू नये, आणि अशा विभक्त झालेल्या राज्यांना अमेरिकेने रशियाविरुद्ध फूस देऊ नये. अमेरिकन भांडवलदारांनी त्यानंतरच्या दहा वर्षांत रशियाला आर्थिकदृष्ट्या संपूर्ण नागवे केले. काही वर्षे रशिया हा अमेरिकेचा जवळजवळ मांडलिक देश झाला. जेव्हा अमेरिकेने इराकवर दोन आक्रमणं केली, १९९१ आणि २००३ मध्ये, तेव्हा रशिया यूनोमध्ये तोंडात मूग गिळून गप्प बसला.

२००६ मध्ये जेव्हा पूर्वसोव्हिएट जॉर्जिया या देशाने रशियाविरुद्ध हालचालींना सुरुवात केली, तेव्हा रशियात चलबिचल झाली. २००० साली रशियाची सूत्रे पुटिन यांच्या हातात आली होती. त्यांनी फौज पाठवून जॉर्जियाचा पराभव केला. २००६ सालीच भूतपूर्व अमेरिकन अध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या पत्नी आणि त्या वेळच्या न्यूयॉर्कच्या सेनेटर हिलरींना अमेरिकेचे अध्यक्ष व्हायचे डोहाळे लागले. २००८ साली निवृत्त होणारे अध्यक्ष जॉर्ज बुश आणि त्यांचा पक्ष त्यांच्या अजूनही चालू असलेल्या इराक युद्धामुळे बदनाम झालेले होते. त्यामुळे संधी चांगली होती.

हिलरीची सर्वात मोठी समस्या म्हणजे तिने इराक युद्धाला दिलेला पाठिंबा. तिच्या विरुद्ध उभा राहिला एक तेज:पुंज तरुण आणि फर्डा वक्ता बराक ओबामा. इराक युद्धाच्या वेळेस त्याचा राजकीय जन्म झाला नसल्याने त्या बाबतीत तरी त्याची मूठ झाकलीच होती. त्याने हिलरीला इराक प्रश्नावरून धारेवर धरले. पुढे मुख्य निवडणुकीत तो जिंकला आणि हिलरी त्याच्या मंत्रिमंडळात परराष्ट्रमंत्री म्हणून गेली, पण तिचं तेवढ्यावर भागणार नव्हतं. तिला दुसरी पोलादी स्त्री (Iron Lady) व्हायचं होतं. तिने लिबिया, व्हेनेझुएला, सिरीया, यूक्रेन वगैरे देशांना दमदाटी द्यायला सुरुवात केली. त्यापैकी लिबियात ती यशस्वी झाली. इतर ठिकाणी तिला पुटिन नडला आणि त्याने तिच्यावर कुरघोडी केली. तेव्हा ती संतापली आणि नागिणीसारखी डूख ठेवून बसली.

२०१४ साली तिने मंत्रीपदाचा राजिनामा दिला. आता तिला सुवर्णपदक पाहिजे होते. त्याची तयारी करायची होती. तिच्या सहा वर्षांच्या कारकिर्दीत आणि तिच्या नवऱ्याच्या आठ वर्षांच्या कारकिर्दीत तिने आपल्या पक्षात, प्रसार माध्यमांत आणि सरकारमध्ये भरपूर माणसं पेरून ठेवली होती. ती २०१६ सालची अध्यक्षीय निवडणूक जिंकणार याची तिला, तिच्या पक्षातल्या आणि देशातल्या लोकांनाच काय तर, पण जगातल्या इतर देशांतल्या प्रमुखांना आणि उद्योगपतींनासुद्धा खात्री होती. त्यांच्या सोयीकरता तिने 'क्लिंटन फाउंडेशन' हा खास ट्रस्ट तयार केला. त्याला देणगी द्यायची आणि आपली कामे अमेरिकन सरकारकडून करून घ्यायची, असे त्या ट्रस्टचे साधेसरळ स्वरूप होते. ट्रस्टमध्ये असंख्य कोटी डॉलर्स जमा झाले. तिला खूष करण्यासाठी पत्रकार, आजी-माजी नोकरशहा यांच्यात जणू अहमहमिका लागली. सगळे २०१६च्या सुखस्वप्नात गुंग झाले.

बरेच वेळा नजर वर लागली असताना पायाशी काय जळत आहे इथे आपले लक्ष नसते. डेमोक्रॅटिक पक्षाच्या अंतर्गत पक्षनेतृत्वाविरुद्ध, वॉल स्ट्रीटविरुद्ध आणि एकूण श्रीमंत वर्गाविरुद्धच असंतोष खदखदत होता. अशा लाटेवरच 'Hope and Change' या नावाखाली ओबामा निवडून आला होता. ओबामाने आपल्याला पद्धतशीर मामा केला असाही एक सूर पक्षाच्या डाव्या मंडळीत होता. त्यांना एक आशेचा किरण दिसला. व्हर्मांट नावाच्या राज्यातल्या (हे कुठे आहे हे ९०% अमेरिकन लोकांना माहीत नाही) बर्नार्ड सँडर्स नावाचा (हा ९८% अमेरिकन लोकांना माहीत नव्हता), जोरजोरात हातवारे करून बोलणारा, पिंजारलेल्या केसाचा, न्यूयॉर्कवाणीत बोलणारा, ७५ वर्षांचा, ज्यूवंशीय, स्वत:ला समाजवादी म्हणवून घेणारा एक विक्षिप्त म्हातारा हिलरीविरुद्ध उभा राहिला. त्याला पक्षातल्या असंतुष्ट लोकांनी डोक्यावर घेतले.

सुरुवातीस हिलरीला त्याची गंमत वाटली. पण पक्षांतर्गत प्राथमिक निवडणुकीत त्याची मते २% वरून ५०% वर आली तेव्हा ती घाबरली. २००८ सालचा ओबामा डोळ्यासमोर उभा राहिला. सँडर्सला पाडण्यासाठी तिने आणि तिच्या 'लोंबत्यांनी' घाणेरडे राजकीय खेळ चालू केले. ते खेळ पक्षाध्यक्ष पडेस्टा

याच्या खासगी ई-मेलमधून बाहेर पडले. हे ई-मेल्स ज्यूलिअन असांज नावाच्या पत्रकाराने आपल्या 'विकीलीक्स'मध्ये प्रसिद्ध केले. हिलरीची बदनामी झाली. ई-मेल्स चोरले कुणी? इथे अॅगथा ख्रिस्तीलासुद्धा लाजवेल अशा रहस्यमय नाटकाचा पहिला अंक चालू झाला.

''अर्थातच रशियानं'' हिलरीचा दावा. ''माझ्यासारखी खमकी स्त्री पुटिनला नकोय.'' ''असांज नाव सांगायला तयार नाही. पण आपल्याला ते रशियाकडून मिळाले नाहीत.'' असं तो म्हणतो. ''मी ई-मेल्स असांजला दिले. पण मला कुणी दिले, हे मी सांगणार नाही,'' असं एक माजी ब्रिटीश अँबॅसडर म्हणतो. अमेरिकेच्या हेरखात्याच्या चार विभागांनी मात्र (अप्रामाणिकपणे) हिलरीची बाजू उचलून धरली. त्यांच्या मते हे ई-मेल्स चोरले नसून ते रशियाने इंटरनेटवरून हॅक केले आणि असांजला दिले. ''असांज हा रशियाचा हेर म्हणून अनेक वर्षं काम करतोय.'' असा हिलरीपंथीय लोकांचा आरोप आहे. (तो सध्या इंग्लंडच्या तुरुंगात खतपत पडलाय.)

काही दिवसातच DNC च्या संगणक विभागात काम करणाऱ्या एका तरुणाचा खून झाला. (वॉटरगेट आणि रशिया गेट यांच्यातला DNC हा एकमेव दुवा.) त्याने चोरून ईमेल्स असांजला दिले होते का? म्हणून त्याचा खून झाला का? संगणकातून चोरी झाली की तो हॅक झाला हे संगणकाच्या तपासावरून कळलं असतं. पण हिलरीचे लोक तो संगणक FBI ला तपासाला द्यायला तयार नाहीत आणि गंमत म्हणजे FBI तो मागतही नाही! सगळंच संशयास्पद. या प्रकरणापासून होणारा आवाज दडपणं गरजेचं होतं. इथून पुढे अमेरिकेच्या पवित्र निवडणुकीत रशियाची (किंवा समानार्थी पुटिनची) अमंगळ ढवळाढवळ, हा गजर चालू होतो.

त्याच सुमारास विरुद्ध रिपब्लिकन पक्षात डॉनल्ड ट्रंप नावाच्या एका धशचोट समंधाचा उदय झाला. वाह्यात गमजा मारणं हे त्याचे वैशिष्ट्य. राजकारणात आतापर्यंत प्रस्थापित झालेल्या सर्व प्रथा त्याने पायाखाली तुडवल्या. खुद्द रिपब्लिकन पक्षातल्या ''आदरणीय'' व्यक्तींची टिंगल केली. रशियाबद्दल प्रश्न विचारला तर पक्षातले इतर उमेदवार ''मी निवडून आलो/ले तर पहिल्या प्रथम पुटिनचं नरडं पकडीन.'' असं उत्तर देत असताना ट्रंप एकटा म्हणायचा, ''मी पुटिनशी मैत्री करेन. रशियाशी संबंध सुधारीन.'' असला माणूस आपला प्रतिस्पर्धी असला तर चांगलंच. त्या दृष्टीने हिलरीने प्रयत्न केला. तिची इच्छा सफल झाली आणि ट्रंपच्या पक्षाने त्याला उमेदवारी दिली.

'आता ट्रंपचा रशियाशी संबंध लावायचा म्हणजे काम फत्ते', असा हिलरीचा होरा. २०१६ सालच्या जुलैमध्ये तिच्या एका चमच्याने 'पुटिनच्या हातातलं बाहुलं: ट्रंप' हा लेख प्रसिद्ध केला. हा हिलरीने (शिखंडीआडून) सोडलेला पहिला बाण. आपण निवडून आल्यानंतर तुमची नेमणूक मोठेमोठ्या जागांवर करू असं प्रलोभन दाखवून तिने अनेकांना कामाला लावले, सी.आय.ए.चे माजी प्रमुख मायकल मोरेल याने ५ ऑगस्ट २०१६ रोजी 'न्यूयॉर्क टाइम्स'मध्ये लेख लिहिला. ''माझा हिलरीला शंभर टक्के पाठिंबा आहे. माझ्या मते ट्रंप हा देशाच्या सुरक्षिततेला मोठा धोका ठरेल.'' हे नवीन होतं. देशाच्या महत्त्वाच्या पदावरच्या जुन्या आणि जाणत्या माणसाने अशा प्रकारे निवडणुकीत ढवळाढवळ करणं पूर्वी कधी झालं नव्हतं, पण ही नुसती सुरुवात होती.

पुढच्या अंकात इंग्लंडच्या एक जेम्स बाँडने प्रवेश केला. त्याचे नाव स्टील. दोन्ही पक्षांकडून पैसे घेऊन हा दोघांनाही मामा करत होता. किंबहुना त्यांना आवडेल ते पुरवत होता, भरवत होता. त्याने ट्रंप आणि पुटिनच्या सुरस आणि अश्लील प्रेमकथा पसरवल्या. त्या लोकांनी हावरटपणे वाचल्या. ट्रंपला वेश्या पुरवून पुटिन त्याला ब्लॅकमेल करणार आहे, हा मुख्य विषय. (ट्रंपचं वेश्यागमन, त्याचा बाहेरख्यालीपणा जगजाहीर असताना ट्रंप कसा काय ब्लॅकमेल होणार याचा कुणी विचार केला नाही.) स्टीलच्या बनावट अहवालाच्या आधारावरच FBI ने ट्रंपच्या काही कर्मचाऱ्यांवर वॉरंट काढले, त्यांच्यावर बेकायदेशीर पाळत ठेवली आणि ते चोरून रशियन लोकांना भेटतात वगैरे अफवा पसरवल्या.

स्टीलने दिलेल्या या अहवालात इतके ''हुक्स'' होते की प्रत्येक हुकला पकडून वेगवेगळ्या अशा असंख्य गोष्टी रचता येत होत्या आणि तथाकथित जबाबदार पत्रकारांनी त्या रचल्या. आपल्याला ज्या काही थापा मारायच्या त्या ''मला आतल्या गोटातून कळल्या,'' या मथळ्याखाली खपवायच्या. आपल्यासारखा दुसरा कुणी तरी उभा करायचा, त्याची मुलाखत घ्यायची आणि आपल्याला जी काही लोणकढी खपवायची आहे त्याला दुजारा घ्यायचा. (कालांतराने पुटिन आणि ट्रंपवर टाकण्यासाठी असे पन्नास-एक बाँबशेल तयार झाले. एकातही दम निघाला नाही. पण नंतर आपली अमुकअमुक बातमी चुकीची होती हे सांगायची साधी तसदीसुद्धा ती पसरवणाऱ्याने घेतली नाही.)

बघता-बघता नोव्हेंबर २०१६ची ६ तारीख आली. निवडणूक संपली. हिलरी आणि तिचा नवरा जांभळे कपडे घालून लोकांच्या अभिनंदनासाठी आतुरतेने सज्ज होते. (जांभळा हा यूरोपमधील राजांच्या कपड्यांचा पारंपरिक रंग असे.) प्रसार वाहिन्यांवरील बातमीदार हातात सरसावलेल्या पेन्सिली, चेहेऱ्यावर विद्वत्तेचा भाव, समोर लॅपटॉप, आणि मागे अमेरिकेचा भव्य नकाशा असा थाटात बसून अपरिहार्य अशा निकालाची वाट बघत होते. आकडेवारी करून आज रात्री ट्रंपची कशी कत्तल होणार हे श्रोत्यांना समजावून सांगत होते. मग विपरीत घडले. अशक्य ते शक्य झाले आणि शक्य ते अशक्य झाले. मर्तिकाच्या वातावरणाने आसमंताला ग्रासले. लोकांना अश्रू आवरेनासे झाले. आणि मोठा स्फोट झाला ''हा माझा प्रेसिडेंट नाही!''

हे असे कसे झाले? हा सगळा पुटिनचा हलकटपणा. त्याने स्वत:ला सर्वश्रेष्ठ समजणाऱ्या अमेरिकन गोऱ्या लोकांना – विशेषत: त्यांच्यातल्या स्त्रीद्वेष्ट्या पुरुषांना चिथवले. गोऱ्या-काळ्यांमधली तेढ वाढवून पुटिनने त्याचा ट्रंपला फायदा करून दिला. सोशल मीडियांचा गैरफायदा घेतला. अमेरिकेत असणाऱ्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग केला. पुटिनच्या आर.टी.या टीव्ही वाहिनीने अपप्रचाराचं टोक गाठलं. हे सर्व कशासाठी? ''केवळ मला पाडण्यासाठी'' हिलरी म्हणते. यापुढे ट्रंपशी फक्त संघर्ष –Resistence– आणि रशियाला धडा शिकवणे -Russiagate!

या धड्यातली पहिली पायरी म्हणजे ट्रंपची चौकशी करायला समिती नेमायची. असंच निक्सनच्या वेळेसही झालं होतं. त्यानंतर ट्रंपवर आरोपपत्र (Impeachment) सादर करायचं. मग खटला. पण ट्रंप म्हणजे निक्सन नाही हे त्यांना माहीत नव्हतं. चौकशी समिती नेमली तेव्हाच निक्सनला घाम फुटला होता. ट्रंप हा निर्लज्जातला निर्लज्ज माणूस. चौकशी चालू असतानाच जेव्हा-जेव्हा संधी मिळेल तेव्हा-तेव्हा तो पुटिनला भेटला. सगळ्यांच्या समोर भेटला. पडद्याआड भेटला. एकदा तर त्याने भाषांतरकर्त्याला हाकलून लावले. ''देशद्रोही'', चोहीकडून आरोळ्या फुटल्या. त्याचा स्वत:चा पक्ष तर जातिवंत रशियाविरोधीच. त्यांना पुरोगामी सामील झाले. स्त्रीमुक्तीवाले, समलिंगीमुक्तीवाले, वगैरे सर्वांच्या समोर एकच एककलमी कार्यक्रम: ट्रंप हटावो.

पुटिन आणि ट्रंप हे जागतिक व्यासपीठावर तीन-चार वेळा तरी भेटले असतील. प्रत्येक वेळेला अमेरिकेतल्या विद्वान पत्रकारांनी पुटिनला उद्देशून ''त्याला सांगितलं का? त्याला दम दिला का?'' असं लहान मुलं जसं आपल्या आईला सतावतात त्याप्रमाणे ट्रंपला सतावलं. आता दोन्ही राष्ट्रांकडे पृथ्वी दहा-वीस वेळा नष्ट करण्याइतके बाँब आहेत. त्यांना असल्या खुळचट प्रश्नांकडे लक्ष द्यायला कुठे वेळ आहे? शिवाय ट्रंपने असं विचारणं म्हणजे अप्रत्यक्षपणे आपली निवडणूक अवैध आहे असं कबूल करण्यासारखे नाही का? शेवटी वैतागून ट्रंपने सर्वांच्यासमोर पुटिनला सज्जड दम दिला. ''याच्यापुढे आमच्या निवडणुकीत ढवळाढवळ केलीस तर खबरदार.'' प्रश्न विचारणाऱ्याची चेष्टा झाली. घरी मात्र गदारोळ माजला.

घाईघाईने म्यूलर नावाच्या एका सज्जनाच्या नेतृत्वाखाली चौकशी समिती स्थापन केली. (म्यूलरऐवजी मलर, मर्लर हेसुद्धा उच्चार चालतात.) हा बुशच्या काळात FBI चा प्रमुख होता. इराककडे अॅटमबॉम्ब आहेत असं धडधडीत खोटं सांगणाऱ्यांमधला हा मोठा गड्डा. (अमेरिकेच्या अंतर्गत कायदा आणि सुव्यवस्थेचं काम नेमून दिलेली FBI ही संस्था इराकमध्ये काय करत होती, असले फालतू प्रश्न विचारायचे नाहीत.) एका बाजूला चौकशी समितीचं काम चालू असताना त्याचे असंख्य डॉक्टर वॉट्सन दोन वर्षं टीव्हीवरती त्या म्यूलर नामक शरलॉक होम्सच्या वेगवेगळ्या क्लृप्त्या लोकांना समजावून सांगत. शेवटी एकदाचा समितीचा अहवाल बाहेर पडला. आठ कोटी डॉलर्स खर्च झाले. समितीच्या सदस्यांचा पाच वर्षांच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटला. एवढं असून ज्यांच्यामुळे हे सर्व रामायण घडले त्या असांज आणि स्टील यांना साध्या चौकशीसाठीसुद्धा बोलवले नाही! आणि जे तीस रशियन गुप्तहेर गुन्ह्यात गुंतलेले आहेत असं म्यूलर सांगतो त्यांना चौकशीसाठी बोलावता येणं अर्थातच शक्य नाही!

समितीचा निष्कर्ष काय? तर ''काहीतरी मजबूत लफडा दिसतोय पण आम्हाला पुरावा मिळत नाही.'' म्हणजे काय? दोन्ही बाजू आपण जिंकलो असा दंगा करताहेत. शेवटी म्यूलरला नक्की काय म्हणायचंय हे समजून घेण्यासाठी त्याची सर्व देशासमोर मुलाखत घेतली गेली. ती दिवसभर टिकली. त्यात तो जो काही भ्रमिष्टासारखं बोलला त्याचा अर्थ अजूनही लागत नाही. पण Resistence वाले Impeachment चा नाद सोडायला तयार नाहीत. ट्रंप निगरगट्ट माणूस आहे ही त्याच्या दृष्टीने एक मोठी जमेची बाजू आहे. एखादा लेचापेचा असता तर त्याला एव्हाना वेड लागलं असतं.

या सर्वातून काही निष्पन्न झालं नाही अशातला भाग नाही. खोट्या बातम्या पसरवतात या नावाखाली अप्रिय लोकांची मुस्कटदाबी चालू झाली आहे. त्यांचे सोशल मीडियावरचे अकाउंट्स बंद झालेत. त्यांच्या यूट्यूब वाहिन्यांवर गदा आली आहे. सर्व ''मुख्यप्रवाहातल्या'' वाहिन्या आणि वृत्तपत्रे फक्त सहा कॉर्पोरेशनच्या ताब्यात आहेत. खोटं बोलण्याबद्दल FBI चे जे आजी-माजी अधिकारी बदनाम झाले आहेत त्यांना या वाहिन्यांनी आपल्यात 'तज्ज्ञ सल्लगार' म्हणून सामील करून घेतले आहे. इथले काही पत्रकार आज दिवसाला तीस हजार डॉलर्स एवढे कमावतात. पद्धतशीर खोटं बोलल्याशिवाय बातम्या सनसनाटी होत नाहीत, असं काही जण कबूलही करतात.

**ताजी बातमी :** ट्रंपची नवीन एक भानगड नुकतीच बाहेर पडली आहे! त्याच्या आतल्या गोटातल्या कुण्या एका अनामिक माणसाचा गौप्यस्फोट! ट्रंपने कुठल्यातरी एका पुटिनसारख्या बदमाश नेत्याला एक सांगू नये ते गुपित सांगितले आहे. नक्की काही कळत नसले तरी बाब अतिशय गंभीर आहे, असे न्यूयॉर्क टाइम्स, वॉशिंग्टन पोस्ट यांचे मत आहे. आता मात्र Impeachment शिवाय गत्यंतर नाही!!

**– डॉ. मोहन द्रविड**
भ्रमणध्वनी : ९८२०५६३१३०
mohan.drawid@gmail.com

शेखर साठे

# जागतिक घडामोडींच्या संदर्भात भारतीय अर्थव्यवस्थेचा धावता आढावा

**मंदी आहे की नाही याची साधकबाधक चर्चा चालूच राहील. समाजाचे मानसिक ध्रुवीकरण बदलून एकमत होण्याची शक्यता नजीकच्या काळात तरी कमी आहे. जगापुढील प्रश्न कठीण आहेतच. परंतु भारतापुढील प्रश्न अधिक जटिल होत जाणार आहेत. त्या प्रश्नांना भारत सरकार कशा प्रकारे तोंड देईल हे पाहावयाचे बाकी आहे.**



कुठल्याही देशाची अर्थव्यवस्था आपल्याला कळली आहे असा दावा अर्थशास्त्रज्ञसुद्धा करू शकणार नाहीत. तरीही अर्थातच, अर्थव्यवस्थेबद्दल ते अधिकारवाणीने बोलू शकतात. याचा अर्थ असा नव्हे की इतरांना ते बोलायचा अधिकार नाही. अर्थव्यवस्थेची खुबी कशात असेल तर तिचे स्वरूप ठरवण्याचे अधिकार अर्थशास्त्रींच्या नव्हे तर बहुतकरून राजकारणी लोकांच्या हातात असतात आणि बऱ्याच वेळा अर्थसशास्त्रींची भूमिका जे काही होत आहे त्यावर भाष्य करण्याच्या पलीकडे जात नाही. पुष्कळदा, त्यांचे म्हणणे पत्रकार आणि चॅनेलकारांच्या म्हणण्यामध्ये हरवून जाते. त्यात इतरेतर सामान्यजन बुद्धिभेद करणाऱ्या जुजबी, बऱ्याच वेळा चुकीच्या माहितीवर किंवा विश्वासावर आधारलेली मते, किंवा विधाने चघळून आपले ज्ञान पाजळत राहतात. यात व्हॉट्सॲप किंवा फेसबुक यांसारखी समाजमाध्यमे हिरिरीने आघाडीवर असतात. सध्याचा काळ असा आहे, की आपल्या देशातलेच काय, साऱ्या जगातल्या वातावरणाचेच ध्रुवीकरण झाले आहे. त्यामुळे

विचारांतला मध्यममार्गच लुप्त झाल्यासारखा दिसतो.

लुप्त झाल्यासारखा दिसतो असे म्हटले त्यात एकप्रकारचा विरोधाभास असला तरी ते सत्य आहे. लुप्त आहे ते दिसणार कसे? गंमत अशी, की पाहूनसुद्धा म्हणजे शोधूनसुद्धा सापडत नाही म्हणून लुप्त म्हणायचे. सापडतात ती मतांची, विचाराची, आवडीनिवडीची आणि जगण्याचीसुद्धा दोन टोके - घरात असो, की कामाच्या ठिकाणी असो, की समाजात असो. मुद्दा असा, की वाद-प्रतिवाद करताना एक बाजू घेणे अपरिहार्य आहे. तशी घेतली नाही तर या विषयावरची चर्चा संदर्भहीन आणि अनुद्‌बोधक व्हायचीच शक्यता अधिक. अधिकृत असो वा अनधिकृत, माहितीचे स्रोत गढूळ झालेले आहेत. खरी माहिती कोणती आणि खोटी कोणती हे पडताळणे दुरापास्त किंवा अतिशय वेळखाऊ होते तेव्हा सद्‌सद्विवेक कामाला येतो. मूळ तत्त्वशीलतेचा आधार घ्यावा लागतो आणि आपला तर्क किंवा अनुमान सिद्ध होण्याची किंवा त्याला अनुमोदन मिळण्याची वाट पाहावी लागते. त्यामुळे मी निष्पक्षपातीपणाने मांडणी करतो आहे असा माझा दावा नाही. परंतु, मी जे मांडणार आहे त्यातील मूलतत्त्वे स्पष्ट करीत माझे म्हणणे मांडणार आहे. प्रश्नांची उकल करणे आणि मूलतत्त्वांच्या आधाराने घडणाऱ्या घटनांचा ऊहापोह करणे एवढाच माझा उद्देश आहे. भरमसाट आकडेवारी देण्याचे किंवा स्पष्टीकरणाशिवाय पारिभाषिक शब्द वापरण्याचे तसेच ज्या प्रश्नातच उत्तर अनुस्यूत असते असे (ऱ्हेटॉरिक) प्रश्न विचारणे मी टाळणार आहे.

**अर्थशास्त्र हे काही विज्ञान नव्हे**

अर्थशास्त्र या शब्दात 'शास्त्र' असले तरी ते काही विज्ञान नव्हे. अर्थशास्त्री त्यांच्या अभ्यासात कितीही गणित वापरत असले किंवा सांख्यिकीचा (स्टॅटिस्टिक्स) आधार घेत असले, पारिभाषिक शब्द वापरत असले, तरी त्यामुळे त्या विषयातले सिद्धांत प्रयोगाने सिद्ध किंवा रद्दबातल होण्यासारखे नसतात. त्या सिद्धांतांची परिणती आर्थिक-राजकीय धोरणात होत असते आणि त्या धोरणाची उपयुक्तता केवळ त्यांच्या सामाजिक यशापयशाच्या मोजमापाने सांगता येते. यशापयशसुद्धा एकूण समाजजीवनावरचा परिणाम हितकारक की अहितकारक आहे यावरून ठरते, राजकीय उद्दिष्टांवर किंवा राजकीय प्रतिस्पर्ध्यांवर कुरघोडी करून नव्हे. अर्थात शास्त्रीय विचारपद्धतीचा अनेक समाजशास्त्रांप्रमाणेच अर्थशास्त्रालाही खूप लाभ होतो.

निखळ अर्थशास्त्र असा विषयच अस्तित्वात असू शकत नाही, कारण अर्थव्यवस्थेला राजकीय व सामाजिक परिमाण असतेच असते. लोकांना आर्थिक सुरक्षा नसेल तर समाजात असंतोष आणि राज्यकर्त्या वर्गाला धोका अपरिहार्य असतो. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊनच आधुनिक भांडवलदारी लोकशाही राज्यघटनेची निर्मिती झाली आहे. त्या राज्यघटनेनुसार, कमीअधिक प्रमाणात जगातील सर्व लोकशाही देशांत प्रत्येक व्यक्तीचे, मग ती व्यक्ती कुठल्याही जातीची, धर्माची, प्रांताची, रंगाची किंवा वंशाची असो, तिची भाषा, विचार, संचार आणि धर्माचरण यांसारखी मूलभूत स्वातंत्र्ये आणि त्यांना धरून जगण्याचे हक्क संरक्षित असतात. गेल्या शतकातल्या दुसऱ्या जागतिक युद्धानंतर उदयाला आलेल्या आधुनिक जगाने हा मार्ग स्वीकारलेला आहे. आपल्यापुढील आर्थिक समस्यांचा विचार करताना या मूलभूत गोष्टी नजरेआड होऊ नयेत म्हणून त्यांचा उल्लेख केला. येथे २००८ सालच्या जागतिक वित्तीय अरिष्टानंतर भारताच्या अर्थव्यवस्थेतील स्थित्यंतराचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु तसे करण्याआधी थोडक्यात १९९२ साली आपल्या अर्थव्यवस्थेमध्ये घडून आलेल्या आमूलाग्र बदलाचा आणि त्या काळी जागतिक अर्थकारणात वाहू लागलेले वारे यांचा थोडक्यात परामर्श घेणे मला आवश्यक वाटते.

**दुसऱ्या जागतिक युद्धानंतरचे जग**

दुसरे जागतिक युद्ध संपल्यानंतर शीतयुद्धाच्या सावटाखाली जगाचे साधारणतः तीन भागांत आर्थिक विभाजन झाल्याचे मानण्यात येत असे. अमेरिकन छत्राखालचे प्रगत भांडवलशाही देशांचे पहिले जग, लोखंडी पडद्यामागील रशियन प्रभावाखालचे साम्यवादी दुसरे जग आणि मागासलेले, प्रगतिशील, विखुरलेले तिसरे जग, अशी ती विभागणी होती. पैकी पहिली दोन्ही जगे दोन शत्रूसमान लष्करी गटांमध्ये (वॉरसॉ आणि नाटो करार) आक्रमकपणे संघटित होती तर तिसरे जग, भारत व चीनसह बहुतांशी दोन्हीपैकी कुठल्याही राजकीय आणि लष्करी तळाशी असंलग्न होते. तशी अलिप्तता प्रस्थापित करण्यामध्ये नेहरूंच्या नेतृत्वाखाली भारताने मोठा पुढाकार घेतला होता. पैकी चीन साम्यवादी तर भारत मिश्रअर्थव्यवस्था असलेला आणि मूलतः भांडवलशाही-लोकशाही तत्त्वांवर आधारित धर्मनिरपेक्ष संघराज्य म्हणून उभा होता. १९७१ साली अमेरिकेचे सकल राष्ट्रीय उत्पन्न (जीडीपी) चीनच्या ११.५ पट तर भारताच्या १७.५ पट होते (फक्त चीन-भारत अशी तुलना करायची झाली तर चीनचा जीडीपी भारताच्या दीड पट होता). १९७१ सालच्या जगाकडे पाहिले तर ते जग आणि त्यातले पहिले जगसुद्धा आजच्या जगाइतके समृद्ध नव्हते. खुद्द अमेरिकासुद्धा गरिबी आणि वांशिक भेदांच्या प्रश्नांनी आणि व्हिएतनाममधील पराभवाने ग्रस्त होती. लोखंडी पडद्याआडसुद्धा सर्व काही आलबेल नव्हते. भारत, चीन आणि इतर तिसऱ्या जगातील देशांमध्ये दारिद्र्याला सीमा नव्हती. जगाच्या आर्थिक वाटचालीचा वेग सर्वत्र बेताचाच होता.

परंतु पुढच्या पंधरा-सोळा वर्षांनंतर जगात वेगळेच वारे वाहू लागले. हा बदल इतका अनपेक्षित होता की जगातले सर्वात बलाढ्य गुप्तहेरखाते असलेल्या अमेरिकेलासुद्धा त्याची कल्पना नव्हती. रशियाच्या गोर्बाचेव्ह यांनी पुनर्रचनेची आणि मोकळेपणाची घोषणा करून सोव्हिएत युनियनमध्ये आणि परिघातल्या राष्ट्रांच्या विघटनाची वाट मोकळी केली. त्याच

जोशात त्यांनी अमेरिकेच्या रेगन यांच्याशी हस्तांदोलन करून अण्वस्त्रे नष्ट करण्याच्या कराराला मूर्त स्वरूप दिले आणि जर्मनीच्या युद्धोत्तर फाळणीचे प्रतीक असलेली अभेद्य बर्लिन वॉल एका रात्रीत लोकांनी पाडली. अमेरिकेला जगाची एकहाती सत्ता गवसली आणि जागतिक तेलराजकारणाने एका नव्या संघर्षाचे रौद्ररूप धारण केले. त्याचे भारतावर अनपेक्षितपणे प्रचंड परिणाम झाले. रशिया आणि रशियन छत्राखालील इतर युरोपीय देश यांचा भारताच्या एकूण व्यापारातील वाटा जवळजवळ ४० टक्के होता. तो व्यापार ते देश कोलमडल्यामुळे अचानकपणे ठप्प झाला. मध्यपूर्वेतील अमेरिकेच्या इराकवरील हल्ल्यानंतर तेथे स्थायिक असलेल्या अनिवासी भारतीयांच्या झुंडी अचानकपणे स्वदेशी परत येऊ लागल्या आणि त्यांच्याकडून आपल्या देशाकडे वाहणारा डॉलरचा ओघ पूर्णपणे आटला. भारताकडची डॉलरची गंगाजळी संपत आली आणि देशावर काखा वर करायची पाळी आली. अशावेळी त्यावेळचे अर्थमंत्री, अर्थतज्ज्ञ मनमोहनसिंग यांनी पंतप्रधान नरसिंह राव यांच्या सहमतीने काही धाडसी पावले उचलली. त्या पावलांच्या परिणामी भारताच्या नव्या आर्थिक वाटचालीची सुरुवात झाली. त्याआधीच १९८४ ते १९८९ यादरम्यान राजीव गांधींनी दूरसंचार आणि संपर्कक्षेत्रात आधुनिकता आणण्यासाठी आणि संगणकीकरणासाठी नेटाने प्रयत्न सुरू केले होते.

**नव्या आर्थिक धोरणाची त्रिसूत्री**

एका त्रिसूत्रीला धरून १९९२ सालच्या आपल्या देशातील आर्थिक सुधारणा करण्यात आल्या होत्या. नियमनाचे शिथिलीकरण, धोरणाचे उदारीकरण आणि अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण ही ती त्रिसूत्री होती. लेखणीच्या एका फटकाऱ्याने लायसेन्सराज बरखास्त करण्यात आले व नवीन उद्योग सुरू करण्यासंबंधी सर्व निर्णयाधिकार प्रवर्तक उद्योजकांवर सोडण्यात आले. भांडवलउभारणी आणि व्याजदर व नव्या भांडवलनिर्मितीचा भाव ठरवण्याचे सर्व अधिकार सुनियोजित पद्धतीने रिझर्व्ह बँक आणि सेबी यांसारख्या स्वायत्त संस्थांच्या देखरेखीखाली सोडून बाजारशक्तींना पूर्ण वाव देण्यात आला. देशाचे आयातधोरण उदार करून जवळजवळ सर्व प्रकारच्या आयातीला मुभा देण्यात आली. परकीय भांडवल भारतात यावे म्हणून अनेक मार्ग मोकळे करण्यात आले. भारतीय अर्थव्यवस्था गजगतीने चालते असे वर्णन करण्यात येत असे. त्या मंदगतीला हिंदू विकास दर असेही म्हणत. १९९२ नंतर हत्ती धावायला सुरुवात झाली.

या सर्व सुधारणा करताना पुरेसा सावधपणा बाळगण्यात आला. एक म्हणजे, रुपया आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पूर्णपणे परिवर्तनीय न करता भारतीय नागरिकांना रुपयाचे परकीय चलनात रूपांतर करण्यासाठी भरपूर मुभा देण्यात आली. मात्र परदेशी संस्था किंवा व्यक्ती यांच्यासाठी रुपयाच्या विनिमयावरची बंधने सैल केली असली तरी पूर्णपणे हटवली नाहीत. दुसरी गोष्ट म्हणजे परकीय संस्थांना आणि उद्योजकांना भारतामध्ये थेट गुंतवणूक आणि भागभांडवलबाजारात गुंतवणूक करता यावी यासाठी पारदर्शक धोरण ठरवण्यात आले. ती मुभा देताना त्यांना भारतीय कर्जरोख्यांमध्ये केवळ मर्यादित गुंतवणूक करण्याची परवानगी देण्यात आली. तिसरी गोष्ट म्हणजे परकीय चलनाच्या रूपाने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कर्जे उचलण्याच्या बाबतीत संयमी धोरण ठेवण्यात आले. भारत सरकारनेही तसे कर्ज उचलण्याचे टाळले. चौथी गोष्ट म्हणजे सरकारच्या वार्षिक जमाखर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी आर्थिक तुटीवर जीडीपीच्या ३.५ टक्के मर्यादा कायद्याने ठरवण्यात आली (फिस्कल रिस्पॉन्सिबिलिटी ॲक्ट).

ही सर्व बंधने आणि सवलती प्रत्येक बाबतीत साधकबाधक चर्चा करून पूर्ण विचाराअंती ठरवण्यात आल्या होत्या. नव्वदच्या दशकाच्या शेवटीशेवटी पूर्वेकडील राष्ट्रांमध्ये परकीय चलनाचे मोठे अरिष्ट आले होते. ज्या अर्थव्यवस्थांचे वाघ म्हणून वर्णन करण्यात येत असे त्या अर्थव्यवस्थांना जबरदस्त झटका बसला होता. भारत मात्र संयमी धोरणांमुळे त्या अरिष्टातून सहीसलामत सुटला होता. एकीकडे पूर्वेकडील देशांमध्ये चलनाचे अरिष्ट उजेडात येत असताना जगातील सर्व भांडवलबाजारांमध्ये डॉटकॉम कंपन्यांचा फुगा फुगत होता. त्याकाळात वायटूके नावाचा एक मोठा बागुलबुवा जगातल्या सर्व उद्योगधंद्यांना भिववीत होता. शतक संपले. तो बागुलबुवा फुसका बार निघाला आणि नवे शतक उजाडता उजाडता डॉटकॉमचा फुगा फुटला. भारतातील गुंतवणूकदारांना त्याचा फटका थोडाफार बसलाही, पण त्याचे अर्थव्यवस्थेवर फारसे गंभीर परिणाम झाले नाहीत.

**युरोपचे आर्थिक संघराज्य**

याच सुमाराला युरोपने एक धाडसी पाऊल टाकले. पूर्व आणि पश्चिम जर्मनीच्या युतीनंतर केवळ दहा वर्षांच्या आत युरोपीय संघाची स्थापना होऊन सर्व घटक देशांनी आपापली स्वतंत्र चलने बरखास्त करून (ब्रिटनचा अपवाद वगळता) युरो नावाने एक नवीनच सामाईक चलन स्वीकारले, संघामधील सर्व नागरिकांना संचारस्वातंत्र्य देऊन कुठेही नोकरी किंवा उद्योगधंदा करण्याचे स्वातंत्र्य दिले आणि व्यापार पूर्णतः मुक्त केला. जुना राष्ट्रवाद एकप्रकारे बासनात गुंडाळून युरोपला एक नवी सामूहिक ओळख दिली. अशाप्रकारे जागतिकीकरणाच्या नव्या चक्राला एक वेगळेच परिमाण मिळाले. त्याचवेळी अमेरिकेच्या राजकीय व आर्थिक नेतृत्वाखाली एकध्रुवीय जगाचे अनावरण झाले. त्या एकध्रुवीय जगात अमेरिकेच्या सर्वात बलाढ्य अर्थव्यवस्थेचे वर्चस्व होते आणि समाजवादाची पूर्ण पीछेहाट होऊन भांडवलशाहीच्या अनिर्बंध वाटचालीला मोकळे रान मिळाले. वायटूकेच्या निमित्ताने सुरू झालेली संपर्कमाध्यमे आणि माहिती-तंत्रज्ञानातली क्रांती वेगाने जगभर पसरली. ती पसरत

असताना जगातील नव्या समीकरणांचा फायदा घेत साम्यवादी चीनने भांडवलशाही जगाचे उत्पादित वस्तूंचे पुरवठादार म्हणून स्थान पटकावण्यास सुरुवात केली. २०१९ साली चीन अमेरिकेपाठोपाठ सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे, पण अमेरिका दीड पटीने चीनच्या तर भारताच्या सातपट पुढे आहे. भारत व चीन यांच्यामधील सकल राष्ट्रीय उत्पन्नामधील दरी कमी होण्याची चिन्हे अजिबात दिसत नाहीत.

**जीडीपी म्हणजे नेमके काय?**

सकल राष्ट्रीय उत्पन्न (ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट - जीडीपी) म्हणजे काय ते आपण थोडक्यात पाहू. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अध्यक्ष मोहन भागवत यांचे म्हणणे काहीही असो (जीडीपी हे प्रगतीचे योग्य माप नव्हे असे ते म्हणतात), जगभर कुठल्याही देशाची आर्थिक प्रगती मोजण्याचा जीडीपी हा एक सर्वमान्य निकष आहे. त्याव्यतिरिक्त इतर अनेक निकषही आहेत. जीडीपीमध्ये देशाच्या आर्थिक व्यवहारांच्या एकूण स्थितीचे दर्शन होते. देशाच्या सीमेअंतर्गत वस्तू आणि सेवा यांच्या उत्पादनावर एकूण किती खर्च होतो याचे मोजमाप करण्यात येते. त्या वस्तू आणि सेवा यांच्या वाढणाऱ्या किमती लक्षात घेऊन नाममात्र असलेल्या आकड्याचे वास्तविक आकड्यामध्ये रूपांतर करण्यात येते. तसे करताना पाया म्हणून एका संदर्भवर्षाची निश्चिती करण्यात येते. मग दरवर्षी ते मोजमाप करून अर्थव्यवस्था किती वेगाने वाढते आहे हे पाहिले जाते. जीडीपीची कल्पना समजायला अतिशय सोपी आहे, पण तिचे मोजमाप अत्यंत काटेकोरपणे नियमाधिष्ठित पद्धतीने केले जाणे अपेक्षित असते. २०१४ सालानंतर आपल्याकडे जीडीपी मोजण्याच्या पद्धतीत अचानक बदल करण्यात आला व आधीच्या पाच वर्षांचे आकडे दुरुस्त करण्यात आले. मात्र तो बदल करण्यामागची कारणमीमांसा स्पष्ट करण्यात आली नाही. त्यामुळे अनेक अर्थशास्त्रज्ञ आणि संस्थाधिकाऱ्यांच्या मनात प्रसृत जीडीपी आकडेवारीसंबंधी शंका होत्या. त्या शंकांचे अजूनही निरसन झालेले नाही. दुर्दैवाने, तीच आकडेवारी वापरण्याशिवाय दुसरा पर्याय उपलब्ध नाही.

जीडीपी मोजण्याच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. त्यातली समजायला सोपी खर्चाच्या आधारे केलेले मोजमाप ही पद्धत पुढीलप्रमाणे. देशाच्या अर्थव्यवस्थेतील सहभागी घटकांचे चार मुख्य प्रकार मानण्यात येतात. ते म्हणजे उद्योग-व्यवसाय करणाऱ्या सर्वप्रकारच्या कंपन्या, घरगुती क्षेत्र (यामध्ये सर्व व्यक्ती, कुटुंबे, सेवाभावी संस्था इत्यादी), सरकार (राज्य, केंद्र, स्थानिक, नागरी इत्यादी) आणि देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील आयात-निर्यातीमधील निव्वळ बाकी, हे ते चार घटक होत. यातील प्रत्येक घटक वस्तूंच्या आणि सेवांच्या उत्पादनावर एका वर्षात देशांतर्गत किती खर्च करतो याची गोळाबेरीज म्हणजे त्या वर्षाचा जीडीपी. यातले महत्त्वाचे तत्त्व म्हणजे होणारा खर्च वस्तू किंवा सेवा यांच्या प्रत्यक्ष उत्पादनाच्या कामासाठी खर्च झाला असला पाहिजे ही आहे. त्यामुळे बँकेत ठेवलेल्या ठेवी किंवा बँकांनी दिलेली कर्जे, निवृत्तीवेतन, सरकारने दिलेल्या सबसिडी अशा खर्चांचा जीडीपीमध्ये समावेश होत नाही. आयात-निर्यातीच्या बाबतीत एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. परदेशातून आपल्या देशात आलेला माल (आयात) हा आपल्या देशात उत्पादित झालेला नसल्यामुळे तो वजा करावा लागतो, तर आपल्या देशातून निर्यात होणार माल जोडावा लागतो. दुसऱ्या शब्दांत, आयात जास्त असेल तर आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट वजा होते, त्याउलट, निर्यात जास्त असेल तर ते अतिरिक्त उत्पादन जीडीपीमध्ये भर घालते. भारताच्या अर्थव्यवस्थेत घरगुती क्षेत्राचे जीडीपीमधील योगदान ५० टक्क्यांहून अधिक आहे. अंतिमतः सर्व वस्तू आणि सेवा यांचे उत्पादन प्रामुख्याने घरगुती क्षेत्राच्या उपभोगासाठी होत असल्यामुळे या क्षेत्रात मागणीची घट झाली तर तिचा अर्थव्यवस्थेवर सर्वाधिक आणि मूलगामी परिणाम होतो. भारताच्या बाबतीत (आणि अमेरिकेच्या बाबतीतही) आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपली आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट. ही नित्यनेमाने आपल्या जीडीपीमध्ये घट करत असते. तुलनेने, चीनच्या बाबतीत त्यांची निर्यात आयातीपेक्षा खूप अधिक असल्यामुळे त्यांच्या जीडीपीत भर पडत असते. जीडीपी मोजण्याचे दुसरे माप म्हणजे अर्थव्यवस्थेतील सर्व सेवा आणि वस्तू यांच्या उत्पादनाची गोळाबेरीज करणे. दोन्ही मापनपद्धतींमध्ये निष्कर्ष एकच निघायला हवा.

**जागतिक अरिष्टाच्या दिशेने वाटचाल**

डॉटकॉमचा फुगा फुटल्यानंतर अमेरिकेत एक वेगळाच फुगा अनपेक्षितपणे तयार होऊ लागला. २००१ साली धाकटे जॉर्ज डब्ल्यू बुश 'सहृदय कॉंझर्व्हेटिव्ह' ही प्रतिमा पांघरून अटीतटीच्या लढतीमध्ये अध्यक्ष म्हणून निवडून आले. त्यांनी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यावर केवळ सात-आठ महिन्यांतच वर्ल्ड ट्रेड सेंटरवरचा भीषण दहशतवादी हल्ला झाला. त्या हल्ल्यानंतर त्यांनी दहशतवादाविरुद्ध युद्ध पुकारले (वॉर ऑन टेरर) आणि मंदीच्या दिशेने पुन्हा पुन्हा झुकू पाहणाऱ्या अमेरिकन अर्थव्यवस्थेला तारण्यासाठी अमेरिकेत इन्कम टॅक्स नाट्यमयरीत्या कमी करण्यात आला. (आपल्याकडे अशा प्रकारची नाट्यमय कपात अलीकडेच करण्यात आली याचा उल्लेख पुढे येईलच. शिवाय दहशतवादाविरुद्ध लढाई आहेच!). त्याशिवाय, व्याजाचे दर माफक ठेवून अमेरिकन बँकांना भांडवली बाजारात आणि वित्तबाजारात डेरिव्हेटिव्हज् ट्रेडिंग करायला प्रथमच संपूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले. बँकांवरचे नियंत्रण कमी करण्यामागे त्यांना युरोपीय बँकांशी स्पर्धा करता यावी असा वरकरणी उद्देश होता, पण प्रत्यक्षात मात्र बँकांना निरंकुश स्वातंत्र्य हवे होते आणि अनेक सबबी पुढे करून त्यांनी बुश सरकारकडून आपली मागणी पदरात पाडून घेतली. १९२९ सालच्या पहिल्या जागतिक मंदीच्या

काळात बँकांवर भांडवलबाजारात सहभाग घेऊ देण्यावर बंदी होती. ती बंदी घालणारा ग्लास स्टिगल कायदा २००१ साली रद्द करण्यात आला आणि सत्तर वर्षे अमलात असलेले बँकांवरचे कडक निर्बंध काढून टाकण्यात आले. पुढची पाच-सहा वर्षे बँकांनी अमेरिकेत आणि युरोपमध्ये बेफिकीर व्यवहारांचा हैदोस घातला.

भारताच्या जीडीपीमध्ये घरगुती उपभोगाचा वाटा पन्नास टक्क्यांहून अधिक आहे. अमेरिकेत तर तो वाटा सत्तर टक्क्यांहून अधिक आहे. त्यामुळे, जीडीपीच्या एकंदर वाटचालीमध्ये घरगुती क्षेत्रामध्ये मागणी कशी आहे, वस्तू आणि सेवा त्यांच्या उपभोगाची स्थिती कशी आहे यावर आर्थिक वाढ बऱ्याच अंशी अवलंबून असते. त्या तत्त्वाला धरून, अमेरिकेत २००० च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात घरगुती क्षेत्रामध्ये घरखरेदीला प्राध्यान्य देण्यात आले. बँकांनी घरखरेदीसाठी कर्जे देण्याचा सपाट लावला. घरांच्या किमती वाढू लागल्या. वित्तव्यवसायिकांमध्ये असा एक समज होता की घरासाठी कर्ज घेणारे लोक कधीही कर्ज बुडवत नाहीत. तो समज खोटा ठरण्याची परिस्थिती बँकांच्या वर्तणुकीमुळे बँकांवर ओढवली. गृहकर्जे देण्याचा अनुभव आणि यंत्रणा असणाऱ्या बँका थोड्याच होत्या, पण कर्ज देण्यासाठी सर्वच बँक आतुर होत्या. अशा बँकांनी गृहकर्जे देणाऱ्या बँकांकडून कर्जे विकत घ्यायला सुरुवात केली. गृहकर्जे देणाऱ्या बँकाही आपल्या हिशेबवहीतील कर्जे विकून नवी कर्जे द्यायला मोकळ्या झाल्या. घरांच्या किमती सतत वाढत असल्यामुळे बँका अधिकाधिक मोठी कर्जे देऊ लागल्या. लोकही सहज कर्ज मिळते म्हणून दोन-दोन, तीन-तीन घरांसाठी कर्ज घेऊ लागले. काही अतिकल्पक बँकांनी त्यात गृहकर्जावर आधारित डेरिव्हेटिव्ह प्रॉडक्ट्स काढून वित्तीय बाजारात विकायला सुरुवात केली. वित्तबाजारात भागभांडवल, कर्जरोखे यांचे व्यवहार चालतात हे आपल्याला माहीत आहे. परंतु ते भागभांडवल किंवा ते कर्जरोखे भविष्यात तगतील की बुडतील, वाढतील की पडतील यासंबंधीच्या भाकितांवर आधारित व्युत्पन्न हुंड्या काढून त्यांची खरेदी-विक्री होते. त्या व्यवहारांना डेरिव्हेटिव्ह बाजार म्हणतात. असा डेरिव्हेटिव्ह बाजार भागभांडवल, कर्जरोखे, गृहकर्जे, परकीय चलनाचे विनिमयदर, सोने, चांदी व इतर धातू, खनिज, तेल-वायू, शेतीमाल या सर्वांमध्ये भरतो. अमेरिकेतील आणि पुढे जगातील बँका त्या व्यवहारामध्ये पडल्यानंतर त्या बाजारांत प्रत्यक्षातल्या वस्तू आणि सेवा यांच्या कितीतरी पटींनी अधिक असे व्यवहार होऊ लागले. त्या व्यवहारांमध्ये कुणाचा पायपोस कुणाच्या पायात राहिला नाही. त्यातून २००७ साली जागतिक वित्तीय अरिष्टाला सुरुवात झाली. गृहकर्जे बुडवणाऱ्या लोकांचे प्रमाण वाढल्यामुळे त्यावर आधारित सर्व इमले कोसळू लागले. आपल्या देशात ज्यांना नॉन-बँक फायनान्स कंपन्या म्हणतात त्यांना अमेरिकेत इन्व्हेस्टमेंट बँक असे गोंडस नाव आहे. आधी मोठ्या इन्व्हेस्टमेंट बँका कोसळायला सुरुवात झाली. काही मोठ्या इन्शुरन्स कंपन्या आणि काही मोठ्या बँका त्या अरिष्टाच्या कचाट्यात सापडल्या. आपल्या देशात आयएलएफएस, एचडीआयएल, इंडिया बुल्स यांच्याबाबतीत आता जे घडत आहे ते पाहता २००८ सालच्या जागतिक वित्तीय अरिष्टासारख्या अरिष्टाची आपल्या देशातली नांदी आहे असे म्हणता येईल. आपल्याकडे येऊ घातलेल्या वित्तीय अरिष्टाच्या मुळाशी मोठ्या पायाभूत सुविधांमधील बेताल गुंतवणूक, बेफाट गृहकर्जे आणि आटोक्याबाहेर जाऊ पाहणारी इतर बुडीत खात्यामधली कर्जे आहेत. त्यात प्रचंड अडचणीत सापडलेल्या बांधकाम उद्योगाची भर पडली आहे.

**युरोपीय संघाच्या नव्या इमारतीला तडे**

अमेरिकेच्या जोडीला युरोपमध्येसुद्धा त्याच प्रकारच्या प्रश्नांचे पेव फुटले होते. विशेष म्हणजे युरोपीय संघामध्ये आणखी एक प्रमाण पाहावयास मिळते. ते म्हणजे अखंड युरोपमधील कमकुवत देशांचा -ग्रीस, स्पेन, पोर्तुगाल, इटली आणि आयर्लंड - कर्जबाजारीपणा. त्या प्रकाराच्या कर्जबाजारीपणाचे आपल्याकडील परिस्थितीशी बरेच साम्य आहे. अमेरिका आणि युरोपमध्ये फेडरल रिझर्व्ह बँक आणि युरोपीयन सेंट्रल बँक यांनी आक्रमकपणे स्वस्त व्याजदराचे धोरण राबवायला सुरुवात केली. त्यांचे व्याजाचे दर जवळजवळ शून्याच्या घरात पोहोचले. यालाच मुबलक कर्जपुरवठ्याचे धोरण (इझी मनी पॉलिसी) म्हणतात. गेली दहा वर्षे त्या धोरणाचा अंमल चालू आहे, पण त्यांची आर्थिक कोंडी काही अजून फुटलेली नाही. एक गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे, ती म्हणजे २००८ सालच्या आर्थिक अरिष्टाचे भारतावर एक गोष्ट सोडता इतर फार परिणाम झाले नाहीत. वित्तीय अरिष्टाच्या काळात अमेरिकन डॉलर कमालीचा कमकुवत झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाचे भाव भडकले. २००९ साली दर पिंपाला ५० डॉलरच्या आसपास असलेला तेलाचा भाव मनमोहनसिंग सरकारच्या अखेरच्या वर्षात म्हणजे २०१४ च्या मे महिन्यात ११० डॉलरच्या वर पोहोचला. परंतु एकंदरीत २००९ च्या जागतिक वित्तीय अरिष्टानंतरच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेतला जोम कमी झाला तरी आर्थिक वाढ चालूच होती. मे २०१४ मध्ये मोदी देशाचे पंतप्रधान झाले आणि देशाच्या अर्थकारणाने नवे वळण घेतले. जीडीपीचे मोजमाप करण्याची पद्धत आणि पायाभूत वर्ष बदलण्यात येऊन नवी आकडेवारी प्रसिद्ध करण्यात येऊ लागली. ते काहीही असो, नव्या आकडेवारीनुसारसुद्धा गेल्या पाच तिमाहींमध्ये जीडीपीच्या वाढीचा दर सातत्याने खाली येत असल्याचे दिसत आहे. काहींच्या मते ही आकडेवारीसुद्धा २ ते ३ टक्क्यांनी अतिरंजित म्हणजे फुगवलेली आहे.

**नवे वादळ**

२०१४ साली मोदीसरकार राज्यावर येत असताना जागतिक बाजारपेठेत तेलाचा भाव ११० डॉलरच्या वर गेला होता. महत्त्वाचे म्हणजे त्यानंतर काही महिन्यांतच तेलाचे भाव नाट्यमयरीत्या पडून पन्नास डॉलरच्या खाली आले आणि आजतागायत बहुतांश काळ पन्नासच्या आसपासच आहेत. त्याला ऑइल बोनान्झा असे म्हणतात. जीडीपीच्या मोजमापात आयातीचे महत्त्व काय आहे याचाही आपण आधी उल्लेख केला आहे. आयात कमी झाल्यामुळे जीडीपीला उभारी मिळण्याऐवजी तेलाच्या किमतीमधली जवळजवळ संपूर्ण बचत कररूपाने सरकारखाती जमा होत राहून त्याचा आपल्या अर्थव्यवस्थेला म्हणावा तसा फायदा झाला नाही. निर्यात वाढविण्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्यामुळे आपल्या जीडीपीची ती बाजू कच्चीच राहिली आणि खालावणाऱ्या मागणीला आधार देण्याऐवजी सरकार एकापाठोपाठ एक असे धक्केच देत राहिले. भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाटचालीत ८५% नोटांचे वर्षभराकरता केलेले निश्चलीकरण आणि देशभर जीएसटीच्या रूपाने एकच वस्तू-सेवा करप्रणालीचा अंमल या दोन महत्त्वाच्या घटनांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्याआधी, जगात गेल्या पाच वर्षांत आणखी एक महत्त्वाचा बदल झाला आहे त्याची नोंद घेतलीच पाहिजे. १९८९ साली जगात एक वेगळेच वारे वाहू लागले होते याची आपण नोंद घेतली. जगामध्ये समाजवादाची पीछेहाट झाल्यानंतर उदारमतवादी भांडवलशाहीचा जगात विजय झाला आहे असे एक वातावरण तयार झाले होते. प्रत्यक्षात, ती हवा फारच थोडा काळ टिकली आणि २००८-०९ च्या जागतिक अरिष्टानंतर ते वातावरण झपाट्याने विरळ होऊ लागले आणि त्या कमी दबावाच्या क्षेत्रात अनुदार, संकुचित राष्ट्रवादी विचारसरणीचे वारे शिरू लागले आहे. जवळजवळ संपूर्ण युरोपला, अमेरिकेला आणि भारतालासुद्धा या वादळाने ग्रासले आहे.

**संकुचित राष्ट्रवाद**

माहिती आणि संपर्क माध्यमाच्या तंत्रज्ञानक्रांतीची सर्व सूत्रे, माहितीचा साठा, त्याचप्रमाणे ती माहिती आपल्याला हवी तशी फिरवून आपल्याच फायद्याच्या दृष्टीने पुढे ढकलण्याची कला काही मक्तेदारांच्या हाती एकवटली असल्याचे दिसते. त्याचप्रमाणे ती माहिती हवी तशी फिरवण्याचे कसब असलेले तंत्रवेत्ते ताब्यात ठेवण्याची क्रयशक्ती काही पैसेवाल्या शक्तींच्या हातात केंद्रित झाली आहे. त्यामुळे पूर्वी ज्याला सायलेंट मेजॉरिटी म्हणत ती सध्या अस्तित्वात असल्याचे दिसत नाही. त्यातून लेखाच्या सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे लोकमानसाचे पूर्णतः ध्रुवीकरण झाल्याचे दिसते. युरोप आणि अमेरिकेत परदेशी स्थलांतरितांविरोधी तसेच परधर्मीयांविरोधी मोठ्या प्रमाणावर जनमत संघटित होऊ लागल्याचे दिसत आहे. त्या जनमताने राष्ट्रवादाचा तसेच धार्मिक अस्मितेचा परिवेश धारण केलेला आहे. एकीकडे पुढारलेल्या प्रगत जगातली लोकसंख्या झपाट्याने वृद्ध होत आहे आणि त्यांच्याजवळ तरुण मनुष्यबळाची कमतरता तयार होत आहे. ती कमतरता भरून काढण्याएवढे सक्षम आणि सुशिक्षित मनुष्यबळ त्यांच्याजवळ नाही. ते त्यांना परदेशातून आयात करावे लागणार आहे हे उघडच आहे. परंतु तिथल्या तरुण आणि मध्यवयीन पिढीला ते अपमानास्पद आणि अन्याय्य वाटते. स्वस्तात मिळणाऱ्या परदेशी आणि परधर्मीय लोकांना झुकते माप देण्याचा उदारमतवादी अभिजनांचा तो एक डाव आहे असे त्यांना वाटते. स्थानिक, दुर्लक्षित, अन्य वर्णाच्या जनसमुदायांना मिळणाऱ्या सवलतींबाबतही त्यांना विषाद वाटतो. भारतामध्ये ऐतिहासिकदृष्ट्या दुर्लक्षित राहिलेल्या लोकांना मिळणाऱ्या सवलतींबाबतही तसाच विषाद दिसून येतो. हे उदारमतवादी लोकांनी स्वतःचा सामाजिक आणि राजकीय वरचष्मा प्रस्थापित करण्यासाठी कपटाने घडवून आणले आहे असे त्या संकुचित राष्ट्रवादी लोकांना वाटते. मूळच्या स्थानिक भूमिपुत्रांवर त्यामुळे अन्याय होतो म्हणून उदारमतवादी अभिजनांचे वर्चस्व हाणून पाडायचे सर्व राष्ट्रवाद्यांचे राजकीय ध्येय आहे. याबाबतीत जगभरच्या राष्ट्रवाद्यांचे एकमत आहे.

**डीमॉनेटायझेशन**

भारतातील चलनाच्या निश्चलीकरणाच्या म्हणजे डीमॉनेटायझेशनच्या दुष्परिणामांबद्दल खूप लिहिले गेले आहे. तरीही सत्तेवरील सरकार आणि त्यांचे समर्थक यांना ती एक मोठी चूक होती हे काही पटलेले नाही. तरीसुद्धा त्या धाडसी पावलाचे फायदे नेमके काय झाले हे कुणीही पुराव्यानिशी सांगू शकत नाही - कारण तसे पुरावेच उपलब्ध नाहीत. जे पुरावे आहेत ते सर्व त्या बेदरकार पावलाच्या दुष्परिणामांचे आहेत. डीमोनेटायझेशनला ३ वर्षे उलटली तरी नेमका किती काळा पैसा बाहेर आला याची कुणालाही माहिती नाही. सुरुवातीला दिवसागणीक डीमोनेटायझेशनचे वेगवेगळे उद्देश सांगितले जायचे. त्यातले एक उद्देश थोड्या विस्ताराने विशद करू. प्रत्येक छापील नोट म्हणजे रिझर्व्ह बँकेने धारणकर्त्याला दिलेली वचनचिठ्ठी असते. तिच्यावर गव्हर्नरची सही असते. तिला भारत सरकारची हमी असते. त्या नोटा रद्द केल्या की काळा पैसावाले घाबरतील आणि ते सर्व नोटा बँकेत जमा करू शकणार नाहीत. त्या नोटा मोदींनी म्हटल्याप्रमाणे कस्पटासमान होतील. तो पैसा नष्ट झाल्यात जमा होईल म्हणजे तेवढे रिझर्व्ह बँकेचे दायित्व कमी होईल. दायित्व कमी झाले याचा अर्थ रिझर्व्ह बँकेला तेवढा धनलाभ होईल आणि मग सरकारला ती रक्कम रिझर्व्ह बँकेकडे लाभांश म्हणून मागता येईल. अशा रकमेचा सर्वसाधारण अंदाज १,८०,००० कोटी रुपये सांगण्यात येत असे. प्रत्यक्षात जवळजवळ सर्व नोटा परत आल्या आणि सरकारी तिजोरीत तेवढे पैसे जमा होण्याचे स्वप्न धुळीला मिळाले. मात्र सरकार एवढे चिवट की रिझर्व बँकेच्या गंगाजळीतून तेवढा लाभांश त्यांनी अखेर या वर्षी दुसऱ्या

मार्गाने  काढला. त्या क्रमात रिझर्व्ह बँकेच्या दोन गव्हर्नरांना राजीनामा द्यावा लागला. शेवटी मर्जीतल्या अधिकाऱ्याला गव्हर्नरपदी बसवून आपल्याकडे वळेल असे धोरण त्या स्वायत्त संस्थेच्या गळी उतरविण्यात आले. डीमोनेटायझेशनमुळे शहरांतील आणि कृषिक्षेत्रातील असंघटित क्षेत्राची वाताहत झाली, अनेक छोटे उद्योग बंद पडून मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी तयार झाली हेसुद्धा सरकार मानायला तयार नाही. यासंबंधी कोणतीही आकडेवारी लोकांपुढे येऊ नये म्हणून मात्र त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केला. डीमोनेटायझेशनच्या जोडीला जीएसटीची नाट्यमय घोषणा आणि धरसोडीची अंमलबजावणी याचाही असंघटित क्षेत्रावर विपरीत परिणाम झाला. अपेक्षेपेक्षा कितीतरी कमी करवसुली प्रत्यक्षात हाती पडत आहे. त्या तुटीला रोडावणारी अर्थव्यवस्थाही जबादार आहे. पेट्रोल-डिझेल तर अजूनही जीएसटीच्या बाहेरच आहेत.

**सात महिन्यांत तीन अंदाजपत्रके**

यावर्षी तीन वेळा अंदाजपत्रक बनविण्याचा पराक्रम सरकारने केला आहे. हा बहुधा एक विक्रमच म्हणावा लागेल. निवडणुकीच्या आधी व्होट ऑन अकाउंटच्या नावाखाली जुजबी अंदाजपत्रक सादर करण्यात आले. पुढे निवडणूक जिंकल्यावर एक अंदाजपत्रक झाले आणि त्यानंतर लगेच तीन महिन्यांत कॉर्पोरेट इन्कम टॅक्सचे नाट्यमय सुधारित दर घोषित करण्यात आले. मुळात आर्थिक मंदी आहे हेच नाकारून वर्षाला सुरुवात झाली. सर्वच बाजूंनी जेव्हा विपरीत माहिती येऊ लागली तेव्हा कुठे सरकारने थोड्याशा नाराजीनेच आर्थिक मंदी येत असल्याची कबुली दिली आणि काही घोषणा केल्या. रिझर्व्ह बँकेनेही व्याजाचे दर कमी करून सरकारची एक मागणी पूर्ण केली. उद्योग आणि बँका मात्र ती व्याजदरकपात अपुरी असल्याचे म्हणत आहेत आणि आणखी कपातीची मागणी करत आहेत. याहीपेक्षा अधिक चिंतेची बाब आहे ती सरकारच्या जमा-खर्चाच्या तुटीची. तूट आली तर काही बिघडत नाही असे सर्व उद्योजक घसा कोरडा करून सांगत आहेत. प्रत्यक्षात मात्र अनेक जाणकार, शिवाय परदेशी गुंतवणूकदार याबाबतीत अतिशय चिंतातुर आहेत. सरकारच्या अंदाजपत्रकातली खरी तूट राजरोसपणे लपविण्यात आली आहे असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्याचा पुरावा म्हणून फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचा दाखला दिला जातो. हमीभावापेक्षा वरच्या दराने धान्य शेतकऱ्यांकडून खरेदी करणे हे एफसीआयचे काम आहे. त्यासाठी लागणारी सबसिडी देणे हे भारतसरकाराचे देयक आहे. त्या संस्थेला स्वतःचे काहीही उत्पन्न नसते. त्यामुळे त्या संस्थेने काढलेले कर्ज भारत सरकारच्या अंगावरच असते. एफसीआयने राष्ट्रीय बचत योजनेमधून (पोस्टातील बचत आणि पीपीएफ इत्यादी) जवळजवळ १,२०,००० कोटी उचलले आहेत. बजेटमध्ये मात्र तसे दाखविण्यात आले नाही तरी ते (सामान्य नागरिकांचे बचतीचे पैसे) परत फेडणे हे निर्विवादपणे सरकारचे कर्तव्य आहे. अशी ही वाढणारी तूट सरकारला कर्ज काढूनच भरून काढावी लागणार. करमहसुलामधून सर्व रक्कम उभीच राहू शकत नाही.

**सरकारी डॉलर कर्जरोखे**

यासंदर्भात, गेल्या बजेटमधल्या एका नवीन तरतुदीचा उल्लेख केलाच पाहिजे. त्या तरतुदीचा अनिर्बंध वापर झाला तर इतकी वर्षे धीमेपणाने, मोजूनमापून सुधारणा घडवून आणण्याचा संयम सुटायला फार वेळ लागणार नाही आणि आर्थिक अरिष्टापासून फार काळ दूर पळता येणार नाही. ती तरतूद म्हणजे परदेशी संस्था आणि गुंतवणूकदारांकडून परकीय चलनाच्या रूपाने जमा-खर्चातली तूट भरून काढण्यासाठी कर्ज काढण्याची मुभा. भारत सरकारने परदेशी गुंतवणूकदारांकडून अशाप्रकारचे कर्ज काढण्याचे आजपर्यंत, कठीणप्रसंगीसुद्धा टाळले होते. अपवाद म्हणून फक्त अनिवासी भारतीयांकडून डॉलरमध्ये खास ठेवी स्वीकारण्याच्या योजना दोन वेळा राबविल्या होत्या. भारतीय उद्योजकांना परकीय चलनात कर्जे उभी करण्याची मुभा नियंत्रित पद्धतीने दिलेली आहे, पण सरकारनेच असे कर्ज आजपर्यंत उचललेले नाही. त्यामागे एक दूरदर्शीपणाही आहे. परंतु, विद्यमान सरकारची एकूण बेधडक वृत्ती पाहता आजपर्यंतच्या संयमाला सोडचिठ्ठी दिली जाण्याची शक्यता आहे.

**पुढच्या पाऊलखुणा**

मंदी आहे की नाही याची साधकबाधक चर्चा चालूच राहील. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे समाजाचे मानसिक ध्रुवीकरण बदलून एकमत होण्याची शक्यता नजीकच्या काळात तरी कमी आहे. जगापुढील प्रश्न तर कठीण आहेतच. परंतु भारतापुढील प्रश्न अधिक जटिल होत जाणार आहेत. त्या प्रश्नांना भारतसरकार कशा प्रकारे तोंड देईल हे पाहावयाचे बाकी आहे. आजपर्यंत त्यांची खरी कसोटी लागलेलीच नाही कारण ज्यांनी समर्थपणे विरोध करायला हवा ते सर्व अजून तरी दुर्बळ आहेत. पुढे येणाऱ्या आर्थिक घडामोडींचे आणि राष्ट्रीय तसेच जागतिक पातळीवरील राजकीय संदर्भ कळावेत हाच या लेखामागचा हेतू आहे. त्यामुळे अध्यापकीय थाटात कोणतीही आकडेवारी देण्याचे किंवा पुस्तकी संदर्भ देण्याचे मी टाळले आहे. पुढच्या पाऊलखुणा ओळखण्यासाठी वाचकांना मदत झाली तर लेखाचे उद्दिष्ट सफल होईल.

**- शेखर साठे**

भ्रमणध्वनी : ९८२००४११९०

sathecs@gmail.com

info@gadark.in www.gadark.in

WITH BEST COMPLIMENTS

GADARK

# GADARK LAB PVT. LTD

INDUSTRIAL ANALYST AND CONSULTANTS

*Fresh Solutions for fresher environment*

**RECOGNIZED BY**

Ministry of Environment Forest & Climate Change,
Government of India

**ACCREDITED BY**

OHSAS

NABL ACCREDITED


ISO

**Mumbai Office :**
15, Hindustan Kohinoor Industrial Complex, L. B. S. Marg, Vikhroli (W), Mumbai – 400 083.
Tel. – (022) 2577 7069 / 70. Email – info@gadark.in Web Site : www.gadark.in
**Laboratory :**
Plot No. H-54, Addl. M.I.D.C. Kudal, Post-Nerur Dewoolwada, Tal.- Sindhudurg

सरोज जोशी

# नवा शिपाई

**२५ नोव्हेंबर २०१९! दिनकर गांगल यांचा ऐंशीवा वाढदिवस! सळसळते चैतन्य, सदासतेज तरुण मन आणि नव्याचा ध्यास ही गांगलांची वैशिष्ट्ये! मराठी सांस्कृतिक विश्वातील नव्या शिपायाला हा मानाचा मुजरा!**



'फिरत्या चाकावरती देसी मातीला आकार विठ्ठला तू वेडा कुंभार, तू वेडा कुंभार' ग. दि. माडगूळकर यांच्या गीताची ओळ ओठांतून सहजपणे बाहेर पडली आणि लक्षात आलं की आपल्या जवळपास असाच एक वेडा कुंभार वावरत असतो. ह्या कुंभारानं अनेक होतकरू माणसांच्या जीवनाला आकार देऊन त्यांना समर्थ व्यक्ती बनवलं आहे. ही व्यक्ती म्हणजे दिनकर गांगल हे काय सांगायला हवं? 'गांगल ७०, ग्रंथाली ३५' या पुस्तकात लेखकांची मनोगतं तर व्यक्त झालीच आहेत. त्याचबरोबर गांगलांची जडणघडण कशी झाली ह्यावर प्रकाश पाडणारे त्यांच्या निकटच्या मित्रांचे म्हणजे कुमार केतकर, अरुण साधू वगैरेंचे लेखही त्यात आहेत. 'गांगल ७०' हे पुस्तक – सव्यसाची पत्रकार आणि द्रष्टे समाजसेवक, कार्यकर्ते आणि साक्षेपी संपादक असणाऱ्या गांगलांचं व्यक्तिचित्र आपल्या डोळ्यांसमोर उभं करतं.

तसं पाहता गांगल हे आडनाव, परंतु हे आडनावच सर्रासपणे नावासारखं वापरलं जातं. इतके

खोलपर्यंत गांगल आमजनतेपर्यंत पोचले आहेत. गांगल म्हटल्यावर दिनकर गांगल असं म्हणण्याची जरुरी राहत नाही. गांगल म्हटल्यावर लगेच 'ग्रंथाली' हा शब्द पुढे येतो. 'संस्कृतिकारण' हा शब्द रूढ करणारे आणि अर्थपूर्ण करणारे पत्रकार गांगल असा आतला आवाज उमटतो. लगेच फणा वर काढून प्रश्न उठतो, 'गांगलांची ग्रंथाली की ग्रंथालीचे गांगल?' परंच 'थिंक महाराष्ट्र' ही वेबसाइट गांगल सुरू करतात, त्यावेळी या प्रश्नाचं अचूक उत्तर मिळतं. हा पत्रकार एकाच जागी फार काळ चिकटून राहणारा स्थितिशील माणूस नाही. हा मनस्वी माणूस गतिशील आहे. पायाला चाकं आहेत आणि उडण्यासाठी दोन पंखसुद्धा. नाहीतर 'महाराष्ट्र टाइम्स'मधली सहसंपादकपदाची, रविवार पुरवणीचा बहर असणारी उत्तम नोकरी सोडून त्यांनी 'ग्रंथाली' नावाची चळवळ सुरू केली नसती. 'ग्रंथाली' हे नाव गांगलांचे मित्र अशोक जैन ह्यांनी सुचवलं. त्यांचे सारे मित्र त्यांच्याबरोबर होते. मात्र सारेजण आपापली नोकरी सांभाळून मदत करत होते, पाठिंबा देत होते. 'ग्रंथाली वाचक चळवळ' स्थापन झाली तेव्हा गांगल ३५ वर्षांचे होते. 'महाराष्ट्र टाइम्स'म ध्ये पहिल्या पाच-सात वर्षांतच त्यांनी स्वत:चा एक स्वयंभू कॉर्नर निर्माण केला होता. गोविंद तळवलकर संपादक असताना स्वत:चा असा समांतर बाज प्रस्थापित करणं सोपं नव्हतं. 'म हाराष्ट्र टाईम्स' हे तेव्हा एक सत्ताकेंद्र होतं आणि त्या संस्थानाचे अधिपती म्हणून तळवलकरांना महाराष्ट्र ओळखत होता. मराठी मध्यमवर्गाचा मानबिंदू आणि उच्चभ्रू मराठी माणसाचं 'महाराष्ट्र टाइम्स' हे गर्वाचं घर होतं. तळवलकर त्या वर्गाचे आयकॉन होते. अशा वातावरणातही रविवार पुरवणीच्या माध्यमातून गांगलांनी प्रथम स्वत:चा कॉर्नर आणि मग स्वत:चं उपसंस्थान चालू केलं. ह्याला कारणीभूत होती दिनकर गांगलांची विलक्षण संवेदनशीलता, सर्वंकष कुतूहल आणि नि:स्पृह स्वभाव.



दिनकर गांगल यांच्या 'सत्तरी'निमित्त सत्कार – एकनाथ ठाकूर, सुशीलकुमार शिंदे आणि डॉ. अभय बंग

पुढे काही दिवसांनी गांगलांचं उपसंस्थान स्वतंत्र संस्थान झालं. हा हा म्हणता सर्व प्रकारचे लेखक, कवी, समीक्षक, चळवळे, गांगलांच्या संस्थानात येऊन सामील झाले. अनिल बर्वेपासून अरुण साधूपर्यंत आणि मन्या ओक, अशोक शहाणेंपासून ते थेट दुर्गा भागवतांपर्यंत सर्वजण गांगलांच्या सांस्कृतिक प्रजासत्ताकात येत होते.

गांगलांनी निर्माण केलेला माहोल रविवार पुरवणीच्या शिडात मावेनासा झाला. वारं खूपच भन्नाटपणे वाहत होतं. गांगलांच्या मनात धगधगणारी ऊर्जा इतर वाटा शोधत होती. त्याच काळात कुर्ला येथील नेहरूनगरात राहणाऱ्या पत्रकार, लेखक-प्राध्यापक मंडळींनी एक छोटासा ग्रंथप्रेमींचा गट बनवला होता. त्यात गांगल, अरुण साधू, प्र.ना. परांजपे, अशोक जैन, जगन फडणीस, सुधीर नांदगावकर अशी मंडळी होती. तो काळ १९७२-७४ चा. आजच्या 'ग्रंथाली'चा जन्म तिथेच झाला. मागे वळून बघता असं म्हणता येईल की महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वातावरणात निर्माण झालेली 'ग्रंथाली' ही पहिली एनजीओ. पहिली अनौपचारिक बैठक गांगलांच्याच ३४/९०२ या घरात झाली. शिवाजी पार्क, गिरगाव, साहित्यसहवास ह्यांना पर्यायी साहित्य-सत्ताकेंद्र कुर्ल्याच्या नेहरूनगरात निर्माण झालं होतं.

'महाराष्ट्र टाइम्स'मधील गांगल हा नवोदितांचा, चळवळीतील कार्यकर्त्यांचा एक मोठा आधार! धडपडणाऱ्या आणि नवं काही करणाऱ्या प्रत्येकाला संधी मिळाली पाहिजे आणि आपणाला शक्य होईल तेवढी आपण दिली पाहिजे हा त्यांचा दृष्टिकोन. मी माझा दादासाहेब तुळपुळ्यांवरचा पहिला लेख त्यांच्याकडे घेऊन गेले त्यावेळी मी नवोदित असूनही त्यांनी तिथल्या तिथे, लागलीच तो लेख स्वीकारला. माझ्या अंगातील गुणवत्तेला त्यांनी चालना दिली. लेखकांनी लिहिलेले लेख छापणारे ते संपादक नाहीत. लेखकाला घडवणारे ते द्रष्टे, सूक्ष्मदृष्टी असणारे संपादक आहेत.

'ग्रंथाली' ही एक सांस्कृतिक चळवळ आहे. ती वाचन-संस्कृतीचा प्रसार करण्याची चळवळ आहे. जनसामान्यांपर्यंत पुस्तकं पोचवणं, माफक किमतीत ती देण्याचा प्रयत्न करणं हे उद्दिष्ट आहे. त्यासाठी ग्रंथ निर्माण करून ते छापणं, विकणं ह्या गोष्टी ओघानंच येतात. म्हणजे 'ग्रंथाली' ही सेवाभावानं चालवलेली सार्वजनिक चळवळ असली तरी त्यात उद्योग, धंदा, व्यापार याही गोष्टी आल्याच. चळवळ आणि व्यापार यांची युती मोठी अवघड गोष्ट असते. हे अंतर्गत द्वंद्व सांभाळून आजपर्यंत तरी 'ग्रंथाली'नं हे असिधारा व्रत चालवलं आहे. ही लक्षणीय गोष्ट आहे. सुदेश हिंगलासपूरकर, छे-छे! चूकच झाली, सुदेश गांगल ह्याच्या हिशेबाप्रमाणे ९०० पुस्तकं 'ग्रंथाली'नं प्रकाशित केली आहेत. या चळवळीमध्ये सांस्कृतिक प्राधान्यालाच सर्व

ठेवलं. चळवळ आणि धंदा यात योग्य तोल ठेवून निष्ठेनं, शिस्तीनं काम करणारा बेहिशोबी जुगारी लागतो. पस्तीस वर्षं गांगलांनी व्रताचारी तपस्व्यासारखी ही कठीण जबाबदारी सांभाळली आहे.

'ग्रंथाली' केलं काय, असा प्रश्न अनेकांना पडतो. 'ग्रंथाली' हे गांगल यांचं महाराष्ट्राला आणि मराठी भाषेच्या विस्ताराला लाभलेलं फार मोठं योगदान आहे. 'ग्रंथाली'च्या माध्यमातून विविध नव्या विषयांचा ग्रंथसंपदेत सहभाग करताना ग्रामीण भागातील विविध लेखकांना गांगलांनी बोलतं केलं, प्रोत्साहन दिलं. त्यांना मार्गदर्शन करून, त्यांच्याकडून चांगलं लिखाण लिहवून घेतलं. 'बलुतं', 'उपरा', 'उचल्या', 'निशाणी डावा अंगठा' ही पुस्तकं याची साक्ष देतात. 'ग्रंथमोहोळ', 'ग्रंथदिंडी' या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्र ढवळून काढला. या ग्रंथदिंडीबरोबर त्या-त्या भागात व्याख्यानं, पुस्तकचर्चा, लेखक, कवी यांचा वाचकांशी संवाद इत्यादी विविध कार्यक्रमांचं आयोजन करून, महाराष्ट्राच्या तळागाळात वाचकचळवळ पोचवण्याचं फार मोठं काम त्यांनी केलं. महाराष्ट्रातील हा पहिलाच प्रयोग होता आणि त्याला प्रतिसादही प्रचंड लाभला.

'ग्रंथाली'च्या माध्यमातून गांगल यांनी केलेला दुसरा महत्त्वपूर्ण धाडसी प्रयोग म्हणजे ज्ञानयज्ञ. राज्यातील विविध विषयांवर विविध लोकांकडून १००० पुस्तकं लिहवून घ्यावयाची अशी भन्नाट कल्पना त्यांनाच सुचू शकते. दाभोळच्या खाडीपासून नाशिक आणि विविध विभाग, प्रदेश, चालीरिती ह्यांची माहिती सांगणारी छोटी-छोटी पुस्तकं त्यांनी प्रसिद्ध केली. त्या-त्या प्रश्नाशी, प्रदेशाशी निगडित अशा सर्वसामान्यांना गांगल यांनी लिहितं केलं, हे त्यांचं असामान्य असं योगदान आहे.

कित्येक धाडसी प्रयोगांनी ग्रंथालीनं मराठी साहित्य व सांस्कृतिक विश्वात सळसळतं चैतन्य निर्माण केलं. ग्रंथयात्रा, ग्रंथमोहोळ, संवादयात्रा, बालझुंबड, विज्ञानग्रंथाली, विपुलयात्रा, वाचनपरिषदा म्हणजेच साहित्यसंस्कृतीचा एकत्र कल्लोळ. 'भूतकाळाचे अवजड ओझे, डोक्यावर ना घेऊन नाचा, करा पदस्थल त्याचे, आणिक चढुनि त्यावर भविष्य वाचा.' विंदा करंदीकरांची ही उक्ती त्यांच्या कार्याला लागू पडते.

एखाद्या अभिजात कवीला ज्यावेळी काव्यात नवीन प्रवाह निर्माण करायचा असतो, तेव्हा त्याला नवीन प्रतिमा आपोआप सुचतात. तसंच गांगलांचं झालं. ग्रंथाली वाचक-चळवळ सुरू केल्यावर १९८२ साली काढलेल्या ग्रंथालीच्या संवादयात्रेच्या निमित्तानं गांगलांच्या आणि ग्रंथालीच्या धोरणांचं संस्कृतिकारण हे व्यवच्छेदक लक्षण बनलं. शिक्षणाचा जसा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला तसा शैक्षणिक गुणवत्तेचा स्तर खाली येणं स्वाभाविक होतं. तो स्तर उंचावर ठेवण्यासाठी विविध घटकांशी संवाद साधणं आणि संस्कृतीचं पोषण करणं म्हणजे संस्कृतिकारण, अशी ही भूमिका होती. गांगलांना गेली तीस-चाळीस वर्षं मुख्य ध्यास होता सांस्कृतिकारणाचा. त्यांनी ग्रंथालीच्या माध्यमातून एक सांस्कृतिक व्यासपीठ निर्माण केलं. महाराष्ट्रातील मराठी माणसांच्या प्रश्नांवर विविध चर्चा व कार्यशाळा घडवून आणल्या. गांगलांना दूरदृष्टीचं वरदान असल्यामुळे पुढे येणाऱ्या संभाव्य प्रश्नांवर चर्चा, कार्यशाळा ते घडवून आणतात. पाण्याच्या प्रश्नावर मार्गदर्शन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय जलआयोगाचे अध्यक्ष माधवराव चितळे ह्यांना त्यांनी बोलावलं आणि पाणीप्रश्नावर चर्चासत्र ठेवलं.

'ग्रंथाली'च्या व्यासपीठाच्या निमित्ताने त्यांचे शरद पवारांपासून जॉर्ज फर्नांडिसापर्यंत, रघुनाथ माशेलकरांपासून जयंत नारळीकरांपर्यंत संबंध आले. अनेक बँक संचालकांना त्यांनी कामाकरता आपल्या कार्यालयात बोलावलं, पण कार्याव्यतिरिक्त गांगल कधीच कुणाच्या मागे गेले नाहीत. ते प्रसिद्धीपराङ्मुख राहिले. पूर्वीच्या ऋषिमुनींसारखे निरिच्छ राहिले. सर्व गोष्टी समाजाच्या कळवळ्यातून घडत गेल्या. स्वार्थाचा लवलेश नाही.

ह्या कार्यकर्त्या माणसानं साहित्याची पूर्वीची संकल्पना बदलून टाकली. 'साहित्य म्हणजे निव्वळ कथा, कादंबरी, कविता नव्हे तर 'सह' हा शब्द अतिशय महत्त्वाचा आहे' असं ते मानतात. ते म्हणतात की माणसानं आकाशासारखं उंच ध्येय ठेवावं. आकाशच कवेत घेण्याचा प्रयत्न करावा. गांगलांनी पुस्तकांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीची आस धरली. स्वत:च्या अक्कलहुशारीचा उपयोग वैयक्तिक भरभराटीसाठी न करता स्वत:ला समाजाच्या कल्याणासाठी वाहून घेतलं. त्यांच्या कार्याला परतत्त्वाचा स्पर्श झालेला आहे. 'सर्वेऽपि सुखिन: सन्तु, सर्वे सन्तु निरामय:' हीच त्यांची आकांक्षा कायम असते. शिवाय त्यांच्या अंगात नेतृत्वाचे गुण आहेत. माणसं जोडणं आणि सांभाळणं त्यांना जमतं. खरं तर ते मितभाषी आहेत. एखादं वाक्य बोलून ते आपलं मत व्यक्त करतात. अर्धस्फुट स्मित करतात, पण ते अतिशय सहृदय आहेत. त्यांच्या निकट आलेल्या व्यक्तींना अडचणीच्या वेळी धावून मदत करतात. तरीही गांगल आपल्यासारखेच दोन पाय असलेले माणूस आहेत. आपल्या मित्रमंडळीत ते मोकळेढाकळे वागतात. स्त्रियांना ते व्यक्ती समजतात. सन्मानानं वागवतात. त्यांच्या गुणांची कदर करतात. आपल्या कर्तृत्वाचा गैर दबाव ते वाचकांवर लादत नाहीत, म्हणून तर या चळवळीत स्त्रिया बहुसंख्येनं सामील झाल्या आहेत. वर्तणुकीतला हा सच्चेपणा, सज्जनपणा मला लाखमोलाचा वाटतो. आजकालच्या उनाड उच्छृंखल हवेमध्ये ते सागाच्या झाडासारखे उंच वाटतात. इतर पुरुष कार्यकर्त्यांनी हा आदर्श ठेवण्यासारखा आहे.

आणखी दोन गोष्टींचा जरूर उल्लेख करायला हवा. चळवळीचं मुखपत्र म्हणून 'रुची' मासिकाची निर्मिती झाली, आज त्याला स्वत:ची ध्येयधोरणं सांभाळून एका दर्जेदार मासिकाचा दर्जा प्राप्त झालेला आहे. दुसरा उल्लेख सुदेश हिंगलासपूरकराचा करायला हवा. शिवाजीला दुसरा शिवाजी जन्माला घालता आला नाही, असा आरोप केला

जातो. परंतु गांगलांच्या कडक शिस्तीमध्ये सुदेश हा मुलगा गांगलांच्या हाताखाली तयार झाला. आता तो गांगल निवृत्त झाल्यावर ग्रंथालीचा सर्व कारभार व रुची मासिक समर्थपणे चालवत आहे. अमेरिकेत भरणारी संमेलनं तो गाजवतो. 'उतू नये, मातू नये, घेतला वसा टाकू नये' हा बाणा सांभाळून तो राहतो. सुदेश हिंगलासपूरकरला काही लोक सुदेश गांगल म्हणूनच ओळखतात. लोकांना तो गांगलांचा मुलगा वाटतो.



**श्री.पु. भागवत, अरुण साधू यांच्यासोबत 'ग्रंथाली'च्या कार्यक्रमात**

सत्तरच्या दशकात 'रुची'च्या प्रकाशनाला सुरुवात झाली. साहित्य, कला, सामाजिक विचार, तत्त्वविचार अशा संस्कृतीच्या सर्व अंगाना स्पर्श करेल, वाचकाभिमुख आणि संवादप्रधान असेल असं नियतकालिक त्या काळात नव्हतं. १९७७ साली 'रुची'चा पहिला अंक निघाला. या छोट्याशा अंकाचं स्वरूप एखाद्या गृहपत्रिकेसारखं होतं. संपादकीय निवेदनात गांगल म्हणतात, ''हे नियतकालिक काढण्यात आमचा दुहेरी हेतू आहे. पहिलं व्यवहारी उद्दिष्ट म्हणजे ग्रंथालीच्या वाचक चळवळीच्या सदस्यांच्या संपर्कात राहण्याचं उत्तम माध्यम म्हणून उपयुक्तता. ग्रंथालीची नवीन प्रकाशनं, नवीन कार्यक्रम, उपक्रम व आवाहनं 'रुची'द्वारे सदस्यांपर्यंत पोचवणं. दुसरे उद्दिष्ट म्हणजे ग्रंथ व साहित्यप्रसार, सांस्कृतिक अभिसरण, अभिरुचीची जडणघडण या बाबतीतल्या ग्रंथालीच्या ध्येयधोरणाचा प्रसार करणं.'' साहित्य, संस्कृती, मराठी भाषा, मराठी समीक्षा, ग्रंथ प्रकाशन व ग्रंथव्यवहार, लेखक व लेखनप्रक्रिया, लेखक व लेखनाचे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक संदर्भ ह्या विषयांमध्ये रुचीला रस आहे.

साक्षेपीपणा हा गांगलांचा विशेष गुण, जसा पुस्तक-प्रकाशन, ग्रंथमोहोळ, ज्ञानयज्ञ ह्यातून दृग्गोचर होतो त्याहून अधिक 'रुची' या मासिकातून दृग्गोचर होतं. रुची हे नुसतं मासिक नाही तर सांस्कृतिक कार्यक्रमांची – घटनांची नोंद घेणारं उपयुक्त दालन आहे. 'सत्यकथा', 'किर्लोस्कर' या बंद पडलेल्या मासिकांच्या पार्श्वभूमीवर रुचीची वाढ, विकास होणं आणि टिकून राहणं महत्त्वाचं आहे. वर्तमानकाळाचा स्वीकार करणारं, पुस्तकांतून सर्व विचारधारा वाचकांपर्यंत पोचवणारं असं बहुआयामी व्यक्तिमत्त्व गांगलांचं आहे हे निर्विवाद सत्य आहे.

सारंग दर्शने ह्यांनी घेतलेल्या मुलाखतीत 'संस्कृतिकारण' म्हणजे काय हे गांगलांनी स्पष्ट केलं आहे. ते म्हणतात, ''माझ्या दृष्टीनं सांस्कृतिक प्रभाव हा समाजावर असायला हवा. एकेकाळी समाजात धर्मसत्ता प्रभावी होती. नंतर राजसत्ता प्रभावी होती. मात्र संस्कृतीचा समाजावर प्रभाव असला पाहिजे. नवी मूल्यव्यवस्था जन्माला येत असताना तिला आकार देणं ही प्रत्येक सुजाण माणसाची जबाबदारी आहे. समाजातील सर्व घटकांची मानसिकता घडवण्याचे प्रयत्न म्हणजे संस्कृतिकारण.

''संस्कृतिकारण हा शब्द आम्ही १९८८ मधे प्रथम वापरला. संस्कृतिकारण आणि संवाद ह्या दोन शब्दांचा वापर ग्रंथयात्रेच्या निमित्तानं करण्यात आला. संवाद कोणाशी? आमजनतेशी. तो कुणाचा? जे या संस्कृतिकारणाच्या ध्येयानं प्रेरित झाले आहेत त्यांचा. या संवादाचं माध्यम कोणतं? तर पुस्तकं. पुस्तकांच्या निमित्तानं हा संवाद समाजात जाऊन साधायचा होता. 'ग्रंथाली' हे केवळ या संवादांचे माध्यम होती. आता पुस्तक हे माध्यम तितकं प्रभावी राहिलेलं नाही. इतर माध्यमं अधिक प्रभावी ठरत आहेत. त्यासाठी नवीन प्रकल्पाची जरुरी आहे, पण मी एकटा हा तोडगा काढू शकत नाही. ग्रंथालीचं खरं सूत्र हेच आहे की अनेक विचारवंतांनी एकत्र यावं. अनेक व्यक्ती एकत्र आल्या की त्यांचे संयुक्त विचार उपयोगी पडतात. सिनर्जी हा योग्य शब्द आहे. मग 'थिंक महाराष्ट्र डॉटकॉम' ही कल्पना मांडली व ती कार्यान्वितही झाली. आरंभी या वेबसाइटचं काम तीन पातळ्यांवर चालावं अशी कल्पना आहे. (नितेश शिंदे वेबसाईटचं कामकाज पाहत आहे.) एक म्हणजे मराठी कर्तृत्वाची नोंद. दुसरी गोष्ट स्वयंसेवी संस्था आणि व्यक्ती ह्यांच्या कर्तृत्वाचा आढावा. तिसरी गोष्ट म्हणजे मराठी समाज आणि मराठी संस्कृती यांच्या माहितीचं विकीपिडियाच्या धर्तीवर सतत चालणारं संकलन.''

ग्रंथालीच्या माध्यमातून गांगलांनी असंख्य गोष्टी केल्या. त्या सर्वांची जंत्री न करता इतक्या गोष्टी सकारात्मक दृष्टिकोनातून करणारे गांगल स्वत: कसे घडत गेले हे पाहूया. पुष्कळदा मोठ्या व्यक्तींच्या मोठेपणाची बीजं त्यांच्या बालपणात दडलेली असतात. 'रम्य ते बालपण' असंही म्हटलं जातं, पण गांगलांकडून मात्र वेगळंच उत्तर मिळतं. गांगलांचं बालपण रोहे या उत्तर कोकणातील गावी गेलं. ना धड खेडं, ना धड शहर असं ते गाव, तेव्हा 'आयुष्याची पहिली ३० वर्षं अंधारात' असं

रोखठोक उत्तर ते देतात. असं उत्तर द्यायला मनाचा ठामपणा आणि घट्टपणा असावा लागतो. मनाला एक सुंभासारखा भरभक्कम पीळ असावा लागतो. तो त्यांच्यात ठासून भरलेला आहे. शिवाजीचा पराक्रम आठवला की जिजामातेचं नाव आठवतं, पण गांगल आईचं नाव घेत नाहीत किंवा वडिलांचंही नाही. त्यांची आई ते दहा-अकरा वर्षांचे असताना वारली. आईची वाचनाची आवड माझ्यात उतरली असावी असा उल्लेख ते करतात. 'वडिलांची कर्तव्यनिष्ठा, कष्टाळू स्वभाव माझ्यात आला असावा' असं ते म्हणतात. घरातील धार्मिक कर्मठपणाचा ते निषेधात्मक उल्लेख करतात. शाळेतल्या एखाद्या शिक्षकाची आठवण त्यांना येत नाही किंवा पुढील आयुष्यात भेटलेल्या एखाद्या आदर्शाचा ते उल्लेख करत नाहीत. दत्तगुरूंनी चोवीस गुरू केले होते, पण इथे एकही नाही. मात्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सकारात्मक निर्देश करतात.

मला जाणवतं, अंधाराची लिपी त्यांनी डोळसपणे वाचली असावी. अंधाराच्या तंबूत ते उंटाच्या धिटाईनं वावरले असावेत. म्हणूनच अंधाराच्या पाठीवर प्रकाशसूत्र लिहिण्याची क्षमता त्यांना लाभली असावी. अजिंक्यताऱ्यात राहून तेजाळपणा वाढला असावा.

मॅट्रिकनंतर ते पुण्यात गेले आणि त्यांचं मनमोकळं आयुष्य सुरू झालं. झापडबंद, बंदिस्त परिस्थितीतून सुटका झाली. पुण्यात लाभलेल्या स्वातंत्र्याच्या मोकळ्या वाऱ्यामुळे त्यांची प्रगती सुरू झाली. आपलं शिक्षण स्वत: अर्थार्जन करून पुरं केलं. 'सकाळ' आणि 'केसरी'मध्ये पत्रकार म्हणून काम करताना त्यांनी पत्रकारितेचे धडे उत्तमपणे गिरवले. पत्रकारिता त्यांना आवडू लागली, जमू लागली. त्यातली आव्हानं ते स्वीकारत गेले. त्यांच्या सकारात्मक स्वभावाला धुमारे फुटू लागले. पत्रकारितेत ते मुरत गेले. मुंबई आणि महाराष्ट्र टाइम्सचं त्यांना आकर्षण होतंच. म.टा.मध्ये आल्यावर पतंजली सेठी ह्यांच्या ट्रेनिंग स्कूलमध्ये पहिले चार महिने ट्रेनिंग झालं. त्या वेळच्या महाराष्ट्र टाइम्सची इमेज कर्णिक, माधव गडकरी आणि शंकर सारडा यांनी घडवली होती. शंकर सारडांच्या नेतृत्वाखाली चालू झालेल्या 'मैफल' या रविवार पुरवणीचा दबदबा जबरदस्त होता. गांगल म्हणतात, ''सत्तरच्या सुमारास मी रविवार विभागात आलो. १९७२ मध्ये मला थॉमसन फाउंडेशनची स्कॉलरशिप मिळाली. या स्कॉलरशिपची आधी परीक्षा असायची. नंतर मुलाखत असे.''

ही स्कॉलरशिप, लंडनमधलं वास्तव्य आणि त्या वेळचे सगळे अनुभव हा त्यांच्या आयुष्याचा टर्निंग पॉईंट आहे. त्यामुळे तिथं त्यांचा माणूस म्हणून जन्म झाला, असं ते मानतात. अंधारपर्व संपायला तिथे प्रारंभ झाला. एकीकडे पत्रकारितेचं ज्ञान आणि दुसरीकडे मनुष्यस्वभावाचा अनुभव या दोन्हींचा एकत्रित परिणाम त्यांच्यावर झाला आणि आवश्यक त्या जन्मकळा भोगत ग्रंथालीचा जन्म झाला आणि साखर म्हणून पुस्तकं वाटण्यात आली.

गांगलांचे अचाट आणि अफाट उद्योग पाहून त्यांना प्रेरणा आणि ऊर्जा कुठून मिळते हा प्रश्न मला सतावत होता. गांगलांना मी छेडायचा प्रयत्न केला, पण हाती काही लागलं नाही. मग मी शोधून काढलेलं उत्तर देत आहे. हा माझा तर्क आहे. सेल्फ अॅक्चुअलायझेशन हेच उत्तर आहे. पुण्याला सकाळमध्ये आणि केसरीमध्ये काम करताना पत्रकार म्हणून ते घडत गेले. पत्रकारिता हा त्यांचा पिंड असावा. मुंबईत आल्यावर म.टा.मध्ये काम करताना ते स्वत:च्या अंतरंगाचा शोध घेत होते. त्यांना कळून चुकलं की नुसती पत्रकारिता नव्हे तर समाजासाठी रचनात्मक कार्य करण्यात आपल्याला रस आहे. त्यामुळे आपल्याला आनंद मिळतो. त्यांचा संवेदनस्वभाव त्यांना सापडला. ते स्वत:च स्वत:ला सापडले. आनंदाचं गाव त्यांना आंदण मिळालं.

बाहेरच्या जगात आदरणीय आणि वंदनीय असणारी माणसं घरात कधी कधी वेगळीच एकारलेली वागतात, पण गांगलांच्या वागण्यात आतबाहेरपणा नाही. त्यांच्या मुली अपर्णा आणि दीपाली ह्यांना त्यांनी प्रेमळ मोकळेपणानं वाढवलं, वाढू दिलं. गांगलांच्या कर्तृत्वाचा आलेख काढताना, त्यांची पत्नी सहचरी अनुराधा ह्यांचा आवर्जून उल्लेख केला जातो आणि तो यथायोग्यच आहे. त्यांच्या यशामध्ये अनुराधाचा सिंहाचा वाटा आहे. गांगलांचा घर-संसार आणि सामाजिक संसार अनुराधानं निगुतीनं आणि समर्थपणे सांभाळला. परंतु गांगलांनी दोघांमधला अनुबंध रेशमासारखा मऊ-मऊ आणि चिवट राखला हेही तितकंच महत्त्वाचं आहे, अधोरेखित करण्यासारखं आहे. माझ्याजवळ बोलताना अनुराधा स्पष्टपणे म्हणाली की गांगलांबरोबर आयुष्य जगताना त्यांच्या मोठेपणाचं ओझं, दडपण मला कधीही जाणवलं नाही कारण 'साथी साथ करी, करी कर धरी, मानी हिला सहचरी' असे ते वागले. त्यांच्या प्रोत्साहनामुळे मी कधी लिहू लागले ते माझं मलाच कळलं नाही.

गांगलांची वाढ त्यांच्या वयाच्या दशकागणीक होत गेलेली दिसते. त्यातील शेवटचं दशक महत्त्वाचं - वय वर्षं सत्तर ते ऐंशी. त्यांनी त्या दहा वर्षांत खूपच मोठी झेप घेतली. जगाला भेडसावणारा ग्लोबल आणि लोकल असा जो प्रश्न १९९० नंतर निर्माण झाला होता, त्यालाच ते जाऊन भिडले. म्हणजे ते प्रांजळपणे सांगतात, की तो त्यांचा उद्देश नव्हता; परंतु 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' या त्यांच्या अभिनव प्रकल्पाच्या विकासात अन्य अनेक गोष्टींबरोबर तीही गोष्ट साध्य होत आहे असं त्यांना जाणवलं. 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' ही खरोखरच फार मोठी सिद्धी आहे. 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम'च्या उपलब्धी कोणत्या झाल्या त्या नोंदवताना ते म्हणतात :

● थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' हा प्रकल्प गेली नऊ वर्षं चालू आहे. अपुऱ्या साधनसामग्रीमुळे त्यास मर्यादा खूप आहेत, परंतु 'महाराष्ट्र - भाषा व संस्कृती' यांचा समग्र कोशच त्यातून उभा

होत आहे. ते काम महादेवशास्त्री जोशी यांनी करून ठेवलेल्या 'भारतीय संस्कृतिकोश' या कामाच्या कितीतरी पुढे जातं! कारण त्यास हजारो हात लागणार आहेत. ती किमया इंटरनेट माध्यमाची. त्यामुळे बारा कोटी महाराष्ट्रीय एकमेकांशी जोडले जाऊ शकतात व नित्य संपर्कात राहू शकतात.

● तो गावोगावची अस्मिता जपण्याचा व जागती ठेवण्याचा अभिनव व विधायक मार्ग आहे!

● त्यामधून मल्टिमीडियाच्या अनेक शक्यता तयार होतात. जुनी पिढी त्या काळानुरूप 'वाचनएके वाचन' अशी महती सांगत राहिली, 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' प्रकल्पामधून त्यापुढे जाणं होतं व म्हणून कालानुरूपता साधली गेली.

● 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम'च्या प्रयत्नांत मराठी माणसाचा आत्मविश्वास जागा होण्याची शक्यता दिसते. मराठी माणूस जात्या संकोची, प्रसिद्धीपराङ्मुख. त्यामुळे त्याची कामगिरी/कर्तबगारी जगापुढे येत नाहीच; परंतु त्याची त्यालाही कळत नाही. 'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन'च्या तालुकावार पाहणीत प्रत्येक तालुक्यात पंधरा ते पंचवीस माणसं विविध क्षेत्रांत असाधारण कामगिरी करतात असं दिसून आलं. त्या सगळ्यांचं कर्तृत्व एकत्र प्रकट झालं तर मराठी माणसाचा आत्मविश्वास दुणावणार नाही का?

● थिंक महाराष्ट्र डॉट कॉम'सारखा स्थानिक संस्कृतीचं जतन/संवर्धन करता-करता जगाशी जोडून घेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न जगात अन्यत्र कोठे नाही. त्या अर्थानं 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' लोकल की ग्लोबल या 'ग्लोकल' पेचावर उत्तम इलाजाचं मॉडेल ठरू शकते!

गांगल 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम'ची मांडणी करत असताना त्यांच्या 'मराठी विद्यापीठ' या कल्पनेचा मुद्दाम उल्लेख करतात. ती संकल्पना त्यांना 'ग्रथाली-ज्ञानयज्ञा'तील स्थानिक महात्म्याची पुस्तकं घडवताना सुचली. 'प्रिंट मीडियम'मध्ये शब्दाक्षरं बंदिस्त झाली, की त्यात नव्या माहितीची/ज्ञानकल्पनांची भर ही अवघड होते. उलट, ते माध्यम इंटरनेटवर इंटरॲक्टिव्ह बनतं. त्यामुळे ज्ञानाचं संकलन व आदानप्रदान सोपं होऊन जातं; तेवढंच नव्हे तर ते सतत अद्ययावत होत असतं.

'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम'चं एक वैशिष्ट्य मुद्दाम नोंदलं पाहिजे, ते म्हणजे ते पोर्टल माहिती व ज्ञान यांच्या संकलनाची कोणतीही रूढ चाकोरी पाळत नाही. गांगल यांचा दावाच हा आहे, की समाजातील विधायकता, उपक्रमशीलता, ज्ञानोत्सुकता वाढत आहे आणि प्रस्थापित संस्था - सरकार, विद्यापीठं, साहित्य-संस्कृती संघ वगैरे, समाजातील या वाढत्या जाणिवांना पुरेशा पडत नाहीत. प्रस्थापित संस्थांमध्ये पढतशहाणे तयार होतात. त्यांचा आणि या नव्या जाणिवांनी समृद्ध व्यक्तींचा कनेक्ट राहत नाही. गांगल यांना खुल्या समाजातून जी माहिती व ज्ञान निर्माण होतं ते नोंदण्यासाठी, ते एकत्र करण्यासाठी 'मराठी विद्यापीठ' आणि आता 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' हवं आहे. गांगल यांची गेल्या तीस-चाळीस वर्षांतील बदलत्या समाजाबाबतची निरीक्षणं द्रष्टी म्हणावीत अशी आहेत. त्यांनी त्यांच्या एका पुस्तकाचं शीर्षक 'स्क्रीन इज द वर्ल्ड' असं दिलं आहे. बघा ना! छोट्याशा मोबाइल पडद्यापासून टीव्ही पडद्यापर्यंतच्या आकारात आज प्रत्येक व्यक्तीचं जगाविषयीचं औत्सुक्य व आकलन सामावलेलं जाणवेल. ज्ञाननिर्मिती विद्यापीठात होण्याऐवजी ती वेगवेगळ्या व्यवसायांतून निर्माण होत आहे. मात्र, त्या ज्ञाननिर्मितीला 'ॲकॅडमिक' क्षेत्रात मान्यता नाही. गांगलांचं 'मराठी विद्यापीठ' हे समाजातील असं खुलं ज्ञान संकलित करू पाहते. दुसऱ्या बाजूला, व्यावसायिक हे नवीन समाजव्यवहारातील ब्राह्मण बनत आहेत असं गांगल ठासून सांगतात, व्यावसायिकांचे त्यांच्या-त्यांच्या विषयातील ज्ञान व कौशल्य वादातीत असते, परंतु ब्राह्मणांनी त्यांच्या तशाच ज्ञानकौशल्याधारे एकेकाळी सारा समाजव्यवहार नियंत्रित केला आणि समाजातील सर्वसाधारण माणसांचा कॉमन सेन्सच लोपून गेला. त्यांच्यात न्यूनगंड निर्माण झाला. समाज व्यवसायतज्ज्ञांचा बडिवार माजवून पुन्हा एकदा तीच चूक करत आहे, असं गांगल सोदाहरण पटवून देतात.

आद्य पत्रकार नारदमुनी ह्यांचा एखादा अंश गांगलांमध्ये असावा असं मला वाटतं. त्यांच्या चळवळ्या स्वभावामुळे म्हातारपणानं त्यांच्यापुढे लोटांगण घातले आहे. ते चिरपुस्तक-तरुण आहेत.

गांगलांना प्रसिद्धीची हाव नाही, मोठेपणा मिरवण्याची हौस नाही. प्रसिद्धीच्या मागे लागलं की सिद्धी लाभत नाही हे त्यांना पक्कं माहीत असावं. आतापर्यंत अनेक गुणविशेषणं वापरून झाली. मला माहीत आहे की मी ह्या चळवळ्या माणसाला शब्दांत पकडू शकले नाही.

आतापर्यंत वापरलेल्या सर्व विशेषणांना पालाण घालणारं एक सार्थ विशेषण मला सुचलं आहे. ते केशवसुतांचा नवा शिपाई आहेत.

नव्या मनुतील नव्या दमाचा शूर शिपाई आहे
कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे


ज्याच्या सामाजिक जाणिवा जागृत होऊन टोकदार झाल्या आहेत असा हा बंडखोर, बाणेदार, समाजसेवक नव्या शिपायाच्या स्वरूपात आपल्यापुढे उभा ठाकलेला आहे. त्याच्या शरीरात बाणेदारपणाची एक ठिणगी धगधगत आहे. ही ठिणगी अशीच तळपत राहो आणि ठिणग्यांची तेजस्वी माळ ओवत तो उभा राहो!

**– सरोज जोशी**
भ्रमणध्वनी : ९८३३०५४१५७

संतोष पाठारे

# राष्ट्रीय पुरस्कार काही प्रश्न

राष्ट्रीय पुरस्कारांची निवड प्रक्रिया 'चित्रपटांचा दर्जा' या एका निकषावर अवलंबून असते. बहुतांश वेळा ही निवड योग्यच असते मात्र काही वेळा या निवडींवर प्रश्नचिन्ह उभे केले गेले.




'अँड ऑस्कर गोज् टू...' या वाक्यातील उत्कंठा, उत्सुकता जितकी हॉलिवुडमधील कलावंत व प्रेक्षकांना असते तितकीच ती आपल्याकडील इंग्रजी चित्रपटांच्या चाहत्यांना सुद्धा लागून राहिलेली असते. ऑस्कर पुरस्काराचं भारतीयांना असलेलं अप्रूप अनाकलनीय आहे. आजवर 'मदर इंडिया' व 'लगान' हे दोनच अस्सल भारतीय चित्रपट सर्वोत्कृष्ट विदेशी चित्रपटांच्या अंतिम फेरीत पोहचले असले तरीही आपल्याकडे चित्रपटक्षेत्रात उतरणाऱ्या अनेक हौश्यानवश्यांना ऑस्करचं स्वप्न पडत असतं. खरं तर ज्याप्रमाणे मुंबईत बॉलिवुडकरांसाठी फिल्मफेअर ॲवॉर्ड असतात त्याच प्रमाणे हॉलिवूडमध्ये ऑस्कर पुरस्कार दिले जातात. त्यातील अनेक पुरस्कारांपैकी एक सर्वोत्कृष्ट विदेशी चित्रपटाचा पुरस्कार! त्यासाठी जगभरातील अनेक देश आपल्याकडील दर्जेदार चित्रपट पाठवतात. आपल्याकडील चित्रपट या स्पर्धेत टिकून रहात नसले तरीही या स्पर्धेचं जितकं आकर्षण भारतीयांना आहे तितकं भारत सरकारतर्फे चित्रपटांना देण्यात येणाऱ्या

राष्ट्रीय पुरस्कारांबाबत नाही. तुलना करायची झाली तर ऑस्कर पुरस्कारांपेक्षा राष्ट्रीय पुरस्कारांची व्याप्ती आणि दर्जा मोठा आहे. १९५४ सालापासून देण्यात येणाऱ्या या पुरस्कारांमुळे भारतीय चित्रपट क्षेत्रातील अनेक कलावंत, तंत्रज्ञ, निर्माते यांच्या उत्तम कामगिरीला दाद मिळाली आहे आणि या क्षेत्रात भरीव कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहन सुद्धा!

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी सर्व कलांच्या विकासासाठी योजना आखल्या. 'संगीत कला अकादमी', 'साहित्य कला अकादमी', 'राष्ट्रीय चित्रपट प्रशिक्षण संस्था', 'राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय' यांची स्थापना पंडित नेहरुच्या कलाप्रेमातून झाली. पारंपरिक व उपयोजित कलांचं संवर्धन, विकास आणि कलाकारांच्या दर्जेदार कामगिरीला राजमान्यता मिळावी या हेतूने या संस्था कार्यरत झाल्या. भारतभर पसरलेल्या चित्रपट व्यवसायाचं स्वरुप इतर कलांपेक्षा वेगळं होतं. यात अनेक कलावंत आणि व्यावसायिकांचा सहभाग त्यामुळे 'चित्रपट कला अकादमी' स्थापन करणं जिकिरीचं होतं. यावर पर्याय म्हणून चित्रपट निर्मितीला सरकारकडून चालना मिळावी व चित्रपटाला कलेचं स्वरुप प्राप्त व्हावं या उद्देशाने १९५४ साली राष्ट्रीय पुरस्कार देण्याची कल्पना नेहरु सरकारने मांडली. त्याआधी दोन वर्ष मुंबईत पहिला आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आयोजित करून चित्रपट माध्यमाचे सामर्थ्य सांगणाऱ्या 'बायसिकल थिव्हज्', 'राशोमन'सारख्या चित्रपटांचे चित्रपटसृष्टीतील कलावंतांसमोर प्रदर्शन करण्यात आलं होतं. या चित्रपटांनी प्रभावित होऊन आपल्या इथे 'दो बिघा जमीन', 'पथेर पांचाली', 'बूट पॉलिश'सारखे चित्रपट निर्माण होऊ लागले. चित्रपटाचे कला मूल्य जपणाऱ्या व प्रेक्षकांच्या मनोरंजनाबरोबरच त्यापलिकडे जाऊन काही सांगू पाहणाऱ्या चित्रपटांचा गौरव करण्याचा हेतू राष्ट्रीय पुरस्कारांमुळे साध्य होऊ शकला.



देविकाराणी

भारतीय चित्रपटसृष्टीची मुहूर्तमेढ मराठी माणसाने उभारली व भारतीय चित्रपटसृष्टीत मानाचा समजला जाणारा राष्ट्रीय पुरस्कार देखील सर्वप्रथम मराठी चित्रपटानेच पटकावला. साने गुरुजींच्या 'श्यामची आई' या कादंबरीवर आधारित आचार्य अत्रे दिग्दर्शित चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला. आई व मुलगा यांच्यातील अनुबंध, आईने मुलावर केलेले संस्कार याची भावरम्य कथा 'श्यामची आई'मध्ये चित्रित झाली होती. वनमालाबाई व माधव वझे यांचा नैसर्गिक अभिनय, आचार्य अत्रेंचे सफाईदार दिग्दर्शन व वसंत देसाईनी संगीतबद्ध केलेली सुमधुर गीते यामुळे 'श्यामची आई'ला राष्ट्रपतींकडून सुवर्णकमळ मिळालं. मराठी चित्रपटाने सर्व भारतीय भाषांमधून हा पुरस्कार पटकावला मात्र त्यानंतर मराठी चित्रपटाला हा पुरस्कार मिळवण्यासाठी तब्बल पन्नास वर्षे वाट पहावी लागली. पन्नासच्या दशकात बंगाली व हिंदी चित्रपटसृष्टीत कलात्मक प्रयोग झाले. सत्यजित रे, मृणाल सेन, तपन सिन्हा, हृषिकेश मुखर्जी, ख्वाजा अहमद अब्बास, बासू भट्टाचार्य, व्ही. शांताराम या दिग्दर्शकांनी केलेल्या सर्जनशील कामाची नोंद राष्ट्रीय पुरस्कार देऊन घेतली गेली. रामू कारियांत यांचा 'चेम्मीन', पट्टभिराम रेड्डीचा 'संस्कार' आणि अदूर गोपालकृष्णनचा 'स्वयंवरम्' या चित्रपटांना मिळालेल्या राष्ट्रीय पुरस्कारांमुळे

एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीपासूनच भारतातील चित्रपट निर्मितीमध्ये बदल घडून आले. समांतर चळवळ थंडावली होती. राष्ट्रीय पुरस्कार मिळवणारे चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहचत नसत. त्यातील व्यावसायिक मूल्याचा अभाव व पर्यायाने वितरणात येणारा अडथळा ही त्यामागील कारणे होती. २००४ साली मधुर भांडारकरांच्या 'पेज-३'ला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आणि व्यावसायिक चित्रपटांचा देखील या पुरस्कारासाठी विचार करता येऊ शकतो याची ग्वाही मिळाली. २०१५ ला 'बाहुबली-द बिगिनिंग'ला मिळालेल्या राष्ट्रीय पुरस्काराने सर्वांनाच आश्चर्यचकित केले.

१९७८ साली चेतन आनंद यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीला राष्ट्रीय पुरस्कार देण्याच्या योग्यतेची एकही फिल्म वाटली नाही. त्यामुळे त्यावर्षी सुवर्णकमळ वगळता इतर विभागातील पुरस्कार देण्यात आले. समांतर सिनेमाची चळवळ ऐन भरात असताना कोणताही चित्रपट निवड समितीला भावला नाही हे विशेष!




दक्षिणेतील कलात्मक चित्रपट निर्मितीला प्रोत्साहन मिळालं. या दरम्यान मराठी चित्रपट मात्र तमाशा, कौटुंबिक मसाला व विनोद यांच्या दुष्टचक्रात अडकला होता. समांतर चित्रपटांचा प्रवाह मराठीत आला परंतु तरीही इतर प्रादेशिक चित्रपटांनी गाठलेल्या उंचीपर्यंत तो पोहचू शकला नाही. मराठी चित्रपटाला हा सर्वोच्च पुरस्कार मिळवण्यासाठी तब्बल पन्नास वर्षे वाट पहावी लागली. २०१४ ला संदीप सावंतच्या 'श्वास'ला सुवर्णकमळ मिळालं. एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीस मुंबईत सुरु झालेले 'मामि' व 'आशियाई' महोत्सव, तरुण दिग्दर्शकांची जागतिक चित्रपट पाहून चित्रपट माध्यमाकडे गंभीरपणे पाहण्याची दृष्टी, प्रशिक्षण संस्थांमधून त्यांनी घेतलेलं तंत्रशुद्ध शिक्षण आणि या दिग्दर्शकांनी केलेल्या कलात्मक प्रयोगांना प्रेक्षकांनी दिलेला प्रतिसाद, हे सर्व घटक मराठी चित्रपटसृष्टीच्या मन्वंतराला कारणीभूत ठरले. 'श्वास', 'डोंबिवली फास्ट', 'वास्तुपुरुष', 'हरिश्चंद्राची फॅक्टरी', 'धग', 'गाभ्रीचा पाऊस', 'विहीर', 'टिंग्या 'अशा चित्रपटांनी मराठी चित्रपटांना वेगळी दिशा दिली. त्याचाच परिपाक म्हणजे देऊळ (२०११), कोर्ट (२०१४) आणि कासव (२०१६) या चित्रपटांना सुवर्णकमळ मिळालं. पन्नास वर्षाची कसर अवघ्या बारा वर्षाच्या काळात चार वेळा सुवर्णकमळ मिळवून भरून काढली गेली.

गेल्या काही वर्षात लघुपटांच्या पुरस्कार यादीत सातत्याने मराठी लघुपटांना राष्ट्रीय पुरस्कार जाहीर होत आहेत ही देखील अभिमानाची गोष्ट आहे. 'कातळ', 'औषध', 'आबा ऐकताय ना', 'पिस्तुल्या', 'पावसाचा निबंध' व 'खरवस' हे अलीकडेच पुरस्कार प्राप्त लघुपट!

गेली सहासष्ट वर्ष केंद्रीय माहिती व प्रसारण खात्याकडून राष्ट्रीय पुरस्कार जाहीर केले जातात. 'डायरेक्टोरेट ऑफ फिल्म फेस्टिव्हल', 'आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव समिती' यांच्या सहकार्याने नेमलेल्या परीक्षक मंडळाकडून या पुरस्कारांची निवड केली जाते. भारतीय भाषेतील, भारतीय निर्मात्यांनी निर्माण केलेल्या चित्रपटांच्या प्रवेशिका जानेवारी महिन्याच्या सुरुवातीस डायरेक्टोरेट ऑफ फिल्म फेस्टिव्हल यांच्या कार्यालयात निर्माते पाठवतात. प्रवेशिकेमध्ये चित्रपटाची सविस्तर माहिती भरणे गरजेचे असते कारण चित्रपट व माहितीपट/लघुपट यांच्या वेगवेगळ्या गटांमध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपट, दिग्दर्शन, अभिनय, गीत-संगीत, प्रकाशचित्रण, ध्वनी संयोजन, वेशभूषा, रंगभूषा, संकलन अशा सर्व विभागांना पुरस्कार असतात. सर्वोत्कृष्ट चित्रपटाबरोबर भारतीय प्रादेशिक भाषांमधील प्रत्येकी एका चित्रपटाची निवड 'रजत कमळ' पुरस्कारासाठी केली जाते. चित्रपट व लघुपटांच्या बरोबरीनेच चित्रपटविषयक पुस्तक व समीक्षकास देखील राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. या सर्वाची निवड करणारी समिति दोन स्तरांवर काम करते. पहिल्या स्तरावर चित्रपटसृष्टीतील कार्यरत असणारे कलावंत, तंत्रज्ञ व समीक्षक यांचे चार गट केले जातात. पश्चिम भागातील परीक्षक इतर भागातील चित्रपटांचे परीक्षण करून अंतिम फेरीसाठी शिफारस करतात. अशा प्रकारे निष्पक्षपणे भारतातील पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण या प्रांतातील संभाव्य चित्रपट अंतिम फेरीसाठी निवडले जातात. अंतिम फेरीत पहिल्या स्तरातील काही परीक्षक मुख्य परीक्षकांच्या समितीबरोबर विजेत्यांची निवड करतात.

आजवर हे पुरस्कार मिळवणाऱ्यांमध्ये बंगाली चित्रपट आघाडीवर आहेत. सत्यजित रायना सहा वेळा सुवर्णकमळ मिळाले आहे. तर बुद्धदेव दासगुप्तांना पाच वेळा सुवर्ण कमळ मिळालयं. मृणाल सेन व गिरीश कासारवल्लींना चार वेळा सुवर्णकमळाचा सन्मान मिळालाय.

पुरस्कारांची निवड प्रक्रिया चित्रपटांचा दर्जा या एका निकषावर अवलंबून असते. बहुतांश वेळा ही निवड योग्यच असते  मात्र काही वेळा या निवडींवर प्रश्नचिन्ह उभे केले गेले. 'बारीवाली' (२०००) चित्रपटासाठी किरण खेरला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला पण या चित्रपटासाठी तिला रीटा कोईरल यांनी आवाज दिल्याचं निदर्शनास आणून दिलं गेलं. निर्मात्यांनी अर्थात हा दावा फेटाळून लावला. 'रुस्तम'साठी अक्षयकुमारला, 'हम तुम'साठी सैफ अलीला, 'दमन'साठी रविना टंडनला व 'पुकार'साठी अनिल कुमारला मिळालेले पुरस्कार वादाच्या भोवऱ्यात आले. निवड समितीवरील मुख्य ज्युरींचे कलाकारांशी असलेले लागेबांधे व सरकारी यंत्रणेचा हस्तक्षेप यामुळे त्या पुरस्कारास पात्र असलेल्या कलाकाराला किंवा चित्रपटाला डावलून कमी योग्यतेच्या कलाकाराला हा पुरस्कार दिला गेल्याचे लक्षात येतं. हा पुरस्कार मिळाल्यानंतर त्या कलावंताचं व कलाकृतीचं मोल वाढणार असतं, तसंच

त्याची जबाबदारीसुद्धा वाढणार असते, अशा वेळी आपण योग्य त्या व्यक्तीची निवड करतोय ना? याचे तारतम्य निवड समितीच्या सदस्यांनी बाळगायला हवं. नाहीतर अशा प्रकारच्या प्रतिष्ठेच्या पुरस्कारांवर प्रश्नचिन्ह उभं राहतं.

हा पुरस्कार मिळवणं हे प्रत्येक कलावंताचं स्वप्न असतं. राष्ट्रपतींच्या हस्ते मिळणारा हा सन्मान कलावंताच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय क्षण असतो. दुर्दैवाने २०१८ ला राष्ट्रपती रामनाथ कोविंद हे काही मोजक्याच कलावंताना पुरस्कार देतील व इतर पुरस्कार माहिती प्रसारण खात्याच्या मंत्री स्मृती इराणी व सचिन नरेन्द्रकुमार सिन्हा देतील, असं आयत्यावेळी जाहीर केल्यामुळे कलावंतामध्ये नाराजी पसरली. यावर्षी निवडणुकांचे कारणं सांगून सरकारने या पुरस्कारांची घोषणा करायला उशीर लावला. साधारणतः एप्रिल महिन्यात घोषणा करून मे महिन्यात या पुरस्काराचं वितरण केलं जातं, परंतु यावर्षी सप्टेंबरपर्यंत हे पुरस्कार वितरण कार्यक्रम केला गेलेला नाही. दरवर्षी निर्माण होणाऱ्या चित्रपटांना राष्ट्रीय पुरस्कार देण्याबरोबरच या क्षेत्रात आयुष्यभर निष्ठेने योगदान देणाऱ्या कलावंतांना फाळके पुरस्कार देण्याची परंपरा सुरू करण्यात आली. भारतातील चित्रपटसृष्टीतील हा सर्वोच्च पुरस्कार मानला जातो. दहा लाख रुपये, प्रशस्ती पत्रक आणि सुवर्ण पदक असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. १९६९ साली देविकाराणींना पहिला दादासाहेब फाळके पुरस्कार देण्यात आला. भारतीय चित्रपटसृष्टीतील पन्नास दिग्गजांना हा पुरस्कार देण्यात आलाय. पृथ्वीराज कपूर, राज कपूर, शशी कपूर, लता मंगेशकर, आशा भोसले, बोम्मी नरसिंह रेड्डी, बी.नागी रेड्डी ही काही नावे. बी.आर. चोप्रा, यश चोप्रा अशा एकाच कुटुंबातील सदस्यांनी हा पुरस्कार मिळवलाय. या वर्षीचा पुरस्कार हिंदी चित्रपटसृष्टीत 'अँग्री यंग मॅन' म्हणून आपली इमेज प्रस्थापित करणाऱ्या व अजूनही आपल्या दमदार अभिनयाने कार्यरत असणाऱ्या अमिताभ बच्चन यांना जाहीर झालाय.

राष्ट्रीय पुरस्कार मिळवणं हे कलाकाराचं अंतिम ध्येय असतं. हा पुरस्कार मिळवण्यासाठीआपल्या कलेचा सर्वोत्तम आविष्कार सादर करण्याचा प्रयत्न कलाकार करत असतात. प्रेक्षकांनी सुद्धा त्याची दखल घेऊन अशा कलावंतांना दाद द्यायला हवी.

**– संतोष पाठारे**
भ्रमणध्वनी : ८१६९१७०८२७
santosh_pathare1@yahoo.co.in

**श्रीशब्दरत्न प्रकाशन प्रकाशित**
**एक वाचनीय व संग्राह्य**
**दिवाळी अंक**

**अक्षरगंध**

**दिवाळी २०१९**
**वर्ष १०वे**

**पृष्ठे सुमारे २००**
**मल्य रु.१८०/-**
**प्रकाशक, संपादक**
**– मधुवंती सप्रे**

***** मुख्य विषय : अभिनव वाग्विलासिनी । जे चातुर्यार्थ कलाकामिनी *****

**१) सर्वश्री सावित्रीबाई फुले, लक्ष्मीबाई टिळक, बहिणाबाई चौधरी, माणिक वर्मा, रोहिणी भाटे**
लेखन - वि.वा.शिरवाडकर, दीपक घारे, मीना गोखले, डॉ.नीता पांढरे, शमा भाटे, मधुरा प्रभू, शैला दातार, मधुवंती सप्रे

**२) सर्वश्री माणिक भिडे, पद्मा सहस्त्रबुद्धे, सुचेता भिडे-चापेकर, रोहिणी हट्टंगडी**
लेखन - रामदास भटकळ, सारंगी आंबेकर, नीलिमा कढे, मीरा दातार, राधा आंबेकर, गौरी कुलकर्णी

**व्यक्तिविशेष**
**१) रँग्लर र.पु.परांजपे -** इरावती कर्वे **२) विचारवंत पंडित प्रा.नरहर कुरुंदकर** - शामल पत्की, राजू परुळेकर, कुरुंदकरांचे दोन वाचनीय लेख, **३) जाहिरात गुरू व हिंग्लिश नाटककार भरत दाभोळकर** - मुलाखत - गणेश आचवल, **४) प्रकाशक गं.पा. आणि अप्पा परचुरे** – जयवंत दळवी, रेणुका माडीवाले, **५) संगीततज्ज्ञ चैतन्य कुंटे** – मुलाखत लीलाधर चक्रदेव व सौमित्र क्षीरसागर, **६) अभिनेता सुमीत राघवन** – हॅम्लेटचा अनुभव

| **विचारवेध लेखमाला** | **आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने** | **रंग कवितेचे** |
|---|---|---|
| भारतकुमार राऊत, राजा राजवाडे, किरण पुरंदरे, शुभदा वराडकर, अ.पां.देशपांडे, वा.ल.मंजुळ | डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर, गिरीजा कीर, चांगदेव काळे, अरुण गोडबोले, डॉ.सरोज बावडेकर, अभय जोशी (सुदेश - ग्रंथाली) | सुचेता भिडे-चापेकर, मोरेश्वर पटवर्धन, गुणवंत पाटील, रविन पाटील, ऐश्वर्य पाटेकर, डॉ.उर्मिला चाकूरकर इत्यादी |

| | | |
|---|---|---|
| **मुखपृष्ठ व मांडणी प्रज्ञा हरणखेडकर** | **एकही जाहिरात नसलेला, साहित्य, कला विषयक भरगच्च लेखांनी परिपूर्ण असा अंक १९ ऑक्टोबर पासून पुस्तकांच्या सर्व दुकानांमधे उपलब्ध - मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, कोल्हापूर इ. संपर्क - shreeshabdaratna@yahoo.com** / ९८२११७५३४९ | **द्वारा : ए-६०३, शुभम, जीवन विकास केंद्र मार्ग, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७** |

# काव्यरंग

**गजल : अजून बाकी!**

आयुष्याशी देणेघेणे... अजून बाकी!
या जगण्याचे किती मनसुबे... अजून बाकी!

किती कळ्या या आसुसलेल्या फुलण्यासाठी,
किती फुलांशी बोलायाचे... अजून बाकी!

असेन थकलो, हरलो नाही, अजूनही मी-
हे माझ्याशी माझे लढणे... अजून बाकी!

अता माणसे कळू लागली, जराजराशी,
किती चेहरे वाचायाचे... अजून बाकी!

पुन्हा नव्याने भर प्याले तू, आज साकिया-
नशेतही का, होष राहिले... अजून बाकी?

'दबीर' आहे, रहस्यमय ही कथा जिण्याची-
पण, शेवटचे, पान वाचणे... अजून बाकी!

**सदानंद डबीर**
भ्रमणध्वनी : ९८१९१७८४२०



**'छत्री'**

भर पावसात तो विकतोय छत्र्या
नि स्वत:ला कोरडं ठेवू पाहणारे लोक
त्या घेताहेत विकत
व्यावहारिक कोरडेपणानेच.

पावसाच्या जोरासोबत
त्याचा वाढतोय उत्साह,
वाढतेय गर्दीही
गुळाभोवती घोंगावणाऱ्या माशांसारखी

'लुटलो...खाली करो'च्या गर्जनांसह
खोक्यातून उडताहेत सर्वत्र
रंगीबेरंगी छत्र्यांची फुलपाखरं
पिंजऱ्याचे दार उघडताच
आभाळओढीने झेपावणाऱ्या लव्हबर्ड्ससारखी

पांगलेल्या गिऱ्हाईकांनंतर तो निघाला
रिकाम्या खोक्यात
धुक्यासारखी दाटलेली भूक भरून
आभाळाच्या छत्रीखाली भिजत;
आपला फाटका खिसा वाचवत.

त्याच्या डोळ्यांतून वाहताहेत आभाराश्रू
नि ओठांवर भिजतेय एकच प्रार्थना,
उद्याही धरावी त्याने अशीच
पावसाची कृपाछत्री...

**गीतेश गजानन शिंदे**
भ्रमणध्वनी : ९८२०२७२६४६

**भविष्य**

अख्खं हिरवंगार रान
काहीतरी अशुभ बिभत्स स्वप्न पडल्यावर
दचकून जागं झाल्यासारखं भेदरलेलं

झाडं उभी आहेत पण मलूल, रडवेली
कोणत्याही क्षणी उन्मळून पडतील अशी
फांद्या अर्धांगवायू झाल्यासारख्या
निचेष्ट, निष्प्राण
एखादी अवखळ झुळुक आली तरच
काही अबोध पानं
जराशी, कशीबशी हलतात तेवढंच...

पक्षी भयभीत, निपचित बसलेले
वावटळ शांत झाल्यावर
इकडे तिकडे विखरून पडणाऱ्या
सुकलेल्या वाळक्या पानांसारखे

दूरच्या कुठल्यातरी
अनोळखी प्रदेशातल्या पक्ष्यांचा एखादा चुकार थवा
चिवचिवाट करत उडत जातो
तितकीच काय ती हालचाल

ओहोळ, झरे वाहताहेत पण
गालावरून अश्रू ओघळावा तसे

रातकिडे आता किरकिर करत नाहीत
आता ते फक्त रडतात

रानातला हिरवाकंच ओला वारा
दंगलीत आपल्या आईबाबांसकट
जळणारं घर बघणाऱ्या मुलासारखा
भयाण सुन्न

रानाला कवेत घेऊन जी नदी वाहतेय
तिचं पाणी
अकाली वैधव्य आलेल्या
स्त्रीच्या चेहऱ्यासारखं
दिसायला लागलंय

काही नाही
या सगळ्यांनी काही दिवसांपूर्वी
रानाच्या कपाळावर
एक बोर्ड ठोकलेला पाहिला

एका बिल्डरचा

**चंद्रशेखर सानेकर**
भ्रमणध्वनी : ९८२०१६६२४३



**कवीचं जग**

तुम्ही खिशात हात टाकला
की तुमच्या खिशात पैसे खुळखुळतात.

कवीने खिशात हात टाकला
की त्याच्या खिशात प्रतिमा खुळखुळतात

तुमच्या खिशातल्या पैशाने
तुम्ही काय विकत घ्याल
हे मला ठाऊक नाही
पण खिशात खुळखुळणाऱ्या प्रतिमांनी
कवी मात्र
नक्कीच विकत घेऊ शकतो
हे अख्खं जग!

**प्रशांत असनारे**
भ्रमणध्वनी : ९७६३७१४३०४

**समाधिस्थ...**

पुरुष पुरुषासारखा असावा...
न रडणारा...
डॅशिंग ...
डेरिंगबाज...
गिर्रेबाज....
ससाण्यासारखा...
अख्खं आभाळ कवेत घेणारा...



या एवढ्या पुंजीवर
घरटं बांधतात कित्येकजणी...
मग हळवा सापडला तर?
भिडस्त असला तर ?
खोदत जातात आतपर्यंत
कबर खोदल्यासारखी...
आणि खोल शिरताना
मारून ठेवतात आत खुंट्या
परतीची वाट चढायच्या...

तरीही तक्रार नसते त्याची...
तो जागा आखतो...
सातबारा जमवतो...
भुकेच्या मुंगळ्यांना चढू देत नाही
निश्चयावर...
नसेल कणा ताठ
पण फिरवत नाही पाठ....
गप्प बसतो कोपऱ्यातल्या खुर्चीसारखा...
बरंच ऐकत असावेत त्याचे कान..
थकलेला दिसतो झेलताना
नेम धरून मारलेले शब्द...
घरोघरी...
त्यालाही भूक असावी....
वर्दळही हवी असेल... आपलेपणाची...
समजूतदारपणाच्या बोळ्याने
फिरवावंसं वाटतही असेल
वठलेल्या मनावर संजीवन...

पिलं 'बाबा' बोलावतात,
म्हणून त्याच्यातली आई
मरत नाही काही...

पण मग
असा कसा
सुटतो नजरेतून
जिवंत समाधी घेतलेला
घरोघरीचा पुरुष?

**शिल्पा देशपांडे**
भ्रमणध्वनी : ९८२०२६३२२३

**भास**

ते असे करणार नाही, हा जरी विश्वास होता
दगाबाज वस्तीत नाही, हाच मोठा भास होता

दंगली शहरात मुरल्या, अन् घरे मौनात मेली
दाखले देऊन दूरचे, गनीम आसपास होता

कोणत्या रंगात नेकी, शोधू कुठले रक्त परके
पळालेले पाय म्हणती, लढाईत उल्हास होता


कालचा आवेश ऐकून रांगले जन आप्त सारे
टांगत्या खिळ्यात विरला, तान्हुलाचा श्वास होता

भिंत सारवून झाली, अंगणेही लख्ख केली
अटाळ्याच्या कवडशाचा, जाच व्हरांड्यास होता

शास्त्र काट्याची लढाई, मी कसा जिंकेन बरवा
आज्यास नाही बोल फुटले, बापास बंदीवास होता

**श्रीपाद अपराजित**
भ्रमणध्वनी : ९९२२२०८८२२





**मोरपीस**

वेणीचे पेड वळावेत
इतक्या सहज विणतात बायका
गोफ नात्यागोत्यांचे
लेकराबाळाच्या सुखात
उधाणतात वात्सल्याचा समुद्र होऊन
जोडीदारात तर बेमालूमपणे वितळतात,
जशी पाण्यात विरघळावी खडीसाखर
सग्यासोयऱ्यांसाठी तुकोबाच्या औदार्याचं
आभाळ होतात बायका
कधीतरी सांजावल्या संध्याकाळी
बसतात निवांतपणे हिशोबाला
तर पदराच्या पुरचुंडीत गवसतो
झडलेल्या मोरपीसासारखा
स्वप्नांचा सांगाडा!

**छाया कोरेगावकर**
भ्रमणध्वनी : ९३५९१३६७७०



## आई

इवलसं रोप असती
तर सहज रोपलं असतं
इथं तिथं
आई तर विस्तीर्ण झाड होती...

शहरात आली
पण आपली मूळं तिकडेच गावी सोडून आली
इथे सिमेंटच्या इमारतीत
निर्जीव दगडी घरात राहून
कोमेजली
भरभर म्हातारी होत गेली

इथे निवांत वेळ कुणाकडे होता बरं
आईशी बोलायला
सुख-दु:ख वाटून घ्यायला
तिकडे गावी
दिनू काका, जानकीताई, शैलावहिनी होत्या
या शहरात तर
गप्पागोष्टींचं माध्यम होतं -
टीव्ही, पेपर, मोबाईल
म्हणून आई
मुकी झाली
हरवून गेली
दूर निघून गेली

**मूळ हिंदी कविता : जसविंदर शर्मा**
**मराठी अनुवाद : नामदेव कोळी**
भ्रमणध्वनी : ९४०४०५१५४३

## गरिबी

मी बाळ असताना
आई मला बिछान्यावर झोपवून
भाताच्या शेतात जायची.
दिवसभर राबायची
आणि मी
अंथरुणावरचा कचरा खायचो.

मी रडायचो
डोळे पुसायचो माझ्या हाताने,
लाल होईपर्यंत!
शेंबूड गळायचा नाकातून
तो पुसायचो, माझ्याच बाहीने.

तरुण झाल्यावर
भात शेतात मजुरी करून
थोडेफार पैसे कमावले,
पुस्तके खरेदी करण्याइतपत;
पण मकरउत्सवात सर्व खर्च झाले.

अख्खा दिवस जमीन खोदून
जेव्हा मी घरी परतायचो;
तेव्हा मी भात न खाता दारूचं प्यायचो.
आणि माझी बायको पाणी उकळायची...
माहीत आहे... कशासाठी?

**मूळ संताली कविता : श्याम सी. टुडू**
**मराठी अनुवाद : प्रतिभा सराफ**
भ्रमणध्वनी : ९८९२५३२७९५

**अंधार कोळिष्टकांत तडफडतोय**

तुझ्या भाळीची रक्तमुद्रा शोभून दिसतेय
स्वागतासाठी सज्ज आहेत तुझ्या
वधस्तंभ उन्हाचे
अथवा धारोष्ण रक्तझरे


तहान व्याकुळ झालीच तर
समोर मृत्यूनद वाहतोच आहे

तू अपेक्षिलेस की, इथं एक एक दिप प्रज्वलित व्हावा
तिथं हारीनं मांडल्या गेल्यायत कबरी
अंधार कोळिष्टकांत तडफडतोय
तेजस्वी तारा

तुझ्या हाती लक्षणीय खड्ग विफलतेचं
नि तुझ्या हृदयातील रात्र प्रहर ओलांडतेय...

**प्रकाश खरात**
भ्रमणध्वनी : ९००४०७५२५७





**स्वाभिमानी मुली**

मुलं मोठी झाल्यावर
सीतेने घेतला जमिनीचा आधार
रामाऐवजी,
गंगेनंही मारली उडी
उंच कैलासावरून
शंकराचा भरला संसार मोडण्याऐवजी...

जोपर्यंत मुलींना मिळत राहतील
डोंगर-जमिनी-नद्या-विहिरी,
भडका उडणारे स्टोव्ह वा
कीटकनाशकांच्या बाटल्या,
गेला बाजार रंगीत-जुन्या-मजबूत साड्या-ओढण्या-स्कार्फ
मुली जपत राहतील
तुम्हीच त्यांना शिकवलेला स्वाभिमान.

तुम्हांला एकतर मुली मिळतील
नाहीतर
त्यांचा स्वाभिमान!

स्वाभिमानी मुली नावाची काही जमात
शिल्लक राहणार नाही भूतलावर
असेच तर चाललेत तुमचे प्रयत्न
गंगेपासून शबरीपर्यंत!

**- योगिनी राऊळ**
भ्रमणध्वनी : ९८३३५८१४६१

अरविंद व्यं. गोखले

# लोकमान्यांचे अर्थकारण

**लोकमान्य टिळक हे सर्वार्थाने क्रांतिकारक होते. एकाच वेळेला ते गणिती असायचे, त्याचवेळी देशाच्या अर्थव्यवस्थेबाबत त्यांचा विचार चालू असे. लोकमान्यांच्या स्मृतिशताब्दी निमित्ताने हा विशेष लेख.**



लोकमान्य टिळकांच्या निधनाला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. त्याचवेळी महात्मा गांधीजींची दीडशेवी जयंती २ ऑक्टोबर रोजी पार पडली. लोकमान्य टिळकांना परराष्ट्र राजकारणाचा जेवढा आवाका होता तेवढा तो गांधीजींना त्या काळी नव्हता. गांधीजींचा भारतीय अर्थकारणाचा जेवढा अभ्यास होता, त्यापेक्षा अधिक लोकमान्यांचा होता आणि तो सरस होता. इथे मला गांधीजी विरूद्ध लोकमान्य अशी तुलना करायची नाही. ओघात जे आले ते सांगितले. टिळकांनी दुष्काळ निवारण्याचे उपाय तेव्हा सांगितलेले होते, ते आजही आपल्याला आदर्शवत वाटावेत असेच आहेत. १८९७ च्या दुष्काळात त्यांनी गावोगाव जाऊन शेतकऱ्यांना 'फेमिन कोडा'चा अर्थ समजावून दिला होता. त्यांनी 'फेमिन कोडा'चे सुलभ भाषांतर करून ते स्वत: वाटले होते. गांधीजींचा मार्ग हा लघुउद्योगाच्या माध्यमातून विकास साधणारा होता, तर लघुउद्योगाबरोबरच अवजड उद्योग टिळकांनी कधीच वर्ज्य मानला नाही. 'पुण्यातील पहिली चिमणी' हा अग्रलेख टिळकांनी २८ फेब्रुवारी १८९३ रोजी लिहून औद्योगिक क्रांतीचे स्वागत केले

होते. पुण्याच्या आसपास जेव्हा शेकडो चिमण्या उभ्या राहतील तेव्हाच पुण्यास पूर्वीचे वैभव प्राप्त होईल, हे कै. माधवराव कुंटे यांचे वाक्य उद्धृत करून टिळकांनी या अग्रलेखात म्हटले आहे की, विलायतेतून जो रेशमी कपडा येथे येतो त्याचे रेशीम येथूनच जाते. नुसता कपडा पाहिला तर तो येथेही तयार होतो, पण विलायती कपड्यास जो तजेला व जी सफाई असते ती येथे बनवलेल्या कपड्यास असत नाही. त्यासाठी लागणारी यंत्रसामग्री येथे तयार होत नाही, ती पुण्यात नव्याने निघालेल्या या गिरणीने मागविलेली आहे. आपल्याकडे जर चांगले कापड तयार झाले तर ते परदेशी, विकले जाईल आणि त्यातून भारताची अर्थव्यवस्था सुधारेल. स्वदेशी वस्तूंची निर्मिती करायची आणि विकास साधायचा तर परदेशी तंत्रज्ञान (मग ते ब्रिटिश का असेना) आणि परदेशी यंत्रसामग्री त्यांना वर्ज्य नव्हती. याच अग्रलेखात त्यांनी म्हटले होते की, 'आम्हास लागत असलेले कापड मँचेस्टर येथे तयार व्हावे व चिनी, जपानी लोकांस लागत असलेले कापड आम्ही मुंबईत तयार करावे, असला खो-खोचा व्यापार कधीही शाश्वात राहावयाचा नाही.' थोडक्यात आपले कापड आपण बनवावे आणि ते इतके निर्माण व्हावे की ते इतर देशांमध्येही निर्यात व्हावे, तरच देशाची अर्थव्यवस्था बळकट होईल, असे त्यांना सुचवायचे आहे.

इथे तुलना करायची म्हणून नव्हे पण गांधीजींनी स्वदेशीची मोहीम हाती घेण्यापूर्वी ती टिळकांनी हाती घेतली होती आणि त्याचे अतिशय पद्धतशीरपणे त्यांनी नियोजन केले होते. (गांधीजींचे दक्षिण आफ्रिकेहून भारतात जुलै १९१४ मध्ये आगमन झाले.) देशात निर्माण झालेल्या वस्तूंचा वापर जनतेकडून जोपर्यंत सातत्याने केला जात नाही तोपर्यंत देशांतर्गत उत्पादनांना उठाव मिळणार नाही आणि ते उत्पादन वाढणारही नाही, इतका तर्कशुद्ध विचार टिळकांनी अनेक सभांमधून बोलून दाखवला होता. आपल्याला हव्या असलेल्या सगळ्या वस्तू देशात तयार होईपर्यंत त्या वापरण्यात अर्थ नाही, असा विचार करणारे एकतर स्वत:ची स्वदेशीच्या वापरातून सुटका करवून घेत आहेत किंवा त्यांना त्या वापरायच्याच नाहीत, असेही त्यांनी बोलून दाखवले होते. स्वदेशीचा विचार हा त्यांनी आधी केला आणि मग विलायती मालावरल्या बहिष्काराची हाक दिली. या बहिष्काराबाबत गोपाळ कृष्ण गोखले यांनी तो 'टिळकांनी सरकारवर टाकला असल्या'चा दावा केला. वास्तविक तसे नव्हते. तो विलायती वस्तूंवरच होता, पण त्यातून टिळकांना इंग्रज सरकारच्या विरोधात बहिष्कारही घडवायचा होता, ही वस्तुस्थिती आहे. इंग्रज सरकार त्यांच्या 'फोडा आणि झोडा' या धोरणाप्रमाणे या देशात नवनव्या भिंती उभारून आपल्या सत्तेला अधिकाधिक बळकटी आणायचा प्रयत्न करत राहणार, हे त्यांनी ओळखले होते. त्याचेच प्रत्यंतर बंगालच्या फाळणीने आणून दिले. व्हॉइसरॉय लॉर्ड कर्झन याने १९ जुलै १९०५ रोजी बंगालची फाळणी करून आपल्या उन्मादी आणि अविवेकी कृतीचे प्रदर्शन मांडले. त्याला सर्वदूर विरोध होऊ लागला. ७ ऑगस्ट १९०५ रोजी बंगालमध्ये कडकडीत हरताळ पाळण्यात आला. लंडनमध्ये श्यामजी कृष्ण वर्मा यांनी त्याच महिन्यात इंडिया हाऊसची स्थापना करून लंडनमधील भारतीयांना चळवळीसाठी संघटित केले. भारतीय राष्ट्रवादाचे ते उद्गाते ठरले. बंगालच्या फाळणीला केवळ बंगालमधूनच विरोध होता असे नाही, तर महाराष्ट्रही त्या विरोधात मागे नव्हता. लोकमान्य टिळकांनी या विरोधाचे नेतृत्व केले होते. त्यांनी ठिकठिकाणच्या आपल्या भाषणातून आणि केसरीच्या अग्रलेखांमधून जनतेला उठाव करण्याचे आवाहन केले. केवळ काड्यापेटी तुमच्याकडे आहे म्हणून दिवा पेटत नाही, तर त्यास तेलवातही लागते, असे सांगून तेलवातीच्या तयारीची त्यांनी रुजवात करून दिली होती. त्याचवेळी त्यांनी स्वदेशीची जनतेला हाक दिली. लॉर्ड कर्झनला त्यांनी औरंगजेबाची उपमा दिली. बंगालच्या फाळणीने कर्झनच्या विरोधात सर्वत्र संतापाची लाट उसळली, ती इतकी की त्याला राजीनामा देऊन पळ काढावा लागला होता.

प्रखर देशभक्तीचे वारे सर्वत्र वाहू लागलेले असतानाच लोकमान्यांनी स्वदेशीचे केलेले आवाहन संपूर्ण देशभर हां हां म्हणता पसरले. वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी 'अभिनव भारत' या क्रांतिकारक संघटनेला उभे करणारे विनायक दामोदर सावरकर तेव्हा फर्ग्युसन महाविद्यालयात शिकत होते. परदेशी कपड्यांची होळी आम्हाला करायची आहे, असे सांगायला हा तरुण मुलगा टिळकांकडे आला तेव्हा टिळकांनी त्याला आणि त्याच्याबरोबरच्या मुलांना काय सांगितले ते लक्षात घेण्याजोगे आहे. परदेशी कपड्यांची अशी होळी करा की, समस्त देशवासीयांमध्ये त्याने वन्ही पेटवायला हवा. होळी नुसती दिखाऊ नको, तर जे गाडे मिरवत आणाल, त्यात रस्तोरस्ती भर पडत गेली पाहिजे. असे ढीग लागले पाहिजेत, की प्रत्येकाला असे वाटले पाहिजे की, यापुढे विलायती कपडे आपल्या अंगावर दिसणार नाहीत. ७ ऑक्टोबर १९०५ रोजी पुण्यात या विद्यार्थ्यांनी खरोखरच गाडे भरभरून विलायती कपडे गोळा केले आणि त्याची तेव्हाच्या लकडी पुलापलीकडे (आताच्या संभाजी पुलापलीकडे) कर्वे रस्त्याच्या तोंडाशी होळी केली. जेव्हा हे विद्यार्थी टिळकांना आपल्याला परदेशी कपड्यांची होळी करायची असल्याचे सांगायला आले तेव्हा तिथे उपस्थित असलेले न. चिं. केळकर यांनी तसे केल्याने कपड्यांची हानी होईल, त्यापेक्षा ते कपडे वाटून टाकले तर त्याचा गोरगरिबांना उपयोग तरी होईल, असे म्हणताच टिळकांनी 'या होळीने जे साध्य होईल ते गोरगरिबांना विलायती कपडे वाटून टाकण्यापेक्षा अधिक मोलाचे असेल', हे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी तिथेच स्वदेशी कपडे वापरण्याची शपथ घेतली. विलायती कपड्यांविरूद्धचा राग हा देशभर पसरला आणि इंग्रजांनी टिळकांच्या नेतृत्वाचा धसकाच घेतला. टिळकांच्या या

आंदोलनाने आपल्या मँचेस्टरमध्ये निर्माण होणाऱ्या कापडाचे काय होणार, याची त्यांनी चिंता लागून राहिली होती. टिळकांनी कपडे जाळायला सांगून काय एवढे केले, असे आजही विचारले जाऊ शकते, पण टिळक हे तेवढ्याने थांबणारे नव्हते. त्यांनी मुंबईला जाऊन देशी गिरणी कारखानदारांशी चर्चा करून त्यांना कापडाचे उत्पादन वाढवायला सांगितलेच, पण त्यांच्या कापडाची स्वस्तात विक्री कशी करता येईल, याविषयीही काही उपाय सुचविले. स्वस्त कापडाची आणि विशेषत: धोतरांची विक्री त्यांनी काही केंद्रे उभारून सुरू केली. स्वस्त दरात धोतरांची निर्मिती केल्याने स्वाभाविकच विलायती तागे बंदरातच पडून राहू लागले. त्यामुळे इंग्रजांचे धाबे दणाणून गेले नसते तरच नवल.

लोकमान्यांनी त्या काळात शेतकऱ्यांच्या सहकारी पेढ्यांच्या आणि सहकारी सोसायट्या स्थापन करण्याच्या कल्पनेला उचलून धरले होते. १० नोव्हेंबर १९०३ रोजी त्यांनी लिहिलेल्या अग्रलेखाचे शीर्षकच मुळी 'शेतकऱ्यांच्या व कारागिरांच्या परस्पर साहाय्यकारी पेढ्या' असे होते. ते काय लिहितात ते पाहा : 'हिंदुस्थान देशातील शेतकऱ्यांची स्थिती उत्तरोत्तर खालावत चाललेली आहे व वारंवार कर्ज काढावयास लागत असल्यामुळे सावकार काही त्यास सुटत नाही अथवा सावकारास व्याज भरण्यातच त्यांचे सर्व उत्पन्न नाहीसे होते, ही गोष्ट हिंदुस्थान सरकारच्या आज बरीच वर्षे नजरेस आलेली आहे; ती सुधारण्यास काय काय उपाय योजावे, याबद्दल सरकारात विचारही चालू आहे. परंतु राज्यकारभाराच्या इतर बाबतीत ज्याप्रमाणे सरकारचे मत व लोकमत भिन्न झालेले आहे, त्याप्रमाणे याही विषयाची स्थिती आहे. शेतकरी लोक दरिद्री झाले आणि एक वर्ष पाऊस न पडला तर त्यास दुष्काळाची कामे पाहावी लागतात, ही वस्तुस्थिती दोन्ही पक्षास मान्य आहे. लोकांचे म्हणणे असे आहे की, शेतकऱ्यास अशी स्थिती प्राप्त होण्याचे मुख्य कारण देशातील उद्योगधंदे बुडून वाढत्या प्रजेस केवळ शेतीवरच निर्वाह करावा लागतो आणि देशातील संपत्तीचा ओघ विलायतेकडे वळला असल्यामुळे चांगले व परोपकारी सावकारही राहिले नाहीत हे होय. ही स्थिती सुधारावयाची असेल तर, पूर्वीच्या अमदानीत खेडेगावातील लोकांस जे धंदे करता येत असत ते, अगर तशा प्रकारचे धंदे त्यास मिळावे अशा प्रकारे तजवीज करून, हलक्या व्याजाने पैसे शेतकऱ्यास मिळतील अशी व्यवस्था करा, असे लोकपक्षाचे म्हणणे आहे आणि त्याप्रमाणे काही उदारबुद्धीच्या सावकारांनी एकत्र जमून आपणांस सरकार काही सवलती देत असेल तर आपण शेतकीच्या पेढ्या काढून शेतकऱ्यास हलक्या व्याजाने पैसे देण्यास तयार आहो, असे सरकारास कळवले होते. पण ही व्यवस्था सरकारास रुचली नाही व सर वेडरबर्नसारखे गृहस्थ मध्यस्थ असताही अशा तऱ्हेच्या सावकारी पेढ्यास सरकार मदत करण्यास तयार नाही, असा या कामी उद्योग करणारास जवाब मिळालेला आहे. ही गोष्ट येथे नमूद करण्याचे कारण एवढेच की, सरकारचे या कामी धोरण कोणत्या प्रकारचे आहे हे वाचकांच्या नीट लक्षात यावे.' यावर उपाय काय, तर 'आता शेतकऱ्यांनी आणि कामगारांनी आपापल्या पेढ्या निर्माण कराव्यात आणि गरजेनुसार संबंधितांना कमीत कमी दरात किंवा बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून द्यावे आणि त्याची त्या वेळची गरज भागवावी', असे टिळकांनी म्हटले. ही मंडळी व्यापार करणारी नसल्याने त्यांनी त्यात फायद्याचा दृष्टिकोन ठेवता कामा नये, असेही त्यांनी सुचवलेले आहे. अशा कर्जावर व्याज किती घ्यायचे ते मंडळाने म्हणजेच शेतकरी आणि कामगार यांच्या प्रतिनिधी-मंडळाने ठरवावे, असे त्यांनी म्हटले आहे. थोडक्यात जे व्याज आकारल्याने फायदा होईल, तो सदस्यांमध्ये वाटून न घेता तो भांडवलात जमा करावा, म्हणजे भांडवलही वाढेल आणि शेतकरी तसेच कामगार यांची त्या-त्या काळची गरज भागेल. हे तत्वज्ञान सांगणारे टिळक तेव्हा स्वत:ला मार्क्सवादी किंवा डावे विचारवंत वगैरे म्हणवून घेत नव्हते. तेव्हाच्या काय, पण आजच्या हिशेबातही ते डावेच होते आणि त्यांचे हे डावेपण रशियात कॉम्रेड लेनिन आणि भारतात कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे यांनी ओळखलेले होते.


केसरी.

वर्ष १. पुणें—मंगळवार तारीख ४ जानेवारी १८८१. अंक १.

आंतरराष्ट्रीय घडामोडींवर टिळकांचे चौफेर लक्ष असायचे. त्या काळी रशिया असो की आयर्लंड, टिळकांना जनतेला एकच संदेश द्यायचा होता, तो म्हणजे सरकारच्या अन्यायाविरोधात स्वस्थ बसू नका. टिळकांनी तेव्हा रशियन वकिलातीशी संपर्क साधला होता आणि रशियातल्या लष्करी विद्यालयात भारतीय विद्यार्थ्यांना प्रशिक्षण घेता येईल का, याविषयी विचारणा केली होती. त्यांचे झारविरोधी लिखाण तोपर्यंत चर्चेचा विषय ठरल्याने त्यांच्या या चौकशीला नकारार्थी उत्तर मिळाले. तेव्हा त्यांनी लिओ टॉलस्टॉय आणि मॅक्झिम गॉर्की यांच्याशीही पत्रव्यवहार केला. लिओ टॉलस्टॉय यांनी त्यावेळी लिहिलेल्या एका लेखात

टिळक आणि गांधी या दोघांचाही उल्लेख केला होता. गांधी तेव्हा अजून दक्षिण आफ्रिकेतच होते, पण त्यांच्या तिथल्या कामाला टॉलस्टॉय यांनी गौरवले होते. त्याचबरोबर त्यांनी गांधी हे कोणत्याही पद्धतीच्या क्रांतिकार्यास उपयुक्त नाहीत, असे म्हटले होते. टिळक असोत की गांधीजी, दोघेही रशियातल्या पहिल्या उठावाने प्रभावित झाले होते, पण तो तेवढा यशस्वी झाला नाही याबद्दल टिळकांच्या मनात हळहळ होती. ती त्यांनी अग्रलेखांमधून व्यक्तही केली आहे. 'इंग्रज कोठावळ्याचा रशियन जुलूम' हा अग्रलेख (९ ऑगस्ट १९०७) वाचताना तर त्यांनी अन्याय्य दडपशाहीची घातलेली सांगड पदोपदी जाणवते. 'हिंदुस्थानवर रशियाची स्वारी' हा अग्रलेख (९ ऑगस्ट १९०४) वाचताना आपल्याला तेव्हाच्याच नव्हे तर आजच्याही भौगोलिकतेचे भान येते. या अग्रलेखाचे निमित्त होते ते रशियाचे युद्ध खात्याचे प्रमुख जनरल क्युरोपाटकिन यांनी सरकारला सादर केलेल्या अहवालाचे. त्यात त्यांनी सुमारे एक लाख पंधरा हजार सैन्य घेऊन आशियातील तुर्कस्तानमधून अफगाणिस्तानच्या मार्गाने हिंदुस्थानवर स्वारी करता येईल, असा दावा केला होता. ती तेव्हाची दाट शक्यता होती. कोणाकोणापासून सावध राहण्याची आवश्यकता आहे याचेही मार्गदर्शन टिळकांनी या सर्व अग्रलेखांमधून केले होते.

जे जे हत्यार भारतीय स्वातंत्र्यासाठी वापरता येईल ते वापरलेच पाहिजे याविषयी त्यांचा कटाक्ष असे. मुंबईत १९०६ मध्ये पोस्टमनांचा संप झाला. टिळकांनी त्या संपाला पाठिंबा तर दिलाच पण पोस्टमनांना त्या काळी मुंबईत मिळणाऱ्या २० रुपये पगारात तेव्हाच्या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी जगून दाखवावे असे थेट आव्हानही दिले. २८ ऑगस्ट १९०६ रोजी त्यांनी केसरीत लिहिलेल्या अग्रलेखाचे शीर्षक होते 'हा पोटापाण्याचा प्रश्न आहे'. त्यात त्यांनी पोस्ट खात्याला भीक लागलेली आहे, अशातला भाग नाही, असे सांगून म्हटले होते की, 'लोकांना खूप काम पडते व खायला पुरेसे मिळत नाही हेही खरे आहे. ब्रायनसारख्या परदेशचा प्रख्यात मुत्सद्दी हिंदुस्थानचे लोक पाप्याच्या पितराप्रमाणे आसन्नमरण दिसतात, असे आपले मत जगाला कानठळ्या बसतील एवढ्या मोठ्याने सांगतो. अशी परिस्थिती असताना इंग्रजी राज्याची इज्जत किंवा इभ्रत राखण्यासाठी बादशाही बालिश कल्पनेला बळी पडून पोस्टखात्याच्या चालकांनी ऐंशी-नव्वद इसमांना पूर्वीप्रमाणे तुम्ही पोटात कदान्न भरून जिवंत राहून सरकारची नोकरी बजावा, असे सांगण्याचा निर्दयपणा दाखवितात हे योग्य आहे काय?' त्यावेळी मुंबईत सहाशेच्या आसपास पोस्टमन होते आणि त्यांचा तो संप फोडण्यातही आला होता असे दिसते. या ऐंशी-नव्वद जणांच्या बढतीत अडसर निर्माण करण्यात आला होता, पण म्हणून त्यांनी संपातून माघार घेतलेली नव्हती.

आज आपल्याला सर्वत्र मॉल आणि नवनव्या 'शॉपिंग प्लाझा' यांचे कोण कौतुक आहे, पण त्या काळात जनतेची गरज म्हणून त्यांनी एक मोठे स्वदेशी वस्तूंचे दुकान थाटले होते. देशांतर्गत उत्पादनांचा उठाव व्हावा या हेतूने त्यांनी रतनजी जमशेदजी टाटा यांच्या सहकार्याने पहिले बॉंबे स्टोअर मुंबईच्या फोर्ट भागात उभे केले. आजच्या भाषेत सांगायचे तर भारतातला तो पहिला मोठा मॉल ठरला. त्यानंतर त्याच्या १३ शाखा ठिकठिकाणी उघडण्यात आल्या. पुण्यातही कँप भागात जे 'बॉंबे जनरल स्टोअर' आहे तेही त्याचीच शाखा आहे. गेली अनेक वर्षे या स्टोअरच्या दारात मी लोकमान्यांचे मोठे तैलचित्र पाहात असे. सध्या ते मात्र दिसत नाही. मुंबईत पहिल्यावहिल्या स्वदेशी मॉलचे उद्घाटन १७ डिसेंबर १९०६ रोजी दादाभाई नवरोजी यांच्या हस्ते झाले. १८९७ मध्ये दादाभाईंनी रॉयल कमिशनपुढे साक्ष देऊन भारताची त्या काळची अवस्था काय झाली आहे ते स्पष्ट केले होते. तेव्हापासून दादाभाई हे टिळकांचे 'रोल मॉडेल' होते. तेव्हाच्या त्या कमिशनपुढे लॉर्ड रिपनपासून लॉर्ड डफरिनपर्यंत अनेकांच्या साक्षी झाल्या, पण त्यातल्या एकानेही हिंदुस्थानची खरी आर्थिक स्थिती किती खालावलेली आहे हे सांगितले नाही, पण ते धाडस दादाभाईंनी तेव्हा केले होते. दादाभाईंनी १८६७ मध्ये लिहिलेल्या 'पॉवर्टी अँड अनब्रिटिश रूल इन इंडिया' हे पुस्तक लिहून ब्रिटिशांच्या भारतीय संपत्तीवर डल्ला मारण्याच्या भूमिकेचा खरमरीत शब्दांमध्ये समाचार घेतला होता. त्याचाही उल्लेख टिळकांनी आपल्या या अग्रलेखात केला होता. दर वर्षी हिंदुस्थानातून २०-२५ कोटी रुपये आम्हास त्याचा काहीही मोबदला न मिळता विलायतेस जातात, हे सांगून टिळकांनी आपल्या संपत्तीचा कसा ऱ्हास होतो आहे ते सांगितले होते. दादाभाई हे अर्थातच भारतीय राष्ट्रवादाचे जनक होते आणि त्यांना 'ग्रँड ओल्ड मॅन ऑफ इंडिया' असे म्हटले जात असे. त्यांच्याबद्दलच्या टाइम्सकारांच्या अतिशय दूषित अशा लिखाणास उद्देशून टिळकांनी 'दादाभाई नौरोजी यांची रॉयल कमिशनपुढील साक्ष' हा अग्रलेख लिहिला होता. त्या अग्रलेखात टिळकांनी म्हटले होते की, 'हिंदुस्थान देशाचा राष्ट्र या नात्याने खून करून केवळ दुभत्या गाईप्रमाणे येथील लोकांचे आपल्या पोषणाकरिता रक्षण करण्याची जर इंग्रजी राज्यकर्त्यांना हाव असेल तर ती अगदी नीचपणाची आहे असे म्हटले पाहिजे.'


लोकमान्य टिळक हे भारतीय राष्ट्रवादाचे धगधगते प्रतीक होते. 'भारतीय असंतोषाचे जनक' हे बिरूद त्यांना व्हॅलेन्टाइन चिरोल याने दूषण म्हणून दिले खरे, पण ते त्यांचे भूषण ठरले. त्यांचा हा राष्ट्रवाद सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि प्रागतिक विचारांमधून आला होता. लखनौ करार हे तर त्यांच्या दूरदृष्टीचेच खरेखुरे रूप होय.

**- अरविंद व्यं. गोखले**
भ्रमणध्वनी : ९८२२५५३०७६
arvindgokhale@gmail.com

शिरीष गंधे

# ।। फंदी अनंत कवनाचा सागर।।

१४ नोव्हेंबर २०१९ रोजी फंदींच्या द्विशताब्दी स्मृतिवर्षाची सांगता होत आहे. शाहीर म्हणून आणि कीर्तनकार म्हणून अनंत फंदींची कामगिरी संस्मरणीय आणि कालातीत आहे यात शंका नाही.



शाहीर अनंत फंदी यांची समाधी,केशवतीर्थ, संगमनेर.

'फंदी अनंत कवनाचा सागर' असे शाहीर होनाजीने अनंत फंदींच्या रचनाबहुलतेचे वर्णन केले आहे. त्यात तथ्य असलेच पाहिजे, याचे कारण होनाजी हा फंदींचा समकालीन शाहीर आहे तथापि आज या कवनाच्या सागरातील काहीच रचना उपलबध असाव्या, याहून दुर्दैव ते कोणते? रक्ताक्षी संवत्सरावर इ.स.१७४४ मध्ये जन्मलेल्या अनंत फंदींवर नाथपंथीय भवानीबुवांची कृपादृष्टी पडल्यावर,फंदींची काव्यसृष्टी बहरली. फंदींची शाहीर म्हणून ओळख करून घेताना, त्यांच्या भवतालाचाही विचार करावा लागतो. तत्कालीन संगमनेरसारख्या गावपातळीवरचे वातावरण, घरातील संस्कार, साहित्य, संगीत, कीर्तनादी संस्थांचा पडलेला प्रभाव यातून हळूहळू शाहीर घडत जाण्याची प्रक्रिया सुरू होते.

अनंत फंदींच्या बालपणाचा विचार करता, स्वच्छंदीपणात ते व्यक्त झाले. मनसोक्त

हुंदडणे, हाणामाऱ्या, नकला करणे यातून व्यष्टी आणि समष्टीचे निरीक्षण आपोआपच घडत गेले. हे निरीक्षण पुढे काव्यनिर्मितीस उपयोगी आले.

सत्ता, वित्त, शक्ती यातून येणारा अहंकार, या अहंकारापायी सामान्य माणसांची नित्य होणारी होरपळ, यामुळे फंदींचे मन कळवळले नव्हे ते या विरुद्ध पेटून उठले आणि शब्दातून. *'लंडे गुंडे हिरसे तट्टू यांची संगत धरू नको'* असे अवतरले. तत्कालीन राज्यकर्त्यांची कानउघाडणी करताना फंदींची लेखणी अधिक धारदार बनते आणि *' दो दिवसांची जाईल सत्ता, अपेश माथा घेऊ नको'...* अशी व्यक्त होते.

फंदींचा मित्र परिवार सर्व थरातला होता. रतन, राघू हे साथीदार गुरव तर मलिक हा मुस्लीम होता. होनाजी गवळी होता तर भवानीबुवा हे ब्राह्मण या शिवाय धनगर, मराठा, गोसावी अशा सर्वच लोकात फंदींची उठबस होती. याचा परिणाम त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर झाला आणि यातूनच त्यांची कवनाची भाषा आकारली. त्यामुळे फंदींची भाषा धनगरी आहे, हा आक्षेप आपोआपच निकालात निघतो.

फंदींच्या भाषेचा विचार करता, त्यांचा स्वभावही विचारात घ्यावा लागतो. वरील काही नेमकी उदाहरणे पाहिल्यावर स्पष्टोक्ती हाच त्यांचा स्थायीभाव दिसतो. उदा. विंचूरकरांकडे घडलेला प्रसंग. महेश्वराहून संगमनेरी परतत असताना, विंचूरमध्ये थांबले असता फंदींनी जासुदाबरोबर 'संगमनेरचे कवी' आले आहेत असा निरोप पाठवला. सरदार शिवाजीराव विंचूरकरांनी जासुदाबरोबर 'विंचूरी रुपया' पाठवून दिला. याचा राग येऊन फंदींनी तिथेच एक कवन रचले, *'विंचूरकरांची रास पाहिली, नाही अमुच्या कामाची'* अहिल्याबाईंच्या दरबारात ज्या कवीला अतिशय सन्मानाची वागणूक मिळते, त्याला आपल्याच मुलखात आपल्याच माणसांकडून अशी वागणूक मिळावी हे सहन न होऊन ते निघणार, तोच सरदारांना आपली चूक उमगली आणि त्यांनी फंदींचा सत्कार करून, संगमनेरपर्यंत सोबत आपली माणसेही दिली.

हे कवन तत्कालीन राज्यकर्ते, धनिक, कलावंतांकडे कसे पाहात, याचे प्रातिनिधिक उदाहरण आहे. विस्तारभयाअभावी सर्व कवन दिले नाही. तथापि कलावंतावर ही वेळ तर सामान्य माणसाची काय स्थिती असेल, हे कळून येते.

होनाजीने फंदींचे वर्णन करताना *'सरस्वती ज्याच्या जिव्हाग्री'* असे म्हटले आहे. आपल्या काव्यगुणामुळे फंदींना महाराष्ट्र तसेच मध्यप्रदेश, गुजरात राज्यातही उदंड लोकप्रियता मिळाली. पूर्वायुष्यात शाहीर म्हणून तर उत्तरायुष्यात कीर्तनकार म्हणूनही फंदींनी आपला ठसा राज्यकर्ते आणि जनमानसावर उमटवला. अहिल्याबाई होळकरांच्या दरबारात, खर्ड्याच्या लढाईनंतर, सवाई माधवरावांच्या दरबारात, दुसरे बाजीराव तसेच पेशवाईनंतर बडोदा येथे सयाजीराव गायकवाड यांच्या दरबारात फंदींना मोठा मान होता. दुसऱ्या बाजीरावाने आपल्याजवळील पत्रव्यवहार फंदींच्या स्वाधीन करून, सवाई माधवरावांवर कवन करण्यास सांगितले होते. यातच सर्व काही आले. तरीही वेळ प्रसंगी बाजीरावासही *वडिलांचे हातचे चाकर, त्यास मिळेना भाकर!* (योग्य मान) या शब्दात त्यांनी फटकारले आहे.

मलक फकीर त्यांच्या फडातील साथीदार होता. तो फंदींच्या रचना सुरेल आवाजात गाई. तो सूफी होता, फंदींना गुरुस्थानी होता, तथापि त्याच्या सूफी तत्त्वज्ञानाचा फारसा प्रभाव फंदींच्या रचनेवर दिसत नाही. या मलकच्या नादी लागले म्हणून, 'फंदी' हे नाव पडले हा वाङ्मय इतिहासकारांनी करून दिलेला एक समज! हा बरोबर नसून हे नामकरण तत्कालीन शृंगेरीपीठाचे शंकराचार्य संगमनेरी आले असता, घडून आले आहे.

अनंत फंदी लौकिक अर्थाने शाळेची पायरी चढले नाहीत, तथापि कुशाग्रबुद्धी, अफाट निरीक्षण, अभ्यासूवृत्ती, यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होत गेले. विविध वृत्तांचा अभ्यास, संगीतकलेची उत्तम जाण, माणसांची पारख त्यांना होती. दागिन्यांचीही पारख त्यांना उत्तम होती. पिढीजात सराफी व्यवसायामुळे त्यांना हे शक्य झाले, हे त्यांच्या 'चंद्रावळ' लावणीतील तेहतीस वाळ्यांच्या वर्णनावरून लक्षात येते.

अनंत फंदी नाव उच्चारले की, त्यांच्या अजरामर उपदेशपर फटक्यातील शब्द ओठावर घोळू लागतात. सर्वसामान्य माणसाचा दैनंदिन वर्तनक्रम कसा असावा, याचे सुंदर दिग्दर्शन या रचनेत आहे. *संसारामधि ऐस आपुल्या, उगाच भटकत फिरू नको...* किंवा *कष्टाची बरी भाजीभाकरी, तुपसाखरेची चोरी नको...* अथवा *पदरमोड कर काही, पण जामिन कोणा राहू नको...*

थोडक्यात *बिकट वाट वहिवाट नसावी, धोपट मार्गा सोडू नको...* या फंदींच्या शब्दांना सुभाषिताचे मूल्य लाभले आहे, हे कोणीही जाणकार कबूल करील.

फंदींना पंचाहत्तर वर्षांचे दीर्घायुष्य लाभले. १४ नोव्हेंबर १८१९ मध्ये संगमनेर (नगर)येथे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन! १४ नोव्हेंबर २०१९ रोजी फंदींच्या द्विशताब्दी स्मृतिवर्षाची सांगता होत आहे. शाहीर म्हणून आणि कीर्तनकार म्हणून अनंत फंदींची कामगिरी संस्मरणीय आणि कालातीत आहे यात शंका नाही.

**– शिरीष गंधे**

भ्रमणध्वनी : ९७६६२०२१४१

shirish.gandhe@gmail. com

## अरुण मळेकर

# खय्याम
# प्रतिभासंपन्न स्वयंभू संगीतकार

**शास्त्रीय संगीतावर आधारित खय्याम यांनी स्वरबद्ध केलेल्या रचना म्हणजे कानसेनांना आशेचा किरण आहे. या वर्षी १९ ऑगस्ट २०१९ मध्ये खय्याम यांचे निधन झाले. त्यांच्या आठवणी जागवणारा हा लेख...**



"Today's music is an organized noice".. या वाक्याची वारंवार प्रचिती देणाऱ्या आजच्या कर्णकटू कोलाहलाच्या जमान्यात खय्याम नामक गुणसागर - शांत प्रवृत्तीच्या माणसाने नुकतीच आयुष्याची भैरवी गात-गात जगाचा निरोप घेतला. अनिश्चिततेचा शाप असलेल्या चित्रपटाच्या झगमगत्या दुनियेतील हा नंदादीप स्वयं प्रकाशाने अखेरपर्यंत तेवत होता कारण स्वयंभू खय्याम साहेब म्हणजे चित्रपटसंगीतविश्वातील असामान्य प्रतिभेचे एक आदर्श गृहस्थ होते.

आपल्या उमेदवारीच्या काळापासून चित्रपटासाठी संगीत साज चढवताना सर्वच चित्रपट आपल्या प्रवृत्ती तथा अभिरुचीनुसार वाट्याला येतील याची शाश्वती नसते. त्यात आपली असामान्य गुणवत्ता दाखवायला वावही नसतो. हे सर्वच संगीतकारांच्या भाळी अनेकदा आलाय. अशा पार्श्वभूमीवर ज्या प्रतिभासंपन्न बुजुर्ग संगीतकारांनी आपल्या अलौकिक संगीताशी तडजोड न करता आपला अनोखा दर्जा सांभाळलाय त्यात खय्याम साहेबांचे स्थान फार वरच्या दर्जाचे आहे.

आपण पेश केलेल्या शायरी-गजलांचा दर्जा त्यांनी कसोशीने सांभाळलाय ही त्यांची खासियत वादातीत आहे.

प्रत्येक क्षेत्रातला कलावंत, खेळाडू, मुरब्बी असा राजकारणी यांच्या झंझावती, गतिमान कारकिर्दीत जसा झगमगता काळ असतो तसे अपयशासह पिछेहाटीचे दु:खही त्यांच्या वाट्याला येते. आपल्या अभिरुचीनुसार संगीत देण्याचा वसा त्यांनी कायम जपला. किंबहुना त्यांच्या अशा व्रतस्थपणामुळेच बॅड पॅचचा काळ खय्याम यांच्या नशिबी आला नाही. एखाद्या चित्रपटासाठी स्वरबद्ध केलेल्या गीतरचनांचा चौफेर बोलबाला म्हणून प्रसिद्धीचा झोत त्यांच्यावर असतानाही त्यानंतर चालून आलेले चित्रपट अव्हेरले असे कधी घडले नाही आणि एखाद्या चित्रपटातील गाणी कानसेनांच्या पसंतीला जरी उतरली नाहीत म्हणून त्यांच्याकडे निर्मात्यांनी पाठ फिरवली असेही कधी झाले नाही.

आपल्या संथ, निर्मळ संगीत प्रवासात खय्याम साहेबांनी काही काळ विराम घेतला तो स्वखुशीने. आपल्या शरीराला मर्यादा आहेत याचे लख्ख भान आणि वैयक्तिक, कौटुंबिक जीवनातील अचानक उद्भवलेल्या आपत्ती ही त्यामागील सत्यस्थिती आहे. थोडक्यात त्यांच्या निर्मळ आयुष्यातील हा काळ तसा अभ्यासासह, आत्मचिंतनासाठी स्वल्पविराम होता. खय्याम हे प्रतिभावान-स्वयंभू संगीतकार होतेच पण त्यांना शायरीची उत्तम जाणही होतीच. पहाडी आणि बिहाग या रागाकडे त्यांचा विशेष ओढा होता.

खय्याम यांचा सर्वत्र नावलौकिक होण्यासाठी... 'फिर सुबह होगी', 'आखरी खत', 'फुटपाथ', 'शोला और शबनम', 'कभी-कभी' या चित्रपटात त्यांची नाममुद्रा उमटली. मात्र १९८०च्या दशकात 'उमराव जान' चित्रपटातील त्यांनी स्वरबद्ध केलेल्या गीतरचना म्हणजे त्यांच्या वैभवशाली संगीत कारकिर्दीचे शिखर होते. खय्याम यांचे भारतीय बाजाचे, खानदानी संगीत आणि आशा भोसले यांचा स्वर्गीय आवाज यामुळे उमराव जानच्या गीतरचनांनी कळसाध्याय गाठला.

उपरोक्त संगीत प्रवासाच्या पाठोपाठ 'थोडीसी बेवफाई', 'बाजार', 'दर्द', 'रझिया सुल्तान' यातील गीतरचनांनी खय्याम यांच्या संगीत यात्रेतील सातत्याची प्रचिती येते.

खय्याम यांच्या संगीतात उडत्या-गतिमान-ठेक्याच्या चालींना तसे स्थान नाही. शांत वातावरणातील नदीच्या प्रवाहासारखं त्यांचं संगीत ऐकण्यात नकळत चित्ताची एकाग्रता होते. आपल्या एकाकीपणातही सुखद अनुभवाची प्रत्यय येतो. 'शामे गम की कसम', 'इन आँखो की मस्तीमे', 'ए दिल-ए नादाँ', 'दिखाई दिए यूँ' या रचना ऐकल्यावर त्यांची अनोखी अनुभूती येणारच. अष्टावधानीपणे काम करता-करता या गीतरचना ऐकणं म्हणजे या असामान्य स्वररचनेचा उपमर्द केल्यासारखे होईल. त्या शांत-निवांतच ऐकल्या पाहिजेत.

प्रेमभंगाने पराभूत झालेल्या प्रेमिकांची आर्त हाक खय्याम यांच्या अनेक गीतातून कुणाच्याही अंत:करणाची तार छेडते. 'कभी कभी मेरे दिलमें खयाल आता है' या गाण्यातून अमिताभ बच्चन यांची एक नवीन ओळख त्यांच्या अभिनयासह प्रकट झाली. आता चार दशकानंतरही ही गीतरचना कानसेनांच्या स्मरणात आहे.



**स्व. खय्याम यांनी स्वरबद्ध केलेल्या लोकप्रिय गीतरचना...**

| | |
|---|---|
| १. शाम ए गम की कसम | फुटपाथ |
| २. मितवा लागी रे कैसी लगन | देवदास |
| ३. कभी कभी मेरे दिलमें | कभी-कभी |
| ४. इन आँखों की मस्तीमें | उमराव जान |
| ५. ए दिल-ए-नादाँ | रझिया सुल्तान |
| ६. दिखाई दिये यूँ | बाझार |
| ७. तुम अपना रंज-ओ गम | शगुन |
| ८. फिर छिडी रात | बाजार |
| ९. करोगे याद तो हर बात | बाजार |
| १०. तेरे भरोसे पे नंदलाल | भक्तिगीत |
| ११. पतिया लिख लिख हारी | भक्तिगीत |
| १२. दिल चीज क्या है.. | उमरावजान |

मोहम्मद जहूर खय्याम हाश्मी असे खय्याम यांचे खरे नाव. वयाच्या सतराव्या वर्षी पौगांडावस्थेत असतानाच त्यांनी आपल्या संगीतप्रवासाला लुधियाना मुक्कामी सुरुवात केली. उमेदवारीच्या काळापासूनच संगीतकार होण्याची महत्त्वाकांक्षा तथा उमेद घेऊन ते फाळणीनंतर भारतात आले. प्रारंभी त्यांची सर्वत्र शर्माजी म्हणून ओळख होती. मात्र स्थैर्यप्राप्तीनंतर त्यांनी संगीतकार म्हणून 'खय्याम' हे नाव धारण केलं.

खय्याम आणि त्यांची गुणवंत पत्नी जगजीत कौर यांच्या वैभवशाली जीवनप्रवासाला कारुण्याची दु:खद किनार आहे. आपला एकुलता एक मुलगा प्रदीप याचं ऐन तारुण्यात निधन झालं तेव्हा आयुष्यावर बेमालूम प्रेम केलेल्या गजलांनीच या पती-पत्नींना सावरलंय. तोच त्यांचा आधार होता.

याच काळात त्यांच्यातील कवी जागृत होऊन भावपूर्ण

भजने आणि गजलांच्या रचनांची निर्मिती त्यांच्याकडून झाली. त्यातील काही रचना स्व. रफी आणि आशा यांच्या आवाजात जनमानसात आकाशवाणीमार्फत पोचल्या आहेत.

चित्रपटाचा आत्मा ठरलेल्या शास्त्रीय संगीत आणि मेलडीयुक्त संगीताची असोशी नव्या काळात विशेष उरली नाही. पण या काळातही शास्त्रीय संगीताच्या गीतरचनेवर आधारित खय्याम यांच्या स्वरबद्ध केलेल्या रचना म्हणजे कानसेनांकरता खचितच आशेचा किरण आहे.

खय्याम यांचे बरेच समकालीन संगीतकार त्यांच्या झगमगत्या कारकिर्दीत जिवंतपणीच दंतकथा बनून गेले. त्यातील काहीजण आपल्या विक्षिप्तपणासह वादग्रस्तपणाचे धनीही झाले परंतु आपल्या संगीतयात्रेतील व्रतस्थपणामुळे खय्यामसाहेबांच्या भाळी हा शिक्का कधीच बसला नाही. त्यांची खानदानी नजाकत कोणतीही तडजोड न करता त्यांनी आयुष्याच्या अखेरपर्यंत निष्ठेने सांभाळली. असल्या घराण्याला चौकटीची जी सीमारेषा असते त्याचा संस्कार सांभाळत तिचा मागोवा घेत राहाणं हेच या घराण्याचं व्रत असतं. या घराण्याचे खय्यामसाहेब हे तसे एकांडी शिलेदार होते.

बरेचदा जनमानसात बोलबाला झालेल्या संगीतकारांवर कालांतरांनी एकसुरीपणाची चर्चा होते. वास्तविक ही तर त्या संगीतकाराची शैलीच निर्माण झालेली असते, त्यांच्या वेगळेपणाचा तो एक चेहराच बनतो. आपल्या स्वत:ची संगीत प्रवासाची वेगळी वाट सांभाळत मार्गस्थ होताना खय्यामाची अनेक गाणी लोकप्रिय झाली. खटक्यांनी आणि फिरत असलेल्या मुखड्यांनी खय्याम यांनी स्वरसाज चढवलेल्या गीतरचना म्हणजे 'Make to order' अशा स्वरूपाच्या कधीच झाल्या नाहीत. बाजारू दुनियेपासून ते दूर होते. शांत, निवांतपणे आशयगर्भ शायरीत त्यांचा सारा जीव अखेरपर्यंत गुंतला होता.

प्रत्येक गीतरचनेला संगीतसाज चढवताना त्या गीताची पार्श्वभूमी, त्याचा परिस्थितीजन्य भाव आणि त्यातील आर्ततायुक्त भावना याचा बेमालूम मेळ त्यांनी मोठ्या कल्पतेने साधत आपली असामान्य प्रतिभा दाखवलीय. अनेक समकालीन दिग्गज संगीतकार 'विश्वरत्न' लता मंगेशकरांच्या स्वर्गीय आवाजांनी आपली कारकिर्द गाजवत असताना खय्यामसाहेबांची कारकिर्द कधीच लतामय नव्हती. हे त्यांचे वेगळेपण फार कमी कानसेनांच्या ध्यानी येते. अनेक गायक, गायिकांच्या वैशिष्ट्यपूर्ण आवाजाचा यथायोग्य वापर करण्यात त्यांचा अभ्यासपूर्ण व्यासंग दिसतो. 'ठहरिये होशमे आ लूँ' या गीतासाठी सुमन कल्याणपूरकरांचा आग्रह धरून आपली निवड सार्थ ठरवलीय, तर गुलामाचा दर्दभरा आक्रोश पेश करताना रांगडा आवाजाच हवा, यासाठी लोकप्रिय पार्श्वगायकाची जरुरी नाही, याचं भान म्हणजे त्यांचा सखोल अभ्यास दर्शवतोय.

कथानकाची पार्श्वभूमी ध्यानी घेऊन गीत कुणावर चित्रित होणार आहे याचाही त्यांचा अभ्यास होता. जोडीला सर्वव्यापी निसर्गाची सहजसुंदर संवेदना आपल्या प्रतिभेतून पेश करण्यात त्यांचा हातखंडा होता. संगीत साज चढवलेल्या गीतातील प्रकट होणाऱ्या अज्ञात, अलौकिकाची अनोखी ओढ होती, त्याला कुठेही कृत्रिमतेचा दर्प नव्हता.

भारतीय संगीताचा बाज कायम ठेवत नवनवीन संगीत पेश करण्यात खय्याम यांचा अभ्यास आणि समाजमनाचं भान कायम जाणवतं. लोकसंगीताची पकड घेणारी चाल आणि पाश्चात्त्य संगीतातील 'कॉर्ड्स' यांचा अनोखा मिलाफ काही संगीतरचनेत आहेच.

'उमराव जान' आणि 'रझिया सुल्तान' या चित्रपटांना ऐतिहासिक पार्श्वभूमी असल्याने त्यांनी त्याचा सारा इतिहास वाचून काढलाच नव्हे तर त्या-त्या स्थळांना प्रत्यक्ष भेटीही दिल्यात. एका निर्मात्याला खय्याम यांनी बांधलेली चाल ऐकवली. ''आपण मला नौशादसारखी चाल द्या'' हा आग्रह धरणाऱ्या निर्मात्याचा करार त्याच क्षणी रद्द करून ते घरी परतले. खरं तर हा खय्याम यांचा प्रारंभीचा खडतर प्रवासासह संघर्षाचा काळ होता.

**समाजभान असलेले कृतज्ञ खय्याम**

खय्याम आणि त्यांची पत्नी जगजीत कौर यांच्या सुखी संसाराला दु:खाची किनार आहे. एकुलता एक मुलगा प्रदीपचं हृदयविकारानं निधन झाल्यावर पती-पत्नीने वास्तव स्वीकारून परस्परांना आधार दिला. नियतीने आपल्याला खूप काही दिलंय याची जाणीव ठेवून दोघांनी आपली सर्व संपत्ती सामाजिक जाणिवेने दान करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी धर्मदाय न्यासाची स्थापना करून त्याद्वारे वादक, कलाकार यांना प्रोत्साहनात्मक अर्थसाहाय्य देण्याचा प्रयास केला. खय्याम, स्व. प्रदीप आणि जगजीत कौर यांच्या नावातील आद्याक्षराने 'के. पी.जे ट्रस्ट' म्हणून या विश्वस्त निधीतील काही हिस्सा दरवर्षी पंतप्रधान सहाय्यता निधीसाठी उपलब्ध केला जाणार आहे.

बदलत्या संकल्पनेच्या काळातही कोणतीही तडजोड न करता आपली नाममुद्रा कायम राखणाऱ्या खय्याम यांची दखल घेऊन भारत सरकारचा 'पद्मभूषण', 'संगीत नाटक अकादमी'सह 'जीवनगौरव' पुरस्काराचे ते मानकरी ठरलेत.

स्वातंत्र्योत्तर काळातील लोकसंगीत, शास्त्रीय संगीतासह कर्णमधुर, मेलडीयुक्त संगीत देणाऱ्यांच्या रांगेतला मनसबदार खय्याम आता काळाच्या पडद्याआड झाल्याने एका प्रतिभासंपन्न शायराबरोबर संगीताचं वैभवशाली युगही अस्ताला गेलंय.

**– अरुण मळेकर**
भ्रमणध्वनी : ९८६९११८५०१
arun.malekar10@gmail.com

गणेश कुलकर्णी

# श्रीलंका
# एक थरारक अनुभव

सगळ्या प्रवासात भाषा ही अडचण होतीच. आमचा ड्रायव्हर तमिळ ख्रिश्चन होता. तसा तो फार बोलायचाच नाही. गाडीतली गार हवा आणि मालिनीचा शुद्ध सारंग लागला की आम्हा दोघांची तंद्री लागायची.



गेल्या आठवड्यात अचानक श्रीलंका फिरण्याचा योग आला. सोमवारी सकाळी ठरले आणि दुपारी आम्ही पुण्याला रवानाही झालो. पुणे-चेन्नई, चेन्नई कोलंबो असे विमान मिळाले. जेटच्या डबघाईमुळे इथल्या विमान कंपन्यांची भाडी गगनाला भिडली होती. त्यामुळे असा खुष्कीचा मार्ग पत्करायला लागला. कुठे फिरायचे ते आम्ही ठरवले, कसे फिरायचे ते आमच्या सहल आयोजकाने ठरवले. आम्हाला कँडी नुवारा एलिया, उदेवाला अभयारण्य (हत्तींसाठी प्रसिद्ध), सिंहराजा पक्षी अभयारण्य / 'याला' अभयारण्य (बिबट्यांसाठी प्रसिद्ध) हे करून शेवटच्या दिवशी कोलंबो शहरातून फिरत-फिरत रात्रीचे चेन्नईसाठी विमान पकडायचे होते. पुण्याहून विमानाने जाण्यासाठी कारने निघालो तर पुणेकरांनी त्यांच्या नेहमीच्या पद्धतीत आमचा पचका करण्याचे ठरवले असावे. संपूर्ण मार्गावर अनेक पाट्या / रस्त्यांची नावे यांची रेलचेल आहे. पण विमानतळाचे मार्गदर्शन मात्र अभावानेच जाणवले. 'गुगलाय नम:' म्हणत कसेबसे

पोहचलो. तिथे लहानसाच विमानतळ, त्यामुळे चेकइन करायला फारसा वेळ किंवा त्रास झाला नाही.

सध्याच्या घडीला श्रीलंका सगळ्याच लोकांचे आवडीचे ठिकाण आहे. बऱ्यापैकी स्वस्ताई (खूप नाही, पण तरीही) समृद्ध निसर्ग, सहज दिसणारे जंगलातले प्राणी / पक्षी, अथांग निळाशार समुद्र (सर्फिंग करायला आवडेल असा) स्वच्छता आणि सगळ्यात मोठा गुण म्हणजे निवांतपणा. श्रीलंका या देशाचा वेगच ७० किमी आहे. रस्त्यावरचे वाहन जास्तीत जास्त ७० किमीनेच चालवावे लागते. शहरी भागात याच वेगावर ४० किमीची मर्यादा येते. इथले ड्रायव्हर अभावानेच गाडीचा हॉर्न वाजवतात. संपूर्ण ८ दिवसांत अनेक वेळा आम्ही ट्रॅफिकजाम मध्ये अडकलो पण कुणीही कुणाला ओव्हरटेक करतंय, हॉर्न वाजवतंय, साईड मागतंय असं चित्र कधीच दिसलं नाही. पुढचा उभा राहिला की त्याच्यामागे सभ्यपणे प्रत्येकजण उभा राहतो. रस्त्यावर चालणाऱ्या पादचाऱ्यांचा सन्मान जपला जातो. रस्ता ओलांडणाऱ्याला प्रथम प्राधान्य दिलं जातं. संपूर्ण बेटावर रस्त्यांचेच जाळे आहे पण फक्त दुपदरीच रस्ते आहेत. शेवटच्या दिवशी आम्ही चारपदरी रस्ते बघितले जे नव्यानेच बांधले गेलेत. इथली रेल्वे ब्रिटिशांनी सोडून गेलेल्या काळातच वावरताना दिसली. सिंगल लाईन आणि डिझेल इंजिनवर चालणारी गाडी एक दोनदा बघायला मिळाली. त्या गाडीचे प्रवाशांचे डबे आपण फोटोत गांधीबाबांना ज्या डब्यातून हाकलले तो डबा बघतो ना त्याच काळातले होते. त्यामुळे कारने फिरण्याशिवाय पर्यायच नाही. अनेक परदेशी पर्यटक तिथे सायकलवरून फिरत होते. ते ज्या गतीने जात होते, त्याच गतीने मागच्या सगळ्या गाड्या पळत होत्या.

एकदा म्हणे आपले प्रख्यात कविवर्य, नाटककार तात्यासाहेब शिरवाडकर इंग्लंडला गेले होते. कारने फिरताना संध्याकाळी एके ठिकाणी त्यांना थेम्स नदीत अस्ताला जाणारा सूर्य दिसला. त्यांनी ड्रायव्हरला सांगून कार थांबवली आणि सूर्यास्ताचा आनंद घेत उभे राहिले. दहा पंधरा मिनिटांनी ड्रायव्हरने त्यांची तंद्री भंग केली. बघतात तर, मागे असंख्य गाड्यांची रांग लागलेली. त्यांना फारच शरमिंदे झाल्यासारखं वाटलं. ते माफी मागायला लागले. तर ती रसिक मंडळी म्हणाली, ‘तुम्ही माफी कशाला मागता? तुम्ही इतका छान सूर्यास्ताचा आनंद घेताय त्यात व्यत्यय आणण्याचा



आम्हाला अधिकारच नाही.’ ही इंग्रजांची वृत्ती श्रीलंकेतल्या माणसांमध्ये वागण्याबोलण्यात सतत जाणवली. संपूर्ण श्रीलंकेत कुणीही, कुठे कचरा टाकत नाही. तुमचे म्हणणे पटले नाही तर अदबीनेच तुम्हाला त्याची प्रचिती आणून देतील. मुख्य म्हणजे एकही भिकारी दिसला नाही किंवा कुणीही मोठ्याने बोलतंय, भांडतंय असं चित्र तिथे आम्हाला आमच्या संपूर्ण प्रवासात कधीच दिसलं नाही.

आतापर्यंत चाललेल्या वंशिक दंगलीतून हा देश नुकताच सावरतोय. गेल्या दशकभरापूर्वी या देशाने प्रचंड हिंसाचार पाहिला आहे. तब्बल २५-२६ वर्षे तामिळ-सिंहलींच्या वंशिक दंगलीतून हजारो लोकांचे शिरकाण करण्यात आले होते. त्याकाळात संचारबंदी, आणीबाणी या अगदी रोजच्या गोष्टी होत्या. घरातले दोघं नवराबायको एकत्र बाहेर पडायचेच नाहीत. अचानक जर एखादा बॉम्बस्फोट झाला तर घरी उरलेला निदान परिवाराचा  सांभाळ करेल हाच विचार त्यामागे असायचा. प्रभाकरन, शांती सेना, राजीव गांधी हत्या, नंतर प्रभाकरनच्या कोवळ्या मुलाची निर्घृण कत्तल असे अनेक पदर, कंगोरे श्रीलंका म्हटले की डोळ्यासमोरून झर्रकन पसार होतात. त्याच श्रीलंकेत आज पर्यटन उद्योग तब्बल ५% च्या वर आर्थिक भार उचलतोय. २०१८ साली तब्बल २ लाख पर्यटकांनी श्रीलंकेला भेट दिली होती.

आपल्या डोक्यात लंका म्हणजे रावणाची असेच शिकवलेले असते, पण रावणाचा या लंकेशी काहीच संबंध नसावा. आपण रावणाची कल्पना दहा तोंडं असलेला, म्हणजे प्रचंड मोठी शरीरयष्टी, ताकद असलेला वगैरे केलेली असते. पण इथल्या लोकांना मात्र रावण आपल्यासारखाच वाटतो. ‘रावणा केव्ह’ आणि ‘रावणा फॉल्स’ बघितल्यावर हे प्रकर्षाने जाणवले. एवढीशी ती डोंगरातली गुहा, एवढासा तो धबधबा रावणाच्या नावाने ओळखलं जाणं हा रावणाचाच अपमान वाटला. मुख्य म्हणजे इथल्या बोटॅनिकल गार्डनला आम्हाला भेट द्यायला मिळाली. सगळी झाडं आपल्यासारखीच. एकही वेगळं झाड दिसलं नाही. भारतात, केरळात जी झाडं दिसतात तीच झाडं इथेही होती. (‘नुवारा एलिया’मध्ये मात्र एके ठिकाणी नीलमोहर आणि गुलमोहर शेजारी शेजारी फुललेले बघितले!) तर सीतेने आपला वनवास अशोक वाटिकेत व्यतीत केला

असे म्हणतात. ती ज्या झाडाखाली बसली होती किंवा ज्या झाडांची वनराई होती ते झाड सीता-अशोक (आसू-पालवा) किंवा सराका अशोका (सॉरोलेस) म्हणूनही ओळखले जाते. संस्कृतमध्ये तब्बल सोळा नावांनी हे झाड ओळखले जाते. या झाडाचा आपल्या अनेक महाकाव्यांतही उल्लेख आहे. आपण सर्रास ज्याला अशोक म्हणतो तो 'मास्ट ट्री', खरा अशोक नव्हे. खऱ्या अशोकाचा उल्लेख ज्ञानेश्वरांनी अभिमन्यूच्या चक्रव्यूहाच्या प्रसंगासमयी फारच मार्मिकपणे केला आहे. ज्ञानेश्वर म्हणतात, ''अशोकाच्या कोवळ्या पालवीसारखा अभिमन्यू चक्रव्यूहात घुसला.'' म. वा. धोंडांनी या प्रतिमेचा साक्षेपी धांडोळा घेतला तेव्हा त्यांना जाणवले की अशोकाच्या कोवळ्या पालवीवरून हात फिरवला की लहान बाळाच्या जावळावरून हात फिरवल्यासारखे वाटते. अभिमन्यूचा कोवळेपणा अधोरेखित करताना ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेचा अवाक् करणारा प्रत्यय येतो. अस्मादिकांनी देखील त्याचा प्रत्यय घेतला आहे. तेव्हापासून डोंबिवली परिसरात या झाडाची अनेक रोपं आम्ही लावली आहेत. ज्ञानेश्वरीतही त्याचा उल्लेख सापडतो. म्हणजे हे झाड खूपच पुरातन आहे. झाडाचे आयुष्य खूप आहे. झाडाचा फुलोरा देखील देखणा असतो पण थोडेसे वाकडे-तिकडे वाढते इतकेच! या झाडाखाली उभे राहिले की आपली मन:स्थिती सकारात्मक ऊर्जेने भरून जाते, असे म्हणतात. सीतेने आपल्या वनवासातले दिवस अशोकवनात घालवले असे उल्लेख आपण रामायणात देखील वाचतो. रावणाच्या महालात रहायला सीतेने नकार दिला. तिने अशोकवनात राहण्याचे ठरवले. इथेच रावणाची पत्नी मंदोदरी सीतेला भेटायला यायची. सीतेची व हनुमानाची पहिली भेट अशोक वाटिकेतच झाली किंवा सीतेला हनुमानाने ओळखीची खूण म्हणून अंगठी दिली, ती जागा इथे 'सीताएलिया' नावाने ओळखली जाते, पण संपूर्ण परिसरात एकही सीता अशोकाचे झाड दृष्टीस पडले नाही. कारण असे म्हणतात की, हनुमानाने निघताना सगळ्या अशोकवनाचीच नासधूस केली होती, असे रामायणातच उल्लेख आहेत. तीच वाटिका आज प्रख्यात 'हकगला बोटॅनिकल गार्डन' म्हणून प्रसिद्ध आहे. मुख्य म्हणजे इंग्रजांनी जिथे-जिथे राज्य केलं तिथे-तिथे त्यांच्या आवडीची झाडं लावली. उद्योग व्यापारासाठी सगळी जंगलं, डोंगर संपवून चहाचे मळे लावले आणि शोभेला इतर झाडे लावली. त्यांच्या बागेत त्यांना आपल्या घराचा अनुभव यावा, अशा झाडांची निवड मुद्दामहून करण्यात आली. घरापासून दूर असणाऱ्याला आपल्या घरी असल्यासारखे वाटावे हाच त्यामागचा उद्देश. कदाचित यामुळेही काळाच्या ओघात इथल्या सीता अशोकाची झाडं नाहीशी झाली असावीत. सीतेने आपला वनवासातला काळ इथे घालवला या श्रद्धेने लोक झुंडी-झुंडीने इथल्या उद्यानाला भेट देतात. आपल्या राणीच्या बागेत झाडं बघायला फारच थोडे लोक जातात हा माझा अनुभव! त्यानिमित्ताने मुलांना प्राणी, पक्षी दाखवणे हाच मुख्य हेतू. इथे नुसती झाडं बघायला इतकी माणसं जाताना बघून आश्चर्यच वाटत राहिले. मुख्य म्हणजे तिथे हे सुट्टीचे दिवस आणि मनोरंजनाची फारशी कुठली साधनं उपलब्ध नसल्यामुळेच अशा ठिकाणी सहपरिवार कारने, बसने ही मंडळी बहुधा येत असावीत.

इथल्या मंदिरात जाण्याचाही योग आला. आपल्या महाराष्ट्रापेक्षा दक्षिणेतल्या मंदिरातला गाभारा, तिथलं भारलेलं वातावरण बघून आपण नकळत नतमस्तकच होतो. इथे मात्र





सगळी मंदिरं फोटोंची. गणपती, विष्णू, लक्ष्मी किंवा तत्सम कुणी, पण सगळे फोटो! तेही भगभगीत लाईटच्या तोरणाने सजवलेले. त्याच लाईनीत येशूचाही फोटो आणि एका बाजूला मशिदही. बुद्धाला तर विष्णूचाच अवतार मानलेलं त्यामुळे त्याची मूर्ती असतेच. खऱ्या अर्थाने सर्वधर्मसमभाव! अशा मंदिराच्या परिसराला तिथे 'केलियाना' म्हटले जाते. इतकी गर्दी पण उगाच चबर चबर नाही. छानपैकी शिस्तीत सगळे वावरतात. परत देवाला वाहण्यासाठी केळीचा अख्खा घड, शहाळं, अख्खं अननस, अख्खं कलिंगड याने भरलेलं ताटच नेतात. इतका वजनदार नैवेद्य वाहताना दमछाक झाली तरी तक्रार मात्र कुणाचीच नसते.

इथे बुद्धिस्ट लोकांची संख्या तब्बल ७०% च्या आसपास आहे. इतर ३०% टक्क्यांमध्ये बाकीचे विभागलेले आहेत. कँडीमध्ये 'टूथ रिलिक' नावाचे बुद्धाचे पुरातन मंदिर बघण्याचा योग आला. कुठल्याही हिलस्टेशनवर असलेल्या बौद्ध मठाचा अनुभव येत होता. प्रचंड मोठ्या परिसरात हे मंदिर पसरलेलं आहे. गौतम बुद्धाचा दात त्याच्या सरणावर चंदनाच्या लाकडात अडकलेला दांतीर नावाच्या बौद्ध भिख्खूला सापडला. त्याने तो इथे आणला. त्याची पूजा, अर्चा, भोग असे सगळे प्रकार साग्रसंगीत सुरू होते. दाताचा रंग पांढरा म्हणून सगळी मंडळी पांढरे कपडे आणि पांढरी तगर, जाईची फुलं घेऊन इथे-तिथे फिरत होती. वरच्या बाजूला संग्रहालयात अनेक मौल्यवान, त्या काळातल्या वस्तू होत्या. एके ठिकाणी एक मोठा दात (सुळा) ठेवलेला होता. तो बुद्धाचा असल्याचा दावा गाईड करत होता. एके ठिकाणी प्रचंड मोठ्या पादुका होत्या. त्याही बुद्धाच्या आहेत अशी इथल्या लोकांची श्रद्धा आहे. बुद्ध त्यांच्या मते धिप्पाड, उंच, भरदार पुरुष होता. त्या अनुषंगानेच तिथल्या वस्तूंचं जतन केलेलं आहे. शंकराचार्यांनी बौद्ध धर्माचा भारतातला प्रसार रोखला, पण श्रीलंकेसारख्या देशात मात्र तो प्रचंड फोफावलेला जाणवत होता.

श्रीलंकेचं पहिलं नाव सिलोन. आपल्याला रेडिओ सिलोन माहीत असतोच, त्यातली अजरामर 'बिनाका गीतमाला' देखील! त्या काळातले आपले मराठमोळे मंत्री डॉ. बी. व्ही. केसकरांनी आपल्या रेडिओवरून हिंदी गाण्यांच्या प्रक्षेपणाला रीतसर बंदी घातली होती. त्यांच्या मते त्यामुळे आपल्या संस्कृतीचा ऱ्हास वगैरे होतो. तेव्हा रेडिओ सिलोनवरून सुरुवातीला अर्ध्या तासाची बिनाका गीतमाला कार्यक्रम सादर करायची कल्पना निघाली. त्या कार्यक्रमाचे रेकॉर्डिंग मुंबईतील रिगल थिएटरच्यावर असलेल्या स्टुडिओत चालायचे. नंतर ते सिलोनला पाठवून सगळीकडे प्रक्षेपित व्हायचे. कार्यक्रम लोकांना आवडायला लागल्यावर तो एक तासाचा करण्यात आला. कार्यक्रमाची लोकप्रियता वाढल्यावर तो प्रक्षेपित करणारे श्रीलंकन कर्मचारी आपल्या कार्यक्रमाचा हेवा देखील करायचे आणि मुख्य गंमत म्हणजे हा कार्यक्रम तिथले लोकं ऐकायचेच नाहीत. आपल्याकडे मात्र तो प्रचंड प्रसिद्ध होता. अमिन सयानींचे मोठे बंधू विनोदाने डॉ. केसकरांचा उल्लेख 'फादर ऑफ रेडिओ सिलोन' असा करीत. ती कोलंबोतली इमारत शेवटच्या बॉम्बस्फोटाच्या धामधुमीत बघायची मात्र राहून गेली. तर त्या सिलोनला १९४८ साली इंग्रजांकडून स्वातंत्र्य मिळालं आणि १९७२ साली सिलोनचं श्रीलंका झालं. २.१७ करोड लोकसंख्या असलेला श्रीलंका आजही हिंदी बोलताना अडखळतो. आपल्यासारखेच तामिळ लोक तिथेही आहेत पण त्यांना हिंदीचा गंधही नाही. श्रीलंकेत भाषा हा मोठा घोळ होता. आपल्याला दाक्षिणात्त्य म्हटलं म्हणजे मद्रासी, किंबहुना ते सगळे एकच वाटतात, पण यात तमिळ / केरळी / मल्याळी / आंध्र अशा अनेक भाषिक छटा आहेत. असे म्हणतात की, महात्मा गांधी जेव्हा सर्व प्रथम इग्लंडला शिकण्यासाठी बोटीने जायला निघाले तेव्हा त्यांनाही इंग्रजी येत नव्हते. मनात ते अगोदर वाक्य जुळवायचे मगच बोलायचे. आमचीही स्थिती साधारण थोडीफार अशीच होती. निदान आपण मराठीतलं इंग्रजी तरी बोलतो आणि इथे समोरच्याला धड इंग्रजीही येत नाही, सिंहली भाषेशिवाय दुसरी कुठली भाषा बोलायला कुणीच तयार नव्हते. बऱ्याचदा खाणाखुणा किंवा त्यांना समजावून आपली दमछाक झाली की देवावर हवाला सोडून गप्प बसणे यापेक्षा फार काही करता यायचं नाही. 'जिथे शब्द खुंटतात तिथे माणसाने गप्पच बसले पाहिजे!' असे थोर जर्मन तत्वज्ञ विट्गेन्स्टाईन देखील म्हणतो. याचा फटका प्रवासात बसलाच पण जेवण मागवताना जास्तच पंचाईत व्हायची. एकतर तिथली लोकं शाकाहार फारसा करतच नाहीत.

आम्ही शुद्ध शाकाहारी असल्याचा आम्हाला खूपच त्रास झाला. आम्हाला आपल्या मुंबईतल्या उडपी हॉटेलांनी माजवलं आहे. अशीच चव कुठेतरी तिथल्या तमिळींकडून आम्ही अपेक्षित केली. तेच चूक होतं हे पदोपदी जाणवत गेलं. सकाळी नाष्टा देखील ते मच्छी / मटण / भात असा करतात. एके ठिकाणी आम्हाला छानपैकी जेवणाच्या पारंपरिक ठिकाणावर आमच्या ड्रायव्हरने सोडलं. तिथे पारंपरिक वेशभूषा, लोकसंगीत गाणारे असा सगळा मस्त माहौल होता. गाणाऱ्याने किशोरचे 'गाता रहे....' त्याच्या सिंहली उच्चारात खास आमच्यासाठी गायले. गिटार, तुंबाच्या साथीनं आपली हिंदी गाणी ऐकताना मजा येत होती, पण जेवायला शाकाहाराचे पर्याय मात्र काहीच नव्हते. व्हेज विचारल्यावर एके ठिकाणी आपली बेसनात भिजवून तळलेली मोठी मिरची फक्त दाखवली. 'व्हेज एग फ्राईड राईस' असे लिहिलेली डिश होती किंवा 'व्हेज फिश' असाही प्रकार होता. भोवतालच्या परदेशी नागरिकांना याची काही आपत्तीच नव्हती. प्रश्न आमचाच होता. निव्वळ फळांवर दिवस ढकलले आम्ही. अहो दूध इथल्या लोकांसाठी फारच अप्राप्य. इथे वर्गीस कुरिअन, त्यांची दुधाची महाक्रांती याचे महत्त्व जाणवले. त्यामुळे दुग्धजन्य पदार्थांवर सरळ-

सरळ काट. एके ठिकाणी हॉटेलवाल्याला अपार मेहनतीने खीर बनवण्यास सांगितले. त्यालाही आम्हाला काय हवे ते कळले असे जाणवले. संध्याकाळी शेवयाची खीर टेबलावर आली ती शेवाळी रंगाची. म्हटलं हे काय तो म्हणाला, ''आम्ही दूध टाकलं,'' मी म्हटलं, ''पण असा रंग का?'' तो म्हणाला, ''नारळाचे दूध टाकले आहे.'' आम्ही कपाळावर हात मारून घेतला. आपण नारळाच्या दुधाची सोलकढी बनवतो, खीर नाही हे त्याला काय सांगणार. एके ठिकाणी दिवसभर फिरल्यानंतर पक्षी बघण्यासाठी दोन चार तास चालायचे होते. एकमेव हॉटेल असलेल्या ठिकाणीच आम्हाला सोडण्यात आले. तिथली बाई समजूतदार वाटली. कुणीतरी आम्हांला सांगितलं की, तुम्ही हिंदू ब्राह्मण सांगा म्हणजे चांगलं जेवण मिळेल. आम्ही ते सांगितल्यावर तिथली बाई म्हणाली, 'व्हेजिटेबल राईस, ओके?' मी खूश झालो. भाजी-भात तर भाजी-भात. तिने अर्धातास बरेच काहीतरी केले. आतून कुकरचे आवाज, भाज्या इकडून तिकडून नेण्याचे आवाज ऐकत आम्ही वाट बघत राहिलो. थोड्या वेळाने तिने डिश आणली. एका बाजूला उकडलेल्या मद्रासी गाजराचे तुकडे, फरसबीच्या शेंगा, चिरलेला टोमॅटो, काकडी आणि त्याच डिशमध्ये एका बाजूला भाताची मूद, सोबत मीठ आणि मिरी पावडर ठेवून खा म्हणाली! इतका पचका आमचा कधीच कुणी केला नव्हता. आम्ही प्रत्येक वेळी त्यांना सांगायचो, सगळं मिक्स करून कॉफी बनवून द्या. ते सगळं वेगळंच आणून ठेवायचे. खूप आदळआपट केल्यावर तोच ट्रे उचलून आत नेऊन सगळं मिक्स करून कॉफी द्यायचे तोपर्यंत सगळं थंडगार झालेलं असायचं. (सर्वात फ्रेश आणि चांगली कॉफी आम्हाला शेवटच्या दिवशी कोलंबो एअरपोर्टवर मशिनचीच मिळाली.) फळं मात्र खूप छान होती. कलिंगड, पपई, सफरचंद, केळी मस्तच होती. किंग कोकोनट म्हणून केशरी रंगाचे शहाळे आपल्याकडे फारसे मिळत नाही. तिथे सर्रास मिळते. पाणी मुबलक आणि चवीला छान गोडसर असायचे. शेवटच्या दिवशी विमानतळावर एके ठिकाणी इडली मिळेल म्हणून खूश झालो. इडली आली पण प्लेटमध्ये इडली-चटणी नव्हती तर ग्रीन सॅलड होतं. ब्रोकोलीची पानं, काकडी, टोमॅटो याबरोबर इडली खाण्याचा अनुभवही फारच वेगळा होता.

आम्ही आठवडाभर श्रीलंका अक्षरश: पालथा घातला. जंगल सफारीत आम्हाला सोनेरी कोल्हा, हत्ती, अनेक पक्षी, वेगवेगळ्या जातीचे साप, कांगारु लिझार्ड किंवा हंम्प नोज लिझार्ड बघायला मिळाले. बिबळ्यांसाठी राखीव जंगलात ४०-४९ बिबळे आहेत. पण त्यांचे काही दर्शन झाले नाही. एक तर बिबळ्या तसा खूप लाजाळू आणि सध्याच्या प्रचंड उन्हामुळे तो आतल्या जंगलात निघून गेला होता. त्याच जंगलात फिरताना ड्रायव्हरने आमची जिप्सी कसल्याशा आवाजाच्या अंदाजाने एके ठिकाणी उभी केली. झाडं तोडल्याचा कडकड असा आवाज अगदी जवळच येत होता. आम्हीही नि:स्तब्धपणे वाट बघत राहिलो. आमची एकमेव गाडी तिथे उभी होती. इतक्यात अगदी आमच्या समोरच एका धिप्पाड हत्तिणीने रस्ता ओलांडला



आणि तिच्या मागे दुडुदुडु करत तिचं पिल्लू तिला बिलगूनच चालताना फारच गोंडस दिसत होतं. आमची गाडी बघितल्यावर हत्तीणीने बिचकून पहिल्यांदा डावा पाय आक्रमणासाठीच उचलला होता. पण आमचा शांतपणा बघून तिने निर्धास्तपणे रस्ता ओलांडला. साधारणपणे पिल्लू असेल तर हत्तीण थोडीशी आक्रमकच असते. रविवारी सकाळी आम्ही शेवटच्या टप्प्यासाठी रवाना झालो. दिवसभर फिरत-फिरत आम्ही रात्री कोलंबो विमानतळावर विमान पकडणार होतो. गॅले फोर्ट, माडू गंगाची बोट सफारी, कोलंबो शहराचा फेरफटका, केलियाना मंदिराला भेट असे सगळे ठरले होते. सकाळी निघालो तेव्हा वातावरणात कसलाच तणाव वगैरे जाणवत नव्हता. माझ्या बरोबर हॉटेलातून काही स्थानिक परिवार निघत होते. त्यांची सुट्टी संपवून ते कोलंबोला परतत होते. त्यांच्याशी गप्पा मारत-मारत आम्ही आमच्या कारने निघालो. सगळ्या प्रवासात भाषा ही अडचण होतीच. आमचा ड्रायव्हर तमिळ ख्रिश्चन होता. तसा तो फार बोलायचाच नाही. गाडीतली गार हवा आणि मालिनीचा शुद्ध सारंग लागला की आम्हा दोघांची तंद्री लागायची. डुलत-डुलत प्रवास सुरू केला.

अकरा वाजता सहज मोबाईल बघितला. तर भारतातून आमच्या सहल आयोजकांचा एक मेसेज दिसला. ''घाबरू नका, लवकरात लवकर विमानतळ गाठा.'' आम्हाला काही कळेना. आम्ही का घाबरायचं नाही, किंबहुना आम्ही कुठे घाबरलो होता? ड्रायव्हर आपल्या फोनवर त्याच्या अगम्य भाषेत काहीतरी बोलत होता. पण आम्हाला काही पत्ता लागू देत नव्हता. नंतर अचानक दुसरा मेसेज आला की कोलंबोला ६ बॉम्बस्फोट झाले आहेत. तुम्ही कोलंबो शहर टाळा आणि शक्यतो लवकरात-लवकर विमानतळ गाठा. आम्हाला त्यावेळी

या सगळ्याचे गांभीर्य जाणवत नव्हते. आम्ही दरम्यान ड्रायव्हरशी संपर्क साधण्यात यशस्वी झालो. तो त्याच्या मोडक्या-तोडक्या इंग्रजीत म्हणाला की आमच्या स्थानिक सहल आयोजकाचा त्याला निरोप आहे की आम्हाला शक्यतो काही कळू न देता विमानतळावर पोचवणे. दरम्यान आम्ही गॅले फोर्टवर पोहचलो होतो. तेव्हाही तो कसलीही घाई करत नव्हता. आम्हाला अस्वस्थता येऊ नये याची काळजी घेत होता. त्याला त्या घटनेचे गांभीर्य कळले असावे. पण ते आमच्यापर्यंत पोचवावे असे त्याला वाटले नसावे. गॅलेफोर्ट हा ४२३ वर्ष जूना पोर्तुगीजांनी बांधलेला सर्वात जुना किल्ला आहे. तिथले दिपगृह, त्याची तटबंदी अजूनही शाबूत आहे. जागतिक वारशाच्या यादीत असलेल्या गॅले फोर्टवर रणरणत्या उन्हात आम्ही फिरत होतो. वर चढून गेल्यावर अथांग निळा समुद्र खूपच छान दिसत होता. इतक्या रणरणत्या उन्हात आईस्क्रिम विकणारी गाडी उभी होती. संपूर्ण परिसरात फक्त एकच प्रचंड विस्तारलेलं झाड होतं. सहज बघितलं तर ते बॅरिंगटोनिया स्पेसिओसा जातीचं, समुद्री तिवराचं झाड होतं. दाट पानांची सावली, त्याखालच्या गारव्यात थंड आईस्क्रिम आणि समोर अथांग निळाशार समुद्र भोवतालचं भान विसरायला लावत होते. अचानक ड्रायव्हरच्या फोनने भानावर आलो. आता मात्र तो घाई करायला लागला. दरम्यान वॉच टॉवर बघून घेतला. त्यातली ३.१५ ची वेळ आमच्या कॅमेऱ्यात कैद झाली होती. इंग्रजांनी लोकांना वेळेचं महत्त्व कळावं म्हणून प्रत्येक ठिकाणी वॉच टॉवर बांधले. त्यांचं स्थापत्य आणि घड्याळातले रोमन आकडे खरंच देखण्या स्वरुपात आजही अभंग आहेत.



आता मात्र ड्रायव्हरला परिस्थितीचं गांभीर्य जाणवलं असावं. त्याने लवकर चलण्याचा आग्रह धरला. आम्हाला भूक लागली होती. मधल्या माडूगंगा नदीवर बोट सफारी रद्द करावी असे त्याने सुचवले. आम्हीही एकंदर परिस्थितीचा अंदाज घेत होकार दिला. त्याच्यापुढे एक भारतीय पद्धतीचं जेवण मिळेल असं 'Dhaba' नावाचं ठिकाण होतं. त्याने गुगल मॅपवर त्या हॉटेलचं स्थळ खात्री करून मला सहज म्हणल्यासारखा म्हणाला की, 'एकदा तुम्ही हॉटेलला फोन करून विचारून घ्या.' मी फोन लावला तर हॉटेलच्या मॅनेजरचा धास्तावलेला आवाज ऐकून मात्र मी घाबरलो. त्याने नकारच दिला पण खूप विनंती केल्यावर दोनच माणसं असतील तर काहीतरी करुया म्हणाला. दरम्यान रस्त्यावरचा शुकशुकाट जाणवण्याइतपत वाढला होता. वाहनांची वर्दळ कमी कमी होत चालली. आजूबाजूला ॲम्ब्युलन्स आणि पोलिसांच्या गाड्यांचा वावर वाढलेला जाणवायला लागला. एका क्षणी आम्ही हॉटेलवर पोचलो तर हॉटेलच्या सुरक्षा रक्षकाने बाहेरचे गेट बंद करून टाकले होते. कुणालाच आत जाऊ देत नव्हता. अर्थात त्यावेळी त्या तिथे आम्ही फक्त दोघेच होतो. संध्याकाळचे चार वाजत आले होते. बाहेरची गर्मी, रणरणते ऊन आणि पोटातली भूक यामुळे सखीची ॲसिडीटी वाढलेली. काहीतरी पोटात जाणं अतिशय गरजेचं होतं. आत्ताच ही परिस्थिती तर नंतर काय मिळणार ? या सगळ्या विवंचनेत ते लोखंडी गजाचे दार मी ठोठावत राहिलो. सुरक्षा रक्षक त्याच्या भाषेत आम्हाला हाकलवत होता. मी त्याला विनंती केली की, 'मला मॅनेजरशी बोलू देत.' शेवटी आमचा आवाज ऐकून एक वेटर डोकावला. त्याने आम्हाला सरळ धुडकावूनच लावले. आम्ही इंग्रजीतले वाक्य पूर्ण बोलेस्तोवर तो निघूनही गेला, त्याचं फक्त Sorry एवढंच आम्हा दोघांना कळलं. मी मात्र हात जोडत राहिलो. इतक्यात मी ज्याच्याशी फोनवर बोललो तो बहुधा दरवाजावर आला. त्याचा समजूतदारपणा आम्हाला भावला. त्याने चट्कन आम्हाला आत घेतले. एका कोपऱ्यात लपवून बसवले. बाजूच्या दोन टेबलावर काही माणसे चिंताग्रस्त होऊन बसलेली होती. समोर टिव्हीवर बॉम्बस्फोटाच्या बातम्या, दृश्य दिसत होते. मॅनेजर नंतर सांगायला लागला की सहा वाजल्यानंतर संपूर्ण बेटावर आणीबाणी जाहीर झाली असली तरी आतापासूनच त्याची अंमलबजावणी सुरु झाली आहे.

आणीबाणी / संचारबंदी असले शब्द आमच्या मागच्या पिढीकडून आम्ही फक्त ऐकले होते. इतक्यात सखीची तब्येत आणखीनच खालावली. काहीतरी थंड मिळेल का याची चौकशी केली. तर किचन बंद आहे, उपलब्ध असेल ते जेवण पटकन जेवा, एवढेच उत्तर मिळाले. थोड्या वेळाने आम्ही आतले झालो होतो. बाजूच्या टेबलावर मुंबईहून आलेला गुजराथी ग्रुप हिंदीत संवाद साधायला लागला. त्यांचे परतीचे विमान बुधवारचे होते. त्याने आम्हाला धीर दिला. ट्विटरवरचा आपल्या परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांचा मेसेज दाखवला

व भारतीय दूतावासाचा नंबर पण दिला, म्हणाला, ''काही अडचण आली तर या नंबरवर लगेच संपर्क करा. तुम्हाला नक्की मदत मिळेल.'' एवढ्यात त्या वेटरला माझ्या बायकोची दया आली. त्याने किचनवाल्याची खूप मिनतवारी करून तिथल्या स्थानिक आंब्याचा ज्यूस करून आणला. तो पिऊन, थोडेसे खाऊन आम्ही ताजेतवाने झालो. मॅनेजर, हॉटेल कर्मचारी या वातावरणाशी बऱ्यापैकी परिचित होते. मॅनेजर काहीतरी सांगत होता, ''लवकर जा, अगोदरपासूनच तुम्हाला चालावे लागेल, खूप रांग असेल.'' ते आम्हाला त्यावेळी फारसे कळले नाही. एव्हाना ड्रायव्हरचा फोनवर फोन, ''लवकर निघा!''

आम्ही पुन्हा प्रवास सुरु केला. आता मात्र रस्ते निर्मनुष्य झाले होते, दुकाने बंद. संपूर्ण देशातच आणीबाणी आणि संचारबंदी लागू केली होती. अजून दोन बॉम्बस्फोट झाले होते. त्यात एका अतिरेक्याच्या घरात पोलिस घुसले होते. तिथेच एकाने आत्मघाती स्फोट घडवला. त्यात दोन पोलिस अधिकारीही ठार झाले होते. मग सहज बातम्या बघितल्या तर फारच दारुण परिस्थिती होती. एका चर्चमधल्या मदरमेरीचा पुतळाच अर्ध्यात तुटून खाली पडला होता. शेवटी प्रत्येकाच्या श्रद्धेचा एक भाग असतो. त्याला धक्का लागणं कुणालाच सहन होत नाही. आम्हाला स्थानिक आयोजकांचा ऑडिओ मेसेज आला. त्यावर 'आम्ही गर्दीची ठिकाणं / मंदिरं / चर्च टाळावीत. शहरात न येता परस्पर बाहेरूनच विमानतळ गाठावा', अशी सूचना होती. 'घाबरायचे कारण नाही तुम्ही सुखरुप आहात.' या वाक्यावर भर होता. आम्ही स्फोटाच्या जागेपासून दूर होतो. (साधारण ४०-५० किमी)

आता आम्हाला परिस्थितीचे गांभीर्य जाणवायला लागले. आपण परदेशात असणे आणि तिथे अशी परिस्थिती उद्‌भवणे कुणालाही अपेक्षित नव्हते. आम्ही परदेशी होतो. मी आणि सखी, दोघेही एकमेकांना धीर देत शांत बसून होतो. कार आपल्या वेगाने पळत होती. खूप मोठा वळसा घालून नव्याने बांधलेल्या हायवेवरून ड्रायव्हर आमची कार पळवत होता. अचानक एक टोल आला. पुढच्या दोन-चार गाड्या पोलिस थांबवून तपासत होते. ड्रायव्हरपण सावध झाला. त्याने आपले आयकार्ड, आमचे विमानाचे तिकिट आपल्या फोनवर उतरवून घेतले. आमची गाडी त्यांच्यापर्यंत गेली. पोलिसांची आमची नजरानजर झाली. त्याने सहजपणे आम्हाला पुढे सरकायला सांगितले. कसलीही तपासणी न करता जाऊ दिले. आम्ही पुढच्या मार्गाला लागलो. गर्मीचा तडाखा गाडीतल्या कारने सुसह्य होत होता. वातावरणात अचानक मळभ दाटून आले. सगळा भोवतालच उदास होत गेला. मग रिमझिम पावसाला सुरुवात झाली. संध्याकाळचे सात वाजून गेले होते. अंधार घनदाट व्हायला लागला. विमानतळ दृष्टिक्षेपात नव्हता. समोरच्या गाड्यांचा वेग मंदावलेला होता. त्याच वेगाने आम्हीही चाललो होतो. सगळेजण विमानतळाच्या दिशेनेच धावत होते. अचानक एका मोठ्या रांगेचा भाग होऊन आम्ही उभे राहिलो आहोत असे जाणवले. ड्रायव्हर म्हणाला, ''आपण विमानतळाच्या जवळ आहोत. साधारण दोन किमीवर. आमचे रात्री १०.४० चे विमान होते. आम्ही तसे वेळेत होतो. समोर दूर फक्त सैनिकांचे बूट / त्यांचा खाड् खाड् आवाज एवढंच काय ते जाणवत होते. पुढे काय चालले आहे याचा काहीच थांगपत्ता लागत नव्हता. सगळीकडेच भयाण शांतता होती. पावसाची रिमझिम सुरुच होती. मुंगीच्या पावलाने कार पुढे सरकत होती.

अचानक एके ठिकाणी बाजूच्या बसमधून तमाम भेदरलेल्या जपानी वरिष्ठ नागरिकांना आपल्या बॅगांसहित भर पावसात उतरवलेले आम्ही बघितले. त्यांचा लीडर त्यांना धीर देत एक रांग करायला सांगत होता. सगळ्यांच्या हातात ट्रॉली बॅगा, चेहऱ्यावर प्रचंड दडपण, भांबावलेपणा तरीही शांतपणे, आहे त्या परिस्थितीला तोंड देताना त्या म्हाताऱ्या बायकांना बघून आम्हालाही थोडासा धीर आला. इतक्यात आमच्या गाडीवर टकटक झाली. एक सैनिक बंदूक रोखून आमच्याशी बोलायला लागला. भारत म्हटल्यावर मला उगाचच त्याचा चेहरा जरा निवळल्यासारखा वाटला. रस्त्यावरच्या लाईटच्या उजेडात तो आमचे पासपोर्ट बघत होता. डिकी उघडून बॅग तपासून त्याने आम्हाला पुढे जायला सांगिले. फर्लांगभर पुढे गेल्यावर दुसऱ्या एका सैनिकाने त्याच्या भाषेत आम्हाला खाली उतरायला सांगितले. ड्रायव्हर समजावयला लागला की कार तिकडे जाऊ देत नाही. एखादा किमी तुम्हाला चालत जावे लागणार. त्याचा निरोप घेतला बॅग हातात घेतली. दोघेही आम्ही एकमेकांना आधार देत पुढे सरकायला लागलो. 'ते अंदाज कुठले न अवधान कुठले, कुठे यायचे-जायचे भान नाही.....' असे काहीतरी मनात आठवत पुढे सरकत राहिलो. विमानतळ किती दूर आहे? दिशा कुठली, काहीच कळत नव्हते. गेल्या आठ दिवसात असा एकट्याने कुठेच फिरलो नव्हतो. प्रत्येक ठिकाणी गाईड असायचा, पण सगळा जत्था एका शांत लयीत पुढे सरकत होता. असेच थोडे चालल्यावर अचानक विमानतळाचा परिसर दिसायला लागला.

सगळीकडे हाहाकार माजलेला होता. तमाम परदेशी नागरिक तिथे गटागटाने जमा झालेले होते. सकाळच्या स्फोटात तब्बल तीनशेच्या वर माणसे मेली होती, त्यात चाळीसेक विदेशी नागरिक आणि चारेक भारतीय देखील होते. सगळेच भांबावलेले. त्या गर्दीत आताच्या, नंतरच्या, पहाटेच्या विमानांची माणसे देखील होती. आम्हाला सूचना होत्या की विमानतळावर लवकरात-लवकर पोहचा त्याच सूचना त्यांनाही होत्या. त्यामुळे विमानतळाच्या प्रवेशद्वारावर घाऊक गर्दी जमा झालेली होती. तपासणी तर प्रत्येक टप्प्यावर अधिकच कडक होत चालली होती. इतक्या गर्दीत आम्ही काय करायचे, आत कसे शिरायचे काहीच कळत नव्हते. एकतर पुढे सगळी उंच धिप्पाड माणसे उभी होती. आम्ही दोघे तसे उंचीनेही लहानच.

त्यामुळे काय चालले याचा काही अदमासच येत नव्हता. त्याही गर्दीत विमानतळावरच्या कर्मचारी स्त्रिया हातात कर्णे घेऊन जी तातडीची विमानं उडणार होती त्यांच्या प्रवाशांना नावानिशी शोधत होत्या. बाहेर पाऊस पडतोय, उभं राहायला जागा नाही. अशा अवस्थेत आम्ही एका बाजूने संथपणे पुढे सरकत राहिलो. तिथले कर्मचारी एका टप्प्याच्या पुढे कुणालाच जाऊ देत नव्हते. शांतपणे सगळ्यांना उत्तरे देत होते. ही सगळी जणं सकाळपासून सलग काम करत होती. पण कुणाचाही चेहरा कंटाळवाणा, आळसटलेला नव्हता. आपल्या देशावर आलेल्या संकटाला सामोरे जाण्याचा धीरोदत्तपणा त्यांच्या वागण्या-बोलण्यातून जाणवत होता. एकच प्रश्न अनेकजण विचारतानाही त्यांचा आवाज चढत नव्हता किंवा ते कुणाला टाळतही नव्हते. इतक्यात मला काय वाटले, मी तिथल्या कर्मचाऱ्याला माझे तिकीट दाखवले. एव्हाना ८.३० वाजून गेले होते. त्याने चट्कन आमच्याकडे बघितले व आम्हाला पुढच्या रांगेत यायला सांगितले. साधारण दोन गेटमधून चार रांगा पुढे सरकत होत्या. आम्ही पहिल्याच रांगेत उभे राहिलो. (तिथेही माझा कॉमनसेन्स जागा होता.) पहिल्या रांगेत स्कॅनिंगचे मशिन होते. इतर रांगातले पोलिस बॅगा उघडून सामान उचकटून तपासत होते. आमचा नंबर आला, पायातले बूट सुद्धा स्कॅन करायला लावले.

आता आम्ही व्यवस्थेत आलो होतो. त्यांच्या गतीने पुढे सरकत होतो. इंडिगोची लाईन शोधत पुढे गेलो तर तो आमचीच वाट बघत असल्यासारखा निवांतच बसला होता. त्याच्याकडचे प्रवासी पुढे सरकले होते. आम्हाला बोर्डिंग पास मिळाला. या अगोदरही आत शिरताना प्रचंड मोठी रांग, स्कॅनिंग या सगळ्या सोपस्कारातून पार पडावेच लागले. या रांगेत आम्ही पहिल्यांदा आमचे शरीरधर्म उरकले. तब्बल सहाएक तासानंतर आम्ही बाथरुम बघितले. मग छानशी कॉफी घेतली. त्याने जरा हुरुप आला. कॉफी देणारी कर्मचारी सकाळपासून घरीच गेली नव्हती पण चेहऱ्यावर तेच हसू होते. प्रेग्नंट दिसत होती. तिच्या चेहऱ्यावरचे निरागस भाव बघून जीव कळवळला. आमच्या ड्रायव्हरच्या मित्राचे आईवडिल स्फोटात ठार झाले होते, पण शेवटपर्यंत त्याने आम्हाला साथ दिली. कुठेही वाऱ्यावर सोडले नाही. आजूबाजूला प्रचंड गर्दी होती. आपण गर्दीत तसे थोडेसे निवांत होतो. 'जे त्यांचे होईल ते आपलेही' ही भावना मोठी असते. एकटेपणाचा ताण वेगळाच असतो. बोर्डिंग पास मिळाल्यावर हायसे वाटले, बॅग कार्गोत गेल्यामुळे हातही मोकळे झाले होते. आम्हाला वाटले झाले सगळे, पण बोर्डिंग पास देणाऱ्यानेच आम्हाला इमिग्रेशनच्या रांगेत जायला सांगितले. त्या दुसऱ्या टोकाला पण प्रचंड रांग होती. आम्हाला त्या वातावरणातला तणाव जाणवत होता. एक भयानक शांतता असामंतात पसरलेली होती.

मला २००४ साली प्रदर्शित झालेला 'टर्मिनल' चित्रपटातला टॉम हॅंक्स आठवायला लागला. बाल्कन राष्ट्रातला नागरिक, त्याच्या देशात उठाव झाल्याने त्याचा तो देशच नकाशावरून नाहीसा होतो आणि त्यामुळे त्याचे नागरिकत्व अवैध ठरते. त्यानंतर तिथून बाहेर पडण्याच्या त्याच्या खटपटी, लटपटी. प्रत्येक वेळी नव्याने त्याचे इमिग्रेशनच्या रांगेत उभे राहणे आणि प्रत्येक वेळी रिग्रेटचा शिक्का, तो शिक्का मारतानाचा आवाज सगळे मनात जागे झाले. रांग हळूहळू पुढे सरकत होती. अचानक आमचा नंबर आला. काही जुजबी प्रश्न उत्तरे झाली. जेवढे वाटले तेवढे काही फार कठीण नव्हते. लगेच त्याने आमच्या पासपोर्टवर शिक्के उठवले. आम्ही 'जितं मया..' म्हणत तिथून लगेच बाजूला झालो. ९.३० होऊन गेले होते. ही सगळी कामं झाल्यावर पोटात भूकेची महाप्रचंड जाणीव झाली. मग हॉटेल, त्यातही शाकाहारी काही मिळेल का याची चौकशी करायला लागलो. एकच हॉटेल, तिथेही भली मोठी रांग. त्यांच्याकडे इडली होती आम्ही खूशच झालो. गेल्या आठ दिवसात इडलीचे दर्शन सुद्धा दुर्लभ झालेले होते. मस्तपैकी खाऊन थोडेसे रिलॅक्स झालो . एव्हाना दहा वाजून गेलेले. आम्ही आपले १०.४० चे विमान आहे आणि गेटच्या जवळ आहोत म्हणून अगदी निवांत विंडो शॉपिंग करत हिंडत होतो. इतक्यात एक महिला कर्मचारी कर्ण्यावर कुणाच्या तरी नावाची उद्घोषणा करत होती. नाव ओळखीचे वाटले म्हणून तिच्या जवळ गेलो तर ती आम्हा दोघानांच शोधत बाहेर आली होती. तिथल्या तपासणीत लगेच आम्हाला सगळ्यांच्या पुढे नेऊन तिनं आमच्या विमानात आम्हाला ताब्यात दिले. आम्ही आमच्या जागेवर स्थिरावलो. दहा वाजून पाच मिनिटे झाली आणि बोर्डिंग कंम्प्लिटचा निरोप एअर हॉस्टेसने वैमानिकाला दिला देखील आणि पुढच्या पाचच मिनिटात आमचे विमान हवेत उडण्यासाठी सज्जही झाले. आम्हाला हे अनपेक्षित होते. विमान तब्बल तीस मिनिटे अगोदर आकाशात झेपावले देखील. त्या शेवटच्या मिनिटाला विमान निव्वळ आमच्यासाठी खोळंबले होते याचं थोडं वैषम्यही वाटत राहिलं. बाहेरचा पाऊस, मंद होणारे धावपट्टीचे दिवे, विमानातला सुखावणारा गारवा, या सगळ्याचं एक वेगळंच चित्र मनावर उमटत राहिलं. आम्ही आपल्या देशात यायला निघालो होतो. आपल्या इथं उतरल्यावर आम्ही पुन्हा एकदा इमिग्रेशनच्या रांगेत उभे राहिलो. तिथले कर्मचारी जरासे सुस्तावलेलेच होते. इतक्यात आतून एक त्यांचा अधिकारी आला. त्यांना आमच्या समोरच त्याने निर्देश दिले की श्रीलंकेहून आलेल्या प्रवाशांना लवकर मोकळे करा. आम्हालाही बरे वाटले. नंतर सारेच सोपे होते.

आम्ही आपल्या देशात पोहोचलो होतो!

**– गणेश मनोहर कुलकर्णी**
भ्रमणध्वनी : ९८१९९५७८५२
magnakul@rediffmail.co

डॉ. अनंत पां. लाभसेटवार

# मला भेटलेले उबेरचे वाहनचालक

**'पुस्तकं वाचण्याएवढाच माणसं वाचल्यानं माणूस शहाणा होतो यात शंका नाही.' हे मला नंतर उबेरच्या ड्रायव्हरने शिकवलं.**




एकेकाळी अमेरिकेतले अधिकांश टॅक्सीवाले उर्दू बोलणारे. त्यात तुरळकच हिंदी किंवा इंग्रजी मातृभाषा असलेल्यांचा समावेश होई. मग मी विमानतळावर जाण्यास जर्सी सिटीमधील एक टॅक्सी कंपनी वापरली. तिचे सगळे गाडीवान इजिप्तमधले. इंग्रजीचं बेतातच आकलन असणारे. पण त्यांनी त्या आंग्ल भाषेतला एक शब्द चांगला पाठ करून ठेवलेला. तो म्हणजे टिप्स. ही बक्षिसी सेवा पुरवल्यावर ग्राहकाच्या मर्जीनुसार देण्याची पद्धत. हे टॅक्सीवाले गाडीत बसलं न बसलं की त्यांच्या दृष्टीनं कळीच्या आणि आपल्या दृष्टीनं डोकेदुखीच्या मुद्याला हात लावित. मग उबेरचं प्रकरण सुरू झालं आणि माझी या यातनातून सुटका झाली. आता माझ्या भ्रमणध्वनीवर टिचकी मारली की काही मिनिटातच टॅक्सी समोर हजर. तो ड्रायव्हर अदबीनं पेट्या आत भरतो आणि तेवढ्याच नम्रतेनं विमानतळावर गेलं की त्या काढून काठावर ठेवतो आणि निरोप घेतो. पैशाची देवाणघेवाण कुठेच होत नाही. भाडं आपल्या फोनवर आकारले जाऊन त्याची पावती पाठवण्यात येते.

पाहिजे असेल तर आपण गाडीवाल्याशी संवाद साधू शकतो. नाही तर अर्धाएक तास मौन कसं पाळणार? सावरकर, गांधी, मोरारजी देसाई आत्मशुद्धीसाठी आठवडा-आठवडा अबोला धरीत. पण आपण एवढं पुण्य कुठे करू शकतो? त्यामुळे ड्रायव्हरशी बोलणं आलंच. या देवाण घेवाणीत आपण बरंच काही शिकू शकतो कारण हे ड्रायव्हर्स जगाच्या सर्व कानाकोपऱ्यातून आलेले असतात. त्यांची संस्कृती, विचार व राहणी वेगळी. ते अल्पशिक्षित असूनही या देशात कसे आले? कुटुंब एकत्रीकरणाच्या कायद्याखाली त्यांना प्रवेश मिळतो. म्हणजे एक जण अमेरिकेत गुणवत्तेवर ग्रीन कार्डधारक झाला की तो हळूहळू आपले नातेवाईक या देशात आणू शकतो. गुजरात रिकामा होण्याचं हे एक कारण आहे.

परवा काझिकास्तानमधला एक मुस्लीम 'अल्ला हो अकबर'चे नारे देत हत्या करताना पकडला गेला. त्यानं या देशात एकूण २२ नातेवाईक आणले असं आढळून आलं. अमेरिकेत दरवर्षी जवळजवळ १० लाख ग्रीनकार्ड धारक येतात. त्यातले फक्त १५% गुणवत्तेच्या निकषांवर. उरलेले ८५% त्यांचे नातेवाईक म्हणून स्थलांतर करतात.

हे उबेरचं वाहनचालक पृथ्वीवरच्या अनेक देशातून आल्यामुळे त्यांच्या जीवनात डोकावल्यानं आपण बरंच शिकू शकतो. नाटककार विजय तेंडुलकर नवीन चेहरे वाचण्यास रेल्वेच्या फलाटावर जात असे म्हणे. तेच आपण अमेरिकेत या उबेरच्या गाडीवाल्याची कथा ऐकून करू शकतो व जगाविषयी सुसंस्कृत होण्यास मदत होते. अशा वेळी 'प्रत्येकाचं जीवन म्हणजे एक कादंबरीच' या उक्तीवर आपला विश्वास बसतो.

काही वर्षांपूर्वी उबेर क्षितिजावर येण्यापूर्वी शिकागोमध्ये मला दोन टॅक्सीवाले भेटले. ते मी कधीच विसरणार नाही. त्यातला एक होता ऐंशीतला सरदारजी. त्याच्या सगळ्या आठवणी फाळणीपूर्वीच्या. त्याचे मनात पाकिस्तान व इंडिया अजून एकच आहे अशी भावना. नंतर मला कळलं की तो ब्रिटिश सैन्यात सैनिक असे. त्याचं जन्मग्राम आता पाकिस्तानमध्ये गेल्यामुळे तो मायदेशी जात नव्हता. आता त्याचे मुलं, नातवंडं अमेरिकेत मोठी झाली होती. पण घरी बसून काय करायचं म्हणून टॅक्सीवाल्याचा धंदा आरंभला होता. कमाई करण्यापेक्षा उत्पादक वेळ खर्च करणे हा त्यामागचा उद्देश. असा उदात्त हेतू मला अमेरिकेतल्या इतर अल्पसंख्याकांमध्ये (काळे, हिसपीलिक वगैरे) कधी आढळला नाही. माझं गंतव्यस्थान आल्यावर त्याला टॅक्सीचं भाडं विचारलं. ते त्यानं स्वीकारायला टाळलं. देशबंधुत्वाच्या बांधिलकीपोटी त्याला ते उच्च वाटलं नाही पण मीच त्याला आग्रह करून पैसे घेण्यास भाग पाडलं. आधुनिकीकरणाच्या रस्त्यावर पहिला बळी पडतो तो माणुसकीचा, मानवतावादी मूल्यांचा पण ती मूल्य कोळशाच्या खाणीत हिरे जेवढे दुर्मीळ तेवढ्या कमी प्रमाणात अजूनही या जगात उपस्थित आहेत या जाणिवेनं माझ्या मनाला उभारी आली.

दुसरा एक ड्रायव्हर अफगाणिस्तानमधला. त्यावेळी त्या देशात युद्ध सुरू होतं म्हणून तिथल्या विस्थापितांना अमेरिका प्राधान्यानं पुर्नवर्सनासाठी बोलावून सहकुटुंब प्रवेश देई. त्याचं विमानाचं तिकिट, रहायला निवासस्थान, अन्न व इंग्रजी शिकणं यासाठी मदत करी. पण उन्नत समाजाला योगदान करण्यास लागणारं कुठलंच कौशल्य नसल्यामुळे पुरुषांमध्ये त्यांना टॅक्सी ड्रायव्हरचा पेशा पत्करावा लागे. आता ही योजना बंद करण्यात आली. मुस्लिमांमध्ये परस्त्रीकडे नुसतं बघणं पाप समजण्यात येतं. माझा त्या दिवशीचा टॅक्सी ड्रायव्हर त्याच पंथाचा. मग महिला ग्राहकाला तो कशी सेवा पुरवतो? तो म्हणाला, ''मी खाली मान करून टॅक्सीचं दार उघडतो. समोरच्या आरशात बघून मागच्या आसनावर बसलेल्या स्त्रीकडे देखील बघत नाही. या प्रमाणे परस्त्रीचा विटाळ असूनही तो आपला व्यवसाय करीत होता. अमेरिकन संस्कृतीवर त्याचा मुळीच विश्वास नव्हता. त्याला फक्त मुस्लीम धर्म व अल्लाच आवडत होते. पण मुलं शाळेत गेल्यावर त्यांना पाश्चात्त्य संस्कृतीला सामोरं जावं लागत नाही का? ते संस्कार कसे टाळता येतील? त्यात मुलींचा प्रश्न अजूनच बिकट म्हणून त्यानं आपल्या मुलीला मशिद पुरस्कृत मुस्लीम शाळेत घातलं होतं. तिथे मुस्लीम मुलेमुलीच असल्यामुळे मुलीचं पाश्चात्त्यीकरण होणार नव्हतं. अशा शाळा अमेरिकेत शेकडोने आहेत. या देशात जगातल्या सर्व मुस्लीम देशातून लोक आलेले असल्यामुळे विद्यार्थ्यांचा तोटा नाही.

शालेय शिक्षण संपल्यावर पुढे काय? की मुलीला लगेच बोहोल्यावर चढवून चूल आणि मूल या धोपट मार्गावर लावायचं? याचा देखील त्यानं विचार केला होता. त्याला आपल्या मुलीनं डॉक्टर व्हावं अशी इच्छा होती. त्यासाठी तो तिला पाकिस्तानमध्ये पाठवणार होता. तिथे ती मुस्लीम वातावरणात वैद्यकीय शिक्षण घेणार होती. अमेरिकेत मग कशाला रहायचं? अर्थातच डॉलरची चटक कधी सुटत नाही. म्हणजे ख्रिस्त धर्मीय वातावरणात कमाई करून मुस्लीम मूल्य अंमलात आणण्याची त्याची जीवनशैली धर्मनिष्ठा प्रकट करीत होती. या दोन धर्मामध्ये तो त्रिशंकू म्हणून लटकत होता.

भारतीय माणूस आपला धर्म न सोडता नवीन मूल्य स्वीकारण्यास नेहमी तयार असतो. त्यामुळे त्याला त्या-त्या देशाच्या मुख्य सामाजिक प्रवाहात सामील होण्यास कठीण जात नाही. आज भारताचे ४.१ दशलक्ष भूमिपुत्र अमेरिकेत सापडतात पण त्यांच्या मनात माझ्या त्या अफगाणी ड्रायव्हरसारखं धार्मिक द्वंद्व क्वचितच आढळत असेल. तिथल्या संस्कृतीत विलीन होण्यास त्यांना कुठलीच धार्मिक अडचण येत नाही. मुस्लीम लोकं अजूनही इंग्लंडमध्ये किंवा फ्रान्समध्ये शरियात कायदा पाळतात. म्हणजे मुलींना शिक्षणाऐवजी घरी डांबून ठेवणं, तिचं लग्न एखाद्या वडील माणसाशी लावणं, तिला कुठल्याच खेळांमध्ये भाग घेऊ न देणं व बाहेर पडताना बुरखा घालण्यावर सक्ती करणं. अमेरिकेतल्या भारतीयांमध्ये या उलट नियोजित लग्न करण्याची प्रथा केव्हाच मोडीत आली. भारतातही तसंच होत आहे. बदलत्या परिस्थितीला तोंड देण्यास जी लवचिकता

हिंदू धर्मात सापडते ती मुस्लीम धर्मात सापडत नाही हे त्या अफगाण गाडीवाल्यानं त्या दिवशी माझ्या निदर्शनास आणून दिलं. नाही तर हे शिकण्यास मला ग्रंथालयात जाऊन जाडजूड पुस्तकांचं पारायण करावं लागलं असतं. पुस्तकं वाचण्याएवढाच माणसं वाचल्यानं माणूस शहाणा होतो यात शंका नाही. हे मला नंतर उबेरच्या ड्रायव्हरने शिकवलं.

न्यू जर्सीत एवढे भारतीय लोक आहेत की ते राज्य दुबईप्रमाणे भारताचा विस्तार समजण्यास मुळीच हरकत नाही. असं असताना हिंदी भाषिक गाडीवान आपल्या वाट्याला येणं बाबूनं खिरापत मागण्या एवढं सहाजिक आहे. त्या दिवशी विमानतळावर नेणारा देशी ड्रायव्हर बघून मला मुळीच नवल वाटलं नाही. त्याचं नावं चिमन. तो चिमनलालचा अपभ्रंश असावा. त्याला चांगलं मराठी येत असलं तरी तो महाराष्ट्रीयन नव्हता कारण त्याला जो व्यवहार आणि आर्थिक ज्ञान होतं तेवढं आपल्या बंधूत कधीच सापडत नाही. शेअर बाजाराच्या गोष्टी करणारा मराठी बांधव मला अजून सापडायचा आहे. तो राशीभविष्याच्या गोष्टी खपवेल पण सोनं-चांदीच्या बाजाराविषयी कधी ब्र काढणार नाही. पण चिमणभाईनं लगेच त्या गोष्टींना हात घातल्यामुळे तो मुळचा गुजराती आहे हे गणित कळायला वेळ लागला नाही. मुंबईत राहून त्यानं मराठी माऊलीचं शोषण केलं होतं. त्याचं अवांतर ज्ञान बघून मी थक्क झालो. ते UPSC च्या परीक्षेस लागणाऱ्या ज्ञानाप्रमाणे पुस्तकी नव्हतं. तो म्हणाला, ''भारतीय रेल्वेत अनिवासी भारतीयांसाठी खास कोटा आहे.'' आजपर्यंत मला वाटलं तो फक्त फुकट्या मंत्र्यांसाठी, प्रशासकीय सेवा अधिकाऱ्यांसाठी किंवा अबलांसाठीच असतो. पण आम च्यासारख्या परदेशात राहणाऱ्या सबलांवर आपल्या रेल्वेनं कृपा करावी हा औदार्याचा कळसच समजायला पाहिजे. रेल्वेमध्ये सर्वसामान्य सोडून सर्वांसाठी कोटा आहे हे ऐकून देशातील मुख्य परिवहन स्त्रोताविषयी माझ्या मनातला आदर द्विगुणीत झाला. म्हणाला, ''स्टेशनावर डॉलर फेकले की रेल्वे आपल्या पायाशी लोळते. यातलं खरं खोटं अल्ला जाणे. त्यानं मला अजूनही दुसरं ज्ञान पाजलं. वेस्टर्न युनियन ही जगात कुठेही पैसे पाठवणारी संस्था भारतात जाणाऱ्यांना महत्त्वाची असते असा त्यानं शोध लावला. ती १००० डॉलर देशात पाठवण्यास १० डॉलर शुल्क आकारते. त्यापेक्षा जास्त रक्कम पाठवल्यास बरीच शुल्कवाढ होते. म्हणून चिमन म्हणाला की ९९९ डॉलर पाठवलेले बरे. (हे व्यवहारचातुर्य मराठी माणसातही असतं म्हणा.) टपालखात्यानं दर वाढवले की आपण पत्रलिखाण कमी करतोच की!

**क्यूबातले गाडीवान**

त्या दिवशी फ्लोरिडाला गेल्यावर दुसराच गाडीवान मिळाला. त्याला मिसरूडही फुटलं नसावं. अशा किशोरवयीन टॅक्सीवाल्याच्या हाती आपण सुरक्षित असणार का असा प्रश्न पडला. पण उबेरनं त्याची पार्श्वभूमी तपासली असणार म्हणून चिंता करण्याचं कारण नव्हतं. हा पोरगेलासा गाडीवान दोन वर्षापूर्वी वडिलांबरोबर क्यूबावरून अमेरिकेला चलाखी वापरून आलेला. त्याची आई आणि बहीण अजून क्यूबातच अडकले होते. त्या साम्यवादी देशातून कॅस्ट्रो सत्तारूढ झाल्यावर लाखो लोक अमेरिकेला आले होते. त्या सर्वांना ग्रीन कार्ड व नंतर नागरिकत्व मिळालं. दक्षिण फ्लोरिडा अशा स्थलांतरितांनी तुडुंब भरलेला आहे पण आता त्यावर बंदी घालण्यात आली. तरी पण कुणी ९० मैल जलप्रवास करून अमेरिकेच्या दक्षिण किनाऱ्याला स्पर्श केला की तो आपोआप ग्रीन कार्डासाठी पात्र होतो. ते स्वर्गाचं तिकीट मिळण्यासाठी सिलिकॉन व्हॅलीमध्ये काम करणाऱ्या भारतीय संगणक तज्ज्ञांना ५० वर्ष वाट बघावी लागते. जगात न्याय आहे असं कसं म्हणता येईल? या सुलभतेमुळे क्यूबातले लोक अमेरिकेत येण्यास उत्सुक असतात पण अमेरिकेचं नौदल त्यात अडसर आणते. समुद्रावरच त्यांना पकडून मायदेशी रवानगी करते. त्यामुळे किनाऱ्यावर येणारे वीर कमीच. पण आजच्या टॅक्सीवाल्याने, अलेक्झांडरने एक क्लृप्ती केली. क्यूबावरून निकरागवा या मध्य अमेरिकेतील देशात विमानानं गेला आणि तिथून विमान कंपनीच्या नजरचुकीमुळे मायामीला आला. नाही तर व्हिसा तपासल्याशिवाय आंतरराष्ट्रीय प्रवास आरंभता येत नाही पण त्या दिवशी तिथल्या हवाई कन्येनं चूक करून त्यांना विमानात बसू दिलं आणि त्याचं नशीब उघडलं. कायद्यानुसार जो कुणी क्यूबन अमेरिकन भूमीला स्पर्श करतो त्याचा ग्रीन कार्डाचा अहेर देऊन स्वागत करण्यात येतं. त्याची मायदेशी उचलबांगडी होण्याचा प्रश्नच नव्हता. त्यामुळे अलेक्झांडर वाचला. तो इंग्रजी शिकू लागला. वडिलांना लगेच एका दुकानात नोकरी मिळाली आणि मुलानं उबेरचा धंदा सुरू केला. आता आई आणि बहीण यांना अमेरिकेत कसं आणायचा हाच त्यांना प्रश्न पडला होता.

त्यानंतर मला पुन्हा एकदा क्यूबातला ड्रायव्हर मिळाला. तो तर संगणक विद्येत पदवी मिळवलेला. पण क्यूबामध्ये त्यासाठी प्राध्यापक आहेत का? अर्थातच नाहीत. म्हणून त्या देशानं ते भारतातून आयात केले होते. ते ऐकून मला नवलं वाटलं. आपले संगणक अभियंते जगभर विखुरले आहेत. ते देशाचे खरे राजदूत कारण ते सर्वत्र सदिच्छा पसरवतात.

जुलै २०१७ मध्ये फोर्ट लॉडरडेल, फ्लोरिडाच्या विमानतळावर जाताना मिळालेला उबेर ड्रायव्हर कृष्णवर्णीय. त्याची जीवनयात्रा अगदीच वेगळी. तो कॅनडातून फ्लोरिडामध्ये आलेला आणि आता नर्सिंगचा तीन वर्षाचा कार्यक्रम पूर्ण करीत असलेला. शिक्षणामुळे तो सुसंस्कृत वाटत होता पण अमेरिकेत जसे आंबे तसे कॅनडात काळे पिकत नाही. तो मूळचा होता पश्चिम आफ्रिकेतल्या एका देशातला. आईनं त्याला घेऊन हेटी या अमेरिकेपासून ७०० मैल पूर्वेला असलेल्या बेटरूपी देशात पलायन केलं. ते आगीतून फुफाट्यात जाण्यासारखं झालं कारण ते काळं बेट करिबियन समुद्रात असलेल्या सर्व बटू देशात गरीब, मागासलेलं व एड्सग्रस्त. क्यूबाप्रमाणे तिथून अमेरिकेला स्पर्श केला की ग्रीन कार्ड मिळत नाही म्हणून आई व मुलगा

कॅनडात गेले. तिथून ते अमेरिकेत आले. कसे ते मात्र कळलं नाही पण इथे त्याचं भविष्य उज्ज्वल होतं कारण अमेरिकेत परिचारिकांची वानवा आहे. तो म्हणाला, ''त्याच्या वर्गात दोन भारतीय विद्यार्थी आहेत. या स्त्रीप्रधान व्यवसायात आजकाल पुरुषांनीही प्रवेश करण्यास सुरुवात केली. जनरल मोटर्सचा कारखाना बंद पडल्यावर त्याच्या अनेक निष्कासित कर्मचाऱ्यांनी नर्स होण्याचं ठरवलं. त्यानं मला एकदा सुई दिली. गाडीत स्क्रू ड्रायव्हर भोकसल्यासारखं वाटलं. आपल्या पुढ्यात वाहनाऐवजी माणसाचं शरीर आहे हे तो विसरला होता.

आजच्या कृष्णवर्णीय ड्रायव्हरचं राजकीय मत बघून मला नवल वाटलं. त्याला भारताविषयी बरंच माहीत होतं. त्यावेळी डोकलामचं प्रकरण गाजत होतं. विस्तारगंडानं उन्मत झालेला चीन आता पुन्हा भारताला कुरतडण्याच्या मार्गावर होता. तो म्हणाला, ''भारतानं या चकमकीत कदापि माघार घेऊ नये.'' तसं केलं तर त्याची जागतिक प्रतिमा काळवंडेल व त्याचा आदर कमी होईल. भूतान व नेपाळ तटस्थ धोरण आखतील. आपल्या जन्मदेशापासून एवढ्या दूर असलेल्या भारताविषयी त्या कृष्णवर्णीयाच्या मनात एवढी कणव असावी हे बघून मी चकित झालो. अर्थातच त्यानं मोदींचं नाव ऐकलं होतं आणि त्याचं आपल्या पंतप्रधानांविषयी सकारात्मक मत होतं. त्यानं काँग्रेस पार्टीला भ्रष्टाचाराच्या ढिगावर फेकून दिलं होतं.

त्याला जग माहीत असलं तरी GPS असूनही फोर्ट लॉटरडेलचं विमानतळ माहीत नव्हतं. किंवा ते माहीत नसल्याचं त्यानं सोंग केलं. दूरच्या रस्त्यानं नेऊन वेळ जास्त लावला. तो रस्ता आपल्याला ठाऊक असल्याची त्यानं ग्वाही दिली. पण त्याविषयी तो सर्वस्वी अनभिज्ञ आहे हे सिद्ध झालं. हा गोंधळ त्यानं जास्त पैसे उकळण्यासाठी हेतूपूर्वक केला असा मला संशय आला आणि शेवटी माझ्या फोनवर जेव्हा उबेरचं बिल तेव्हा माझी शंका खरी ठरली. कारले कितीही घोळलं तरी शेवटी कडूच. तसंच गाडीवाला कुठलाही असो. त्याची ग्राहक खिसे फाडण्याची वृत्ती लोप पावत नाही हेच खरं. या गाडीवाल्याचं वेगळं व्यक्तिमत्त्व, त्याचं भौगोलिक ज्ञान व विचारसरणी बघून मला तो सुसंस्कृत वाटला, पण वैद्यकीय क्षेत्रात अमेरिकेत तरी अनैतिकतेला जागा नाही. हे त्यानं लक्षात ठेवलं तर तो एक चांगली नर्स होईल.

**युरोपियन ड्रायव्हर**

आज आहे डिसेंबर १, २०१७. बाहेर थंडी मी म्हणते. मला भल्या पहाटे म्हणजे ४ वाजता शिकागोच्या ओहेर विमानतळावर जायचं होतं. उबेरनं मला प्रथमच गोरा गाडीवाला पाठवला होता. चांगला उमदा आणि स्वागतशील व्यक्तिमत्त्व असणारा. म्हणजे आतापर्यंत मला मिळालेल्या उबेरच्या टॅक्सीवाल्याच्या रांगेत तो उठून दिसत होता. एवढ्या सकाळी तो एवढा चुणचुणीत व उर्जाशील संवाद कसा साधतो हेच मला कळेना कारण त्यावेळी सगळी अमेरिका निद्रिस्त होती. बोलताना कळलं की तो अमेरिकन नव्हता. तो मूळचा जर्मन. मुंबईत मराठी आणि अमेरिकेत गोरा टॅक्सीवाला मिळणं अशक्यच. या क्षेत्रात मध्यपूर्व मुस्लीम देश, पाकिस्तान, भारत व लॅटिन अमेरिका या देशांचं प्रभुत्व आहे. गोऱ्यांनी आणि काळ्यांनी देखील केव्हाच माघार घेतली. पण आजचा गोरा युरोपमधला असल्यामुळे त्याच्या मनात न्यूनगंड नव्हता. त्याला आपण 'हान्स' म्हणू या.

तो गाडीवान असला तरी उत्तुंग स्वप्न बघत होता. त्याला तरुण असतानाच डॉलरमध्ये दशलक्षावधी व्हायचं होतं. त्यामुळे स्वस्थ न बसता तो अनेक धंद्यात गुंतला होता. आमचं रहिवासी संकुल असलेला ७० मजली लेक पॉईंट टॉवर, स्थापत्त्यरचनेचा नमुना म्हणून शिकागोमध्ये प्रसिद्ध आहे. तिथे अनेक प्रसिद्ध कलाकार किंवा दिग्गज व्यक्ती रहात असत किंवा रहातात. त्यातली सर्वाधिक प्रसिद्ध म्हणजे ओपरा. ती जवळजवळ ट्रंपएवढीच श्रीमंत. त्यांच्या 'ॲप्रेंटिस' या दूरदर्शनावरील १४ वर्ष चाललेल्या कार्यक्रमापेक्षा तिचा शो जास्त काळ चालला. बायका सहसा नवऱ्याचं ऐकत नाहीत. किंबहुना तसं करणं अमेरिकेत न्यूनतेचं व परावलंबित्वाचं चिन्ह समजतात. पण तमाम स्त्री जात ओपराचं ऐकते. त्यांची मतं तिच्या मुठीत आहेत म्हणून २०२० मध्ये ट्रंपविरुद्ध तिनं अध्यक्षीय निवडणुकीत उभं रहावं असा उदारमतवाद्यांनी आतापासूनच हट्ट धरला. अशी व्यक्ती एकेकाळी आमच्या टॉवरमध्ये रहात होती, हे आमचं नशीबच समजायला पाहिजे. ओबामाचा मुख्य सल्लागार डेव्हिड ॲक्सलरॉडला मी व्यायाम शाळेत भेटलो होतो, म्हणजे त्याच्याशी चार शब्द बोललो. प्रत्यक्षात आणि दूरदर्शनावरील त्यांची प्रतिमा अगदी वेगळी. आमच्या टॉवरचा इतिहास याप्रमाणे प्रसिद्ध आहे. हे सांगण्याचं कारण म्हणजे हान्सनं तिथे बांधकाम केलं होतं. तिथे ७७५ संकुले आहेत. त्यांची खरेदी विक्री नेहमीच सुरू असते. नवीन मालक आपल्या संकुलाचं नूतनीकरण करतो. त्यामुळे हान्सला नेहमी काम मिळे.

आम्ही तिथे वर्षातून काही आठवडे राहतो हे कळताच त्यानं आपलं एक ओळखपत्र मला दिलं. म्हणाला, ''संकुलात दुरुस्ती करायची असेल किंवा त्याची साफसफाई करण्यास बाई लागत असेल तर मला नक्की फोन करा. सध्या आम्ही त्या कामासाठी पूर्व युरोपमधून अमेरिकेत आलेल्या व इंग्रजी न कळणाऱ्या बायका एका कंपनीतर्फे कामाला बोलावतो. ''आम्ही अनेक महिने न्यू जर्सीमध्ये राहतो ही बातमी कानावर पडताच त्यानं दुसरं एक ओळखपत्र मला सुपूर्द केलं. तो म्हणाला, ''माझी एक कंपनी न्यूयॉर्कजवळ आहे.'' बहुआस्थापनं असलेल्या हान्सच्या उद्योगांना सीमाच नव्हती. हे उद्योग तो आपल्या मित्राबरोबर चालवत असावा.

त्याची दिनचर्या बघून मी थक्क झालो. त्यानं सकाळी ३ वाजतापासून काम सुरू केलं होतं. ओहेरला जाण्याची ही त्याची तिसरी फेरी. ९-१० वाजता घरी जाऊन तो १-२ तास झोप घेणार होता. मग आपल्या इतर धंद्यात लक्ष घालणार होता. नंतर पुन्हा २ तास झोप. त्यानंतर पुन्हा उबेर. म्हणजे आपण जी रोज

८ तास झोप घेतो त्या ऐवजी तो अर्धी घेऊन काम करीत होता. कुठल्याही क्षेत्रात वर येण्यासाठी कष्ट उपसावे लागतात, हा जगाचा नियम आहे. यशाचं फळ तोंडात पडत नाही; ते कमवावं लागतं. हान्सला ते चांगलं ठाऊक होतं.

अर्थातच संवादाची गाडी राजकारणात गेली. सध्याच्या नेत्यांमध्ये जर्मनीच्या अध्यक्षा अँजेला मर्कल सर्वाधिक काळ सत्तेवर राहिल्या हे त्यांचं विशेषत्व आहे म्हणून मी हान्सला त्यांच्याविषयी विचारलं. अध्यक्षपदी तीनदा निवडून आल्यामुळे मर्कलविषयी जर्मन लोकात आपल्या नेहरूंएवढं प्रेम असेल असं मला वाटलं पण माझा तो प्रश्न ऐकून हान्स प्रथमच विचलित झाला. त्याच्या मनात अँजेलाविषयी नुसता द्वेष होता. माध्यमांनी साकारित केलेली प्रतिमा वास्तवापेक्षा निराळी होती. मर्कलनी सिरियामधून जवळजवळ १० लाख विस्थापितांना जर्मनीत प्रवेश दिला होता. त्यांच्या पुनर्वसनासाठी अमाप पैसा खर्च केला होता. जर्मन जनतेचं कल्याण मात्र त्या विसरल्या. याचा जर्मन लोकांना राग आला. शिवाय देशात हे मुस्लीम पाहुणे आले तेव्हापासून बलात्काराचं, चोऱ्यांचं व इतर गुन्ह्यांचं प्रमाण वाढलं. जर्मन मुलीला अल्पवस्त्र परिधान करून बाहेर पडणं धोक्याचं झालं. त्यामुळे देशाचा सांस्कृतिक पोतच बदलला. हे हान्स व त्याच्या देश बांधवांना मुळीच मान्य नव्हतं. म्हणून त्याचा अँजेलावरील रोष.

मग मी त्याला दुसरा प्रश्न विचारला. जर्मनी व अमेरिका यामधील कुठला देश तुला आवडतो? त्यानं 'अमेरिका' असा नि:संदिग्ध निर्वाळा दिला. तो म्हणाला अमेरिकेएवढं स्वातंत्र्य व उद्योगस्नेही वातावरण जगात कुठेच सापडत नाही. जर्मनीत नवीन वाहन विकत घेण्यासाठी ३-४ दिवस लागतात. तेच काम अमेरिकेत ३-४ तासात उरकते. अमेरिकेत सापडणारी लिंगसमता व स्त्री हक्क इतर देशात सापडत नाही. दुसऱ्या देशात स्त्रिया देशप्रमुख झाल्या असल्या तरी ती लाक्षणिक प्रगती आहे. सम हक्क व लिंगसमता त्या देशात तळागाळापर्यंत झिरपले नाहीत.

आज हान्स मिळाला तसा एकदा मला भल्या पहाटे एक देखणी, तरुण व काळी महिला उबेर ड्रायव्हर म्हणून मिळाली. तिचं धाडस बघून मी थक्क झालो. शिकागोचा काही भाग अफगाणिस्तानपेक्षा जास्त धोक्याचा आहे. त्या युद्धग्रस्त देशापेक्षा अमेरिकेच्या तिसऱ्या नंबरच्या शहरात जास्त खून होतात. ते काळ्यांच्या वेटाळापुरतं मर्यादित असलं तरी रात्री बेरात्री एकट्या तरुण स्त्रीला काम करणं किती धोकाग्रस्त याचा विचारच केलेला बरा! पण त्या तरुणीनं एक पिस्तुल आपल्या बटव्यात किंवा शरीरावरील व्यूहात्मक ठिकाणी लपवून ठेवली असणार, अशी मला शंका आली किंवा तिनं अमेरिकेन सैन्यात भरती होऊन अफगाणिस्तानमध्ये आघाडीवर काम केलं असेल. तालिबान किंवा अलकायदाला सामोरं गेल्यावर शिकागोतल्या चोरांची तिच्यासमोर डाळ शिजण्याची काय शक्यता? त्यामुळे शिकागोमध्ये रात्री टॅक्सी चालवणं हा तिला भातुकलीचा खेळ वाटत असावा.

**मुंबई**

मुंबईतही मला उबेरचे अनेक गाडीवान मिळाले. हा श्रीधर नावाचा तरुण ड्रायव्हर घ्या. त्याचं स्वप्न एकच. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यशस्वी होण्याचा त्याला ध्यास लागलेला. एक सनदी अधिकारी होऊन स्थिर नोकरी मिळवून समाजमान्य बाबू होणं हे त्याच्या आयुष्याचं उद्दिष्ट होतं. हे साध्य करण्यासाठी तो आतापर्यंत दोनदा या परीक्षेत बसला होता. पण त्याचं नशीब एवढं खडतर की एकदा दोन आणि दुसऱ्यांदा फक्त एका गुणानं त्याचं उद्दिष्ट त्याच्या हातातून सुटलं. आता तो तिसरा प्रयत्न करणार होता. असं करताना त्याला जी स्पर्धा करावी लागत होती, ती ऐकून मी चाट पडलो. एकूण ६४ जागा होत्या. त्यातल्या अर्ध्या अल्पसंख्यंकासाठी व १६ महिलांसाठी राखून ठेवल्या होत्या. म्हणजे श्रीधर १६ जागांसाठी स्पर्धा करीत होता आणि त्यासाठी किती अर्ज आले होते? तो म्हणाला अडीच लाखाहून जास्त. त्यापेक्षा लॉटरी जिंकणं सोपं होतं. तरीही या पठ्ठ्यानं धीर सोडला नव्हता. तिसऱ्यांदा परीक्षेस बसण्यासाठी लागणारी फी जमवण्यासाठी तो उबेरचा गाडीवान झाला होता. दर वेळी पैशासाठी वडिलांसमोर तोंड वेंगाडण्याचा त्याला कंटाळा आला होता.

दुसरा एक ड्रायव्हर शुद्ध मराठी बोलणारा. कोल्हापुरात जन्मलेला. सौदी अरेबियात काम करून आजारी वडिलांची शुश्रूषा करण्यास मायदेशी परतलेला. त्याचं मराठी भाषेवरचं प्रभुत्व बघून मी विस्मयचकित झालो कारण त्याचं नाव होतं इकबाल. त्याची गोल पांढरी टोपी आणि लांब दाढी धर्मसूचक होती. आजकाल मराठी मातृभाषा असलेल्या बांधवाचं मराठी कळण्यास आंग्लभाषेचा शब्दकोश वापरावा लागतो तर ही स्वारी खाड्‌खाड् शुद्ध मराठी बोलत होती. शिवाय त्याची भाषा एवढी रसाळ व व्यक्तिमत्त्व स्नेहशील की आम्ही पुढच्या वेळी मुंबईवरून पुण्याला जाण्यास त्याची गाडी वापरायचं ठरवलं. त्याचं ओळखपत्र देखील घेतलं. तर असे हे उबेरचे वेगवेगळे ड्रायव्हर!

त्यानंतर अनेक देशांतून आलेले वाहनचालक माझ्या वाट्याला आले. अशा बहुभाषिक, बहुद्देशीय व बहुसांस्कृतिक वाहनचालकांशी संवाद साधल्यामुळे उबेरनं आपणास सुसंस्कृत होण्याचा नवीन मार्ग उपलब्ध करून दिला. तो ग्रंथालयात जाण्याएवढाच प्रभावी आहे, असं मला आढळून आलं.

**– डॉ. अनंत पां. लाभसेटवार** (Ph.D.)
anantlabh@gmail.com
लेखक, माजी अध्यक्ष-फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी,
कॅन्सास अमेरिका

रावसाहेब पुजारी

# धनगरवाड्यातील कोकरांची किलबिल...

मेंढरं मेंढवाड्यात आली की एकच गोंधळ होई. आई पोराला आणि लहान-लहान पोरं आईला शोधत एकच गलका करत. बें-बें, में-मेंचा एकच सूर त्या परिसरात घुमत राही. एकमेकांचा आवाज जवळूनसुद्धा त्या गोंगाटात ऐकू येत नसे.

गावाच्या वईल्या बाजूला त्यांचे मेंढवाडे होते. मेंढवाडे सोडले की डोंगराची हद्द सुरू होते. ती हद्द वनखात्याची. हद्द वनखात्याची असली तरी तो परिसर कधी वनाखाली आलाच नव्हता. परिसर दगड-धोंड्यांचा; उचल-सखल भागात विखुरलेला! त्यात अतिक्रमण करता येत नाही, म्हणून तिकडे मेंढवाडे सरकले नाहीत. पण मोकाट मेंढरांचा वावर त्या परिसरात सदानकदा सुरूच असतो. या मेंढवाड्याच्या उशाला पूर्वी दगडासाठी वडाराने खणलेली खाण आणि त्यात काळेसार पाणी. खण एका बाजूला वाहती होती. बायांनी वाहत्या पाण्याजवळ धुण्यासाठी दगड ठेवून त्याचा धोबी कट्टा केला होता. आया-बाया कपडे धुण्यासाठी त्या खणीवर नित्यनेमाने येतात; धू-धू कपडे धुतात आणि बरोबर, एकमेकींच्या घरातल्या सासवा-सुनांची लक्तरं त्या हितं धुतात. जणू, मन मोकळं करण्याची त्यांची ती हक्काची जागा. डोंगराच्या पुढ्यात, मेंढवाडे रांगोळीतील ठिपक्यांप्रमाणे भासत. मेंढवाडे ज्याच्या-त्याच्या ऐपतीप्रमाणे पसरलेले. बड्या मेंढक्यानं ऐसपैस रान धरलेलं. बारक्यांनी जागेच्या सोयीने कडकडेनं मेंढवाडे धरलेले. बहुतेक सगळ्या मेंढवाड्यांना चिकाचे कुंपण घातलेले. पेडेला मात्र कळकांची दाट कुडण केलेली. मेंढरांना आसरा करण्यासाठी कोणी कळक्याच्या काठ्यांचं आणि झावळ्यांचं कुंपण घातलेलं होतं. कुणी तेवढ्यापुरताच चिकाचा आडोसा केलेला होता. कोणी दोन-तीन हातांचे विटाचे छातीबरोबर भिताड घातलेलं. प्रत्येकाच्या वाड्याला बंदाट्यानं तयार केलेलं मजबूत तुस्त दार असे. त्याची तुस्त बांधणी म्हणजे धनगरी संस्काराची जणू वेगळी वीणच म्हणावी लागेल. त्यातून चिटपाखरूंसुद्धा आत येऊ शकत नव्हतं. मेंढवाड्यांच्या उबदार आडोशाला लहान-लहान तान्ही कोकरं डालग्यात घातलेली असत. सकाळी डालेली कोकरी संध्याकाळी मेंढरं पुन्हा आकरावर आल्यानंतरच त्यांची गाठीभेट होई. त्यामुळे तीसुद्धा बंदिवानातील कैद्यासारखी वैतागलेली असत. मेंढक्यांना ते मेंढवाडे म्हणजे लांडगा, भुरटी कुत्री आणि चोरटे यांच्यापासून संरक्षण मिळण्यासाठी जणू सुरक्षित घर असतं. त्या भरोश्यावरच मेंढकं दिवसभर रानावनातून निवांत फिरत असतात. त्यामुळे त्यांचा पाठीमागचा घोर कमी होतो.

लक्ष्मीवाडीच्या त्या डोंगराच्या बाजूनं पुढे एक टेकाड चढलं, की टोळ बिरोबाचे छोटाखानी देऊळ लागते. रानावनात मेंढरं, शेरडं निवांत फिरत असतात. मेंढकं, त्यांचं धनगरी कुत्रं आणि कांही गुराखी आजूबाजूला गुरं फिरवत असतात. टोळ बिरोबाच्या परिसरात अनेक काटेरी झुडपं वाढलेली असतात. झिपरी कुत्री जीभ बाहेर काढून त्या झुडपातून सावली शोधत असतात.

आपल्या मेंढरांचं रक्षण करण्यासाठी या बनात टोळबिरोबाला इंथ बसवलेलं आहे, अशी बहुतेक सर्वच मेंढक्यांची समजूत होती. त्याच्याशेजारी होळबिरोबा, मेघराजा व इतर देवांची छोटी-छोटी आणखी दोन-चार देवळं आहेत. कोणत्या देवळात कोणता देव आहे आणि त्याचं नाव काय आहे, याची फारशी माहिती मेंढक्यांनासुद्धा नसे. पण रूढ परंपरेनं हे देव आणि त्यांची देवळं हे या मेंढक्यांच्या श्रद्धेचे विषय बनलेले.

टोळ बिरोबा मेंढरांची कुत्र्यां-लांडग्यापासून राखण करतो. त्याला दर रविवारी मेंढकं तपानं करायला येतात. मानाची ओवाळणी म्हणून पाच नारळांचं तोरण बांधतात, मेंढरांच्या ताज्या दुधानं त्याला अभिषेक घालतात. त्याची मनोभावे पूजाअर्चा करतात. तपानाचं पाणी पुन्हा खांडावर जाऊन शिंपडतात. तसा हा आता मेंढक्यांसाठी शिरस्ताच झालेला. नवखा मेंढका हे नित्यनेमाने तपनाला येतो. तो 'त्याचं खांड बक्कळ होऊ दे', अशी प्रार्थना वाक्यारंभी करतो. त्याची मनोभावना खांड बक्कळ झालं पाहिजे, एवढीच असते. त्याने मनाशी खांडं बक्कळं झाली तर त्याचा बग्गा होईल. पुढे आपण कारभारी होऊ, अशी आशा बाळगलेली असते.



इकडे, मेंढवाड्या डालग्यातील कोकरांच्या बेसुरी ओरडण्याच्या आवाजाने कालवा केलेला असे. कोणाचेही लक्ष त्यांच्या ओरडण्याकडे सहज वेधलं जाई. तान्ह्या कोकरांना संध्याकाळ झाली की प्रचंड भूक लागलेली असे. त्यामुळे डालग्यातील सगळी कोकरं एकदम बेसुरी पद्धतीनं ओरडू लागतात. त्यांना ओढ, त्यांच्या आया कधी एकदा घरी येतात आणि त्यांना दूध पाजतात, याची लागलेली असते. मेंढवाड्याकडे सांच्यापारी परतणाऱ्या मेंढरांचे आवाजसुद्धा तसेच मायं-लेकरांच्या ओढीची साक्ष देत आसमंत भेदत असतात. अनेक लेकुरवाळ्या मेंढ्या एका लयीनं ओरडण्यास सुरुवात करतात. घरपरतीची त्यांची ती वाट त्या आवाजानं निनादत राहते. मेंढवाडे जसजसे जवळ येऊ लागतात, तसा कोकऱ्यांचा आणि मेंढरांच्या आवाजाचा गलका सुरू होतो. तान्ह्या लेकुरवाळींचा तर एकदम घोलाणा सुरू असतो. धनगरणी दूरवरच्या त्या आवाजानं सावध होतात. दिवस कलू लागला, की धनगरणी दुधाची हंडी घेऊन त्या मेंढवाड्याकडे पावलं वळवतात. मेंढवाड्याच्या दाराशी धनगरणी अगदी तान्ही काही कोकरी कवटाळून बसलेल्या असतात. मेंढक्याची वाट पाहत मेंढवाटकडे डोळे लावून असतात.

तो धनगरवाडा गावाच्या उशालाच होता. डोंगराकडची मोकळी जागा म्हणजे त्यांचं आकुर. ज्याची त्याची जागा या आकरावरसुद्धा निश्चितीत असते. एकमेकाच्या आकारावर कोणी सहसा आगळीक मांडायला जात नाही. काळाबरोबर ती त्यांची मालकीच झालेली असते. त्याची कुठल्या दफ्तराला नोंद नसते. पण मेंढक्यांना हा ठावठिकाणा चांगला माहीत असतो. त्याचबरोबर त्यांच्या मेंढरांनासुद्धा त्यांच्या-त्यांच्या आकुराची सवय झालेली असते. सवयीप्रमाणे मेंढरं त्यांच्या आकरावर जाऊन थांबतात. त्यांच्या लहानग्यांना पोटभर दूध पाजतात. ती लहान कोकरी आकरावर खेळताना, हिंदळताना त्या मेंढरांनासुद्धा किती समाधान वाटत राहते!

मेंढवाड्याबरोबरच या आकराची झाडलोट करणे, मेंढ्यांचे कळप तेथून बाहेर पडले की धनगरणी लेंड्यांचा केर एकत्रित करतात. बुटीने त्या लेंड्या, मूत बाजूच्या उकिरड्यावर आणून टाकतात. त्यांचे मोठालं ढीग तयार होतात. धनगर ते मेंढी खत म्हणून मोठ्या दराने शेतकऱ्यांना विकतात. पण आकुर लोटण्याचे काम मेंढपाळ कुटुंबात नवख्या धनगरणीकडे

हटकून दिलेले असते. ती इमाने-इतबारे ती कामे करते. वयोवृद्ध मेंढपाळाला आकूर लोटावा क्वचितच लागत असे. तोही आता डेंगलेला असून मेंढराकडं त्याचे जाणे बंद झालेले असते. म्हणून तो आकरावर थांबून तिथली काही कामे करत असतो. अन्यथा नवख्या धनगरणीला आकुर लोटायचे काम म्हणजे तिच्या सासरची पहिली परीक्षा असे. त्यावर सासू-सासरा, नवरा, दीर, थोरल्या जावा यांची नजर असे. ती कामचुकारपणा करते का, याची इथंच परीक्षा सुरू होते. या सर्वांचा विश्वास संपादन करण्यासाठी तिला या सगळ्यांना सामोरे जावेच लागत असे. नवख्या धनगरणी मोठ्या आनंदाने हे काम करत.

आकरावर शेळ्या-मेंढ्या रात्रभर मुतून, हागून सगळी दैना करतात. पुन्हा त्यातच त्या बसतात, उठतात. मेंढरांनी टाकलेल्या लेंड्यांचा आणि मुताचा वास तिथं भपकारीत असतो. तो नवख्या माणसांना अधिक जाणवतो. मेंढक्याला, धनगरणीला त्याचे काहीच वाटत नाही. त्यांच्या ते अंगवळणी पडलेले असते. काही धनगरणी त्यांचे मेंढवाडं, आकुर नारळाच्या कवटीसारखं लख्खं ठेवतात. सासवांच्या, शेजारणीच्या कौतुकाचे दोन शब्द त्यांच्या कानावर पडले की त्या धन्य होत. अंग मोडून केल्या कष्टाचं चीज झाल्याचं समाधान  त्यांना मिळे. यासाठी त्यांच्या कामात चुकारपणा अजिबात पाहण्यास मिळत नसे.

शेळ्या-मेंढ्यांना जसे वाड्यात येण्याचे, आपल्या पिल्लांना पाजण्याचे वेध लागलेले असतात. तसेच धनगरणीला, मेंढक्यालासुद्धा कोकरी मिळवणीचे वेध लागलेले असतात, वाड्यात राहिलेली कोकरी आणि रानातून फिरून आलेल्या मेंढ्यांचा बैजवार एकत्र करणे महत्त्वाचं असतं. मेंढरं मेंढवाड्यात आली की एकच गोंधळ होई. आई पोराला आणि लहान-लहान पोरं आईला शोधत एकच गलका करत. बें-बें, में-मेंचा एकच सूर त्या परिसरात घुमत राही. एकमेकांचा आवाज जवळूनसुद्धा त्या गोंगाटात ऐकू येत नसे. तो आवाज हळूहळू वाढत जातो आणि मेंढरं-कोकरांची मिळवणी झाली की तो आवाज पुन्हा खाली-खाली येऊन बंद होतो. मेंढकं मेंढरांना लावलेली आळपणं काढून टाकत, ज्याची तिची कोकरी त्या-त्या मेंढरांच्या कासेला लावी. कोकरी मच-मच आवाज करीत दुधाच्या घुटका पोटात ढकलत शांत होत असे. त्यांच्या ओठावरून घरंगळणारं दूध मेंढी चाटत आपल्या तान्ह्याला भरवत राही. बाळाचं पोट भरलं की आई समाधान पावते, तसं सगळं सुरू असतं.

भुकेली कोकरी कोठल्याही मेंढीच्या कासेत शिरून ढुशा मारू लागते. तसे मेंढीला त्याचा नवखा वास लागताच ती टण्दिशी उडी मारून बाजूला जाते. या धडपडीत लहान-लहान कोकरी उलथी-पालथी होत. मेंढका जिच्या-तिच्या कासेला जिचं-तिचं कोकरी लावण्याचा प्रयत्न करत राहतो. धनगरणी त्याला मदत करू लागतात. कोकरी मिळवणी अशीच काही काळ सुरू असते. तान्ही कोकरी आणि मेंढरं यांची जुळवाजुळव होईपर्यंत त्यांची धडपड सुरूच राहते. बुट्या लावराला बांडं कोकरू लाव, भुरीला तिचं कोकरू जुळव, मोरकानीला वावरं कोकरू जोडून दे, असं बराच वेळ मेंढका आणि धनगरणी करत असतात. मध्येच गलुलं कोकरू आईसाठी कोकलत ब्यां ब्यां करत मेंढरांच्या घोळक्याभोवती येडं घालत राहतं. त्याच्या ब्यां ब्यां करण्याकडे मेंढक्याचं लक्ष आपसुक वेधलं जातं. त्याला तिच्या आईजवळ सोडावं लागतं. मध्येच मेंढका हातांतील छप्पीनं वांड मेंढीला लगावून तिला तंबी देतो. तिचं कोकरी त्यांच्या कासेला लावून देतो. थोडा वेळानं मेंढरांचा आणि कोकरांचा गलका कमी होतो. हळूहळू तो खाली बसतो आणि मेंढका आणि धनगरणी दुधाने भरलेल्या हंडीसह घराकडे निघून जातात. हा गलका त्या मेंढवाड्यातील रोजचा असतो. प्रत्येक वाड्यावर तीच तऱ्हा पाहण्यास मिळते. तो मेंढक्यांच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग झालेला असतो.

सकाळी लवकर उठवून मेंढवाड्यातील मेंढरं आकरावर आणायची. बारकी कोकरं मेंढऱ्यांच्या कासेला लावायची. त्यांच्या धारा काढायच्या. कोकऱ्यांसाठी थोडीफार वैरण आणायची. यासाठी शेवरी, हिरवा पाला; तसंच वड्याकाठनं आलेली चांगली झाडं बेंदायची आणि ती कोकऱ्यासाठी आणून ठेवायची. वज्र्याचा भारा मेंढवाड्यापर्यंत आणूपर्यंत मेंढक्याला झेंडू फुटलेला असे. कोकरी डालग्यात घातल्यानंतर ती वैरण डालग्याला आडकवून ठेवली जायची. संध्याकाळ होईपर्यंत कोकरी, आजारी मेंढरं तसेच म्हातारी-कोतारी जनावरं त्या वैरणीवर ताव मारत राहतात. जणू तो त्यांचा दिवसभराचा खाना असतो. ती बेगमी मेंढक्यालाच करावी लागते. तो त्याच्या रोजच्या कामाचा महत्त्वाचा भाग असतो. दुधासाठी मेंढ्या आळपून ठेवल्या जातात. मेंढरांच्या लेंड्याचा काला करून ती मेंढरांच्या स्तनांना लावून त्यावर बारीक चिंधकं बांधून ठेवली जातात. याला 'आळापणं' म्हणतात. यामुळे कोकरू मेंढीला सारखं-सारखं ढुशा मारत बसत नाहीत. घरातील पोराबाळांसाठी दूध राखलं जातं. त्यासाठी ती तजवीज मेंढका करत असतो.

सकाळच्या पाऱ्यातील कामं मेंढकं आवरेपर्यंत धनगरणी घरातील भांडीकुंडी, धुणं आवरून मेंढक्यांसाठी भाकरी तयार करत असत. चुलीवर भाजलेली, भरपूर पापूड आलेली आणि त्याचा घमघमाट असा वास येत असतो. चुलीवर रटरट करत कोरड्यास शिजत राहतं. राना-उन्हातून हिंडणाऱ्या मेंढक्यांचं जेवण म्हणजे पाच-सहा भाकऱ्यांचा एकदम खुर्दा केलेला असे. ते तो कालवूनच खात असतो. त्यात गरम-गरम तिकटजाळ बक्कळ कोरड्यास असे. कधीमधी कोरडी उसळंही असतात. कडक साय आलेलं दूध. सकाळचं जेवण भरपेट झालं तरी दुपारचा बोकणा मालकीन देतच असते. त्यातसुद्धा दोन-चार भाकरी, थोडी उसळ आणि तेल-चटणी, खर्डा, कांदा, क्वचित लोणच्याची फोड; तसंच जेवणाच्या वेळीच काढलेलं ताजं

शेळ्यामेंढ्यांचं आकरी दूध असे. कोणती शेळी करड्यांना पाजताना नखरे करते, तिला दुपारी मेंढकं जेवणाच्या वेळी चिटतात. त्या कच्च्या दुधात भाकरी खुसकरून खाण्याची बहुतेक सगळ्या मेंढक्यांना सवय असते. त्यात कोणी आढेवेढे घेत नाहीत. एकाद्या झाडाच्या सावलीला, पाण्याची सोय बघून किंवा दरडंला मेंढक्यांचा दुपाराचा विसावा असतो. त्या ठिकाणी मस्त जेवण, त्याच ठिकाणी थोडा वेळेचा छोटासा डुलका निघे आणि त्यानंतर मेंढकं पुन्हा ताजेतवाने होऊन मेंढरामागून भटकंतीला निघत.

दिवसभर डोंगरकपारीतून हिंडणारी शेरडं-मेंढरं संध्याकाळ होऊ लागली, की गावाकडच्या रिकाम्या रानातील पाला-पाचोळा शोधत गावाच्या बाजूनं गावंदरीला येऊ लागतात. शेरडं-मेंढरं गावंदरीला असतील तर एकाद्या मळ्यात शेळ्या-मेंढ्यांच्या ताज्या दुधाचा चहा हाटकून केला जातो. अतिशय गडद असा हा तो चहा म्हणजे एक वेगळाच आविष्कार असतो. मेंढराच्या दुधाचा चहा खूप स्वादिष्ट असतो. त्याची चव बराच वेळ जिभेवर तरळत असते. शेतकरी मेंढक्यांना मुद्दाम बोलावून आपल्या आवारात हा चहा करायला लावत. त्यासाठी साखर, पावडर, चुलवाणं देत. कुरवाडणीसुद्धा तशा चहासाठी मेंढक्यांना माया लावत असतात. रोज कोणीना कोणी मेंढका गावकऱ्यांच्या लज्जतदार चहाच्या फर्माईशीला हजर असे.

काखेत बोकणा, त्यात स्वतःबरोबर कुत्र्याचं दोन वेळचं जेवण, खांद्यावर पटकुरं आणि हातात कुऱ्हाड किंवा आकडी घेऊनच जित्रापांबरोबर मेंढका घराबाहेर पडे. हातातील कुऱ्हाडीनं वाटेत एखादं झाड बेंदायचं, त्याच्या चाऱ्यावर मेंढरं, शेरडं चारायची. सावळलेली झाडं खांद्यावर टाकून घरी परतणारे ती मेंढकं त्यांची अशी एक वेगळीच मेंढकेपणाची ओळख करून देतात. त्यात त्यांना धन्यताही असते. रानात कोठे अचानक लांडगा-कुत्र्यांचं कळप आल्यास त्यांना भीती दाखवण्यासाठी त्या कुऱ्हाडीचा चांगला उपयोग होतो.

पावसाळा सुरू होताच डोंगराच्या चारी बाजूंना लगा-लगा हिरवा चारा उपलून येत असतो. त्यामुळे मेंढकं हारखून जातात. हिरवा चारा खाऊन मेंढरं तुडुंब झाली की मेंढक्यांच्या अंगावर मूठभर मांस चढे. आकडीचा सुद्धा तोच उद्देश असतो. मात्र, मेंढरांपेक्षा शेरड्यांमागे जाणारे मेंढकं आकडी वापरतात. कुंपणावरचा शेलका चारा, उंच झाडावरच्या फांद्या बेंदायला तिचा चांगला उपयोग होतो. त्यांच्या डोक्यावर टोपी, फेटा नाहीतर एकादं पेटकुरं असतंच. बोडका मेंढका सहसा रानात चुकूनही दिसणार नाही. सोबतीला धनगरी कुत्रं. ते मेंढक्याची पाठ सोडत नाही. कायम त्याच्याबरोबर असतं. मेंढका जरा बाजूला गेला की कुत्रंही त्याच्या मागोमाग जातं. मेंढका थोडा वेळ विसावला की कुत्रंही तिथंच विसावतं. दोघांना एकमेकांचा विसर पडत नाही. रात्रीच्या वेळी मेंढवाडा सोडून कुत्रं इतरत्र जात नाही. त्याला त्याची सवय झालेली असते. मेंढवाड्याच्या कोपऱ्यात पायाच्या खुऱ्यानं माती उकरून अंगाभोवती उबदारपणा करून वेटोळ्यात दाराजवळ पहारा देत असते. मेंढका वस्तीला आला की ते त्याच्याजवळ मचाणावर विसावतं. त्याला कोणी परकी चाहूल लागली तरी ते भुंकण्यास सुरुवात करते. त्यामुळे मेंढका सावध होतो. मेंढक्याचा कुत्र्यावर आणि कुत्र्यांचा मेंढक्यावर जीव असतो. तेच मेंढरांचे खरे रखाणदार असतात. सकाळ-संध्याकाळी मेंढकं आकरावर आलं की पहिलं काम ते कुत्र्यांना जेवू घालतात. भोगुन्यात बक्कळ दूध ओतून घरून आणलेली भाकर त्याला देतात. मच-मच आवाज करत कुत्रा जेवत असतो. त्यानंतर तो शांत झोपी जातो. धनगरी कुत्र्यांची अशी एक वेगळी ओळख विकसित झालेली आहे.

आकरावरून मेंढरं बाहेर पडली की धनगरणींची आकरावरची कामं सुरू होतात. धनगरणी आकुर लोटणं, डालग्यात चारा घालणं, कोल्ही-कुत्री-लांडगं येणार नाहीत याची दक्षता घेत मेंढवाडा तुस्त बांधणं ही कामं करतात. त्याशिवाय त्यांची सुटकाच होत नाही. दिवसभर कोकरी डालग्याला लटकलेला चारा खाऊन तिथंच झोपी जातात. विश्रांतीनंतर ती कोकरी पुन्हा संध्याकाळी चार-पाच वाजता जागी होतात. त्यानंतर त्यांचा डालग्यात धिंगाणा सुरू होतो. धनगरणी, वयोवृद्ध मेंढके, धनगरांची पोरं डालग्यातील कोकरी मेंढवाड्यात थोडा वेळ पाय मोकळं करण्यास बाहेर सोडतात. तिथं त्यांचं कब्बडी, हुतू-तू सुरू होते. मेंढवाड्याच्या छोट्या मोकळ्या जागेत उड्या मारणारी कोकरी म्हणजे त्यांचं एक वेगळंच विश्व बहरलेलं असतं. पळता-पळता एकमेकांच्या अंगावर जाऊन आदळणारी ती कोकरी भारी अवखळ असतात. त्यांना आवरता-आवरता धनगरणीला पुरे वाट होते. अगदी नव्यानं जन्मलेली तान्ही कोकरं धनगरणीच्या भवती खेळत असतात. धनगरणीला चाटणारी नवजात कोकरं धनगरणी मोठ्या मायेनं त्यांच्या ऊबीला धरून बसते. नुकतीच पायावर चालू लागलेली ती पिल्लं सतत ब्यां ब्यां करत धनगरणीला चाटत राहतात. तिच्या भवताली फिरत राहतात. त्यांच्या ब्यां-ब्यां ओरडण्यानं धनगरणीला त्यांची माया येते. त्या त्यांच्या अंगावरून मायेचा हात फिरवत त्यांना कुरवाळत राहतात. जणू त्यांच्याच पोटी ते लहान लेकरूं जन्मलेलं आहे. नवख्या धनगरणीला तिचं हे कुटुंब तसंच फुलत-फुलत मोठं व्हावं, असं वाटत राहतं.

ती अवखळ कोकरी तासभर खेळल्यानंतर पुन्हा धनगरणी एकेक कोकरू पकडून त्यांना डालग्यात घालू लागतात. डालग्यातील कोकरी पुन्हा एका रवात भेकड पसरतात. त्यांचे ब्यां-ब्यां करत ओरडणं त्या गावाबाहेरच्या मेंढवाड्यातील वातावरणात वेगळाच हुंकार निर्माण करतात. कोकरांना त्यांच्या आयांची ओढ लागलेली असते. पुन्हा त्यांच्या पोटात भुकेचा लोळ उठलेला असतो. त्यांचे ओरडण्याचे चित्कार तेच सांगून जातो. भुकलेली ती लहान बाळं आईच्या भेटीसाठी व्याकूळ झालेली असतात. त्यांना कधी एकदा त्यांच्या आयांना भेटतो,

असं झालेलं असतं.

दिस बुडतीला गेला की मेंढपाळांनाही त्यांच्या जित्रापांना जागेवर आणून सोडण्याचं असते. त्यासाठी ते मेंढरांची पोटं भरल्याची खात्री झाली, की हळू-हळू बकरी आकराकडे घेऊन येऊ लागतात. मेंढक्यांची पावलं हळू-हळू मेंढवाड्यांच्या दिशेनं चालू लागतात. सगळ्यात मागे त्यांचा कुत्रा असतो. तो मेंढरं वाड्यात येईपर्यंत सावध असतो. मेंढरांचं वाड्यात येणंसुद्धा त्यांच्या ओरडण्यानं माय-लेकरांच्या भेटीची ओढ सांगून जातात. माय-लेकरांची आतुरलेली सायंकाळ असते. विठ्ठल-रूक्मिणी यांच्या भेटीला वारकरी जसे आतुरलेले असतात, तशीच ती माय-लेकरं एकमेकांच्या भेटीसाठी आतुरलेली असतात. तोच सांगावा त्यांच्या ओरडण्यातून सतत येत असतो. लहान कोकरांच्या आया खांड सोडून पुढे पळू लागतात. मेंढकं त्यांना दबवण्याचा प्रयत्न करतात. त्या मेढकांना दाद देत नाहीत. त्यांना कधी एकदा त्यांच्या पिल्याला भेटतो, असं झालेलं असतं. लहान बाळांच्या आयांना त्यांच्या तानुल्या कोकरांची ओढ लागलेली असते. त्या मेंढवाड्याकडे येताना सतत ब्यां ब्यां असा ओरडा करत असतात. कांही मेंढरं तर कळप सोडून धावत जातात. नवख्या बाळंतणींचा तर एकदम घोलाणा सुरू असतो. रानातून आलेल्या मेंढरांचा आवाज जसा मेंढवाडा जवळ येईल, तसा वाढत जातो. पेडेला आलेली सगळी मेंढरं एकदम ओरडू लागतात. त्याच वेळी वाड्यातील डालग्यामधील कोकरांचाही आवाज वाढलेला असतो.

भुकेने व्याकूळ झालेल्या तान्ह्या कोकऱ्यांची पहिल्यांदा मिळवणी केली जाते. ती त्यांच्या आयांच्या कुशीत मच-मच करत दूध पिऊ लागतात. मिलनाची ती घडी मेंढरांसाठी खूप मोलाची असतो. कोकरी एकदा का ढुशी देत मेंढीच्या कासेला येऊन लागले की तिला खूप समाधान होते. ती तिच्या दुधावर पिल्यांना तृप्त करते. मच-मच आवाज करत मेंढ्याच्या स्तनातून घरगळणारं दूध कोकरांचं पोट भरवून जातं. दूध पिऊन मेंढी आणि कोकरू, दोघंही समाधान पावतात. कोकरांच्या वासानेच मेंढ्या अतीव समाधानी होतात. त्यांना त्या हुंगत राहतात. दिवसभर फिरून फिरून दुःखलं-भागलेलं शरीर कधी एकदा त्यांना जमिनीवर टाकीन असं झालेलं असतं. कोकऱ्यांची पोटं भरली की मेंढरं मिळेल तिथं बैठका मारतात. मस्तीतील कोकरं त्यांच्या अंगा-खांद्यावर उड्या मारू लागतात. उरली रात्रं कशी सरली, त्यांचं त्यांना कळत नाही. पुन्हा नवा दिवस त्यांच्या आयुष्यात उगवतो. मेंढवाड्यातील ती किलबिल शाळेतील शाळाभरणीच्या सकाळच्या वेळच्या गोंगाटासारखी वाटत राहते.

मेंढका रात्रीच्या वस्तीला येतो. त्यासाठी मेंढवाड्यात मचाण तयार केलेलं असतं. लाकडी मचाण मेंढवाड्याच्या एका कोपऱ्यात किंवा मध्यभागी उभं केलेलं असतं. मेंढका त्यावर ऐसपैस झोपू शकतो. तो त्यावरून त्याच्या वाड्यातील सर्व मेंढरांचं निरीक्षण करू शकतो. त्याचं कुत्रं बऱ्याचदा त्याच्या पायापाशी पोटात पाय गुंडाळून घेऊन झोपलेलं असतं. मात्र, ते येणाऱ्या-जाणाऱ्यांचा, नवख्या व्यक्तींचा, जनावरांचा माग लगेच काढतं. त्याला शंका येताच ते भुंकायला सुरूवात करतं. तसा मेंढका सावध होतो. त्याच्या इतर सहकाऱ्यांना सावध करतो.

मेंढरं, कोकरी, शेरडं, करडं, मेंढकं, धनगरणी सगळे उन्हं, पाऊस, वारा, थंडी या सगळ्यांना तोंड देत, नवा दिवस नव्या आशा घेऊन कामाला लागतात. मेंढरांचं, मेंढक्यांचं; तसंच, त्या धनगरवाड्याचं जगणं एका विशिष्ट अशा आवर्तनाला बांधलेलं असतं. मेंढपाळ त्याच्या जित्रापांना दऱ्याखोऱ्यातून, रानावनातून आणि वाड्यावस्त्यावरून मिळेल, तेवढा चारा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करीत असतात.

गावकुसाबाहेरचा एक छोटा समाज, दहा-बारा, वीस-पंचवीस घरांची ती वस्ती, म्हणजे धनगरवाडा. ती माणसं मनानं सरळ आणि नाकासमोर चालणारी असतात. बाबश्याच्या लक्ष्मीवाडी गावातही धनगरवाड्याचे चार बुडके आणि शे-दीडशे माणसांची लोकवस्ती असते. त्यांच्या जगण्याचा मध्यवर्ती कणा हा मेंढीपालन व्यवसायच होता. त्यांच्यासाठी ते जिवाचे रान करत. ते प्रसंगी सारा बाडबिस्तरा घेऊन एका गावाहून दुसऱ्या गावी जातात. त्या ठिकाणी मिळेल त्या रानावनात राहतात. सोबत, बायका-पोरं सगळा बाड-बिस्तरा असतो. त्यांची शिस्त लावताना कारभाऱ्याची मोठी तारांबळ उडते. हे असेच, दिवसामागचे दिवस बघणारा तो मेंढका, मेंढरं आणि धनगरवाडा डोंगरदऱ्यातून, राना-वनातून मिळेल, त्या चाऱ्यावर त्यांची गुजराण करत राहतात.

मेंढरांच्या चारा-पाण्यासाठी दिवाळीनंतरचे काही दिवस ते त्यांचा गाव सोडून बाहेरच्या नदीकाठच्या गावात काही दिवस तळ टाकतात. पुन्हा पावसाळा सुरू झाला की परत गावी येतात. त्यांची ती भटकंती हाच त्यांचा श्वास झालेला असतो. त्याच्या उलट कोकणातील मेंढपाळांचं असतं. त्यांना त्यांच्या जित्रापांचं संरक्षण पावसापासून करायचं असतं. त्यासाठी ते कमी पावसाच्या प्रदेशात काही काळ जातात.

मनानं साधी-सरळ असणारी ती मंडळी नेहमी नाकासमोर चालतात. वागण्या-बोलण्यात जाडेभरडेपणा असला तरी त्यात विश्वास ओतपोत भरलेला असतो. व्यवहारात पारदर्शकता असते. मनाला भावलं तर त्याच्यासाठी सगळं काही करण्याची तयारी असते. असे अनेक उन्हाळे-पावसाळे सोसून मेंढक्यांचा कारभारी पुढे होत असतो. चार मेंढरांनी सुरूवात करणारा छोटा मेंढकासुद्धा आयुष्यात कधीतरी कारभारी होईन, अशा जिद्दीनं रात्र-दिवस भरपूर कष्ट उपसतो. म्हणूनच ती धनाची आगार बनतात. खऱ्या अर्थानं धनगर असतात.

**- रावसाहेब पुजारी**
भ्रमणध्वनी : ०९८८१७४७३२५
sheti.pragati@gmail.com

मोहिब कादरी

# माणूस आहे म्हणून...

’परवा एक मुसलमानांचा माणूस आला होता हा प्लॉट घ्यायला! आम्ही सर्वांनी मिळून हाकलून लावलं!’ बाई मोकळेपणाने बोलून गेल्या. मी अवाकच!

अहमदपूर माझ्यासाठी नवीनच. आयुष्यात पहिल्यांदाच नोकरीच्या निमित्ताने इथे आलो. येण्यापूर्वी बरंच ऐकलेलं. वर्तमानपत्रात वाचलेलं. इथली मुलं दहावीबारावीला महाराष्ट्रात पहिली येतात आणि पंधरा दिवसाला एकदा नळाला पाणी येतं. वयाची एकवीस वर्ष पूर्ण झाल्याबरोबर मिळालेली नोकरीची ही पहिलीच संधी आणि अहमदपूरला झालेली पहिलीच नेमणूक. भरपूर स्वप्ने सोबत घेऊन आनंदाने आलो. पहिल्याच दिवशी सकाळी साहित्यिक प्राध्यापक दिनकर कुलकर्णी सरांची भेट घेतली. माझ्या मित्राचे भाऊ त्यांचे जावई. सरांनी छान मार्गदर्शन केलं. बरीच माहिती सांगितली. ओळखी आणि संदर्भाने वेळोवेळी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. काळजी करण्याचं काही कारण नाही आणि काही अडचण आली तर मी आहेच, बिनधास्त राहा, असा आशीर्वादरूपी सल्ला दिला.


राहण्यासाठी किरायाच्या घराच्या शोधात होतो. शहरातील काही शिक्षकांनी मिळून तयार केलेली एक छान कॉलनी विद्यानगर. शिक्षक असणे हा समान धर्म असलेली सर्व जातिधर्माचे लोकं आनंदाने एकत्रित राहत असलेली ही कॉलनी. शिक्षक नसलेल्या बाबुअप्पांचे त्यात एक घर. त्यांची मुलगी आणि जावई या घरात राहायचे. सोबत काही भाडेकरू. मोठं दोनमजली घर. दोन खोल्यांचा एक गाळा रिकामा होता. अप्पांना भेटलो. ते म्हणाले, ‘‘रिकामंच आहे. आजपासूनच जा राहायला.’’ एक कपड्यांची आणि एक पुस्तकांची बॅग सोबत फक्त. लगेच राहायला गेलो. मोठ्या रस्त्याच्या दुतर्फा वसलेली छान कॉलनी. लोक फारच प्रेमळ. सर्वांनी माझं स्वागत केलं. लगेच माझं भय्या असं नामकरणही झालं. छोट्यांपासून वडिलधाऱ्यांपर्यंत सर्वांचा भय्या कधी झालो कळलंच नाही. गुण्यागोविंदाने राहणारे सर्वजण. एकमेकांच्या दुःखात आनंदात सहभागी होणारी चांगली माणसं. भरपूर प्रेम मिळालं. नवीन गाव असूनसुद्धा फार जुने नाते असल्यासारखं. एकदम रमून गेलो. रोज सकाळी ऑफिसला निघायच्या आत शेजारच्या कोणाच्यातरी घरून पोहे, इडली, उपमा काहीतरी नक्की येणारच. घरीही एवढ्या शिस्तीत कधी मिळालं नाही. घर विसरून जाईल इतकं प्रेम.

माझी नोकरी लोकसंपर्काची. अल्पावधीतच भरपूर ओळखी झाल्या. नवनवीन ऋणानुबंध तयार झाले. पूर्ण रमून गेलो. आसपासच्या विवाहसमारंभांची आवर्जून आमंत्रणे यायची. न चुकता आनंदाने जात राहिलो. विवाहसमारंभातील व्यवस्थापनाचे संस्कार मला माझ्या गावातूनच मिळालेले. कोणाच्याही घरी काही शुभकार्य असेल तर गावातील प्रत्येकजण झटत असे.

आपापल्यापरीने जमेल तेवढे सहकार्य करायचेच. जातिधर्माच्या पलीकडे जाऊन सर्वांनी हा धर्म पाळलेला. झोकून देऊन काम करायची सवय मला तिथेच लागलेली. सहसा ग्रामीण भागात अशी परंपरा असतेच. इथेही मी ते चालू ठेवली. त्यामुळे ओळखी अधिकच वाढल्या. कुठल्याही कार्यात, नियोजनात बहुतांश वेळा मी असायचोच. मग ते कार्य समाजातील कोणाचेही असो.

अशातच सत्यनारायण काळे  यांची भेट झाली. समाजवादी वातावरणात वाढलेले मारवाडी गृहस्थ. त्यांचे वडील कम्युनिस्ट. आयुष्यभर गोरगरिबांच्या, सामान्यांच्या प्रश्नांसाठी लढले. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत शेतकरी, शेतमजुरांच्या प्रश्नांसाठी झगडत राहिले. त्यांच्या पश्चात कार्याची आठवण राहावी, इतरांना प्रेरणा मिळावी म्हणून त्यांचे चिरंजीव सत्यनारायण काळे त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी एक व्याख्यानमाला घ्यायचे. या निमित्ताने सत्यनारायण काळे यांची भेट झाली. सुस्पष्ट विचार, निर्भीड मतमांडणी करणारं पितृतुल्य व्यक्तिमत्व. हक्काने अधिकारवाणीने बोलायचे. छान गट्टी जमली. सर्वजण त्यांना सत्तूभाऊ म्हणत. रोज सायंकाळी त्यांच्याकडे आमची बैठक ठरलेली. त्यांना दोन मुले, एक मुलगी. त्यांच्या मुलीच्या विवाहसमारंभापासून आमचं नातं अधिकच घट्ट होत गेलं. ते आम्हा नवराबायकोला मुलगी व जावईच म्हणायचे. नुसतं म्हणणंच नाही तर जावयाप्रमाणेच त्या घरात माझा मानसन्मान. छोट्याम ोठ्या प्रत्येक कौटुंबिक कार्यक्रमात माझा जावई म्हणून सत्कार सन्मान व्हायचा. किती प्रेम आणि किती जीव लावावा. त्यांचे ऋण व्यक्त करावे तेवढे कमीच! किती भाग्यवान आहे मी हे वेळोवेळी जाणवत राहायचं.

एक दिवस एका मित्राच्या दुकानावर उभा होतो. समोर रद्दीत आलेल्या वह्या पडल्या होत्या. उगीच चाळलं. एका वहीत चुकून आलेलं एक पत्र सापडलं. सुंदर हस्ताक्षरात एका विद्यार्थिनीने आपल्या प्राध्यापिका मॅडमना लिहिलेलं पत्र होतं. काय अप्रतिम भावना व्यक्त केल्या होत्या. माझ्या डोळ्यांतून नकळत अश्रूच आले. ते पत्र काढून घेतलं. सुप्रसिद्ध साहित्यिक, लेखिका, कवयित्री आणि अहमदपूरच्या महात्मा गांधी महाविद्यालयातील इंग्रजीच्या प्राध्यापिका ललिता गादगे यांना त्यांच्या विद्यार्थिनीने लिहिलेलं ते पत्र. वाचून प्राध्यापिका ललिता गादगेताईंना भेटावं अशी इच्छा झाली. घराचा पत्ता शोधून काढला. एका संध्याकाळी गेलो सरळ त्यांच्या घरी. प्रा. ललितातार्इ गादगे, त्यांचे पती उद्धवराव हल्लाळे साहेब, मुलगी माधवी आणि मुलगा विद्याधर. छान चौकोनी कुटुंब. मूळचे कर्नाटकाच्या सीमाभागातील हे मराठी कुटुंब.





नोकरीच्या निमित्ताने इथे स्थायिक झालेले. ललितातार्इंना पाहिल्या-पाहिल्याच मला माझ्या मोठ्या बहिणीची आठवण झाली. साधारणतः एकाच वयाच्या दोघी. स्वभाव तसाच. बोलणं, वागणं सारखंच. पहिल्या भेटीतच नातं निर्माण झालं. अधिकारवाणीने बोलणारी मोठी तार्इच मला इथे भेटली होती. त्यांच्या घरातीलच सदस्य कधी होऊन गेलो, हे कळलंच नाही. नियमित जाणंयेणं. कार्यालयीन कामाव्यतिरिक्त लेखन,वाचन असे छंद जोपासायचा खुराक मला तिथून मिळायचा. त्यांच्या दोन्ही मुलांच्या लग्नाचे नियोजन माझ्याकडेच.

माझा एक जिवश्चकंठश्च मित्र झालेला म्हणजे महेंद्र. मित्र कसा असावा याचं उत्तम उदाहरण. माझ्यासारखाच व्यवसायाच्या निमित्ताने अहमदपूरला आलेला. आमची छान मैत्री झाली. त्याचे कुटुंब, नातेवाईकांतील सर्वजण मला महेंद्रचा खास मित्र म्हणूनच ओळखायचे आणि माझे कुटुंबही. किंबहुना दोन्ही कुटुंबांनी आम्हा दोघांना त्यांच्याच कुटुंबातील एक

सदस्य म्हणून स्वीकारलेलं. महेंद्रने अहमदपूरला घर बांधायचं ठरवलं. स्वतःसाठी एक छोटंसं घर आणि सोबत कुणीतरी राहावं म्हणून किरायाने देण्यासाठी तीन खोल्यांचे दोन स्वयंपूर्ण गाळे. आधीच ठरल्याप्रमाणे एका गाळ्यात मी आणि एका गाळ्यात बँकेचे अधिकारी एस्.एम्. जोशी राहायला आले. समोरच्या शेजाऱ्यानेही हुबेहूब असेच बांधकाम केले आणि तिथेही दोघेजण राहायला आले. दोन्ही इमारतीमधील संरक्षक भिंत न बांधता जागा तशीच खुली ठेवली होती. त्यामुळे एक चाळच तयार झाली. सर्व सण उत्सव सर्वांनी मिळूनच साजरे करायचं. दिवाळी, दसरा, होळी असो की रमजान, बकरी ईद. सर्वांचा सहभाग असायचाच. विशेष बाब म्हणजे सर्वच्या सर्वजण वेगवेगळया जातिधर्माचे होते. आमचा सणांचा उत्सव पाहून इतर शेजारीपाजारीही त्यात सामील व्हायला लागले. 'वसुधैव कुटुंबकम्'च्या धर्तीवर एक कुटुंबच तयार झालं. माझा मुलगा दानिशचा जन्म तिथलाच. लहानाचा मोठा त्याच वातावरणात झाला. तिथल्या सर्वांच्या घरात राहूनच त्याची वाढ झाली. जोशी साहेबांच्या मुलांचा आणि आईसाहेबांचा तो विशेष लाडका. दिवसभर त्यांच्याच घरी राहायचा. बदली होऊन गेल्यावरही जोशी साहेबांच्या आई दानिशला भेटायला वर्षातून एकदातरी आवर्जून यायच्याच. औरंगाबदवरून एकदा खास त्याला भेटायला आल्या होत्या. सोबत त्याला सोन्याची अंगठी आणली. आम्ही म्हणालो, ''हे कशासाठी? याची काय गरज होती.'' त्या म्हणाल्या, ''सर्व नातवांना दिलंय. यालाच द्यायचं राहिलं होतं.'' किती हे प्रेम आणि किती हे जीव लावणं! आभार मानावे तेवढे कमीच या विश्वाच्या निर्मात्याचे. अहमदपूर शहराने मला भरभरून प्रेम दिलं. इथं नेमणूक मिळणं ही माझ्यासाठी ईश्वराने दिलेली एक अनमोल भेट होती.

आपले स्वतःचे एक छोटेसे घर असावे असे वाटायला लागले. आम्हां कर्मचाऱ्यांना कार्यालयाकडून घरासाठी सवलतीच्या दरात कर्ज मिळायचे. त्याचा आधार घेऊन घर बांधून घ्यावं, असं ठरवलं. नोकरी लागण्यापूर्वी बिकट आर्थिक परिस्थितीमुळे आमच्याकडे घर नव्हतंच. शेतातल्या झोपडीतच राहायचं. आता परिस्थिती चांगली झाली होती. घराचं स्वप्न पूर्ण करायची संधी होती. आयुष्यातील मोठं स्वप्न, 'स्वतःचं घर असावं.' गृहकर्जाचे नियम मात्र कडक. नगररचनाकाराने एनए,लेआऊट मंजूर केलेल्या जागेवरच घर बांधावं. अशी रचना अहमदपूरला त्यावेळी कमीच. फार शोधलं तर तीनचार कॉलनी सापडल्या. पण रिकामी जागा नाहीच. असेलच तर कुणी विकायला तयार नाही.

एक दिवस आनंदाचा उजाडला. माझे एक जवळचे मित्र विवेक येरमे यांनी निरोप दिला. ''एका चांगल्या कॉलनीत एक भूखंड विकायला निघालाय. त्यांच्या जवळच्याच नातेवाईकाचा आहे. या आपण घेऊन टाकू.'' किती आनंद झाला होता त्यादिवशी! स्वप्नपूर्तीच्या दिशेने एक पाऊल. विवेक येरमे एक प्रगतिशील शेतकरी. उत्तम व्यावसायिक. माझे खास मित्र. अहमदपूर येथून जवळच असलेल्या शिरूर ताजबंद येथे राहायचे. महिन्यातून एकदातरी त्यांच्याकडे भोकरीवरण खायला जायचंच. माझ्या जवळपास सर्व आनंदाच्या क्षणाचे साक्षीदार. आज माझ्या जीवनातील सर्वोत्तम आनंदाच्या क्षणाचे साक्षीदारही तेच होणार होते. किंबहुना त्यांच्याचमुळे ही संधी चालून आलेली. आनंदाच्या भरातच विवेक येरमे यांच्याकडे गेलो. माझे इतर दोन मित्र तिथे आधीच येऊन बसलेले मधुकर कोतलापुरे आणि नामदेव विराळे. मी पोहोचल्याबरोबर त्यांनी एवढंच सांगितलं. ''आम्ही सर्व बघून ठेवलंय. उत्तम जागा आहे. कॉलनी छान आहे. लोकं छान आहेत. काहीच बघायची गरज नाही. आपल्या सर्व अटीत बसतंय. किंमत थोडीफार जास्त वाटतीय. पण एवढं सगळं जमत असल्यावर काही जास्त विचार करू नये. आपल्याला राहायला घर बांधायचंय. थोडे पैसे जास्त देऊनच प्लॉटमालकाचे आशीर्वाद घ्यावे.'' मी फक्त ऐकलं आणि काही बोलण्यापूर्वीच त्यांनी प्लॉटधारकाला फोन करून बोलावून घेतलं. माझी ओळख करून दिली. विवेक येरमे आणि मधुकर कोतलापुरे यांनीच बोलणी केली. आम्हाला प्लॉट पटलाय. साहेबाला स्वतःला राहायला घर बांधायचं आहे. योग्य ती एकच किंमत सांगावी आणि आपले आशीर्वाद, शुभेच्छांसह प्लॉट द्यावा.'' त्या सद्‌गृहस्थांनी थोडावेळ विचार करून एक किंमत सांगितली. मला थोडी जास्त वाटत होती. पण काहीही न बोलता विवेक येरमे उठले आणि म्हणाले, ''आणा साखर.'' आपल्याच खिशातून अनामत रक्कम काढली. डोक्यावर रुमाल घेतला. देऊन टाकला बयाणा. पाचच मिनटात सौदा पूर्ण. चहापान करून बैठक संपली.

विवेक येरमे आणि मित्रांचे आभार मानले. आनंदाच्या भरात सरळ घरी आलो. काय चांगला दिवस उगवला होता माझ्यासाठी. व्यवहाराची रक्कम जमा करण्याच्या तयारीला लागलो. पगाराच्या तुलनेत रक्कम फार मोठी होती. थोडीफार रक्कम जमा होती. आम्हा कर्मचाऱ्यांच्या पतसंस्थेतून कर्ज घेतलं. पूर्ण रकमेची जोड झाली. एक दिवस ठरवला खरेदीखतासाठी. विवेक येरमे आणि नामदेव विराळे यांनीच सर्व औपचारिकता पूर्ण करून घेतली. मी फक्त सह्या करायला गेलो होतो. दोन दिवसानंतर खरेदीखताची प्रत आली. हातात पडल्याबरोबर डोळ्यात नकळत अश्रू. आयुष्यात पहिल्यांदा स्वकमाईतून घरासाठी जागा घेतली होती. व्यवहार पूर्ण होईपर्यंत कोणालाच काही सांगितलं नव्हतं. एवढ्या झटक्यात व्यवहार झाला की कोणाला काही सांगायची, विचारायची फारशी संधीही मिळाली नव्हती. सत्तूभाऊ, ललिताताई आणि मित्र महेंद्र यांना, प्लॉट घेणार आहे एवढंच माहिती होतं. आधी सत्तूभाऊंना घरी जाऊन आनंदाची बातमी सांगितली. मिठाई दिली. काय आनंद झाला होता त्यांना. अभिनंदन केलं. मस्त कडक चहा पिऊन आनंद साजरा केला. घराच्या शेजारी एकाबाजूला महेंद्र आणि दुसऱ्या

बाजूला जोशीसाहेब. माझे कुटुंबीय आणि सर्व शेजाऱ्यांचं मिळून तयार झालेलं आमचं एक कुटुंब. मिठाई देऊन सर्वांना आनंदात सहभागी करून घेतलं.

दुसऱ्या दिवशी ललितातार्इंकडे गेलो. त्यांना आनंदाची बातमी सांगितली. हल्लाळेसाहेब, ललितातार्इ सगळेच खूश. ललितातार्इ म्हणाल्या, ''माझी इच्छा होती, त्या कॉलनीत आपलं घर असावं. महाविद्यालयाला जवळ, जायला यायला सोपं. सुंदर कॉलनी. नेहमी जाता-येता दिसते. छान निर्णय झाला.''

हल्लाळेसाहेब म्हणाले, ''चला! प्लॉट पाहून येऊ?''

मी, ललितातार्इ आणि हल्लाळेसाहेब लगेच गेलो पाहायला. चाळीस फुटाच्या रस्त्यावर प्लॉट. दोन बाजूला रस्ता, एका बाजूला ग्रीनलँड आणि एका बाजूला प्राध्यापक शेजारी. उच्चशिक्षित उच्चभ्रू वस्ती. सर्वांना आवडला. परत निघालो होतो. इतक्यात समोरच्या घरातून कुणीतरी आवाज दिला. रस्त्याच्या पलीकडच्या घरातील बाई होत्या. त्यांनी विचारलं, 'प्लॉट घेतला का?' आम्ही 'हो' म्हटलं. त्यासरशी त्यांनी आम्हा सर्वांना चहाला बोलावलं. शेजारी राहायला यायचं होतं. जास्त आढेवेढे न घेता आनंदात गेलो. साध्याभोळ्या मनमोकळ्या बाई. आम्ही खुशीत गप्पा मारत. चांगले शेजारी दिसताहेत म्हणून त्याही खुश. त्यांनी ललितातार्इंना नाव विचारलं. तार्इंनी त्याचं नाव सांगितलं. आपली ओळख करून दिली. बार्इंच्या चेहऱ्यावर एक वेगळे समाधान दिसले. हल्लाळेसाहेबांची ओळख करून दिली. मला आपला छोटा भाऊ म्हणून संबोधले. माझी पूर्ण ओळख करून देणार इतक्यात बार्इंचं लक्ष ठेवलेल्या चहाकडे गेलं. आत गेल्या आणि चहा घेऊन आल्या. माझी ओळख अर्धवटच राहीलेली.

चहा घेत असताना बाई म्हणाल्या, 'चांगलं झालं बाई, तुम्ही हा प्लॉट घेतला! नाहीतर अवघड होणार होतं! परवा एक मुसलमानांचा माणूस आला होता हा प्लॉट घ्यायला !

आम्ही सर्वांनी मिळून हाकलून लावलं!' बाई मोकळेपणाने बोलून गेल्या.

मी अवाकच. स्तब्ध! चहाचा घोट कितीतरी वेळ तोंडातच राहिला. गिळताच येईना. अचानक चहाची चवच बदलली. छान गोड चहा एक झटक्यात कडू झाला होता. उरलेला अर्धा कप चहा पिणे अवघड झाले. ललितातार्इ आणि हल्लाळेसाहेब निशब्द. शांत. काहीवेळ त्या बाई एकट्याच बोलत राहिल्या. त्या पुढे काय बोलत होत्या मला काही कळलं नाही. किंबहुना ऐकूच आलं नाही. आमची अस्वस्थ शांतता बहुतेक बार्इंच्याही लक्षात आली असावी. थोड्या शांत झाल्या. मीही सावरलं स्वतःला. कसाबसा कप रिकामा केला आणि झटक्यात बाहेर पडलो. काहीच न बोलता सरळ ललितातार्इंच्या घरी आलो. कितीतरी वेळ स्तब्ध शांत बसून. राहवलं नाही. आसवांना वाट मोकळी करून दिली. मन मोकळं केलं. ललितातार्इ आणि हल्लाळेसाहेबही अस्वस्थच. मला शांत करतांना ललितातार्इही रडल्या. मोठ्या बहिणीची भूमिका पार पाडली, पण त्याही आतून अस्वस्थच. संवेदनशील मनाच्या एक लेखिका शेवटी. आणि एक आई.

चारपाच दिवस असेच गेले. पुढं काय करायचं हा प्रश्न होता. एके दिवशी ललितातार्इंचा फोन आला. गेलो भेटायला, पण त्या काही बोलण्याच्या मनस्थितीतच नव्हत्याच. अस्वस्थता स्पष्ट दिसत होती त्यांच्या चेहऱ्यावर.

मी म्हणालो, ''काय झालं ललितातार्इ?''

त्या अस्वस्थ होऊन म्हणाल्या, ''त्या गल्लीतली काही माणसं आली होती भेटायला!''

मी आश्चर्यचकित होऊन म्हणलो, ''काय झालं पुढे?''

म्हणत होती, ''काहीही करा पण आमच्या गल्लीत मुसलमानाचं घर नको! माणूस तसा चांगला दिसतो! पण कितीही चांगला असला तरी शेवटी मुसलमानच की? आमची सर्वांची इच्छा आहे की आपण मध्यस्थी करून त्यांना इथे येऊ देऊ नका!''

पुढे त्यांना बोलवेना. ऐकून मी थक्क झालो. पट्कन तिथून निघून आलो. पुढच्या दोन दिवसात माझ्या आणखी काही जवळच्या मित्रांकडे ही मंडळी गेली होती. तेच ते पुराण घेऊन. मित्रांनी एवढंच सांगितलं, 'ती लोकं आली होती.' काय बोलणं झालं सांगितलं नाही. मीही विचारलं नाही. कारण ते काय बोलले असतील हे मला माहिती होतंच आणि ठरवून टाकलं तिथे घर बांधायचे नाही.

त्यावेळी बऱ्याच माझ्या मित्रांनी मला आधार दिला. ज्यांना ज्यांना हे कळलं ते धावतच आले. मला जबरदस्त समर्थन दिलं. ठामपणे माझ्यासोबत उभे राहिले. भक्कम साथ दिली. माझा उत्साह कमी होऊ दिला नाही. प्रत्येक पावलावर माझ्यासोबत राहण्याचा विश्वास दिला. विशेष म्हणजे हे सर्वजण मुस्लिमेतरच. वेगवेगळया जाती आणि धर्मांचे.

काही जण म्हणाले, ''चला आपण बांधकाम सुरु करू! पाहू या कोण अडवतं ते! तुम्ही स्वतःला एकटे समजू नका! आम्ही सर्वजण तुमच्यासोबत आहोत!''

काही जण तर म्हणाले, ''आणा ते पेपर इकडे! तुम्ही फक्त कर्जाच्या पेपरवर सह्या करा! आम्ही पूर्ण करून घेऊ बांधकाम! घर पूर्ण झाल्यावर तुम्ही सरळ राहायलाच यायचं!''

काय आधार मिळाला होता मला. एकाच शहरातील वेगवेगळी माणसं. त्यांचं माझ्या समर्थनार्थ उभं राहणं योग्य होतं, पण मलाच वाटलं घराच्या गल्लीत पाऊल टाकलं की आनंद व्हावा. जिथं आनंद नाही तिथे घर कशाला. दिवसभर आपण बाहेर असतो. घरातील मंडळी अशा वातावरणात राहू शकतील काय? अशा विचारांच्या लोकांसोबत राहावं तरी कशासाठी? असे अनेक प्रश्न पडलेले. या सर्व मित्रांचे मनापासून आभार मानले. धन्यवाद दिले. त्यांचे हे समर्थन माझ्यासाठी एक मोठा

आधार होता. प्रोत्साहन होते. घर तिथे बांधायचे नाही या निर्णयावर मात्र ठाम राहिलो.

माझे स्नेही आणि जवळचे मित्र भारत चामे म्हणाले, ''चला माझ्या शेजारी घर बांधा. जागा रिकामी आहे. आम्हाला कोणालाच तुमची अडचण नाही.'' काही जण तर म्हणाले, ''कशाला दुसरं घर बांधता? भलं मोठं आमचं घर रिकामंच आहे. या. आपण सोबत मिळून राहू.'' किती विश्वास होता हा! किती प्रेम, स्नेह, आपुलकी! मी भारावून गेलो. ईश्वराचे मनःपूर्वक आभार मानले. मनातून वाटलं, जे होतं ते आपल्या भल्यासाठीच होतं. इतकी चांगली माणसं इथं सोडून मी उगीचच दुसरीकडे भरकटत चाललो होतो.

शेजारी घराजवळच राहणाऱ्या केंद्रेकाकू एकेदिवशी सकाळीच घरी आल्या आणि म्हणाल्या, ''आमच्या घरासमोरचा आमच्या दिराचा प्लॉट निघालाय विकायला! आम्हीच घेऊन दिलेला आहे त्यांना फार पूर्वी! माझे फार कष्ट लागलेत तिथे! कुणीतरी येऊन राहण्यापेक्षा तुम्ही घ्यावा अशी इच्छा आहे! आपण सारे मिळून राहूया आनंदात!''

काय आनंद झाला होता, आपण सारे मिळून राहू या वाक्याने. नवीन उत्साह दिला. नवीन ऊर्जा दिली.

मी म्हणालो, ''पण मी मुसलमान, चालेल का तिथल्या सर्वांना?''

त्या म्हणाल्या, ''मला माहिती आहे, तुमचा पूर्वानुभव वाईट आहे! पण सगळीच माणसं तशी नसतात हो! मी कशासाठी आले तुमच्याकडे! असं असतं तर आलेच असते का?

ही अशी एक गल्ली आहे, तिथे सर्व जातिधर्माचे लोकं आनंदाने राहताहेत! कोणत्याही जातीचे नाव घ्या त्या जातीची किमान दोन घरे या गल्लीत सापडतीलच! मुस्लीम समाजाचंही एक घर आहे तिथे आधीचं! तुमचं दुसरं घर! आम्हाला आनंद वाटेल!''

त्यांचं अधिकारवाणीने येणं आणि आपुलकीने बोलणं, मला मोठा आधार देऊन गेलं. ललिताताई, महेंद्र, जोशीसाहेब आणि सत्तूभाऊंशी चर्चा केली. निर्णय घेतला की हे घ्यायला हरकत नाही. जमा सर्व रक्कम त्या प्लॉटमधे संपून गेली होती. सत्तूभाऊ, ललिताताई आणि जोशीसाहेबांनी मदतीचा हात पुढे केला. सत्तूभाऊंच्याच घरी बैठक झाली. मधुकर करले आणि दत्तामहाराज केंद्रे यांच्या मध्यस्थीने सौदा पूर्ण झाला. मधुकर करले यांनीच आपल्या खिशातून पाच हजार रुपये बयाणा दिला. खरेदीखत सुद्धा परस्पर लिहून तयार झाले. मी फक्त सह्या करायला गेलो. आधीचा उत्साह मात्र आता नव्हता, पण पुन्हा नव्याने स्वप्नपूर्तीच्या दिशेने चालू लागलो.

**– मोहिब कादरी**

भ्रमणध्वनी – ९४२२४६८७६०, ९४०३४६८७६०

mohibquadrirediffmail.com

quadrimohibgmail.com

*With Best Complimenst From*

# M/s. Ransing Traders

**Building Material Suppliers & Building Contractor**

**RNAJIT RANSING**

Proprietor

At & Post Pinguli - Gudhipur, B.K.G. Road,
Tal - Kudal, Dist. - Sindhudrug-416528
Mobile : 9604548151 / 7774900447

भगवान इंगळे

# बालबच्चेवाला भोलेनाथ पाल

**मी तुम्हाला वर्गात सांगायचो, सर, हे प्लेटो, ॲरिस्टॉटल, हेगेल पार डोक्यावरून जातात. लाईफमधली स्टोरी सांगा, स्टोरी. तुम्ही दाहक, ज्वलंत अनुभव सांगायचा. त्यातली प्रेरणा घेऊन इथवर आलो.**

**त्या** दिवशी बेल होताच तृतीय वर्ष बी.ए.च्या वर्गात गेलो. पहातो तर एकच विद्यार्थी उपस्थित. त्याला विचारलं,

''अरे, भोलेनाथ पाल. अपने सतरा स्टुडंट्स और तू अकेला कैसा? कहाँ गये बाकी सारे? जा बच्चोको ढूंढकर लेके आ.''

तो वर्गातून दप्तर घेऊन मुलांना पहायला गेला. अगोदरचा अर्थशास्त्राचा तास, लांबल्यानं मुलं थोडी उशिरानं वर्गात आली. वेळापत्रकाप्रमाणं माझी सलग दोन लेक्चर्स झाली. 'भोलेनाथ गैरहजर' मनात विस्मरलो. दांड्या मारणारा भोलेनाथ चांगला वर्गात बसला होता. उगा बाहेर पाठवलं.

दुसऱ्या दिवशी सोमवारी मागच्या बेंचवर अपराध्याप्रमाणं बसलेल्या भोलेनाथला हटकलं.

''क्यूँ, कल याने सॅटर्डेको सब स्टुडंट्स दस मिनिट के बाद क्लास मे आये. दोनो लेक्चर हुए। आप अकेले नहीं थे। कहाँ गये थे भोलेनाथजी?''

तो नम्रपणे उभा राहून सांगू लागला,

''सर, शनिचरको आपने मुझे लडके ढूँढके लानेको कहा था.''

''हां यस. कहा था। तो?''

''तब मेरी ट्युब जली. मै कंप्लीट भूल गया था कि बिवीको अर्जंट अस्पताल जाना था। उसने मुझे इस्कूलसे बच्चे को घर लानेको कहा था। उस दिन सॅटर्डे. स्कूल का हाफडे.''

''तो फिर क्या हुआ भाई?''

''हुआ कुछ नही। फिर मैं सिदा इस्कूल गया। मेरे अपने बच्चे को घर लाया। आपने सही वक्तपर याद दिलाया। नहीं तो मुसीबत हो जाती। थँक्यू, इंगलेसरजी.''

''शाब्बास पठ्ठे!''

तसा वर्ग खो-खो हसू लागला.

''तुम्हारे कितने बच्चे है?''

''अब सिर्फ दो है। पहला थर्ड सँन्डर्ड मे और दुसरा फर्स्ट मे पढता है।''

''कान पकडके सुन भोलेनाथ, जादा नही. दो काफी हैं। लोकसंख्या नियंत्रण के उपाय, सोल्यूशन के प्रश्न का सिर्फ पेपरमें उत्तर लिखना पर्याप्त नहीं। उसका रिअल लाईफमे आचरण करो.''



ती मजुरी करायचा. लोकांच्या घरादारांना रंग द्यायचा. काम नसल्यावर कॉलेजला यायचा.

टीवायच्या वार्षिक परीक्षेनंतर त्या मुलांचा संपर्क तुटायचा. भोलेनाथ पाल विस्मृतीत गेला. अनेक वर्षांचा गॅप पडला. त्या दिवशी त्यानं हादरवलं मला.

कर्नाटकातील बेळगावच्या दिडशे वर्षे जुन्या लोकमान्य टिळक ग्रंथालयानं बॅरिस्टर नाथ पै व्याख्यान मालेत, माझा आत्मकथनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. मी, आशा, मुलगा निखिलेश आम्ही तिघं रेल्वेच्या स्लिपर क्लासने रात्रीचा प्रवास करीत कार्यक्रमासाठी निघालो होतो. उजाडताना गाडीत आलेला २१ जाने. २००४ चा 'तरुण भारत-बेळगाव' घेतला. त्यात माझ्या फोटोसह कार्यक्रमाची बातमी आली होती. तेवढ्यात बोगीतल्या प्रवाशांची तिकिटं तपासत तिकिट कलेक्टर आमच्या जवळ आला. त्यानं मी दिलेल्या तिकिटाबरोबर मला निरखून, खाली वाकून, माझ्या पायांना स्पर्श केला. तसा मी एकदम चपापलो बाबा! तो म्हणाला,

''हॅलो, इंगळे सर! इकडं कुणीकडे?''

झोपेचा अंमल काही प्रमाणात डोळ्यावर होता. पेपर बाजूला करून विचारलं,

''टी.सी. साहेब तुम्ही मला ओळखता? तुम्हाला कुठंतरी बघितल्यासारखं वाटतंय.''

''नाही ओळखलं? काय सर! अहो, भवन्सचा बालबच्चेवाला ना मी.''

तो खरोखरचे कान पकडून, मुंडी हलवून खाली बसला.

भोलेनाथ पालचं संसार पहात, मिळेल ती मोलमजुरी करीत शिक्षण चाललं होतं. त्या दिवशी मी त्याचं नाव 'बालबच्चेवाले भोलेनाथ' ठेवलं. तो न लाजता-सवरता हसायचा. हसत-खेळत पॉलिटिक्सचे लेक्चर चालायचे. उत्तर प्रदेशातील अलहाबादवरून शिकायला आणलेला भोलेनाथ वडिलांबरोबर काळबादेवीच्या चाळीत राहत होता. त्याचे वडील भाऊच्या धक्क्यावरून, समुद्राची मासळी होलसेल भावानं विकत घेऊन, दक्षिण मुंबईतल्या चाळी, झोपड्यांत फिरून विकायचे. त्यात चार पैसे सुटायचे. बापाची तळमळ की पोरानं शिकून मोठं व्हावं. नोकरीपाण्याला लागावं. त्यासाठी ते अधूनमधून कॉलेजवर येऊन, अर्थशास्त्र, राज्यशास्त्राच्या आम्हा प्राध्यापकांना भेटून हात जोडून, भोलेनाथवर लक्ष देण्याची विनंती करायचे.

भोलेनाथ सावळ्या वर्णाचा सरळ नाकी, उंचापुरा होता. स्वभाव सालस, गरीब होता. बुद्धिमत्तेनं चांगला परंतु परिस्थितीनं गांजलेला. एफवाय, एसवायच्या यथावकाश एटीकेटी पार करीत, चारपाच वर्षांनी टीवाय बीएला आला होता. मिळेल

मी विजेचा चारशे होल्टेजचा झटका बसल्यागत ताडक्न उभा राहिलो. त्यांच्याकडं पहात शेकहॅन्ड करीत म्हणलो,

''काय भोलेनाथ पाल? इथं चेकरच्या गणवेशात?''

''यस सर. मी आपला आज्ञाधारक विद्यार्थी.''

''व्हेरी गुड! व्हेरी गुड!! या आमच्या मिसेस आशा मॅडम.''

त्याने वाकून मॅडमच्या पायाला हात लावला. आशाने उठून हात जोडले. ''हा मुलगा निखिलेश. नववीला असतो. मोठी मुलगी नीलम तुमच्या युपीतल्या रायबरेलीला पायलटचं प्रशिक्षण घेते. बसा सर्वजण खाली.''

आम्ही ऐसपैस बसलो. तो माझ्या पायाशी चवड्यांवर बसला. मी रागावलो.

''अरे भोलेनाथ, यार आसं काय करतोस? तू आता मोठा अधिकारी झालास. आम्हा शिक्षकांचं नाव रोशन केलंस. उठ. असा जवळ बैस.''

त्याला माझ्या शेजारी बसवलं. उंचापुरा सडसडीत भोलेनाथ पांढऱ्या शुभ्र पॅन्टीवरील वुलनच्या काळ्या कुळकुळीत कोट, टायमध्ये रुबाबदार दिसत होता. डब्यातले सहप्रवासी

आमच्याकडं कुतूहलानं पाहू लागले.

''भोलेनाथ, माझा आज सायंकाळी साडेपाच वाजता मराठा बँकेच्या सभागृहात बेळगावला कार्यक्रम आहे. ही तरुण भारतमध्ये बातमी आली आहे. घे वाच.''

ती न्यूज वाचून म्हणला,

''अभिनंदन सर. ड्युटीवर नसतो तर मी कार्यक्रम सोडला नसता. मी तुम्हाला वर्गात सांगायचो, सर, हे प्लेटो, ॲरिस्टॉटल, हेगेल पार डोक्यावरून जातात. लाईफमधली स्टोरी सांगा, स्टोरी. तुम्ही दाहक, ज्वलंत अनुभव सांगायचा. त्यातली प्रेरणा घेऊन इथवर आलो. नव्या आवृत्तीची प्रत मिळेल का?''

''हो. आहे ना. निखिलेश, पुस्तकाची प्रत काढ बॅगम धली.''

त्याचं नाव टाकून सही करून आत्मकथन दिलं. त्यानं कोटातल्या खिशातल्या शंभराच्या तीन नोटा पुढं केल्या.

''काय भोलेनाथ? अरे, भेट दिलंय. पैसे काय देतोस.''

''तसं नाही सर. पुस्तक स्वत: विकत घेऊन वाचल्यावर त्याचं खरं महत्त्व कळतं, पण हा साक्षात भगवानाने दिलेला प्रसाद!''

भोलेनाथ उभा राहिला. भक्तिभावानं कपाळाला 'पुस्तक' लावून थँक्यू-थँक्यू करीत खाली बसला.

''खूप सुधारणा केलीस भाषेची. मराठीवर सॉलिड कमांड मिळवलीस. सफाईदार बोलतोस. युपीचा आहेस. कुणाला खरं वाटणार नाही. परभाषिक असून इतकी तरक्की!''

''मी उत्तर प्रदेशातल्या इलाहाबादला जन्मलो पण शिक्षण आणि करिअर मुंबईतलं. शिवबांच्या महाराष्ट्रात रहायचं म्हनल्यावर मराठी लिहिता, वाचता, बोलता उत्कृष्ट प्रकारे आली पाहिजे. ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी! जिथं खावे मिठ तिथे रहावे नीट! बरोबर की नाही?''

''एकदम खरं. पुस्तक वाचून प्रतिक्रिया कळव. त्यात माझा पत्ता, फोननंबर दिला आहे. काय?''

''हो. आठ दिवसात अभिप्राय देतो. मला प्रवासात चिक्कार वेळ मिळतो. सर, तुमच्या बऱ्याच गोष्टी मला माहीत आहेत.''

''हो ना. बरं पन मला सांग भोलेनाथ, टी.वाय. परीक्षा दिल्यावर कुठं गायब झाला होतास? आज योगायोगानं भेटलास.''

''नाही सर. मी राज्यशास्त्र-अर्थशास्त्र घेऊन अठ्ठावन्न टक्क्यानं ग्रॅज्युएट झालो. अर्थशास्त्रानं दगा दिल्यामुळं फर्स्ट क्लास हुकला. स्टाफ रूममध्ये मिठाई घेऊन आलो. प्रा. दुभाष मॅडम, प्रा. राजे सर, प्रा. मेधा गुप्ते मॅडमना पेढे वाटले. त्यावेळी तुम्ही रजेवर होता. कार्यक्रमाच्या दौऱ्यावर असणार. मी पुढं पारंपरिक शिक्षण न घेता सरळ नोकरीच्या पाठी लागलो. अंथरूण पाहून पाय पसरलं. स्पर्धा परीक्षेत जीव ओतला. रक्ताचं पाणी केल्यानं झटक्यात रेल्वेत लागलो.''

''फार चांगलं केलंस. योग्य निर्णय घेतलास. किती वर्षे झाले सर्विसला?''

''झाले ना कंम्प्लीट सहा वर्ष. हे सातवं चालू आहे.''

''भोलेनाथ, तू ड्युटीवर आहेस. आमच्या जवळ असं निवांत बसून चालतं का?''

''नाही चालणार. पण सर, मी रात्रभर चोख ड्युटी बजावली. चेकिंगची ही शेवटची बोगी. तुम्ही रामप्रहरी अचानक देवाप्रमाणं दर्शन दिल्यावर सोडणार का तुम्हाला?''

''नको सोडू. किती राहिलं बेळगाव?''

त्याने खिडकीतून बाहेर पाहून अंदाज घेतला.

''आणखी दोनेक घंटे रखडपट्टी होणार.''

''हो का? मग सांग मला भोलेनाथ तू इथवर कसा पोचलास?''

''हो. सांगतो ना. अथपासून इथपर्यंत डिटेल अे टु झेड सांगतो.''

तेवढ्यात जर्मनच्या बादलीत बाटल्या भरलेला विक्रेता कोल्ड्रिंक, थम्सअप, थंडा पाणी ओरडत डब्यात शिरला. भोलेनाथला पाहताक्षणी त्याचा आवाज खाली गेला. टीसी साहेबांनी त्याला हुकूम सोडला,

''ए पोऱ्या, तीन थम्सअप दे. निखिल, मॅडम, घ्या सर थंडा!''

मी, निखिलने बाटल्या उचलल्या. आशानं नकार दिला. ''थँक्स भोलेनाथ. नको मला. माझा घसा खराब आहे. घ्या तुम्ही. मी चहा घेईन.''

त्यानं मला पैसे देऊ दिले नाहीत. स्वत: थम्सअपवाल्याचे मिटवून, त्याला दोन स्पेशल अद्रक घातलेल्या चहाचं फर्मान दिलं. म्हणला,

''आता ऐका सर,''

''हं सांग. आशा, निखिल नीट काळजीपूर्वक ऐका.''

टीसी साहेब आपली जीवन कहाणी सांगू लागले.

''आम्ही आईबापाला तीन अपत्य. पहिल्या दोन बहिणींच्या पाठीवर मी झालो. मी पहिली दुसरीत असताना आईचा देहान्त झाला.''

''इतक्या कमी वयात कशानं दगावल्या भोलेनाथ?''

''पिताजी सांगायचे, की खेतीत काम करताना दस नंबरी विषारी नागानं पायाला दंश केला. दवाखान्यात नेण्याऐवजी चार कोसावरल्या मांत्रिकाच्या आश्रमात पळवलं. तिथं आमच्या आईनं राम म्हटलं. आमचं एकत्र कुटुंबातलं मोठं खटलं. एकादोघानं मरमर राबायचं. बाकीच्यांनी एकमेकांशी स्पर्धा करीत गमवायचं. आळशीपणा, शिक्षणाचा, नियोजनाचा अभाव. सारासार विचार नाही. असल्यावर दिवाळी नसल्यावर शिमगा. कुटुंबांचा भराभरा विस्तार झाला. त्याप्रमाणात उत्पन्न नसल्यानं उपासमारीची पाळी आली. माझे पिताजी थोरले. त्यांच्यावर जबाबदारी. भाऊ भावजया बिनडोक. भांडणं झगड्यांचा सुकाळ. पिताजीचं कुनी ऐकत नसंत. वैतागून सगेवाल्यासंगं मुंबईला आले.''

''तुझ्या वडिलांना किती बहिणी भावंडं?''

''त्यांना चार बहिणी तीन लहान भाऊ एकूण आठ बहिणी भावंडं. माझ्या दोन आत्या दिल्या घरी नांदतात आणि दोघीचं वाटोळं झालं. त्या रांडव होऊन आमच्यात राहतात. त्यांच्या स्टोऱ्या सांगायला वेळ नाही पुरायचा.''

''भोलेनाथ, तुमची आई दगावल्यावर वडिलांनी दुसरं लग्न केलं असेल ना.''

''सर, नाही नाही. आमची परवड होऊ नये म्हणून पिताजीनं दुसरी शादी नाही केली. ते मुंबईला सुरुवातीला चणे-फुटाणे, केळी, भाजीपाला विकून पैसे गावी पाठवायचे. आम्हाला एकत्र कुटुंबात खायला प्यायला नीट मिळत नसायचं. हाल होत असत. भेदभाव चालायचा. एकवेळ पुरुषाचं बरं होतं. स्त्रियांचं हाल कुत्रं खात नसं. आईबाप नसल्यानं आम्ही तिघं वनवाशाप्रमाणे रहायचो. सर, तुम्हाला खोटं सांगत नाही. एकवेळ सावत्र आईनं छळलं नसतं इतका त्रास एकत्र कुटुंबातल्यांनी दिला.''

''अरे, एकत्र कुटुंबात तर सुख दुःख वाटून घेतली जातात. एक तीळ सातजण खातात. दुर्बलांचं, अनाथांचं इतर सभासद संरक्षण करतात. का आशा?''

आशा म्हणाली, ''हो. पण एकत्र कुटुंबात फायद्यापेक्षा दोष अमाप आहेत. मी स्वत: त्याचा अनुभव घेतला आहे. त्यात संस्कार महत्त्वाचे असतात.''

''सर, जॉइंट फॅमिलीत दुबळ्यांचं संरक्षण होतं, हे मला मान्य आहे परंतु आमचं गावाकडलं कुटुंब त्याला अपवाद होतं. माझी थोरली दिदी गंगा बापाला चिठ्ठी पाठवून सगळं कळवी. पिताजीला तिचं खरं वाटत नसं. ते भाऊबंदापुढं आमचा कचरा करीत. काही ऐकून घेत नसत. ''

''मग रे?''

''पुढं अती झालं. पिताजी गावी जत्रेला आले होते. आडपदरानं चौकशी केली. बगा सर, पोट सरकल्यावर वास यायचा राहतो का?''

''हो. येतो ना! पादल्यावर वास यायचा राहत नाही.''

आमच्या छळवणुकीच्या एकेक कथा ऐकून पिताजी शेजाऱ्याच्यात ढसाढसा रडले. आमच्या वाट्याला आलेली हिश्श्याची दोन बिघा जमीन विकली नि आम्हाला घेऊन इकडं बम्बईला आले.

''मुंबईला आल्यावर कसा जम बसवला?'' मी विचारलं.

''पिताजीनं काळबादेवीला चाळीत बारा बाय पंधराची रूम पागडीवर घेतली. आम्हा तिघांना महानगरपालिकेच्या शाळेत घातलं. सर, मी तिसरीपासून मुन्सिपालिटीच्या मराठी शाळेत शिकलो.''

''तिकडं युपीत हिंदी. इथं मराठी. त्रास झाला असेल नाही?''

''झाला सुरुवातीला थोडाबहुत त्रास, पण इथल्या वातावरणाशी रूळलोत आम्ही. मुंबईत राहिल्यानं पिताजी व्यवहारी बनले होते. त्यांनी उरलेले शेतीतले थोडे बहुत पैसे लेकींसाठी कॅनरा बँकेत ठेवले. माझ्या बहिणी गंगा, जमुना बारावी झाल्यावर त्यांना एकीला लखनौला, दुसरीला अलाहाबादला संस्कारक्षम मॉडर्न घरी दिलं. त्या नांदायला गेल्यावर आम्हा बापलेकाचं मलाच डाळ रोटीचं बघावं लागायचं. शेती विकल्यानं घरचं अन्नधान्य मिळणं बंद झालं. इथं महागाई. कॅनरा बँक खाली झाली. त्यात पिताजींना हृदयाचा आजार जडला. दवाखान्याचा खर्च वाढला.

निखिल, तू कोणत्या माध्यमात शिकतोस?''

भोलेनाथांचं जीवन ऐकण्यात मग्न झालेल्या निखिलनं उत्तर दिलं.

''मी होय? मी साहेब, इंग्रजी माध्यमात शिकतोय.''

''मी तुझ्याएवढा असल्यापासून बिल्डिंगीतल्या ब्लॉकना तीस रुपये हजेरीवर रंग लावायचो. भिंती घासून-घासून कोवळे हात दुखायचे. छिलटे, सालपाटं निघायची. जवा काम नसेल तेवा शाळा. दहावी झाल्या-झाल्या पिताजीनं शादीचं लोढनं गळ्यात बांधलं.''

मुलानं विचारलं, ''बापरे! इतक्या लवकर?''

''हो. निखिल, आमच्या युपीकडं लहानपणी लग्नं होतात.''

आशा म्हणाली, ''किती परसेंटनं मॅट्रिक सुटलात?''

''मॅडम, तीन मार्कशीटं. आमचा ३५% रिझल्ट.''

''मग कुठं मिळाला प्रवेश?''

''सर, मॅडम, मोठ्या नामांकित कॉलेजचं साधं नाव घ्यायची आपली लायकी नव्हती.''

''मग ओ?''

''गरीब दीन दुबळ्यांचे तारणहार गिरगाव चौपाटीच्या भवन्सनं प्रवेश दिला. रडतकढत बारावी परीक्षा दिली. मला पिताजीनं दोनेक महिने काडीच्या कामाला हात लावू दिला नाही. त्यांनी घर चालवलं. मला मुलगा झाला. त्याच दिवशी बारावी पासचा रिझल्ट आला.''

''आ रे वाऽ भोलेनाथ, दुधात साखर पडली ना!''

''मग दोनी आनंदाच्या घटनांचे एकत्र पेढे लोकांना वाटले.''

''छान केलंस.''

''ऐकाना; पिताजींना आजारानं पहिल्यासारखं काम झेपत नसे.''

''तरी तुझे बाबा बसत-उठत, धापा टाकीत स्टाफरूमला यायचे. प्राध्यापकांना हात जोडायचे. पाया पडायचे. त्यांची तुझ्यासाठी खूप तगमग चालायची.''

''सर, काय करणार? कुटुंबासाठी मजुरीला पहिली पसंती द्यावी लागायची. मुंबई विद्यापीठानं ७५% हजेरी सक्तीची केल्यानं घरी लव लेटर्स यायचे. मी रंगकामात सेंट परसेंट हजर कॉलेजला

मात्र डिफॉल्टर. माझ्या पाचवीला एटीकेटी पुजलेली. काही तुसडे, नकचढे प्राध्यापक धारेवर धरायचे. त्यांच्याकडं शंका समाधानासाठी गेल्यास ''वर्गात रेग्युलर रहायला नको. सारख्या दांड्या मारतोस. माझ्या विषयाला काळिमा फासणार आहेस.'' असं जिभेला हाड नसल्याप्रमाणं वाटेल ते ताड्ताड् खोचक बोलून कचरा करायचे कारण त्यांना भोलेनाथ डोक्यानं कमी, असा-तसा वाटायचा. त्यात माझ्या अंगावर साधे गबाळ्यागत जीर्ण कपडे. हातापायावर एशियन पेंटच्या रंगाचे डाग.''

निखिल म्हणला,

''मग आमचे पप्पाही चिडत असतील ना तुमच्यावर?''

''नाही निखिल. अजिबात नाही. यांचा मुळचा विनोदी स्वभाव. जरी रागावले तरी त्यात आपलेपणाचा, प्रेमाचा ओलावा असायचा. माझी जबाबदारी वाढली होती. कामाजी मजुरी? का कॉलेजची हजेरी? कुटुंबाला उपाशी ठेवणं? का लेक्चरला बसणं? या जीवनाच्या द्वंद्वातून मार्ग काढणं आलं. सर, तुम्ही लेक्चरला ऐकवलेल्या तुमच्या संघर्षानं प्रेरणा मिळायची. त्यातून मिळालेल्या ऊर्जेनं खडतर वाट तुडवत राहिलो.''

मी विचारलं,

''ए बालबच्चेवाल्या, आता किती मुलं बाळं तुला?''

''एक मुलगा. एक मुलगी बस. त्या दिवशी तुम्ही वर्गात बजावलं होतं ना.''

''कशाविषयी? मला आठवत नाही.''

''तुम्ही म्हणाला होता. विद्यार्थ्यांनो पॉप्युलेशन कंट्रोलचे उपाय नुसते मार्कासाठी घोकायचे नाहीत. तुम्हा सूज्ञ तरुणांनी ते प्रत्यक्ष जीवनात अनुसरायचे आहेत. लोकसंख्या विस्फोट देशाच्या प्रगतीत धोंड आहे धोंड! हे पक्कं ध्यानात ठेवा.'' तास सुटल्यावर घरी आल्या आल्या दप्तर दिवळीत ठेवून, मिसेसला तंबी दिली, 'बग पार्वती, भगवानच्या कृपेनं दोन झाले. बस झाले. आता तिसऱ्यांदा पाळणा हालवायचा नाही. भगवान सरांची सक्त वॉर्निंग, ताकीद आहे आपल्याला.' तिला पटवलं. कुटुंब नियोजनाचं ऑपरेशन केलं.''

''वाऽऽ सुरेख! ऐकून समाधान झालं. पण तुझ्या बायकोला मराठी येतं?''

''अहो सर, आहे मराठी चौथी परंतु धडाधड मराठी पुस्तकं वाचून काढते.''

''भोलेनाथ, तुझं सगळं ऐकावं ते नवल. बरं सांग कितवीत आहेत मुलं?''

''मोठा मुलगा महिंदर दहावीला गेलाय. धाकटी समता आठवीला आहे. मुलं मोठी होऊ लागली तसं माझं वय वाढत गेलं. मी मुलांचा बाप कॉलेजला शिकत होतो. तुम्ही माझं टोपणनाव बालबच्चेवाला भोलेनाथ ठेवलं.''

आशा म्हणाली, ''ते काही विचारू नका. एखाद्याला समर्पक शीर्षक देण्यात यांचा हात कुणी धरणार नाही.''

''हो मॅडम, राज्यशास्त्राच्या दोन मुलांची पक्की दोस्ती. कुठंही दोघं. त्यांचे विषयपण सारखे. एका बेंचवर बसणारे. यांनी कोणती नावं ठेवावीत त्यांची?''

''कोणती ठेवली?''

''अहो, सरांनी शोलेतली विजय-बिरूची जोडी त्यांना चिकटवली. मराठी विषयाच्या प्राध्यापिका रश्मी शेटे मधल्या सुटीत राजगिऱ्याचे लाडू वाटायच्या. त्यांचं नाव राजगिरे मॅडम ठेवलं होतं. एका एसवाय बीएससीच्या हुशार, डेरिंगबाज ललनेचं नाव चक्क 'बहन मायावतीजी' ठेवलं होतं. मायावतीजी म्हणल्यावर ती खळखळून हासायची. उकळी फुटायची. कुणाला खटकत नसे. राग येण्याचं सोडा उलट मजा वाटायची. विनोदानं हास्यनिर्मिती व्हायची.

मी म्हणालो, ''मागे तिचा घरी फोन आला. मला आठवेना. मग ती ललना म्हन्ली, ''अहो सर ओळखू येईना होय? आहो मी तुमची मायावतीजी बोलते.'' बहन मायावती जी आरे तू का? मग तिला मार्गदर्शन केलं.''

''आमच्या प्रारब्धात कॉलेज कमी. मजुरी करून आलो की मुलांना वाचन-लेखनाला बसवायचो. त्यांच्याबरोबर स्वत:चा अभ्यास करायचो. अनेकदा परीक्षा देत, अपमान पचवीत पदवीधर झालो. या नोकरीला लागलो. मुंबई सेंट्रलला फ्लॅट घेतलाय.''

भोलेनाथनं आपलं कार्ड कोटातून काढून दिलं. ''माझ्या घरी जरूर जरूर या सर.'' विनवलं. आशाचा स्पेशल चहा पिऊन झाल्यावर त्याला म्हनलो,

''भोलेनाथ, ध्यानात ठेव. तुझ्या या गणवेशामागं पिताजींचे अपार परिश्रम आहेत. त्यांना उतारवयात नीट सांभाळ. आशीर्वाद घे.''

''सर मुलाकरिता जन्मदात्यानं झिजणं साहजिक आहे. पण मानसिक, सामाजिक, आर्थिक दृष्ट्या कोलमडलेल्यांना उभं करण्यात भवन्स कॉलेजच्या तुम्हासारख्या गुरुजनांचे कमी कष्ट नाहीत. आहो, दात शाबूत असताना चणे मिळणं दुर्मीळ! मुबलक चणे आहेत तर तोंडाचं बोळकं. या खेळात नियती तरबेज. तिनं मला नोकरी लागण्याच्या सहा महिने अगोदर सिव्हीअर अटॅकने पिताजींना नेलं.''

''ओऽ आय एम सॉरी! तुझी वादळातली नाव किनाऱ्याला लागल्याचे पाहून, त्यांच्या डोळ्याचं पारणं फिटलं असतं. आनंदानं त्यांचा ऊर भरून आला असता. आपण पराधीन आहोत. निसर्गाच्या आधीन आहोत.''

विषयांतर करायला विचारलं.

''भोलेनाथ, एक विचारू तुला?''

''हो सर, विचारा ना.''

''तू बिन तिकिटवाल्यांना कसं वागवतोस? कसं ट्रीट करतोस? पगाराव्यतिरिक्त चार पैसे मिळतात ना वरचे?''

''नाही नाही. अजिबात नाही. अहो सर, या भ्रष्टाचाराने

पुरी वाट लावली इंडियाची. सडून गेली व्यवस्था सारी. बघा, अंगावर रेमंड, विमल, वुलनचे उंची कपडे. शर्टाला सोन्याचांदीची बटने. पायात किमती जोडे. गळाभरून दागदागिने आणि रेल्वे डब्यातून प्रवास मात्र फुकट. जणू यांच्या बापजाद्याची भारतीय रेल्वे. या व्हाईट कॉलर चोरांना दयामाया नाही. मी त्यांना थेट तुरुंगात डांबायला कचरत नाही, पण कॉलेज शिकायला चाललेल्या, स्पर्धा परीक्षेला निघालेल्या, नोकरीच्या मुलाखतीला जाणाऱ्या सुशिक्षित बेकारात मी स्वत:ला पहातो. मजबुरीनं विदाऊट तिकिटांचे असल्यास त्यांना सोडून देतो. कित्येकदा वक्तावर माझ्या पगारातले राखून ठेवलेले पाचपन्नास त्यांच्या खिशात बळं कोंबतो. दुष्काळ पडल्यानं, नैसर्गिक आपत्ती आल्यानं पोट भरायला शहराकडं निघालेले तांडे, दिनदुबळी कुटुंबं मला पाहून, रेल्वे डब्यातल्या टॉयलेटमध्ये दडतात. लाचारीनं पाया पडतात. हात जोडतात. अश्रू ढाळतात. त्यांची कीव आल्यानं रूल रेग्युलेशन बाजूला सारतो. सर, कायदा माणसाच्या कल्याणासाठी, भल्यासाठी का त्याला छळण्यासाठी?''

''तुझं एकदम बरोबर आहे. तू पॉलिटिक्सचा माझा विद्यार्थी शोभतोस बघ.''

''मला सर, रेल्वेडब्यात येणाऱ्या आंधळ्या पांगळ्या, दोन्ही हात नसणाऱ्या, धडधाकट असणाऱ्या असह्य भिकाऱ्यांचे, वंचितांचे वेगवेगळे अनुभव येतात. भारताचं दाहक चित्र, बहुरंगी वास्तव स्पष्ट होतं. त्यांचं जगणं म्हणजे जणू प्रत्येकाचं एकेकाचं स्वतंत्र आत्मकथन! ते लिहावं म्हणतो.''

''अवश्य. तुझे लहानपणापासूनचे सगळे अनुभव लिहून काढ. तुला हवी ती मदत करीन. हिंदी मातृभाषिक, एक उत्तर भारतीय तरुण आपले जीवनानुभव मराठीत लिहू लागल्यास वाङ्मय समृद्ध होईल. ते राष्ट्रीय स्तरावर जाईल. कर सुरुवात. तुला आमच्या हार्दिक शुभेच्छा!''

रेल्वेगाडी बेळगाव स्टेशनला लागली. तिकिट कलेक्टर साहेब भोलेनाथ पाल आम्हाला भक्तिभावे हात जोडून, राष्ट्र उभारणीच्या कामगिरीवर घाईगडबडीत अदृश्य झाला.

(भगवान इंगळे यांच्या 'उभारणी' या आगामी आत्मकथनातून)

**– भगवान इंगळे**
भ्रमणध्वनी : ९९२०४५९७४७


**॥ग्रंथाली॥**



## कॅलिडोस्कोप
**शशिकांत जहागीरदार**
पन्नासेक ललित लेख आणि कथांमधील निवडक लिखाणाचा हा संग्रह.
**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**



## रंग माझा वेगळा
**अनुराधा गोरे**
वीरनारी, वीरमाता यांच्या संघर्षमयी आयुष्याचं कर्नल मनोजकुमार यांनी केलेलं वर्णन
**मूल्य ३५० रु. सवलतीत २५० रु.**




## मस्त झकास अफाट
**डॉ. सुमन नवलकर**
डॉ. सुमन नवलकर यांच्या या विनोदी कथा आपला वेगळा ठसा उमटवतात.
**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**



## संगणकक्षेत्रातील काही प्रज्वलित दिवे
**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**
पुस्तकातील चरित्र वाचकांना प्रेरणादायी
**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**



## निवडणूकविषयक कायदे आणि प्रक्रिया
**दिलीप शिंदे,** भा.प्र.से.
निवडणूकविषयक कायदे आणि प्रक्रिया कशी असते यावर माहिती देणारे पुस्तक.
**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**



## माणूसजत्रा
**आदित्य अ. जाधव**
भावपूर्ण शब्दांचा आनंद तरंग देणारा काव्यसंग्रह.
**मूल्य १२० रु. सवलतीत ८० रु.**

# Well Wisher

# M/s. Manmohan Enterprises

**Govt. Regd. Contractor**

**Since 1990**

**Kishore Keswani**

**Dhiraj Keswani**

**9545098000**

साहित्य अकादेमी प्रादेशिक कार्यालय, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर (पूर्व), मुंबई - 400014
फोन : 022 - 24135744, 24147650 E-mail : rs.rom@sahitya-akademi.gov.in

## मराठी प्रकाशने

**कथा**

श्री.दा.पानवलकर यांची कथा रु.100/-
संपा. म.द.हातकणंगलेकर

दि.बा.मोकाशी यांची कथा रु.100/-
संपा. अरविंद गोखले

मराठी लोककथा रु. 60/-
संपा. मधुकर वाकोडे

कोंकणी कथा मराठीत रु.250/-
संपा. किरण बुडकुले

अजुनी वाढताती झाडे रु.150/-
रस्किन बॉन्ड
अनु. शैला सायनाकर

लाल शिखरे रु.125/-
अख्तर मुहिउद्दीन
अनु. उमा भगत

**कविता**

स्वातंत्र्योत्तर मराठी कविता (1945-60) रु.250/-
संपा. वसंत पाटणकर

मराठी लघुकथा संग्रह रु.360/-
संपा. अच्युत केशव भागवत

पु.शि.रेगे यांची निवडक कविता रु.175/-
संपा. प्रकाश देशपांडे

स्वातंत्र्योत्तर मराठी कविता (1961-80) रु.200/-
संपा. तु.शं.कुळकर्णी

संत जनाबाई आणि अन्य मध्ययुगीन संत कवयित्री यांची कविता रु.175/-
संपा. विलास खोले

शालोम रु.275/-
(ज्यू लिखित आणि संबंधित मराठी कविता)
संपा. नारायण गाडे

मराठी दलित कविता रु.125/-
संपा. बी. रंगराव

**लेखसंग्रह**

आगरकर लेखसंग्रह रु.175/-
संपा. ग.प्र.प्रधान

लोकमान्य टिळक लेखसंग्रह रु.260/-
संपा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

राजवाडे लेखसंग्रह रु.350/-
संपा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

**एकांकिका**

निवडक मराठी एकांकिका रु.160/-
संपा. रत्नाकर मतकरी, सुधा जोशी

मराठी दलित एकांकिका रु.110/-
संपा. दत्ता भगत

**ललित लेखन आणि अन्य**

ॲनिमल फार्म रु. 75/-
जॉर्ज ऑरवेल

निवडक सदानंद रेगे रु.130/-
संपा. वसंत आबाजी डहाके

निवडक विठ्ठल रामजी शिंदे रु.170/-
संपा. गो.मा.पवार

बाबरी स्मृतिचित्रे रु.100/-
अनु. ह.रा.दिवेकर

मौखिकता आणि लोकसाहित्य रु.200/-
संपा. मधुकर वाकोडे, सुभाष कोहळे

एकनाथ वाङ्मयदर्शन रु.110/-
संपा. भगवंत देशमुख

नामदेव गाथा रु. 90/-
संपा. हरी श्रीधर शेणोलीकर

तुकाराम गाथा (निवडक अभंग) रु.220/-
संपा. भालचंद्र नेमाडे

एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य - खंड - 1 रु.110/-
संपा. भास्कर लक्ष्मण भोळे

एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य - खंड - 2 रु.120/-
संपा. भास्कर लक्ष्मण भोळे

विसाव्या शतकातील मराठी गद्य - खंड - 1 रु.190/-
संपा. भास्कर लक्ष्मण भोळे

विसाव्या शतकातील मराठी गद्य - खंड - 2 रु.160/-
संपा. भास्कर लक्ष्मण भोळे

श्री तुकारामाच्या अभंगाची चर्चा खंड - 1 रु.150/-
वासुदेव बळवंत पटवर्धन, गणेश हरी केळकर

श्री तुकारामाच्या अभंगाची चर्चा खंड - 2 रु.150/-
वासुदेव बळवंत पटवर्धन, गणेश हरी केळकर

मराठी लोकगीते : संस्कृती अभ्यासाची साधने रु.190/-
संपा. रमेश नारायण वरखेडे

साने गुरुजी पुनर्मूल्यांकन रु.130/-
संपा. भालचंद्र नेमाडे

भारतीय दलित साहित्य रु.230/-
संपा. शरणकुमार लिंबाळे

स्त्रियांचे मराठीतील निबंधलेखन रु.270/-
संपा. विद्युत भागवत

बाळ गांधी, गांधी बापू झाले, त्यांची गोष्ट रु.150/-
बोबुकेर मामद कुरैशी
अनु. अ.ग.वर्दी

भाषावार प्रांतरचना आणि मराठी : काही परिप्रेक्ष्य रु.150/-
संपा. रमेश नारायण वरखेडे

डॉ.बाबासाहेब आंबेडकर : जीवन व कार्य रु.300/-
संकलन. लक्ष्मण गायकवाड

मराठी गझल : अर्धशतकाचा प्रवास रु.175/-
संपा. राम पंडित

मराठी संत कवयित्रींचा इतिहास रु.175/-
संपा. विद्यासागर पाटंगणकर

प्राचीन भारतीय लिपिमाला रु.500/-
रायबहादुर पंडित गौरीशंकर हीराचंद ओझा
अनु. लक्ष्मीनारायण भारतीय

प्रेमचंद : लेखणीचा शिलेदार रु.375/-
अमृत राय
अनु. कमलाकर जेऊरकर

निवडक पु.भा.भावे रु.200/-
संपा. वसंत व-हाडपांडे
राम शेवाळकर


निवडक मराठी आत्मकथा रु.175/-
संपा. राम शेवाळकर

गालिब काळ आणि कर्तृत्व रु.140/-
पवन कुमार वर्मा
अनु. निशिकांत ठकार

विनोबा सारस्वत रु.225/-
संपा. राम शेवाळकर


निवडक चिं.त्र्यं.खानोलकर रु.225/-
संपा. रवींद्र घवी

**Subscribe to : समकालीन भारतीय साहित्य Single Copy : Rs.50, 1 Year : Rs. 250, 3 Years : Rs. 650**
***Indian Literature* Single Copy : Rs.100, 1 Year : Rs.500, 3 Years : Rs.1300**
साहित्य अकादेमी 'बुक क्लब' चे सदस्य व्हा, आजीवन सर्व भाषांतील पुस्तकांवर 25 % सवलत मिळवा.
वेबसाइट : **http : // www.sahitya - akademi.gov.in**


पाच वर्षांत इंकिंग इनोव्हेशन्सतर्फे रसिक वाचकांसाठी ६०हून अधिक दर्जेदार पुस्तके प्रकाशित
'रूची'च्या वाचकांसाठी खास सवलतीच्या दरात...
एक दिवा तेजाचा, एक दिवा उत्कर्षाचा,
एक दिवा ज्ञानाचा, एक दिवा वाचनाचा!
Will
नरेंद्र मोदी
Deer Tales
चरैवेति! चरैवेति!!
TIGER
इंकिंग इनोव्हेशन्सने सामाजिक बांधिलकी जपून आरोग्यविषयक, वैद्यकीय, राजकीय, वाईल्ड लाईफ तसेच मनोरंजक विषयांचे विविध पैलू उलगडणारी अनेक पुस्तके वाचकांसाठी प्रकाशित केली आहेत.
१०% सवलतीच्या दरात घरपोच
INKING INNOVATIONS
इंकिंग इनोव्हेशन्स
India Printing House, Ground Floor, 42, G. D. Ambekar Marg, Wadala, Mumbai – 400 031
Tel: +91 22 2418 6233 • Email : sarika.inking@gmail.com • Website : www.inkinginnovations.com

ग्रंथाली

# लेखक : वसंत वसंत लिमये



## साद हिमालयाची


सिक्कीम ते लडाख, आठ आठवडे, १२,००० किमी थरारक आल्हाददायक प्रवास, पुणे ते पुणे १६,००० किमी अशी मजल मारणारा प्रवास, उत्तुंग हिमशिखरं, स्वच्छ सूर्यप्रकाश, गच्च धुकं, गारा, पाऊस असं लहरी हवामान, सुचीपर्ण वृक्ष, देवदार अशी घनदाट जंगलं, सुजलाम सुफलाम करणाऱ्या, अल्लडपणे खळाळत वाहणाऱ्या अनेक नद्या, रमणीय जलाशय, अवघड, खतरनाक रस्ते, दोन्ही बाजूस अंगावर येणारं उग्रभीषण सौंदर्य, डोंगराच्या वळचणीला बसलेल्या चिमुकल्या गावातील कष्टमय पण आनंदी जीवन जगणारी निर्व्याज, हसतमुख, प्रेमळ माणसं असा कलायडोस्कोप.

मूल्य : ३५० रुपये
सवलतीत : २५० रुपये

## कॅम्प फायर

गेल्या चव्वेचाळीस वर्षांत सह्याद्री, हिमालय, युरोप आणि इतर अनेक ठिकाणी केलेल्या स्वच्छंद भटकंतीतील थरारक, रमणीय आणि चटका लावून जाणारे अनुभव...

मूल्य : ३०० रुपये
सवलतीत : १८० रुपये






## लॉक ग्रिफिन

कादंबरीची जातकुळी रॉबर्ट लडलमच्या भव्य, अभ्यासपूर्ण आंतरराष्ट्रीय कथानकाप्रमाणे आहे. ह्या कादंबरीवर सहजपणे एका ब्लॉकबस्टर चित्रपटाची निर्मिती होऊ शकते.
– सचिन खेडेकर, अभिनेता

मूल्य : ५०० रुपये सवलतीत ३००

## तिन्ही पुस्तकांचा संच ६०० रुपयांत

# विविध स्पर्धा, प्रकाशने आणि रंजक कार्यक्रमांनी साजरा होतोय
# 'ग्रंथाली'चा ४५ वा वाचकदिन
## कीर्ती महाविद्यालयाच्या सहकार्याने




गेली ४३ वर्षे २५ डिसेंबर रोजी वाचकदिन साजरा करीत असते. मागील तीन वर्षे ग्रंथाली, वाचककेंद्र कार्यकम आणि स्पर्धांची आखणी करीत असून एका दिवसाऐवजी सलग दोन दिवस कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन करीत आहे.

या वर्षी ग्रंथाली आपला ४५वा वाचकदिन २४ व २५ डिसेंबर रोजी, कीर्ती महाविद्यालय, दादर येथे साजरा करणार आहे.

मागील तीन वर्षांत 'ग्रंथाली'ने अनुक्रमे सिनेमा, कविता, मग नाटक अशा साहित्यप्रकाराला केंद्रस्थानी ठेवून त्याप्रमाणे वाचकदिनाची आखणी केली होती. या वर्षी कथा या साहित्यप्रकाराला केंद्रस्थानी ठेवून 'ग्रंथाली'ने वाचकदिनाची आखणी केली आहे. यात पुढील स्पर्धा व कार्यक्रमांची मेजवानी रसिकांना मिळणार आहे.

- अभिवाचनस्पर्धा,
- कथापरीक्षण लेखनस्पर्धा,
- कथालेखनस्पर्धा (परदेशी व बृहन्महाराष्ट्रीय लेखकांसाठी)
- कथाचित्रस्पर्धा
- लघुपटनिर्मितीस्पर्धा
- अरविंद गोखले यांच्या कथांवर एकांकिका आविष्कार

नामवंत कलाकारांचे कथाअभिवाचन आणि अभिनेते संजय मोने यांचा 'कानाला खडा' असे विविधांगी प्रयोग करण्यात येणार आहेत. या वर्षीच्या वाचकदिनाची रूपरेषा पुढीलप्रमाणे असेल.

**१. अभिवाचनस्पर्धा :** शालेय (फक्त ठाणे शहर मर्यादित), महाविद्यालयीन व मुक्त अशा तीन गटांत घेण्यात येणाऱ्या या स्पर्धेसाठी कोणतेही शुल्क नसून या स्पर्धांची अधिक माहिती खालीलप्रमाणे.

**अ. शालेय गट अभिवाचनस्पर्धा**

ही स्पर्धा फक्त ठाणे शहरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी मर्यादित असून त्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या ठाणे शहरातील विद्यालयांनी चांगदेव काळे यांच्याशी ९८६९२०७४०३ या क्रमांकावर दिनांक २० नोव्हेंबरपर्यंत संपर्क साधावा.

**ब. महाविद्यालयीन विद्यार्थिगट अभिवाचनस्पर्धा**

- ही स्पर्धा कनिष्ठ महाविद्यालयीन युवक ते पीएच.डी. करणारे विद्यार्थी यांच्यासाठी असून या स्पर्धेची प्राथमिक फेरी मुंबई (क.ज. सोमैया महाविद्यालय, १६ डिसेंबर), त्यांच्या सहकार्याने ठाणे (अर्थात क) आणि पालघर (सोनोपंत दांडेकर महाविद्यालय) अशा तीन केंद्रांवर घेण्यात येईल. प्राथमिक फेरी डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात होईल.
- प्रत्येक केंद्रातील तीन विजेते स्पर्धक अंतिम फेरीत प्रवेश करतील. अंतिम फेरी दिनांक २५ डिसेंबर रोजी कीर्ती महाविद्यायालय दादर येथे दुपारी १ वाजता होईल.
- अंतिम फेरीत प्रवेश करणाऱ्या संघातील स्पर्धकांना प्रमाणपत्राने सन्मानित करण्यात येणार असून तीन अंतिम विजयी संघांना ग्रंथभेट देऊन गौरवण्यात येईल.
- स्पर्धेच्या नियमानुसार एका अभिवाचकसंघात किमान १ आणि कमाल ५ वाचक असतील आणि प्रत्येक संघास कमाल १० मिनिटांचा अवधी देण्यात येईल. या अवधीत अभिवाचकसंघाने फक्त कथेचे अभिवाचन करावयाचे आहे.
- अभिवाचनासाठी निवडलेली कथा मूळ मराठी भाषेतील वा मराठी भाषेत अनुवाद झालेली असावी. मराठी बोली भाषेतील कथेचे अभिवाचन करता येईल.
- अभिवाचनात संगीताचा वापर करण्यास अनुमती आहे.
- स्वलिखित कथेचे अभिवाचन स्पर्धक करू शकतील.
- एका स्पर्धकास व संघास एकाच केंद्रातून सहभागी होता येईल तसेच स्पर्धकांना त्यांचे महाविद्यालयाचे ओळखपत्र दाखवणे अनिवार्य असेल.

- या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी मुंबई जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी डॉ. लतिका भानुशाली यांच्याशी ९३२२२०७८७८ या क्रमांकावर, तर ठाणे जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी किरण येले यांच्याशी ९८६९२६०७८० या क्रमांकावर तर पालघर जिल्ह्यातील तसेच वसई-विरार-भाईंदर परिसरातील विद्यार्थ्यांनी प्राध्यापक विवेक कुडू यांच्याशी ९०४९५३०४१५ या क्रमांकावर दिनांक २९ नोव्हेंबरपर्यंत संपर्क साधावा. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्यतत्त्वावर फक्त पहिल्या ५० संघांनाच प्रवेश दिला जाईल.

**क. मुक्त गट**

- ही स्पर्धा नि:शुल्क असून सर्व वयोगटांतील स्पर्धक यात भाग घेऊ शकतात.
- एका अभिवाचकसंघात किमान २ व कमाल ५ वाचक असू शकतील आणि अभिवाचनासाठी प्रत्येक संघास १० मिनिटांचा अवधी देण्यात येईल. या अवधीत अभिवाचकसंघाने फक्त कथेचे अभिवाचन करावयाचे आहे.



- अभिवाचनात संगीताचा वापर करण्यास अनुमती आहे.
- स्वलिखित कथेचे अभिवाचन स्पर्धक करू शकतील.
- या गटात सहभागी होण्यासाठी चंद्रकांत मेहेंदळे यांच्याशी ९३२३४८७०२५ या क्रमांकावर किंवा श्रीनिवास नार्वेकर यांच्याशी ९३२२४९२६३० या क्रमांकावर दिनांक २९ नोव्हेंबरपर्यंत संपर्क साधावा.
- प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्त्वावर फक्त पहिल्या ५० संघांनाच प्रवेश दिला जाईल.
- या स्पर्धेची प्राथमिक फेरी दिनांक २२ डिसेंबर रोजी रविवारी सकाळी ९ वाजता कीर्ती महाविद्यालय, दादर सुरू होईल आणि अंतिम फेरी दिनांक २५ डिसेंबर रोजी बुधवारी, कीर्ती महाविद्यालय, दादर येथेच दुपारी १ वाजता घेण्यात येईल.
- अंतिम फेरीतील सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल आणि तीन विजयी संघांना ग्रंथभेट देऊन गौरवण्यात येईल.

**२. कथापरीक्षण लेखनस्पर्धा**

- या वर्षी ग्रंथाली वाचकांसाठी कथापरीक्षण आणि रसास्वाद लेखनस्पर्धा आयोजित करत असून त्या अंतर्गत 'मला आवडलेली कथा' या विषयावर किमान ८०० शब्दांचा लेख granthali.kathaparikshan@gmail.com या इमेल पत्त्यावर दिनांक २२ नोव्हेंबर पर्यंत पाठवण्याचे आवाहन करत आहे.
- या स्पर्धेतील तीन विजेत्या स्पर्धकांचे परीक्षण ग्रंथालीच्या 'शब्द रुची' अंकातून प्रकाशित करण्यात येणार असून विजेत्यांना प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट देऊन सन्मानित केले जाईल.
- कथेचे परीक्षण फक्त इमेलव्दारेच स्वीकारण्यात येणार असून टपाल वा अन्य माध्यमांद्वारे आलेले साहित्य विचारात घेतले जाणार नाही, तसेच कथेची फोटोकॉपीही म ेलने पाठवल्यास ती स्वीकारली जाणार नाही. मेलने फक्त टाईप केलेले वा स्कॅन केलेले साहित्य स्वीकारले जाईल. इच्छुकांनी अधिक माहितीसाठी मोहन शिरसाठ यांच्याशी ९४२१०५१८२३ या क्रमांकावर संपर्क साधावा.

**३. परदेशी व बृहन्महाराष्ट्रीय लेखकांसाठी कथालेखनस्पर्धा**

- मराठी रसिक वाचक आणि लेखक बृहन्महाराष्ट्र आणि परदेशातही वास्तव्य करून आहे आणि त्यांना मराठी साहित्य सामावून घेण्यात असमर्थ ठरले किंवा त्यांच्या मनात आपणास मराठी मुलखाने आपल्यात सामावून घेतले नाही ही खंत आहे, हे जाणवल्याने प्रथमच 'ग्रंथाली'ने परदेशस्थ मराठी लेखक वाचकांसाठी तसेच बृहन्महाराष्ट्रातील मराठी लेखक वाचकांसाठी कथालेखनस्पर्धा आयोजित केली आहे.





वाचकदिन २०१८

- सर्व वयोगटांच्या स्पर्धकांना या स्पर्धेत भाग घेता येईल.
- या स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांनी किमान ५०० ते कमाल १००० (पाचशे ते एक हजार) शब्दांपर्यंत कथा लिहून दिनांक १५ नोव्हेंबरपर्यंत granthalivachakdin@gmail.com या इमेल पत्त्यावर पाठवण्याचे आवाहन ग्रंथालीने केले आहे.
- कथा फक्त इमेलद्वारेच स्वीकारण्यात येणार असून टपाल वा अन्य माध्यमाद्वारे आलेले साहित्य विचारात घेतले जाणार नाही, तसेच कथेची फोटोकॉपीही मेलने पाठवल्यास ती स्वीकारली जाणार नाही. मेलने फक्त टाईप केलेले वा स्कॅन केलेले साहित्य स्वीकारले जाईल.
- या स्पर्धेतील तीन विजेत्या कथा ग्रंथालीच्या 'शब्द रुची'च्या डिसेंबर २०१९ च्या अंकात प्रकाशित केल्या जातील.
- अधिक माहितीसाठी इच्छुकांनी किरण येले यांच्याशी ९१९८६९२६०७८० या क्रमांकावर संपर्क साधावा.

**४. कथा-चित्रस्पर्धा**

- ग्रंथाली प्रथमच अशी अनोखी स्पर्धा आयोजित करत असून त्याद्वारे साहित्य आणि कला यांच्या संयोगातून जन्मणाऱ्या कलाकृतीचा आस्वाद रसिकांना देण्याचा प्रयत्न करणार आहे.
- ही स्पर्धा दिनांक २२ डिसेंबर रोजी रविवारी कीर्ती महाविद्यालय, दादर येथे होणार असून कोणत्याही वयोगटातील चित्रकार या स्पर्धेत भाग घेऊ शकतात.
- या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना स्पर्धेआधी पंधरा कथा दिल्या जातील आणि त्यातील त्याला आवडलेल्या एका कथेवर त्या कथेचे अभिवाचन चालू असताना चित्र काढायचे आहे.
- कथेचे अभिवाचन संपल्यावरही चित्रकारास चित्र पूर्ण करण्यास अवधी देण्यात येणार असून, वाचनासह एकूण अवधी दीड तासाचा असेल.
- अंतिम फेरी २५ डिसेंबर रोजी कीर्ती महाविद्यालय, दादर येथे संपन्न होईल.
- या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तसेच अधिक माहितीसाठी इच्छुकांनी संपदा जोगळेकर-कुलकर्णी यांच्याशी ९८२०१२४३७३ या क्रमांकावर संपर्क साधावा. या स्पर्धेत सहभागी होण्याची अंतिम तारीख १५ डिसेंबर असेल. स्पर्धे साठी प्रथम नोंदणी करणाऱ्या साठ व्यक्तींना प्रथम येणाऱ्यास प्रथम या तत्त्वावर सहभाग घेता येईल.

अधिक माहितीसाठी सुदेश हिंगलासपूरकर (विश्वस्त), धनश्री धारप (कार्यक्रम संयोजक) यांच्याशी 'ग्रंथाली' कार्यालयात १२ ते ५ या वेळेत संपर्क साधावा.


'भोंडला' नाटक २०१८






## ‘साहित्य ते सिनेमा’

- ग्रंथाली वाचकदिनानिमित्त सादर करत आहे, ‘साहित्य ते सिनेमा’. सुप्रसिद्ध लेखक, अभ्यासक, चित्रपटदिग्दर्शक अशोक राणे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष कथा-लघुपटनिर्मितीची संधी! प्रथम नोंदणी करणाऱ्या साठ जणांसाठी मर्यादित.
- ६ नोव्हेंबर २०१९, कीर्ती महाविद्यालय, प्रभादेवी, दादर येथे सकाळी १० ते ५ कार्यशाळा. (नोंदणी ५ नोव्हेंबरपूर्वी करावी.)
- कार्यशाळेत पाच लघुकथा देण्यात येतील. त्यावर स्पर्धकांनी ५ ते १५ मिनिटाचे लघुपट करणे अपेक्षित आहे.
- १ डिसेंबर २०१९ पर्यंत प्रवेशिका फॉर्म भरून द्यायचा आहे.
- लघुपट सादर करण्याची अंतिम तारीख १५ डिसेंबर २०१९ आहे.
- कार्यशाळेसंदर्भात डॉ. लतिका भानुशाली ९३२२२०७८७८ यांच्याशी granthali.short.films@gmail.com या मेलवर संपर्क साधावा.
- प्रथम पुरस्कार १५ हजार रुपये, द्वितीय १० हजार रुपये, तृतीय पुरस्कार ५ हजार रुपये. हे पुरस्कार दिग्दर्शकाला देण्यात येतील. पटकथा-लेखनाला तीन पुरस्कार असतील. हे पुरस्कार पुस्तकच्या रूपात दिले जातील. २५ डिसेंबर रोजी सायंकाळी विजेत्या लघुकथांची घोषणा केली जाईल आणि ते लघुपट दाखविले जातील.

## अरविंद गोखले एकांकिका आविष्कार

अरविंद गोखले हे मराठी नवकथाकारांपैकी एक नाव. मागील वर्षी नीला उपाध्ये संपादित ‘कथाव्रती अरविंद गोखले’ आणि ‘अनवट अरविंद गोखले’ ही दोन पुस्तके प्रकाशित करत ग्रंथालीने या महान लेखकाला आदरांजली वाहिली. त्यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून या वर्षी ग्रंथालीने मंगळवार, २४ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता कीर्ती महाविद्यालय, दादर येथे अरविंद गोखले यांच्या कथेवर आधारित एकांकिकांचे अविष्कार सादर करण्याचे ठरवले असून हे सादरीकरण अधिक माहितीसाठी दत्ता सावंत करणार आहे. अधिक माहितीसाठी ९८६९२२१६५७ या क्रमांकावर

**‘कथा’** या विषयाला घेऊन होणाऱ्या
येत्या वाचकदिनी

**संजय मोने** साकारणार आहेत

# ‘कानाला खडा’

यात दोन कथाकारांशी
ते संवाद साधतील.
कीर्ती महाविद्यालयाच्या पटांगणावर
सायंकाळी रंगणाऱ्या या कार्यक्रमातून
उलगडेल दोन कथाकारांचा प्रवास...

## संजय मोने लिखित



नव्या पुस्तकाचे

**वाचकदिनी प्रकाशन**





'झी' मराठी'वरील 'कानाला खडा' हा कार्यक्रम लोकप्रिय झाला.
त्यातील निवडक कलावंत आणि काही सामाजिक कार्यकर्ते
यांच्या आयुष्यातील खडतर काळ व त्यांनी केलेलं काम,
त्यांनी मिळवलेलं यश याचा वेध घेणारं पुस्तक
संजय मोने यांच्याच लेखनातून सिद्ध होत आहे.
२५ डिसेंबर रोजी ते प्रकाशित होईल.











## वाचकदिनी प्रसिद्ध होणारी पुस्तके

शिदोरी (नाट्यप्रवासाची)
**कुमार सोवनी**
शिदोरी (चित्रपट कारकिर्दीची)
**कुमार सोवनी**
गंध आणि काटे (कथासंग्रह)
**चांगदेव काळे**
तिसरा डुळा (कथासंग्रह)
**किरण येले**
अम्लान (कवितासंग्रह)
**योजना शिवानंद**
नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१९
**सुधीर थत्ते/नंदिनी थत्ते**
डॉ. प्रतिभा राय यांच्या अनुवादित कथा
**वसुधा सहस्रबुद्धे**

# अरुण साधू स्मृती पाठ्यवृत्ती - दोन वर्षांचा आढावा




'परतवाडा आणि बरंच काही' पुस्तकप्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत

'ग्रंथाली'चे संस्थापक-सदस्य आणि ज्येष्ठ लेखक अरुण साधू हे नावाजलेले पत्रकारदेखील होते. अनेक वर्षे वेगवेगळ्या इंग्रजी दैनिकांत वरिष्ठ पदांवर त्यांनी लक्षणीय काम केले. त्यानंतर अचानक साधू यांचा शिक्षणक्षेत्रात प्रवेश झाला त्याचे श्रेय शास्त्रज्ञ डॉ. वसंतराव गोवारीकर यांना द्यायला हवे. १९९४-९५च्या सुमाराला पुणे विद्यापीठाच्या (आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) कुलगुरूपदी आल्यानंतर गोवारीकर यांनी पत्रकारितेचे शिक्षण अधिक अर्थपूर्ण, व्यवसायाला अनुरूप व त्याच्या गरजा योग्य प्रकारे पूर्ण करणारे व्हावे यासाठी साधू यांना संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागात प्राध्यापक म्हणून निमंत्रित केले.

१९९६ ते २००१ या काळात साधूंनी या विभागात अनेक नवनवे प्रयोग केले. नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल ते पाहिले. त्यामुळे या विभागाचे नाव सर्वत्र अधिक आदराने घेतले जाऊ लागले. रानडे इन्स्टिट्यूट या नावाने ओळखला जाणारा संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग साधूंची लोकप्रियता आणि त्यांचा थोरामोठ्यांशी असलेला संपर्क यामुळे अधिकच प्रसिद्ध झाला.

साधूंच्या निधनानंतर त्यांच्या स्मृत्यर्थ एखादा कायम स्वरूपी उपक्रम करण्याची सर्व शिक्षकांची इच्छा होती. त्याच सुमारास कुमार केतकर, अरुणा साधू यांच्याशी माझा आणि विभागातल्या सहकाऱ्यांचा संपर्क झाला. त्यांच्याही मनात साधूंचे व्यक्तिमत्त्व, लौकिक, अभ्यासविषय यांच्याशी सुसंगत असा उपक्रम करण्याचे विचार चालू होते. साधू जरी विभागात प्राध्यापक असले तरी फक्त विभागासाठी किंवा विभागातील विद्यार्थ्यांसाठी उपक्रम न करता राज्यव्यापी उपक्रम करावा, साधू जसे समकालीन घडामोडींचा धांडोळा घेऊन त्यांविषयी सखोल लेखन करत तसे लेखन करण्यासाठी उत्तेजन देणारा उपक्रम असावा असे आमच्या चर्चेतून पुढे आले. तरुण पत्रकारांना त्यांच्या आवडीच्या विषयांचा पाठपुरावा करण्यासाठी साह्य मिळाले तर त्यातून चांगले अभ्यासू पत्रकार, लेखक तयार होतील या मुद्यावर आमचे एकमत झाले. उपक्रमासाठी लागणारा निधी साधू कुटुंबीय आणि मित्रपरिवार उभा करेल, 'ग्रंथाली' त्या निधीचे आर्थिक नियोजन करेल, व आमचा विभाग उपक्रमाची आखणी आणि अंमलबजावणी करेल असे त्यातून ठरले. दरवर्षी साधू यांच्या स्मृतिदिनाच्या आसपास पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांसाठी नामांकित पत्रकाराचे व्याख्यान आयोजित करावे, व त्या व्याख्यानात पाठ्यवृत्ती विजेत्यांच्या नावांची घोषणा करावी असेही ठरवण्यात आले.

साधूंच्या मृत्यूनंतरच्या त्यांच्या पहिल्या जन्मदिनी त्यांच्याच झिपऱ्या या कादंबरीवर निघालेल्या चित्रपटाच्या पुण्यातील खास खेळाच्या वेळी शरद पवार आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत अरुण साधू पाठ्यवृत्तीची घोषणा करण्यात आली. त्यानंतरच्या दोन महिन्यांत अर्ज मागवण्यात आले. पाठ्यवृत्तीचे पहिलेच वर्ष असूनही राज्यभरातून एकोणीस तरुण पत्रकारांनी त्यांचे संशोधन प्रस्ताव पाठवले होते. त्यांतील विषयांची विविधता थक्क करणारी होती. तरुण पत्रकार दैनंदिन कामाच्या जोडीला आपापल्या आवडीच्या विषयांवर काम करत आहेत हे पाहून आपण पाठ्यवृत्ती सुरू करण्याचा घेतलेला निर्णय योग्यच होता याविषयी आमची खात्री पटली. प्रस्तावांची प्राथमिक छाननी करून, त्यांचे मूल्यमापन करून उमेदवारांच्या मुलाखती घेऊन सुयोग्य उमेदवार निवडणे हे मोठे काम होते. त्यात ज्येष्ठ सनदी अधिकारी चंद्रकांत पाटील आणि राज्यशास्त्राचे प्राध्यापक सुहास पळशीकर यांची मदत झाली.

साधूंच्या पहिल्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने पुण्यात आयोजित




**डॉ. उज्ज्वला बर्वे, कुमार केतकर, सिद्धार्थ भाटिया, धनंजय गांगल आणि सुवर्णा साधू–बॅनर्जी**

करण्यात आलेल्या सिद्धार्थ भाटिया यांच्या अरुण साधू स्मृती व्याख्यानाच्या वेळी – २८ सप्टेंबर २०१८ रोजी – दै. लोकमतच्या नाशिक आवृत्तीत काम करणाऱ्या पत्रकार मेघना ढोके यांची पहिल्या पाठ्यवृत्तीसाठी निवड करण्यात आली.

आसाममधल्या माणसांचा संघर्ष त्यांना अभ्यासायचा होता. राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणीमुळे होरपळून निघणाऱ्या सामान्य माणसांचे आयुष्य कसे आहे, आपण भारतीय आहोत याचा पुरावा द्यावा लागणे त्यांच्यासाठी किती यातनामय आहे, हा संघर्ष खरा कसा आहे–आंतरराष्ट्रीय, प्रादेशिक, धार्मिक की भाषिक हे जाणून घेण्यासाठी मेघना ढोके यांनी आसामच्या विविध भागांना भेटी दिल्या. त्यांच्या वर्षभराच्या अभ्यासातून हाती आलेला तपशील, त्याचे विश्लेषण आणि त्यावरून निघणारे निष्कर्ष यांच्या आधारे पुस्तक लिहिण्याचे त्यांचे काम आता पूर्ण होत आले आहे. ते 'ग्रंथाली'तर्फे प्रकाशित होण्याची शक्यता आहे. 'मला या विषयात रस असला, माझ्या परीने मी त्याचा अभ्यास करत असले तरी पाठ्यवृत्तीमुळे त्या कामाला दिशा, आर्थिक साह्य आणि सन्मान मिळाला' अशी मेघना ढोके यांची भावना आहे.

या वर्षीदेखील पाठ्यवृत्तीची घोषणा जून महिन्यात करण्यात आली. राज्यभरातून पंधरा प्रस्ताव आले. ज्यांनी गेल्या वर्षी प्रस्ताव पाठवले होते, पण ज्यांची निवड झाली होती अशांनीदेखील प्रस्ताव पाठवले हे विशेष. ज्येष्ठ पत्रकार सदा डुंबरे आणि प्राध्यापक–लेखक जयदेव डोळे यांनी प्रस्तावांचे परीक्षण केले. ज्या चार प्रस्तावांचा अंतिम फेरीत विचार करण्यात आला, त्यांपैकी दोन विषयांच्या अभ्यासाची निकड, प्रस्ताव



**मेघना ढोके सिद्धार्थ भाटिया यांच्या हस्ते पाठ्यवृत्ती स्वीकारताना**

सादर करणाऱ्या पत्रकारांचे त्या संबंधातील आधीचे काम, व अभ्यासाचे नियोजन समान दर्जाचे वाटल्याने दोघांना विभागून पाठ्यवृत्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला. 'महाराष्ट्राबरोबरच उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, हरियाणा या राज्यांतील गोवंशाचा तुलनात्मक अभ्यास करावयाचा आहे. त्यासाठी पुरेसा वेळ देण्याची माझी तयारी होती मात्र, पुरेसे आर्थिक पाठबळ नसल्याने मला अभ्यास करता येत नव्हता. या कायद्याचा अभ्यास करून हा कायदा शेतकऱ्यांसाठी कसा अन्यायकारक आहे हे मला पाहायचे आहे. त्यासाठी मला या फेलोशिपचा उपयोग होणार आहे,' असे दत्ता जाधव यांना वाटते. पाठ्यवृत्तीची निवडप्रक्रिया तांत्रिकदृष्ट्या योग्य आहे आणि बहुतांश प्रक्रिया ऑनलाइन होत असल्याने वेळ आणि पैसा वाचतो,

## अरुण साधू पाठ्यवृत्ती योजना

**पाठ्यवृत्ती दीड लाख रुपये (एका पत्रकारासाठी किंवा दोन पत्रकारांना समान विभागून) मराठीतून लिहिणाऱ्या, किमान तीन वर्षांचा अनुभव असलेल्या पत्रकारांसाठी, वयोमर्यादा ४५ वर्षे.**
**प्रस्ताव पाठवण्याचा कालावधी – १ जुलै ते १५ ऑगस्ट**
**(head.dcjgmail@com या पत्त्यावर)**
**निवडप्रक्रिया – लेखी प्रस्तावांच्या मूल्यमापनानंतर चार सर्वोत्तम प्रस्ताव पाठवणाऱ्या पत्रकारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येतील, व त्यातून अंतिम विजेत्यांची निवड केली जाईल.**
**सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात स्मृतिव्याख्यानात पाठ्यवृत्ती विजेत्यांच्या नावांची घोषणा करण्यात येईल.**




**'ग्रंथाली'ची भूमिका मांडताना पद्मभूषण देशपांडे, रेखा शेळके, डॉ. उज्ज्वला बर्वे, अरुणा साधू, कुमार केतकर, राजदीप सरदेसाई आणि ए.एन. कदम**





**राजदीप सरदेसाई यांच्या हस्ते पाठ्यवृत्ती व मानपत्र स्वीकारताना मेघना ढोके, दत्ता जाधव आणि मुक्ता चैतन्य**



**'विसरलेल्या आठवणींची गोष्ट' पुस्तकप्रकाशन कुमार केतकर, राजदीप सरदेसाई आणि ए.एन. कदम**

असेही त्यांचे मत आहे.

जाधव यांच्याबरोबरच मुक्ता चैतन्य यांचीही पाठ्यवृत्तीसाठी निवड झाली आहे. त्या मुक्त पत्रकार म्हणून काम करतात. समाज-माध्यमे, डिजिटल तंत्रज्ञान यांविषयी त्या विपुल लिखाण करतात. 'गेमिंग आणि पॉर्नचे मुलांवर होणारे परिणाम' हा विषय आताच्या काळात समजून घेणे फार गरजेचे आहे या विचारातून त्यांनी त्या विषयाचा सखोल अभ्यास करण्यासाठी पाठ्यवृत्तीसाठी अर्ज केला होता. 'अरुण साधू अभ्यास पाठ्यवृत्तीसाठी माझ्या विषयाची निवड झाली हा मी मोठा सन्मान मानते. फेलोशिपच्या निमित्ताने पत्रकार म्हणून माझा नव्याने प्रवास सुरू झाला आहे. जो मला पत्रकार म्हणून अधिक सजग करणारा आहे. प्रस्ताव पाठवल्यानंतर अंतिम मुलाखतीची फेरी अतिशय महत्त्वाची आणि कसोटी बघणारी होती. विषयाची तयारी आणि माझा आवाका या दोन्हीची परीक्षा त्यात झाली,' अशी त्यांचीही भावना आहे.

यावर्षी एमजीएम संस्थेच्या सहकार्याने औरंगाबादमध्ये झालेल्या अरुण साधू स्मृती व्याख्यानात वरील दोघांच्या नावांची घोषणा करण्यात आली. व्याख्यानाचे प्रमुख वक्ते राजदीप सरदेसाई यांच्या हस्ते दोघांचा सत्कारही करण्यात आला. कुमार केतकर हे अन्य वक्ते होते. एमजीएम संस्थेचे अध्यक्ष ए.एन. कदम यावेळी उपस्थित होते. एमजीएम कॉलेजच्या प्रिन्सिपॉल रेखा शेळके यांनी एकूण कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले होते. मेघना ढोके यांनी त्यांच्या आसामबद्दलच्या अभ्यासाचे सादरीकरणही या कार्यक्रमात केले. पुढच्या सप्टेंबरपर्यंत जाधव आणि चैतन्य या दोघांचे अभ्यास पूर्ण होतील. तोवर नव्या पाठ्यवृत्ती विजेत्यांची घोषणा झालेली असेल. अशा रीतीने दरवर्षी नवनवे विषय अभ्यासले जातील. उत्तरोत्तर अधिकाधिक तरुण पत्रकार या संधीचा लाभ घेतील अशी आशा करायला हरकत नाही.

# दया पवार स्मृतिपुरस्कारसोहळा




प्रज्ञा पवार मेघना पेठेंना पुरस्कार देताना




डॉ. रावसाहेब कसबे डॉ. मंगेश बनसोड यांना 'बलुतं' पुरस्कार देताना




प्रतिमा जोशी शीतल साठे यांना पुरस्कार देताना




मल्लिका अमरशेख डॉ. हरिश्चंद्र थोरात यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना

दया पवार प्रतिष्ठानच्या वतीने दिल्या जाणाऱ्या पद्मश्री दया पवार स्मृतिपुरस्काराने लेखिका मेघना पेठे, मल्लिका अमरशेख आणि सामाजिक कार्यकर्त्या, शाहीर शीतल साठे यांना सन्मानित करण्यात आले. यंदा या पुरस्काराचे १३ वे वर्ष आहे. मुंबई मराठी पत्रकारसंघाच्या सभागृहात साहित्यक्षेत्रातील दिग्गजांच्या हस्ते हा पुरस्कारसोहळा पार पडला. ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबेंनी वर्तमान परिस्थितीवर फटकारे ओढले. 'चाळीस वर्षांपूर्वी बलुत्यानं जातीचा, कमीपणाचा न्यूनगंड संपवला. म्हणून अनेकजण लिहिते झाले आणि मराठी साहित्य विस्तारत गेले,' असे कसबे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात स्पष्ट केले. 'शासकीय कामकाजातून 'दलित' हा शब्द काढून टाकण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र हा शब्द आता नकारात्मक राहिलेला नसून या शब्दाने मोठी चळवळ उभी केलेली आहे. ती सहजासहजी संपवू देणार नाही,' असा निर्धार प्रज्ञा दया पवार यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणातून केला. यावेळी ज्येष्ठ हिंदी लेखक ओमप्रकाश वाल्मिकी लिखित 'जूठन' या आत्मकथनाच्या 'उष्टं' या मराठी अनुवादासाठी डॉ. मंगेश बनसोड यांना 'ग्रंथाली'तर्फे देण्यात येणारा यंदाचा 'बलुतं' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

ज्येष्ठ पत्रकार प्रतिमा जोशी आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. हरिश्चंद्र थोरात यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सोमैया कॉलेजच्या प्राचार्य वीणा सानेकर, दत्ता बाळसराफ यांनी सूत्रसंचालन केले.

**दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या दलित आत्मकथनातून निवड केलेल्या एका आत्मकथनास 'ग्रंथाली'तर्फे 'बलुतं' पुरस्कार दिला जातो.**

# ज्येष्ठ पत्रकार आणि प्रथितयश लेखिका संजीवनी खेर यांना कै. वसंतराव उपाध्ये सृजनशील पत्रकारिता पुरस्कार प्रदान



**नीला उपाध्ये, संजीवनी खेर, अविनाश तांबे, डॉ. मनीषा टिकेकर. संजीवनी खेर यांना पुरस्कार प्रदान करताना**

'समाजातील सर्वच क्षेत्रात जे जे घडतंय ते अभ्यासून लोकांपर्यंत पोचवणे म्हणजे पत्रकारिता होय. भाषेवर प्रभुत्व, चौफेर ज्ञान, घड्याळाकडे न बघता काम करण्याची वृत्ती पत्रकारांमध्ये असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आपली व्यक्तिगत मते कधीही बातमीत डोकावता कामा नयेत. पत्रकारितेच्या जगातील वाढत्या वेगामुळे आणि 'तातडी'मुळे बातम्यांमध्ये चुका होत असतात. त्या टाळण्यासाठी पत्रकारांनी आपला व्यासंग वाढवणे, बातमीतील तपशिलांची खात्री करून घेणे अत्यावश्यक आहे.' असे मत ज्येष्ठ पत्रकार आणि प्रथितयश लेखिका संजीवनी खेर यांनी व्यक्त केले. सन २०१९ सालचा 'ज्येष्ठ पत्रकार कै. वसंतराव उपाध्ये सृजनशील पत्रकारिता पुरस्कार' त्यांना मंगळवार, १ ऑक्टोबर रोजी ज्येष्ठ प्राध्यापिका आणि लेखिका डॉ. मनीषा टिकेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. चेंबूर एज्युकेशन सोसायटी आणि बाल विकास संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात आपल्या सत्काराला उत्तर देताना त्या बोलत होत्या.

पत्रकारिता हे लोकांना शहाणे करून सोडणारे माध्यम आहे, या एका ध्यासाने, कोणत्याही पदाचा मोह न बाळगता तहहयात प्रामाणिक पत्रकारिता करणारे ज्येष्ठ पत्रकार कै. वसंतराव उपाध्ये यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी हा पुरस्कार पत्रकारिता क्षेत्रातील ज्येष्ठ, व्यासंगी आणि सृजनशील लेखन करणाऱ्या पत्रकाराला दिला जातो. पुरस्काराचे हे यंदाचे चौथे वर्ष आहे.

'लोकसत्ते'पासून 'लोकप्रभा'पर्यंत संपादकीय वाटचाल केलेल्या ज्येष्ठ पत्रकार संजीवनी खेर यांनी साहित्यक्षेत्रातही आपली छाप उमटवलेली आहे. त्यांच्या 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेल्या, नोबेल साहित्यिक, सर्वसाक्षी, जलसूक्त, चित्रकथी, संभाजी या पुस्तकांसह सहा-सात कादंबऱ्या, दोन कथासंग्रह, चार ते पाच अनुवाद प्रकशित झाले असून इतिहास संशोधनक्षेत्रातदेखील विविध डॉक्युमेंटरीज बनवून त्यांनी मोलाची भर घातली आहे. अशा प्रकारे सर्वार्थाने बहुअंगी अशा व्यक्तिमत्त्वाचा सृजनशील पत्रकार म्हणून गौरव न होता तरच नवल!

व्युत्पन्न पत्रकार अरुण टिकेकर यांच्या पत्नी इतकीच ओळख न राखता वाचकांच्या कायम स्मरणात राहील असे व्यासंगी वृत्तपत्रीय लेखन करणाऱ्या प्रा. डॉ. मनीषा टिकेकर या गेली एकेचाळीस वर्षे लाला लजपतराय महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य करीत आहेत. याशिवाय त्यांनी आपल्या शेजारी देशांतील राज्यव्यवस्था, अंतर्गत घडामोडी, त्यांचा भारतावर होणारा परिणाम या विषयावर 'भारत आणि भारताचे शेजारी' तसेच 'कुंपणापलीकडचा देश पाकिस्तान' असे ग्रंथलेखनही केले आहे.

ज्येष्ठ प्राध्यापिका डॉ. मनीषा टिकेकर यांनी तर सध्याच्या पत्रकारितेच्या व्यवसायाचे ढळढळीत वास्तव आपल्या भाषणात मांडले. पत्रकारिता या क्षेत्राला विनाकारण ग्लॅमर प्राप्त झालेय. इतर व्यवसायांप्रमाणेच या व्यवसायातदेखील बदल होणे क्रमप्राप्त आहे, मात्र या व्यवसायात आवश्यक असणारा प्रामाणिकपणा, ठोसपणा, वैचारिक डूब या नीतिमूल्यांचा ऱ्हास होत चालला असून

सध्या दृक्‌श्राव्य माध्यमातील मुलाखतींमध्ये आलेला उथळपणा, उडत्या भाषेचा मोह, वृत्तपत्रांवरील दिवसागणीक वाढत चाललेली जाहिरातींच्या जॅकेट्सची संख्या या सर्वच गोष्टींचा विषाद वाटतो, असे त्या म्हणाल्या. ग्लोबलाइज्ड भाषा वापरताना, विशेष नावे देताना सर्रास चुका केल्या जातात. मातृभाषेव्यतिरिक्त इतर भाषांचा वापर करताना तारतम्य बाळगणे, चौफेर वाचन करणे, संतुलित दृष्टिकोन ठेवणे, टीका करतानादेखील पातळी राखणे आज खूप आवश्यक झाले आहे. सध्याच्या युवकयुवतींना पत्रकारितेचे शिक्षण डोळसपणे देणे, समाजहिताच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे या, शब्दांत त्यांनी या कार्यक्रमासाठी जमलेल्या पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांना आणि रसिक प्रेक्षकांना मार्गदर्शन केले.

'शारदीय नवरात्रोत्सवाचे निमित्त साधून या कार्यक्रमात एका सरस्वतीच्या हातून दुसऱ्या सरस्वतीचा सन्मान होतो आहे, याचा मनापासून आनंद होत आहे. तसेच, दैनंदिन लेखनकार्यासोबतच नवनवीन सृजनशील उपक्रमांमध्ये पत्रकाराने स्वतःला गुंतवून घेऊन समाजमनाची मशागत केली पाहिजे', असे ज्येष्ठ पत्रकार, मुंबई विद्यापीठाच्या गरवारे पत्रकारिता वर्गाच्या मुख्य समन्वयक आणि कै. वसंतराव उपाध्ये यांच्या पत्नी नीला उपाध्ये यांनी आपल्या मनोगतात सांगितले. या कार्यक्रमात सर्व मान्यवरांनी कै. वसंतराव उपाध्ये यांच्या आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चेंबूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अविनाशजी तांबे होते. बालविकास संघाच्या वतीने अमित आपटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक तर प्रा. आर्या आपटे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

पत्रकारिताक्षेत्राचा लेखाजोखा मांडत व्यासंगी वक्त्यांच्या आणि रसिक प्रेक्षकांच्या सान्निध्यात हा सृजनाचा सोहळा रंगला.

**शब्दांकन – नम्रता कडू**

# पुनरुत्थान



**'पुनरुत्थान' कवितासंग्रह प्रकाशनसमयी सायमन मार्टिन, लक्ष्मीकांत देशमुख, जस्तिना मार्टिन, विनायकदादा पाटील, भरत पेंढारी आणि प्रकाश भातम्ब्रेकर**




**मूल्य १६० रु.**
**सवलतीत १०० रु.**


'ग्रंथाली' प्रकाशित केलेला सायमन मार्टिन यांचा 'पुनरुत्थान' कवितासंग्रह हा त्यांचा आजवरचा आठवा कवितासंग्रह आहे. ६ ऑक्टोबर २०१९ रोजी वसईतील 'सहयोग संस्था' आयोजित नवव्या साहित्य–कला महोत्सवात 'पुनरुत्थान' कवितासंग्रहाचे प्रकाशन झाले. त्यावेळी बोलताना अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देखमुख म्हणाले, 'या संग्रहातील प्रत्येक कविता समाजाचे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रातील भ्रष्ट वातावरणाचे विशेष संदर्भ देत भाष्य करते. सायमन यांनी अशारीतीने आठ वेळा समाजव्यवस्थेविरुद्ध बोलण्याचा गुन्हा केला आहे. आणि त्यांनी तो गुन्हा यापुढेही करत राहावा. ख्रिस्ती समाजाची वेदना, सुख–दुःख मराठी काव्यप्रांतात आणून एका अर्थाने सायमन यांनी मराठी कविता ही समृद्धच केली आहे. साहित्यास जात आणि धर्म नसतो. त्यामुळे सायमन मार्टिन यांना खोचकपणे ख्रिस्ती कवी म्हणून संबोधण्याची गरज नाही.'

प्रकाशनाच्यावेळी पुनरुत्थान कवितासंग्रहातील निवडक कवितांचे वाचन विलास पागार, प्रा. अंजली दशपुत्रे, योगिनी राऊळ, विजय परेरा आणि प्रा. उत्तम भगत यांनी केले. प्रकाशनसमारंभास विशेष पाहुणे म्हणून वनाधिपती विनायकदादा पाटील, प्रकाश भातंब्रेकर उपस्थित होते.

# सतारीच्या तारा



**सुदेश हिंगलासपूरकर, सायमन मार्टिन, मॉनसिनियॉर फ्रान्सिस कोरिया, फादर थॉमस डिसोझा आणि लेखक ॲन्थनी परेरा**



**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**

'सतारीच्या तारा या ॲन्थनी परेरा लिखित पुस्तकाचा विमोचन सोहळा रविवार १३ ऑक्टोबर २०१९ रोजी नंदाखाल, विरार येथे पार पडला.

या प्रसंगी मॉनसिनियॉर फ्रान्सिस कोरिया, कवी सायमन मार्टीन फा. थॉमस डिसोझा व 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर हजर होते.

ॲन्थनी परेरा हे मुंबई महानगर-पालिकेच्या शाळेतून सेवानिवृत्त झालेले शिक्षक असून त्यांचे या आधी 'पैशाचे झाड' व 'परी आली माझ्या घरी' या पुस्तकांचे प्रकाशन झाले आहे.

ललित लेखांचा संग्रह असलेल्या या पुस्तकात नैतिक अथवा आध्यात्मिक विषय निवडून शिक्षक या नात्याने प्रत्येक लेखात प्रभावीपणे विवेचन केले आहे. एका जातिवंत शिक्षकाने आपल्या अंतरमनीचया चिंतनाला दिलेले हे शब्दरूप आहे. परेरा यांचे चिंतन व्यापक स्वरूपाचे असून समाजातील आदर्श लोकांच्या पाऊलखुणा आपल्या पुढे ठेवल्या आहेत. रसिक वाचकांना भावणारे व उद्बोधन करणारे हे पुस्तक आहे.

# गुलाबराव पारनेरकर भाग २ पुस्तकाचे विश्वविक्रमी प्रकाशन







**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

पत्रकार आणि लेखक सचिन जगदाळे यांच्या 'ग्रंथाली' प्रकाशित गुलाबराव पारनेरकर (भाग २) या पुस्तकाचे विश्वविक्रमी प्रकाशन नुकतेच ओमान, दुबई, अमेरिका या देशा-तून तसेच महाराष्ट्रातल्या किमान तीस जिल्ह्यातून एकाच दिवशी आणि एकाच वेळेस पार पडले. महाराष्ट्रस्थित मराठी लेखकाचे विदेशात प्रकाशित होणारेदेखील हे पहिलेच पुस्तक आहे. जगदाळे हे मुख्य पुस्तक प्रकाशन सोहळ्यासाठी स्वतः ओमान येथील सोहार शहरात उपस्थित होते. सोहार येथील प्रकाशन सोहळ्याची जबाबदारी 'स्नेहबंध-एक नातं आपुलकीचं' या संस्थेने उचलली होती. प्रकाशन सोहळ्यानंतर जगदाळे यांचा अभिवाचनाचा कार्यक्रम देखील तिथे पार पडला. सोहार शहरातील कार्यक्रमास शहरातील किमान दोनशे मराठी कुटुंबांनी उपस्थिती दर्शविली होती.

# ‘कविता महाजन’च्या आठवणी जागवताना....

कविता महाजन... एक भारदस्त लेखिका, अत्यंत उत्कट कवयित्री, सृजनशील चित्रकार आणि आगळीवेगळी बालसाहित्याची निर्मिती करणारी संवेदनशील व्यक्ती... एकंदरीतच वाचन, लिखाण आणि साहित्य-निर्मितीबद्दलचा कविताचा आवाका प्रचंड होता. तिची संवादाची भूक न शमणारीच होती. म्हणूनच, तिच्या लिखाण आणि व्यक्तिमत्वाचं वर्णन ‘धबधबा’ असंच करता येईल.

सतत आणि सातत्यानं व्यक्त होणं.. मग ते काव्यातून असो, की कथाकादंबरी वा अनुवादित साहित्याच्या माध्यमातून असो, किंवा बालसाहित्यातून रोमँटिक व अदभूत विश्वाची सफर घडविण्याची तिची विलक्षण किमया असो... ‘कविता’ म्हणजे या सर्व साहित्य-प्रकारांसाठी आवश्यक असणाऱ्या चिकाटी आणि गतिमानता यासारख्या अनेक गुणांचा ‘समुच्चय’ होती. हे कमी होतं म्हणून की काय, तिनं ब्लॉग व फेसबुकवरून अक्षरशः प्रचंड लिखाण करून, आपल्या मांडणीच्या शैली व त्यातील समयोचित आशयामुळं, वाचकांना गदागदा हलवण्याचं, त्यांना अंतर्मुख करण्याचं कार्य केलं आहे.

धकाधकीचं जगणं आणि वेळोवेळी बसलेल्या अनेक धक्क्यातून तसंच, भावभावनांच्या कल्लोळातून तिचा जो साहित्य व जीवनप्रवास सुरू होता, तो तिला ओळखणाऱ्या सर्वांनाच थक्क करून सोडणारा होता! तिच्या ‘धारदार’, ‘वास्तववादी’ लिखाण आणि ‘रोखठोक’ स्वभावामुळे अनेक वादळं उठली खरी.. पण तिनं मनाच्या ठाम निश्चयानं ती सारीच झेलली आणि जिद्दीनं ती पेलली सुद्धा.

तिचा हा सारा प्रवास कवेत घेत तिनं आपल्यासाठी निर्माण करून ठेवलेल्या ‘समुद्राच्या विशाल जाळ्यारूपी’ संचिताचा वेध घेणं हे खचितच सोपं नाही. आणि हा सारा साहित्यपट कोणत्याही प्रकारच्या रंगमंचीय आविष्कारातून वा अभिवाचनासारख्या कार्यक्रमातून पकडण्याचा प्रयत्न करणं, हे नक्कीच आव्हानात्मक होतं.


२७ सप्टेंबर २०१९ रोजी म्हणजेच कविताला जाऊन एक वर्ष झाले. त्यानिमित्तानं, तिच्या साहित्याचा अल्पसा का होईना पण वेध घेण्याचा प्रयत्न करावा, अशी कल्पना सुषमा देशपांडे यांनी उज्ज्वला मेहेंदळे आणि मृदुला भाटकर यांच्यापुढे मांडली. त्यासाठी आवश्यक असणा-या संहितेचं संकलन व लेखन, कविता महजनची जवळची मैत्रीण असलेल्या आणि तिच्या साहित्याचे वाचन केलेल्या उज्ज्वल मेहेंदळे यांनी करावं आणि सुषमा देशपांडे आणि मृदुला भाटकर यांनी या संहितेचं अभिवाचन करावं, असं ठरलं. आणि त्यातूनच कवितानं हाताळलेले विविध साहित्यप्रकार, आपल्या समाजात स्त्रियांची होणारी घुसमट व्यक्त करणाऱ्या कविता, तसंच, सद्यपरिस्थितीतील दांभिकतेवर नव्या सोशल मीडियावर कोरडे ओढणारे स्वतंत्र व विपुल लिखाण, आदींना स्पर्श करणारी एक संहिता उज्ज्वला मेहेंदळे यांनी तयार केली.



सुषमा देशपांडे आणि मृदुला भाटकर संहितेचं अभिवाचन करताना

सुषमा देशपांडे तर कसलेल्या अभिनेत्री, नाट्य दिग्दर्शिका आणि सामाजिक चळवळींशी बांधल्या गेलेल्या, तर मृदुला भाटकर यांना लेखन, कविता आणि अभिनयाचे अंग फार पूर्वीपासूनच म्हणजे कॉलेज जीवनापासून होतेच. त्यामुळे दोघींचं अभिवाचन कसदार होणार याबद्दल शंकाच नव्हती.

कविताच्या प्रथम स्मृतिदिनी, ‘कविताला आठवताना’ हा पहिला कार्यक्रम पुण्यात झाला. त्यानंतर ११ ऑक्टोबर २०१९ रोजी मुंबईतील पहिल्या कार्यक्रमाचे, ‘ग्रंथाली’ने सुरू केलेल्या विचार पीठाच्या वतीने संयोजन करण्यात आले. सुषमा देशपांडे आणि मृदुला भाटकर या दोघींनी आपल्या वाचिक अभिनयानं उपस्थितांच्या अंतःकरणाचा ठाव घेतला. जवळपास सव्वातास या दोघांनी प्रेक्षकांना चांगलंच खिळवून ठेवलं. या कार्यक्रमातून ‘कविता महाजन’ यांच्या आठवणींना वळसा घालत, त्यांचं साहित्यिक कार्यकर्तृत्व रसिकांपुढे प्रभावीपणे मांडलं गेलं.



प्रेक्षक वाचकवर्ग

उपस्थितांमध्ये, मीनाक्षी दादरावाला, मीना गोखले, सुबोध आणि वसुधा जावडेकर, उषा मेहता, छाया दातार, नीरा आडारकर, आदी मान्यवर साहित्यप्रेमी उपस्थित होते.

एका अर्थानं, हा कार्यक्रम म्हणजे मैत्रिणींनी मिळून एका मैत्रिणीला, लेखन व अभिवाचनातून वाहिलेली श्रद्धांजली म्हणता येईल.

**– प्रशांत कोठडिया**



# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## विसरलेल्या आठवणींची कथा

**अरुण साधू**



### पुन्हा पुन्हा आठवावे असे पुस्तक

'हा माणूस, जो केवळ एक बटण दाबून आपल्याला निर्जीव करू शकतो, दोन सर्किट्स कापून आपल्याला नष्ट करू शकतो, तोच आपल्या रोबो जातीच्या सर्व्हायवलचा खरा शत्रू हे त्या जीवाकांक्षा स्फुरलेल्या रोबोला नक्कीच कळेल. त्याला नष्ट केलं की आपल्याला अमरत्व, हेही त्याला समजू शकेल... मग हे सज्ञान झालेले, जीवाकांक्षा 'अंकुरलेले रोबोच पृथ्वीला निर्मनुष्य करण्यासाठी उणव करतील, अशीही शक्यता तुम्ही नाकारू शकणार नाही.' (पृ. क्र. ५१)

अरुण साधू याचा हा नवा कथासंग्रह, त्यांच्या पुस्तकरूपाने अप्रकाशित राहिलेल्या कथांचा. यात चार कथा आहेत, ज्या वेगवेगळ्या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या आहेत. एक आहे मुक्त चिंतन, आपल्याच लेखणावर लिहिलेले आणि एक लेख आहे त्यांच्याच दोन मित्रांविषयीचा. साधूच्या साहित्यात काळाचे अंतरंग उलगडण्याची ताकद आहे, हे त्यांचे साहित्य वाचलेल्यांना ज्ञात आहे. ते वर्तमानात वावरत असताना भूतकाळाला जिवंत करतात आणि भविष्यकाळात काय असेल ती स्थितीही समोर उभी करतात. हे काळभान त्यांच्या कथांचे बलस्थान आहे, त्याचा प्रत्यय या कथा देतात.

घनश्याम मेघे ही 'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि' या कथेतील प्रमुख व्यक्तिरेखा; न्यूरो सायंटिस्ट. रोबोत मेंदू निर्माण करण्याच्या प्रयोगाने झपाटलेला. ही कथा त्याच्या बौद्धिक, आत्मिक आणि मानसिक पातळीचे दर्शन घडवते. तसे तिचे स्वरूप दीर्घकथा वाटावी असे. परंतु घडणारा प्रवास फक्त सकाळपासून सायंकाळपर्यंतचा. तोही थक्क करणारा. मानसिक आंदोलने आणि घडणाऱ्या घटना, यामुळे ही कथा काळाच्याही पुढे जाते. असे असूनही ती विज्ञानकथा नाही, हे विशेष. जोडीने आलेली पत्नी कौसल्या, मुलगी पोमी, मेहुणा भरत, त्याची पत्नी मोहिनी, वशिष्ठ, ही मंडळी कथेची गुंफण सकस पीळदार करतात. कथेत इंग्रजीचा वापर अधिक आहे, परंतु ती अनाठायी न वाटता कथेचे पोषण करण्याचे काम करते.

'इनोसंट गेम' ही कथा संगणकाचा वापर आणि उपयुक्तता यावर आधारलेली दिसते. परंतु त्याच्याआड दडलेला वेगळाच गेम असतो, त्याची व्याप्ती मोठी असूनही गूढ कथेसारखी तिला डूब दिलेली आहे. 'सॅम' ही एक व्यक्तिरेखा, वयस्क, चार तरुण मुले आणि संगणकाचा वापर, यांच्यात ही कथा इतक्या सहजपणे उद्दिष्टाकडे पोहोचते की आपण चकित होतो. इथेही इंग्रजीचा वापर आहे. परंतु ती त्या वातावरणाची मागणी आहे, हे नाकारता येत नाही.

कथा लिहिताना ज्या कथेचा पल्ला खूप मोठा आहे, तिला बांधेसूद कसे करावे? 'विसरलेल्या आठवणींची कथा' ही कथा या प्रश्नाचे उत्तर आहे. स्मृती आपल्या हार्डडिस्कवरून डिलिटच करून टाकावी, अगदी रिसायकलबिनमधूनही हद्दपार करावी. परंतु कुठलीतरी अदृश्य कळ दाबली जाऊन नेमका त्याच दुसऱ्या स्मृतीचा पडदा उघडतो. तशी ही कथा. दोन टोकावर वाटणारे ध्रुव समोरासमोर येतात, नव्हे एकाच गुणधर्माशी जोडले जातात, हे सूत्र प्रतिभेचा कस पाहणारे ठरते.

अशोक आणि माधव या दोन मित्रांची कथा म्हणजे 'धुरकट आरशात दडलेला अंधुक चेहरा.' तरल पातळीवर घडणारी कथा एक सुंदर नितळ अनुभव देते. तसाच अनुभव 'कुमार केतकर आणि अरुण टिकेकर' या लेखात येतो. दोघेही पत्रकार, संपादक, आपापल्या वैशिष्ट्यांनी संपन्न असलेले. त्यांच्या व्यक्तित्वावर चिकित्सक प्रकाश टाकण्याची जबाबदारी तशी अवघडच. परंतु या सव्यासी व्यक्तिरेखा अतिशय तौलनिक पद्धतीने, समर्थपणे उभ्या केल्या आहेत. आपले मैत्रेय आड येऊ न देता त्यांच्या सर्वांगीण पैलूंवर निर्भीडपणे लिहिले आहे.

लेखक आपल्या लेखनाकडे कसा पाहतो? भूमिका, दृष्टिकोन, सभोवताल, कथानक, व्यक्तिरेखा याविषयी कसा विचार करतो? कुठल्या वाचकाला पडणारे हे प्रश्न. साधूंनी या प्रश्नांची उत्तरे 'मुखवटा' या लेखात दिली आहेत. साधूंच्या गाजलेल्या 'मुंबई दिनांक', 'सिंहासन', त्रिशंकू' या कादंबऱ्यांप्रमाणेच गाजलेली आणखी एक कादंबरी 'मुखवटा'. चार पुनर्मुद्रणे झालेली ही कादंबरी महत्त्वाची कशी, याविषयी सांगताना, लेखकाचा भूतकाळ तिच्याशी जोडलेला आहे, तो कोणत्या टप्प्यावर, त्यातली नानी ही कशी वेगळी ठरते, यांचा तपशील ते उलगडत जातात. त्यासाठी किती टिपणे काढावी लागली, नकाशे काढून नातीसंबंध कसे जुळवले, यांचीही माहिती ते देतात.

अरुण साधू यांचे साहित्य वाचताना मिळणारा आनंद नक्कीच वेगळा असतो. लेखनातला सकसपणा, विषयाची मांडणी, सोबत सभोवतालचे वातावरण, अंतरंगाचा तळ शोधून त्यातला गाभा पकडण्याची शैली, प्रत्येक व्यक्तिरेखेचे स्पष्ट आणि रेखीव चित्रण आणि मानसिक पातळीवर चालणारे व्यवहार, हे सारे तरलतेने आणि जाणीवपूर्वक येते. मनावर त्याची छाप उमटवून तिथेच रूतून राहते. हे सारे अनुभव पुन्हा आपल्या भेटीला आले आहेत ते या संग्रहातून. या संग्रहाविषयी आणि साधूविषयी शेखर साठे यांनी प्रस्तावनेत खूप आपुलकीने लिहिले आहे. साधूंच्या लेखनाइतकीच ही प्रस्तावना आवर्जून वाचावी अशी आहे. अरुण साधू यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले आहे. विसरलेल्या आठवणींचे जाळे सतीश भावसार यांनी मुखपृष्ठावर उलगडून दाखविले आहे. हा उलगडण्याचा प्रवास देखील वेगळाच आहे.

**मूल्य २०० रु.   सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

**ट्रंप : एक वादळी जीवन**
**डॉ. अनंत प्रा. लाभसेटवार**



**स्वत:चा शिक्का असलेला धुरंधर**

'अमेरिकेच्या २४२ वर्षांच्या इतिहासात स्वत:च विमान असलेला दावेदार अध्यक्ष म्हणून कधीच निवडून आला नव्हता. उद्योजकांच्या नीतिबद्धतेविषयी जनतेच्या मनात प्रश्नचिन्ह असे. पण व्यावसायिक राजकारण्यांनी पोकळ वचनं देऊन आणि विपुल नाकर्तेपणा दाखवून लोकांचा रोष ओढवला होता. त्यामुळे डोनाल्डमध्ये त्यांना पर्याय सापडला.' (पृ. क्र. ६७)

ट्रंप एक वादळी जीवनपट हे डॉ. अनंत लाभसेटवार यांचे नवे चरित्रात्मक पुस्तक. ज्याच्या शीर्षकातच चरित्रनायकाचे वेगळेपण अधोरेखित केलेले आहे. त्याची साक्ष पटते ती पुस्तक वाचल्यानंतर. अर्थात जेव्हा सर्व दृष्टीने लेखक एक मोठी व्यक्ती चरित्रनायक म्हणून निवडते, तेव्हा तिला पूर्णपणे न्याय देण्याची जबाबदारी लेखकावर येते. त्यातून अशी व्यक्ती हयात असेल, आपल्या व्यक्तित्वाचा प्रभाव अधिकाधिक प्रभावी करीत असेल तर ही जबाबदारी अधिकच वाढते. डोनाल्ड ट्रंप हे आज अमेरिकासारख्या सामर्थ्यवान राष्ट्राचे ४५ वे अध्यक्ष आहेत. त्यांच्या चरित्राचा वेध घेण्याचे शिवधनुष्य लेखकाने उचलले आहे, पेलले आहे, इतकेच नव्हे तर ते अतिशय काळजीपूर्वक आपल्या हाती दिले आहे, कुठेही तडा न जाऊ देता. यासाठी अभ्यास, संशोधन आवश्यक असते. डॉ. लाभसेटवार यांचे वैशिष्ट्य असे की, असे चरित्रात्मक वा माहितीपर लेखन करायचे असेल तर प्रथम त्या विषयाचा सखोल अभ्यास करतात. त्याचा अनुभव त्यांच्या इतर यापूर्वी प्रकाशित झालेल्या पुस्तकांनी दिलेला आहे. तोच अनुभव प्रस्तुत वाचताना येतो, नव्हे त्यांनी दिलेले तपशील, आकडेवारी, तारखा, प्रदेश, चौक, इमारती, त्यांची नावे, संबंधित व्यक्तींची नावे, त्यांची क्षमता, राजकारण्यातले बारकावे, संसदेचे घटनेनुसार व्यवहार, हे सगळे पुरावा म्हणून आपल्यासमोर येतात तेव्हा थक्क व्हायला होते. हे सगळे अभ्यासाअभावी कसे शक्य आहे? यासाठी त्यांनी पुस्तकाच्या पृ. क्र. २०८ वर संदर्भसूची दिलेली आहे. शिवाय प्रस्तावनेच्या पृ. क्र. सहावर त्यांनीच स्पष्ट केले आहे की, कुठलंही लिखाण करण्यापूर्वी मी संशोधन महत्त्वाचं समजतो. या प्रस्तावनेत त्यांनी या लेखनाचे प्रयोजनही स्पष्ट केलेले आहे. त्यांची ही प्रस्तावना म्हणजे केवळ पुस्तकाविषयीची भूमिका, इतकीच नाही, तर लेखकाचा लेखनाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही स्पष्ट करणारी आहे.

डोनाल्ड ट्रंप अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठी उभे राहिले आणि सगळ्या जगाचे लक्ष त्यांनी स्वत:वर केंद्रित करून घेतले. त्याकाळात प्रसारमाध्यमानी त्यांची प्रतिमा कशी आहे याविषयी भरभरून लिहिले, दाखवले. असा माणूस राष्ट्राध्यक्षपदासाठी योग्य नाही, हाच सूर अधिक होता. तरीही जानेवारी २१, २०१७ रोजी वॉशिंग्टनमध्ये त्यांचा राज्याभिषेक झालाच. परंतु विषय इथेच थांबला नाही, सतत त्यांच्याविषयीच्या, त्यांनी जाहीर केलेल्या धोरणांविषयी टीकाटिप्पणी सुरू आहे. त्यासाठी त्यांचे विरोधक प्रत्येक संधीचे सोने करू पाहात आहेत. परंतु ट्रंपही व्यक्ती कुणापुढे हार पत्करणारी नाही, असाच अनुभव येत आहे आणि हे सारे अतिशय तपशीलाने या पुस्तकात आलेले आहे.

डोनाल्ड ट्रंप मुळात राजकारणात नसलेली व्यक्ती. त्यांची खरी ओळख आहे ती एक व्यावसायिक म्हणून बांधकाम क्षेत्रातले एक अग्रणी वलयांकित नाव म्हणून. ती ओळख निर्माण करण्यासाठी केवळ त्याची सौंदर्यदृष्टीच नव्हेतर वाटाघाटीचे चातुर्य अधिक प्रभावी ठरलेले आहे. अमेरिकेत टोलेजंग इमारती उभ्या करताना त्यांनी 'ट्रंप' हे नाव कायम अग्रभागी ठेवलेले आहे. अर्थात त्यासाठी प्रचंड अशी किंमत त्यांना मोजावी लागलेली आहे. तिचा तपशील वाचताना आपणच थक्क होतो. यातून एक धीरोदात्त व्यक्तिमत्त्व समोर उभे राहते. त्यांनी केलेले वेगवेगळे व्यवसाय, प्रयोग, याच्या जोडीला आणखी एक थक्क करणारी गोष्ट आपल्यासमोर येते ती म्हणजे डोनाल्ड ट्रंप लेखक आहेत. वीस पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. ती सगळी विक्रमी पद्धतीने विकली गेली आणि त्यावर मिळालेले मानधनही विक्रमी आहे, हे सांगायला नको.

डोनाल्ड ट्रंप यांचा जीवनपट उलगडणे सोपे काम नाही. परंतु डॉ. लाभसेटवार यांनी अतिशय पद्धतशीरपणे त्याची मांडणी केलेली आहे. बालपणापासून ते पुस्तक प्रकाशनाच्या दिनांकापर्यंतचा सर्व तपशील एकेक पैलू घेत मांडला आहे. त्यातून डोनाल्ड ट्रंप हे स्वतंत्र साम्राज्य आहे, याचा प्रत्यय येतो, तसा एक हरहुन्नरी माणूस म्हणूनही लक्षात येतो. त्यांच्या स्वभावातले एकेक पैलू समर्थपणे उलगडून दाखवलेला आहे. हे पुस्तक वाचत असताना खात्री पटते हे एक वादळी व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्याविषयी असलेल्या शंका, प्रश्नच अनुत्तरीत होतात असे नव्हेतर इथपर्यंतचा प्रवास कसा वादळ होता, आणि तरीही ट्रंप ठामपणे उभे आहेत, याचेच नवल वाटत राहते. लेखकाने एक समग्र चरित्र आपल्याहाती दिले आहे असे ठामपणे म्हणता येते. नव्हे एक भव्य पट पाहात असेच वाटत राहते. सतीश भावसार यांनी छान मुद्रा मुखपृष्ठावर ठेवून मुखपृष्ठ सजवले आहे.

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**



# ग्रंथपान

**माणूसजत्रा**

**आदित्य अ. जाधव**



**माणसाच्या जगण्याची कविता**

कविता भरतीसारखी येते, अंतरंगातील भावनेच्या सागरातून तरंगत मनाच्या किनाऱ्यावर अवचित अवतरते. ती विचार करून, ठरवून नाही करता येत. कधी स्वप्न बनून झोपेत डोकावते, कधी रखरखत्या उन्हात सावली बनून येते. तर कधी तिन्ही सांजेला आठवणीचा सुखद गारवा देणारी झुळूक बनते. कविता असते मुग्ध, निखळ आनंद देणारी, आल्हाददायक, लोभस कळीसारखी! कविता ही एखाद्या प्रस्थापित व्यवस्थेविरुद्धचा संताप असते. कविता कधी आक्रोश मांडते, कधी लिंगभेदाच्या वेदना सहन करत तळमळते. आपल्या कवितेविषयी लिहिणे अवघड असते. कविता कधी, कशी, कोणत्या रूपात अस्तित्वाला गवसणी घालील, याचा कुठलाच नियम नाही, नेम नाही. तिचे रूप कितीही न्याहाळून पाहण्याचा प्रयत्न केला तरी तिच्या मूळापर्यंत पोहोचणे साध्य झाले, असे कुणी छातीठोकपणे सांगू शकत नाही. तरीही तिची वेणा आणि वीण कवीची असतात आणि त्याविषयी कवी काही सांगू शकतो. तो एकप्रकारे आत्मशोध म्हणता येईल. तो शोध कवीने स्वत:च्या मनोगतातून व्यक्त केला आहे. कविता समजून घेण्यासाठी या आत्मशोधाची खरी निकड असते.

'माणूसजत्रा' हा आदित्य अ. जाधव यांचा दुसरा कवितासंग्रह. या संग्रहात एकूण ७४ कविता आहेत. या कविता वाचून झाल्यावर लक्षात आले, एका बैठकीत वाचून सोडून द्याव्यात, अशा या कविता नाहीत. वरवर पाहता त्या खूप साध्या आणि सोप्या वाटतात, परंतु त्यांच्या गाभ्याकडे लक्ष दिले तर कळते, या कविता पुन्हा पुन्हा वाचण्याची गरज आहे. प्रत्येक कवितेचा विचार स्वतंत्रपणे करायला हवा. अन्यथा या कवितांवर अन्याय केल्यासारखे होईल. आपण उदाहरण घेऊन पाहू या.

विषय (पान क्र. ११) चार कडव्यांची ही मोजकी कविता आहे. काय अपेक्षित आहे या कवितेत, एक शब्द. आश्वासक, स्थैर्य, आध्यात्म आणि माणूसपण यांना जोडणारा शब्द. या शब्दासाठी त्यांनी जे संदर्भ दिले आहेत, त्या प्रत्येकाला मोठा अर्थ आहे, हे आपण विसरू शकत नाही. उपहास, उपरोध यांनी भारलेले काटेरी वास्तवाचे भान ही कविता जागे करते. कुठलीच गोष्ट आता शाश्वत राहिलेली नाही. कधीकाळी चंद्रभागा बारामाही वाहात असायची, पाण्याने आणि भक्तांनी. बाराही महिने जगता येईल अशी सुगी होती आणि आध्यात्म, परमात्मा, सात्त्विकता यांचे अधिष्ठान जागृत होते. आज कुठे आहे हे सारे? हा एकच अर्थ या कवितेत नाही. परंतु त्यासाठी ही जागा नाही. प्रत्येकाला या कवितेत वेगळा अर्थ सापडेल.

तुळस (२९) या कवितेतील तुळस हे रूपक असेच अनेक अर्थांनी समोर ठेवलेले आहे. अंगणात तुळस असणे, यात अप्रुप आहे की गृहीत धरणे आहे? दारी इतर रोपे रूजत नाहीत, तुळस जेवढी रूजते, यात काय अपेक्षित आहे कवितेतून? तुळस ही आदर्श, संस्कार, निर्व्याज, सौख्य, भक्ती, प्रेम, सौभाग्य यासारख्या अनेक अर्थांनी योजलेले आहे. त्यांची जपणूक, जोपासना यावर सगळे अवलंबून आहे. त्याला तडा जाऊ द्यायचा की खतपाणी घालायचे, हे ज्याच्या त्याच्यावर अवलंबून आहे. परंतु कवी आपल्याकडून खतपाण्याची अपेक्षा ठेवतात, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

कवीने मनोगतात व्यक्त केल्याप्रमाणे या माणसाच्या कविता आहेत. हा माणूस मातापित्यांना विठ्ठलरुखमाईचा रूपात पाहतो. लेकीच्या संसार कल्पनेने हरखतो कधी काळजीत पडतो. भाऊ, बहीण या नात्याविषयी आपुलकी दाखवतो. आपला गाव, परिसर यांच्या कल्पनेत रंगून जातो. शिवाराच्या हंगामात ऊनपाऊस झेलतो. परंतु तोच माणूस एका शब्दासाठी जीव ओवाळून टाकतो नाहीतर हाती पलिता घेऊन जीवावर उठतो. त्याची वृत्ती टाळमृदुंगाची शांततेची पण त्याचवेळी बंडखोरीची. हे सारे हळुवार तर कधी सूचक पद्धतीने कवीने कवितेतून व्यक्त केले आहे. माणसाचे हरवलेपण, तुटलेपण, एकाकीपण कवीला हेलावून सोडते.

या संग्रहात निसर्ग आहे, हंगाम आहे, सुगी आहे. रान हा विषय कवीला खूप जवळचा. ''रानात झरला आषाढात''(३), ''रानातल्या माणसांना'' (२३), ''दूर रानात गोंधळ'' (३०), ''रान सांगे मूळकथा'' (४४), ''रान घालते चकवा'' (४६), ''पोखरून गेले रान'' (४९) याप्रमाणे तीन हा शब्द. तो सकाळ, दुपार, संध्याकाळ, उन्हाळा, पावसाळा, हिवाळा, बालपण, तारुण्य आणि वृद्धत्व, अशा संदर्भांना ते लागू आहे.

या कविता आशावाद व्यक्त करतात. जगण्याचे सूत्र सांगताना ते अवघे चार घडीचे, हाडामासाचे, त्याच्या भोगात अडकून मोक्षाकडे दुर्लक्ष करू नका. जे जे वाईट असेल ते ओरबडून पुढे जा. जीवनाची बाग फुलवा आणि जगताना मनी हीच फुललेली बाग ताजी ठेवा. ही सकारात्मकता या कवितेची ताकद आहे. या कविता कवीविषयीची आश्वासकता व्यक्त करतात. कधी अभंगाच्या नादात, तालात, लय घेऊन आलेल्या कविता दमदारपणाचा प्रत्यय देतात. एक चांगला संग्रह वाचला याचा आनंद देतात.

माणूसजत्राचे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी आशयपूर्ण सजवले आहे.

**मूल्य १२० रु. सवलतीत ८० रु.**

# ग्रंथपान

**राघवशेला**
**डॉ. विजयकुमार देशमुख**



**ईप्सित माहीत असलेली आत्ममग्न कविता**

'डंख मारुनी इथे, भुसभुशीत रात्री जाग्या झाल्या,
एक पहाट तेवत ठेवुनी, चांदण्या विरुनी गेल्या.'

डॉ. विजयकुमार यांचा हा नवा कवितासंग्रह, 'राघवशेला'. ग्रंथालीची उत्तम निर्मिती असलेला हा संग्रह उत्तम दाद द्यावी, अशा कवितांनी नटलेला. प्रत्येक कविता तिचे वेगळेपण घेऊन आलेली, तिच्यातल्या कल्पना आणि चिंतनाची त्यांना मिळालेली जोड, त्यामुळे मनात रुंजी घालत राहतील अशा या कविता. या कवितांना एक लय आहे. सहज चाल लावून सादर करता येतील असा नाद आहे. ती कधी गझलेच्या जवळ जाते तर कधी लोकगीताचा साज लेऊन आपल्याशी हितगुज करू पाहते. साधा आणि सहजपणा हा तिचा स्थायीभाव, परंतु तितकीच आशयाने संपन्न असलेली. वाचकाच्या मनाला हळुवारपणे साद घालणारी. कधी तिच्याच नादाने पुढे जाणारी. आपले ध्येय माहीत असलेली. कुठे थांबायचे याचे भान असलेली. त्यामुळे प्रत्येकाच्या मनातली. स्थळकाळाला आपल्या सोबत घेतलेली. ताजी आणि त्यावेळी आत्ममग्नतेत स्वतःला शोधणारी.

कविता ही ठरवून वा आखून लिहिली जात नाही. तसे झाले तर तिच्यातला कृत्रिमपणा लक्षात यायला वेळ लागत नाही. मुळात कविता अशी कागदावर कधी उतरत नाही. काळजाचा हुंकार, जमिनीतून बीज अंकुरावे तसा तिचा जन्म. तिच्यातला निरागसपणा आणि तितकाच निर्लेप प्रसन्ना मोहून टाकणारा. हा नितळपणा ज्या कवितेत सापडतो ती कविता सगळ्यांची होते. अशी ही सगळ्यांची कविता. कवीने अनेक विषयांना हात घातलेला आहे. तरुण वयातले उमलते उन्मेष सापडतात ते प्रेमाचे. किंबहुना अनेकांचे कवितालेखन सुरू होते ते या प्रेमाच्या नवथर भावनांतून. प्रेम आणि त्यातून वाट्याला येणारा विरह, ही संकल्पना काही नवीन राहिलेली नाही. अर्थात त्यामुळे शिळी झाली आहे, असेही म्हणता येणार नाही. सर्वकाळात ती चिरंतन आहे आणि राहणार आहे. कवी त्याला अपवाद असण्याचे कारण नाही. या संग्रहातील बऱ्याचशा कविता त्यांचा प्रत्यय देतात. ऋतुगंधात न्हाताना माझा स्वप्नपक्षी चंद्रकलांनी फुलतोय, तुझ्या नाजूक पावलांसाठी मी टाकला फुलांचा सडा, असे म्हणताना कवीने जणू तमाम प्रेमीजनांच्या मनातले बोल आपल्यासमोर ठेवले आहेत, असे म्हणता येईल. अशा तऱ्हेने व्यक्त होणे तरल पातळीवरचे ठरते. परंतु त्याचवेळी एक भाव महत्त्वाचा ठरतो. 'पाहून हे बेईमान तारे, मुशाफिरा थांबलास का रे? इथे चंद्रही कधी कधी काळवंडतो.' हे भान विसरता येत नाही.

उर्दू काव्यात मृत्यूचे दर्शन अपरिहार्य असते. त्याची अनेक रूपे अनुभवास येतात. या संग्रहातही हा अनुभव जिवंत आहे. 'माझ्या प्रेताला मीच खांदा देतो', 'इथल्या प्रत्येक प्रेताला मीच खांदा देतो', 'माझे मीच पाहतो मरण', 'समोर मृत्यू असूनही पतंग झेपे दिव्याकडे.' या प्रत्येक ओळीला खूप मोठे असे संदर्भ आहेत. ते नैराश्याकडे घेऊन जात नाहीत, तर अंतर्मुख करतात. 'शोधतो तळ अंतरीचा, कुणी म्हणती हा खेळ संचिताचा', 'शाश्वत पांथस्थ अशाश्वत क्षणांची चिरंतन वाट चालणारे', असे चिंतन वाचताना अध्यात्माच्या जवळ जाणारे सत्य समोर मांडले आहे, असे म्हणावेसे वाटते.

आपल्या भोवती असलेले वास्तव कवीने नजरेआड केलेले नाही. किंबहुना असलेले वास्तव किती भीषण आहे, स्वार्थ आणि पोकळपणाने कसे व्यापलेले आहे, यावरचा पडदा ते नेमकेपणाने वर उचलतात. 'गारपीटग्रस्तांना त्यांनी भरघोस मदत केली पण सरकारी कागदपत्रांत ती गहाळ झाली.' हे वास्तव कोण नाकारील? समूहाचे अज्ञान हे स्वार्थ जोपासण्यासाठी कुरवाळावे लागते. त्याचे भान येते तेव्हा खूप उशीर झालेला असतो. त्याविषयी कवी लिहितात, 'आम्हाला एक कळला असता तर त्यावर आम्हीही दोन शून्यं दिली असती.' 'कटाव', 'फास', 'प्रीतीचं फूल', 'शिवार' यासारख्या कविता लोकगीताशी जवळीक साधतात. तर काही ओळी आपल्याला वेगळ्याच अनुभवांच्या उंचीवर घेऊन जातात, जशा,'कोरा माठ झिर्पल्यावानी तू रडू नको मुळूमुळू', 'मोटेलाच असतो पाण्याचा कळवळा', 'पावशाच्या डोळ्यात चाहूल पावसाची'.


या कविता आशेची ज्योत तेवत ठेवतात. 'खेळ नियती, खेळ तू, जसा तुला हवा. थेंब थेंब तेलाने तेवत ठेवीन अखंड दिवा...', 'कधीतरी पहाट होईल हे सुंदर स्वप्न पाहत... डोळे सताड उघडे ठेवतो.' अशा ओळी ते सहजपणे लिहून जातात. या कवितांतून जसा आशावाद व्यक्त झाला आहे, तसा तो कवीबाबतही व्यक्त होतो. त्यांची तरलता, विषयाला भिडण्याची क्षमता, व्यक्तअव्यक्तातील नेमके अंतर, यामुळे ही कविता मनाला थेट भिडते. या कवितेविषयी प्रस्तावनेत प्रा. बाळासाहेब बोरसे यांनी आश्वासकतेचीच ग्वाही दिलेली आहे. दासू वैद्य यांनी केलेली पाठराखण तितकीच कौतुकाची आहे. स्वतः कवीने मनोगतात एक हृद्य आठवण दिलेली आहे. पावसात घडलेल्या दोन घटनांशी जोडलेली. कवितेची भिजलेली पहिली वही आणि मित्राच्या आईचा मृत्यू, याला कारण पाऊस. कवीच्या संवेदनशील मनावरचा हा ओरखडा ते आजही बाळगत आहेत. जो संवेदनशील असतो त्याच्या कविता भावनांच्या डोहातून वर येणे स्वाभाविकच असते, फुलांच्या गंधासारख्या. सुंदर कविता. सतीश भावसारांचे मुखपृष्ठही सुंदर आहे.

**मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**


Since 1942
Supreme®
People who know plastics best
पाईपिंगचे संपूर्ण समाधान
सुप्रीम परिवारातर्फे आपणा सर्वांना
दीपावली व नूतनवर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!
॥ शुभ दीपावली ॥
पाईपिंगच्या प्रत्येक गरजांसाठी 'सुप्रीम' ची दर्जेदार,
टिकाऊ व पर्यावरण पूरक उत्पादने...
8500 पेक्षा जास्त उत्पादने
दि सुप्रीम इंडस्ट्रीज लि. मुंबई/जळगाव
फोन: 022-4043 000, 0257-3050541, 42, 43, 44, 49
Toll Free No.: 1800-102-4707
www.supreme.co.in
pvc-pipes@supreme.co.in
Download the App
Supreme Pipes
आयुष्यभराची साथ...

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2019-2021
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, कुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.